# एडमंड बर्कचें चरित्र

म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र.

REFBK-0003329

ना. गो. चापेकर

राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
नुक्रम .............. दि. ..............
प्रति .............. नोंद ..............

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रम ............ विः ............
क्रमांक ............ नों. दि. ............

# एड्मंड बर्कचें चरित्र

नारायण गोविंद चापेकर

'गच्चीवरील गप्पा', 'पैसा', 'निवडक लेख' या पुस्तकांचे कर्ते

REFBK-0003329

बदलापुर (ठाणें)

विजयादशमी शके १८४९

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—

१ आर्यसंस्कृतिमुद्रणालय, चिमणबाग, टिळक रोड,
सदाशिव पेठ, पुणें.

२ पैसाफंडवस्तुभांडार, लक्ष्मीरोड, पुणें.

घर नंबर ६ शुक्रवार, पुणें, येथें आर्यसंस्कृति-मुद्रणालयात
वासुदेव गोपाळ परांजपे यांनीं छापिलें व बदलापुर
येथें नारायण गोविंद चापेकर यांनीं प्रसिद्ध केलें.

# अनुक्रमणिका


पुस्तकपरिचय (के. ल. ओगलेकृत) ... ... ३–९

दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना ... ... ... १०–१२

१ विद्यार्थिदशा ... ... ... ... १

२ कार्याचा प्रारंभ ... ... ... ... ८

३ पार्लमेंटांत प्रवेश ... ... ... १४

४ अमेरिकेचा प्रश्न ... ... ... २९

५ रॉकिंगहॅमचें प्रधानमंडळ ... ... ... ५४

६ वॉरन हेस्टिंग्जची चौकशी ... ... ... ७१

७ फ्रान्समधील राज्यक्रांति ... ... ... ९१

८ वार्द्धक्य, पुत्रशोक, व मृत्यु ... ... ... १४१

९ धर्मश्रद्धा ... ... ... ... १६९

१० बर्कचीं राजकीय मतें ... ... ... १७९

११ वक्तृत्व ... ... ... ... १९५

१२ स्वभाववर्णन ... ... ... ... २००

## परिशिष्ट (कांहीं भाषणें)

१ अर्काटच्या नबाबाचें कर्ज ... ... ... १

२ लग्नाच्या कायद्यावरील भाषण ... ... ... २९

सूची ... ... ... ... ३३

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३ | २२ | सोबतच्या | सोबत्याच्या |
| ६ | १४ | असे | असतो |
| ७ | ५ | राहून, | राहून |
| ८ | ४ | वर्षे | वर्षांनंतर |
| ३५ | २५ | दिसे | दिसे. |
| ३६ | १३ | देण्याची | घेण्याची |
| ४१ | ६ | . | , |
| ४२ | २५ | ब | व |
| ४५ | १५ | . | , |
| ५७ | सरती | . | , |
| १०६ | ६ | फेंच | फ्रेंच |
| १०९ | १८ | सेपाविल्या | सोंपविल्या |
| ११४ | २४ | करारोत्पादत | करारोत्पादित |
| ११५ | १५ | स्थितासि | स्थितीस |
| १२८ | ७ | फडण्यास | फेडण्यास |
| १३७ | २४ | कला | केला |
| १५२ | ४ | सांगितल्यामुळ | सांगितल्यामुळें |
| १६७ | २२ | पिछेहट | पिछेहाट |
| १८१ | १७ | लागते | लागते. |
| १९० | २६ | रजासीन्नच | राजासीन्नच |

## परिशिष्टाचें शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ५ | १४ | परिणामास | परिमाणास |
| ११ | ११ | टेलर | टेलर, |
| १६ | १२ | लेखांचे | लाखांचे |
| २२ | सरती | मोठा | मोठी |
| २४ | ३ | निभव | निभाव |
| २७ | २० | नावाबाच्या | नवाबाच्या |

# पुस्तकपरिचय

इंग्लंडचा इतिहास आणि ब्रिटिश अमदानींतील हिंदुस्थानाचा इतिहास यांशीं थोडाबहुत तरी ज्यांचा परिचय आहे, त्यांना एडमंड् बर्क या सुप्रसिद्ध तत्त्वज्ञानी मुत्सद्याची ओळख करून देण्याचें कारण नाहीं. खोल विद्वान्, आर्तांचा कैवारी, अश्रांतउद्योगप्रिय, इत्यादि बहुमोल गुणांबरोबर हिंदुस्थानाचा वाली म्हणून आम्हांला तो प्रिय झाला पाहिजे. हिंदुस्थानाविषयींचें आपलें प्रेम त्यानें वॉरन हेस्टिंग्जविरुद्ध झालेल्या खटल्यांत पराकाष्ठेची दगदग घेऊन व्यक्त केलें. ही त्याची कामगिरी हिंदी लोकांनीं त्याचें सदैव ऋणी राहण्यासारखी झाली यांत कांहीं शंका नाहीं. या कामगिरीमुळें हिंदुस्थानावर इंग्रज अधिकाऱ्यांकडून जुलूम व्हावयाचा बंद झाला किंवा येथें इंग्रजी राज्य स्थापन होण्याच्या कामीं विशेष अडथळा उत्पन्न झाला, असा कांहीं प्रकार नाहीं ही गोष्ट खरी. पण असा कांहीं परिणाम घडून आला नाहीं म्हणून बर्कच्या कळकळीला व त्यानें केलेल्या कामगिरीला कमीपणा येतो असें मुळींच नाहीं. त्याची कळकळ व अन्यायाची चीड हीं या खटल्यांत चांगलीं दिसून येतात. पण बर्कच्या या खटपटीचा प्रत्यक्ष परिणाम कांहींच झाला नाहीं असें मात्र नाहीं. हेस्टिंग्ज जरी आपल्यावरील खटल्यांतून दोषमुक्त होऊन निसटला, तथापि त्याचीं कृष्णकारस्थानें व अनुचित जुलूम हे जगजाहीर होण्याला हा खटला कारणीभूत झाला व त्यामुळें पुढें असे अन्याय करणारांना थोडी तरी दहशत बसली यांत शंका नाहीं. परंतु हिंदुस्थानांत तो काळच मुळीं हिंदी लोकांच्या अवनतीचा असल्यामुळें इंग्रजशाहीच्या कचाटींत सांपडणें या देशाला अपरिहार्य झालें. बर्कचा त्यांत कांहीं दोष नाहीं. हिंदी लोकांच्या दैवाचा तो भाग आहे. या खटल्याची सर्व हकीकत नीट वाचणाराला बर्कच्या निरपेक्ष कळकळीबद्दल खात्री वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. त्याच्या कामगिरीचा फायदा घेण्याइतकी अक्कल दुर्दैवानें हिंदी लोकांत

त्यावेळीं दिसून आली नाहीं. विविधज्ञानविस्ताराच्या मे १९२७ च्या अंकांत रा. वाकसकरांनीं रघुनाथरावदादा पेशव्यासंबंधानें जीं पत्रें प्रसिद्ध केलीं आहेत, (पुढें पृष्ठ १७१ पहा) त्यांवरून हिंदी लोकांची अवनति उघड दिसून येते. अर्थात् इंग्रजांच्या हिंदुस्थानविषयक धोरणाला आळा घालण्याच्या कामीं बर्कचा झाला तरी फारसा उपयोग होण्याचा संभव नव्हता. घरचा यजमान आपलीं द्रव्य ठेवण्याचीं स्थानें कंदील घेऊन चोराला दाखवून देण्यास पुढें झाला असतां इतरांच्या प्रयत्नाला यश येऊन त्याच्या द्रव्याचें रक्षण कितीसें होणार ? पण तें कांहीं असलें तरी बर्कनें वॉरन हेस्टिंग्जवरील खटल्याच्या प्रसंगानें आपली निरपेक्ष परोपकारी वृत्ति व्यक्त केली यांत शंका नाहीं. हिंदुस्थानांत इंग्रजी राज्य स्थापण्याची दैवी कामगिरी ज्या इंग्रज गृहस्थांनीं केली त्यांपैकीं कित्येकांच्या हातून प्रसंगीं केवढीं अनीतीचीं कृत्यें झालीं याची कल्पना या खटल्यांतील बर्कच्या भाषणांत आलेल्या माहितीवरून चांगलीच येते. अर्काटच्या नबाबाला कर्ज देण्याचा बहाणा करून तेथें इंग्रज व्यापाऱ्यांनीं कसा धुडगूस घातला व नबाबाची काय दशा केली याची हकीकत बर्कच्या भाषणांत वाचल्यावर हल्लींच्या कित्येक सावकारांच्या काळ्याकुट्ट म्हणून अधिकारी वर्गाकडून रंगविलेल्या चित्रांना फारच चांगलें म्हणावें लागेल. अर्काटच्या नबाबाच्या कर्जाच्या बाबतींत इंग्रज व्यापाऱ्यांनीं लढविलेल्या डावपेंचांच्या व निंद्य वर्तनाच्या पासंगासहि मारवाडी सावकारांचीं कृत्यें लागावयाचीं नाहींत. पण ही माहिती प्रथम मोठ्या परिश्रमानें सरकारी कागदपत्रांवरून मिळवून जाहीर करण्याचें काम बर्कनेंच केलें. नबाबासारख्या तत्कालीन हिंदी लोकांना बर्कच्या या कामगिरीची वार्ताहि कदाचित् कळली नसेल, मग त्या कामगिरीनंतर योग्य तो धडा शिकून इंग्रजी डावपेंचांच्या तोडीस तोड करण्याची गोष्टच बोलावयास नको. पण तत्कालीन हिंदी लोकांना स्वार्थबुद्धीनेंहि बर्कच्या कामगिरीचें चीज करावें असें जरी वाटलें नसलें, तरी आजच्या हिंदी वाचकांनीं कृतज्ञताबुद्धीनें त्या कामगिरीचें महत्त्व जाणून घेणें अवश्य आहे.

बर्क हा राजकारणी पुरुष खरा; पण त्याचें राजकारण सात्त्विक वृत्तीचेंच एकंदरींत होतें. त्याची दृष्टि केवळ राष्ट्रीय नसून आंतरराष्ट्रीय झालेली होती. त्याला आपल्या स्वतःच्या आयर्लंड देशासंबंधानें अत्यंत प्रेम होतें व त्याला अधिक

सुख व्हावें म्हणून त्यानें प्रयत्नहि केला. पण आपल्या स्वतःच्या देशाइतकेंच त्याला हिंदुस्थान, किंवा अमेरिका यांबद्दलहि प्रेम होतें व अन्याय हा कोणावर व केव्हांहि होऊं नये असें त्याला वाटत असे. वॉरन हेस्टिंग्जच्या खटल्यांत जसें त्यानें हिंदुस्थानांतील दुर्बल लोकांविषयीं कळकळीचें प्रेम दाखविलें, तसेंच अमेरिकेंत लोकांनीं आपल्या हक्कांविषयीं चालू केलेल्या झगड्यांतहि त्यांची बाजू घेऊन त्यानें दाखविलें. अशा रीतीनें त्यानें आपली दृष्टि केवळ राष्ट्रीय नसून सार्वराष्ट्रीय म्हणजे साधुपणाची होती हें उघड दाखविलें आहे. बर्कच्या या वृत्तीमुळें त्याच्या वर्तनांत व उक्तींत विसंगतपणा उत्पन्न झालेला कित्येकांना दिसून येतो. पण त्याच्या वर्तनांत आणि बोलण्यांत प्रसंगानुरोधानें भासणारा विरोध वास्तविक नसून केवळ बाह्यात्कारीच होता. अमेरिकेंतील लोकांनीं आपल्या हक्कसंरक्षणार्थ केलेला झगडा बर्कला पसंत होता, पण फ्रेंच लोकांनीं केलेला आपल्यावरील पिढीजात जुलमाचा प्रतिकार मात्र त्याला नापसंत ठरून त्यांच्याविरुद्ध त्यानें आपलें जबरदस्त टीकास्त्र पाजळून सगळ्या यूरोपला फ्रेंच राज्यक्रांतीविरुद्ध उठावयास लावण्याचें पातक केलें असा त्याच्यावर कित्येकांचा आरोप आहे. बर्क आणि फॉक्स हे उभयतां स्नेही असून फ्रेंच राज्यक्रांतिविषयक मतभेदामुळें त्यांच्यामध्यें जन्माची तेढ उत्पन्न झाली हें प्रसिद्धच आहे. पण हा जो विरोध दिसतो तो बर्कच्या राजकीय तत्त्वांच्या दृष्टीनें विरोध नसून सारा सुसंगतपणाचाच प्रकार आहे. फ्रेंच लोकांच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या प्रयत्नाबद्दल त्याचा रोष नसून त्यांतील घोर अत्याचारांबद्दल तो होता. एकदां लढा सुरू झाला म्हणजे उभयपक्षीं थोडाबहुत अत्याचार प्रसंगानें होणार याची त्याला जाणीव होती आणि तदनुसार अमेरिकन संस्थानांनीं इंग्लंडविरुद्ध शस्त्र उपसलें तरीहि त्यानें त्यांच्याविरुद्ध कांहीं दोषारोप न करतां त्यांची तरफदारीच केली आणि फ्रेंच लोकांनींहि जर आपलें स्वातंत्र्य मिळविल्यानंतर लगेच योग्य रीतीची राष्ट्राची पुनर्घटना करण्याचा प्रयत्न केला असता तर बर्कनें त्यांची वाहवाच केली असती. परंतु फ्रेंच राज्यक्रांतीचा इतिहास म्हणजे केवळ परंपरागत जुलमाचा प्रतिकार करून स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं केलेल्या राष्ट्रीय दृष्टीच्या प्रयत्नांचा इतिहास नसून भरमसाट अत्याचारांचा तो इतिहास आहे. फ्रेंच लोक हे

अत्याचार आपल्या देशांतच करून थांबत, तरीहि एकवार पुरवतें; पण त्यांनीं आपल्या अत्याचारांचा झेंडा सर्व यूरोपभर फडकविण्याचा बेत जेव्हां जाहीर केला, तेव्हां बर्कच्या मनाला धास्ती उत्पन्न होऊन यूरोपखंड या वणव्यांतून सुटावें म्हणून त्यानें आकाशपाताळ एक करून सोडिलें.

या सर्व गोष्टींचा विचार केल्यास बर्कला कोणीहि अन्याय केला तरी तो अक्षम्य वाटत आहे हीच गोष्ट प्रतीतीस येते. अन्याय दिसला कीं त्याला सर्व बळ खर्च करून तोंड द्यावयाचें असा त्याचा स्वभाव होता. अन्यायाची त्याला तीव्र चीड असे व त्याचा प्रतिकार करण्यास तो मुळींच आळस करीत नसे. वॉरन हेस्टिंग्जचा खटला, अमेरिकन संस्थानांचा प्रश्न आणि फ्रेंच राज्यक्रांति या सर्व प्रसंगींच्या त्याच्या वर्तनांत ही एकच गोष्ट दिसून येते. पण त्याला अन्यायाची अत्यंत चीड असली तरी त्याचा प्रतिकार करण्याचा बर्कचा मार्ग सरळ व शांततेचा असाच असे. आपल्याला आलेली अन्यायाची चीड तो अत्यंत कठोर शब्दांनीं व्यक्त करी; परंतु याच्या पलीकडे जाण्याची त्याची तयारी व इच्छा नव्हती व त्यामुळें मॅझिनी किंवा मॅक्स्विनी यांच्या वर्गांत तो अर्थातच पडत नाहीं. त्याच्या अन्यायाच्या प्रतिकारमार्गांत आपल्या वक्तृत्वाचा आणि खोल व विस्तृत वाचनाचाच उपयोग त्यानें केला. पण एवढ्यावरून त्याची देशभक्ति किंवा अन्यायाविषयींची चीड कमी प्रतीची मात्र ठरत नाहीं. कारण अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठीं त्या अन्यायाचें खरें पूर्वस्वरूप उघडकीस आणण्यास जी अवाढव्य खटपट केव्हां केव्हां करावी लागते ती करावयास त्यानें केव्हांहि माघार घेतली नाहीं. हेस्टिंग्जच्याविरुद्ध पुरावा गोळा करण्यांत जी तसदी त्यानें घेतली तीवरून त्याची कळकळ कोणालाहि उघड होईल. त्या कळकळीचें रूप निराळ्या शब्दांनीं सांगावयाचें तर एवढें सांगितलें म्हणजे पुरें कीं त्या खटल्यापासून त्याला कांहीं फायदा नसतांहि त्यानें जो खटाटोप केला त्यामुळें त्यानें ह्या खटल्याचें काम हेस्टिंग्जवर सूड घेण्यासाठीं अंगावर घेतलें असें त्याच्या विरोधकांनीं तर त्यावेळीं म्हटलेंच, पण फ्रॅंक ब्राइट

सारख्या इतिहासकारांनींहि सुडाचा आरोप त्याच्यावर* केला आहे. पण हेस्टिंग्जचा व बर्कचा अर्थाअर्थी कांहींच संबंध नसल्यामुळें बर्कचें कृत्य सुडाच्या इच्छेनें प्रेरित झालेलें नसून अन्यायाची चीड हीच त्याच्या मुळाशीं होती हें उघड होतें; असो.

हिंदी लोकांनीं बर्कच्या चरित्राशीं परिचय करून घेण्याला इतर सर्व सामान्य कारणांबरोबर कृतज्ञतेचें विशेष कारण आहेच; पण त्याच्यासारखेंच आणखीहि महत्त्वाचें कारण आहे. बर्कच्या वेळीं आयर्लंड हें अर्धेमुर्धे तरी स्वतंत्र राष्ट्र होतें व त्याला वेगळें पार्लमेंटहि होतें. परंतु त्या पार्लमेंटचे सभासद निवडण्याची पद्धति अत्यंत सदोष होती. इंग्लंडांतहि हीच स्थिति होती. त्यामुळें पार्लमेंटच्या सुधारणेचा प्रश्न त्यावेळीं वारंवार पुढें येई आणि बर्कलाहि तदनुसार त्या विषयावरील आपले विचार प्रकट करावे लागले आहेत. प्रातिनिधिक सभेचे सभासद कसे निवडावे, त्यांचे संबंध मतदारांशीं कसे असावे इत्यादि विषयांवर त्यानें प्रकट केलेले विचार अत्यंत मननीय आहेत. गेल्या कांहीं वर्षांतील हिंदी कायदेकौन्सिलांच्या निवडणुकीच्या प्रसंगीं अनेक पक्षांकडून जे उद्गार निघाले व ज्या भरमसाट तत्त्वांचा पुरस्कार करण्यांत आला त्यांच्या परिणामांचा विचार करतां बर्कचे प्रातिनिधिक संस्थाविषयक विचार किती उपयुक्त आणि हितकारक आहेत हें समजून येईल. आमच्या कायदेकौन्सिलादि प्रातिनिधिक संस्थांचे सभासद निवडून देणाऱ्या मतदारांनीं व उमेदवारांनीं सुद्धां बर्कचे या विषयावरील विचार नित्य लक्षांत ठेविल्यास आमच्या निवडणुकींना व नंतरच्या प्रातिनिधिक संस्थांच्या कार्याला निःसंशय इष्ट वळण लागेल. तेव्हां या दृष्टीनें सुद्धां बर्कचें चरित्र हिंदी लोकांना आदरणीय झालेलें आहे.

---

* At home he (Hastings) was well received but he had two *ivndinctive enemies* in the House of Commons; one, Edmund Burke the other Philip Francis.–Bright's History Page, 1139.

बर्कच्या चरित्राचें असें महत्त्व असतांहि त्याच्याकडे यावें तितकें लक्ष आजवर दिलेलें दिसत नाहीं. त्याचें प्रस्तुत मराठी चरित्र पंचवीस वर्षांपूर्वी कै. विष्णु गोविंद ऊर्फ अण्णासाहेब विजापूरकर यांच्या तत्कालीन ग्रंथमाला नामक मासिक पुस्तकांत जें एकदां प्रसिद्ध झालें त्याची दुसरी आवृत्ति इतक्या वर्षांनंतर आज निघत आहे. या अवधींत हिंदुस्थानच्या राजकारणविषयक परिस्थितींत पुष्कळ फरक पडला आहे व त्यामुळें जे विचार जातां जातां प्रकट करणें त्या काळाला अनुसरून होतें ते आतां सांगण्यांत स्वारस्य नसल्यामुळें ते या आवृत्तींत शक्य तितके गाळले आहेत. तथापि एकंदरींत पाहतां मूळ पुस्तकांत फारसा फरक केलेला नाहीं; असो.

बर्कच्या चरित्राकडे आजवर जावें तितकें महाराष्ट्रीय लेखकांचें किंवा वाचकांचें लक्ष गेलेलें नाहीं हें उघड आहे. याचें कारण कदाचित् बर्कचें धोरण असावें असें वाटतें. त्यानें अन्यायाच्या प्रतीकारार्थ जे प्रयत्न केले ते सारे सात्त्विक होते. आयर्लंडसंबंधानें असो, अमेरिकेसंबधानें असो कीं हिंदुस्थानासंबंधानें असो, त्यानें जी कामगिरी केली ती पार्लमेंटच्या द्वारा आपले विचार सर्वांपुढें मांडूनच केली. क्रांतिकारकांप्रमाणें गुप्त कट इत्यादि खटपटी त्यानें केल्या किंवा करविल्या नाहींत. त्याचें चरित्र म्हणजे वक्तृत्वाचा, माहिती जमविण्याच्या प्रयत्नाचा, सार्वजनिक गाऱ्हाण्यांची सरळ कायदेशीर मार्गानें दाद लावून घेण्याच्या खटपटींचा इतिहास होय. त्यांत दीर्घश्रम, कळकळ, बुद्धिचातुर्य, सालसपणा, सौजन्य, विद्वत्ता इत्यादिकांचें भरपूर दर्शन घडत असलें, तरी अद्भुत रम्य कथा त्यांत नाहींत. पूर्वी सांगितल्याप्रमाणें मॅझिनी, विल्यम टेल, मॅक्स्विनी इत्यादिकांसारखीं धाडसाचीं कृत्यें त्यांत नाहींत. आजच्या धडाडीच्या राजकीय परिभाषेंत बोलावयाचें तर बर्कच्या चरित्रांत क्रांतीचा इतिहास नसून सनदशीर चळवळीचा इतिहास आहे. आणि म्हणून मॅझिनीसारख्यांच्या चरित्राशीं हें लाविलें असतां कित्येकांना तें तितकें आकर्षक वाटलें नसेल. परंतु बर्कनें प्रत्यक्ष शस्त्र धरिलें नसलें, तरी अमेरिकन संस्थानांनीं शस्त्र धरिलें असतां त्याचा त्यानें निषेध न करितां त्याचें समर्थनच त्यानें केलें. इतकी बर्कच्या सनदशीरपणाची मजल जाऊं शके; पण एकंदरींत त्याचे मार्ग सनदशीर खरे. उदा-

हरणार्थ इकडे अमेरिकेंतील लढा चालू असतां आयर्लंडमध्यें त्यामुळें प्रोत्साहन मिळून आयरिश पुढारी ग्रॅटन यानें स्वयंसैनिक पथकांच्या जोरावर आपल्या पार्लमेंटमध्यें आयर्लंडाला आर्थिक स्वातंत्र्य मिळवून देण्याचा ठराव पास करून घेतला व इंग्लंडांतील लार्ड नॉर्थसारख्या मुत्सद्यांनींहि अमेरिकेंतील कटकटीकडे लक्ष देऊन लोकविरोधाला न जुमानतां इंग्लंडमधील पार्लमेंटांत बिलें आणून त्या ठरावाला संमति दिली. ग्रॅटनला हा जो विजय मिळाला त्याचा फायदा घेऊन त्यानें आणखी दोन वर्षांनीं त्या स्वयंसैनिकांच्या पथकांच्या जोरावरच आणखी पुढें जाण्याचें ठरविलें आणि आयरिश पार्लमेंटाचा कायदे करण्याचा स्वतंत्र अधिकारहि इंग्लिश पार्लमेंटकडून मान्य करविला. पण बर्कला हा ग्रॅटनचा कार्यक्रम पसंत न पडून त्यानें ग्रॅटनचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. ग्रॅटननें त्याचें न ऐकतां आपला कार्यक्रम तडीस नेला ही गोष्ट वेगळी. अमेरिकेच्या लोकांविषयीं एका बाजूनें सहानुभूति दाखवीत असतांहि त्या लढ्याचा फायदा आयर्लंडनें स्वयंसैनिकपथकांच्या जोरावर घेऊन इंग्लंडला आणखी पेंचांत घालूं नये असा बर्कचा आशय असावा व त्यावरून त्याचा शांततेचा सनदशीरपणाच व्यक्त होतो. पण एकंदरींत राजकीय तत्त्ववेत्ता म्हणून त्यानें केलेली कामगिरी व ती करतांना बोलून दाखविलेले किंवा लिहून ठेविलेले विचार सर्वोत्कृष्ट असून तेवढ्यासाठीं त्याचें चरित्र अवश्य वाचण्यासारखें आहे. हे सर्व विचार चरित्रग्रंथांत देणें शक्य नाहीं; तरी त्याचें सामान्य धोरण यांत आलें आहे. बर्कच्या लेखांचा व भाषणांचा संग्रह इंग्रजी भाषेंत सविस्तर छापला असून मोर्लेसारख्यांनीं त्याचीं चरित्रेंहि लिहिलेलीं आहेत. त्यांचा उपयोग करून ग्रंथकारांनीं हें त्या राजकीय तत्त्ववेत्त्याचें चरित्र लिहिलें. आजच्या राजकीय चळवळीला अशा चरित्रांशीं परिचय असणें अवश्य असल्यामुळें त्या चरित्राची ही द्वितीयावृत्ति काढण्यांत आली आहे. तिचा महाराष्ट्र वाचकवर्गाकडून आदर होईल अशी आशा बाळगून ग्रंथकाराच्या साधिकार आज्ञेवरून लिहावयास घेतलेली ही प्रस्तावना पुरी करतों.

**केशव लक्ष्मण ओगले.**

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

आपलें म्हणून जें कांहीं असेल तें सर्वथैव निर्मळ असें वाटणें हा मनुष्य-धर्मच आहे. तदनुसार चरित्रलेखकाला आपलें लेखन उत्तम भासतें एवढेंच नव्हे तर आपला चरित्रनायकहि परमश्रेष्ठ असा वाटतो. कदाचित् अशाच-सारख्या कांहीं कारणांकरितां आपल्या पुस्तकाला दुसऱ्याकडून प्रस्तावना लिहून घेण्याचा प्रघात पडला असावा. कारण तिऱ्हाईत माणसाला निर्विकार मनानें चरित्राची अथवा चरित्रनायकाची यथार्थ योग्यता जशी ठरवितां येते तशी स्वतः चरित्रकाराला त्याच्या चरित्रनायकावरील प्रेमातिरेकामुळें अर्थातच ठरवितां येत नाहीं. मात्र प्रस्तावनाकारानें लेखकाशीं आपलें तादात्म्य करून घेऊन त्याचा केवळ भाट बनणें हें या अन्यथा प्रशंसनीय रूढीचें विकृत स्वरूप होय. ह्या दुसऱ्या प्रकारचीं उदाहरणें सध्यां कमी सांपडतील असें नाहीं. असो, ह्या दृष्टीनें श्री. केशवराव ओगले यांनीं या चरित्राकरितां लिहिलेली प्रस्तावना महत्वाची ठरते. त्यांचे ह्याबद्दल मोकळ्या मनानें आभार मानणें हें माझें कर्तव्यच आहे. पण आणखी विशेष हें कीं नुसती प्रस्तावना लिहूनच ते राहिले नाहींत, तर सर्व चरित्र त्यांनीं एकवार काळजीपूर्वक वाचून त्यांतील व्याकरणाचे व भाषेचे दोष काढून टाकण्यांत मला फारच मदत केली. आपल्या पाठीमागचे अनेकविध व्याप बाजूस सारून असलें किचाट काम त्यांनीं मनोभावानें केलें हे त्यांचे मजवर उपकार आहेत. याशिवाय प्रुफें तपासण्याच्या कामीं सर्वथैव साहाय्य केल्याबद्दल प्रो. वा. ना. गोडबोले यांचे व सूची तयार करण्याच्या कामीं मदत केल्याबद्दल सॉलिसिटर गंगाधर विश्वनाथ गोखले यांचे आभार मानणें अवश्य आहे.

रा. ओगले यांनीं आपल्या प्रस्तावनेंत राजकीय तत्ववेत्ता ह्या नात्यानें बर्कची योग्यता फार मोठी आहे ही गोष्ट वाचकांच्या निदर्शनास आणिलीच आहे. खरोखरच बर्कचें राजकीय तत्वज्ञान अद्वितीय होतें. लॉर्ड मोर्ले व ग्लॅडस्टन या

दोघांनींहि एतद्विषयक बर्कचा मोठेपणा मान्य केला आहे. ग्लॅडस्टनचें चरित्र लॉर्ड मोर्ले यांनीं लिहिलें आहे, त्यांत ग्लॅडस्टनच्या रोजनिशींतला एक उतारा दिला आहे तो असा : 'Read Burke. What a magazine of wisdom on Ireland and America. Made many extracts from Burke. Sometimes almost divine. 'बर्क वाचला. आयर्लंड व अमेरिका ह्यांविषयीं सुविचारांचें केवढें हें भांडार! बर्कमधून पुष्कळ उतारे घेतले. कांहीं ठिकाणीं तर बहुतेक देववाणीच '!

लॉर्ड मेकॉलेनेंहि बर्कविषयीं अत्यंत प्रशंसापरच उद्गार काढले आहेत. त्यानें रोजनिशींत पुढीलप्रमाणें लिहून ठेविलें आहे. 'I have now finished reading again most of Burke's works. Admirable! The greatest man since Milton'.

'मी आतां बर्कचे बहुतेक ग्रंथ पुनः वाचून टाकले. फारच नामी. मिल्टनच्या पश्चात् सर्वांत मोठा मनुष्य. '

ग्लॅडस्टनच्या चरित्रांत ग्लॅडस्टन-मोर्ले संवाद दिला आहे. त्यावरूनहि बर्कचा मोठेपणा प्रस्थापित होतो.

ग्लॅडस्टन--मी बर्कला त्रिखंड मनुष्य समजतों. अमेरिका, फ्रान्स, आयर्लंड, दोहोंच्या बाबतींत बरोबर. एकाच्या बाबतींत चूक.

मोर्ले--तुम्हांला ह्यामध्यें आणखी स्वदेश व हिंदुस्थान घालावयास नको काय? असंतोषावरील त्याच्या विचारांत प्रजास्वातंत्र्यार्थ चाललेल्या लढ्याची योग्य तरफदारी मोठ्या कुशलतेनें केलेली दिसते; त्याचप्रमाणें त्यांत पराकाष्ठेचें अप्रतिम शहाणपणाहि भरलेलें दिसून येतें. तसेंच त्यानें वॉरन हेस्टिंग्जच्या चौकशींत चौदा वर्षें सारखे परिश्रम केले व इंग्लंडला हिंदी लोक आणि राजेरजवाडे यांचे हक्क, त्याचप्रमाणें खुद्द इंग्लंडचें त्यांच्यासंबंधानें असलेलें कर्तव्य यांची जाणीव करून दिली. म्हणून पांचांपैकीं चारांसंबंधानें बर्क बरोबर होता असें म्हटलें पाहिजे.

ग्लॅडस्टन—होय, होय. अगदीं बरोबर. माझ्या तिघांबरोबर या दोहोंचा समावेश केलाच पाहिजे.

बर्कच्या राजनीतिशास्त्रनैपुण्याचा आणखी पुरावा तो काय पाहिजे? म्हणून राजकारणांत प्रत्यक्ष पडणाऱ्या अथवा न पडणाऱ्या प्रत्येक स्त्रीपुरुषानें बर्कचीं मतें समजावून घेणें अवश्य आहे. आमच्या इकडे कै. माधवराव गोळे यांचीं 'हिंदुधर्म आणि सुधारणा', 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' हीं दोन पुस्तकें वाचतांना बर्कचें स्मरण झाल्याशिवाय रहात नाहीं. जुन्या चालीरीतींचें इतकें कुशल समर्थन अन्यत्र आढळणार नाहीं. रूढिप्रियता हें या दोघा विद्वानांचें वैशिष्ट्य होय. या कारणानेंच फ्रेंच राज्यक्रांति बर्कला पसंत पडली नाहीं. सुधारणा घडवून आणण्यासाठीं विध्वंस करण्यास तो तयार नव्हता. रूढिप्रिय असूनहि बर्कसारखा सुधारक क्वचितच आढळेल. समाजाचें स्थैर्य व समाजाची प्रगति यांचीं तत्वें त्यास करतलामलकवत् होतीं. त्याच्याइतकें थोर मन, कडक निस्पृहता, व्यापक दृष्टि, न्यायप्रियता, अन्यायाविषयीं तिरस्कार, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आत्मौपम्यबुद्धि हे गुण बर्कशिवाय इतर कोठें कोणाला आढळतील? आमच्याकडील होतकरू तरुण माणसांनीं बर्कचीं मतें समजून घ्यावीं, त्यांचा अभ्यास करावा, मनन करावें आणि मग आपल्या सार्वजनिक कार्यास आरंभ करावा अशी त्यांस प्रार्थना आहे.

बदलापूर,<br>
गणेशचतुर्थी,<br>
शके १८४९.

**ना. गो. चापेकर.**

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना.

आजकाल वाचनाची अभिरुचि आमच्यांत इतकी मंद आहे कीं, कदाचित् आपल्या प्रिय पुस्तकाचें वाचकत्व पतकरण्याचें काम लेखकालाच उरकून घ्यावें लागत असेल. विश्वविद्यालयांची स्थापना होऊन अर्ध शतक गेल्यावरहि, जर अशी लाजिरवाणी स्थिति आहे, तर त्यावरून विद्यमान शिक्षणपद्धतींत मोठी गोम आहे हें उघड आहे. प्रत्येक कुटुंबाचें स्वतःचें पुस्तकालय असून त्यांत निवडक ग्रंथांचा समावेश करून प्रतिदिनीं थोडेंबहुत तरी वाचण्याची लालसा कुटुंबांतील प्रत्येक मनुष्यांत जेव्हां उत्पन्न होईल, तेव्हांच ग्रंथकारास उत्तेजन येऊन उत्तम ग्रंथ लिहिले जातील. सध्यांच्या स्थितींत लोकांमध्यें वाचनाची अभिरुचि उत्पन्न करावयाची असल्यामुळें, लेखकांनीं आपल्या विषयाची निवड फार जपून केली पाहिजे, हें खरें आहे; तथापि बर्कसारख्या परकीयाच्या चरित्र लेखनाचा एवढा काय उपयोग म्हणून प्रश्न केला जातो व तोहि सुशिक्षित व कॉलेजांत बर्कची व ज्यांची ओळख झालेली असते, त्यांच्याकडून आलेला पाहून फार आश्चर्य वाटतें. परीक्षेकरतां बर्कच्या एका उत्कृष्ट ग्रंथाचें वर्षभर अध्ययन करूनसुद्धां त्याचे अधिक ग्रंथ वाचण्याविषयीं अथवा त्याच्या चरित्रश्रवणाविषयीं कुतूहल उत्पन्न होऊं नये हीच सांप्रतच्या दोषयुक्त शिक्षणपद्धतीवर बिनतोड टीका होय. आतां निव्वळ मराठी वाचकांनीं वरील आक्षेप घेतल्यास तो अगदींच सयुक्तिक नाहीं असें नाहीं. परकीयांच्या चरित्रलेखनापूर्वी एतद्देशीय थोर पूर्वजांचीं चरित्रें लिहिणें हल्लींच्या स्थितींत अगत्याचें व हितावह आहे हें कबूल आहे. पण बर्कचें चरित्र म्हणजे एका परराष्ट्रीयाचें चरित्र असें मानणें चुकीचें आहे. तो हिंदूंत हिंदु, मुसलमानांत मुसलमान व ख्रिस्त्यांत ख्रिस्ती असा असल्यामुळें, सर्व मानव जातीचा त्याच्यावर सारखाच हक्क आहे. तथापि बर्कचें चरित्र हिंदुस्थानवासीयांनीं लिहिणें हें त्यांचें कर्तव्य असल्यामुळें त्याच्या उपयुक्तानुपयुक्ततेचा विचार करण्याची आवश्यकता रहात नाहीं. वास्तविक पाहतां ह्याच्यापूर्वीच त्याचें चरित्र लिहिलें गेलें पाहिजे होतें. ब्रिटिश अंमल चालू झाल्यापासून तों आजपर्यंत, म्हणजे बर्कच्या पश्चात् एक शतकानंतर हिंदुस्थानच्या कारभाराकडे जर कोणी मुत्सद्यानें ब्रिटिश लोकांचें लक्ष लावलें असेल

तर तें एका बर्कनेंच होय. असह्य ज्वरवेदना कमी करणाऱ्या वैद्याचे जसें आपण उतराई होतों, त्याप्रमाणेंच राणीच्या प्रतिनिधींची अन्यायतीव्रता कमी करविणाऱ्या उदारचरिताचेहि आपण अत्यंत ऋणी आहों. तें ऋण फेडण्याचें सामर्थ्य तर आपणांत नाहींच नाहीं, पण त्याच्या चरित्रलेखकानें आपली कृतज्ञता प्रदर्शित करणें हा आपला धर्म आहे. शिवाय असें कीं, सांप्रतचा काल बर्कसारख्या राजकीय तत्ववेत्त्याचें चरित्र लिहिण्यास फारच अनुकूल व योग्य आहे. शिक्षणप्रसारानें प्रजाजन ह्या नात्यानें आपणांस कांहीं हक्क आहेत असें आतां इकडील लोकांस समजूं लागलें आहे. अशा समयीं इंग्लंडांतलिच एका नामांकित मुत्सद्याचीं उदार राजतत्वें लोकांस समजणें फार अगत्याचें व हितावह आहे. अर्वाचीन पाश्चात्य राजनीतिवेत्त्यांच्या राजकीय वचनांचें अध्ययन केल्यानें आपले हक्क संपादन करण्यास आपणांत धैर्य व सामर्थ्य आल्याविना राहणार नाहीं.

बर्कला मरून शंभर वर्षे झालीं. त्याच्या मरणतिथीचा वर्षशतोत्सव इंग्लिश-लोकांनीं नुकताच केला. एवढ्या मुदतींत त्याच्या तोडीचा एकच मुत्सद्दी इंग्लंडांत निपजावा, एवढ्यावरूनच बर्कच्या असामान्य बुद्धिमत्तेची कल्पना करतां येईल. ग्लॅडस्टन साहेब नुकतेच निवर्तल्यामुळें त्यांच्या गुणावगुणांचें परी-क्षण सर्वत्र होत आहे. त्यांत अर्थातच पूर्वीं गाजलेल्या नामांकित मुत्सद्यां-बरोबरहि त्यांची तुलना केली जात आहे. त्यांत जरा जास्त घोटाळ्याचा प्रश्न म्हटला म्हणजे बर्क व ग्लॅडस्टन ह्या दोघांत श्रेष्ठ कोण हें ठरविणें होय. इंग्लिश लोकांचा कल एकंदरींत ग्लॅडस्टनला श्रेष्ठत्व देण्याकडे आहे. घेत-लेल्या विचारसाहित्यावरून त्यांनीं काढलेलें अनुमान केवळ चुकीचें नाहीं. पुरते-पणीं सर्व गोष्टींचा विचार न केल्यामुळें त्यांच्या अनुमानांत चूक झाली आहे. तात्विक दृष्टि, स्वाभाविक उत्सुकता, अत्यंत धार्मिक बुद्धि, नानाशास्त्रात्मक अशी अवाढव्य ज्ञानमर्यादा, सुवक वक्तृत्व, प्राचीनत्वाविषयीं पूज्यबुद्धि असूनहि अवश्य त्या सुधारणा करण्याविषयीं तत्परता, विलक्षण धैर्य, स्वातंत्र्यप्रियता आणि निःसीम सत्याचरण इत्यादि गोष्टींत ह्या दोघां मुत्सद्यांत चांगलेंच साम्य आहे. परंतु ग्लॅडस्टनचा ज्ञानसंग्रह जास्त विस्तृत व खोल होता असें जें कित्येकांनीं

ठरविलें आहे, त्याचा आम्हांस बराच संशय आहे. ग्रीक भाषाभिज्ञता व विशेषत: होमरच्या काव्याची रसिकता हे दोन गुण त्याच्या ठिकाणीं निर्विवाद विशेष होते. ह्याचप्रमाणें, निव्वळ धर्मशास्त्रवेत्ता ह्या दृष्टीनें पाहिलें असतांहि तो बर्कपेक्षां अधिक विद्वान् व प्रवीण ठरेल. आणि त्याचें वक्तृत्वसामर्थ्य तर अप्रतीम होतें ह्यांत संशय नाहीं. नुसत्या भाषेचा विचार केला तर बर्कची भाषा निःसंशय जास्त वक्तृत्वप्रचुर दिसते. ती भाषा वाचीत असतां प्रौढ वाङ्मयरसस्वादनाचा अनुभव वाचणाराला पदोपदीं येत असतो. परंतु ग्लॅडस्टनची वाणी इतकी मोहक होती कीं, उत्तरपक्ष करण्यास सज्ज होऊन आलेली मंडळी ग्लॅडस्टननें भाषण ऐकल्यावर विरघळल्यासारखी होऊन एकदम तन्मतानुयायी बनत असे. ह्याचें कारण भाषेव्यतिरिक्त इतरत्र कोठेंतरी असलें पाहिजे. ग्लॅडस्टनचें समक्ष भाषण न ऐकलेल्या पुढल्या पिढीस ह्या दोघां वक्त्यांचीं भाषणें वाचून त्यांच्या परिणामांत इतका भेद कां पडावा, ह्याचा उलगडा होणार नाहीं. बर्कच्या वक्तृत्वपरिणामाविषयीं खुद्द त्याच्या वेळच्या लोकांचीं परस्परविरुद्ध मतें झालीं आहेत. बर्कच्या वक्तृत्वाची स्तुति वाचीत असतां, असेंहि वाचण्यास सांपडतें कीं, हल्लींहि उत्तम मानलें जाणारें त्याचें भाषण 'अमेरिकेबरोबर सख्य' हें चाललें असतां अर्धा तास झाला नाहीं तोंच सभागृह रिकामें होऊं लागलें. उघड रीतीनें गेलों असतां बर्कचा अपमान होईल म्हणून हळूंच मागें पाऊल काढणाऱ्या अर्स्किननें त्या भाषणाचा रिपोर्ट वाचला, तेव्हां तो फाटेपर्यंत त्यानें खालीं ठेवला नाहीं. ह्यावरून बर्कची वाणी मधुर व मोहक नसावी असें दिसतें. पण ह्याशिवाय आणखीहि ह्या फरकाचें कारण असावेंसें वाटतें तें हें कीं, ग्लॅडस्टनच्या वेळेस इंग्लिश राष्ट्र जितकें उदारबुद्धि (लिबरल) झालें होतें, तितकें बर्कच्या वेळेस नव्हतें; त्यामुळें, बर्कच्या उदार विचारांचें बीज फारसें झालें नाहीं, व दुसरी एक गोष्ट विसरतां कामा नये कीं इंग्लिश लोकांचें प्रत्यक्ष नुकसान ज्यांत होतें, असे विषय बर्कच्या वेळेस उपस्थित झाले असून सर्व राष्ट्राला परिणामीं प्रिय परंतु तत्कालीं प्रतिकूल भाषणें करण्याचे प्रसंग आल्याकारणानें त्याच्या भाषणाचा परिणाम तसा झाला नाहीं. ह्या दोघां वक्त्यांपैकीं कोणाच्या भाषणांना चिरस्थायित्व मिळेल, ह्याबद्दल भावी इतिहासकारांच्या निर्णयाचा अदमास आज करणें जर अगदींच वावगें होणार

नाहीं तर तो बर्कला अनुकूल होईल असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु ग्लॅडस्टनपेक्षां बर्कची योग्यता आम्ही विशेष समजतों, ती वर निर्दिष्ट केलेल्या आनुषंगिक व अप्रधान गुणावगुणांवर नाहीं. त्याच्यामध्यें मोठा गुण हा होता कीं, त्याला अन्याय झालेला बिलकुल खपत नसे व ह्या त्याच्या विशिष्ट स्वभावामुळेंच हिंदुस्थानांतील वॉरन हेस्टिंग्जचीं दुष्ट कृत्यें उघडकीस आलीं, नाहीं-तर ह्या देशाकरितां विलक्षण परिश्रम करण्याचें कारण कांहींच नव्हतें. इंग्लिश राज्यांत हिंदुस्थान देश लोकसंख्येनें, क्षेत्रानें व दुसऱ्या कित्येक बाबतींमुळें विशेष महत्त्वाचा आहे. अशा देशाच्या राज्यकारभाराविषयीं बेफिकीर असणें म्हणजे मुत्सद्यानें आपलें अदूरदर्शित्व प्रकट करणें होय. उत्तर बंगल्यांत सर्व आयुष्य घालवून, त्यांतील दिवाणखाना माहीत नाहीं म्हणून म्हणणाऱ्या अजागळ गृहस्थाप्रमाणें हिंदुस्थानांतील राज्यकारभारासंबंधानें अज्ञता दर्शविणें हें इतर बाबतींत यथार्थ ज्ञान मिळविलेल्या ग्लॅडस्टनच्या सुकीर्तीस कांहींसें लांछनास्पद आहे. म्हणून ग्लॅडस्टनच्या पदरीं एक तर राज्यकारभारांत अदूरदर्शित्व येतें किंवा परस्पर चाललेल्या अन्यायाला अप्रत्यक्ष संमति बांधावी लागते. वाढदिवसानिमित्त, प्रतिसंवत्सरीं राष्ट्रीय सभेकडून अभिनंदनपर तारा घेणाऱ्या ग्लॅडस्टननें, हिंदुस्थानच्या कारभाराची माहिती करून घ्यावयास पाहिजे होती, एकंदरींत अन्याय व जुलूम झालेला पाहून तत्कर्त्यांविषयीं बर्कच्या मनांत संतापाग्नि पेटून जाई, तसा ग्लॅडस्टनच्या मनाचा प्रकार होत असलेला दिसत नाहीं. इंग्लिश लोकांना हिंदुस्थानची कधींच आठवण होत नसल्यानें ह्या देशासंबंधीं ग्लॅडस्टनचें कर्तव्य काय होतें ह्याचा त्यांनीं विचार केला नाहीं आणि म्हणूनच त्यांचीं ग्लॅडस्टनविषयींचीं अनुमानें भ्रष्ट झालीं आहेत.

हिंदुस्थानासंबंधानें बर्कचा आणखी एक अप्रतिम गुण उघडकीस आला आहे. त्याची कल्पनाशक्ति इतकी विलक्षण होती कीं, प्रत्येक बाबतींत भिन्न असलेल्या कोणत्याहि लोकांच्या रीतिभातीचा विचार त्या लोकांप्रमाणेंच त्यास करतां येई. हिंदुस्थानासंबंधीं झालेल्या त्याच्या भाषणांवरून स्पष्ट दिसतें कीं, एकाद्या विद्वान् व धूर्त हिंदुमुसलमानाप्रमाणें त्यांच्या आचारविचारांचें पृथक्करण त्यास करतां येई. आतां निव्वळ राजकीय तत्ववेत्ता म्हणून अर्वाचीन पिढीनें व खुद्द ग्लॅडस्टननें बर्कचें वर्चस्व मान्य केलें आहे तें भावी प्रजेला बदलण्याचें कारण पडेल असें वाटत नाहीं.

दा. क. 3329

# एड्मंड बर्कचें चरित्र.

## भाग पहिला.

### विद्यार्थिदशा

इंग्लंड देशाच्या पश्चिमेस आयर्लंड म्हणून एक लहानसें बेट आहे. हे बेट पूर्वी स्वतंत्र असून तद्द्वीपस्थ राजाच्याच अमलाखालीं असे; परंतु कालगतीनें त्याचें स्वातंत्र्य नष्ट होऊन राज्यकारभाराचीं सूत्रें प्रायः इंग्लिश पार्लमेंटच्या हातीं गेलीं. ह्या बेटांतील लोक उद्योगी, साहसी व स्वदेशभक्त आहेत. आजपर्यंत इंग्लंडांत ज्यांनीं ज्यांनीं नांव गाजविलें, व त्या देशाचें वैभव वाढविण्यास जे विशेष कारणीभूत झाले, त्यांपैकीं बरेच ऐरिश लोक होते. स्विफ्ट, गोल्डस्मिथ वगैरे विद्वद्रत्नें आयर्लंडांतच निर्माण झालीं. ह्याच देशांत डब्लिन शहरीं इ. स. १७२९ च्या जानेवारी महिन्याच्या १२ व्या तारखेस प्रस्तुतचरित्रनायकाचा जन्म झाला.

२ बर्कचें कुटुंब पूर्वी लिमरिक प्रांतांत राहात असे; परंतु कांहीं प्रसंग आल्यामुळें एड्मंड बर्कचा पणजा कॉर्क प्रांतांत, त्याचा जमीनजुमला होता, तेथें जाऊन राहिला. बर्कच्या बापाचें नांव रिचर्ड. तो प्रॉटेस्टंट धर्मानुयायी होता. डब्लिन शहरीं राहून तो वकिलीचा धंदा करीत असे. त्याचा धंदा इतक्या भरभराटीनें चालला होता कीं, त्या धंद्यांत त्याची बरोबरी करणारा

तेथें दुसरा कोणीहि नव्हता. इ. स. १७२५।२६ च्या सुमारास, त्याचें एका नेगल नांवाच्या कुलीन स्त्रीबरोबर लग्न लागलें. तिच्यापासून त्याला एकंदर १४।१५ मुलें झालीं. त्यांपैकीं ग्यारेट, एड्मंड रिचर्ड हे मुलगे व ज्युलियाना नांवाची मुलगी खेरीजकरून, बाकी सर्व लहानपणींच निवर्तलीं. ही ज्युलियाना फार थोर मनाची, ममताळु व शहाणी होती. वर्षारंभाच्या दिवशीं आंधळ्या, लंगड्या अशा दुर्बलांची ती स्वतः सेवा करी. वडील भाऊ ग्यारेट हा आपल्या बापाचा धंदा चालवीत असे. तो लग्न होण्याच्या पूर्वींच मरण पावला. ह्याची विनोदपर भाषणाबद्दल फार ख्याति असे. धाकटा भाऊ रिचर्ड हा मोठा लेखक, राज्यकारस्थानी व कायदेपंडित होता. हाहि अविवाहितच मेला. वडील मुलगा म्हणजे केवळ दादाच असून, कनिष्ठ मुलगा बुद्धिमान व तरतरीत असतो, असा आपल्याप्रमाणें त्या लोकांचाहि समज आहे. व फॉक्स आणि पिटप्रमाणें बर्क हा वडील मुलगा नव्हता, या गोष्टीची त्याच्या कित्येक इंग्रजी चरित्रकारांनीं आपल्या वाचकांस आठवण दिली आहे.

बर्कच्या लहानपणची हकीकत फारशी उपलब्ध नाहीं; परंतु जें कांहीं थोडें लिहिलेलें आढळतें, त्यावरून त्याची प्रकृति फार अशक्त होती असें दिसतें, व त्याला क्षयरोगहि जडेल कीं काय अशी त्याच्या आईबापांस भीति पडली होती. त्याच्या कुशींत नेहमीं दुखत असे, त्यामुळें बाळपणीं प्रिय असलेल्या नानाविध खेळांत भावाबरोबर तो क्वचितच दृष्टीस पडे. तेव्हां अर्थातच भाऊ खेळण्यास गेले म्हणजे घरीं पुस्तकें वाचीत कोचावर तो पडून राही. अशक्ततेमुळें त्याच्या पुत्रवत्सल आईनें शाळेंत जाण्याची त्याजवर सक्ति केली नाहीं; तथापि त्याच्या शिक्षणाकडे तिचें दुर्लक्ष झालें नाहीं. लिहिण्यावाचण्यास तो घरींच शिकला. असें सांगतात कीं, शेजारची एक वयोवृद्ध बाई ह्या मुलाची हुशारी पाहून, त्याला प्राथमिक शिक्षण आपण होऊन मोठ्या आनंदानें देत असे. बाहेरगांवीं गेल्याशिवाय प्रकृति सुधारणार नाहीं असें वाटल्यामुळें, त्याला गजबजलेल्या राजधानींतून खेडेगांवीं आज्याच्या घरीं पाठविलें. तेथें त्याला प्रथमच शाळेंत घातलें; तथापि त्याच्या आप्तांचें लक्ष त्याच्या शिक्षणापेक्षां प्रकृतीकडे जास्त असल्यामुळें, अभ्यास बेताबातानेंच चालला

५०९ ५।२५ १५।३।७

होता. तरी पण तो अगदीं निरुद्योगी नव्हता. त्याच्या शिक्षकाचें नांव ओव्हालोरन असें होतें. ह्याच्याविषयीं एक दंतकथा सांगतात, तीवरून त्याच्या शिष्याची सुशीलता चांगली व्यक्त होते. पार्लमेंटमध्यें शिरून चोहोंकडे प्रसिद्ध झाल्यावर, आपलें जुनें ठिकाण पाहण्याच्या इच्छेनें बर्क आपल्या आजोळच्या गांवीं गेला; ही बातमी त्या वृद्ध शिक्षकास समजली तेव्हां हे शिष्यवर्य आतां आपणास ओळखतात किंवा नाहीं हें पाहण्यासाठीं म्हणून, बर्क उतरला होता त्या घराकडे जावें, असें त्याच्या मनांत आलें. एवढ्या मोठ्या मनुष्याकडून कितपत संभावना होईल ह्याविषयीं बराच साशंक होऊन, रस्त्यानें हळू हळू जात असतां, एका खोलींत पोषाक करतांना त्यानें बर्कला पाहिलें. शिष्यानेंहि आपल्या गुरूला ताबडतोब ओळखिलें व पोषाख आटोपण्यापूर्वींच धांवत येऊन त्याला नमस्कार केल्यावर त्यानें त्याची सर्व विचारपूस केली. तो दिवस त्या गुरुशिष्यांनीं गतकालीन गोष्टी बोलण्यांत घालविला, व निघतांना गुरुदक्षिणा म्हणून याच्या हातांत ५० रुपये ठेवून बर्कनें त्यास संतुष्ट केलें.

आज्याच्या घरीं सुमारें पांच वर्षें काढल्यावर तो परत डब्लिन येथें आला. तेथें एक वर्षभर तो शाळेंत जात असे. नंतर तेथून बॅलिटोर येथील नामांकित विद्यालयांत त्याच्या बापानें त्यास पाठविलें. तेथील अध्यापकाचें नांव आब्राहाम शाकल्टन असें होतें. ह्याच्याच बुद्धिवैभवानें व उद्योगानें शाळेचें नांव सर्व देशभर पसरून तेथें पुष्कळ नामांकित लोक तयार झाले. त्याच्या पाठीमागें त्याचा मुलगा रिचर्ड व नातू आब्राहाम ह्यांनीं ती शाळा चालविली. बर्क ह्या शाळेंत असतां, रिचर्ड हा त्याचा अत्यंत जिवलग स्नेही होता. ह्याच्या बरोबर बर्कचा १५ व्या वर्षापासून तों तहत मरेपर्यंत पत्रव्यवहार चालू होता. हा बर्कपेक्षां ४।५ वर्षांनीं मोठा असल्यामुळें त्याच्या सोबतच्या लहानपणच्या गुणदोषांचें अवलोकन करण्याची शक्ति त्यास आली होती. त्यानें असें म्हटलें आहे कीं, बर्क प्रथमपासूनच होतकरू दिसून आला. तो शाळेंत आला, त्या वेळेस फारसा मोठा नव्हता; पण लवकरच त्याची शिकण्याविषयीं उत्सुकता दिसून आली आणि पुष्कळ प्रसंगीं त्याच्या वयाच्या मानानें विचारपरिपक्वता व मानसिक धैर्य हीं त्याच्या ठिकाणीं विशेष व्यक्त होत. अगदीं लहान असतां

पुष्कळ वाचलें असल्यामुळें, नानाविध विषयांचें ज्ञान त्यानें संपादन केलें होतें. तो मोठ्या हौसेनें लॅटिन् कविता पाठ करून आपल्या सोबत्यांस म्हणून दाखवी. त्याच्या इतर गुणांमध्यें शोधकता हा विशेष गुण होता. इतिहास व काव्य हीं मनःपूर्वक वाचण्यांत तो आपला बराच काल घालवीत असे. त्याचा स्वभाव प्रेमळ असे. इतर मुलांप्रमाणें गडबड्या नसल्यामुळें त्याला एकटेंच राहणें आवडे; परंतु तो सुस्वभावी असून आपणास जें कांहीं येतें तें दुसऱ्यास सांगण्यास सदा तत्पर असे. डॉक्टर जॉनसननें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, ज्या बुद्धि-बलावर पुढें मोठे लोक प्रसिद्धीस येतात तें बुद्धितेज सूक्ष्मदृष्टीनें पाहिलें तर त्यांच्या बाळपणींहि झळकल्याशिवाय राहत नाहीं. हा सिद्धांत बर्कच्या संबंधीं खरा ठरतो. ह्या शाळेंत असतां त्याच्या सवईवरून, कोणत्याहि विषयांत खोल जाऊन त्याचें परीक्षण करण्याची हातोटी त्याला अल्प वयांतच साधली होती हें स्पष्ट दिसत होतें. त्याचप्रमाणें अव्याहत अभ्यास, त्वरित ग्राहकता व विलक्षण स्मरणशक्ति ह्यांवरून शिक्षकाचें त्याच्यावर प्रेम बसलें होतें; म्हणून तो शिक्षक आपल्या आवडत्या शिष्यास शिक्षणाप्रमाणें आरोग्याविषयींहि फार जपत असे. हे उपकार त्याचा कृतज्ञ चेला कधींहि विसरला नाहीं.

शाळेंत असतांना ह्याच्याविषयीं अशी एक आख्यायिका सांगतात कीं, एके दिवशीं एका श्रीमंत मनुष्याच्या हुकुमावरून गरीब बिचारा मनुष्य आपली झोंपडी आपणच मोडतो आहे असें पाहून, बर्कच्या पायाची आग मस्तकास गेली आणि तो म्हणाला, मी जर मोठा असतों व हातांत अधिकार असता, तर अशा रीतीनें त्या गरीब मनुष्यावर जुलूम होऊं दिला नसता. वर सांगित-लेल्या जॉनसनच्या म्हणण्याची प्रतीति ह्याहि गोष्टींत दिसते. कारण उत्तर वयांत बर्कच्या अंगचा वर्णनीय सद्गुण म्हटला म्हणजे, कोणत्याहि दिशेनें निराश्रित लोकांवर होत असलेल्या जुलुमाविषयीं अत्यंत उद्वेग, हा होय. मनुष्याच्या स्वभावाच्या खऱ्या स्वरूपाचें त्याच्या खासगी वर्तनावरून किंवा आप्तमित्रांशीं जो त्याचा संबंध असतो त्यावरून जसें परीक्षण करतां येतें तसें, त्याच्या सार्वजनिक वर्तनावरून करितां येत नाहीं. बॅलिटोर येथें असतांना गिल्ल नांवाच्या एका चाकर

माणसाची आणि बर्कची ओळख पडली होती, व तेथें गेल्यावर तो त्यास भेट-ल्याशिवाय कधींहि राहत नसे. इ० स० १७८६ सालीं हेस्टिंग्जवर आरोप ठेवून चौकशी चालू असतां, बॅलिटोर येथें जाण्याचा प्रसंग आला तेव्हां गिल्लला भेटल्यावांचून तो राहिला नाहीं. ह्यावेळीं गिल्लचें वय ८० वर्षांचें होतें. डोळ्यांनीं स्पष्ट दिसत नसे व सर्व गात्रें निस्त्राण होऊन तो अगदीं मरणोन्मुख झाला होता. तथापि आपल्या तरुण सोबत्याचें नांव कानीं पडतांच त्याला क्षणिक आवेश आला. बर्कनें आपल्या नेहमींच्या सदय अंतःकरणानें विचारपूस करून, बरोबर असलेल्या आपल्या मुलाची व त्याची ओळख करून दिली. ह्या वर्तनानें त्या वृद्ध मनुष्याच्या मनाला इतका आल्हाद झाला कीं त्याच्या तोंडांतून एक शब्दहि येईना. सरतेशेवटीं तो मोठ्या प्रयासानें म्हणाला, " आपणास पाहून मला मोठा अभिमान वाटतो. महाराज, आयर्लंडमध्यें आपले पुष्कळ स्नेही आहेत." बर्कनें उत्तर दिलें, " तूं एक त्यांपैकींच आहेस. तुझी प्रकृति बरी दिसते. माझ्यामध्यें मागल्यापेक्षां कांहीं फरक दिसतो काय?" तोंडाकडे न्याहाळून पाहाण्याचा प्रयत्न केल्यानंतर वृद्ध गिल्ल म्हणाला, " वार्ध-क्यामुळें मला आतां अगदीं दिसेनासें झालें आहे." हें ऐकून स्पष्ट दिसण्या-करितां बर्कनें आपल्या तोंडाशीं दिवा धरिला. ह्या एका गोष्टीवरून बर्कच्या मनाचा थोरपणा व साधेपणा चांगला व्यक्त होतो; कारण बाळपणांत सहज-गत्या परिचित झालेल्या आपल्यापेक्षां अतिशय कमी दर्जाच्या मनुष्याविषयीं इतकें निर्व्याज प्रेम प्रकट केलेलें पाहून, अल्प ज्ञानानें फुगलेल्या घमेंडखोर लोकांनीं माना खालींच घातल्या पाहिजेत. शाळेंत असतां, आपला मित्र शाकल्टन ह्याजबरोबर त्यानें कांहीं लॅटिन कवितांचें भाषांतर केलें होतें व तें फार चांगलें उतरलें होतें असें म्हणतात. तीन वर्षें ह्या शाळेंत राहिल्यावर इ० स० १७४४ त तेथून निघून, डब्लिन येथें ट्रिनिटि कॉलेजमध्यें बर्क गेला त्या वेळेस नानाप्रकारच्या विषयांत त्यानें बरीच प्रवीणता संपादन केली होती.

ह्या कॉलेजांतील अध्यापकांस असा बुद्धिमान् शिष्य लाभला होता; परंतु त्यांचा ज्ञानसंचयच मर्यादित असल्यामुळें, बर्कला म्हणण्यासारखा फायदा झाला नाहीं; तथापि असें सांगतात कीं, ह्याच गुरूनें, एका विशिष्ट विषयांत

सर्व लक्ष घालण्यापेक्षां नानाविध विषयांचें ज्ञान संपादित करणें श्रेयस्कर आहे, असा उपदेश ह्या सुशिष्यास केला होता, व जॉनसन आणि बर्क यांच्या चरित्रावरून हा मार्ग एकंदर ज्ञानशक्ति वृद्धिंगत होण्यास विशेष कारणीभूत होतो असें दिसतें. ह्या विद्यालयांत ख्रिस्तीधर्मशास्त्र, गणित, नीतिशास्त्र वगैरे विषयांचें अध्ययन त्यानें केलें. विद्यादेवीचे एकनिष्ठ भक्त बनून ज्यांनीं तिची आमरणांत एकाग्रचित्तानें सेवा केली, व त्यामुळें अखिल जगावर चिरकालिक व अविस्मरणीय उपकार करून ठेविले अशा लोकांचें त्यांच्या भावी स्थितीला अनुरूप असें तेज विद्यालयांत असतां तेथें पडत असतेंच असा नियम नाहीं. जॉनसन, स्विफ्ट, गोल्डस्मिथ, बर्क वगैरे विद्वत्श्रेष्ठांच्या शाळेंतील अभ्यासक्रमाकडे पाहतां, त्यांच्या भावी अलौकिक कर्तृत्वाची तेव्हां कल्पना होण्यासारखी नव्हती. तथापि रत्न मृन्मिश्रित असलें तरी चमकल्याशिवाय रहात नाहीं. त्या कॉलेजचे एक उपगुरु बर्कविषयीं असें म्हणत असत कीं, बर्क हा असामान्य पण शांत बुद्धीचा मुलगा आहे, व आपल्या ज्ञानाची घमेंड मारण्यापेक्षां तें अधिक संपादन करण्याविषयीं तो विशेष उत्सुक असे.

इ० स० १७५१ सालीं शेवटली पदवी घेतल्यावर त्यानें कॉलेज सोडलें. कॉलेजांतील माहितीवरून असें समजतें कीं, बर्कचा कल विशेषेंकरून इतिहास, तत्वज्ञान व प्राचीन भाषा ह्यांकडे होता. प्राचीन व अर्वाचीन ग्रंथकर्त्यांविषयीं त्यानें लवकरच निश्चित मत बनविलें. ज्या ग्रंथांत मनुष्यस्वभाव, मनुष्यांच्या इच्छा व हेतु ह्यांचें उत्पत्तिस्थान, तसेंच मानवीकृति व रीतिभाती ह्यांचें पूर्ण ज्ञान असेल, ते ग्रंथ तो फार चाहात असे, व ह्यामुळें चांगली कादंबरी वाचणें म्हणजे चांगलें पुस्तक वाचणें असें तो म्हणे. वारंवार शेगडीजवळ बसून घरांतील बायकांस निवडक कादंबऱ्या तो वाचून दाखवी. 'मनुष्याच्या अभ्यासाचा उत्तम विषय मनुष्यच होय,' असें पोपप्रमाणें त्यालाहि वाटत असे. प्राचीन वक्त्यांमध्यें डिमॉस्थिनिस त्याला फार आवडे, लहानपणींच कविता करण्याचा त्याला नाद लागला होता. त्याचप्रमाणें त्यानें कांहीं भाषांतरें व मूळ त्रोटक कविता आपल्या वयाच्या १७ व्या वर्षी केलेल्या आहेत. त्यांमध्यें कांहीं ठिकाणीं तर त्यानें चांगल्या इंग्लिश कवींचीहि बरोबरी केली आहे.

हाउस ऑफ् कॉमन्स म्हणून इंग्लंडमध्यें जी लोकनियुक्त प्रतिनिधींची सभा आहे, तीमध्यें सुकर प्रवेश होण्याकरितां आयर्लंडमधील होतकरू, बुद्धिमान व तरुण लोकांची वकीलीची परीक्षा देण्याची उत्कट इच्छा असते, त्याप्रमाणें बर्कचाहि बेत होता व तो नियमाप्रमाणें परीक्षेपूर्वी कांहीं वर्षे कॉलेजमध्यें राहून, अभ्यास करण्याकरितां लंडन शहरीं इ० स० व १७५० सालीं आला.

---

3319

# भाग दुसरा

## कार्याचा प्रारंभ

लंडन शहरीं असतां, आपल्या दुसऱ्या पुष्कळ बरोबरीच्या सोबत्यांप्रमाणें भोजनादि विलासांत कालक्षेप न करितां, वकिलीच्या धंद्यांत तयार होण्यासाठीं त्यानें बरेच परिश्रम केले. मानसिक शिक्षणाला कारणीभूत असें जें कायद्यांचें ज्ञान, त्याविषयीं त्याची बुद्धि नेहमीं सादर असे. पुढें कित्येक वर्षें हाऊस ऑफ कॉमन्समध्यें बोलत असतां, त्यानें ह्या विषयासंबंधीं खालील उद्गार काढले. "सर्व मानवीशास्त्रांत हें शास्त्र प्रधान असून थोर आहे. दुसऱ्या कोणत्याहि शिक्षणापेक्षां ह्या शिक्षणानें मनुष्याची ग्राहकशक्ति तीव्र होते." ह्या विषयाची बर्कनें जरी इतकी स्तुति केली, तरी त्यानें तो धंदा म्हणून पतकरला नाहीं. एकदां ज्याला विद्याभिरुचि लागली, त्याला रात्रंदिवस ह्याच धंद्यांत आयुष्य व्यर्थ घालविणें कधींहि पसंत पडणार नाहीं. आपल्या मुलानें बॅरिस्टर होऊन विपुल धनसंचय करावा, एतद्विषयक वडिलांची इच्छा त्यास पुढें बरीच बाधक झाली. कारण, ह्या धंद्याविषयीं मुलाची पराङ्मुखता दिसतांच घराहून खर्चास पाठविणें बंद झालें. ह्याचा परिणाम असा झाला कीं, निर्वाहाच्या दृष्टीनें अत्यंत फसवणुकीचा, दरिद्री व बेभरंशाचा असा ग्रंथलेखनाचा उद्योग त्याला पतकरावा लागला. लंडनांत पोंचल्यावर कांहीं दिवसांनीं त्यानें आपल्या एका स्नेह्यास पत्र लिहिलें, त्यावरून बर्कचें सूक्ष्मावलोकन व इंग्लिश लोकांच्या स्वभावाचें व स्थितीचें ज्ञान चांगलें होतें, असें दिसून येईल. तो म्हणतो, 'लंडनचें व तेथील लोकांचें वर्णन केलें, तर एक मोठा ग्रंथ होईल. येथील इमारती फारच सुरेख आहेत. नीटनेटक्या पण साध्या उटजांना शोभा देणारीं कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन पद्धतीवर बांधलेलीं शांत व सुखवस्तु

निवासगृहें सभोंवार पसरलेलीं आहेत. हें शहर दुर्व्यसनाचें केवळ माहेरघर आहे असें म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं; परंतु ह्यामुळें होणाऱ्या ईश्वरी-कोपाचें निवारण बऱ्याच अंशानें दवाखाने व धर्मशाळा ह्यांनीं होतें. ... ... इंग्लिश लोक प्रथम फार बेपर्वा असतात. ओळख करतांनाच ते फार सावध-गिरी बाळगितात. पूर्ण माहिती झाल्याशिवाय ते तुमच्याशीं स्नेह करणार नाहींत; परंतु एकदां कां स्नेह जमला, म्हणजे ती पवित्र ग्रंथि आपण होऊन कधींहि तोडणार नाहींत. सारांश, खरा इंग्लिश मनुष्य नुसत्या वचनांनीं गार करीत नाहीं, तर हातांनीं कृति करून दाखवितो. मंडळींत तो बहुधा मुग्ध असतो. त्याचा प्रिय विषय राजनीति. त्यावर बोलत असतांहि तो फार विचा-रानें बोलतो. स्त्रिया मात्र इतक्या भिडस्त नाहींत. त्या फार नखरेबाज आहेत. जात्याच सुंदर आणि चपल असल्यामुळें, तरुण मनुष्याला त्यांच्या कटाक्षांतून सुटणें किंवा त्यांच्या मंदवाही शब्दप्रवाहापुढें कान मिटणें सोपें काम नाहीं. ह्या देशांत, आपणास वाटत होतें त्याप्रमाणें विद्वानांस मान मिळतोच असें दिसत नाहीं. एखाद्या संपन्न मनुष्यानें विद्वानांना आश्रय दिल्याचें माझ्या आढळण्यांत नाहीं. वास्तव उत्कृष्ट लेखकांना, एकंदर जनसमूहाच्या चंचल आश्रयाखालींच रहावें लागतें; तथापि प्रोत्साहन नसतांहि विद्याप्रसार मोठ्या जारीनें चालला आहे. ग्रीस व रोम देशांच्या अतिशय भरभराटीच्या दिवसां-तहि ऐकण्यास न मिळणारें वक्तृत्व कॉमन्ससभेंत वारंवार ऐकूं येतें; परंतु कांहीं झालें तरी अलंकारिक भाषणापेक्षां अंकगणिताच्या साहाय्यानेंच मनुष्य कांहीं करूं शकेल. नाटककलेविषयीं म्हणाल तर, माझ्या मतें तिची अगदीं दुर्दशा होऊन गेली आहे. घाणेरडीं नाटकें रंगभूमीवर हल्लीं बरींच दृष्टीस पड-तात; परंतु ह्याचा दोष मी प्रेक्षकांच्या अभिरुचीला लावीत नाहीं. कारण शेक्सपियरचे खेळ असले म्हणजे नाटकगृहें गच्च भरून जातात, इत्यादि......' अशा प्रकारचीं आमच्या इकडील शिक्षित म्हणविणाऱ्या मंडळीचीं खाजगी पत्रें वाचावयास सांपडतील तो सुदिन होय. हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत होणाऱ्या राष्ट्रीयसभेच्या वार्षिक महोत्सवास जाणारे कितीसे प्रतिनिधि तत्तत्स्थलविशिष्ट गोष्टींनीं मागें राहिलेल्या आप्तमित्रांस सज्ञान करीत असतील

बरें ? अशा रीतीनें इतिहासांत मराठी वाङ्मयांत उत्कृष्ट भर पडेल ह्यांत संशय नाहीं; परंतु इतकी अवलोकनशक्ति व जिज्ञासा आमच्यांत असेल तेव्हां !

ह्या सुसंपन्न राजधानींत असतां, बर्क आपली सुट्टी कधीं शहराचा अन्तर्भाग निरीक्षण करण्यांत व राहण्यांत घालवी व कधीं प्रकृतिस्वास्थ्यास्तव आरोग्याकरितां प्रसिद्ध अशा स्थलीं जाऊन राही. या सुमारास ग्लॅसगोच्या विश्वविद्यापीठांत रिकाम्या झालेल्या तर्कशास्त्राध्यापकाच्या जागेकरितां त्यानें खटपट केली; परंतु त्यांत त्यास यश आलें नाहीं. ह्या कामीं जर कदाचित् त्याचा प्रयत्न सफल झाला असता तर विद्याव्यासंग अव्याहत चालू ठेवण्यास ही जागा अनुकूल असल्यामुळें, व त्या दिशेकडे निसर्गतःच त्याच्या मनाची प्रवृत्ति असल्यामुळें, बर्कच्या चरित्रांत फरक पडला असता. असो; या यत्ननैष्फल्यानें निरुत्साह न होतां, त्यानें आपलें ग्रंथावलोकन पूर्ववत् चालू ठेवलें. खरोखर बर्कला व्यसन म्हटलें तर, शक्तीच्या बाहेर विद्याव्यासंग हेंच होय. दुर्मार्गाला उद्युक्त करणारी साधनविपुलता जेथें आहे, अशा लंडन शहरीं ऐन उमेदींत वडील किंवा आप्त ह्यांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष बिलकूल कहा नसूनहि त्याचें आचरण व वर्तन अगदीं शुद्ध असे; एवढेंच नव्हे, तर त्यास एकहि खेळ खेळतां येत नसे, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. व्यसनापासून अलिप्त राहिल्याकारणानेंच, लहानपणापासून अशक्त असतांहि पार्लमेंटमधील प्रधानमंडळाचीं व स्वतःचीं जबाबदारीचीं कामें त्यास नेटानें झेपतां आलीं. रात्रीचे तीन चार वाजेपर्यंत निजण्यास सवड मिळूं नये, इतका कामाचा नेट त्याच्या पाठीमागें असे. मनुष्यस्वभाव व काव्य ह्यांचा नाटकाशीं निकटसंबंध असल्यामुळें, इतर विद्याभिलाषी लोकांप्रमाणें नाटकें पहाण्याचा मात्र त्यास नाद असे. ह्याचमुळें पुढें प्रसिद्ध इंग्लिश नाट्यकलाविशारद गॅरिक ह्याची व बर्कची ओळख झाली. ह्यावेळेस गॅरिकची कीर्ति चोहोंकडे पसरली होती. सरस्वतीपुत्र व लक्ष्मीपुत्र त्याचा स्नेह संपादण्याविषयीं सारखेच उत्सुक असत. गॅरिकच्याच घरीं बर्कचा पुष्कळ नामांकित गृहस्थांशीं परिचय झाला.

इ० स० १७५५ सालीं अमेरिकेस जाण्याचा विचार त्याच्या मनांत आला, व पुढें एक दोन वर्षे तो त्या नादांतहि होता; परंतु वडिलास संमत नसल्या-

दाखवितों व असें असूनहि, सांप्रतची राज्यव्यवस्था जर अवश्य म्हणून मान्य आहे, तर धर्मव्यवस्थाहि तितक्याच प्रमाणानें अवश्य व मान्य असली पाहिजे. आपली व्यावहारिक स्वतंत्रता आपण होऊन जर मर्यादित करून घेतों, तर धर्मविषयक स्वतंत्रता धर्मगुरूकडून नियंत्रित होण्यास कांहीं हरकत असूं नये." पहिल्यापासूनच त्याच्या मनाची अशी पक्की खात्री झाली होती कीं, नैतिक कर्तव्यें व समाजव्यवस्था ही जर प्रत्येक मनुष्याला गणितशास्त्राच्या नियमाप्रमाणें, त्यांचीं कारणें स्पष्ट करून सांगण्यावर अवलंबून असतील, तर सर्व जगाची अनास्था व शेवटीं नाश होईल. हे विचार आमच्या देशांतील आधुनिक समाजसुधारणेच्छु मंडळींनीं मनन करण्यासारखे आहेत. परंपरेवर किमपि विश्वास न ठेवतां, कारण समजल्याविना कोणतीहि गोष्ट मी करणार नाहीं, असें जर प्रत्येक मनुष्य म्हणूं लागेल, तर जगाची सुधारणा किती तरी मागें हटेल. बर्कनें आपल्या पुस्तकांत हेंच मत निराळ्या रीतीनें प्रदर्शित केलें आहे. बॉलिंगब्रोकच्या लेखांच्या अभ्यासानें त्याच्या भाषासरणीची झांक बर्कच्या सर्व लेखांत कायमची दृष्टोत्पत्तीस येते.

ह्याच वर्षीं कांहीं महिन्यांनीं 'उदात्तता व सौंदर्य' ह्या विषयांवर एक उत्कृष्ट निबंध लिहिलेला त्यानें प्रसिद्ध केला. आजमित्तीस तद्देशीय विश्वविद्यालयांतील बौद्धिक शिक्षणाच्या क्रमिक पुस्तकांपैकीं हें एक आहे. ह्याचें विषयविवेचन अगदीं नवें आहे. ह्यापूर्वीं ॲडिसन वगैरे कित्येक विद्वानांनीं ह्याच विषयावर थोडें बहुत लिहिलें होतें; पण त्यांपैकीं कोणींहि इतक्या सविस्तरपणें व स्पष्टपणें ह्या विषयाचें विवेचन केलें नव्हतें. मनावर होणाऱ्या संस्काराच्या कारणाचें पृथःकरण बर्कप्रमाणें कोणी केलेलें नाहीं. तदंतर्गत गोष्टींचा शास्त्रीयरीत्या विचार करून, त्यानें आपलें म्हणणें सुलभ रीतीनें निर्दिष्ट केलें. खऱ्या तात्विकज्ञानपरिप्लुत टीकेचें हें उदाहरण आहे, असा जॉनसनचा ह्या पुस्तकासंबंधीं अभिप्राय आहे. एवढ्यावरून ह्या पुस्तकाची योग्यता किती असली पाहिजे हें उघड होतें. असें सांगतात कीं, हा निबंध त्यानें एकोणिसाव्या वर्षींच लिहिला होता; परंतु तो सात आठ वर्षें तसाच पडून राहिला होता. पुस्तकाच्या अंतःस्वरूपावरून

तें विचारपूर्वक लिहिलें आहे हें सहज कळून येतें. तसेंच लेखकाचा चौकसपणा व सूक्ष्मावलोकन त्यावरून स्पष्ट दिसतात. वयाच्या एकोणिसाव्या वर्षी अशा कठिण विषयावर लिहिणें, हें सामान्यबुद्धीच्या मनुष्याचें काम नाहीं. प्रचलित मताविरुद्ध कांहींतरी नवें लिहून सर्व जगाला चकित करण्याची हांव ह्या वयांत फार असते; पण बर्कनें अशा मार्गाचें अवलंबन न करितां धर्मासंबंधीं किंवा राज्यव्यवस्थेसंबंधीं लोकांचा जो समज झालेला असतो, तोच बहुशः खरा असतो, हें सिद्ध करून समाजस्थैर्याला त्यानें बळकटी आणली. खुद्द इंग्लंड-मध्यें ह्या निबंधाची चहा फारशी झाली नाहीं; परंतु फ्रान्स व जर्मनी ह्या देशांत सर्व सुशिक्षित लोकांचें कुतूहल ह्या निबंध–वाचनानें जागृत झालें व ह्या पुस्त-काचीं निरनिराळ्या भाषेंत भाषांतरेंहि झालीं. लोकांमध्यें नवीन विचारांचा ओघ उत्पन्न करण्याचें श्रेय बर्कनें घेतलें, असें एका जर्मन इतिहासकाराचें म्हणणें आहे.

सतत मानसिक श्रम पडल्यानें मनुष्याची प्रकृति क्षीण होणें स्वाभाविक आहे, अभ्यास म्हटला म्हणजे तो एकांतांतच झाला पाहिजे. इतर धंद्यांत ज्या मित्र-मंडळाच्या योगानें उल्हासवृत्ति राहून चित्तरंजन होतें, त्याच मित्रवर्गापासून ग्रंथ-कर्त्याच्या तीव्र कल्पनातरंगांना विघ्न येतें. कारण, ग्रंथकर्त्याचें काम मुख्यतः पुस्त-कांशीं असतें. बर्कची प्रकृति ह्यावेळीं पुनः नादुरुस्त झालेली दिसते, म्हणून त्याला हवा बदलण्याकरितां स्थलांतर करणें भाग पडलें. येथें त्याचा देशबांधव ख्रिस्तो-फर न्यूजंट म्हणून एक वैद्य राहत असे. हा मोठा सुशील व योग्य मनुष्य होता. त्याची व बर्कची पूर्वीची थोडीशी ओळख असल्यामुळें, त्यानें उदार-बुद्धीनें बर्कला आपल्या घरीं राहण्यास बोलाविलें. तेथें असतां त्याची मुलगी जेन हिच्यावर बर्कचें प्रेम बसलें व त्या दोघांचें लग्न झालें. ह्या शरीरसंबंधा-पासून त्याला अखेरपर्यंत सुख झालें. आपल्या पतीच्या बुद्धिश्रेष्ठत्वाचा पत्नीला योग्य असा तिला सप्रेम अभिमान वाटत असे. ती गुणी होती, व सुशीलता, दयार्द्र अंतःकरण आणि सुस्वभाव ह्या गुणांमुळें बर्कला तिची फार मदत होत असे. तो वारंवार म्हणे कीं, उंबरठ्यांत पाऊल ठेवल्याबरोबर माझी चिंता व कष्ट नाहींशीं होतात.

# भाग तिसरा

## पार्लमेंटांत प्रवेश

राजकीय उलाढालीपेक्षां ग्रंथावलोकन व ग्रंथरचना ह्यांकडे बर्कचें लक्ष ह्या-वेळीं विशेष असे; व ह्या दुसऱ्या कामांत त्यानें चांगला लौकिक संपादन केला. 'उदात्तता व सौंदर्य' ह्यांवरील निबंधानें त्याचा कीर्तिपरिमल दशदिशा पसरला. इ० स० १७५७ सालीं ह्या निबंधाची दुसरी आवृत्ति निघाली तेव्हां एक प्रत त्यानें आपल्या बापास नजर पाठविली; त्याबद्दल त्याच्या बापानें त्यास एक हजार रुपये पाठवून दिले. बर्कचा हा उद्योग अप्रतिहत चालू होता, व पुढें एक दोन वर्षांच्या आंत, नाटयकलेवर एक सुरस निबंध, इंग्लंडचा संक्षिप्त इतिहास आणि अमेरिकेंतील युरोपियन वसाहतींची हकीकत वगैरे लेख बाहेर पडले. इंग्लंडचा इतिहास जॉनच्या कारकीर्दीपर्यंतच आला आहे; तथापि त्यांत त्या बेटाचा प्राचीन इतिहास लक्षपूर्वक शोध करून लिहिला आहे. ह्या पुस्तकावरून साधारण वाचकाला तद्द्वीपस्थ मुळचे लोक, सॅक्सन लोकांच्या वसा-हती, त्यांचे कायदे आणि संस्था, ह्यांविषयीं बरीच माहिती मिळण्यासारखी आहे परंतु ह्या सर्वांपेक्षां विशेष जबाबदारीचें व महत्वाचें काम त्यानें इ० स० १७५९ त पतकरलें. डॉड्स्ले नांवाच्या एका पुस्तकें विकणाऱ्याच्या साहाय्यानें 'वार्षिक टिपण' नांवाचें मासिकपुस्तक त्यानें सुरू केलें. वर्षांत घडलेल्या लहान मोठ्या सर्व गोष्टींचें निवेदन व परीक्षण ह्यांत होत असे. एवढयावरून हें चालविण्यास किती श्रम पडत असावे व चालकाला सर्व गोष्टींची पूर्ण माहिती किती असली पाहिजे, ह्याची कल्पना करितां येईल. ह्याच्या उपयुक्ततेविषयीं व लोकप्रियतेविषयीं सर्वांचें मतैक्य आहे. ह्या काळचा ज्यांनीं पुढें इतिहास लिहिला, त्यांला ह्या टिपणाचा फारच उपयोग झाला आहे. ह्या उद्योगामुळें

बर्कला मोठा फायदा हा झाला कीं, राज्यकारभाराची इत्थंभूत माहिती पार्लमेंट-मध्यें शिरण्याच्या पूर्वींच झाली. लेखक ह्या नात्यानें डॉट्स्लेकडून त्यास वर्षाचे १०० पौंड मिळत असत. ह्यापूर्वीं कांहीं दिवस इंग्रजी भाषेचा आद्य कोशकार प्रसिद्ध सॅम्युअल जॉनसन ह्याची आणि बर्कची ओळख झाली होती. मर्मभेदक शब्दांनीं संभाषणांत जय मिळविण्याची एकाची जबरदस्त हांव असू-नहि, व राजकीय विषयासंबंधीं परस्परांची विरोधी मतें असतांहि, ह्या दोघां विद्व-न्मुकुटांचा अतिदृढ स्नेह जमला व त्या स्नेहांत आमरण अंतर पडलें नाहीं. ह्याचें कारण अन्योन्यगुणग्राहकता हेंच होय. जॉनसन, बर्कची जितकी प्रशंसा करीत असे, तितकी प्रशंसा आजपर्यंत कोणत्याहि एका मोठ्या मनुष्यानें दुसऱ्या मोठ्या मनुष्याची केली नसेल खालील हें उताऱ्यावरून सहज दिसून येईल.

एके वेळीं कांहीं विषयावर संभाषण चाललें असतां एकानें म्हटलें, मनु-ष्याची कीर्ति सामान्यतः त्याच्या वास्तविक योग्यतेपेक्षां जास्त पसरते. त्यावर दुसऱ्यानें म्हटलें, ह्या नियमाला बर्क हा अपवाद आहे. जॉनसननें हें म्हणणें कबूल केलें. तो म्हणाला होय, बर्क हा असामान्य बुद्धीचा मनुष्य आहे. त्याचा मनोरूप झरा अक्षय्य आहे. आणखी तो एके प्रसंगीं म्हणाला, बर्क ऐकणारांवर छाप बसविण्याच्या उद्देशानें बोलत नाहीं. तर त्याला सर्व विषयांची इतकी माहिती आहे कीं, त्याच्यानें बोलल्याशिवाय राहवत नाहीं. बर्केशीं सप्रमाण वाद करण्यास मानसिक श्रम फार पडतात असें त्यास वाटे. आणखी एके वेळीं त्याच्या तोंडांतून असे उद्गार निघाले कीं, जगांत पसरलेल्या कीर्तीला अनुरूप ज्याचें संभाषण आहे, असा एकटा बर्कच आहे. तुम्हांला वाटेल तो विषय घ्या; त्यावर तुमचें समाधान करण्यास त्याची तयारी आहे. एकंदरींत जॉनसन इतक्या सुप्रसिद्ध, आग्रही व विलक्षण ग्राहकबुद्धीच्या मनुष्याचें प्रेम व स्नेह संपादन करणें, ह्यांतच बर्कच्या अंगीं असलेल्या अपूर्व गुणांची पूर्ण कृतार्थता झाली असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. त्याच्या संभाषणकौशल्याचें ऐकणारास फार आश्चर्य वाटे. सारांश, जॉनसनशिवाय संभाषणकलेंत त्याची बरोबरी करण्यास दुसरा कोणीहि समर्थ नव्हता.

वार्षिक टिपणाचें संपादकत्व स्वीकारल्यामुळें, राजकीय घडामोडी व मंत्रि-मंडळ ह्यांशीं बर्कचा बराच परिचय झाला. ह्या परिचित मंडळामध्यें हॅमिलटन नांवाचा पार्लमेंट सभेचा एक सभासद होता. ह्या ओळखीपासून बर्कचा राज्यकारभारांत शिरकाव झाला. कारण इ० स० १७६१ सालीं हॅमिलटन आयर्लंडमध्यें कांहीं कामगिरीवर गेला असतां, त्या वेळेस त्यानें बर्कला आपल्या-बरोबर खासगी कारभारी ह्मणून नेलें. ह्या योगानें बर्कला आपल्या जन्म-देशाची सेवा करण्याची आयतीच संधि प्राप्त झाली. एका प्रसिद्ध इतिहासकारानें असें म्हटलें आहे कीं, विद्वान् लोकांच्या देशांतरामुळें आयर्लंडचें जेवढें नुकसान झालें आहे, तेवढें मोठमोठ्या उमराव लोकांच्या देशत्यागानें झालें नाहीं. हें सर्वांशीं खरें आहे; कारण आयर्लंडच्या स्वातंत्र्याचा अपहार होतां-क्षणींच सद्गुणांचा उदय व विकास होण्याची जागाहि अर्थात् नाहींशी झाली; म्हणून तेथील नामांकित लोकांस इंग्लंडमध्यें येऊन आपल्या बुद्धिमत्तेचें तेज पाडल्याशिवाय गत्यंतर नाहींसें झालें. या गोष्टीचा उल्लेख प्रस्तुत चरित्राच्या प्रारंभींच केला आहे, व आतांहि प्रसंगानुसार ड्यूक ऑफ वेलिंगटन व त्यांचे बंधु हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल लॉर्ड वेल्स्ली व हल्लींच्या काळचे महावीर लॉर्ड वुल्स्ले अशी कित्येक उदाहरणें देतां येण्याजोगीं आहेत. दुःखांत सुख इत-केंच कीं, देशत्याग केल्यावर तरी आयरिश लोकांस एवढ्या योग्यतेस चढतां येतें. देशाची ऊर्जितावस्था देशांतील कर्तबगार लोकांवर अवलंबून असते; परंतु देशांत राहून तर त्यांचा निभाव लागत नाहीं. असो, पारतंत्र्याचा हा एक अप-रिहार्य परिणाम आहे. बर्कला जन्मभूमि सोडून इंग्लंडांत रहावें लागलें हें खरें आहे; तथापि स्वदेशाच्या उपयोगीं पडण्याची त्याची उत्कट इच्छा कधींहि शिथिल झाली नाहीं, व जेव्हां जेव्हां प्रसंग आला तेव्हां तेव्हां आपल्या वज-नाचा व विद्येचा त्यानें स्वदेशहितार्थ उपयोग केला. पुढें पार्लमेंटमध्यें लोकांनीं सभासद निवडल्यावर याला जो आनंद झाला, तो स्वतःकरितां नसून, स्वदेशाचें कल्याण करण्याची ह्या रूपानें जी संधि मिळाली, त्यामुळें होय.

आयर्लंडमध्यें सुमारें तो दोन वर्षें राहिला. तितक्या मुदतींत त्यानें काय केलें हें स्पष्ट समजण्याला मार्ग नाहीं; तथापि त्याच्या एका खासगी पत्रावरून कामाचा बोजा त्याच्यावर फार पडत असे असें दिसतें. त्यानें आपलें काम इतक्या चोख रीतीनें बजाविलें कीं, हॅमिलटनच्या वजनानें व खटपटीनें आयर्लंडच्या तिजोरींतून त्यास दरसाल ३०० पौंड पेनशन देण्याचा ठराव झाला; परंतु पुढें तें नाकारणें त्यास लवकरच भाग पडलें. हॅमिलटन् हा फार कोत्या मनाचा मनुष्य होता. हें पेनशन देण्यांत त्याचा असा हेतु दिसतो कीं बर्कला सर्व आयुष्यभर आपला बंदा गुलाम करून सोडावा. त्यानें असा आग्रह धरला कीं, इतर कोणताहि व्यासंग न धरितां बर्कनें आजन्म आपल्याजवळ रहावें. ग्रंथलेखनसुद्धां मना करण्यांत ह्या अदूरदृष्टि पुरुषाचा काय हेतु होता हें समजणें कठीण आहे. कांहीं असो; बर्कच्या मानी स्वभावाला हें बिलकुल पसंत पडेना. ३०० पौंडांच्या लालसेनें आपल्या स्वतंत्रतेचा विक्रय करणारा बर्क नव्हता. विद्याव्यासंगानेंच तो ह्या योग्यतेस चढला होता व ती कायम ठेवण्यास त्याच मार्गाचें अवलंबन केलें पाहिजे हें तो पक्कें जाणून होता. शेवटीं पेन्शनावर लाथ मारून त्यानें अर्थात् आपल्या जागेचा राजीनामा दिला.

इ० स० १७६३ पासून १७६५ पर्यंत दोन वर्षें त्यानें इंग्लंडमध्यें घालविलीं. पार्लमेंटसभेचें काम चालू असतां, तो त्या सभेच्या ग्यालरींत जाऊन बसे, व तेथें चाललेला वादविवाद आणि भाषणें लक्षपूर्वक ऐकत असे. त्याचप्रमाणें व्यापार व ब्रिटिशराज्यव्यवस्थेचा पाया ज्या तत्वांवर रचला गेला तीं तत्वें, ह्यांचा त्यानें चांगला अभ्यास केला. ह्यामुळें पार्लमेंटमध्यें त्याचें वजन किती पडलें हें पुढें कळून येईल. इंग्लंडच्या व्यापारवृद्धीचा त्यास फार अभिमान वाटे. आह्मी आज आहों ह्या स्थितीला आह्मांस आणण्यास व्यापार मूळ कारण आहे, त्यामुळेंच आह्मी स्वतंत्र व बलाढ्य राष्ट्र बनलों आहों, असा त्याचा दृढ भरंवसा असल्यामुळें, व्यापाराच्या घडामोडी समजून घेण्यांत द्रव्याची व श्रमाची त्यानें परवा केली नाहीं. एका माहितगार मनुष्यानें जॉनसनला सांगितलें कीं, तुह्मी

आपल्या प्रवासवर्णनांत व्यापाराचें जितकें ज्ञान प्रकट केलें आहे तितकें उभ्या वर्षांत पार्लमेंटमध्यें बर्कखेरीजकरून कोणाचेंहि दिसून आलें नाहीं.

अभ्यासाची दिशा व मनाचा स्वाभाविक कल ह्यामुळें सार्वजनिक कामांत पडण्याची पात्रता त्याच्या अंगीं आली होती, व साऱ्या राष्ट्राच्या दैवयोगानें तशी संधि लवकरच त्यास प्राप्त झाली. इ० स० १७६५ मध्यें प्रधानमंडळ अधिकारभ्रष्ट झालें. तिसऱ्या जॉर्जच्या कारकीर्दींत हा तिसरा प्रसंग होय. कोणताच प्रधान त्याच्या पसंतीस उतरेना. पिटची बेअब्रू झाली. एकास घालवून दिलें, व असह्य लोकनिंदेला कंटाळून तिसऱ्यालाहि आपल्या जागेचा राजीनामा द्यावा लागला. नंतर जॉर्ज ग्रेनव्हिलनें राज्यधुरा खांद्यावर घेण्याचें पतकरिलें; परंतु फार दिवस झाले नाहींत तोंच त्यानें अमेरिकेंत युद्धाचें बीजारोपण करून, पार्लमेंटला त्रास देऊन राजाला उद्विग्न केलें. अखेरीस १७६५ त त्यालाहि आपलीं वस्त्रें खालीं ठेवावीं लागलीं. नंतर मोठ्या नाखुषीनें राजानें लॉर्ड रॉकिंगहॅम यास बोलाविलें. त्याशिवाय राजास दुसरा उपायच नव्हता. बर्कला आपल्या खासगी कारभाऱ्याची जागा देण्याची सुबुद्धि रॉकिंगहॅम यास झाली. ह्या वेळेपर्यंत ज्यांनीं राज्यकारभार चालविला, त्या सर्वांत रॉकिंगहॅमचा नंबर पहिला लागेल असें म्हणतात. ह्याचा प्रमाणिकपणा अढळ असून विचार स्पष्ट व मन सरळ होतें. इष्ट हेतु साधण्याकरितां नांवाला कलंक लावणाऱ्या साधनांचा त्यानें कधींहि उपयोग केला नाहीं. त्याचें ज्ञानार्जन दांभिक नसून महत्वाकांक्षेचा तर त्याला स्पर्शहि नव्हता. थोर घराण्यांत जन्मल्यामुळें राजकीय वादग्रस्त विषयांचा उदार अंतःकरणानें विचार करण्याची त्यास सवय होती. राजकीय बाबतींत त्याचीं मतें नेमस्त व शहाणपणाचीं होतीं. राज्यकारभार हातीं घेतल्यावर देशकल्याणाशिवाय आत्मैकहितासारख्या क्षुद्रतर विचारांना त्याच्या हृदयांत अवकाश मिळत नसे. सारांश, विरुद्ध पक्षाच्याहि लोकांना त्याला दोष देण्यास जागा नव्हती.

ह्यावेळीं इंग्लंडमध्यें बरीच अस्वस्थता उत्पन्न झाली होती. अशा प्रसंगीं मध्यंतरीं येणाऱ्या विघ्नांना तोंड देऊन पार पडण्याचें सामर्थ्य ह्या प्रधानामध्यें होतें असें दिसत नाहीं. शिवाय त्याच्या अनुयायांमध्यें मतैक्य नसल्यामुळें त्याची

कारकीर्द अल्पायु झाली. ह्या थोर मनुष्याबरोबर राहून राज्यकारभारांत प्रवेश होण्याचा योगायोग बर्कला आला; परंतु मागच्याप्रमाणें येथेंहि दुर्दैव आड येत होतें. त्याच्याविषयीं निरनिराळ्या कंड्या लोकांमध्यें प्रचलित होत्या. कोणी म्हणत हा जेसुईट आहे, दुसरे म्हणत हा पोपानुयायी आहे. जेसुइट लोकांवर युरोपस्थ ख्रिस्तानुयायी इतकी आग पाखडतात ह्याचें कारण असें आहे कीं, त्या पंथाचे लोक स्वधर्मप्रसारार्थ अघोर उपाय करण्यासहि मार्गे पुढें पाहत नाहींत. इ० स० १५३४ सालीं ह्या पंथाची स्थापना झाली. असो. कांहीं वृद्ध व अनुभवशीर माणसांचाहि ह्या निराधार गप्पांवर विश्वास पडून, त्यांनीं त्यांच्या समजुतीनें अन्यधर्मप्रवर्तक अशा माणसाच्या नेमणुकीनें होणाऱ्या अघोर व अक्षम्य पापाबद्दल नवीन प्रधानाची कानउघाडणी करून, ती नेमणूक रद्द करण्याविषयीं त्यास उपदेश केला. रॉकिंगहॅमचा स्वभाव सरळ असल्यामुळें उतावळी न करतां प्रत्यक्ष बर्कच्या तोंडूनच ह्या गोष्टीचा खुलासा करून घेण्याचा विचार त्यानें केला व ऐकलेल्या गोष्टी त्यास सांगितल्या. त्यावर बर्कनें निक्षून सांगितलें कीं ह्यापैकीं एकहि खरी नाहीं. असल्या गोष्टी ऐकून माझ्यावर असलेला आपला विश्वास अंशतः तरी कमी होण्याचा संभव आहे, व ज्या मनुष्याचा पूर्ण विश्वास मजवर नाहीं, त्याच्याशीं संबंध ठेवण्याचा विचार कोणत्याहि ऐहिक हेतूंनीं माझ्या मनांत वागणार नाहीं. एवढेंच बोलून न राहतां तो आपल्या जागेचा राजीनामा देण्यास प्रवृत्त झाला. ह्या स्पष्टोक्तीमुळें रॉकिंगहॅमची पूर्ण खात्री होऊन राजीनामा घेण्याचें त्यानें नाकारिलें. ह्याप्रमाणें आलेलें वादळ शांत झालें. रॉकिंगहॅमच्या मरणापर्यंत पुढें १७ वर्षें एकाच्या स्वामिभक्तींत व निष्कपट सेवेंत, आणि दुसऱ्याच्या उदार गुणग्राही स्नेहांत व्यत्यय आला नाहीं. ह्याप्रमाणें उपक्रम झाला; तथापि पर्यवसान चांगलें झालें. एका श्रीमंत आयरिश सद्गृहस्थाच्या खटपटीनें इ० स० १७६५ सालीं दिजंबरच्या २६ व्या तारखेस वेंडोव्हर प्रांतांतील लोकांनीं बर्कला आपल्यातर्फे पार्लमेंटसभेंत निवडून पाठविलें. पार्लमेंटमध्यें शिरण्याची संधि मिळाल्यामुळें बर्कच्या श्रमाचें चीज व महत्त्वाकांक्षेची सफलता झाली.

इंग्लिश लोकांची द्रव्यतृष्णा अनावर व अमर्याद आहे, हें सर्वत्र महशूरच आहे. दुसऱ्याच्या कनवटीचे पैसे आपल्या खिशांत येऊन कसे पडतील, या विषयीं त्यांची सारखी धडपड चाललेली असते. द्रव्यलोभासारख्या विकारांना वश होऊन एकाच रक्तमांसापासून निघालेल्या स्वबांधवांना—केवळ ते निराळे राहिले म्हणून—लुबाडण्याच्या निरनिराळ्या कल्पना पार्लमेंट-मध्यें ह्यावेळीं निघत होत्या. सुधारलेल्या लोकांच्या लुबाडण्याच्या कल्पना सुधार-लेल्याच पाहिजेत. उघड उघड जबरदस्ती न करितां न्यायाच्या पांघरुणाखालीं आपणच केलेल्या कायद्यांच्या मदतीनें ते आपली जुलमी हांव तृप्त करून घेतात. ह्याचाच स्टँप अॅक्ट हा एक मासला होय. जॉर्ज ग्रेनव्हिल प्रधान असतां हा कायदा पसार झाला. ह्या कायद्यानें अमेरिकन लोकांना चीड येऊन त्यांच्यांत बंडाचीं पूर्वचिन्हें दिसूं लागलीं. हा कायदा पसार झाला त्यावेळीं त्याच्या विरुद्ध कॉमन्ससभेंत फक्त चाळीस जणांनीं मत दिलें व लॉर्डसभेंत त्यावर वादहि झाला नाहीं. ह्यावरून ह्याचा काय परिणाम होईल व आपल्यास त्याचे परिणाम कसे भोगावे लागतील ह्याची इंग्लिश लोकांना कल्पनाहि नव्हती असें दिसतें; परंतु रॉकिंगहॅम अधिकारारूढ झाल्यावर पार्लमेंटसभेंत दोन पक्ष झाले. एका पक्षाचें म्हणणें पडलें कीं अमेरिकन लोकांच्या सल्ल्याशिवाय त्यांच्यावर कर बसविण्याचा प्रयत्न ब्रिटिश राज्यव्यवस्थेचा पाया ज्या तत्वांवर रचला आहे, त्या तत्वांच्या विरुद्ध आहे. दुसऱ्या पक्षाचा आग्रह असा पडला कीं कर बसविण्याचा अधिकार आपल्या हातानें दुसऱ्यास देणें म्हणजे राष्ट्राला फारच लांछनास्पद आहे. ह्या पक्षाला लोक पुष्कळ असून त्यांचें वजनहि चांगलें होतें.

इ० स० १७६६ च्या जानेवारी महिन्यात पार्लमेंटसभा भरून कामास सुरु-वात झाली. अमेरिकेसंबंधीं वाद चालला असतां बर्कला भाषण करण्याचा प्रसंग आला, व तो त्यानें व्यर्थ दवडूं दिला नाहीं. त्याच्या पाठीमागून पिट बोलण्यास उठला. त्यानें ह्या नवीन सभासदाची फार स्तुति केली, व असा योग्य मनुष्य मिळविल्याबद्दल प्रधानमंडळाचें अभिनंदन केलें. तो म्हणाला—ह्या विषयावर सविस्तरपणें बोलण्याचा माझा स्वतः विचार होता; पण मला जें कांहीं बोलावयाचें होतें, तें मोठ्या मार्मिकपणानें व अत्युत्तम वक्तृत्वशैलीनें

आधींच सांगितलें गेल्यामुळें, आतां बोलण्यास कांहीं उरलें नाहीं. पिटसारख्या स्वतः वाक्पटु व राज्यकारस्थानी पुरुषापासून प्रांजल स्तुति प्रथमप्रसंगींच संपादन करितां आली, ह्यावरून बर्कच्या भाषणाची कल्पना करितां येईल. हें त्याचें पहिलेंच भाषण श्रवण करण्यास उत्सुक असा मित्रवर्ग पार्लमेंटसभेच्या गॅलरींत मुद्दाम त्या दिवशीं जमला होता. त्या सर्वांस बर्कच्या वाक्कौशल्याबद्दल योग्य अभिमान व आनंद वाटला हें सांगणें नको. ह्यानंतर पार्लमेंटमध्यें बर्कचीं पुष्कळ भाषणें झालीं, व तीं पहिल्याप्रमाणेंच सुश्राव्य झाल्यामुळें, त्याच्या अनुपम वक्तृत्वशक्तीबद्दल लोकांचा फारच अनुकूल अभिप्राय झाला. जॉनसननें आपल्या एका मित्रास लिहिलें कीं, आजपर्यंत बर्कच्याइतकी कीर्ति पहिल्याच प्रसंगाला कोणीहि मिळविली नाहीं. तो एके प्रसंगीं म्हणाला, बर्कनें उत्तम भाषण केलें ह्यांत मुळींच आश्चर्य नाहीं. बर्कला जे ओळखतात त्यांचा पक्का भरंवसा आहे कीं, तो सगळ्या देशांत अप्रतिम मनुष्य होईल.

ह्या प्रधानमंडळानें स्टांपाचा कायदा रद्द करून, राजनीतीची शक्कल लढवून विरुद्ध पक्षाचेंहि समाधान करण्याकरितां, मातृदेशाचा वसाहतींवर कर बसविण्याचा हक्क कायम आहे अशा आशयाचें एक बिल पार्लमेंटपुढें आणिलें; परंतु याचा परिणाम व्हावा तसा झाला नाहीं. त्यांच्याच पक्षाचे लोक त्यास प्रतिकूल होऊन प्रतिपक्षाची बाजू बळकट झाली. शेवटीं ह्या प्रधानमंडळास वर्षअखेरीस आपल्या जागेचा राजीनामा द्यावा लागला. असें वाकबगार आणि देशहितरत प्रधानमंडळ अधिकारच्युत झालेलें पाहून लोकांचीं मनें साशंक झालीं. एकामागून एक लागलेली प्रधानमालिका पाहून, हें केवळ स्वाभाविक नसून हेतुपूर्वक होत आहे अशी लोकांना शंका उत्पन्न झाली; व एका उद्योगी गृहस्थाच्या खटपटीनें जेव्हां असें समजलें कीं, पांच सहा वर्षांत अधिकारिवर्गांत एकंदर पांचशें तीस इसम बदलले तेव्हां तर हा आलेला संशय अधिक दृढ झाला. त्या प्रधानमंडाळाच्या पश्चात् पिटनें अधिकारवस्त्रें स्वीकारलीं. पुढें कांहीं दिवसांनीं बर्कनें राज्यकारभारावरून दूर झाल्याचीं कारणें आपल्याप्रमाणेंच लोकांना कळावी, व त्यांचा गैरभरंवसा होऊं नये म्हणून त्या अल्पकाळांतच संपुष्टांत आलेल्या कारकीर्दीची हकीकत लिहून आपल्या पक्षाची चांगली काम-

गिरी बजाविली. नवीन पक्ष अधिकारारूढ झाल्यामुळें बर्कचीहि जागा गेली त्यामुळें अर्थात् निर्वाहाचें साधनहि नाहींसें झालें; परंतु अत्यंत वर्णनीय व आश्चर्यकारक गोष्ट ही कीं, नवीन व्यवस्थेंत जागा मिळत असतांहि स्नेह्यांचा कोणत्याहि तऱ्हेनें प्रतिबंध नसतां व खुद्द रॉकिंगहॅमनें जागा पतकरण्यास संमति दिली असून त्यानें केवळ आपल्या पक्षाच्या इभ्रतीकरितां ती पतकरली नाहीं. वस्तुतः पाहतां नवीन व जुन्या व्यवस्थेंत मतभेद नसून व्यक्तिभेदच होता. तेव्हां जागा पतकरण्यांत मनोदेवतेविरुद्ध आचरण करण्याचें पाप लागत नव्हतें. लक्ष्मीची वक्रदृष्टि असतांहि बर्कनें आपोआप आलेली जागा घालविली ह्याचें पुष्कळ लोकांस गूढ आहे; पण ह्यांत बर्कच्या स्वभावाचा विचार केल्यास कांहींच चमत्कृतिजनक वाटणार नाहीं. स्वदेशहिताहून आत्महित भिन्न नाहीं असें मानणारेच खरे देशभक्त होत.

पार्लमेंटची बैठक संपल्याबरोबर जन्मभूमीस जाऊन त्यानें आपल्या जुन्या स्नेह्यांची भेट घेतली. येथें एका प्रांतीं तो आपल्या मित्राच्या घरीं असतां, त्याच्याविषयीं एक आख्यायिका सांगतात ती अशीः— एके दिवशीं सकाळीं जरा लवकरच जेवून आपल्या स्नेह्यांबरोबर बर्क शहरांत फिरावयास निघाला. जातां जातां वाटेंत एक तमाशा चालला होता, त्याच्या बाहेर कांहीं मुलें जमलेलीं असून आंत काय चाललें आहे तें पाहण्याविषयीं अगदीं आतुर दिसलीं. त्यांचें तें तद्विषयक कुतूहल व तें पुरविण्यास असमर्थ असल्यामुळें झालेला हिरमोड पाहून बर्कनें मालकाशीं ठराव करून सर्व जमलेल्या मुलांस आंत जाऊन आपली हौस पुरी करून घेण्याची सक्त दिली त्या वेळेस त्याचे स्नेही कांहीं मागें राहिले होते, ते आल्यावर सर्व खर्च आह्मीं देतों म्हणून त्यांनीं आग्रह धरिला; परंतु बर्क तें कबूल करीना. तो म्हणाला—इतक्या प्राण्यांना आनंदी करण्याची संधि क्वचितच येते ह्याकरितां त्यामुळें झालेल्या सुखाचा वांटा मी दुसऱ्या कोणास देणार नाहीं. वर्तमानपत्रांत किंवा अन्य रीतीनें आपल्या नांवाचा डिंडिमा जेणेंकरून होईल असें धर्मकृत्य करण्यास पुष्कळ लोक तयार असतात; पण क्षुल्लक व म्हणूनच प्रसिद्धीस न येणाऱ्या गोष्टींत मनाचा थोरपणा दाखविणारे पुरुष स्वभावसिद्धच थोर होत.

इ० स० १७६६ च्या आक्टोबर महिन्यांत नवीन पार्लमेंटसभेच्या बैठकीस सुरुवात झाली. रॉकिंगहॅमपक्ष बहुतेक अस्तंगतच झाला होता; परंतु बर्कचा लौकिक वृद्धिंगत होत चालला होता. कोणत्याहि ठिकाणीं जा, अप्रसिद्ध व विशेषतः द्रव्यहीन मनुष्याचा एकदम उत्कर्ष झालेला पुष्कळ लोकांस सहन होत नाहीं. शुक्लपक्षाच्या चंद्राप्रमाणें बर्कचें तेज पार्लमेंटमध्यें इतकें पडूं लागलें कीं, त्याच्या उदयापूर्वी टिवटिव चमकत असलेला तारासमूह अगदीं निस्तेज पडला. नामांकित घराण्यामध्यें ज्याचा जन्म नाहीं व लक्ष्मीची ज्याच्यावर पूर्ण अवकृपा आहे अशा मनुष्याला पार्लमेंटसभेंत येण्याचा अधिकार नाहीं असा त्यावेळीं सामान्य समज असे. ह्याप्रमाणें सर्व परिस्थिति प्रतिकूल असतांहि आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर पार्लमेंटसभेंत शिरून तेथें असामान्य कीर्ति ज्यानें संपादन केली, असें एक बर्कचेंच उदाहरण आहे. राजकार्यव्यापृत मंडळींत ज्याचें नांव कधीं ऐकिलें नाहीं असा मनुष्य एकदम इतक्या योग्यतेस चढलेला पाहून सर्वांस आश्चर्य वाटे; परंतु वक्तृत्वनैपुण्यानें आणि राजकार्यप्रवीणतेनें एका आगंतुकाकडे एका पक्षाचें अग्रेसरत्व आलेलें पाहून पुष्कळांस विषाद वाटूं लागला. त्याच्या असाधारण बुद्धिमत्तेचा व ग्राहकशक्तीचा विचार केला असतां त्याला मिळालेलें यश यथार्थच होतें. आपणावर पडलेलें काम चोख रीतीनें बजावतां यावें म्हणून हाऊस ऑफ् कॉमन्समध्यें आजपर्यंत जितके लोक आले त्यांपैकीं कोणीहि इतके मनःपूर्वक श्रम केले नव्हते. निरनिराळ्या विषयांचें त्यानें बरेंच ज्ञान संपादन केलें होतें व पाहिजे तेव्हां त्याचा उपयोग करण्याची शक्ति असल्यामुळें, त्याच्या भाषणांत तें ओतप्रोत भरलेलें असे. इतिहास, काव्य, अर्थशास्त्र, नीतिशास्त्र वगैरे सर्व प्रकारच्या विषयांत त्याला सारखेंच गम्य असे. अशा सभासदाचें वजन इतरांवर लवकर पडलें ह्यांत नवल नाहीं. राज्यकारभारांत जेथें शीघ्रकार्यकर्तृत्वाची अपेक्षा असून तर्कशास्त्राच्या नियमानुसार ही गोष्ट चांगली कीं ती चांगली ह्याचा खल करीत बसण्यास अवधि नसतो, तेथें निवळ विद्याप्रवीण मनुष्य नालायक ठरतो असा जो साधारण समज आहे तो बर्कच्या उदाहरणानें अगदीं असत्य ठरतो. सर्व विषयांचें ज्यानें परिशीलन केलें आहे असा मनुष्य एकाच विशिष्ट विषयांत पारं-

गतता मिळविलेल्या मनुष्यापेक्षां त्या विषयांतसुद्धां जास्त उपयोगी पडतो असा अनुभव आहे. माहिती असूनहि आपलें ह्मणणें दुसऱ्याच्या मनावर ठसेल अशा रीतीनें व्यक्त करून सांगण्याचें सामर्थ्य पुष्कळांच्या अंगीं नसतें; परंतु विषयाची पूर्ण माहिती व तो उत्कृष्ट रीतीनें प्रतिपादन करण्याची शैली हे दोन गुण ज्याच्यांत आहेत त्यास यश मिळाल्याशिवाय राहणार नाहीं. कल्पना, शब्दसंग्रह व जोरदार भाषण ह्यांमध्यें तर फारच थोडे बर्कची बरोबरी करूं शकतात. ह्या सर्वांपेक्षां विधात्याची उज्वल देणगी म्हटली म्हणजे सुदृढ स्मरणशक्ति. वक्तयाच्या अंगीं जे अमूल्य नैसर्गिक गुण असतात त्यांपैकीं हा एक आहे. स्मरणशक्तिविरहित निवळ बुद्धिमत्ता निस्तेज पडते. आजपर्यंत जे जे अलौकिक सरस्वतीपुत्र धवलयशोगिरिशिखरावर निर्धास्त रमत आहेत त्या सर्वांची स्मरणशक्ति सारखीच अवर्णनीय होती. बॉस्वेलनेंहि जॉन्सनच्या चरित्रांत त्याच्या अजब स्मरणशीलतेच्या गोष्टी सांगितल्या आहेत. तो एखाद्या अप्रसिद्ध व कधीं न ऐकलेल्या कवीच्या काव्यांतील चुटके अचानक म्हणत असे. पुष्कळ लोक पुस्तकांचे भारेच्या भारे वाचतात; पण वाचलेलें बिनचूक ध्यानांत ठेवून लौकिक विषयांच्या प्रतिपादनाकरितां प्रसंगोपात्त त्याचा उपयोग करण्याचें सामर्थ्य थोडक्यांच्याच अंगीं असतें. बर्कच्या अलौकिक स्मरणशक्तीची कल्पना खालील ऐकीव गोष्टीवरून करतां येईल.

एके ठिकाणीं कांहीं मंडळी जेवणाकरितां जमली होती. त्यांत बर्क व एक धर्माधिकारी असे दोघे होते. ह्या दुसऱ्या बहुश्रुत व प्राचीनइतिहासज्ञ मनुष्यानें नानाविध विषयांवर बोलण्यास सुरवात केली; परंतु ते विषय नेहमींच्या संभाषणांत कधींहि न येणारे असल्यामुळें जमलेल्या मंडळीपैकीं फारच थोडक्यांचें लक्ष चाललेल्या भाषणाकडे वेधलेलें होतें. कांहीं वेळपर्यंत बर्क स्वस्थ बसला होता; परंतु ब्रिटनमध्यें सीझरनें केलेल्या पराक्रमाचें सविस्तर वर्णन करीत असतां मध्येंच त्या धर्माध्यक्षाला थांबवून एक मोठी चूक केलेली त्यानें त्याच्या नजरेस आणली. त्यामुळें त्या गोष्टीचें सर्व स्वरूप पालटलें. धर्माधिकाऱ्यानें उत्तर न करितां झालेली चुकी कबूल केली. नंतर एका अप्रसिद्ध

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थल
अनुक्रम........ दि: ५।१२५
प्रवेश ५.८७ ...



लॅटिन ग्रंथकाराविषयीं बोलणें सुरू झालें. त्याच्या एका ग्रंथांतील वाक्य म्हणत असतां, धर्माधिकाऱ्यानें मुळांतलें दोन तीन शब्द गाळून त्या ऐवजीं भलतेच घातले, तेहि बर्कनें दुरुस्त केले. त्यानंतर एका प्राचीन व अत्यंत दुर्मिळ अशा भूगोलवर्णनाच्या पुस्तकाकडे भाषणाचा ओघ वळला. त्यामध्येंसुद्धां त्यानें आपलें टीकानैपुण्य प्रदर्शित केलेलें पाहून सर्व मंडळी आश्चर्यानें थक्क झाली. सायंकाळीं त्या मंडळींपैकीं एक गृहस्थ धर्माध्यक्षाबरोबर परत जात असतां त्यास म्हणाला, "महाराज, आपल्या भाषणाला विनाकारण व वारंवार बर्क व्यत्यय करीत असे तरी आपण उलट एक शब्दहि बोलला नाहीं, ह्यावरून आपल्या सहनशीलतेची तारीफच केली पाहिजे. कारण, राज्यकारभारांत पडलेल्या बर्कपेक्षां आपल्या अभ्यासाच्या स्वरूपावरून आपल्यालाच असल्या विषयांची पूर्णपणें माहिती असण्याचा जास्त संभव आहे". ह्यावर त्या धर्माध्यक्षानें उत्तर केलें, " इतकें असूनहि बर्कचें म्हणणें बरोबर होतें. मी चुकलों होतों एवढेंच नव्हे तर त्या विषयावर बोलण्याकरितां मी अगोदर मुद्दाम गेलों होतों. कारण, बर्क तेथें येणार हें मला समजलें होतें व त्याला प्रत्येक विषयाची खडानखडा माहिती आहे असें ऐकिलें तेव्हां त्याच्या विद्वत्तेची परीक्षा करण्याचा मी निश्चय केला; आणि ह्यासाठीं आजची सकाळ मी बहुतेक अभ्यासांतच घालविली. मला वाटत होतें इतकी माझी स्मरणशक्ति धड नाहीं. " ह्या एका गोष्टीवरून त्याच्या स्मरणशक्तीची व विस्तृत वाचनाची कल्पना करितां येईल.

इ० स० १७६७ च्या नोवेंबर महिन्यांत पार्लमेंटच्या बैठकीस सुरवात झाली. त्यावेळीं मंत्रिमंडळाच्या एकंदर कारभारावर त्यानें कडक टीका केली. रॉकिंगहॅम-पक्षाच्या प्रधानमंडळाशीं समेट करण्याबद्दल दोनतीनदां प्रयत्न झाले; पण ते सर्व व्यर्थ गेले. तेव्हां या पक्षांत भेद करून व आपसांत कलह उत्पन्न करून वितुष्ट पाडणें ह्या उपायाचें अवलंबन मंत्रिमंडळाच्या प्रमुखांनीं केलें.

इ० स० १७६८ च्या मे महिन्यांत नवीन निवडणूक झाली. त्या वेळेस वेंडोव्हर प्रांतांतील लोकांनीं बर्कला आपल्यातर्फे पुनः निवडून पाठविलें. याच सुमारास लंडनपासून २४ मैलांच्या अंतरावर बकिंगहॅम प्रांतांत बिकन्सफील्ड नांवाच्या गांवीं त्यानें दोन लाख रुपयांस

एक लाहानशी घरवाडी विकत घेतली. एवढा जमीनजुमला विकत घेण्यास बर्कनें पैसे कोठून आणिले ह्याविषयीं त्याच्या हितशत्रूंनीं नानाप्रकारचे कुतर्क काढले आहेत. कांहींनीं तर त्याच्यावर जुगारांत पैसे मिळविण्याचा आरोप लादला आहे. वास्तविक पाहतां असल्या आरोपाला मुळींच जागा नव्हती. दोन लाख रुपये देण्याची या वेळेस त्याची ऐपत नव्हती हें खरें आहे; पण तेवढ्यावरून त्यानें ते जुगारांतच मिळविले असले पाहिजेत असें अनुमान करणें अप्रयोजक होईल. दोन लाखांपैकीं दीड लाखास तर त्यानें तीच मिळकत गहाण ठेविली होती. पुढें त्याच्या मरणानंतर त्याच्या बायकोनें ही जिनगी विकून सर्व पैसे फेडले. शिवाय ह्या वेळेस रॉकिंगहॅमपासूनहि त्यानें कर्ज काढलें होतें. ही इतकी उघड गोष्ट असतांहि या थोर पुरुषाविषयीं लोकांनीं असा गैरसमज उत्पन्न करावा ह्याचें कारण राजकीय मतभेद होय. पार्लमेंटमध्यें जे दोन पक्ष आहेत त्यांपैकीं एका पक्षांतील लोक दुसऱ्या पक्षाच्या पुढाऱ्यांची नाचक्की करण्याचा नेहमीं प्रयत्न करितात, त्याचाच वर निर्दिष्ट केलेला एक मासला आहे. आमरण द्रव्यविवंचना बर्कच्या पाठीमागें हात धुवून लागली होती. एकट्या रॉकिंगहॅमचेच तीन लक्ष रुपये त्यास देणें होतें; परंतु त्या उदार, गुणग्राही व सहृदय पुरुषानें मरणसमयीं आपल्या पश्चात् आपल्या वारसांस बर्कचीं सर्व खतें फाडून टाकण्यास सांगितलें. असें ह्मणतात कीं, ही जिनगी विकत घेण्याचा बेत ज्या वेळेस रॉकिंगहॅमला समजला तेव्हां त्यानें खरेदी देणाराची रकम पुरी करण्याकरितां लागेल तितका पैसा देऊं केला.

दोघांच्याहि मोठेपणाला शोभण्यासारखा हा व्यवहार असतां, त्यांत दोषैकदृक् लोकांनीं बर्कला नांवें ठेवण्यास कमी केलें नाहीं. वास्तविक पाहिलें असतां बर्कनें रॉकिंगहॅमवर कमी उपकार केले नव्हते. राज्यकारभारांत रॉकिंगहॅममंत्रिमंडळाला त्यानें जें वारंवार साहाय्य केलें, तें केवळ अमोल होतें. त्याचप्रमाणें आयर्लंडमध्यें असतां तेथें असलेल्या रॉकिंगहॅमच्या जमीनजुमल्याची व्यवस्था तो निरपेक्षबुद्धीनें पहात असे. अशा स्थितींत दुसऱ्या एखाद्या स्वार्थसाधु मनुष्यानें आपल्या स्वतःच्या पदरास खार न लावतां परस्पर

सरकारतिजोरींतून बर्कला पेनशन देवविलें असतें. अशाप्रकारें खासगी चाकरीचा बोजा सार्वजनिक तिजोरीवर पडला नाहीं हें दोघांच्याहि निष्कलंक कीर्तीस अनुरूपच झालें.

बर्कला मरणसमयीं फार कर्ज होतें ही गोष्ट विरुद्धपक्षांतील लोक त्याच्या मोठेपणाला न साजणारी म्हणून वारंवार पुढें आणतात; परंतु २० वर्षेपर्यंत सारखा मुख्यप्रधानाचा पगार ओढीत असतांहि पिटनें आपल्या मागें ४०००० पौंड कर्ज ठेविले, ह्याची ह्या निंदक मंडळीस आठवण दिल्यास काय वाटेल? बर्कला कोणत्याहि प्रकारचें व्यसन नसून त्याचा स्वभाव उधळ्याहि नसे. सद्गुणांमध्यें ॲरिस्टॉटलनें उत्तम ठरविलेला जो गुण—क्षुद्र कंजूषपणा आणि ग्राम्य भपका त्यांच्यामधली स्थिति—तो त्याच्यामध्यें होता. निदान शेवटीं तरी प्रत्येक सावकाराचें कर्ज फिटलें आणि स्वतःशिवाय दुसऱ्या कोणाचेंहि नुकसान झालें नाहीं. ह्या गोष्टीला विशेष महत्व देऊन बर्कच्या उज्वल कीर्तीला कालिमा आणूं पाहणाऱ्या लोकांची स्थिति, नामांकित व पुण्यप्रद अशा देवमूर्तीच्या दर्शनास जाणाऱ्या कांहीं मूढ यात्रेकरू लोकांप्रमाणें आहे. मार्ग क्रमीत असतां वरून प्रखर उष्णतेनें अंग होरपळणें, भोंवतालच्या जनसंमर्दांत चिरडून जाणें, व वेळेवर अन्नपाणी न मिळणें, इत्यादि क्षुल्लक व क्षणिक अशा आनुषंगिक गैरसोईविषयींच ते कुरकुर करितात; परंतु त्यांच्या पर्याकुल व जड दृष्टीपुढें आपलें सर्व वैभव आणि ऐश्वर्य ह्यांनीं युक्त अशी पुढें उभी राहिलेली देवाची भव्य व मनोहर मूर्ति, जिच्या दर्शनाकरतां ते मुद्दाम जातात, ती प्रायः त्यांच्या स्मरणांतून विगलित होते.

लोकसमूहावर अवलंबून न राहतां बर्कसारख्या स्वातंत्र्यप्रिय मनुष्यानें एकाच व्यक्तीचा आश्रय करून राहणें अश्लाघ्य आहे, अशाविषयीं त्याच्या शत्रूंचा त्याच्यावर मोठा कटाक्ष असे; परंतु हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, साहाय्यावांचून जें होणें केवळ दुर्घट, किंवा झालेंच तर नानाविध दुःसह संकटें अनुभविल्याविना होणारें नाहीं, असें कार्य लवकर घडवून आणण्याचें उत्कृष्ट साधन म्हटलें म्हणजे, एकाच योग्य व्यक्तीचा आश्रय करून राहणें हें होय. त्यामुळें बुद्धिमत्तेचा यशोमार्ग सुगम होतो. शिवाय अवमानकारक शर्तींनीं जोंपर्यंत असा उदार

आश्रय गुरफटलेला नाहीं, व स्वतःच्या स्वतंत्र मतांचा त्याग करणें भाग पडत नाहीं, तोंपर्यंत त्याचा स्वीकार कां करूं नये हें समजणें कठीण आहे. त्यांतहि कीर्तिमंदिराच्या द्वारापर्यंत ज्यानें आपला रस्ता स्वतःच चोखाळला आहे त्या मनुष्याला मंदिराच्या अंतर्गृहांत नेऊन सोडण्याकरितां, स्नेहबुद्धिपुरःसर पुढें केलेला हात झिडकारून टाकण्यांत, त्याचें शहाणपणापेक्षां गर्वाधिक्यच व्यक्त होतें.

त्याचप्रमाणें व्यक्त्याश्रय आणि लोकाश्रय ह्यांमध्यें फार मोठा फरक आहे. पहिला बहुधा गुणपरीक्षणाच्या पूर्वीच प्राप्त झाल्यामुळें त्यांत निष्कारण औदार्य दिसून येतें; परंतु गुण चांगले कसोटीस लावल्यावर आश्रय देणें म्हणजे विद्व-त्तेला रुजू असणारें कर्ज फेडण्याप्रमाणें आहे. लोकाश्रय हा शब्द निवळ भ्रामक आहे. आजपर्यंत जनसमूहानें कोणालाही व्यापारी भाषेंत बोलणें म्हणजे माल घेतल्याशिवाय आश्रय दिला नाहीं. लोकाश्रय मिळत नाहीं. तो अलौकिक गुणांनीं लोकसेवा करून विकत घ्यावा लागतो. श्रम करून प्राप्त झालेल्या सुखाला आश्रय म्हणणें रास्त नाहीं.

इंग्लंडांत विद्वान् ग्रंथकर्त्यांची राजदरबारांतून हल्लींप्रमाणें क्वचितच संभावना होत असे, व ह्या कामांत सुखांशाच्या मानानें श्रमभारच फार असल्यामुळें व रॉकिंगहॅम्सारख्या राजकारण-पटु मनुष्याशीं सहवास घडल्यामुळें बर्कच्या मनाचा ओघ राज्यकारभाराकडे वळला. नाहींतर राजकीय उलाढालीकडे बर्कचें मनच कदाचित् गेलें नसतें.

# भाग चवथा

## अमेरिकेचा प्रश्न.

इंग्लंडचा राज्यकारभार लोकनियुक्त सभासदांकडून होत असतो. सुधारलेल्या सर्व राष्ट्रांत एका अनियंत्रित पुरुषावर सर्व कारभार सोपविण्यापेक्षां हीच रीत विशेष चांगली ठरली आहे. अशा प्रकारच्या राज्यव्यवस्थेंत विशेष हेंच कीं, राजाच्या जुलमी व स्वैर वर्तनापासून प्रजेच्या स्वातंत्र्याचा आणि सुखाचा ऱ्हास होण्याचा फारच कमी संभव असतो. कारण, शेंकडो लोक एकच विचाराचे होऊन आपल्या सुखाची आपणच पायमल्ली करून घेतील असें प्रायः संभवणार नाहीं; तथापि सृष्टीमध्यें असा एक चमत्कार दिसतो कीं, वारंवार एकाच कारणापासून अत्यंत विरोधी कार्यें घडून येतात. जी राज्यव्यवस्था इंग्लिश लोकांनीं अश्रांत श्रम करून वेळीं प्राणहि खर्चीं घालून राजांच्या अनिर्बंध तृष्णेच्या पेयस्थानीं आपलें स्वातंत्र्यसुख पडूं नये म्हणून स्थापन केली, तीच त्यांच्या स्वतंत्रतेची राखरांगोळी करण्यास पुढें कारणीभूत होत होती, ही गोष्ट इतिहासांत ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

तिसरा जॉर्ज राज्यारूढ झाल्यापासून तों अमेरिकेंतील वसाहती स्वतंत्र होईपर्यंत, म्हणजे इ० स० १७६०पासून १७७६पर्यंत, मध्यंतरीं इंग्लंडकडे पाहून परकीय राजांना उद्वेग व समाधान वाटे. फ्रेडरिक राजानें प्रतिज्ञा करून सांगितलें कीं, मी जरी लहानसा जर्मनीचा राजा आहे, तरी इंग्लंडच्या राज्यपदाची इच्छा तें फुकट दिलें तरी धरणार नाहीं. ग्रेटब्रिटनच्या वैभवाला उतरती कळा लागली आहे, पार्लमेंट आपला नाश करून घेत आहे असें ऑस्ट्रियाच्या दुसऱ्या जोसेफ राजानें विधान केलें. इंग्लंडचें गतवैभव युद्धावांचून परत प्राप्त होत नाहीं अशी रशियाच्या क्याथराईनची खात्री झाली. खुद्द इंग्लंडमध्यें हॉरेस

वॉलपोलसारख्या धूर्त व अनुभवशीर माणसांचीं मनें देशाची तत्कालीन स्थिति पाहून चिंतातुर होऊन गेलीं. युद्धाचा प्रसंग आला असतां सैन्य कोणत्या बाजूला मिळेल याची चौकशी लोक करूं लागले. रोमन इतिहासज्ञ तत्कालीन इंग्लंडच्या स्थितीचें हुबेहुब प्रतिबिंब आपल्या आवडत्या विषयांत सांपडेल ह्या इच्छेनें त्या इतिहासाची पानें चाळूं लागले. ज्यांना फ्रान्स देशांत जिनगी मिळविण्याची संधि आली ते तीवर मृताचा वारस म्हणून आपला हक्क शाबीत करण्याची खटपट करूं लागले. कारण, त्यांना वाटलें कीं न जाणो अशी वेळ येईल कीं, जेव्हां इंग्लंडमध्यें राहणें भयावह होऊन फ्रान्समध्यें जाऊन राहणें स्वतंत्रेच्छु मनुष्याला अधिक श्रेयस्कर होईल. इतक्यांत मिडलसेक्स प्रांतांतील निवडणुकीचें भयंकर वादळ सुटलें. व त्या वादळापुढें इंग्लिश स्वतंत्रता कोठच्या दिशेला उडून जाते ह्याचा अजमास लागेना. पार्लमेंटच्या नवीन निवडणुकीस इ०स० १७६८ त आरंभ झाला. ह्या वेळेस विल्क्स् नांवाचा मनुष्य न्यायसंरक्षणबाह्य असल्यानें पॅरिस येथें असे. तो इंग्लंडास परत येऊन लंडन शहराच्या तर्फे उमेदवार म्हणून पुढें आला; परंतु तेथें त्यास यश आलें नाहीं; तथापि पांच वर्षामागें त्यानें राजदरबाराविरुद्ध लिहिलेल्या लेखांचें व तत्प्रीत्यर्थ सोसलेल्या अपेष्टांचें लोकांस स्मरण झालें. मिडलसेक्स प्रांतांतल्या लोकांनीं आपल्या तर्फे पार्लमेंटमध्यें निवडून जाण्याकरितां उमेदवार राहण्यास त्यास उत्तेजन दिलें. अत्यंत संक्षुब्ध अशा निवडणुकीनंतर सर्वांपेक्षां पुष्कळ मतें मिळून पार्लमेंटचा सभासद म्हणून अखेरीस तोच निवडला गेला.

इ० स० १७६४ सालीं एका पत्राचा अंक पुनः छापल्याबद्दल व स्त्रीजातीवर त्यानें एक निबंध लिहिला त्याबद्दल विल्क्सची चौकशी होऊन तो दोषी ठरला होता व शिक्षा सोसण्यास हजर नसल्यामुळें त्यास न्यायसंरक्षणबाह्य म्हणून ठरविलें होतें. पण मिडलसेक्स येथील निवडणुकीनंतर काम चालविण्यांत झालेल्या एका चुकीमुळें, पूर्वी झालेला ठराव त्यानें फिरवून घेतला तरीहि, पूर्वीच्या अपराधाबद्दल बावीस महिने कैद व एक हजार पौंड दंड अशी त्यास शिक्षा झाली.

पुढें त्याच्याच अर्जावरून खुद्द पार्लमेंटमध्यें त्या खटल्याची चौकशी होऊन विल्क्सला पार्लमेंटसभेंतून काढून टाकण्याची सूचना बहुमतानें पास झाली. त्या-

मुळें मिडलसेक्स प्रांतांत परत निवडणुकीची धांदल उडाली; परंतु यत्किंचित्‌हि व्यत्यय न येतां तत्प्रांतीय लोकांनीं सर्वानुमतें विल्क्सलाच निवडून दिलें. दुसऱ्या दिवशीं कॉमन्ससभेनें भरपूर बहुमत करून असा ठराव केला कीं, पार्लमेंट-मधून बहिष्कृत केल्याकारणानें तेथें काम करण्यास विल्क्स अपात्र आहे; परंतु पार्लमेंटचा हेका पाहून तोच प्रतिनिधि पाठविण्याचा लोकांचा निश्चय दृढतम झाला. तेव्हां अदूरदृष्टि सरकारनें विल्क्सला हटविण्याकरितां आपल्या तर्फेचा एक मनुष्य त्याच प्रांतांत तयार केला. पण सर्व लोकांच्या निश्चयैक्यापुढें सर-कारतर्फेच्या मनुष्याला किती मतें मिळूं शकणार? इतकी खटपट करूनहि अखे-रीस विल्क्स् सुटेना; तेव्हां दुराग्रहरूपी ग्रहानें ग्रासलेल्या पार्लमेंटनें लोकबहु-मतानें पसंत झालेल्या विल्क्स्ला बेकायदेशीर रीतीनें एकीकडे सारून, सरका-रनें पाठविलेल्या मनुष्याचीच, कमी मतें मिळालीं असतांहि, निवड योग्य ठरविली.

ह्याप्रमाणें लोकांनीं निवडून दिलेल्या प्रतिनिधीला पार्लमेंटमध्यें बसण्यास नालायक ठरविण्याचा अधिकार पार्लमेंटच्या एकाच शाखेकडे वस्तुतः मुळींच पोंचत नाहीं. कारण असें झालें असतां एखाद्या दिवशीं अनधिकारापन्न पक्षां-तील झाडून सर्व लोक पार्लमेंटसभेचे सभासद होण्यास नालायक आहेत, असा विरुद्धपक्षांतील लोकांना ठराव करितां येईल, व अशा रीतीनें विरुद्धपक्षाकडून आपल्या राज्यकारस्थानाला येणारा व्यत्यय समूळ नाहींसा होईल. ह्या गोष्टी-वरून एवढें चांगलें व्यक्त होतें कीं, इंग्लंडसारख्या राज्यपद्धतीपासूनसुद्धां एक-सत्तात्मक राज्यव्यवस्थेखालीं अनुभविल्या जाणाऱ्या जुलमी अन्यायाचा प्रादुर्भाव होतो. ह्या राजानुरंजनतत्पर पार्लमेंटच्या जुलमांचें पर्यवसान येथेंच झालें नाहीं. पार्लमेंटमध्यें झालेला वादविवाद छापून प्रसिद्ध केल्याबद्दलसुद्धां कांहीं छापखाने-वाल्यांवर खटले झाले.

मागल्या शतकांत राजानें केलेले जुलूम लोकांना भोंवत असत. ह्या शतकांत लोकनियुक्त सभासदांनींच केलेली अन्यायपरंपरा लोकांच्या दुःखांना कारण होत आहे असें जें बर्कनें ह्यावेळीं म्हटलें तें अक्षरशः खरें आहे. अशा कृत्यांच्या

दुःष्परिणामाबद्दल बर्कनें पार्लमेंटला वेळींच जागें केलें होतें; परंतु अनियंत्रित सत्तेविषयीं एकदां अभिमान उत्पन्न झाला म्हणजे मग तो न्यायदेवता व अनुभवरूपी प्रबळ तोफखाना ह्यांनाहि अभेद्य होतो. ह्या वेळच्या स्थितीचें वर्णन बर्कनें फारच मार्मिक रीतीनें केलें आहे. तो म्हणतोः " 'सरकार' शब्द उच्चारतांच लोकांचा थरकांप व तिरस्कारबुद्धि एकदम दृष्टोत्पत्तीस येते. कायद्याचें भय अजीबात नाहींसें झालें आहे, व त्याची अम्मलबजावणी न झाली तर उपहास होतो, व झाली तर सरकाराविषयीं द्वेषभाव जागृत होतो. वसाहतींचें मातृदेशावरील प्रेम आणि पूज्यबुद्धि शिथिल झालीं आहेत. आपला हेका एकीकडे ठेवून दुसऱ्यांचें म्हणणें मान्य करण्याइतकी अक्कल सरकारामध्यें नाहीं, किंवा अडथळ्यांना न जुमानतां आपला हेतु तडीस नेण्याची कुवतहि नाहीं. आजपर्यंत कधीं न झालेली अव्यवस्था व एकचएक गोंधळ कचेऱ्यांत, कुटुंबांत, पार्लमेंटमध्यें, किंबहुना सर्व राष्ट्रांत, माजून राहिला आहे." ह्या वर्णनावरून राजा आणि प्रजा ह्यांचा परस्परसंबंध ह्यावेळीं कसा होता, प्रजेचा राजाविषयीं कितपत पूज्यभाव होता, व राजाचें प्रजेवर किती प्रेम होतें ह्याची चांगली कल्पना करितां येईल.

इ० स० १७७० सालीं 'आधुनिक असंतोष' ह्या नांवाचा बर्कनें एक लेख लिहिला. त्यांत तत्कालीन स्थितीचें सविस्तर आणि तात्विक विवेचन केलें आहे. रॉकिंगहॅम मंत्रिमंडळाच्या हेतूंच्या समर्थनार्थ हें पुस्तक मूळ लिहिलें होतें; परंतु केवळ तत्कालीन प्रसंगापुरताच ह्याचा उपयोग नसून त्यांत सांगितलेले सर्वसामान्य सिद्धांत, त्या सिद्धांतांची प्रगल्भता व सत्यवादित्व ह्यांच्या योगानें त्या लेखाला चिरकालीनत्व प्राप्त झालें आहे. त्यानेंच लिहिलेल्या फ्रेंच राज्यक्रांतीवरील ग्रंथाशिवाय इंग्रजी भाषेंत ह्या विषयावर दुसरा विचारपूर्वक लिहिलेला लेख आढळणार नाहीं असा विद्वान् लोकांचा अभिप्राय आहे. ह्यापासून राजकारणी पुरुषांना पुष्कळ ज्ञान मिळून आनंद होण्यासारखा आहे. त्याचप्रमाणें ह्या पुस्तकाची भाषासरणी वक्तृत्वशाली असून बर्कच्या बुद्धिमत्तेचा व शहाणपणाचा प्रत्यय आणणारी आहे. बर्कनें आपल्या पुस्तकांत राजाचीं कृष्णकारस्थानें बाहेर काढून त्यांवर कडक टीका केली आहे. राज्यकारभारांत पुढें

येऊं पाहणाऱ्या एका होतकरू मनुष्यानें राजाच्याहि विरुद्ध लिहिण्यास कमी केलें नाहीं. ह्यावरून बर्कच्या स्वतंत्र बाण्याचें व धैर्याचें आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाहीं. ह्यावेळची स्थिति अशी होती कीं, बर्कनें राजाला व तदाश्रित प्रधानवर्गाला मदत केली असती, तर त्यास मोठा अधिकार मिळून धनप्राप्ति झाली असती; पण राजचरणारविंदीं मिलिंदायमान होऊन प्राप्त झालेल्या वैभव-सुखांत आनंद होण्यासारखें क्षुद्र मन बर्कचें नव्हतें. अवलोकन व एकांतमनन ह्यांच्या योगानें त्यानें काढलेल्या व्यापक सिद्धांतावरून त्याच्या बुद्धिसामर्थ्याचें अनुमान सहज करितां येतें. राजाच्या विरुद्ध प्रजेचीं मनें उद्वेगजन्य मनोविकारांनीं परिप्लुत होतात, ह्याविषयीं तो म्हणतो " लोक कधींहि प्रमाद करीत नाहींत, असें म्हणणाऱ्यांपैकीं मी नाहीं. ह्या देशांत, त्याचप्रमाणें अन्य देशांत, त्यांच्या हातून वारंवार मोठमोठे प्रमाद घडले आहेत; परंतु एवढें मात्र खात्रीनें सांगतां येईल कीं, प्रजा व राज्यकर्ते ह्यांमध्यें जे तंटे होतात, त्यांत लोकच दोषी आहेत असें प्रथमदर्शनीं तरी निदान म्हणतां येणार नाहीं. दांडगाई करण्यांत लोकांचा कांहीं फायदा नसतो. ज्या ज्या वेळेस ते अस्वस्थता उत्पन्न करितात, त्या त्या वेळेस अपराध नसून त्यांची ती केवळ चूक असते. " पुढें त्यानें दुसऱ्या एका ग्रंथकाराचा उतारा दिला आहे, तो राजकारणी पुरुषांनीं कधीं न विसरण्यासारखा आहे. " मोठमोठ्या संस्थानांत बंडें होतात, तीं एकाएकीं झालीं असें कधींहि होत नाहीं, किंवा लोकांच्या लहरीवरहि तीं अवलंबून नसतात. युद्ध करण्याच्या हांवेनें लोक कधींहि बंड करीत नाहींत; तर असह्य जुलमांच्या परमावधीमुळेंच तसें करण्यास ते प्रवृत्त होतात". पार्लमेंटमध्यें नेहमीं दोन पक्ष असतात. त्यामुळें कोणत्याहि मनुष्याला दोहोंपैकीं एका पक्षाला जाऊन मिळावें लागतें. ह्याचा परिणाम वारंवार असा होतो कीं, स्वतःचें मत झुगारून, स्वीकृत पक्षाच्या बहुमताप्रमाणें वागणें भाग पडतें. यास्तव ही पद्धति अपरिपक्व विचारांच्या कांहीं मंडळीस अमान्य झाली होती. ही मंडळी कोणत्याहि पक्षाला न मिळतां, वाटेल तेव्हां वाटेल त्या पक्षाच्या तर्फे आपलें मत देत असत. ह्या लोकांचें म्हणणें बर्कनें मुद्देसूद रीतीनें खोडून काढलें आहे. तें इतकें कीं, त्यावर अद्यापि कोणीहि उत्तर देण्याचें साहस केलें नाहीं. हें बर्कचें

पक्षसमर्थन एकंदरींत युक्त आहे ह्यांत शंका नाहीं. तथापि हरएक प्रसंगीं एका व्यक्तीनें केवळ आपल्या पक्षाला रंजविण्याकरितां आपलीं स्वतंत्र मतें गुंडाळून ठेवावीं, असा बर्कचा अभिप्राय असेल असें दिसत नाहीं. कारण, फ्रान्स देशांतल्या राजक्रांतीच्या वेळेस केवळ सत्याकरितां आत्मपक्षाला सोडण्यास बर्कनें मागेंपुढें पाहिलें नाहीं.

पार्लमेंटचे सभासद लोकानियुक्त असून, राजाच्या अंकित होऊन बसले होते, तेव्हां पार्लमेंटची सुधारणा कशी होईल, इकडे सर्वांचें लक्ष लागलें होतें. निरनिराळे लोक निरनिराळे उपाय सुचवीत. कोणाला वाटे प्रत्येक वर्षास पार्लमेंटची निवड नवी करावी; कोणी म्हणत मुलकी खात्यांतील लोकांना पार्लमेंटचे सभासद होऊं देऊं नये. हे सर्व उपाय तांत्रिक असून वरवर पाहणाऱ्या मनुष्याला सुचणारे आहेत. भोंवतालच्या परिस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण करण्याची संवय असल्यामुळें, बर्कचें निदान अगदीं बरोबर होतें ह्यांत आश्चर्य नाहीं. तो म्हणतो, " सांवत्सरिक किंवा त्रिसांवत्सरिक पार्लमेंट करण्याविषयीं ज्या सूचना झाल्या आहेत, त्यांपासून किंवा अशाच दुसऱ्या उपायांपासून खरा कार्यभाग होईल असें मला वाटत नाहीं. त्याला एकच उपाय आहे, आणि तो हा कीं, जोंपर्यंत लोकांचा सरकारावर पूर्ण विश्वास बसला नाहीं, तोंपर्यंत लोकांनीं आपण निवडून पाठविलेले सभासद, आपल्यावर सोंपविलेलें काम पार्लमेंटमध्यें कसें वजावतात ह्याविषयीं डोळ्यांत तेल घालून दक्ष असलें पाहिजे. मतदार लोकांनीं वारंवार सभा भरवून, आपण पाठविलेल्या प्रतिनिधींनीं काय मत दिलें ह्यासंबंधीं खात्रीलायख माहिती मिळविली पाहिजे. "

इ० स० १७७० च्या पार्लमेंटमध्यें प्रथम चार्लस् फॉक्स व बर्क ह्यांचा सामना झाला. ह्या दोघा राजकार्यधुरंधर पुरुषांचा जो निकट संबंध जडला, व दोघांनीं जो अप्रतिम लौकिक संपादन केला, त्यामुळें ह्या राजकारणपटूंची तुलना केली असतां वावगें होणार नाहीं. बर्कच्या बुद्धिमत्तेच्या गोष्टी फॉक्सनें आपल्या बापाच्या घरीं ऐकिल्या होत्या. इ० स० १७६६ सालीं ह्या दोघांची समक्ष ओळख झाली. पुढें परिचय वाढत चालला. त्या बरोबर, ह्या अल्पवयस्क राजकारणी पुरुषाच्या मनांत आपल्या स्नेह्याविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न झाली.

चाहतां चाहतां त्याचा तो शिष्य बनला. शिष्याचा साथीदार झाला व साथीदाराचा कीर्तिसंपादनार्थ स्नेहशील प्रतिस्पर्धी होऊन बसला. अखेरीस असामान्य व अनपेक्षित गोष्टी घडून आल्यामुळें, दोघेहि एकमेकांचे अत्यंत विरोधी बनले.

दुसऱ्यावर वजन पडेल असें अंगीं सामर्थ्य, व पार्लमेंटमध्यें उत्कृष्ट रीतीनें काम करण्यासारखी विलक्षण बुद्धि असतांहि, त्यानें सार्वजनिक कामांत म्हणा किंवा खाजगी आयुष्यक्रमांत ह्मणा, ज्याच्यायोगानें लोकांचा विश्वास व तद्वारा उत्तेजन मिळतें, असा व्यावहारिक शहाणपणा आणि सुपरिणत दूरदर्शित्व दाखविलें नाहीं. ह्याचें कारण कांहीं अंशीं त्याचा जातिस्वभावच होय व कांहीं अंशीं अल्पवयांतच वडिलांचा धाक कमी होऊन, त्यांच्याकडून झालेले लाड हें होय. त्याचें मन फारच लवकर परिपक्व झालें होतें. तो बाल्यावस्थेंतच बहुतेक राजकारणी पुरुष बनला होता; परंतु ह्या कांहींशा अकाल मानसिक परिपक्वतेबरोबरच आत्मशिक्षण व आत्मनियमन ह्यांकडे त्याचें अत्यंत दुर्लक्ष झालें, व त्यामुळेंच मनोविकारांचा पगडा त्याच्या विचारशक्तीवर वारंवार बसत असे. व्यसन, सक्तीचा अतिरेक, सामान्य आचारविचार पाळण्याविषयीं हलगर्जीपणा, खासगी वर्तन शुद्ध ठेवण्याविषयीं बेफिकीरी, कीं ज्यामुळें त्याच्या अत्यंत भरभराटीच्या दिवसांतहि राष्ट्रांतील विचारशील लोक त्याच्याकडे साशंक दृष्टीनें पहात असत. ह्या सर्व गोष्टी त्याच्या स्वैर मनाची साक्ष देतात. धर्माकडेहि त्याचें लक्ष तितपतच होतें.

तथापि त्याच्या अंगीं उत्कृष्ट सद्गुणहि होते. प्रेमळपणा, सौजन्य, औदार्य स्नेहशीलता व निष्कपटपणा, इत्यादि गुणांमुळें त्याच्या दोषांवर इतकें आवरण पडत असें कीं, त्याच्या स्नेह्यांना ते दोष क्वचितच दिसत व लोकांनीं त्याच्या वर्तनावर आणलेल्या आरोपांवर त्यांचा विश्वास बसत नसे. त्याच्या अंगीं जे कांहीं अद्वितीय गुण होते. ते प्रायः स्वभावासिद्ध होते व त्यांच्यावरच तो अनुभवरूपी विश्वसनीय मार्गदर्शकाला न जुमानतां, बहुशः अवलंबून असलेला दिसे ज्ञानाऐवजीं चातुर्य, धिमेपणानें शोध केल्यानंतर प्राप्त झालेल्या फलाऐवजी स्वतःकल्पकत्व, व मनन न करितां एकदम निर्णय करण्याची संवय, हीं

त्याच्या ठिकाणीं बहुशः दृष्टीस पडत. त्याची बुद्धि तीव्र होती. महत्वाच्या सार्वजनिक कामांत स्वतः वाटे त्याचप्रमाणें तो चाले. आपल्या मतांना दुराग्रहानें चिकटून राहिल्यानें दुसऱ्याच्या मतांविषयीं त्याच्या मनांत बिलकुल आदर नसे. परोपदेश ऐकण्यानें स्वबुद्धीला कमीपणा येतो, असा ग्रह त्याचा लहानपणींच झालेला होता.

संभाषणांत त्याचें तेज क्वचितच पडे. त्याचा पत्रव्यवहार सामान्य जनसमूहाच्याहून फारसा भिन्न नसे. त्याचे ऐतिहासिक लेख माहितीनेंहि भरलेले नाहींत. किंवा त्यांत स्वतःचें असें कांहीं नाहीं. वादविवादामध्यें मात्र त्याचें दिसून येणारें सामर्थ्य अप्रतिम असून अवर्णनीय होतें; परंतु अधिक विस्तृत व उदात्त अर्थ घेऊन वक्ता ह्या नात्यानें पाहिलें तर जरी त्याचें उद्गार इतिहासांत अक्षय्य राहण्यास आणि भावी प्रजेच्या प्रशंसनेस पात्र आहेत तरी त्याच्यावर बहुतेक सर्व प्रसंगीं बर्कचीच सरशी झालेली दिसून येते. श्रोत्यांचे मनोविकार व कल्पनाशक्ति आकलन करून घेण्याची हातोटी त्यास फारशी साधली होती असें दिसत नाहीं, आणि अशा प्रकारची शक्ति असल्याविना वक्त्याला आपल्या कलेंत नैपुण्य कधींहि प्राप्त होणार नाहीं. राज्यकारभारांत त्याच्या मनाचा कल लहानसहान गोष्टींकडे नसून, मोठ्या गोष्टींकडे फार असे. उपयुक्ततेचा किंवा शक्याशक्यतेचा विचार न करितां, जें ज्ञान (केवळ तत्वदृष्ट्या) पूर्ण असेल तिकडे त्याच्या मनाची धांव जाई. व्यवहारामध्यें उपयोग केला असतां येणाऱ्या अडचणीची परवा न करितां, नुसतें विधानच ज्यांचें रमणीय आहे असे व्यापक सिद्धांत, तो मोठ्या उत्सुकतेनें ग्रहण करी. कित्येक गोष्टींचा त्या नवीन एवढ्यावरूनच तो मोठ्या धाडसानें अंगीकार करी. बर्कमध्यें व फॉक्समध्यें विलक्षण फरक दिसून येई तो हाच कीं, बर्कला जरी तत्त्ववेत्त्याप्रमाणें शिक्षण मिळालें होतें, आणि दुसऱ्यास शिकवावयाचें असल्यास तो त्याच दृष्टीनें शिकवी, तरी राजकीय किंवा व्यावहारिक कामाचा विचार करीत असतां अनुभवाविरुद्ध म्हणून जेवढे सिद्धांत असतील, त्यांची किंमत तो कांहीं समजत नसे.

बर्कच्या औदार्याविषयीं मागें सांगितलेंच आहे. त्याचें अंतःकरण प्रेमळ होतें, निराश्रित मनुष्याला आपल्या सामर्थ्यानुरूप हरएक प्रकारची मदत

करण्यास तो हमेश तत्पर असे. इ० स० १७६३ सालीं तो डब्लिन येथें गेला होता. तेथें बॅरी नांवाचा एक मनुष्य एका स्नेह्याचें पत्र घेऊन बर्ककडे आला. हा मोठा चित्रकलानिपुण होता; परंतु दुर्दैवानें त्याची स्थिति फारच शोचनीय होती. त्यानें एक चित्र तयार केलें होतें; परंतु त्याचें चीज त्याच्या गांवीं न झाल्यामुळें तो मुद्दाम राजधानीस आला होता. चित्र पाहून बर्कनें त्याची फार प्रशंसा केली व पुढें काय करण्याचा त्याचा उद्देश आहे ह्याविषयीं चौकशी करून घेतली. नंतर त्याच्या मानसिक शक्तीची परीक्षा करण्याच्या हेतूनें त्यानें एक विषय काढला. बर्कनें मुद्दामच त्या विषयाची उलट बाजू घेऊन बोलण्यास आरंभ केला होता. बोलतां बोलतां आपल्या म्हणण्याच्या पुष्टीकरणार्थ ' उदात्तता व सौंदर्य ' ह्या विषयावरील निबंधांतून बॅरीनें एक वाक्य म्हणून दाखविलें. ह्या निबंधाचें कर्तृत्व बर्ककडेच आहे, हें त्या बिचाऱ्याला माहित नव्हतें. बर्कनें आपल्या निबंधाचें महत्त्व शिथिल करण्याचा आव घातला. हें पाहून तो चित्रकार इतका संतप्त झाला कीं, त्याचें शांतवन करण्याकरितां बर्कनें ताबडतोब ग्रंथकर्तृत्व कबूल केलें. हें पाहून बॅरीला फार आनंद झाला, व त्या निबंधाविषयीं असलेला आपला पूज्यभाव अधिक स्पष्ट रीतीनें व्यक्त करण्याकरितां स्वतः हातानें लिहिलेली वरील निबंधाची एक प्रत त्यानें पुढें केली. बर्कची दयाशीलता, ओळख व फुकटचा उपदेश इतक्यावरच थांबलीं नाहींत. स्वतःच्या निर्वाहाचीं साधनें अल्प व सर्वथा असमाधानकारक असतांहि, त्यानें इंग्लंडास जाण्याचा खर्च देऊन, त्यास आपल्या भावाबरोबर पाठवून दिलें. पुढें लंडन येथें आपल्या बिऱ्हाडीं ठेवून घेऊन नामांकित चित्रकारांशीं त्यानें त्याचा परिचय करून दिला व संधि मिळतांच त्याला लहानशी चाकरीहि लावून दिली. पैशाची बळकटी नव्हती ही गोष्ट खरी आहे; परंतु दुसऱ्या लाखों मनुष्यांमध्यें आढळून न येणारी अंतःकरणाची सदयता व निराश्रित बुद्धिमत्तेविषयीं निर्व्याज अनुकंपा, हीं त्याच्यांत जात्याच असल्यामुळें, अपेक्षित फलार्जनाची संधि न मिळाल्यानें, ती बुद्धिमत्ता, अत्यन्त उपेक्षा व दारिद्र्य ह्यांपायीं नष्टप्राय झालेली त्याच्यानें पाहवत नसे. येथेंच त्याची औदार्यमर्यादा संपली नाहीं. त्यानें चित्रकलेचें पूर्ण ज्ञान संपादन करण्याकरितां, त्या द्रव्यहीन चितान्यास आपल्या

खर्चानें इटलीस पाठवून दिलें, व पांच वर्षेपर्यंतचा त्याचा तेथील खर्च बर्कनेंच चालविला. ह्या गोष्टीवरून पुष्कळ शिकण्यासारखें आहे. आपल्या देशच्या सांप्रतच्या शिक्षणस्थितीकडे पाहून हळहळणाऱ्या सुशिक्षितांपैकीं प्रत्येकानें एक मनुष्य सुशिक्षित करण्याचा निश्चय केला, तर ज्ञानप्रसार बिनबोभाट व झपाट्यानें होईल ह्यांत संशय नाहीं. इंग्लंडमध्यें जो इतका ज्ञानप्रसार आजमितीस दिसतो आहे, तो त्याची तद्विषयक जी पराकाष्ठेची उत्कट इच्छा, तिचें फल होय. जॉन्सननें आपल्या शिद्दी चाकरास पाठशालेंत शिक्षणाकरितां ठेविलें होतें !

मिडल्सेक्सच्या निवडणुकीमध्यें पार्लमेंटनें लोकमताला धाब्यावर बसविलें, व तशाच मासल्याचीं दुसरीं कित्येक लोकांना न रुचणारीं कृत्यें केलीं, यामुळें लोकांच्या मनांत त्या पार्लमेंटविषयीं तिरस्कार उत्पन्न झाला होता. करितां पुनः निवडणूक होऊन, नवें पार्लमेंट भरावें अशा अर्थाचा, बकिंग्हॅमशायरच्या लोकांकडून त्यानें अर्ज करविला होता. इंग्लिश लोकांची लोकमतावर पराकाष्ठेची भिस्त व लोकमत जागृत करूनच इंग्लिश लोकांनीं आपल्या उन्नतीचा पाया रचिला. मागें सांगितलेला बॅरी इटलीहून परत आला. तेथें असतां ह्या चित्रकारास सद्गुणांसमवेत दुर्गुणांचाहि थोडाबहुत सहवास जडला होता. फार दिवस राहिल्यानें त्याच्यावर नास्तिक मताची छाया पडली होती; परंतु निष्काम स्नेहाला योग्य अशा आस्थेनें सबळ प्रमाणें दाखवून, बर्कनें आपल्या मित्राचा धर्मावर पुनः विश्वास बसेल असें केलें. डाक्टर बीटी म्हणून बर्कचा एक स्नेही होता. ह्या गृहस्थाचा निबंध बॅरीच्या शंकांचें समाधान करण्याच्या कामीं फारच उपयोगी पडला. ह्यूमच्या नास्तिक मतांविरुद्ध ह्यांत धार्मिक मतें प्रतिपादन केल्यामुळें, जॉनसन आणि बर्क त्याची फारच स्तुति करीत असत. ह्यावरून इंग्लिश लोकांतील दोन विद्वान् श्रेष्ठांचें धर्माविषयीं काय मत होतें तें उघड दिसतें.

इ० स० १७७२ त ईस्ट इंडिया कंपनीच्या कामांत अव्यवस्था होऊन, कंपनी व सरकार ह्यांच्यामध्यें झालेल्या ठरावाविषयीं भानगड उत्पन्न झाली होती. तेव्हां हिंदुस्थानांत जाऊन प्रत्येक खात्याची तपासणी करून कंपनीच्या एकंदर कारभाराची चौकशी करण्याकरितां कमिशन नेमण्यांत आलें. त्या कमिशनच्या

अध्यक्षाची जागा बर्कला देऊं केली होती व ती पतकरण्याविषयीं जरी डायरेक्टरांनीं त्यास आग्रह केला तरी त्यानें कांहीं कारणामुळें ती पतकरली नाहीं. त्यामुळें ह्या देशांत येण्याची संधि बर्कला आली होती ती वाया गेली, हें हिंदुस्थानचें मोठें दुर्भाग्य होय. तो येथें आला असता तर, हिंदुलोकांचा स्वभाव, त्यांच्या चालीरीति, वगैरे गोष्टींचा परिचय होऊन, कंपनीचीं कृष्णकारस्थानें त्याच्या नजरेस पडलीं असतीं व वॉरन् हेस्टिंग्जच्या खटल्यांत त्याचा त्यास फारच उपयोग झाला असता. एवढी मोठी पैसे मिळविण्याची जागा त्यानें कां नाकारली, हा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. पण त्याचें कारण बर्कच्या निरिच्छ स्वभावांत सांपडण्यासारखें असून ती गोष्ट त्याला शोभण्यासारखी आहे. त्याचें स्वदेशसेवेविषयींचें औत्सुक्य द्रव्याच्या आशेनें लुप्तप्राय होण्यासारखें नव्हतें. रॉकिंगहॅम पक्षाची सारी भिस्त एकट्या बर्कवर होती. नौकागमन ज्याप्रमाणें जलसंचयाविना केवळ अशक्य, त्याचप्रमाणें बर्कवांचून रॉकिंगहॅम पक्षाची स्थिति होती. त्याच पक्षांतील एका प्रमुख गृहस्थानें त्यास लिहिलें—' खरोखर, आम्हां सर्वांस हारांतील मण्याप्रमाणें एकत्र राखण्याचें श्रेय आपणांकडे आहे." आपल्या जाण्यानें आपला पक्ष दुर्बल होणार हें पक्कें माहीत असल्याकारणानेंच त्यानें हिंदुस्थानांत येण्याचें नाकबूल केलें.

एक वर्षानें पुनः राजानें रॉकिंगहॅम यास बोलावून आणून मुख्य प्रधानकीचें काम स्वीकारण्याविषयीं आग्रह केला. परंतु अधिकारापन्न होण्याची त्यास मुळींच हांव नव्हती. आपल्या स्वतंत्र विचारांना चिकटून राहिल्याचा काय परिणाम होतो हें त्यांस पूर्णपणें समजलें होतें. त्याचा देशाभिमान अगदीं अढळ होता. तथापि अधिकारच्युत असलेल्या पक्षामध्यें व विशेषतः लॉर्डलोकांत जे दोष प्रायः आढळतात तेच ह्या पक्षामध्यें होते. आळशी, चिकित्साखोर, आणि अव्यवस्थित असल्याबद्दल बर्क त्यांस वारंवार टोंचीत असे. ही उमरावमंडळी मोठी हौशी व चैनी असे. अतिशय महत्त्वाच्या कामाकरितां पार्लमेंट सभेस येण्यासाठीं शिकारीस जाण्याचें लांबणीवर टाकणें ह्या राजश्रींच्या मोठें जिवावर येई. परंतु बर्कनें आपलें सर्व आयुष्य असल्या थंड मंडळीबरोबर काम करण्यांत घालविलें. तो कधीं संतापला नाहीं,

किंवा उदासवृत्तीनें त्यानें आपले प्रयत्न किमपि शिथिल होऊं दिले नाहींत. कायद्यांचे मसुदे तयार करणें, सर्व विषयांवर माहिती पुरविणें अथवा प्रांतिक सभांकरितां अर्ज लिहून देणें इत्यादि सर्व गोष्टी एकट्या बर्कवरच पडत. फार काय पण पार्लमेंटमध्यें बोलण्याचीं भाषणेंहि ह्या सरदार बहादुरांच्या हातांत बर्ककडून तयार होऊन आयतीं पडत. असे अविश्रांत श्रम करणारा साथीदार आजपर्यंत इंग्लंडांतील कोणत्याहि पक्षास मिळाला नसेल. ह्याचें दुसरें कारण असें आहे कीं, त्यास राष्ट्रांतील सरदारवर्गाविषयीं फार अभिमान असे. रॉकिंगहॅम पक्षांतील ड्यूकसाहेबांस त्यानें एक पत्र लिहिलें आहे त्यावरून ह्या लोकांविषयीं त्याच्या मनांत इतका आदर कां वसत असे तें दिसून येईल. तो म्हणतो—" वंशपरंपरासंपन्न अशा नामांकित घराण्यांतील तुम्ही लोक माझ्यासारखे नाहीं. शीघ्रवृद्धीनें व फलाधिगमानें आह्मी कसेहि असलों, किंवा जमिनीवर सरपटत असतां, सुंदर आकाराच्या व मधुर वासाच्या कलिंगडाप्रमाणें मोठे होतों म्हणून कितीहि आढ्यता मारिली तरी पण हंगाम संपल्याबरोबर नष्ट होणाऱ्या व पाठीमागें यत्किंचित्‌हि मागमूस न ठेवणाऱ्या वर्षायु वेलाप्रमाणेंच आमची स्थिति आहे. वास्तविक तुह्मीं असले पाहिजे असे जर असाल, तर माझ्या दृष्टीनें सर्व राष्ट्राला आपल्या छायेनें आच्छादित करणाऱ्या व पुढील पिढ्यांस आपल्या उपयुक्ततेचा फायदा करून देणाऱ्या ओकवृक्षाप्रमाणें तुह्मीं आहांत. राष्ट्राच्या नैसर्गिक ओजस्वितेचा ऱ्हास होत असतां, जर तुह्मांपैकीं कांहीं जण आपल्या उदाहरणानें भावी प्रजेला शुद्ध ठेवण्यासारखें जें देशाभिमान व देशकार्यकर्तृत्व ह्यांचें बीज तें आपल्या वंशजांच्या जीवनशक्तींतच मिसळण्याचा प्रयत्न करतील तर तुमचें आयुष्य व्यर्थ गेलें असें मी मानणार नाहीं." बर्कच्या वरील म्हणण्यांत किती सत्यांश आहे, हें निदान इकडील लोकांस तरी सांगण्यास नको. इंग्रजी राज्यावरोबर जो आमच्या पुरातन थोर घराण्यांचा समूळ नायनाट झाला त्यावरोबरच आमची कर्तृत्वशक्तीहि अजिबात अदृश्य झाली व शिक्षणाचा फैलाव जारीनें चालू असतां, आणि हजारों पदवीधर विद्याधिष्ठानाचे बिल्ले घेऊन प्रतिवर्षी विश्वविद्यालयांतून

बाहेर पडत असतां, गतगुणसमुच्चयाचें बीजारोपणहि अद्यापि आमच्यांत होत नाहीं. सुधारणा, सुधारणा म्हणून ओरओरडून कंठशोष होत असतांहि, प्रत्य-वाय न येण्यासारख्या गोष्टींतसुद्धां इष्ट सुधारणा करण्याचें धैर्य किंवा कुवत हल्लीं-च्या सुधारणावीरांत आढळत नाहीं ! ह्याचें कारण नीतिधैर्य, स्वार्थत्याग, स्थिर-बुद्धि इत्यादि अवश्य गुणांचा ज्यांच्या वंशांत कित्येक पिढ्यांत स्पर्शहि झाला नाहीं. अशाच कुलांतील नरपुंगव इंग्रजी शिक्षणाच्यायोगानें जिकडे तिकडे फड-कत असल्यामुळें, वेळ पडली असतां ही मंडळी एकदम डबघाईस येते ह्यांत आश्चर्य नाहीं. वर सांगितलेले गुण नुसत्या शिक्षणानें येत नाहींत. एखाद्या क्षीणगात्र व निःशक्त मनुष्याला कपडेलत्ते घालून सजवला असतां तो जसा दिसतो, परंतु दोन पावलें चालण्यास सांगितलें असतां त्याला ज्याप्रमाणें भूमिशय्याच घेण्याचा प्रसंग येतो त्याप्रमाणेंच हल्लींच्या सुशिक्षित म्हणविणाऱ्या बऱ्याच मंडळीची स्थिति आहे.

इ० स० १७७३ त बर्कनें फ्रान्स देशाची सफर केली. परदेशपर्यटणाचा हा त्याचा पहिलाच प्रसंग होय. मनुष्यस्वभावाचें व रीतीभातींचें यथार्थ ज्ञान करून घेण्याविषयीं उत्कट इच्छा असतांहि, बर्ककडून फारसा प्रवास घडला नाहीं हें आश्चर्यकारक आहे. पुस्तकांतून कितीहि ज्ञान संपादन केलें तरी तें अप्रत्यक्ष होय. प्रत्यक्षज्ञानाची थोरवी नेहमींच जास्त अस-णार व तसें ज्ञान प्रवासानें प्राप्त होण्याचा संभव विशेष. परंतु एकदां राज्यका-रभारांत शिरल्यावर व त्यांतहि एखाद्या पक्षाचें प्रमुखत्व स्वीकारल्यावर निर्धास्त फुरसत क्वचित् मिळते. हाच त्याचा पहिला व शेवटला स्वदेश सोडून दूरचा प्रवास होय. बर्कचा परम स्नेही जॉनसन् ह्याचीहि प्रवाससीमा फ्रान्सदेशांतील कांहीं थोड्याशा शहरांपलीकडे गेली नाहीं. बर्क तेथें असतां त्याला मोठमोठ्या नामांकित मंडळ्यांकडून निमंत्रणें येत असत. एकंदरींत फ्रेंच लोकांनीं त्याचा आदरसत्कार चांगला केला परंतु धार्मिक व राजकीय बाबतींत फ्रेंच लोकांचीं जीं मतें होतीं तीं ऐकून त्यांच्याविषयीं त्याच्या मनांत इतका तिटकारा आला कीं, फार ओळखी करण्याच्या भानगडींत तो पडला नाहीं. ह्या शतकांत फ्रान्समध्यें इतका

ज्ञानप्रसार झाला होता कीं, एकाच वेळीं विलक्षण बुद्धीचे पुरुष व स्त्रिया एके- ठिकाणीं दुसऱ्या कोठें आढळण्याचा संभव नव्हता; परंतु विद्येमध्यें व शास्त्रीय विषयांतील प्रत्येक शाखेमध्यें त्यांनीं जें नांव मिळविलें होतें, त्याला हरताळ लावण्यासारखी समाजस्थैर्याला आवश्यक असणारीं बंधनें झुगारून देण्याकडे त्यांच्या मनाची प्रवृत्ति झाली होती. ऐहिक गोष्टींत चूर होऊन, धर्माला त्यांनीं अजीबात गुंडाळून ठेविलें होतें. अश्रद्धा आणि व्यसन ह्यांनीं सर्व समाजाला घेरून टाकिलें होतें. अशा प्रकारचें फ्रेंच लोकांचें नीतिविरुद्ध आचरण व पूर्वा- पार चालत आलेल्या सर्व संस्थांविषयीं अनादर पाहून बर्कचें मन उद्विग्न झालें. ह्या स्थितीला उद्देशून पार्लमेंटमध्यें त्यानें पुढें खालील उद्गार काढले.

" धर्मनष्टतेमुळें समाजाला अत्यंत भयंकर व घातक धक्का बसतो. धर्मद्वेष्टे लोक ह्या देशाचेच काय पण सर्व मानवजातीचे शत्रू होत. समाजाकडून उत्ते- जन मिळतें, असा त्यांना भासहि होऊं देणें चांगलें नाहीं. त्यांची कधींही उपेक्षा करितां कामा नये. ह्या लोकांच्या सतत दुष्ट प्रयत्नामुळें, कांहीं चांगल्या राज्यव्यवस्थेचे आधार आधींच ढासळूं लागले आहेत. अशा प्रकारच्या मतांचा प्रसार झालेला आज मी पहात आहे कीं त्याच्यायोगानें धर्मबाबतींत लोक नुसते उदासीनच राहणार नाहींत ". सोळा वर्षांनीं पुढें हें भविष्य शब्दशः खरें झालेलें पाहून, बर्कच्या दूरदर्शित्वाचें कोणास आश्चर्य वाटणार नाहीं ? त्याला फ्रेंच भाषा चांगली बोलतां येत नसे. मात्र बोललेलें स्पष्ट समजे. प्रार्थनेकरितां देवालयांत जमलेलें राजकुटुंब येथें त्याच्या नजरेस पडलें. त्यांत त्या देशाची भावी हत- भागी राणी, जिच्या हृदयद्रावक वर्णनानें बर्कनें साऱ्या युरोपच्या अंतःकरणास द्रव आणला अशी ती तरुण राजकन्या मारी आन्त्वानेत त्यानें पाहिली.

बर्कनें लोकप्रीति संपादन करून पार्लमेंटमध्यें लौकिक मिळविला तोच त्याच्या कर्तृत्वशक्तीची साक्ष देत आहे. कारण, हाऊस ऑफ् कॉमन्स म्हणजे एक असामान्य सभा आहे. इंग्लंडच्या राज्यपद्धतीचें डोळ्यांत तेल घालून संरक्षण करणारी ही सभा. इतकेंच नव्हें, तर कीर्ति संपादण्याचा व मानमान्य- तेस येण्याचा तो एक मुख्य मार्ग आहे. राजकीय कामें करण्याची ज्यांस शक्ति आहे त्यांच्या शक्तीचा कस येथें अगदीं बिनचूक लागतो. आपल्या कर्तबगा-

रींची वृथा घमेंड इतरत्र मनुष्य कितीहि बाळगो किंवा कांहीं वेळ लोकांस भुलवो; परंतु ह्या सभेंत त्याचें खरें स्वरूप तेव्हांच ओळखलें जातें. पार्लमेंट-मध्यें जातांना आपल्या बुद्धिसामर्थ्याची अटकळ फारच थोड्यांना असते. त्याच-प्रमाणें फारच थोडे लोक त्या राजकीय तराजूंत आपलें वास्तविक वजन सम-जल्याशिवाय बाहेर पडतात. सूक्ष्मदृष्टीच्या तीक्ष्ण कर्णांच्या, स्पर्धाकुल मनोवि-कारांच्या व साथीदार सभासदांच्या कार्यक्रमाचें न्याहाळून परीक्षण करणाऱ्या प्रतिनिधींना चकवण्याची कर्तृत्वशून्य मनुष्यानें आशा करणें, अथवा सामान्य बुद्धीच्या मनुष्यानें गुणोत्कर्षपताका मिळविण्याची हांव धरणें व्यर्थ आहे. ह्या ठिकाणीं मंदधी मनुष्याची तेव्हांच अवहेलना होऊन अल्पज्ञ असूनहि विद्व-त्तेचा पोकळ गर्व बाळगणाऱ्या मनुष्याचें खरें स्वरूप तावडतोब समजतें. गर्विष्ठ मनुष्य लवकरच आपल्याला हास्यास्पद करून घेतो व अज्ञ लोक तिरस्कारास कारण होतात. सारांश, मुत्सद्यांच्या कर्तृत्वाची परीक्षा येथच्यासारखी कोठेंहि होत नसेल. ज्ञानार्जनाविषयीं उत्सुक व वृद्ध मुत्सद्यांच्या अनुभवापासून आपला फायदा करून घेण्याविषयीं तत्पर, असा एखादा सामान्य मनुष्य जर ह्या सभेंत आला, तर त्याची जिज्ञासा तृप्त झाल्याशिवाय रहात नाहीं. असें न होईल तर तो त्याच्या बुद्धीचाच दोष समजला पाहिजे. तो जर आग्रही नसेल तर त्याला पुष्कळ वादग्रस्त विषयांसंबंधीं नवीन गोष्टी समजतील. त्याचे दुराग्रह, पूर्व कल्पना आणि अपुरे विचार हे ह्या व्यावहारिक शहाणपणाच्या शाळेंत एका-मागून एक पार नाहींसे होतील. त्याचप्रमाणें राजकीय बाबतींत ढवळाढवळ करणाऱ्या उपद्यापी मनुष्याला ह्या सभेचा चांगलाच दाब असतो. कारण, अशा मनुष्यानें आपल्या राजकीय ज्ञानाची शेखी मिरवून बाहेरील जनसमूहावर कितीहि छाप बसविली तरी तो ह्या सभेंत येतांच अगदीं दिपून जातो. तेथील तें गंभीर व भव्य स्वरूप दृष्टीस पडतांच त्याची बोबडी वळते, व स्तब्ध बस-ण्यांतच त्याचा कांहीं आब राहण्याचा संभव असतो. मोठमोठ्या विषयांवर अरेरावी मतांची तेथें बिलकुल क्षमा होत नाहीं. इतकें जरी आहे, तरी असेहि कांहीं दृढ लोक आढळतात कीं वर्षानुवर्षे ह्या सभेंत घालवून, शेवटीं कोरे ते कोरेच; पण अपवाद हे प्रत्येक गोष्टीला असलेच पाहिजेत.

इंग्लंड व अमेरिका ह्यांच्यामध्यें उपस्थित झालेल्या बेबनावाचें स्वरूप दिवसेंदिवस भयंकर होत चाललें होतें. इंग्लंडमधलेच लोक अमेरिकेमध्यें जाऊन वसाहती करून राहिले होते. ह्या वसाहतींची अन्तर्गत राज्यव्यवस्था आजपर्यंत तेच लोक पहात असत. ब्रिटिशराज्यव्यवस्थेची प्रतिमा त्यांनीं हुबेहुब उठविली होती. कर बसाविण्याचा अधिकार त्यांनीं निवडलेल्या प्रतिनिधींकडेच ठेवलेला असे; परंतु आतां इंग्लिश लोकांच्या बुद्धींत विपर्यास होऊन, त्यांना आपल्याच जातीच्या धर्माच्या व रक्ताच्या, परंतु दुसऱ्या देशांत जाऊन राहिल्यामुळें विभक्त झालेल्या लोकांपासून उकळतां येतील तितके पैसे उकळण्याची आत्मघातकी हांव सुटली. बर्कनें म्हटल्याप्रमाणें लोकांशीं संबंध आला म्हणजे स्वातंत्र्याच्या सर्व कल्पना इंग्लिश लोक विसरून जातात. कांहीं लोकांना तरी आपल्या टाटाखालचीं मांजरें केल्याविना आपली स्वतंत्रता अनियंत्रित आहे असें त्यांस वाटेना. अमेरिकेंतील आमची प्रजा, आमच्या वसाहती, आमचे मांडलिक असें ह्मणण्यांत इंग्लिश लोकांना मोठा अभिमान वाटे. ज्या इंग्लिश लोकांचें स्वातंत्र्यप्रेम इतकें सुप्रसिद्ध आहे, किंबहुना हाच एक गुण ज्यांच्या विद्यमान वैभवाला प्राय: कारणीभूत झाला आहे; त्यांना दुसऱ्यांच्या स्वातंत्र्याविषयीं आदर असूं नये, ह्यावरून मनुष्यावर रानटी आपमतलबीपणाचें किती प्राबल्य असतें, तें दिसून येईल ! इंग्लंडची पिशवी भरण्याकरितां अमेरिकन लोकांवर त्यांच्या संमतीशिवाय नानाप्रकारचे कर पार्लमेंटनें बसविले, परंतु अमेरिकन झाले तरी ते मूळचे इंग्लिश लोकच. त्यांनीं ह्या अन्यायाचा हव्या त्या प्रकारानें प्रतीकार करण्याचा निश्चय केला हें पाहून इंग्लिश लोकांना अधिकच चेव आला व आपला हक्क न घालविण्याविषयीं त्यांनींहि आग्रह धरिला. अशा संधीला, ह्या विषयावर पार्लमेंटमध्यें बर्कचीं दोन अत्युत्तम भाषणें झालीं. इ० स० १७७४ सालीं रोज फुलर नांवाच्या एका सभासदानें अशी सूचना आणिली कीं, अमेरिकेंतील ब्रिटिश वसाहतींत गेलेल्या चहाच्या प्रत्येक पौंडामागें तीन पेन्स जकात द्यावी लागते तीविषयीं विचार करण्याकरितां एक कमिटी नेमावी. ह्या विषयावर मोठा कडाक्याचा वादविवाद सुरू झाला. बर्क बोलण्यास उठण्यापूर्वी, पुष्कळ सदस्य कॉफीगृहांत विश्रांति घेत बसले होते, परंतु वक्त्याच्या

लोकोत्तर वक्तृत्वध्वनीनें सर्व सभागृह पूर्ववत् भरगच्च व प्रफुल्लित झालें. सयुक्तिक भाषणानें सर्वांची खात्री झाली व त्याच्या गुणातिशयाबद्दल त्याचें त्यांनीं प्रांजलपणें अभिनंदन केलें परंतु त्याच्यातर्फे मत देऊन परकीयांसाठीं, न्यायदेवतेस संतुष्ट करण्याइतकें उदार अंतःकरण इंग्लिश लोकांचें नाहीं असें ठरलें. गॅलरीमध्यें बसलेल्या श्रोत्यांकडून प्रशंसासूचक ध्वनि निघूं लागले. त्यांत बर्कच्या वर्णनानें इतिहासांत अक्षय्य झालेले इंग्लिश मुत्सद्दी; जॉन टाऊनशेंड तेथें आपल्या मित्रांसह बसले होते. ते बर्कचें एक जोरदार वाक्य ऐकून एकदम मोठ्यानें ह्मणाले, " अरे देवा ! हा मनुष्य तरी आहे कोण ? हें विलक्षण सामर्थ्य तरी कोठचें ? " इंग्रजी चरित्रकारांनीं निरनिराळे उतारे घेऊन, त्या भाषणाची फार वाखाणणी केली आहे. ह्यावरून तें सर्वच भाषण उत्कृष्ट झालें असें ठरतें. त्याच्या दुसऱ्या ग्रंथांप्रमाणें ही भाषा इतकी वक्तृत्वपूर्ण नाहीं ह्याचें कारण असें असावें कीं, एक तर त्यानें हें भाषण तयार केलेलें नव्हतें. बहुतेक भाग अगदीं आयत्या वेळेस सुचलेला होता; व दुसरें, इंग्लिश लोकांचा ह्या बाबतींत दुराग्रह तो ओळखून होता. केवळ मोहक व अलंकारिक भाषणाचा कांहीं उपयोग होण्यासारखा नव्हता; व ह्मणूनच ज्याच्यायोगानें ऐकणारांची खात्री होईल. असें मुद्देसूद आणि माहितीनें भरलेलें तें भाषण झालें. अमेरिकन लोकांवर कर बसविण्याचा आपला हक्क आहे, एवढ्यावरच इंग्लिश लोक त्यांवर जुलमी कर लादण्यास प्रवृत्त झाले होते; परंतु कायद्यानें किंवा अन्य तऱ्हेनें प्राप्त झालेला अपरिछिन्न हक्क व त्याची अम्मलबजावणी ह्यांमध्यें दुसऱ्या पुष्कळ गोष्टींचा चतुर मुत्सद्याला विचार करावा लागतो, ही गोष्ट त्यांच्या स्वप्नींहि आली नाहीं. बर्कचाहि मुख्य मुद्दा हाच होता. तो म्हणाला, कोणाला किती हक्क आहे ह्याचा विचार मी मुळींच करीत नाहीं. अशाप्रकारच्या वादविवादाला योग्य स्थल शाळाच होत. तेथें त्याची निर्धास्त वाटाघाट होऊं द्या. राज्यकारभारांत असल्या विषयाला जागा मिळतां कामा नये. पूर्वी अमेरिकन लोक होते तसेच त्यांना राहूं द्या. त्यांच्या कामांत ढवळाढवळ करूं नका; म्हणजे आपोआपच सर्व तंटे मिळतील. ते व आपण, त्यांचे व आपले पूर्वज ह्याच पद्धतीनें सुखी होते. व्यापाराच्या सोयीकरितां फक्त आजपर्यंत तुम्हीं त्यांच्यावर बंधनें लादलीं आहेत व आतांहि

व्यापार नियंत्रित करण्याचें कारण तेंच असूं द्या. कराचा बोजा त्यांच्यावर लादूं नका. कारण, आरंभापासून तुह्मीं तसें केलेंलें नाहीं. सार्वभौमत्वाच्या अमर्यादित स्वरूपामुळें लाधलेल्या हक्कांची बजावणी जर तुम्ही दुराग्रहानें कराल तर त्या सार्वभौमत्वाला ग्रहण लागण्याचा प्रसंग येईल. तुमचें सार्वभौमत्व व त्यांचें स्वातंत्र्य ह्यांचा जर मेळ बसला नाहीं, तर यांपैकीं ते कोणतें पतकरतील? तुमच्या डोळ्यादेखत तुमचें सार्वभौमत्व ते झुगारून देतील. एकाद्या दुसऱ्या मनुष्याला तुम्हीं आपला अंकित कराल; परंतु हजारों मनुष्यांना केवळ शुष्क तर्कशास्त्राच्या नियमांनीं आपले गुलाम करणें अशक्य आहे. अमेरिकेंतील इंग्लिश मनुष्यांना ही गुलामगिरी आहे, असें खास वाटेल; आणि ती गुलामगिरी कायदेशीर आहे, एवढ्यावर त्यांचें समाधान होणार नाहीं. लॉर्ड कारमार्थन यास त्यानें जें उत्तर दिलें तें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. असा आक्षेप होता कीं, पार्लमेंटमध्यें प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क मँचेस्टरलाहि अद्यापि नाहीं मग अमेरिकेलाच कुरकुर करण्याचें प्रयोजन काय ? आणि त्यांत अमेरिकन लोक म्हणजे आपलीं मुलें; त्यांनीं वडिलांवरच तुटून पडण्याचा महत् अपराध केला आहे." बर्कनें उत्तर दिलें. "तीं आपलीं मुलें आहेत हें खरें आहे; पण मुलें जेव्हां भाकरी खाण्यास मागतात तेव्हां आपण त्यांना दगड द्यावा काय? जेव्हां ते पितृप्रेमानें ब्रिटिश स्वतंत्रतेच्या मनोहर स्वरूपाचें प्रतिबिंब उठवण्याची इच्छा करितात तेव्हां आपल्या राज्यव्यवस्थेचा अत्यंत लाजिरवाणा भाग असेल तेवढाच आपण त्यांच्यापुढें करावा काय ? चहासारख्या लहानापासून मोठ्यापर्यंत अवश्य लागणाऱ्या पदार्थांवर कर बसविणें कोणत्याहि सुधारलेल्या राष्ट्राला लांछनास्पद आहे व त्यांतहि ह्या करापासून होणारें उत्पन्न म्हणण्यासारखें नसून, अमेरिकन लोकांना चीड येण्यासारखें मात्र हें कृत्य होतें." बर्कनें आपल्या जोरदार भाषेंत आणखी असेंहि सांगितलें कीं, 'खून करावयाचा असेल तर दरोडा तरी घाला; पण कांहीं हेतूशिवाय निर्दयपणानें, जुलमानें, केवळ सूड घेण्याच्या इच्छेनें खून करून, वेड्याच्या पंक्तींत आपल्याला बसवून घेऊं नका. राज्यकारभाराचें धोरण बर्कचें कसें होतें, हें ह्यावरून स्पष्ट दिसण्यासारखें आहे. शंभर वर्षांमागें एका राज्यकार्यपटु पुरु-

पानें, उदात्त विचारांनीं परिपूर्ण असा राजनीतीचा जो धडा घालून दिला, तो त्या वेळेस नाहीं तर नाहीं; पण अद्यापिहि गिरवण्याचें त्याच्या जातभाईंच्या मनांत येत नाहीं ही खरोखर दुःखाची गोष्ट आहे. अमेरिकेविषयीं बोलत असतां निरनिराळ्या प्रसंगीं जीं राजनीतिसूत्रें निर्दिष्ट केलीं आहेत, तीं प्रत्येक स्वामिभक्त मुत्सद्यानें आपल्या हृत्पटलावर अक्षय्य खोदून ठेवण्यासारखीं आहेत. एके ठिकाणीं त्यानें म्हटलें आहे--" राज्यकर्त्यांत सदयता, सौम्यपणा, आणि विश्वास जर असेल, तर त्याचा स्वाभाविक परिणाम प्रजाजनांत शांतता, सुव्यवस्था, आणि राज्यकर्त्याविषयीं आदर व अनुराग हा होय. " तसेंच-" सर्व लोकांविषयीं विचार करावयाचा म्हणजे क्षमाशील व सौम्य वर्तन, हें प्रजा-जनांचें सांत्वन करण्याचें साधन नाहीं, असें मी कधींहि कबूल करणार नाहीं. " आणखी-" सर्व राष्ट्राला आरोप ठेवून शिक्षा करण्याची पद्धति मला तर ठाऊक नाहीं. " जोखमीचें राज्यकारस्थान पार पाडण्यांत केवळ राजनीतितत्वपरायण परंतु अनुभवशून्य मुत्सद्दी कशा चुक्या करतात हें ह्या इतिहासावरून चांगलें व्यक्त होतें. असो, बर्कचें ओरडणें केवळ अरण्यरुदिताप्रमाणें झालें त्यामुळें त्याला चाललें होतें तें निमूटपणें पाहण्याशिवाय गत्यन्तर नव्हतें.

' अमेरिकेवर कर बसविणें ' आणि ' अमेरिकन लोकांशीं सख्य ' ह्या दोन विषयांवरील बर्कचीं भाषणें उत्कृष्ट झालीं, हें मागें सांगितलेंच आहे. विस्तार-भयास्तव तीं येथें साद्यंत देणें अशक्य आहे. करितां त्यांतील कांहीं निवडक उतारे देऊन त्यावरच निर्वाह करणें भाग आहे. अमेरिकन लोक मोठे हुषार, धाडसी व सुसंपन्न आहेत; म्हणून युद्धाचा प्रसंग आला तरी हरकत नाहीं; पण अमेरिका हातांतली घालवितां कामा नये, असें म्हणणारांस उत्तर देतांना तो म्हणतो-" लोकांना वश करण्याचा उत्तम उपाय जर त्यांच्याशीं युद्ध करणें असेल, तर युद्ध करा... ... ... ...परंतु बळापेक्षां शहाणपणाच्या व्यवस्थेवर माझा विश्वास जास्त आहे. बळ म्हणजे अगदीं तिरस्करणीय आहे असें नव्हे; पण अमेरिकन लोकांसारख्या असंख्य, तरतरीत व मानी लोकांस, आपल्यास फायदेशीर होईल अशा रीतीनें ताब्यांत ठेवण्यास बळ हें निर्जीव साधन आहे असें मला वाटतें. महाराज, बळाचा उपयोग फक्त तांत्रिक आहे. त्याच्या यो-

गानें कांहीं काल कदाचित् ते जिंकले जातील; परंतु त्यांस पुनः जिंकण्याची आवश्यकता त्यामुळें नाहीशी होत नाहीं. ज्या लोकांना सतत तरवारीच्या धारेवर ठेवावें लागतें, त्या लोकांवर आपण राज्य करतों असें म्हणतां येत नाहीं.... जर तुम्हांला लढाईंत अपयश आलें तर दुसरा मार्ग राहत नाहीं; कारण सख्य करण्याचे प्रयत्न फसले असतां लढाईचा मार्ग खुला राहतो, पण तो कां जर फसला तर मात्र पुढें सलोखा होण्याची आशाच नाहीं. ”

अमेरिकेवरील बर्कचीं भाषणें उत्कृष्ट झालीं ह्याचें मुख्य कारण हें आहे कीं, त्यानें त्या विषयासंबंधीं फार परिश्रम केले होते. अमेरिकन लोकांसंबंधीं त्यास खडानखडा माहिती होती. त्या लोकांची स्वातंत्र्यप्रियता, त्यांचा धर्म, त्यांच्या रीतिभाती, त्यांच्यामधील शिक्षणप्रसार इत्यादि गोष्टींवरून, अमेरिकन लोकांबरोबर विग्रह न करितां संधि करणेंच श्रेयस्कर आहे असें त्यानें सप्रमाण सिद्ध केलें; इतकेंच नव्हे तर अमेरिकन लोकांच्या स्थितीचा विचार न करितां निव्वळ आपल्यापुरतेंच पाहिलें तरीसुद्धां, त्यांच्याशीं सख्य करणेंच हितावह आहे असें त्यानें सांगितलें. कारण, इंग्लंड व अमेरिका ह्या दोन देशांत तीन हजार कोस अंतर; हुकूम सुटून त्याची अंमलबजावणी होण्यापूर्वी महिनेच्या महिने लोटतात. अशा स्थितींत अमेरिकन लोकांना हम करेसो कायदा ह्या न्यायानें वागविणें अशक्य आहे. फॉक्सनेंहि एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, दूरच्या वसाहतींवर राज्य करण्याचा उत्तम मार्ग म्हटला म्हणजे, त्यांचा राज्यकारभार त्यांच्यावरच सोंपविणें हा होय. हजारों कोस अंतरावरच्या देशाच्या राज्यकारभाराचीं सूत्रें आपल्या हातीं ठेवून तो चालवूं पाहण्याची कल्पना, अदूरदृष्टि व अनुभवशून्य मुत्सद्यांच्याच मेंदूंतून निघणार; आणि अशांचाच पार्लमेंटमध्यें ह्या वेळेस भरणा असल्याकारणानें, अमेरिका इंग्लंडच्या हांतून अजीबात नाहींशी झाली. अमेरिकेशिवायसुद्धां आज इंग्लंडचें राज्य अफाट वाढलें आहे. पण त्यांत अमेरिकेची जर भर असती, तर ह्या जगव्यापी इंग्लिश राज्याच्या वैभवाची कल्पनाहि दुर्घट झाली असती. असो.

अमेरिकन लोकांच्या कायद्याच्या ज्ञानाविषयीं बोलत असतां तो म्हणाला— ‘जगांतील कोणत्याहि देशांत कायद्याचा इतका सर्वसामान्य अभ्यास होत नसेल.

वकिलीचा धंदा करणारे लोक येथें पुष्कळ हिम्मतवान आहेत, आणि पुष्कळ प्रांतांत तेच पुढारीपण घेतात. राष्ट्रीयसभेला पाठविलेल्या प्रतिनिधीपैकीं बरेच कायदेपंडित होते. बहुतेकांना वाचतां येतें, व ज्यांना वाचतां येतें, ते सर्व कायद्याचें थोडें तरी ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करितात. एका नामांकित ग्रंथविक्रयकर्त्यानें मला असें सांगितलें आहे कीं, धार्मिक पुस्तकें खेरीज करून, कायद्यांवरील पुस्तकांइतकी दुसरीं कोणतींहि पुस्तकें वसाहतींत जात नाहींत; आणि आतां तर ते लोक स्वतःच आपल्याकरितां तीं आपणच छापूं लागले आहेत. 'ब्लॅक्स्टोनच्या टीका' नामक ग्रंथाचा इंग्लंडइतकाच अमेरिकेंत खप झाला आहे असें माझ्या ऐकिवांत आहे. आपल्या टेबलावर पडलेल्या पत्रांत जनरल गेज ह्यांनीं असें लिहिलें आहे कीं, थोडेंबहुत कायद्याचें ज्ञान सर्वांस असल्यामुळें कायद्याच्या मर्यादेंत ते कधींहि सांपडत नाहींत. ... ... ... ... ... ...

...ह्या अभ्यासामुळें मनुष्याची बुद्धि तीव्र व चौकस होऊन, दुसऱ्यावर उलटून पडण्यास, व नाना उपायांनीं आपली बाजू संभाळण्यास तो तयार असतो. दुसऱ्या देशांत लोक अधिक साधेभोळे असून इतके तीक्ष्ण स्वभावाचे नसल्यामुळें, त्यांस प्रत्यक्ष संकट आल्याशिवाय राज्यव्यवस्थेंतील दुष्ट तत्त्वांची कल्पना होत नाहीं. येथें हे लोक पुढें होणाऱ्या जुलुमाचें आधींच भाकीत करितात, व राज्य-कारभारांतील दुष्ट तत्त्वांवरून ते जुलूम कितपत असह्य होतील, ह्याचीहि त्यांस पूर्वींच अटकळ करितां येते." एकंदरींत, —

गुणवंतो महोत्साहा धर्मज्ञाः साधवश्च ये ।
संदधीत नृपस्तैश्च राष्ट्रं धर्मेण पालयन् ॥

ह्या प्रसिद्ध भारतान्तर्गतव्यासोक्तीची ओळख बर्कनें आपल्या देशबांधवांस करून दिली; परंतु दुर्दैवानें त्याच्या म्हणण्याची किंमत जाणणारे लोक ह्यावेळीं इंग्लंडमध्यें फारच थोडे होते. खुद्द बर्कनेंहि अशा प्रकारचे निराशेचे उद्गार रॉकिंगहॅमला लिहिलेल्या पत्रांत काढले आहेत. तो म्हणतो, " मला असें खास वाटतें कीं, सर्व राष्ट्राच्या स्वभावांत थोड्या वर्षांत फार फरक पडला आहे. पूर्वीं ज्याप्रमाणें आम्हीं उत्सुक, चौकस, दक्ष आणि प्रखर होतों, तसे आतां नाहीं गत गोष्टींकडे पाहून लोकांना आनंदहि होत नाहीं व उद्वेगहि होत नाहीं.

त्याचप्रमाणें भावी स्थितीचा विचार करितां, आशा किंवा भय ह्यांचीहि छाया त्यांच्यावर पडत नाहीं. ज्यांशीं आपल्याला कर्तव्य नाहीं, अशा विषयांप्रमाणें लोक ह्या बाबतींत उदासीन आहेत. त्या गोष्टीमुळेंचेंच येऊन कांहीं कृति करून दाखविण्यास ते प्रवृत्त होत नाहींत." ह्याच पत्रांत त्यानें रॉकिंगहॅमला आणखी असें कळविलें आहे कीं, ह्या विषयाकडे माझें मन इतकें वेधून गेलें आहे कीं, दुसरें कांहीं मला सुचत नाहीं. बर्कनें अमेरिकन लोकांविषयीं जी कळकळ व आस्था प्रदर्शित केली ती खरोखरीच प्रशंसनीय आहे अमेरिकेविषयीं त्याला पूर्ण माहिती होती, हें मागें सांगितलेंच आहे व अशाविषयीं त्यानें स्वतः उद्गार काढले आहेत "मला वाटतें, अमेरिकेसंबंधीं मला माहिती आहे आणि जर नसेल, तर बरीक माझी जडबुद्धि नाहींशी होण्याची मला आशा नाहीं. कारण ती माहिती समजून घेण्याच्या कामीं काडीइतकीहि मी कसूर केली नाहीं." ही केवळ आत्मश्लाघा नव्हे; तर हें अक्षरशः खरें आहे, ह्याबद्दल वर सांगितलेल्या भाषणावरून कोणाचीहि खात्री होईल. ह्या सर्व माहितीवरून त्याचा जो ह्या विषयासंबंधीं अभिप्राय झाला, तो त्यानें आपल्या देशबांधवांस कळविला आहे. "जगामध्यें जर कोणतीहि गोष्ट अगदीं उघड असेल, तर ती ही आहे कीं प्रजासत्तात्मक राज्यव्यवस्थेशिवाय दुसरी कोणतीहि व्यवस्था अमेरिकन लोकांच्या स्वभावाला न रुचणारी आहे." ज्या पत्रावरून हे उतारे घेतले आहेत, तें पत्र बर्कनें अमेरिकन कारभारासंबंधानेंच ब्रिस्टल येथील शेरीफाला लिहिलें आहे. उदात्त विचार आणि सर्वमान्य व्यापक राजकीय सिद्धांत ह्यामुळें तें वारंवार वाचून मनन करण्यासारखें आहे.

इ० स० १७७४ त पार्लमेंट एकाएकीं बरखास्त झालें. आजपर्यंत लॉर्ड व्हर्ने नांवाच्या एका मित्राच्या साहाय्यानें वेंडोव्हर प्रांताच्यातर्फे बर्क पार्लमेन्टमध्यें बसत असे; परंतु दोघांमध्यें थोडेसें वैमनस्य आल्यामुळें इतःपर वरील गृहस्थांकडून मदत होणें असंभवनीय होतें. ह्याकरितां दुसऱ्या कोठें खटपट करणें भाग पडलें. व रॉकिंगहॅमच्या वजनानें मॉल्टन प्रांतांतील व्यापारी लोकांनीं त्यास निवडलेंहि होतें. इतक्यांत ब्रिस्टल प्रांतांतील व्यापारी लोकांकडून कांहीं

मंडळी मुद्दाम त्यास नेण्याकरितां आली. ब्रिस्टल हें इंग्लंडच्या पश्चिम भागाची राजधानी असून, संपत्ति, वसति व व्यापार ह्यांच्या योगानें लंडनच्या खालोखाल होतें. अशा मोठ्या शहरच्या लोकांनीं आपण होऊन बोलावल्यामुळें व त्यामुळें स्वतःच्या पिशवीस खार न लागतां निवडून येण्याची खात्री असल्या-मुळें, त्याच्यानें त्यांची विनंति अर्थातच अमान्य करवेना. लागलीच आपल्या मॉल्टन मित्रांच्या परवानगीनें तो ब्रिस्टल येथें जाण्यास निघाला. अहोरात्र सुमारें साडेतीनशें मैलांचा प्रवास करून, तो तिसऱ्या दिवशीं ब्रिस्टल येथें येऊन दाखल झाला. वाटेमध्यें एक क्षणभरहि त्यास झोंप मिळाली नाहीं. ह्यामुळें व प्रवासाच्या श्रमातिशयामुळें तो इतका थकला होता कीं, मतदार लोकांस व दुसऱ्या उमेदवारास भेटून त्यानें कांहीं वेळ विश्रांति घेतली. निवडणु-कीची मोठी धांदल उडाली होती. मतें घेण्याचा प्रकार एक महिनाभर सारखा चालू होता; पण अखेरीस त्या संपन्न शहराचें प्रतिनिधित्व त्याच्याकडे आलें. सर्व निवडणुकीचें काम आटपल्यावरहि बर्कच्या निवडणुकीच्या विरुद्ध एक अर्ज झाला. त्यांत कांहीं हांशील नव्हतें; परंतु ब्रिस्टल येथून बर्कच प्रतिनिधि होऊन जावा, अशी ज्या सद्‌गृहस्थांची इच्छा होती, त्यांस विघ्नें कशीं आलीं हें यावरून दिसणार आहे. तुम्हांस एक कवडीचा खर्च पडूं न देतां निवडणुकीचें काम आम्हीं पार पाडून देऊं असें वचन व आश्वासन देऊन त्या व्यापारी मंडळीनें बर्कला बोलावून आणलें. बर्कनें अव्याहत परिश्रमानें व्यापाराच्या बाबतींत माहिती मिळवून, तिचा योग्य उपयोग पार्लमेन्टसभेंत केल्यानें, ह्या वक्त्याची व्यापारी लोकांत अत्यंत चहा झाली. जमेका बेटांतील बंदराचे कामीं केलेल्या खटपटीबद्दल मँचेस्टरनें बर्कचे फार फार आभार मानिले. आणि त्या शहरचा मुखत्यार पार्लमेंटांत असता, तर तेथील व्यापाऱ्यांनींच बर्कला बोलाविलें असतें; पण आज ज्या शहराचें इतकें महत्व वाढलें आहे, त्याच्या बतीनें त्या वेळीं एकहि प्रतिनिधि पार्लमेंटांत बसत नव्हता. यामुळें ब्रिस्टलवाले यांस ह्या गुणग्राहकतेचा मान मिळाला. खुद्द बर्कला लोकांनीं आपलें स्तोम माजवावें असें कधींच वाटत नसे. खरोखर म्हटलें तर लोकप्रियतेचा अव्हेर करण्यापासून त्याचें पुष्कळ नुकसान झालें. लोकमान्यतेचा फायदा घेऊन

स्वहित साधण्याइतकें धोरण नसल्यामुळें जगाच्या दृष्टीनें त्याचें पुष्कळ हित व्हावयाचें राहिलें. या प्रसंगीं सुद्धां विशेष भानगड न करितां मॅाल्टन मुक्कामीं झालेली निवडणूक रद्द करून तो ब्रिस्टल येथें गेला नसता; परंतु त्याला निमंत्रण करण्यासाठीं आलेल्या श्रीमान् व वजनदार व्यापाऱ्यांनीं केलेला आदर व त्या कामी दाखविलेली उत्कंठा पाहून त्याच्यानें त्यांचा हिरमोड करवला नाहीं. बर्कच्या शोधार्थ ते प्रथम लंडनमध्यें गेले, तेथें तो सांपडला नाहीं, म्हणून त्यास त्यांनीं यार्कशायरमध्यें येऊन गाठलें. अशा-वेळीं लोकांची निराशा करणें म्हणजे. असभ्यपणाच झाला असता. म्हणून, बर्कनें इतका त्रास सोसूनहि ब्रिस्टलला येण्याचें कबूल केलें. असो; यावेळीं निवडणूक होऊन ब्रिस्टलकरांच्या वतीनें सहा वर्षे ब्रिटिश पार्लमेंटांत बर्क प्रतिनिधि होता.

आभारप्रदर्शक भाषणांत प्रतिनिधींच्या मतस्वातंत्र्याविषयीं त्यानें जे उद्गार काढले आहेत, त्यावरून त्याच्या सत्यप्रिय व पाणीदार स्वभावाचें आश्चर्य वाटतें. ' खरोखर, मतदारांशीं निकट संबंध ठेवणें, मोकळ्या मनानें वागणें, किंबहुना त्यांच्याशीं एक जीव होणें, ह्यांतच प्रत्येक प्रतिनिधीला आनंद आणि गौरव वाटला पाहिजे, मतदारांच्या इच्छेला महत्व दिलें पाहिजे. त्यांच्या मतांविषयीं त्याच्या मनांत आदर असला पाहिजे, व त्यांच्या कामाविषयीं त्यानें फार दक्ष असलें पाहिजे. त्यांना स्वस्थता, सुख व समाधान हीं मिळवून देण्याकरितां आपण या गोष्टींना आचवणे हेंच त्याचें काम आहे. नेहमीं व प्रत्येक बाबींत त्यांच्या कल्याणापुढें स्वहित तुच्छ मानणें, हेंच त्यांचें श्रेष्ठ कर्तव्य होय; परंतु आपलीं निःपक्षपात मतें, पक्क विचार व उन्नत मनोदेवता इतक्यांचा कोणत्याहि मनुष्याकरितां अगर मनुष्यसमुदायाकरितां, बळी देणें कधींही युक्त होणार नाहीं. प्रतिनिधीच्या उद्योगावरच नव्हे, तर त्याच्या बुद्धीवरही तुमचा सार-खाच हक्क आहे, आणि तुमच्या मतांचा अंगीकार करून जर तो स्वतःच्या बुद्धीचा दुरुपयोग करील, तर तुमची कामगिरी करण्याऐवजीं तुम्हांला फसवि-ण्याचा दोष मात्र त्याच्या माथीं बसेल.

" माझ्या मित्राच्या म्हणण्याप्रमाणें प्रतिनिधीची इच्छा तुमच्या इच्छेच्या अंगभूत असली पाहिजे. एवढेंच असेल तर हरकत नाहीं. कोणत्याहि

पक्षाच्या केवळ इच्छेवर जर राज्यकारभार अवलंबून असेल, तर निःसंशय तुमचीच इच्छा प्रबल झाली पाहिजे; परंतु राज्यव्यवस्था आणि कायदेकानू करणें हीं वादविवाद आणि विचार ह्यांचीं कामें आहेत. नुसत्या मर्जीचीं नव्हत. ग्राह्याग्राह्यविचारापूर्वींच इष्ट गोष्ट ठरवून टाकणें–एका मंडळीनें विचार करावा व दुसऱ्या मंडळीनें निकाल द्यावा–अनुकूल प्रतिकूल प्रमाणाबद्दल उहापोह करणाऱ्या मंडळीपासून सिद्धांत ठरविणारी मंडळी तीनशें कोसांवर असणें, ही न्यायपद्धति कोठची ? निकराचे हुकूम व आज्ञापत्रें, हीं मुकत्यारानें बिनहरकत डोळे मिटून शिरसावंद्य केलीं पाहिजेत, व स्वतःची मनोदेवता निराळें सांगत असतांहि त्याविरुद्ध मत दिलें पाहिजे या गोष्टी आमच्या देशाच्या कायद्याला अगदीं असंमत, अनभ्यस्त आहेत, व त्या आमच्या राज्यपद्धतीविषयीं चुकीच्या कल्पनांमुळें, घडून येतात. प्रतिनिधि म्हणजे निवडून पाठविणारांचा केवळ निरोप्या चाकर, अशी पुष्कळ लोकांची समजूत असते. असें असेल तर निवडणुकीचा एवढा अट्टहास तरी कशास पाहिजे ? अ गेला काय आणि ब गेला काय सारखेच. " परंतु लोकांचा खरोखर आशय अशा समजुतीचा असेल असें संभवत नाहीं. ब्रिस्टलच्या लोकांनीं दुसऱ्या उमेदवारांना टाकून मॉल्टन येथें बर्कला बोलावण्याकरितां मुद्दाम लोक पाठविले ह्याचें कारण असें होतें कीं बर्कनें सांगितल्याप्रमाणें प्रतिनिधीच्या नुसत्या श्रमाचा नव्हे तर, बुद्धीचाहि लोकांना उपयोग पाहिजे होता ; त्याचप्रमाणें, अतिशय सूक्ष्म बुद्धीच्या, प्रचंड ज्ञानाच्या व दीर्घ अनुभवाच्या मनुष्याचीहि जेथें तारंबळ उडते, अशा राज्यकारणाच्या कामीं अज्ञ, जडमति, व अनुभवशून्य अशा लोकांच्या एककल्ली मतांना मान देणें म्हणजे, राज्यशकट लवकरच भग्न करणें होय. राज्यकारभारांत खऱ्या बुद्धिची पारख करणारे असे गोंधळाचे विकट प्रश्न अकस्मात उत्पन्न होतात; व त्यांचा निकाल विलंबावर टाकतां येत नाहीं. अशा वेळेस मी आपल्या निवडणाऱ्या लोकांना विचारीन आणि मग काय तें मत देईन असें म्हणणें, राजकीय काम करणाऱ्या मनुष्याला कधींहि चालणार नाहीं. व असा तरी भरंवसा कोठें आहे कीं, सर्व लोकांचें त्या प्रश्नासंबंधीं एकच मत पडेल ? एकंदरींत ह्या विषयावरील बर्कचे विचार अगदीं सयुक्तिक असून मतदार व उमेदवार ह्यांच्या मधील करार त्यांस अनुसरून असणें इष्ट आहे.

# भाग ५ वा

## रॉकिंगहॅमचें प्रधानमंडळ

इ० स० १७७९ च्या अखेरीस इंग्लंडचें स्वास्थ्य अगदीं नष्ट झालें. चोहोंकडून भयावह संकटें ओढवूं लागलीं. अमेरिकन लोकांना जित करण्याचे सर्व उपाय हरले. आणखी शिवाय लढाईच्या खर्चाचा जबरदस्त बोजा सोसावा लागला. आयर्लंडमध्येंसुद्धां इंग्लंडच्या अन्यार्या, अनुदार, अदूरदृष्टीच्या आपमतलवी वर्तनामुळें लवकरच बंड होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. तेव्हां इंग्लिश लोकांना अंजन मिळून ते थोडेसे शुद्धीवर आले. पार्लमेंटमध्यें राजानें आपल्या भाषणांत आजपर्यंत न दिलेले हक्क व अधिकार आयर्लंडला देण्याविषयीं शिफारस केली. ह्या भाषणावर वादविवाद होतेवेळीं बर्कनें इंग्लिश लोकांची त्यांच्या मूर्खपणाबद्दल चांगलीच निर्भत्सना केली. त्यानें स्पष्ट सांगितलें कीं, " आयरिश लोक मेहेरबानी करा आणि आम्हांस कांहीं सवलती द्या म्हणून पूर्वीं मोठ्या काकळुतीनें विनंति करीत असत. ती विनंति तुम्हीं ते आतां कोपवश होऊन हक्कानें मागूं लागेपर्यंत मान्य केली नाहीं; पूर्वीं विनयपूर्वक केलेल्या मागण्या झिटकारून देऊन आतां त्या कबूल करण्यास तुम्हांस त्यांनीं भाग पाडलें तेव्हां तुम्हीं जागे झालां. उदार बुद्धीनें आपण होऊन सवलती देण्याचें श्रेय इंग्लंडनें घालविलें, आणि त्या कृतज्ञतापूर्वक स्वीकारण्याची अमोल संधि आयर्लंडला नाहींशी झाली. " इंग्लिश राष्ट्राच्या ह्या चिकट स्वभावाची धूर्त इंग्लिश मुत्सद्यांस चांगली माहिती होती. रोमन कॅथॉलिक लोकांचीं बंधनें दूर करण्याविषयीं पार्लमेंटपुढें आलेल्या बिलावर वादविवाद चालला असतां लॉर्ड ग्रेनव्हिलनें खालील उद्गार काढिले. तो म्हणाला,—" ह्या गोष्टींत आपण अखेर निर्णय काय कराल तें मी विचारीत नाहीं. त्याचें सहज अनुमान करितां येतें. तुम्हीं अधिकाराच्या जोरावर दांडगाईनें नाकारलेल्या सवलती भाग पडल्यावर धडपडत धडपडत कशा देतां हें मागील उदाहरणांवरून आम्हांस समजलें आहे.

आपणांस शेवटीं ह्या अर्जांना मान द्यावा लागेल ह्याविषयीं कोणासच शंका नाहीं. एवढ्यासाठीं विचारपूर्वक व शहाणपणानें नेमस्त सवलती देऊन पुरें होणार नाहीं, आणि आपण होऊन दयार्द्रबुद्धीनें त्या दिल्याचें श्रेयहि मिळणार नाहीं, असा प्रसंग येईपर्यंत वाट पाहूं नका. अमेरिका व आयर्लंड ह्या दोन देशांच्या इतिहासावरून पाहतां असें दिसतें कीं, न्यायप्रियतेची व औदार्याची घमेंड बाळगणाऱ्या इंग्रज लोकांकडून याचकवृत्ति धारण करून आपले राजकीय हक्क संपादन करण्याची आशा करणें बहुतेक निष्फल आहे. ”

अमेरिकेच्या लढाईंत आलेलें अपयश व त्या लढाईचा खर्च भागविण्याकरितां बसविलेले कर, ह्या दोन गोष्टींमुळें पार्लमेंटची सुधारणा आणि खर्चाची काटकसर करणें, ह्याकरितां लोकांनीं एकच गवगवा केला. वाह्योपचारांनीं पार्लमेंटची खरी सुधारणा करणें अशक्य आहे, असा त्याचा दृढ समज असल्यामुळें त्या बाबतींत बर्कनें मन घातलें नाहीं; परंतु दुसरा विषय त्यानें हातीं घेतला. हें काम इतकें विकट, मेहनतीचें आणि घोटाळ्याचें होतें कीं, तें तडीस नेण्यास बर्कवांचून दुसरा योग्य गृहस्थ क्वचितच मिळाला असता; व इतके श्रम घेण्याइतकी आस्थाहि थोड्या लोकांतच होती. क्षुल्लक गोष्टींतहि कमिशनें किंवा कमिट्या नेमण्याचा प्रघात जसा हल्लीं दृष्टीस पडतो तसा पूर्वी नव्हता. त्याचा परिणाम असा होई कीं, एकाच मनुष्याला असलीं जोखमीचीं कामें करावीं लागत, व अशा महत्वाच्या कामीं बर्कनें इतके परिश्रम आजपर्यंत कोणीहि केले नव्हते असें म्हणतात. राष्ट्रीय खर्च कमी करूं पाहणाराला राष्ट्रांतील उत्पन्नाच्या व खर्चाच्या प्रत्येक शाखेचें पूर्ण ज्ञान असणें अवश्य आहे एवढें ध्यानांत ठेविलें तर बर्कच्या श्रमांची कल्पना करितां येईल. हें काम पतकरण्यांत बर्कचा आणखी एक विशेष हेतु होता, तो हा कीं, हाऊस ऑफ कॉमन्स सभेचें स्वातंत्र्य अधिक शुद्ध पायावर रचलें जावें. ह्या सभेच्या सभासदांस सरकारी जागा देऊन त्यांच्यावर उपकार करण्याचें सामर्थ्य प्रधानमंडळाला होतें. ह्यामुळें कोणत्याहि आणीबाणीच्या प्रसंगीं अशा उपकृत सभासदांचें पाठबळ त्यांस हटकून मिळत असे. स्वार्थावर नजर ठेवून ज्यांनीं आपल्यास निवडलें, त्यांचें किंबहुना सर्व देशाचें कल्याण बाजूस सारून बाकीच सभासदसमूह आपल्या उपकर्त्यांची झूल ओढण्यास उत्सुक होत असे. तेव्हां पार्लमेंटची खरी

सुधारणा दर तीन वर्षी ताजी निवड करण्यांत अथवा मतें देण्याचा अधिकार जास्त लोकांस देण्यांत नसून, सभासदाचें स्वातंत्र्य नष्ट करणाऱ्या गोष्टींचें बीज नाहींसें करणें ह्यांतच आहे, अशी जी बर्कची समजूत होती ती अगदीं यथार्थ होती. ह्या जागा समूळ कमी करून आणखी कांहीं जागांचे पगार कमी करण्याची सूचना त्यानें आणली. ह्या सूचनेच्या समर्थनार्थ त्यानें केलेल्या भाषणांत राज्यकारभाराची पुरी माहिती, शोधकपणा व सूक्ष्मावलोकन वगैरे गुण दिसून आले. सरकारपक्षास मदत करणाऱ्या मंडळीला गुप्त पेनशनें देण्याची चाल होती. ती मोडण्याबद्दलहि वरील सूचनेंत विचार केला होता. ह्या वेळची त्याचीं भाषणें इतकीं उत्तम आहेत कीं, तेवढ्यावरूनच नामांकित वक्त्यांत आणि राजकार्यधुरंधर मुत्सद्दी मंडळांत त्याची गणना करण्यास हरकत नाहीं.

ह्यांपैकीं बऱ्याच सूचना पार्लमेंटमध्यें पसार झाल्या नाहींत; परंतु त्याचा दोष कर्त्यावर नसून पक्षाभिमानावरच लादला पाहिजे. विरुद्ध पक्षाच्या सूचना पसार न होऊं देण्याविषयीं अधिकारापन्न पक्षाचा सतत प्रयत्न असतो. मग ती सूचना त्यास पसंत असो किंवा नसो. पार्लमेंटमध्यें अधिकारारूढ पक्षाचें प्राबल्य असल्याकारणानें विरुद्धपक्षाला कोणतेंच देशहिताचें काम बहुधा करितां येत नाहीं. अधिकारारूढ झाल्यावरच इष्ट सुधारणा घडवून आणण्याची संधि त्यास लाधते. विरुध्द पक्षाच्या सूचना जर पसार होऊं दिल्या तर त्या योगानें अधिकारारूढ पक्षाचें वजन कमी होतें; आणि लोकांचा त्यावरील विश्वास उडतो. कारण, देशसेवा करण्याचें सर्व श्रेय दुसऱ्या पक्षाला मिळतें. ह्यावरून बर्कला ह्या अत्यंत महत्वाच्या कामीं फारसें यश मिळालें नाहीं ह्यांत आश्चर्य नाहीं. ज्यांनीं ज्यांनीं म्हणून बिलाच्या प्रत्येक वाचनाच्या वेळेस तें हाणून पाडण्याचा संकल्प केला होता, त्यांनींसुध्दां बर्कच्या अप्रतिम वक्तृत्वानें, दीर्घ प्रयत्नानें आणि जिवापाड मेहनतीनें आश्चर्यचकित होऊन तोंडांत बोट घातलें; तथापि पक्षाभिनिवेशाला वश होऊन त्यांनीं आपलें मत त्याच्या वतीनें दिलें नाहीं. स्वदेशाच्या हिताहिताचा खल चाललेला असतां जेथें असे प्रकार घडतात, तेथें सवतीच्या मुलाप्रमाणें मानलेल्या हिंदुस्थानासंबंधीं हलगर्जीपणा प्रकट व्हावा हें स्वाभाविकच आहे.

हिंदुस्थानाप्रमाणेंच इंग्लंडमध्यें पूर्वीं व हल्लींहि, प्रेस्बीटेरिअन, मेथॉडिस्ट, क्वेकर, डिसेंटर, नॉन्‌कन्‌फॉर्मिस्ट, इंडिपेंडंट, प्यूरिटन वगैरे अनेक धर्मपंथी लोक होते व आहेत. तथापि रोमन कॅथोलिक व प्रॉटेस्टंट हे दोन मुख्य भेद असून तदनुयायी वर्ग फार मोठा आहे. पैकीं प्रॉटेस्टंट धर्मपंथाला राजाश्रय असल्यामुळें त्याचाच फैलाव जास्त आहे. हजारों वर्षांमागें भगवद्गीतेनें आणि तदनंतर शंकराचार्यांनीं निरनिराळ्या पंथांची एकवाक्यता जशी केली तशा प्रकारचा प्रयत्न इंग्लंडमध्यें झालेला दिसत नाहीं. असो; एका पंथाला राजाश्रय मिळाल्यामुळें दुसरा अर्थातच पोरका पडला. पोरक्या पडलेल्या पोराप्रमाणेंच रोमन कॅथॉलिक लोकांची शोचनीय स्थिति होती. राजाश्रित धर्माहून अल्पतः भिन्न मतें स्वीकारण्याचें अक्षम्य पाप विचाऱ्यांनीं केल्यामुळें राजकार्यांगणांत त्यांचा प्रवेश होत नसे. फार काय ते राजकीय हक्कांसहि मुकले होते. एवढेंच नव्हे तर नानाविध बंधनेंहि त्यांच्यावर लादलीं होतीं. राजाश्रित धर्माहून अन्यधर्मीयांना कोणत्याहि खात्यांत मोठ्या हुद्द्याच्या जागा मिळत नसत; पार्लमेंटचे सभासद होतां येत नसे; शाळापंतोजीचें निरुपद्रवी काम करण्यासहि ते नालायक ठरले होते; प्रॉटेस्टंट आप्ताच्या मरणोत्तर सिध्या वारसासहि केवळ धर्मभेदामुळें त्याची जिनगी घेण्यास कायद्यानें मना केलें होतें. अशा दुःसह स्थितींत ह्या लोकांनीं दोन तीन शतकें घालविलीं. ह्यावेळीं सगळ्या पार्लमेंटमध्यें बर्क, फॉक्स वगैरे दोन चार सद्‌गृहस्थांवांचून ह्या लोकांच्या हक्कांचें समर्थन करण्यास कोणीहि तयार नसे. ह्यावरून तत्कालीन इंग्रज लोकांची धर्मविषयक बुद्धि किती अनुदार होती हें सहज दिसून येईल. पिटनें आपल्या मित्राला पत्रांत लिहिलें आहे कीं, कांहीं वर्षांपूर्वीं जर एखाद्या प्रधानानें रोमन कॅथॉलिक लोकांच्या तर्फे कांहीं खटपट करण्याचा विचार मनांत आणला असता, तर त्यास अंधारकोठडीच पहावी लागली असती. असो; ह्या बाबतींतहि कालगतीनें शिक्षणाच्या सार्वत्रिक फैलावाबरोबर इंग्रज लोकांच्या विचारांत बदल होऊन ह्या शतकाच्या पूर्वार्धांत सर्व लोकांस धर्मस्वातंत्र्य पूर्ण प्राप्त झालें आहे, ही आनंदाची गोष्ट आहे; परंतु इंग्रज लोकांपैकींच कांहींकांना निष्कारण गेलेले हक्क पूर्ववत् प्राप्त करून घेण्यास तीन शतकें खर्च करावीं लागलीं. हें

ध्यानांत ठेवलें पाहिजे. असो; कांहीं वर्षांमागें त्यांच्या सुदैवानें बर्कच्या परिश्रमांस यश येऊन त्यांचीं बंधनें अंशतः शिथिल करण्यांत आलीं होतीं; पण त्यानंतर पुनः निरनिराळ्या प्रॉटेस्टंट मंडळ्यांकडून पार्लमेंटमध्यें अर्जावर अर्ज आले. ह्या मंडळ्यांचें प्रमुखत्व सामान्य मनुष्याकडे नसून एका दर्ज्या उमरावाकडे होतें. ह्या गृहस्थानें लॉर्डसभेंत जी सूचना आणली त्यावरून त्यांच्या मनोवृत्तीची थोडीशी कल्पना करितां येईल. बर्कवर हे गृहस्थ इतके संतापले कीं, त्या भरांत रोमन कॅथॉलिक लोकांच्या वतीनें बर्कनें पूर्वी केलेला अर्ज टेबलावर ठेवून लाथ मारून खालीं टाकावा अशी वेडगळ सूचना त्यांनीं आणिली; परंतु त्यांच्या दुर्दैवानें सर्वच सभा त्यांच्याप्रमाणें वेडगळ झाली नव्हती. ह्याप्रमाणें कायदेशीर रीतीनें हताश झालेल्या ह्या मंडळींनीं बलात्कारानें इष्ट हेतु सिद्धीस नेण्याचा निश्चय केला. इ० स० १७८० सालीं लंडन शहर दंगेखोर लोकांनीं दणाणून टाकिलें. त्यांच्या नायकावरून ह्या दंग्यास गॉर्डन दंगा म्हणूं लागले. व्हिग पक्षानें रोमन कॅथॉलिक पक्षाची बाजू उचलली होती, म्हणून त्या पक्षावर व मुख्यत्वेंकरून बर्कवर ह्या दंगेखोरांचा मोठा कटाक्ष होता. बर्कच्या घराचें संरक्षण करण्याकरितां सरकारी हत्यारबंद शिपायांचा पहारा ठेवावा लागला. राष्ट्रीय आपत्तीच्या प्रसंगीं सर्व पक्षभेद विसरून जाऊन त्या आपत्तीचा प्रतिकार करण्याकरितां सर्वांनीं एक दिलानें झटणे हेंच प्रत्येक मुत्सद्याचें कर्तव्य आहे. परंतु वरील प्रसंगीं पक्षाभिमानानें अंध होऊन फॉक्ससारख्या मुत्सद्यानें सरकारास पाठबळ देण्याचें नाकारलें. बर्कची मात्र देशप्रीति पक्षांत अडकळून राहण्याइतकी निःसत्व नव्हती. त्यानें सर्व सभासदांस सरकारास ह्या कामीं मनःपूर्वक मदत करण्याविषयीं सारखाच उपदेश केला. त्याचप्रमाणें त्यानें ह्या प्रसंगीं दाखविलेल्या लोकोत्तर धैर्याची तारीफ केल्याविना राहवत नाहीं. एखाद्या शेंदाडशिपायाप्रमाणें घरांत लपून न राहतां भर रस्त्यांत दंगेखोर लोकांमध्यें तो हिंडत असे. त्यांतहि असें धैर्य दयान्वित असेल तर तें निष्कलंक चंद्राप्रमाणें होय. दंग्यांत पकडलेल्या दुर्दैवी लोकांवर राजकृपा व्हावी म्हणून त्यानें निरलसपणें खटपट केली. मूळ दंगा उपस्थित करणाऱ्या लोकांबद्दल त्याचें कांहीं म्हणणें नव्हतें. असल्या लोकांना कायदेशीर कडक शिक्षा

होणें अगदीं योग्य आहे. त्यांचा अपराध क्षमाबाह्य आहे; परंतु या दुष्ट लोकांनीं फसवून ओढलेल्या भाबड्या, असमंजस लोकांवर कायद्याची सौम्य अंमलबजावणी होणें इष्ट आहे असा त्याचा समज होता.

बर्कच्या दयाशीलतेच्या, सुस्वभावाच्या आणि गुणग्राहकतेच्या शेंकडों गोष्टी त्याच्या चरित्रकारांनीं लिहून ठेविल्या आहेत, व मागें सांगितलेल्या कित्येक गोष्टींवरून तो निराश्रितांस मदत करण्यास कसा तत्पर असे तें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. एके प्रसंगीं खुद्द राजपुत्राकडे जाऊन त्यानें आपल्या गरीब धर्माध्यक्ष मित्राची जन्माची सोय करून दिली. ती जागा राजपुत्राच्या ताब्यांतली होती. बर्कनें आपल्या मित्रास कळविलें कीं, राजपुत्राचा व माझा फारसा परिचय नाहीं; तथापि, आपण स्वतः पत्र लिहाल तर तें घेऊन मी राजपुत्राकडे जाईन, त्याप्रमाणें त्यानें राजपुत्राची गांठ घेतली. राजपुत्रानेंहि प्रेमपुरःसर भेट घेऊन अर्जांत केलेली विनंति मान्य केली. ह्या थोरपणाबद्दल कृतज्ञताबुद्धीनें बर्कचें अंतःकरण अगदीं उचंबळून आलें; आणि नुसत्या आभार मानण्याच्या भरांत तो इतका वाहवला कीं, राजयोग्यता राजहित व राजकर्तव्य ह्यांवर त्याचें एक छोटेसें आनंदोल्लसित भाषणच झालें. इतक्यांत आपण कोणाजवळ बोलतों आहों ह्याचें स्मरण होऊन तो एकदम थांबला. आणि झालेल्या मर्यादातिक्रमाबद्दल त्यानें माफी मागितली. त्यावर राजपुत्रानें स्नेहपूर्वक म्हटलें, 'माफी मागण्याची जरूर नाहीं. तुमच्या शिकवणूकीनें आम्हां सर्वांस शहाणपण शिकलें पाहिजे; परंतु दुर्दैवानें फारच थोडे लोक आपल्या सरळ मनाचें अनुकरण करितात.'

प्रसिद्ध इंग्लिश कवि क्रॅब ह्याची पूर्वीची स्थिति म्हटली म्हणजे, तो दारिद्र्याचा एक पुतळाच होता. ह्यानें आपल्या गांवीं असतां कांहीं कविता केल्या होत्या. तेथें त्याची प्रशंसा झाल्यामुळें प्रोत्साहन मिळून लंडन शहरीं जाऊन त्याच्यायोगानें दोन पैसे मिळतील तर पहावें असा विचार त्याच्या मनांत आला. उपयोगी पडण्यासारखा एखादा स्नेही किंवा नुसता परिचितसुद्धां नसून, व खिशांत तीन पौंडांवर एक छदामहि नसतां, लंडनसारख्या बारभाई शहरांत येण्याच्या साहसाचा कष्टप्रद अनुभव त्यास लवकरच आला. जवळ असलेल्या

अल्प संचयाचा थोड्याच अवधींत फडशा उडाला. मग अर्थातच भयंकर आपत्ति दत्त म्हणून पुढें उभी राहिली. विद्वत्तेच्या जोरावर संपन्न होण्याच्या मोहक आशांचा भंग झाला. मोठमोठ्या उमरावांस त्यानें पत्रें लिहिलीं; पण त्यांचीं उत्तरें पाठविण्यास त्यांस फुरसत मिळाली नाहीं. अखेरीस मावकारांच्या कर्जाबद्दल विनभाड्याच्या कोठडींत वसण्याचा प्रसंग ह्या कावबीरावर येऊन ठेपला. इतक्यांत वर्कला एक पत्र लिहिण्याची त्यास वुद्धि झाली. वर्क केवळ त्यास नांवानेंच ऐकून माहीत होता. बाकी त्या दोघांचा यत्किंचितहि संबंध नव्हता. क्रॅबच्या सरळ व हृदयद्रावक लिहिण्यानें वर्कच्या दयार्द्र अंतःकरणांत कळवळा उत्पन्न झाला. त्याच्या गुणांबद्दल आपली खात्री करून घेऊन सर्वप्रकारें त्यानें त्यास मदत दिली. त्याचें काव्य छापवून चार चौघांशीं त्याची ओळख करून देऊन लहानशी नोकरीहि त्यास त्यानें देवविली.

एके दिवशीं संध्याकाळीं पार्लमेंटमधून परत जात असतां वाटेंत त्याला एका दुर्वृत्त स्त्रीनें गांठलें; परंतु आपली येथें डाळ शिजणार नाहीं असें पाहून तिनें आपले बोलणें फिरविलें, आणि दीन स्वरानें व सात्विकपणें द्रव्यरूप मदत मागूं लागली. वर्कनें तिची विचारपूस केली. त्यावर तिनें सांगितलें कीं, " मी पूर्वी एका कुलीन कुटुंबांत चाकरीस होतें; परंतु यजमानाच्या मुलानें फूस लावल्यामुळें माझें पाऊल वांकडें पडलें. त्याचा परिणाम नाना प्रकारचीं दुःखें भोगून सांप्रतची ही शोचनीय स्थिति प्राप्त झाली आहे. ह्यांतून मरण येऊन सुटका होईल तर बरें असें ईश्वराजवळ मी मागत आहे. " वर्कनें सर्व ऐकून घेऊन तिला म्हटलें, " तूं सांगितलेली हकीकत एखाद्याच्या अंतःकरणास द्रव आणण्यासारखी आहे. खरी किंवा खोटी हें तुझें तुलाच माहीत. पण मला आतां असें सांग कीं, संधि मिळेल तर हा हल्लींचा आयुष्यक्रम सोडण्याची तुझी मनापासून निश्चित इच्छा आहे काय ? " " तो सोडण्यास मी हवें तें करीन, " असें उत्तर मिळाल्यावर त्यानें तिला आपल्या घरीं आश्रय दिला. अर्थातच एका व्यभिचारपंकांत पडलेल्या दुर्दैवी स्त्रीला सदाचारिणी करण्याचें महत्पुण्य त्यानें संपादिलें.

स्वतःच्या कल्याणावर लाथ मारून देशसेवेंत आयुष्य समर्पण करण्याचा ज्याचा कृतसंकल्प होता; नागवलेल्या लोकांची तरफदारी करण्याचें ज्यानें ब्रीद

उचललें होतें; राज्यव्यवस्थेची, व्यापाराची, लोकस्वभावाची माहिती ज्याच्या एवढी सर्व राष्ट्रांत एकासहि नव्हती; सूर्योदयाबरोबर तेजोहीन होणाऱ्या असंख्य तारकागणांप्रमाणें ज्याच्या भाषणवक्तृत्वनिपुणतेपुढें इतर सभासद फिक्के पडत; ज्याच्या सप्रमाणरूपी तीव्र बाणाच्या योगानें दुराग्रह व हठवाद ह्यांचे तुकडे तुकडे होत; अशा गुणवान मनुष्याच्या गुणांचें चीज करणें अंशतः तरी चंचल बुद्धीच्या अज्ञजनसमूहावर अवलंबून असणें हा कांहींसा लोकनियुक्त राज्यव्यवस्थेचा दोष म्हणण्यास हरकत नाहीं. बहुतेक बाबतींत बहिष्कृत झालेल्या रोमन कॅथॉलिक पंथाच्या लोकांना कांही हक्क देण्याची त्यानें खटपट केली, व आयर्लंडच्या व्यापारावर अन्यायानें लादलेलीं बंधनें दूर करण्यास त्यानें आपली संमति दिली; हे दोन आरोप ब्रिस्टल शहरच्या लोकांनीं आपल्या प्रतिनिधीवर ठेवले. आणि इ० स० १७८० सालीं पार्लमेंट बरखास्त झाल्यावर त्यांनीं आपल्या प्रामाणिकपणें काम करणाऱ्या प्रतिनिधीस कायमची रजा देऊन आपल्याला अक्षय्य कलंक लावून घेतला. ह्यापुढें शेवटपर्यंत बर्क पार्लमेंटमध्यें मॅल्टन लोकांच्या तर्फे बसत असे.

इ०स० १७७२ सालीं प्रधानमंडळांत बदल झाला. लॉर्ड नॉर्थची सारखी बारा वर्षांची आमदानी संपली. राजानें पुन्हां लॉर्ड रॉकिंगहॅमला बोलावून त्याच्यावर राज्यकारभार सोंपविला. शेलबोर्न, शेरिडन आणि फॉक्स ह्यांस प्रधानमंडळांत जागा मिळाल्या. शेरिडन हा इंग्लिश मुत्सद्यांत मोठा नांवाजलेला असे. हा नुकताच पार्लमेंटमध्यें शिरला होता. ह्याची बुद्धि जात्याच फार तीव्र होती. फॉक्सप्रमाणेंच असामान्य अशा नैसर्गिक बुद्धिसामर्थ्यामुळें राष्ट्रांतील मोठ्या लोकांत त्याची गणना होत असे. त्याच्या अंगीं पुष्कळ प्रशंसनीय गुण होते; परंतु त्याबरोबर त्यांवर विरजण पाडणारे दुर्गुणहि कमी नव्हते. तो आळशी व बदफैली असून त्याला अभ्यासाचा आणि कामाचा कंटाळा असे. अंगीं चांगली कवित्वशक्ति असूनहि ती वर्द्धिगत करण्याचें त्याच्यानें होईना. त्यावेळच्या सर्व हास्यरसोत्पादक नाटककारांत अग्रेसर असूनहि त्यानें तो विषय अजीबात सोडून दिला. तो धूर्त मुत्सद्दी होता ह्यांत संशय नाहीं; तरी पण पुढारी म्हणून घेणाऱ्या लोकांना लोकप्रीति ज्याच्यायोगानें खात्रीनें संपादन करितां येते असें वर्तन,

गांभीर्य आणि विचारप्रगल्भता ह्यांची त्याच्यांत अगदी उणीव होती. तो बडा वक्ता होता; पण लोकांवर परिणाम होण्यास अवश्य वक्तृत्वाचा जो ज्ञानसंचय, तो त्याच्याजवळ फारच अल्प होता. वादविवादामध्यें तो शांत, चाणाक्ष आणि समयसूचक असे. त्याचा स्वभाव गमती असून विलासदेवीचा तो एकनिष्ठ भक्त होता. ह्या सर्व गुणांत फॉक्सचें व त्याचें बरेंच साम्य होतें. बर्क व शेरिडन दोघे एकाच देशांतून आले; दोघांचीहि पूर्वकालीन स्थिति सारखीच होती; निरपेक्षबुद्धि हा दोघांचाहि सारखाच गुण होता; दोघेहि आपल्या पक्षाचे खंबीर आधार होते; एकंदर राष्ट्राची सुरक्षितता धोक्यांत आल्यास दोघेहि पक्षभेद विसरून जात. शेवटीं फॉक्सप्रमाणेंच ह्या दोघां राजकार्यपटु मुत्सद्यांची फ्रान्सांतील राज्यक्रांतीनें फाटाफूट केली.

रॉकिंगहॅमपक्ष अधिकारारूढ झाला असून बर्कला मंत्रिमंडळांत जागा मिळाली नाहीं हें फार आश्चर्यकारक आहे. ह्या पक्षाचा व बर्कचा संबंध म्हणजे देह व आत्मा ह्यांच्या संबंधाप्रमाणेंच होता. आत्म्याविना देह ज्याप्रमाणें केवळ निर्माल्यवत् होतो, त्याचप्रमाणें बर्कविरहित रॉकिंगहॅमपक्षाची स्थिति होती. तसेंच बर्कच्या हातून पार्लमेंटमध्यें आज दहा वर्षें जी लोकोत्तर कामगिरी बजावली गेली, त्यामुळेंहि मंत्रिमंडळांतील जागेवर त्याचा पूर्ण हक्क पोंचत होता, व ती मिळेल अशी त्यास आशा सुद्धां होती. प्रामाणिकपणें काम करूनहि त्याचें योग्य चीज झालें नाहीं, तर कोणत्या मनुष्यास वाईट वाटणार नाहीं? अशी अवहेलना झालेली पाहून दुसरा एखादा स्वार्थपरायण मनुष्य विरुद्ध पक्षास जाऊन मिळता; परंतु बर्कनें केलेली देशसेवा, महत्वाकांक्षेच्या जबरदस्त हावेनें प्रेरित नसल्याकारणानें, त्यानें त्याबद्दल मुळींच तक्रार केली नाहीं. अशाप्रकारचें वर्तन त्यास निःसंशय भूषणावह आहे; परंतु ज्या लोकांनीं सर्वतोपरि योग्य असतांहि त्यास मंत्रिमंडळांत घेतलें नाहीं त्यांस काय म्हणावें? बुद्धिसामर्थ्याला गौणत्व आणणारा एक जबरदस्त दोष त्याच्यांत होता, व त्याचमुळें अधिकाराची पवित्र पायरी चढण्यास त्यास मज्जाव झाला. बर्कच्या कमनशीबानें तो इंग्लिशमन नव्हता. त्याचप्रमाणें रोमन कॅथॉलिक लोकांचा चाललेला छळ पाहून न्यायबुद्धि व दया हीं

ज्याच्यांत अंशतः तरी जागृत राहिलीं आहेत, अशा कोणत्याहि विचारशील प्राण्याप्रमाणें त्यास त्यांची कींव येई, व ह्या अन्यायाचा यथाशक्ति प्रतिरोध करण्याचा तो मनःपूर्वक प्रयत्न करी. ह्यावरून तो रोमन कॅथॉलिक पंथानुयायी आहे असा त्याविषयीं लोकांस संशय येत असे. इंग्लिश लोकांमध्यें सुगुणांबरोबर दुर्गुणहि आहेत; परंतु त्यांत अत्यंत लांछनास्पद दुर्गुण म्हटला म्हणजे, परकीयांविषयीं अनुदारता व मत्सरबुद्धि हा होय. स्कॉच लोकांचा आणि आयरिश लोकांचा इंग्लिश लोक सारखाच तिटकारा करीत. लॉर्ड ब्यूट हा स्कॉच होता, एवढ्याच गोष्टीवरून प्रायः त्याला आपल्या प्रधानकीचीं वस्त्रें टाकून द्यावीं लागलीं. बर्कचा दिवसेंदिवस वृद्धिंगत होत जाणारा उत्कर्ष पाहून पुष्कळ लोक त्याचा आंतून द्वेष करीत; तथापि अंगच्या अद्वितीय बुद्धिसामर्थ्यामुळेंच आजपर्यंत अशा क्षुद्रबुद्धीच्या लोकांना न जुमानतां त्यानें आपली छाप उलटी त्यांवर बसविली होती. आयर्लंड देशांत आणि एका अप्रसिद्ध कुलांत जन्म घेण्याचें अक्षम्य पाप केल्यामुळें त्यास इंग्लिश मुत्सद्यांस आपल्या पंक्तींत घेतां येईना. इकडल्याप्रमाणें, नानाविध जाति तिकडे नसतील, तथापि जातिभेदाचें रूपांतर तेथें खास होतें हें बर्कच्या उदाहरणावरून स्पष्ट होतें. एकाच धर्माच्या, एकाच आचारविचारांच्या, एकच भाषा बोलणारांच्या हक्कांची जेथें बिनदिक्कत पायमल्ली होते, व त्यांचा उत्कर्ष न होऊं देण्याविषयीं सारखी धडपड चालू असते, तेथें विधर्मी व भिन्न आचारांच्या परराष्ट्रीय लोकांची दाद लागली नाहीं, तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. ज्या देशांत विचारस्वातंत्र्यवृक्षाचीं पाळेंमुळें सर्व देशभर सुदृढ पसरलीं आहेत, त्या देशांत अशा क्षुद्र मनोविकारांना अवकाश मिळावा ही गोष्ट मनन करण्यासारखी आहे.

बिचाऱ्या बर्कच्या वाट्यास पेमास्तरचें काम आलें. ह्या जागेचा पगार सालीना चार हजार पौंड होता. बर्कच्या मुलाचीहि त्याच ऑफिसांत सोय केली होती. मागें सांगितलेंच आहे कीं, बर्कनें पार्लमेंटपुढें खर्चाची काटकसर करण्यासंबंधानें एक बिल आणिलें होतें. त्या वेळेस जो कार्यभाग झाला नाहीं, तो त्याला आतां सहज करितां आला. ह्यापूर्वीं ह्या खात्यांत फार अव्यवस्था चालू

होती. पेमास्तरच्या हातांत हजारों पौंड शिल्लक रहात असे. एवढी मोठी रक्कम वापरण्यास सांपडून शिवाय त्या रकमेचें व्याजहि पेमास्तरच खात असे. ही चाल बंद करून हातांत आलेली रक्कम सरकारतिजोरींत टाकण्याचा प्रघात बर्कनें पाडिला. त्याचप्रमाणें, त्या जागेचा पगार चार हजार पौंड त्यानें कायम करून घेतला. ह्या एकट्या खात्याच्या सुधारणेनें वर्षाचे सत्तेचाळीस हजार पौंडांची तिजोरींत भर पडली. बर्कच्या स्थितीचा विचार केला असतां ज्या पैशाचा प्रतिष्ठितपणें, पूर्वापार वहिवाटीच्या जोरावर खाजगीकडे विनियोग करितां आला असता त्यावर आपण होऊन देशाच्या हितासाठीं पाणी सोडणें. हें लहानसहान धैर्य नाहीं, देशहितामध्यें व्यक्तिहिताचा अंतर्भाव होतो. असें मानणारे लोक जेव्हां देशांत निपजतात, तेव्हां देशाचा उदयकाल होण्यास विलंब लागत नाहीं.

रॉकिंगहॅमपक्षाच्या दुर्दैवानें त्याला फारा दिवसांनीं लाधलेला अधिकार पुष्कळ दिवस उपभोगितां आला नाहीं. अधिकाररूढ होऊन तीन महिने झाले नाहींत, तोंच रॉकिंगहॅमचा अकस्मात अंत झाला. व्हिग पक्षाचें धुरीणत्व ह्या थोर उदार गृहस्थाकडे असल्यामुळें त्या पक्षांतील निरनिराळे तट एकवट होऊन त्याच्या बरोबर सलोख्यानें काम करीत असत; परंतु आतां त्याच्या मरणानें त्या पक्षांत एकच गोंधळ माजला. लॉर्ड शेलबोर्न ह्यानें रिकामी पडलेली जागा एकदम पटकावलेली पाहून लोकांस आश्चर्य वाटलें. राजाचें त्यास पाठबळ मिळालें ह्याचें कारण, राजा फॉक्सचा अतिशय द्वेष करीत असे; व शेलबोर्न नसता तर फॉक्सच्या हातांत राज्यसूत्रें पडण्याचा संभव होता. शेलबोर्न हा परराष्ट्रीय कारस्थानांत निष्णात असून त्यासंबंधीं त्याला पूर्ण माहिती होती; तथापि त्याच्या अंगीं इतके दोष होते कीं, त्याच्याबरोबर काम करण्याचें कोणी पतकरीना. बर्कनें तर भर पार्लमेंटमध्यें दोषाविष्करण करून त्याची निंदा केली होती. इ० स० १७८६ त पिटच्या हातांत राज्यकारभार गेल्यावर त्यानेंहि शेलबोर्न ह्यास आपल्याबरोबर काम करण्यास घेतलें नाहीं. ह्यावरून फॉक्स व बर्क ह्यांचीं मनें त्याच्यासंबंधीं निष्कारण दूषित झालीं नव्हतीं असें दिसतें; तथापि या मित्रद्वयांनीं ह्या प्रसंगीं जी चूक केली, तिची तरफदारी करणें कधींहि वाजवी होणार नाहीं. शेलबोर्न हा मुख्य प्रधान

झालेले पाहून, हे दोघे लॉर्ड नॉर्थ साहेबांस जाऊन मिळाले. मागें सांगितलेंच आहे कीं, नॉर्थ मुख्य प्रधान असतां, त्यास फॉक्स व बर्क ह्यांनीं, अनुपम वक्तृत्व, प्रगल्भ विचार, सयुक्तिक वाद इत्यादि अव्याहत चालू ठेवलेल्या तीक्ष्ण शस्त्रप्रहारांनीं इतका विव्हल करून सोडिला होता कीं, त्याचें राजकीय मरण लवकरच ओढवलें. ही त्यांची कृति मुळींच दोषार्ह नसून, उलट त्यांनीं केलेल्या त्या वेळच्या लोकोत्तर देशसेवेबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत; परंतु अशा भिन्न मताच्या प्रतिस्पर्ध्याबरोबर आतां काम करण्यास हे कसे प्रवृत्त झाले ह्याचें मोठें गूढ आहे. लॉर्ड नॉर्थ ह्याला जाऊन मिळाल्याशिवाय त्यांना गत्यंतर नव्हतें असें नाहीं. आपला एक स्वतंत्र पक्ष करून त्यांना राहतां येणें शक्य होतें. कांहींहि असो; ज्या मनुष्याला नाहीं नाहीं तीं नांवें ठेविलीं, त्यालाच आतां आपल्या पाठीशीं धरण्यांत स्वभावविसंगतता स्पष्ट दृग्गोचर होते. आमचीं भांडणें क्षणिक होतीं, पण आमचा स्नेह चिरकालीन आहे, असें म्हणून फॉक्सनें वेळ मारून नेली; परंतु खरी स्थिति न समजण्याइतके लोक अजागळ नव्हते. असो, अशा रीतीनें कलहांत उत्पन्न झालेली शेलबोर्न-कारकीर्द लवकरच संपुष्टांत आली; तेव्हां पुनः लॉर्ड नॉर्थ व त्याचे नवीन पैदा केलेले स्नेही ह्यांच्या हातांत राज्यकारभार आला. ह्या खेपेसहि बर्कला पूर्ववत् पेमास्तरच्या जागेवर संतुष्ट होऊन रहावें लागलें.

ह्या रंगीबेरंगी प्रधान मंडळांतल्या अमदानींतलें अत्यंत महत्वाचें कृत्य म्हटलें म्हणजे इंडिया बिल हें होय. कांहीं वर्षांपूर्वीं बंगाल, बहार व ओरिसा ह्या तीन प्रांतांत चालू असलेल्या न्यायपद्धतीची चौकशी करण्याकरितां हाऊस ऑफ् कॉमन्सची कमिटी नेमण्यांत आली होती. ह्या कमिटीचा नववा आणि अकरावा रिपोर्ट खुद्द बर्कनें लिहिला होता. ह्या व दुसऱ्या रिपोर्टांवरून, चालू असलेल्या व्यवस्थेंत लांच घेण्यादेण्याला मुबलक अवकाश मिळतो व ती न्यायपद्धति अगदीं अपुरी आहे ह्याविषयीं कांहीं संशय राहिला नव्हता. ह्या बिलाच्या उत्पादकत्वाविषयीं इंग्रजी चरित्रकारांत मतभेद आहे. कांहीं लोक फॉक्सवर आणि कांहीं बर्कवर तें लादूं पाहतात. वस्तुतः तें फॉक्सनें मूळ पार्लमेंटपुढें आणलें; परंतु त्यांतील दोषामुळें व अखेरीस आलेल्या अपयशामुळें ह्या कर्तृत्वाविषयींचा उद-

चाउडवींचा प्रकार झालेला दिसतो. बर्कनें जर मूळ मसुदा तयार केला असता, तर त्याला स्वतः तो पार्लमेंटपुढें आणण्यास हरकत नव्हती; व जोंपर्यंत आपण केलेल्या श्रमाचें श्रेय दुसऱ्यास देण्यास विशेष कारणें दाखवितां आलीं नाहींत, तोंपर्यंत बर्कला ह्या बिलाच्या व्यंगाबद्दल जबाबदार धरतां येत नाहीं. हिंदुस्थानांतील कंपनीचा राज्यकारभार बोर्ड ऑफ् डायरेक्टर्स म्हणून मंडळी असे तिच्या मार्फत होत असे; परंतु आतां ह्या बिलानें त्या मंडळीपासून तो अधिकार काढून घेऊन पार्लमेंटनें नेमलेल्या नियमित लोकांवर सोंपविला. बिलाच्या उत्पादकांचा हेतु जरी निःसंशय हिंदुस्थानांतील लोकांवर चाललेल्या जुलमाचा प्रतिकार करण्याचा होता, तरी तो ह्यायोगानें कितपत साधला असता ह्याची बरीच शंका आहे. अफाट प्रजेच्या सुखदुःखाचा विचार पार्लमेंटनें नेमलेल्या मूठभर लोकांच्या हातून होणें केवळ अशक्य आहे, व पूर्ण अधिकार दिलेल्या स्वतंत्र अधिकारिवर्गावर सर्व राज्यकारभार सोंपविणें म्हणजे, अनियंत्रित राज्यसत्तेचा पाया घालणें होय. खुद्द इंग्लिश पार्लमेंटला तो आपल्या हातांत घेऊन योग्य रीतीनें बजावणेंहि असंभवनीयच होतें. हिंदुस्थानांतील कारभार पहाण्याचें जर पार्लमेंटनें पतकरलें, तर इंग्लंडकरितां निराळेंच पार्लमेंट बसवावें लागेल. हिंदुस्थानांतील लोकांच्या हिताहिताविषयीं ह्या वेळेप्रमाणेंच अद्यापिहि इंग्लिश लोक बेपरवा आहेत. असो; वर निर्दिष्ट केलेलें बिल कॉमन्समध्यें पास झालें; पण हाऊस ऑफ लॉर्डस्मध्यें तें पसंत पडलें नाहीं. ह्या कामांत अपयश आल्यामुळें प्रधानमंडळास आपल्या कामाचा राजीनामा द्यावा लागला. खालीं पडलेली जागा राजकीय क्षितिजाबरोबर नवीनच चमकूं लागणाऱ्या एका बालताऱ्यानें पटकाविली.

जे कांहीं थोडे लोक, असामान्य बुद्धिसामर्थ्य व अनुकूल प्रारब्ध ह्यांच्या साहाय्यानें राष्ट्रनियमन करण्यास निसर्गतःच योग्य असतात, अशा लोकांमध्यें पिटची गणना करितां येईल. सुदैवानें जी योग्यता प्राप्त झाली ती त्याला बुद्धिबलानें राखतां आली. राजकीय कारभाराचें सुकाणूं केवळ बालदशेंतच वृद्ध, अनुभवशीर आणि अगाध कीर्तींच्या मुत्सद्यांच्या हातांतून ओढून आपल्या हातीं घेणें; आणि राजाच्या किंवा लोकांच्या अनुकूलतेंत यत्किंचितहि न्यून न पडतां, बालदशेपासून तारुण्यापर्यंत व तारुण्यापासून वार्धक्यापर्यंत तें कायम

ठेवणें, हा प्रकार साऱ्या यूरोप खंडाच्या इतिहासांतहि अननुभूत असेल. त्याच्या प्रथमारंभींच्या अमदानीकडे जरा लक्ष्य फेकलें तर त्या वेळेस अनुभव नसतां त्यानें ज्या चातुर्यानें, शहाणपणानें व नेमस्तपणानें राज्यकारभार चालविला, तें पाहून मनुष्य आश्चर्यानें थक्क होऊन जाईल. हिंदुस्थानची राज्यव्यवस्था, व्यापाराला उत्तेजन देणें, राष्ट्रीय कर्जाची फेड, जमाबंदी वाढविणें वगैरे महत्वाच्या आणि बिकट प्रश्नांची नीट व्यवस्था लावण्याचें काम त्याच्यावर पडलें. तो आपल्या राज्यकारभाराचें धोरण अशा रीतीनें ठेवीत असे कीं, त्यामध्यें शत्रूंना दोष काढतां येऊं नये. लोकमान्यता संपादन करण्यास मुख्यतः बापाचा लौकिक त्यास विशेष सहायभूत झाला. तो मनाचा खोल होता. फॉक्सच्या स्वभावांत आढळून येणारें सौरभ्य किंवा बर्कमध्यें भासमान होणारा मनाचा मोकळेपणा ह्यांपैकीं पिटच्या अंगीं कांहीं नव्हतें. त्याचें नैतिक आचरण निर्दोष असे. त्याचा धूर्तपणा प्रत्येक बाबतींत स्पष्ट दृग्गोचर होत असे व त्याच्या निःस्वार्थबुद्धीचा अनुभव पदोपदीं येत असे. त्याचें भाषण वक्त्याप्रमाणें नसून एखाद्या कार्यव्यग्र मनुष्याप्रमाणें असे. योग्य शब्द योग्य स्थळीं अचानक घालण्याची त्यास चांगली हातोटी साधली होती. त्याचा आकार भव्य असून आवाज सुस्वर होता; तथापि त्याच्या भाषणांत विविधता, औज्वल्य, प्रगल्भ दृष्टांत ह्यांची एकंदर उणीव असे. कल्पनाशक्ति वगैरे कांहीं गोष्टींत तर बर्क आणि फॉक्स ह्या दोघांच्याहिपेक्षां तो फारच कमी येईल. मध्यमांत उत्कृष्ट म्हणून बर्कनें जें त्याचें वर्णन केलें आहे तेंच बहुतांशीं खरें आहे. बर्कच्या भाषणांत ज्याप्रमाणें नवीन विचार किंवा विलक्षण बुद्धिमत्तेची झलक दृष्टीस पडते, तशी पिटच्या भाषणांत नसल्यामुळें ती पुनः वाचण्याची इच्छा होत नाहीं.

ह्याच सुमारास बर्कचा फार दिवसांचा स्नेही डॉक्टर जॉन्सन हा परलोकवासी झाला ( १७८४ ). सत्तावीस वर्षांच्या स्थित्यंतरांत ह्या दोघां अलौकिक पुरुषांची परस्परांविषयीं पूज्यबुद्धि आणि अभिमानयुक्त प्रेम लवमात्रहि कमी झालें नाहीं. अंतकाळीं कांहीं स्नेह्यांबरोबर बर्क जॉन्सनला भेटावयाला गेला होता – त्या वेळेस त्याची ती कष्टमय अवस्था पाहून त्यानें म्हटलें,—‘ लोकांच्या भेटी-

पासून आपल्याला फार त्रास होत असेल.' त्यावर, त्या आसन्नमरण नीतिवेत्त्यानें उत्तर दिलें 'नाहीं महाराज, आपल्या भेटीपासून मला जर आनंद झाला नाहीं, तर मी हतभाग्य असलों पाहिजे.' एवढ्यावरून तो बर्कला फार चहात असे हें उघड दिसतें. ह्या काळच्या सर्व विद्वत्समूहामध्यें ज्ञानसंग्रह आणि कल्पकशक्ति ह्यांच्या योगानें परस्परांशीं तुलना करण्यासारखे हे दोघेच पुरुष होते.

दोघेहि प्रारंभीं वाङ्मयद्राक्षावटिकेंत सहव्यवसायी होते, आणि दोघांनींहि निरनिराळ्या मार्गांत परमोत्कर्ष संपादन केला. बर्कची महत्वाकांक्षा पहिल्यापासून राजकीय कारभारांत भरारी मारण्याची होती असें दिसतें; परंतु जॉन्सनच्या विचारांचा उड्डानप्रदेश इतका विस्तृत नव्हता. स्वतंत्रपणें विद्यामंदिरांत अप्रतिम लौकिक संपादन करण्यापलीकडे त्याची उडी गेली नव्हती. मनुष्याचें नियामकत्व प्राप्त करून घेण्याची एकाची दृढतम इच्छा, व दुसऱ्याची परममनीषा त्यांच्या पुस्तकांचें अधिपत्य पटकाविण्याची. दोघांच्याहि मध्यें एक शारीरिक व्यंग होतें, तें हें कीं, त्यांस दूरचें दिसत नव्हतें. जॉन्सन हा इंग्लिशभाषेचा मोरोपंत होय. मोरोपंताच्या काव्यानें मराठी भाषेला जसें एकप्रकारचें व्यवस्थित स्वरूप आलें, तसेंच जॉन्सनच्या लेखांनीं इंग्लिश भाषेला आलें आहे. इंग्लिशभाषेंत प्रथम कोश ह्यानेंच तयार केला. जॉन्सन आणि बर्क ह्या दोघांनीं पुढील पिढीला निरनिराळ्या भाषापद्धति घालून दिल्या आहेत. जॉन्सनचें लिहिणें नेहमीं विद्याप्रचुर असून युक्तिसिद्ध असल्यामुळें, त्याच्या लिहिण्याच्या सत्यत्वाविषयीं वाचणाराच्या मनाची खात्री होते. जॉन्सनप्रमाणें बर्कची लेखनपद्धति इतकी व्यवस्थित नाहीं हें खरें; पण त्याच्याहि लिहिण्याचा परिणाम तसाच होतो. जॉन्सन वक्ता नसल्यामुळें निवडक मित्रसमूहावर छाप बसण्यास योग्य अशी त्याची भाषापद्धति असे. सर्वसामान्य विषयासंबंधीं दोघांचें ज्ञान बरेंच होतें. दोघांत अतिशय महत्वाचा गुण म्हणजे, मनुष्यस्वभावाचें पूर्ण व यथार्थ ज्ञान होय. दोघांचेंहि आचरण निष्कलंक होतें. लोकनायकांच्या अंगीं हा गुण असणें अवश्य आहे. जर का त्यांच्या खाजगी वर्तनांत दोष ठेवण्यास अल्पहि अवकाश लोकांस मिळेल, तर त्यांची छाप लोकांवर कधींच बसणार

नाहीं. अंगीं असलेली कर्तृत्वशक्ति जागच्या जागीं मात्र थिजून जावयाची. बर्के-प्रमाणेंच अनाथ व पीडित लोकांस पाहून जॉन्सन्च्या दयाशील अन्तःकरणास पाझर सुटे; पण त्याच्या रीतीभातींत व बोलण्याचालण्यांत जितकें मार्दव आणि सभ्यपणा असावा तितका नसे. दोघांचीहि मानसिक शक्ति फार विलक्षण होती. एकाद्या द्रव्यलोभी मनुष्याप्रमाणें त्यांची ज्ञानतृष्णा अनिवार असे; तथापि ह्या ज्ञानमयसंपत्तीचा विनियोग करण्यास ते सारखेच तत्पर असत. दोघांचें अन्तः-करण निसर्गतःच दयार्द्र असल्यामुळें विपन्न मनुष्यांच्या विनवण्या बहुतकरून निरुपयोगी होत नसत. एके दिवशीं बर्क दोघां स्त्रीमित्रांबरोबर फिरत असतां, तेथें एक वृद्ध भिकारी आला. त्याला धर्मबुद्धीनें बर्कनें एक शिलिंग काढून दिलेला पाहून एकीनें म्हटलें, " महाराज, तुमच्यासारख्या लोकांनीं असल्या लोकांस धर्म करावा हें आश्चर्य आहे. हे लोक बहुधा लबाड असतात. आपण जें आतां दिलें तें दारूमध्यें उडून जाईल " बर्कचें उत्तर ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. " बाई, तो म्हातारा मनुष्य आहे, आणि दारूनें जर त्याला आनंद होत असेल, तर त्यानें तो अवश्य करून घ्यावा. "

या दोन खरोखर थोर गृहस्थांच्या अकृत्रिम स्नेहाविषयीं एक फार महत्वाची गोष्ट लक्षांत घेण्याजोगी आहे. ती अशी कीं, इतर बाबतींत अत्यंत ऐकमत्य असलें तरी, त्यांचीं राजकीय विषयावरील मतें अगदींच भिन्न असत. बर्क कट्टा व्हिग म्हणजे लोकपक्षीय व जॉन्सन् पहिल्या प्रतीचा टोरी म्हणजे राजपक्षीय. डॉ० जॉन्सननें सार्वजनिक चळवळींत आपलें मन बिलकुल घातलें नव्हतें. तो पार्लमेंटचा कधींच सभासद झाला नाहीं; पण व्हिगमताचा तो पक्का द्वेषी असे. इंग्लिश भाषेचा त्यानें केलेला कोश जरी पहिला तरी त्याचा पक्षाभिमान व्यक्त होतो. अशा गृहस्थाचें व बर्कसारख्या आवेशी मनुष्याचें सख्य एकदां जुळल्या-वर आमरण अबाधित चालावें, हें आपल्या समाजांतील आपसांतील दुहीचा विचार करतां मोठ्या कौतुकाचें वाटल्याशिवाय रहात नाहीं. सामाजिक विषयां-वर दोघांचे अभिप्राय भिन्न पडतात, सबब उभयतांचा बारावा बृहस्पति; इतका कीं, सार्वजनिक उपयुक्ततेच्या कामींहि दोघांनीं जवळ बसून शांतपणें

बोलण्याची सोय नाहीं—अशी हिंदुस्थानांत स्थिति आहे; पण जेवढ्यापुरता मतभेद तितका विवाद बाकी एकमेकांचीं अंतःकरणें एक, असा प्रकार आपल्या देशांत झाल्याशिवाय आपल्यास बरे दिवस येण्याची आशा नाहीं. बर्कजॉनसन-सारखें निष्कपट मित्रत्व मोठमोठ्या चांगल्या सुधारलेल्या व नांवाजलेल्या राष्ट्रांत-देखील क्वचित्‌च दृष्टीस पडतें पण तसें मित्रत्व आमच्या देशांत आजकाल अत्यंत अगत्याचें आहे.

# भाग ६ वा

## वॉरन हेस्टिंग्जची चौकशी

अन्याय, मग तो कोणत्याहि देशांत, कोणत्याहि हवेंत, कोणत्याहि लोकांवर होवो, तन्निवारणार्थ केवळ निरपेक्ष बुद्धीनें परदुःखसहिष्णुतेनें प्रेरित होऊन जिवापाड परिश्रम करणाऱ्या, संस्कृत कवीनें वर्णिलेल्या, स्वार्थ सोडून परार्थ-घटक बनलेल्या सत्पुरुषमालिकेंत बर्कची गणना करण्यास हरकत नाही. अमेरिकन लोकांचा वाली होऊन, त्यांचें दुःख तें आपलें दुःख असें समजून त्या लोकांवर चाललेल्या जुलमांचा प्रतिकार करण्यासाठीं, त्यानें पार्लमेंटमध्यें आपलें बुद्धिसामर्थ्य व वाक्पटुत्व किती खर्च केलें, हें वाचकांच्या लक्षांतून गेलें नसेलच. अमेरिकन लोकांच्या कलहाचें पर्यवसान स्वातंत्र्यार्जनांत झाल्यामुळें, बरींच वर्षे अमेरिकेवर असलेली दृष्टि स्वस्थानीं येऊन विश्रांति घेते न घेते, तोंच, दुसऱ्या एका प्रचंड व दूरच्या देशावर मोर्चा फिरविण्याचा तिला प्रसंग आला.

कंपनीच्या हिंदुस्थानांतील राज्यकारभाराची चौकशी कमिटी नेमून तिच्यामार्फत पार्लमेंट वारंवार करीत असे. ह्यापैकीं कांहींचे रिपोर्ट खुद्द बर्कनें लिहिले होते, हें मागें सांगितलेंच आहे. तेव्हांपासून त्याचें लक्ष्य ह्या देशाकडे सारखें लागलें होतें. इंग्लिश लोकांच्या राजनीतीला अक्षय्य कलंक लावणारीं राज्यकारस्थानें, धडधडीत अन्याय, असंख्य कुकर्मे, ज्यांच्या जोरावर एका व्यापारी मंडळीनें हिंदुस्थानांत नवीन राज्य पैदा केलें, तीं जसजशीं त्याच्या दृष्टोत्पत्तीस येऊं लागलीं, तसतसें त्याचें मन अधिकाधिकच उद्विग्न होई. म्हणून एकदां उदाहरण करून दाखवून, ह्या अन्यायमालिकेचें मूळ अजिबात नाहींसें करण्याचा त्यानें संकल्प केला, व तो सफल होण्याची संधिहि अनायासें लवकरच आली. हिंदुस्थानचा पहिला गव्हर्नर-जनरल वॉरन हेस्टिंग्ज हा इ० स० १७८५ सालीं हिंदुस्थानांतून आपलें काम सोडून स्वदेशीं गेला. हा अचानक

आलेला प्रसंग बर्कनें व्यर्थ दवडला नाहीं. ह्या साहेबाच्या कारकीर्दीची चौकशी करण्यासंबंधीं त्यानें पार्लमेंटमध्यें लागलीच नोटीस दिली. केवळ मनोदेवतेच्या सौम्य कानउघाडणीचाच प्रत्यवाय झाला तर झाला; नाहींतर बहुतेक अनिर्बाधित अंमल कोट्यवधि लोकांवर गाजवून आयुष्यावशेष सुखांत, वैभवांत आणि आनंदांत घालविण्याच्या इच्छेनें स्वदेशीं परत आल्यावर, सामान्य अपराध्याप्रमाणेंच आपल्याला लोकांनीं गणलेला पाहून, गव्हनरसाहेबांच्या मनोवृत्तीची काय स्थिति झाली असेल ह्याची कल्पनाच केली पाहिजे. ह्या जगांतील वैभव क्षणिक आहे, ह्याविषयीं त्याची पक्कीच खात्री झाली असेल ह्यांत संशय नाहीं.

वॉरन हेस्टिंग्ज ह्याचा जन्म इ० स० १७३२ त झाला. त्याचा बाप धर्माध्यक्ष होता. वेस्टमिनिस्टर येथें कांहीं प्राथमिक शिक्षण मिळविल्यावर त्यानें लगेच ईस्ट इंडिया कंपनींत कारकुनीची जागा पतकरिली. त्याचप्रमाणें तो बंगाल इलाख्यांत प्रथम इ० स० १७५० त आला. तेथें त्यानें फारसी भाषेचा अभ्यास करून, त्यांत इतकी प्रवीणता संपादली कीं, इंग्लंडास परत गेल्यावर, जॉन्सनादि विद्वानांशीं त्याचा परिचय, झाला. १७६८ सालीं पुनः तो मद्रासेस आला. तेथें त्याची हुशारी व चलाखपणा इतका दिसून आला कीं, पुढें त्याची बढतीच होत गेली. अखेरीस गव्हनर–जनरलासारख्या उच्च पदास चढून, सर्व हिंदुस्थानची एकसत्तात्मक राज्यव्यवस्था ह्या थोडक्याच वर्षांमागें खरडे घासणाऱ्या कारकुनाच्या हातांत पडली, व ती १६ वर्षेपर्यंत त्याच्या एकट्याच्याच हातांत होती. सामान्यतः क्षुद्र स्थितींतून इतक्या योग्यतेस चढल्यामुळें हेस्टिंग्ज हा कोणी प्रचंड बुद्धीचा मनुष्य असावा, असें वाचकांस वाटण्याचा संभव आहे, व साधारण माणसांपेक्षां त्याच्या अंगीं विशेष गुण होते ह्यांत शंका नाहीं; पण हा कालच असा होता कीं, साधारण कर्तृत्वशक्तीच्या माणसालासुद्धां, आपल्या अंगीं असलेल्या गुणांचें चीज करून दाखविण्याचे प्रसंग हम्मेश येत. इंग्लंडमध्यें कदाचित् ज्यांच्या तेजाचा विकास होण्यास अवकाश मिळाला नसता, अशा पुष्कळ लोकांस हिंदुस्थानांत येऊन जगाच्या इतिहासांत आपलें नांव अजरामर करण्याची सवड मिळाली. सुव्यवस्थित राज्यसत्तेखालीं धाडसी, अन्यायी किंवा दांडग्या लोकांची घातकी करामत सुफलहीन होते. अशा देशांत नांव मिळविण्यास त्या व्यवस्थेनें घालून दिलेल्या कायदेशीर मार्गाचें अवलंबन करणें भाग

पडतें; व असें करण्यास बुद्धीशिवाय दुसऱ्या गुणांचा फारसा उपयोग होत नाहीं. क्लाइव व वॉरन हेस्टिंग्ज हे इंग्लंडमध्यें असते, तर 'उत्पद्यंते विलीयंते' अशा असंख्य माणसांच्या वर्गांतून निघून वरच्या पण लहान वर्गांत आलेच असते असें खात्रीनें सांगतां येणार नाहीं. ह्या देशांत त्यांनीं जो पराक्रम केला तो निव्वळ त्यांच्या बुद्धिमत्तेचें फळ नव्हे. नुसत्या बुद्धीच्या जोरावर त्यांच्यानें असलीं अचाट कृत्यें करवलीं नसतीं. सुव्यवस्थित राज्यपद्धति चालू आहे अशा इंग्लंड किंवा दुसऱ्या कोणत्याहि देशांत जे निर्भर्त्सनीय अपराध म्हणून गणले जातात, व ज्यांबद्दल कदाचित् योग्य शासन मिळून, सर्व कुलाला कलंक लावण्यास ते कारणीभूत होतात अशा दुर्गुणांच्या साहाय्यानेंच विशेषत: त्यांनीं येथें प्रचंड कीर्ति संपादन केली, बिनदिक्कत अन्याय करण्याकडे मनाची प्रवृत्ति व दुसरें धाडस ह्या दोन विशिष्ट गुणांनींच त्यांच्यावर फार मोठे उपकार केले, व असें असणेंच अगदीं स्वाभाविक आहे. कारण, परराज्यावर दृष्टि ठेवून त्याचा अपहार करण्याची एकदां लालसा उत्पन्न झाली म्हणजे, मग तें संपादन करण्यास अशाच कुमार्गांचें अवलंबन केल्याशिवाय गत्यंतर नसतें. सत्वस्थ वृत्तीनें आपल्या देशाची सीमा वाढविण्याचे प्रसंग क्वचित्च येतात. थोरल्या बाजीराव साहेबांनीं बुंदेलखंडांत ज्याप्रमाणें राज्य संपादन केलें, अशा प्रामाणिकपणें मुलूख मिळविल्याचीं उदाहरणें इतिहासांत विरळा सांपडतील. मराठे लोकांनीं इंग्लिश लोकांसारखा अन्याय केलेला इतिहासांत कोठें दृष्टीस पडत नाहीं, ह्याचा आपणांस अभिमान वाटला पाहिजे; पण मराठ्यांस नीच मार्गाचें अवलंबन करण्याचें मुळींच प्रयोजन नव्हतें. आपल्या अनिवार्य राज्यतृष्णेला निरपराधी राजांचें स्वामित्व बळी घालण्याची त्यांची इच्छाच नव्हती. तरवार उचलण्यांत त्यांचा हेतु दुसऱ्याला लुबाडण्याचा नसून, फक्त स्वतःचें व स्वतःच्या धर्माचें, जुलमी मोंगलांच्या छळापासून संरक्षण करणें हा होता. स्वसंरक्षणार्थ त्यांनीं जरी दोषास्पद उपाय योजिले असते, तरी ते क्षम्य झाले असते; पण त्यांनीं तसें केलें नाहीं. ज्यांच्यापासून त्यांना त्रास पोंचला नाहीं, त्यांच्या वाटेस ते आपण होऊन कधीं गेले नाहींत. ज्या महाभारताच्या वाचनानें शिवाजीच्या मनांत गतवैभव परत मिळविण्याविषयीं स्फूर्ति झाली, त्याच महाभारतांत हजारों वर्षांच्या मागें –

विदुरानें धृतराष्ट्र राजाला केलेला "एष धर्मः परमो यत्स्वकेन राजा तुष्येन्न परस्वेषु गृध्येत्" हा उपदेश शिवाजीच्या अनुयायांनीं पाळला तर त्यांत आश्चर्य नाहीं.

हेस्टिंग्ज हा मोठा धूर्त, हुशार, प्रसंगास न डगमगणारा असा होता. त्याचें धारिष्ट इतकें विलक्षण होतें कीं, इंग्लंडांत वरिष्ट अधिकाऱ्यांकडून सुटलेले हुकूम गुंडाळून ठेवून हिंदुस्थानचा राज्यकारभार तो मनसोक्त चालवीत असे; तथापि दिवसेंदिवस राज्याची सीमा वाढवून कोट्यवधि रुपये तो इंग्लंडास पाठवीत असल्यामुळें, ते अधिकारी त्याच्या अन्यायाकडे व जुलमाकडे कानाडोळा करीत असत. अखेरीस, इ. स. १७८२ सालीं त्यानें आपल्या जागेचा राजीनामा दिला; व इंग्लंडमध्यें परत येतो आहे तोंच, पार्लमेंटनें त्याच्यावर आरोप ठेवून त्याची चौकशी करण्याचें ठरविलें. ही चौकशी बर्कच्या परिश्रमांचें फल होय. बर्कनें ह्या कामांत जें मन घातलें, त्यावरून त्याचा त्या "प्रतिष्ठित अपराध्या" विषयीं खासगी द्वेष असला पाहिजे, किंवा त्याचा मोठेपणा सहन न होऊन त्याच्याविषयीं त्याच्या मनांत मत्सर उत्पन्न झाला पाहिजे, असें म्हणून बर्कच्या सद्धेतूंविषयीं पुष्कळ लोक शंका घेतात. पण क्षणभर विचार केला असतां, हा आरोप किती निराधार आहे हें सहज दिसून येईल. पूर्व परिचय व व्यवहार ह्यांशिवाय एकानें दुसऱ्याचा द्वेष करणें ही कल्पनाच संभवत नाहीं. अल्पवयांत स्वदेश सोडून बहुतेक आयुष्य वॉरन हेस्टिंग्जनें हिंदुस्थानांत घालविल्याकारणानें त्याचा आणि बर्कचा संबंधच नव्हता. द्वेष हा एक मनोविकार आहे; व तो जागृत होण्यास कांहीं तरी कारणें लागतात. अशा प्रकारचीं कारणें दाखविण्याचा कोणी प्रयत्नहि केला नाहीं, तेव्हां बर्कला द्वेषबुद्धीनें पछाडलें होतें, असें म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. दुसरा आरोप, ह्यापेक्षांहि फार भयंकर आहे; परंतु पहिल्याप्रमाणेंच तो निराधार व पोकळ आहे, ह्याविषयीं विचाराअंतीं खातरी होईल. प्रथम, हिंदुस्थानांत हेस्टिंग्जनें कांहीं नांव गाजविलें एवढ्याच गोष्टीमुळें बर्कच्या मनांत मत्सर उत्पन्न झाला, असें समजावें, तर, हेस्टिंग्जशिवाय खुद्द इंग्लंडांत त्याच्या डोळ्यांदेखत पाठीमागून येऊन ज्यांनीं अलौकिक कीर्ति संपादन केली, त्या सर्वांबद्दल तो सार-

त्याच मत्सरी असला पाहिजे; परंतु असें म्हणण्याचें धाडस त्याच्या शत्रूंनाहिं करवणार नाहीं. फॉक्स, शेरिडन् ह्यांच्याशीं त्याचा जो संबंध होता, त्यावरून तर ही गोष्ट चांगलीच स्पष्ट होते. दुसरें असें कीं, हा परोत्कर्षासहिष्णुतेचा आरोप करतांना दोन गोष्टी गृहीत धराव्या लागतात. एक तर बर्कचा उत्कर्ष मुळींच नसला पाहिजे; किंवा तो हेस्टिंग्जपेक्षां कमी असला पाहिजे; परंतु वास्तविक प्रकार अगदीं उलट आहे हें सांगणें नकोच. अन्याय व जुलूम करून निरपराधी व जात्याच शांत स्वभावाच्या अशा हिंदी लोकांना छळणारा हेस्टिंग्ज कोणीकडे आणि आपल्या वाक्चातुर्यानें व लेखनपाटवानें राजनीतीचे व्यापक० सिद्धांत घालून मानवी ज्ञानांत भर घालणारा, तसेंच अराजकारणी पुरुषांनीं नागवलेल्या लोकांच्या हक्कांची व सुखाची पायमल्ली झालेली पाहून विव्हल होणारा बर्क कोणीकडे ? नुसत्या बुद्धिमत्तेच्या जोरावर इंग्लंडमध्यें बर्कसारख्या मनुष्याचा जितका उत्कर्ष होणें शक्य होतें, तितका तो झाला होता. क्षणभर अशीहि कल्पना केली कीं, हेस्टिंग्ज याची कीर्ति उज्वल होती; तरी हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, दोघांचेहि कीर्तिमंदिरांत जाण्याचे मार्ग निर-निराळे होते. त्यामुळें एकास दुसऱ्याविषयीं मत्सर बाळगण्याचें प्रयोजन नव्हतें. बर्कच्या स्वभावाची ज्याला यत्किंचित् माहिती असेल, त्याला तर असल्या क्षुद्रमनोविकारांना त्या निर्मळ अंतःकरणांत अवकाश मिळाला असेल अशी शंकासुद्धां येणार नाहीं. आतां एवढें खरें आहे कीं, बर्कच्या अनुयायांनीं त्याला ह्या कामीं जें पाठबळ दिलें, त्यांत त्यांचा एक राजकारणी हेतु होता. मागें सांगितलें आहे कीं, फॉक्सनें पार्लमेंटमध्यें इंडिया बिल आणलें होतें, तें पास न झाल्यामुळें त्यावेळीं त्यांना आपला अधिकार सोडून द्यावा लागला होता. त्याची तळमळ त्यांच्या मनांतून अद्याप गेली नव्हती. ह्यासमयीं अधिकारारूढ असलेल्या प्रधानमंडळानें हेस्टिंग्जच्या वर्तनाकडे दुर्लक्ष करून त्याला एकप्रकारें साहाय्यच केलें होतें. तेव्हां गव्हर्नर-जनरलचे अपराध उजेडांत आणून प्रधान-मंडळाची नाचक्की करण्याचा हा एक अप्रत्यक्ष उपायच होता. बर्क तरी एक त्यांच्यापैकीं असून तो मोठा राजकार्यधोरणी मनुष्य होता. तेव्हां त्याच्या मनांत वरील विचार मुळींच आले नसतील असें म्हणतां येत नाहीं; परंतु

त्याच्यामध्यें आणि तत्पक्षीयांमध्यें भेद हा होता कीं, त्याच्या एतद्विषयक मानसिक प्रवृत्तीला मुख्य व प्रबळ कारण पक्षकलह नसून, जुलमी आचरणाविषयीं तिटकारा होय. इंडिया बिलाच्या वेळेस त्याच्या पक्षाचा व विशेषतः फॉक्सचा जो अपमान झाला, त्यामुळें त्याला आपल्या पक्षाचें व त्यांतल्यात्यांत मुख्यतः फॉक्स, शेरिडन वगैरे प्रमुख मंडळीचें ह्या उदार कार्याला पूर्ण अनुमोदन व पाठबळ मिळालें. ह्या मंडळीचा मात्र मुख्य उद्देश प्रधानमंडळाला होईल तर हाणून पाडण्याचा होता. हिंदुस्थानच्या लोकांविषयीं त्यांना तितपतच काळजी होती. बर्कच्या सद्धेतूविषयीं आणखी जर पुरावा पाहिजे असेल, तर तो हा आहे कीं, कंपनीच्या हिंदुस्थानांतील राज्यकारभाराविषयीं तपास करतांना प्रथम जी जी मंडळी त्याच्या नजरेखालीं येऊं लागली, त्या सर्वांना झाडून न्यायदेवतेपुढें जबाब देण्याकरितां ओढण्याचा त्याचा बेत होता; परंतु पुढें हेस्टिंग्जपर्यंत आल्यावर त्याला असें आढळलें कीं, बेनफील्ड, इंपे वगैरे सर्व एकाचेच मुनीम आहेत. तेव्हां त्यांना सोडून त्यांच्या मुख्य नायकालाच गांठण्याचा त्यानें बेत केला.

इ० स० १७८७ सालीं हेस्टिंग्जच्या अपराधांची चौकशी करण्याची सूचना कॉमन्स सभेंत पसार झाल्यावर, फिर्यादीतर्फे काम चालविण्याकरितां एक कमिटी नेमण्यांत आली. अपराध्याच्या अधिकाराला व योग्यतेला साजेल असाच चौकशीचा थाट होता. गव्हर्नर–जनरल जेथें आरोपी, तेथें सामान्य न्यायसभेंत त्याच्या अपराधांची चौकशी झाली नाहीं हें स्वाभाविकच आहे. कॉमन्स फिर्यादी, गव्हरनर–जनरल आरोपी, आणि लॉर्ड्स न्यायाधीश, ह्या कारणानें ह्या खटल्याला विशेष महत्व आलें, ह्यांत आश्चर्य नाहीं. स्वतः राजा, राजपुत्र व राजघराण्यांतील इतर मंडळी चौकशीच्या वेळीं हजर असत. ह्या वेळेस लॉर्ड्स लोकांच्या सभागृहाची गॅलरी बायकापुरुषांनीं गच्च भरून गेली होती. ह्या विशिष्ट प्रसंगीं लॉर्ड्स सभेंतील बहुतेक सभासद हजर होते. इ. स. १७८५ त ज्या चौकशीस सुरुवात झाली, तिचा निकाल १७९५ त झाला. अखेरीस इ० स० १७९६ च्या एप्रिलच्या तेविसाव्या तारखेस कोणताहि आरोप शाबीत नाहीं असा निकाल देण्यांत आला; आणि वॉरन हेस्टिंग्ज निर्दोष ठरला.

ह्या महत्कार्यासाठीं बर्कनें जें नीतिधैर्य व न्यायप्रेम प्रदर्शित केलें, त्याची योग्य कल्पना होण्यास तत्कालीन परिस्थितीचें साद्यंत चित्र वाचकांपुढें मांडणें जरूर आहे. ज्याच्या अपराधांची व गुन्ह्यांची चौकशी करून ते जगापुढें आणण्याचा बर्कआदिमंडळींनीं संकल्प केला होता, तो सामान्य मनुष्य नसून, बहुतेक एका युरोपखंडाची जागा व्यापून टाकण्याएवढ्या अवाढव्य देशाचें वस्तुतः सार्वभौमत्व ज्याच्याकडे पूर्वपुण्याईनें आलें होतें, असा तो वैभवसंपन्न पुरुष होता. हिंदुस्थानांत घ्या किंवा इंग्लंडांत घ्या; दोन्ही देशांत त्याचें वजन व दर्जा मोठा होता. कंपनीचें त्याला पूर्ण पाठबळ होतें. कारण त्यानें कंपनीला चांगला फायदा करून दिला होता, व तद्वारा सर्व इंग्लिश राष्ट्राचें वैभव पसरण्यास तो मुख्यतः कारणीभूत असल्यामुळें, व त्याच्या सर्व कृत्यांचा अखेर परिणाम इंग्लिश लोकांस फायदेशीरच असल्यामुळें, ज्या साधनांनीं त्यानें राज्य काबीज केलें, त्या साधनांची चौकशी करण्यास ते अर्थातच तयार नव्हते अधिकाराच्या जोरावर त्यानें स्वतःस धनसंपन्न करून घेतलें होतें; इतकेंच नव्हे, तर दुसऱ्या शेकडों लोकांवर त्यानें उपकार केले होते. खुद्द पार्लमेंटमध्यें असा उपकृतसमूह बराच होता. व पार्लमेंटच्या बाहेरहि मोठमोठ्या हुद्यांवर असलेल्या पुष्कळ लोकांत कृतज्ञताबुद्धीनें त्याच्या विरुद्ध ब्र काढण्याची ताकद नव्हती. आणखी त्यांत विशेष हें कीं, राजाची त्याच्यावर मर्जी होती, ह्यावरून हेस्टिंगचें वजन देशांत किती होतें ह्याची कल्पना होईल.

ह्यापेक्षांहि आरोप शाबीत करण्याचें काम फार दुष्कर होतें. हिंदुस्थान व इंग्लंड ह्यांमध्यें हजारों कोस अंतर व त्यावेळीं हल्लींप्रमाणें दळणवळणाचा मार्ग सुगम नव्हता. हेस्टिंग्जच्या जुलमी कृत्यांना बळी पडलेल्या एतद्देशीय लोकांकडूनच खरा पुरावा मिळण्याची आशा; पण तत्कालीन परिस्थितीकडे पाहतां ही गोष्ट बहुतेक असंभवनीयच होती. एवढ्या मोठ्या मनुष्याविरुद्ध उघडपणें साक्ष देण्यास तज्जातीय लोक स्वाभाविकपणेंच नाखुष होते. शिवाय हिंदुलोकांच्या चालीरीती, स्वभाव, वगैरेविषयीं इंग्लिश लोकांत त्यावेळीं संपूर्ण अज्ञान पसरलेलें होतें. मुख्य प्रधान पिट ह्याच्या मनाचा कलहि प्रथम हेस्टिंग्जला अनुकूल असाच

होता. अशा प्रकारें सगळी स्थिति प्रतिकूल असून व यशःप्राप्तीविषयीं मनोदेवता आश्वासन देत नसून, एवढेंच नव्हे तर ह्याविषयीं उलट द्वेष्यतेस पात्र होण्याचा बळकट संभव असूनहि त्यानें जें जें परोपकारकृत्य अंगीकारलें, त्यांत त्याची अवर्णनीय निस्पृहता स्पष्ट व्यक्त होते. ह्या कामांत इंग्लिश लोकांकडून साहाय्य मिळेल, ह्याची त्यास अगोदरपासूनच चांगली अटकळ होती; परंतु शुद्ध हेतूच्या मनुष्याची हरएक तऱ्हेनें अपेष्टा करण्याचा प्रयत्न त्यांजकडून होईल, असें त्यास वाटलें नसेल. चौकशी चालू असतां पुस्तकांतून, वर्तमानपत्रांतून, छापील हस्तपत्रकांतून, गद्यपद्यरूपानें, त्याचप्रमाणें खासगी भाषणांतून किंवा सभांतून बर्कवर कुत्सित निंदांचा भडिमार एकसारखा चालू होता. एकाद्या वयस्थ मनुष्यानें जर त्यावेळचे लेख पाहिले, तर त्यांवरून आरोपी कोण व फिर्यादी कोण, हें ओळखून काढतां येणार नाहीं. त्याच्या स्वतःच्या कृत्यांत निराधार दोष काढूनच लोक थांबले नाहींत, तर त्याच्या साथीदारांच्या हातून झालेल्या चुकीबद्दल आणि लॉर्ड लोकांसमोर चौकशी चालू असल्याकारणानें ती पुरी होण्यास फार वेळ लागला असें असतांहि त्याबद्दल बर्कच्या माथींच दोष लादला जात असे. स्वतः वॉरन हेस्टिंग्जनें, बर्कविरुद्ध लोकांचीं मनें कलुषित करण्याकरितां करवेल तितका प्रयत्न केला; व एवढ्याकरितां म्हणून, त्यानें वीस हजार पौंड खर्च केले, ही गोष्ट फारच चमत्कारिक रीतीनें पुढें बाहेर आली. ज्याच्या मार्फत असले व्यवहार चालत असत तो स्कॉट नांवाचा मनुष्य आणि एक छापखानेवाला ह्यांच्या दरम्यान तंटा उपस्थित झाला. ह्या आपसांतल्या मूर्खपणाच्या तंट्यांत, छापखानेवाल्याला झालेल्या पोंचेची याद पुढें आली, त्यांत, ' बर्कविरुद्ध अमुक पत्रें ' पैसे अमुक; " बर्कच्या वर्तनावर दोन शब्द " पैसे अमुक; " बर्कच्या प्रामाणिकपणावर आक्षेप " अमुक पैसे वगैरे तपशील होता. अशा रीतीनें द्रव्याच्या आशेनें, श्लाघ्य–अश्लाघ्य हवा तो मजकूर आपल्या पत्रांत लिहून प्रसिद्ध करणारीं बुभुक्षित व भाडोत्रीं पत्रें इंग्लंडांत पुष्कळ होतीं. चौकशी चालू असतां बर्कला निरुत्साह करण्याकरितां पुष्कळ निंदाप्रचुर पत्रें दररोज त्याला येत; परंतु तीं वाचून तो मुकाट्यानें खिशांत ठेवी.

हेस्टिंग्ज अखेरीस दोषमुक्त झाला; तरी त्याच्या अपराधांविषयीं बर्कची शेवट-पर्यंत खात्री होती व दुसऱ्या कोणत्याहि विकारवश नसलेल्या मनुष्याला तसेंच वाटलें पाहिजे. कायद्याच्या कांहीं विशिष्ट अडचणींमुळें अपराधी सुटला; पण तेवढ्यामुळें त्यानें केलेल्या अपराधाचें सत्यत्व कमी होत नाहीं; किंवा मेकॉलेनें म्हटल्याप्रमाणें राजकीय दुष्कृत्यांबद्दल तज्जातीय लोक असल्या अपराध्यास गुन्हेगार ठरवितील असें होणें मनुष्यस्वभावाविरुद्ध आहे. हेस्टिंग्जचीं कृत्यें कितीहि निंद्य असोत, पण अशा कृत्यांनींच इंग्लिश राष्ट्राचें वैभव वृद्धिंगत झालें होतें. असल्याच उलाढालींनीं, एका अफाट देशाचें आधिपत्य त्यांस प्राप्त होऊन अपरंपार संपत्तीचा जबरदस्त ओघ पूर्वेकडून पश्चिमेस वाहूं लागला होता. ह्या अभिमानोत्पादक स्थितीकडे पाहून हर्षभरित होणें, व अशी स्थिति ज्या कारणांमुळें घडून आली त्या कारणांकडे—मग तीं कितीहि उद्वेगजनक असोत—दुर्लक्ष्य करणें हें मानवीस्वभावाच्या दुर्बलतेचें लक्षण आहे. म्हणून नेहमींच्या सामान्य खटल्यांच्या चौकशीमध्यें, न्यायाधीश केवढाहि निःपक्षपाती असला तरी, जेव्हां स्वराष्ट्रास फायदेशीर होणाऱ्या राजकीय दुर्वर्तनाबद्दल एखाद्यावर आरोप करण्यांत येतो, त्या वेळेस न्यायाधीशाच्या निःपक्षपातीपणावर कोणीहि विश्वास ठेवीत नाहींत. हेस्टिंग्जच्या चौकशीचा निकाल होण्यास दहा वर्षें लागलीं; तथापि चौकशीचें खरें काम असें एवढ्या मुदतींत फारच थोडे दिवस चाललें. दररोज चार पांच तासांप्रमाणें जर न्यायाधीश सतत बसले असते, तर दोनच महिन्यांत सर्व निकाल झाला असता.

कामास खरी सुरवात इ० स० १७८८ च्या फेब्रुवारीच्या १५ तारखेस सकाळीं आठ वाजतां झाली. सभागृहांत अतिशय गर्दी झाली होती. १६४ लॉर्ड त्या दिवशीं हजर होते. बर्क उठल्याबरोबर सर्वांचे डोळे त्याच्याकडे लागले. "ह्या देशाच्या कॉमन्स लोकांच्या आज्ञेवरून, वॉरनहेस्टिंग्जचा फिर्यादी ह्या नात्यानें मी येथें उभा राहिलों आहें;" असें म्हणून त्यानें आपल्या भाषणास सुरवात केली. तें जवळ जवळ अडीच तास चाललें होतें. तें गंभीर, नेमस्त पण हृदयद्रावक असून, त्यांतील प्रत्येक वाक्य व विचार हीं अगदीं समुचित होतीं. ह्या भाषणाच्या योगानें ज्या लोकांत गव्हर्नरजनरलच्या अपराधांविषयीं गाढ

अज्ञान वसत होतें, त्या लोकांना त्यानें त्या अपराधांच्या उगमाविषयीं व त्यामुळें हिंदुस्थानच्या लोकांस सोसाव्या लागणाऱ्या संकटांविषयीं पूर्ण माहिती करून दिली व ह्या सर्व खटल्याला त्यानें असें कांहीं विलक्षण स्वरूप दिलें कीं, अगोदर तत्संबंधीं परिचित असलेल्या लोकांनासुद्धां आश्चर्य वाटलें. दुसरे दिवशीं, म्हणजे सोळाव्या तारखेस न्यायाधिशांची संख्या १७५ पर्यंत वाढली. त्या दिवशीं बर्कचें सारखें साडेतीन तास भाषण चाललें होतें, त्यांत त्यानें "नीति ही देशपरिच्छिन्न असते" ह्या तत्वावर कडक टीका केली. हेस्टिंग्जचें व त्याच्या पक्षाचें असें म्हणणें होतें कीं, नीतितत्वें कांहीं एका विशिष्ट हवेंतच लागू पडतात, आणि म्हणून यूरोपमध्यें ज्यांना आपण लांच खाणें आणि जुलूम मानतों, तीं कृत्यें हिंदुस्थानांत करण्यास कांहीं हरकत नाहीं. हिंदू लोक म्हणजे पशूंसमान; त्यांच्याबरोबर व्यवहार करतेवेळेस नीतिमत्तेचीं उदात्त तत्वें प्रसंगोपात्त गुंडाळून ठेवून स्वेच्छाचाराला यथेच्छ विहार करण्यास सोडण्यास प्रत्यवाय नाहीं, असा हेस्टिंग्जच्या वेळचा समज आजहि थोडाबहुत कायम आहे. त्याचप्रमाणें हेस्टिंग्जचें म्हणणें असें होतें कीं, हिंदुस्थानांतील लोकांच्या रीतीभातीच अशा आहेत कीं, तेथें अनियंत्रित राज्यसत्तेचा अंगीकार केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. हें म्हणणें बर्कनें मोठ्या शिताफीनें व सप्रमाण खोडून काढलें. तो म्हणाला, "हेस्टिंग्जला अशा प्रकारचा अधिकार मिळाला तरी कोठून ? ईस्ट इंडिया कंपनीकडून किंवा राजाकडून मिळाला असें मानावें तर प्रथम त्यांच्याजवळ असेल तर ते त्याला देतील. पार्लमेंटानें दिला असें म्हणावें तर, तेंहि शक्य नाहीं. कारण, अशा प्रकारचा जुलमी अधिकार ब्रिटिश राज्यव्यवस्थेला अगदीं अपरिचित आहे." नंतर त्यानें कुराणावरून असें सिद्ध केलें कीं, इंग्रजी कायद्याप्रमाणेंच मुसलमानी कायदे जुलमी राज्यव्यवस्थेला प्रतिकूल आहेत. ह्याहिपेक्षां त्याचे सर्वव्यापक सिद्धांत विशेष वर्णनीय होते व अशा प्रकारच्या सामान्य सिद्धांतांमुळेंच त्याच्या भाषणांना कायमचें महत्त्व आलें आहे. "कोणत्याहि देशांतील सत्ता किंवा अधिकार ह्याविषयीं बोला, म्हणजे मी तुम्हांला सांगतों कीं, त्या शब्दांत संरक्षणाचा अन्तर्भाव होतो. न्यायाधीश शब्द उच्चारल्याबरोबर त्याच्या पाठोपाठ मालमत्तेची कल्पना आलीच. कोणतेंहि राज्य मला

तुम्हीं दाखवा. तेथें प्रजेच्या हिताची केलेली व्यवस्था तुम्हांस दाखवितों. ” ह्याप्रमाणें उपोद्घातादाखल बर्कचें पांच दिवस सारखें भाषण झालें. नंतर फॉक्स, शेरिडन वगैरेंचीं भाषणें झालीं. बर्कचें लांचाच्या आरोपावर पुनः फारच जोरदार भाषण झालें. फिर्यादीतर्फे पुरावा संपल्यावर आरोपीची तक्रार होऊन उत्तरादाखल पुनः बर्कचें नऊ दिवस भाषण झालें.

एवढा कालक्षेप, एवढे श्रम, एवढा द्रव्यव्यय करून, अखेरीस हेस्टिंग्ज निर्दोष ठरला, हें इंग्लिश लोकांच्या स्वभावास व राज्यपद्धतीस अनुरूपच झालें. डुप्लेचे अपराध हेस्टिंग्जच्या अपराधांशीं ताडून पाहतां फारच सौम्य होते; पण फ्रेंचलोकांत न्यायबुद्धि बरीच जागृत असल्यामुळें व कावेबाजपणा जरा कमी असल्याकारणानें बिचाऱ्या डुप्लेला हालअपेष्टांत व कष्टमय स्थितींत काळ काढावा लागला. इकडे हेस्टिंग्जची स्थिस्ती पहा ! त्याच्यावर आलेलें संकट टळलें इतकेंच नाहीं, तर त्याच्या देशबंधूंनीं त्याची अवशिष्ट संसारयात्रा सुखावह करण्याचीहि तजवीज केली ! हिंदुस्थानांतल्या गरीब प्रजेजवळून त्यानें उकळलेले सर्व पैसे ह्या खटल्याच्यापायीं खर्च झाले ही तरी एक अप्रत्यक्ष रीतीनें शिक्षाच झाली म्हणण्यास हरकत नाहीं. ऐतिहासिक दृष्टया तर ह्या खटल्याचें महत्त्व फारच आहे. हेस्टिंग्जच्या अपराधांची किंवा कृत्यांची जर चौकशी झाली नसती, तर ह्या गव्हनरजनरलनें घालून दिलेला कित्ता जास्त चांगल्या रीतीनें गिरविण्यास म्हणजे कमी मंडळी मिळाली असती असें नाहीं. हेस्टिंग्जच्या पूर्वीं जर क्लाइव्हच्या नीच कृत्यांकडे इंग्लिश न्यायदेवतेची दृष्टि गेली असती, तर कदाचित ह्या प्रचंड खटल्याचाहि प्रसंग आला नसता. क्लाइव्हच्या कृत्यांचें प्रोत्साहन मिळून ह्या अन्यायप्रिय गव्हर्नरानें अंगावर रोमांच उभे करण्यासारखीं निर्दय कृत्यें केलीं; परंतु ह्या कृत्यांचा परिस्फोट व त्याचा अखेर परिणाम डोळ्यांपुढें असल्यानें पाठीमागून येणाऱ्या गव्हर्नरजनरलांना अन्याय करण्याची पद्धति बदलावी लागली. प्रत्यक्ष जुलूम करण्याचें सोडून ते कायदेशीर जुलूम करूं लागले. लॉर्ड डलहौसीची कारकीर्द व १८५७ सालचें बंड, हीं ज्यांच्या स्मरणांतून अद्यापि लुप्त झालीं नसतील, त्यांना हा कायदेशीर जुलूम कोणत्या प्रकारचा होता हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. ह्यावरून असें स्पष्ट होतें कीं हेस्टिंग्जची जरी ह्या आरोपांतून मुक्तता झाली, तथापि त्यांत कांहीं विशेष नाहीं.

एका मोठ्या अधिकाऱ्यावर आरोप ठेवून त्याच्या कृत्यांची चौकशी होणें हेंच फार महत्त्वाचें होतें.

चौकशीच्या चालकांनीं आपल्यावर सोंपविलेले निरनिराळे आरोप सिद्ध करण्याचें काम उत्कृष्ट रीतीनें तर बजावलेंच पण त्या वेळेस त्यांच्या उज्ज्वल व आवेशयुक्त वक्तृत्वाच्या लहरी ज्या उसळल्या त्यांनीं एका प्रसिद्ध इतिहासकाराच्या म्हणण्याप्रमाणें भोंवतालच्या भिंतीहि सकंप झाल्याशा दिसल्या. फॉक्स, शेरिडन, विंडहॅम वगैरे मंडळींनीं आपल्या वक्तृत्वाची मर्यादा पाहण्याचाच निश्चय केला होता असें दिसलें; परंतु बर्कच्या भाषणांत कांहीं विशेष स्वारस्य होतें. ह्याचें कारण असें कीं इतरांपेक्षां त्यानें ह्या विषयाकडे अधिक लक्ष दिलें होतें. ह्या कामांत चौकशी करण्याच्या आवश्यकतेविषयीं त्यानेंच लोकांची खात्री केली होती. त्याचप्रमाणें ज्या वेळेस हिंदुस्थानासंबंधीं कोणास कांहीं माहिती नव्हती, व ती करून घेण्याची कोणीहि परवा करीत नसे, त्या वेळीं सर्व देशांत एका बर्कलाच ह्या देशाची इत्थंभूत हकीकत ठाऊक होती. त्याचीं प्रास्ताविक भाषणें ऐकून त्याच्या स्नेह्यांना देखील त्याच्या असामान्य बुद्धीचें आश्चर्य वाटलें. देवीसिंगाच्या निष्ठुरतेचें वर्णन करीत असतां श्रोत्यांच्या मनावर जो परिणाम घडला त्याचें वर्णन करणेंहि अशक्य आहे. ह्या भयोत्पादक वर्णनानें स्त्रीपुरुषांच्या मनोवृत्ति क्षुब्ध होऊन त्या क्रूर कृत्यांच्या कर्त्याविषयीं शापपर उद्गार निघूं लागले. कित्येक स्त्रियांच्या नेत्रांतून त्या वर्णनानें अश्रुधारा वाहविल्या व कित्येक तर तेथेंच मूर्छित होऊन पडल्या. स्वतः बर्कच्या मनोवृत्ति कमी पर्याकुल झाल्या नव्हत्या. त्या निर्दय कृत्यांचें चित्र काढीत असतां त्याला इतका गहिंवर आला कीं, पुढें एक शब्दसुद्धां त्याच्यानें बोलवेना, व पुनः पुनः बोलण्याचा प्रयत्न करीत असतांहि तो सफल होईना. शेवटीं त्या दिवसाचें काम तहकूब ठेवण्याची सूचना करून राजपुत्रानें ह्या स्थितींतून बर्कची सुटका केली. येथवर ऐकणारांच्या अंतःकरणावर काय परिणाम झाला हें सांगितलें; पण ज्यानें अशीं अघोर कृत्यें केलीं, व जीं करतेवेळेस त्याचें अंतःकरण यत्किंचितहि डगमगलें नाहीं, त्याच कठोर अंतःकरणाच्या मनुष्याची स्थिति, आपल्या कृतीचें स्वरूप दुसऱ्याच्या तोंडांतून ऐकून काय झाली हें पाहिलें असतां, बर्कच्या वक्तृत्वनैपुण्याची बालंबाल खात्री

झाल्याशिवाय रहावयाची नाहीं. तो म्हणतो— " अर्धा तासपर्यंत आश्चर्यानें थक्क होऊन मी त्या वक्त्याकडे बघत तटस्थ उभा राहिलों, आणि त्यावेळेस खरोखरच सर्व जगांत माझ्या इतका नीच अपराधी कोणी नसेल असें माझें मलाच वाटूं लागलें. " वक्तृत्व ह्याच्यापेक्षां अधिक काय करूं शकणार? ह्या गोष्टीचा बर्कला मरेपर्यंत फार मोठा अभिमान वाटे. चौकशीला सुरवात झाली त्यावेळेस त्याचें वय जवळ जवळ साठ वर्षांचें होतें. अशा उतार वयांत एवढ्या जबाबदारीचें व श्रमातिशयाचें काम लोकमताविरुद्ध हातीं घेणें खरोखरच भूषणास्पद आहे; पण त्यावेळेस हिंदुस्थानांतील लोकमत अस्तित्वांतसुद्धां नव्हतें; अर्थात् बर्कला त्याचें पाठबळ किंवा त्यापासून उत्तेजन मिळण्याचा संभवच नव्हता. ह्या गोष्टींचा विचार केला असतां बर्कच्या कर्तबगारीची महती ध्यानांत येईल. बर्कच्या भाषणाचे कांहीं मासले येथें देतों, त्यावरून त्याचें वाक्चातुर्य दिसून येईल.

' जेंगिसखान, कौलीखान आणि तामरलेन ह्यांनीं म्हणे ह्या मनुष्यापेक्षां ( वॉरन हेस्टिंग्जपेक्षां ) दहा हजार पटीनें अधिक माणसें लढाईंत मारलीं ! अरेरे ! हे लोक वेडे तर झाले नाहींतना ! अपराध घडल्यामुळें ह्यांना भ्रम तर झाला नसेलना ! जेंगिसखान, कौलीखान अथवा तामरलेन ह्यांच्याबरोबर ह्या मनुष्याची तुलना करण्याचा आमचा इरादा होता असें ह्यांना वाटलें होतें काय? एका खरडेघाशा कारकुनाची—बैलांचीं कंत्राटें घेण्याऱ्या भामट्याची—जगांतील विजयी योध्यांशीं तुलना ! तो ( हेस्टिंग्ज ) वाघ आणि सिंह होता असें आम्हीं कधींहि म्हटलें नाहीं. छे ! आम्हीं म्हटलें, तो खार आणि उंदीर होता. सांथीच्या योगानें ज्याप्रमाणें देशच्या देश उध्वस्त होऊन जातात, त्याच नमुन्याची ह्याची कृति आहे असाच आमच्या म्हणण्याचा आशय होता. आम्हीं म्हटलें कीं, बैलांचा व्यापार करणाऱ्या एका ठकाच्या हातांत अधिकार दिल्यावर तो जगांतील सर्व सिंह आणि वाघ ह्यांपेक्षांहि जास्त नुकसान करूं शकेल. आपल्याला ठाऊक आहे कीं, एकेक टोळ जरी हातानें तेव्हांच चिरडून टाकण्यासारखा असला तरी सर्व टोळ मिळून एकदां कां धाड देशावर आली, म्हणजे ती जेंगिसखान किंवा तामरलेन ह्यांपेक्षांहि तो देश जास्त उजाड करील. फॅरोहाचा गर्वापहार करून त्याला लाजविण्याचें जेव्हां ईश्वराच्या मनांत आलें, तेव्हां आपला

हेतु सिद्धीस नेण्याकरितां त्यानें सिंह किंवा व्याघ्र ह्यांचा उपयोग केला नाहीं; तर देशांत जाऊन नासधूस करण्याकरितां उंदीर, घुशी आणि बेडूक ह्या जातीचे किळस येण्यासारखे ओंगळ प्राणी पाठविले. सरदारहो ! ह्याचा आणि तामरलेननें नव्वद हजार लोकांचीं डोकीं मारून त्यांचे मनोरे बांधले वगैरे जें आपण आतां ऐकलेंत, ह्याचा विचार करा. ”

हेस्टिंग्जतर्फे फिर्यादी पक्षावर असा एक आरोप करण्यांत आला होता कीं, फिर्यादीपक्षानें आरोपीला दुःख, गैरसोय व त्रास देण्याच्या उद्देशानें फिर्यादीचें काम मुद्दाम लांबणीवर टाकलें. ह्या आक्षेपास वर्कनें खालीलप्रमाणें उत्तर दिलें.

“ हा आरोप ऐकून मला आश्चर्य वाटलें नाहीं, हें मी कबूल करतों. मनुष्य-स्वभावाच्या उतावीळपणाचा दाखला जेव्हांपासून मिळतो, तेव्हां पासून तों तहत आजपर्यंत अशी तक्रार ऐकूं येते कीं, क्रौर्य आणि जुलूम ह्यांची चाल झपाट्याची असून तद्विनाशी न्यायदेवतेची गति मात्र अगदी मंद असते. कांहीं अंशीं ह्याचें कारण मानवी व्यापारांची विशिष्ट स्थिति होय. कारण लोभ, महत्त्वाकांक्षा आणि सूड ह्यांची झडप अनिवार्य व घातक मनोविकारांना वळी पडलेल्या प्राण्यावर जशी जोरानें पडते, तशी अर्थातच न्यायदेवतेची स्थिति असणें शक्य नाहीं. कारण ती जात्याच सावध, चौकस, अनुकूलप्रतिकूल गोष्टींचा विचार करणारी, स्वतःविषयीं सुद्धां शंकायुक्त आणि अतिशय नीच अपराध्याचाहि आपल्या हातून अपराध घडेल ह्याविषयीं भीति बाळगणारी असते. ह्या दृष्टीनें पाहतां अपराध व न्याय ह्यांमध्यें फारच फरक आहे. न्यायदेवतेचा खरा अंमल वर्तमानकाळीं नसून भविष्यकाळीं जास्त होतो. ह्याकरितां पुढें होणाऱ्या परिणामांकडे जर आपण लक्ष दिलें नाहीं, तर कायदे व न्यायसभा ह्यांच्या तर्फेनें बोलणेंहि आपणांस कठीण पडेल.ह्या खटल्याची चौकशी आपल्याला किंवा आम्हांला लवकर संपवितां येणार नाहीं; परंतु ह्या होत असलेल्या विलंबाबद्दल आरोपीकडे सानुकम्प दृष्टीनें पाहण्यास आम्हांला वारंवार सांगण्यांत येतें; त्यावर माझें असें म्हणणें आहे कीं, गुन्हेगाराविषयीं आमच्या मनांत कधींहि द्रव उत्पन्न व्हावयाचा नाहीं. खोट्या व दांभिक सद्गुणांचा आम्हांला बिलकुल अभिमान नाहीं; व आमचा असा समज आहे कीं, ज्यांच्यावर जुलूम झाले त्यांच्यावरची दयार्द्र दृष्टि काढून जुलूम करणारांवर ती फिरविणें, म्हणजे महान्

अपराधच आहे. ज्या लोकांना छळलें, ज्यांना लुबाडलें व ज्यांच्या मालमत्तेची नासधूस केली, त्यांचें समाधान मनुष्यमात्राच्या सहृदयतेंतच काय तें आहे; आणि अशा प्रकारची त्यांच्याविषयींची अनुकम्पा आपण जेव्हां भ्रष्ट होऊं देतों त्यावेळेस स्वतः आरोपीनें घातलेल्या दरोड्यापेक्षांहि जास्त भयंकर दरोडा आपण घालतों. महाराज, आम्हांलाहि ही चौकशी लांबली असें वाटतें; आणि त्याबद्दल जितकें वाईट वाटावें तितकें वाटतेंहि; पण ह्याहिपेक्षां आम्हांला विशेष वाईट वाटतें तें हें कीं, ज्यानें बेगमांना लुबाडलें, त्याला योग्य शासन झालेलें बेगमांना आजपर्यंत पाहतां आलें नाहीं. आम्हांला फार वाईट वाटतें कीं, चेतसिंग् अद्यापि भटकतोच आहे; आणि ज्या मनुष्यानें त्याला त्याच्या स्वतःच्या राज्यांतून हांकून लावलें, तो अजून मोकळाच आहे."

आरोपीतर्फे अशी एक तक्रार होती कीं, हिंदु लोक म्हणजे काय त्यांना कायदा नाहीं कानू नाहीं, रीत नाहीं भात नाहीं, मालमत्तेचे नियम नाहींत, इत्यादि. तीवर बर्कनें जें उत्तर दिलें आहे त्यावरून एतद्देशीयांविषयीं त्याला किती इत्थंभूत माहिती होती, तें स्पष्ट दिसून येईल. त्यानें आपल्या भाषणांत एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, हिंदु लोकांच्या एका धर्मशास्त्रावरील ग्रंथाचें इंग्रजींत भाषांतर झालें आहे, त्यांत असें एकहि अक्षर नाहीं कीं जें मीं वाचलें नाहीं. ह्या त्याच्या म्हणण्याचेंहि प्रत्यंतर खालील उताऱ्यावरून येईल.

"प्रथम ह्या किंवा पृथ्वीवरील दुसऱ्या कोणत्याहि देशापेक्षां तेथील लोकांचे निरनिराळे वर्ग फार सूक्ष्म रीतीनें केलेले आहेत. प्रत्येक वर्गांत पुनः निरनिराळ्या कुटुंबांचा अंतर्भाव होतो व ह्यांपैकीं कित्येक घराणीं विशेष अब्रूदार व नांवालौकिकास आलेलीं असतात. त्या सर्वांस विशिष्ट हक्क सवलती आहेत. वडिलोपार्जित जिनगी ब्राह्मणास वंशपरंपरेनें मिळते, व त्यास संतति असेल तर ती त्याच्या कुळांत तशीच चालू राहते. जर त्याला संतति नसली तर ती जिनगी त्याच्या शिष्यवर्गाला मिळते किंवा दुसऱ्या ब्राह्मणाकडे जाते. ब्राह्मणाला कधींहि मरणाची शिक्षा देतां येत नाहीं. अपराधाबद्दल किंवा संतान नाहीं म्हणून ब्राह्मणाची मिळकत केव्हांहि जप्त करतां येत नाहीं......महालकऱ्याला दुसऱ्याच्या मिळकतीची हवी ती व्यवस्था करण्याचा अधिकार आहे, असें कोठेंहि दिसून

येत नाहीं. त्या पुस्तकावरून असें दिसतें कीं, मिळकतीचें संरक्षण करणें हेंच त्याचें कर्तव्य आहे. कायद्याप्रमाणें अंमल करणें त्यास भाग आहे. त्याचप्रमाणें प्रत्येक महत्वाच्या बाबतींत त्यास मदत करण्याकरितां ब्राह्मणांचें मंत्रिमंडळ जवळ असणें जरूर आहे. सारांश, या सर्व व्यवस्थेंत निष्प्रतिबंध अधिकाराचें दिग्दर्शन सुद्धां केलेलें नाहीं......जरूर वाटल्यास मीं आपल्याला सिद्ध करून दाखवीन कीं, त्यांच्यांतील अति श्रेष्ठ अधिकारीहि कायद्यानें बांधलेला आहे व त्यांत कांहीं ठिकाणीं त्यास दंड करण्यास सुद्धां सांगितलें आहे. त्याचप्रमाणें, पुराव्याचे व तक्रारीचे नियम त्यांनीं करून ठेविले आहेत. सारांश, दुसऱ्या देशांत अनियंत्रित सत्तेचा प्रतिकार करण्याकरितां जे नियम आहेत ते सर्व तेथें आहेत. असें असतांहि, आरोपी आणि त्याचे वकील हे हिंदी लोकांत कायदे नाहींत, हें, ह्या पवित्र न्यायसभेंत सर्व धर्माध्यक्ष, सरदार, व न्यायाधीश ह्यांच्या समोर सांगण्याचें धाडस करीत आहेत. ह्या पुस्तकांतून आणखी उतारे घेऊन मी आपल्याला त्रास देऊं इच्छित नाहीं. तें वाचण्याविषयीं मी आपल्याला शिफारस करतों. मनसोक्त दंड किंवा शिक्षा करण्याचा न्यायाधीशास अधिकार नाहीं असें त्यांत तुम्हांला आढळून येईल. एवढेंच नव्हे, तर आपल्यापेक्षां दहा हजार पटीनें जास्त सूक्ष्म रीतीनें दंड करण्याचे नियम त्यांत घालून दिलेले आहेत. त्यांच्या कायद्याच्या पुस्तकांत सर्वोत्कृष्ट व हितावह नियम आहेत इतकेंच नव्हे, तर कोणत्याहि राष्ट्रांत आजपर्यंत केलें नसेल अशा तऱ्हेचें कायद्यांच्या मूलतत्त्वांचें विवेचन त्यांत केलेलें आहे, व हें अत्यंत सुसंस्कृत व विद्वान् माणसांच्या हातूनच झालें असलें पाहिजे...आतां मी आपल्याला असें दाखवीन कीं, हिंदुस्थानांतील लोक अब्रूची चाड फार बाळगतात. हिंदुस्थानांत गुन्हे केल्याबद्दल बायकांची चौकशी होऊन अखेरीस त्यांस दोषमुक्त करण्यांत आलें; तथापि सुटल्यानंतरहि, झालेल्या अपमानामुळें त्यांनीं पुढें फार दिवस काढले नाहींत. कांहीं हिंदू शिपायांना शिक्षा झाल्यावर आम्हांला तोफेच्या तोंडीं द्या, अशी त्यांनीं इच्छा प्रदर्शित केली व त्यांतहि प्रत्येकजण मला प्रथम द्या म्हणून आग्रह धरूं लागला. इतकें असूनहि त्या लोकांना अपमानाचें लांछन वाटत नाहीं असें म्हणतात! अरेरे! ह्या ठिकाणीं ह्या सर्व गोष्टी

शाबीत करण्याचा व सर्व हिंदुस्थान ह्या मनुष्याच्या गुलामगिरींत दिलें म्हणून नाशाबीत करण्याचा प्रसंग यावा ना !" ह्या भाषणावरून हिंदु लोकांच्या आचार-विचारांचें बर्कला किती योग्य ज्ञान होतें, तें नीट समजून येईल. हिंदुस्थाना-संबंधीं बर्कच्या भाषणांचें व लेखांचें सूक्ष्म अवलोकन केलें तर ह्या विलक्षण मनुष्याच्या अलौकिक बुद्धिमत्तेनें मनुष्य थक्क होऊन गेल्याशिवाय राहणार नाहीं. अर्काटच्या नबाबाच्या कर्जावर त्याचें जें भाषण पार्लमेंटमध्यें झालें त्यांत एतद्देशीयांचे व्यवहार, सावकारी, व्याज, चक्रवाढ व्याज, गुमास्ते, टक्का इत्यादि असंख्य घोंटाळ्याच्या गोष्टी, बिनचूक व मार्मिक रीतीनें त्यानें सांगितल्या आहेत; व हीं भाषणें, एखाद्या एतद्देशीयानेंच केलीं आहेत कीं काय असा भास होतो. फार काय सांगावें ! हिंदूलाहि उत्तर देतां यावयाचें नाहीं असें उत्तर देऊन बर्कनें सर्व सुशिक्षित जगास मान डोलवायास लावलें. ज्या बनारस शहरांत गव्हर्नर-जनरलनें लोकांवर जुलूम केले म्हणून बर्कची तक्रार होती, त्याच शहरांत हेस्टिंग्जचें देऊळ लोकांनीं उभारलें, तेव्हां गव्हर्नर-जनरल लोकप्रिय असून त्याच्या हातून बर्कच्या म्हणण्याप्रमाणें जुलमी कृत्यें होणें शक्य नाहीं, असें भासविण्याचा विरुद्ध पक्षाचा प्रयत्न होता व ह्या एका गोष्टीनें लोकांचीं मनें बरींच फिरलीं असेंहि वाटूं लागलें; परंतु अशा प्रमाणांनीं फसून जाण्या-इतकें बर्कचें ज्ञान तुटपुंजीचें नव्हतें. ह्या गोष्टीचें बर्कला कांहींच आश्चर्य वाटलें नाहीं. कारण, हिंदु लोकांच्या धर्मविचारांची व पुराणांची त्यास चांगली माहिती होती. हिंदु लोक शुभ देवतांची आराधना करितात; त्याचप्रमाणें मनुष्यहत्या, गोंवर, देवी वगैरे ज्या अशुभ अधिदेवतांचीहि ते उपासना करितात; मग, हिंदु लोकांनीं हेस्टिंग्जचें देऊळ उभारलें, ह्यावरून आरोपीस अनुकूल अनुमान कसें निघणार ? नुसती अस्ताव्यस्त माहिती असून उपयोगी नाहीं. तर असलेल्या माहितीचा प्रसंगीं आपल्याला फायदेशीर उपयोग करण्याचें सामर्थ्य असणें फार अगत्याचें असतें. परंतु हा गुण फारच थोडयांच्या अंगीं आढळून येतो. असें खुबीदार व समर्पक उत्तर पार्लमेंटमध्यें आजपर्यंत कोणीहि दिलें नाहीं, असें मेकॉलेनें लिहिलें आहे. ह्याप्रमाणें बर्कच्या वाग्विलासांचे, धूर्ततेचे, हिंदुस्थानां-तील लोकांविषयींच्या पूर्ण ज्ञानाचे अनेक मासले देतां येतील; पण अतिशय

कठीण काम म्हणजे त्यांची निवड करणें होय. हीं सर्वच भाषणें इतकीं उत्तम व माहितीनें भरलेलीं आहेत कीं, त्यांचीं सबंध भाषांतरें होणेंच अवश्य आहे. निदान विश्वविद्यालयांतील परीक्षांसाठीं नेमिलेल्या पुस्तकांत त्यांचा अन्तर्भाव कां होऊं नये, तें समजत नाहीं.

हेस्टिंग्जच्या अश्लाघ्य कारस्थानांची चौकशी करण्याविषयीं बर्कचा फार आग्रह होता, व त्यामुळें तो अतिशय नीच मनोविकारांना वश झाला होता, अशी हेस्टिंग्जच्या स्नेह्यांनीं ओरड केली होती. खासगी द्वेष अथवा मत्सर ह्यासारख्या मनोविकारांनीं बर्कचें मन दूषित होणें संभवनीय नव्हतें हें मागें सांगितलेंच आहे, व त्याला चौकशी चालू असतां घडलेल्या गोष्टीवरून चांगली बळकटी येते. इंग्रजी भाषेंतील सर्व निंदाव्यंजक शब्दांचा वर्षाव अनुदार बुद्धीनें बर्कनें गव्हनरजनरलवर केला, असें म्हणून त्याच्या विरुद्ध लोकमत उत्पन्न करण्याची खटपट आरोपीच्या स्नेह्यांनीं चालविली होती. बर्कनें आपल्या भाषणांत ह्याहि आक्षेपाला समर्पक उत्तर दिलें आहे. “ महाराज, ग्रेटब्रिटनचे कॉमन्स म्हणजे गांवढळ लोक होत; आणि म्हणून त्यांनीं आपल्याच मधून नेमलेल्या व्यवस्थापकांच्या तोंडून ग्राम्य शब्द उच्चारले जाणें स्वाभाविक आहे. दरोडेखोरांच्या आणि जुलूम करणारांच्या सभ्य भाषेशीं आमचा परिचय नाहीं. त्याचप्रमाणें लांच खाणाराच्या दांभिक मार्दवाचेंहि आम्हांस यत्किंचित् ज्ञान नाहीं. आम्ही सत्याची भाषा वापरतों; म्हणजे ज्या साध्या व सरळ भाषेंत सत्य सांगितलें पाहिजे, त्याच भाषेंत तें आम्हीं सांगतों. ......दुर्वर्तन आणि दुराचार ह्यांविषयीं सौम्य व मृदु शब्दांनीं बोलणें, हें नीतिभ्रष्ट व अवनतीप्रत पोंचलेल्या काळाचें चिन्ह आहे असें आम्हीं समजतों. जगांत शब्दांनीं बरेंच काम होतें, आणि शब्द हे विचारांचे प्रतिनिधि होत. म्हणून याविरुद्ध हे दुर्गुण व दुराचार बोलण्याच्या कामीं जर लोक भय व कंटाळा प्रदर्शित करतील, तर ते अपराधी आणि अपराध ह्यांशीं सख्य करतात असें दिसेल ........जेथें जेथें आमच्या नीतिबद्ध स्वभावामुळें क्रोधाविष्ट होण्याची आम्हांस संवय लागली आहे, तेथें तेथें आम्हांला क्रोध आल्याशिवाय राहणार नाहीं; व अशा संतापानें आमच्या तोंडांतून निघालेले शब्द वापरण्यास आम्हीं कधींहि मागें घेणार

नाहीं." बर्कचा हा जबाब निरुत्तर होता ह्यांत संशय नाहीं. कारण, त्यानेंच म्हटल्याप्रमाणें ज्या कृत्यांचें वर्णन स्त्रीसमाजांत अकठोर व निराळ्या शब्दांनीं करावें लागतें, त्या प्रकारच्या आरोपीनें केलेल्या दैत्यी कृत्यांचें चित्र न्यायाधीशापुढें मृदु व सौम्य शब्दांनीं काढलें, तर त्याची ती कृति निर्जीवच दिसेल, व आपणच आणलेल्या आरोपांच्या निःसत्त्वतेविषयीं अप्रत्यक्ष रीतीनें कबुली दिल्यासारखें होईल. परंतु बर्कच्या अंगीं असला विघातक कापशी नाजूकपणा कधींच नव्हता. हेस्टिंग्जच्या अमानुष कृतींची यथार्थ कल्पना न्यायाधीशास करूं देणें, हेंच फिर्यादी ह्या नात्यानें बर्कचें काम होतें. तेव्हां त्याबद्दल त्यास दोष देणें अगदीं गैरशिस्त होय. पण ह्याचें कारण असें दिसतें कीं, त्या सभेचा बर्कवरचा विश्वास कांहींसा ढळला होता. बर्कचें ह्यावेळीं उतारवय झालें होतें. पार्लमेंटमध्यें नवीन, अनुभवशून्य व पोरकट स्वभावाच्या मंडळींचा सुळसुळाट झाला होता. बर्कच्या असामान्य वक्तृत्वाचा पूर्ववत् पगडा बसत नसे; पण ह्याहिपेक्षां सर्वांत लांछनास्पद गोष्ट ही कीं, ह्या लोकोत्तर बुद्धीच्या पुरुषाचा त्याच्या वयोवृद्धतेचाहि विचार न करतां, कांहीं चारगट मंडळीकडून वारंवार अपमान होत असे. अशा अप्रयोजक मंडळीनें भरलेल्या पार्लमेंटनें जर आरोपीसंबंधीं कांहीं एक विधान करणाऱ्या बर्कचा निषेध केला, तर त्यांत फारसें आश्चर्य नाहीं; परंतु एवढा झालेला अपमान त्यानें निमुटपणें सहन केला. आपल्या कृतीचें खंडन तर त्यानें केलेंच; परंतु, हेस्टिंग्जच्या अपराधांची चौकशी करविण्यांत, स्वतःच्या शुभाशुभ मनोविकारांना तृप्त करण्याचाच जर त्याचा इरादा असता, तर पार्लमेंटनें केलेल्या अवहेलनेकडे दुर्लक्ष करून जणूं काय कांहींच घडलें नाहीं असें समजून तसेंच पूर्ववत् काम चालविणें, हें त्याच्या मानी स्वभावास अनुसरून दिसत नाहीं. त्याला दृष्टीसमोर हिंदुस्थानांतले अनाथ लोक दिसत होते. तेव्हां अर्थातच ज्या लोकांची निरपेक्ष सेवा करण्याचा त्यानें पतकर घेतला होता, त्यांना कांहीं लोकांच्या अविचारी मूर्खपणाबद्दल तसेंच सोडण्याचा विचार त्याच्या मनांत कसा येणार ? ह्या गोष्टीवरून साधारण विवेकी मनुष्याची खात्री झाल्याशिवाय राहणार नाहीं कीं, जर परदुःखापकर्षासारख्या प्रशंसनीय उद्देशानेंच बर्कनें हेस्टिंग्जवर एवढें भयंकर वादळ उभारलें नसतें, तर पार्लमें-

टचा विश्वास कमी झाल्याबरोबर त्यानें फिर्यादीचे कागद फेकून दिले असते. बर्कच्या अशुद्ध हेतूबद्दलच्या आक्षेपाचें निरसन त्याच्याच तोंडच्या शब्दांनीं करावें हेंच आम्हांला प्रशस्त दिसतें.

" लुबाडून घेतलेल्या सत्तेशिवाय ज्यांच्यांत कांहीं विशेष वाखाणण्यासारखें नाहीं, अशा अज्ञात देशांतून आलेल्या कांहीं क्षुद्र लोकांनीं आपल्याला मुठींत वागवावें, हें पाहून जन्मतःच दुसऱ्यावर अंमल चालविणाऱ्या नरपुंगवास अत्यंत लांछन वाटेल असें आम्हांस वाटतें. केवळ माझे ते देशबांधव आहेत, एवढ्याच-करितां त्यांच्या मुरवतीखातर भूतदयेनें जागृत झालेल्या स्वभावसिद्ध मनोवृत्ति दडपून टाकण्याचें माझ्या हातून कधींहि होणार नाहीं. अजाण आणि अज्ञात अशा लोकांस जर आपण पाठविलें, तर त्यायोगानें त्यांच्या जुलमाला बळी पडलेल्या मनुष्यांचें दुःख अधिकच दुणावतें हें खचित. "

" परंतु ह्या षंढांचें [जनानखान्यांत ठेवलेले] दुःख येथेंच संपलें नाहीं. पन्नास हजार रुपयांकरतां त्यांस बारा महिने अटकेंत राहावें लागलें. ते ह्या वरपगडा ठेवूं पाहाणाऱ्या आरोपीप्रमाणें मोकळे नसून, त्यांना असह्य कारागृहवास सोसावा लागला. ह्या लोकांकरितां मला वाईट वाटतें. त्यांची ती अंधारकोठडी, ज्यांचा सूड उगवण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत नाहीं, अशा प्रकारचे त्यांच्यावर केलेले जुलूम, ह्यांहीकरून माझें अन्तःकरण तिळतिळ तुटतें. आपल्या धनिणीशीं इमानानें वागावें एवढाच ज्यांचा अपराध, अशा ह्या निरुपद्रवी, दुःखी व हतभागी लोकांकरितां माझें काळीज कळवळतें. आरोपीकरतां नव्हे. ह्या सर्व अन्यायांचा कर्ता हाच आहे. म्हणून त्या विपत्तींत पडलेल्या प्राण्यांची कींव न करतां, जर ह्या आरोपीची कराल, तर आपण अन्याय करीत आहां असें होईल. त्यांच्या बिड्यांची आठवण करा. ज्यानें ह्या बिड्या ठोकल्या, तो स्वतः बिडीशिवायच अद्यापि नाहीं काय? तुझे हाल हाल करूं अशी कोणीं यास धमकी दिली आहे काय? अन्नपाण्याशिवाय ह्याला कोणी कोंडून ठेवलें आहे काय? याच्या अपराधाच्या उग्र स्वरूपाला अनुरूप असें कोणतें शासन ह्यास झालें आहे, किंवा होण्याचा संभव आहे? "

# भाग ७ वा

## फ्रान्समधील राज्यक्रांति.

जगांतील अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींची घडामोड ज्याच्या दृष्टीसमोर होत असते, असे फारच थोडे लोक असतात. त्यांतून त्या गोष्टींत ज्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें संबंध असतो, असे भाग्यशाली त्याहूनहि थोडे. बर्कची गणना ह्या दुसऱ्या वर्गांतील लोकांमध्यें होते हें सांगावयास नकोच. अमेरिकन युद्ध, वॉरन हेस्टिंग्जची चौकशी आणि फ्रान्समधील राज्यक्रांति, ह्यांच्याशीं बर्कचें तादात्म्य इतकें होऊन गेलें होतें कीं, दुसऱ्यावांचून पहिल्याची पूर्ण कल्पना होणेंहि शक्य नाहीं, असें म्हटल्यास फारसा बाध येणार नाहीं. तीनहि प्रसंगीं बर्कला एकाएकीच युद्धप्रसंग करावा लागला, आणि तत्कालीन अपयश पतकरावें लागलें; परंतु रणभूमीवर युद्धसाहित्य घेऊन लढणारा वीर आणि विद्यादेवीच्या छत्राखालीं निर्भय क्षेत्रांत, अज्ञान दूर करण्याच्या बुद्धीनें झुंजणारा विद्वान् योद्धा, ह्यांमध्यें मनस्वी फरक आहे. तो हा कीं, पहिल्याचा अपजय इतिहासांत चिरकाल राहणार. त्याचा जो तत्कालीन पराजय तोच अक्षय्य; परंतु अज्ञान, अन्याय वगैरेंशीं संग्राम करून तात्कालिक यशोभंग झाला तरी, इतिहास कायम राहील तोंपर्यंत केव्हांना केव्हां, एका पिढीकडून नाहीं तर दुसरीकडून, केलेल्या कृत्याचें चीज झाल्याशिवाय राहणार नाहीं. तत्कालीन स्थितीविषयीं दुराग्रह, स्वार्थपरायणता अहंभाव इत्यादि मानसिक दुर्विकारांपासून अलिप्त असलेल्या अर्वाचीन पिढीची बर्कच्या त्या त्या प्रसंगीं केलेल्या भाषणांच्या आणि लेखांच्या गांभीर्याबद्दल, त्यांत दिसून येणाऱ्या दूरदृष्टीबद्दल, त्याचप्रमाणें त्याच्या उदार न्यायबुद्धीविषयीं वालंबाल खातरी होत चालली आहे.

मागल्या भागांत सांगितल्याप्रमाणें हेस्टिंग्जच्या अपराधाच्या चौकशीचा बहुतेक भाग बर्कवरच पडला होता. ती चौकशी अद्यापि पुरी झाली नव्हती, तोंच बर्कच्या मनोव्यापारांना जणूं काय अश्रांत ठेवण्याच्या हेतूनें फ्रान्स देशांतील

धामधूमींची वार्ता इंग्लंडांत येऊन पोंचली. प्रत्येक जाणत्या माणसाची जिज्ञासा जागृत करण्यासारखा आणि प्रत्येकाचे मनोविकार अत्यंत क्षुब्ध करण्यासारखा फारच भयंकर प्रकार फ्रान्सांत त्यावेळीं चालला होता. जिकडे तिकडे अंदाधुंदी व अव्यवस्था होऊन एकच कल्होळ माजला होता. सर्व राजकीय सूत्रें तोडून टाकण्याचा लोकांनीं निश्चय केला. सैन्यहि त्यांस येऊन मिळालें. मग तर त्यांनीं आकाश पाताळ एकच केलें. वाडवडिलांच्या निःसीम भक्तीची उत्कृष्ट साक्ष देणाऱ्या, शेकडों वर्षांपूर्वीं निष्टापुरःसर बांधलेल्या देवालयांचा क्षणार्धांत विध्वंस झाला. स्वातंत्र्यनियमनासारखें योग्य शासन झालेल्या अपराधपटु दुर्मति अधमांनासुद्धां, तातावलेल्या जनसमूहानें अविचारानें मुक्त केलें. ह्या कालापूर्वीं न्यायशीर म्हणून मानल्या जाणाऱ्या पद्धतीनें संपन्न झालेल्या व म्हणूनच देशांतील दुसऱ्या लोकांपासून भिन्न पडलेल्या कुलीन लोकांना, आणि तसेंच अपूर्वमतप्रसारकाप्रमाणें देशाच्या आपत्तींचें आदिकारण ठरलेल्या धर्मपरायण धर्माध्यक्षांना देशांतून पाय काढावा लागला. सरशेवटीं ह्या राज्योन्नतियज्ञांत राजप्राणांची आहुति पडून सर्व अघोर कृत्यांचा कळस झाला. हीच फ्रान्सची सुप्रसिद्ध राज्यक्रांति होय.

ह्यावेळीं सोळावा लुई राज्यारूढ होता. तो इ० स० १७७४ त गादीवर बसला हा स्वभावानें गरीब होता; पण राज्यकारभार झेंपण्याइतकी ताकद त्याच्यांत नव्हती. बर्कनें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, ‘निष्कारण बंड करण्यांत लोकांचा कांहीं मतलब नसतो. अन्याय व जुलूम ह्यांचा अतिरेक झाल्यावर त्यांचें स्वाभाविक पर्यवसान बंडांत होणेंच संभवनीय आहे.’ ह्या दृष्टीनें पाहतां फ्रेंच लोकांना बंडापर्यंत मजल मारण्यासारखीं सबल कारणें निःसंशय होतीं. चोहोंकडून ते लोक नाडून गेले होते. चवदाव्या लुईपासून राजांच्या मूर्ख व जुलमी कृत्यांचे परिणाम गरीब प्रजेस सोसावे लागले होते. करांनीं लोकांना पिळून काढलें होतें; आणि विशेषेंकरून सर्व लोकांवर ते सारखे नसल्यामुळें त्यांचा जुलूम सामान्य लोकांस अधिकच भासत असे. राष्ट्रांतील बडे लोक व धर्माध्यक्ष बहुतेक करांपासून मुक्त होते. सर्व ओझें खालील लोकांवर पडलें होतें, आणि ते वसूल करण्यांत जो अन्याय होई, तो तर केवळ असह्यच होता. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत

कष्ट करणाऱ्या मजुरांच्या मध्यंतरीं अपरिहार्य क्षुन्निवारणार्थ घेतलेल्या अल्प न्याहारीवरहि कर सुटला नाहीं. धान्य, कणीक, दारु, सर्पण इत्यादि निर्वाहाला अवश्य लागणाऱ्या पदार्थांवरहि करांचा बोजा पडला होता. हिंदुस्थानांतल्या प्रजेप्रमाणेंच फ्रेंच लोकांना मिठावर कर द्यावा लागत असे. ह्या जुलमी कराचा दोन तृतीयांश भाग राष्ट्रांतील फक्त एक तृतीयांश लोकांवर पडला होता; परंतु अन्यायाची सीमा येथेंच झाली नाहीं. सात वर्षांच्या वरच्या प्रत्येक मनुष्यानें वर्षाचें सात पौंड मीठ घेतलेंच पाहिजे अशी सक्ति असे; आणि हें मीठ स्वयंपाकाकडेच खर्च केलें पाहिजे, दुसऱ्या कामाकरितां लागलेंच तर निराळें खरेदी करावें लागे, व त्याबद्दल जवळ एक सर्टिफिकीट बाळगावें लागत असे. ह्या नियमांचें उल्लंघन करणाराला दंड, कैद आणि कधींकधीं फांशीचीहि शिक्षा होत असे ! ! ह्यापेक्षां अधिक जुलूम काय असणार ? परंतु गंमत ही कीं, असल्याप्रकारचे जुलमाचे मासले पाश्चात्य राष्ट्रांत होत असतां व पाश्चात्य सुशिक्षित राष्ट्रांतील मुत्सद्दी पूर्वेकडील राष्ट्रांत येऊन तद्देशस्थ अनियंत्रित सत्ताधीशसुद्धां करण्यास कचरतील, असे अन्यायाचे प्रकार करीत असतां, पाश्चात्य इतिहासकारांनीं 'पूर्वेकडील जुलूम' हा उपमानविषय बनविला आहे ! ही लोकांची स्थिति झाली. देशांतला व्यापार ठार बुडाला होता. चवदाव्या लुईनें लढायांत पैसे उधळल्यामुळें आणि पंधराव्या लुईनें ते चैनबाजींत नासल्यामुळें राष्ट्रीय कर्ज अतोनात वाढलें होतें. तें इतकें कीं, त्यांतून सुटण्याची लेशहि आशा राहिली नव्हती. कलेक्टरासारख्या प्रांतिक अधिकाऱ्याच्या हातांत प्रायः राज्यव्यवहाराचीं सूत्रें होतीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. खुद्द लोकांचे परस्परविरोधी असे दोन वर्ग झाले होते. बड्या लोकांना सर्व प्रकारच्या सवलती व हक्क असल्याकारणानें ते अर्थातच राजपक्षाला जाऊन मिळत. आपल्या कंगाल बांधवांविषयीं त्यांच्या मनांत तिळभरसुद्धां आस्था किंवा कळकळ वसत नव्हती. तेव्हां स्वाभाविकपणेंच ह्या लोकांविषयीं व राजाविषयीं सामान्य जनसमूहांत असंतोष आणि अप्रीति उत्पन्न झालीं होतीं, व लोक निर्धन, कमकुवत व हताश झाल्यामुळें तीं दिवसेंदिवस वृद्धिंगत होत चालली. द्रव्यार्जनाचा कोणताच मार्ग खुला नव्हता. जे पदार्थ देशांत तयार करतां आले असते, तेसुद्धां पर-

देशांतून विकत आणावे लागत. म्हणजे हिंदुस्थानांत सुबक व स्वस्त कापड तयार करण्याचें सर्व साहित्य असतां, तें जसें परदेशांतून घ्यावें लागतें, तसाच प्रकार ह्या पाश्चात्य देशांत होता. शेतकीचीहि स्थिति येथल्यापेक्षां फारशी भिन्न नव्हती. सरकारधारा कायम नसल्यामुळें तींत सुधारणा करण्यास कोणीहि धजत नसे. कारण, कष्टांतीं कांहीं फळ मिळतें आहे, तोंच त्यावर सरकारची धाड येऊन पडे. दुरवस्थित राज्यकारभारामुळें दुष्काळांपासून वारंवार लोकांचे हाल होत. अशा रीतीनें निकृष्ट झालेल्या ह्या लोकांत असंतोषरूपी प्रलयाग्नि कित्येक दिवस धुमसत होता. होतां होतां इ० स० १७८९ त त्याच्या ज्वालांची धग सर्व युरोपखंडाला लागूं लागली.

फ्रेंच लोक गुलामगिरींत कुजत पडले आहेत, त्यांना तीच स्थिति प्रिय आहे, असा इंग्लिश लोकांचा समज होता. तेव्हां मानवजातीच्या कांहीं भागाच्या दास्यविमोचनाची आनंदप्रद वार्ता कानीं पडतांच तिचा प्रथमदर्शनीं इंग्लंडांत जयजयकार झाला, ह्यांत आश्चर्य नाहीं. ज्यांच्यावर राज्याच्या बंदोबस्ताची जबाबदारी आहे, अशा मुत्सद्यांपैकीं पिट व फॉक्स ह्यांनींसद्धां फ्रेंच लोकांची उघड प्रशंसा केली. बर्कनें मात्र कोणत्याहि तऱ्हेनें उतावळीनें आपला अभिप्राय प्रदर्शित केला नाहीं. फ्रेंच लोकांच्या हेतूंची त्यानें स्तुति केली; परंतु प्रत्येक राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रश्नासंबंधीं त्यानें जो आजपर्यंत शहाणपणा दाखविला, त्यालाच अनुसरून, किंवा फ्रेंच लोकांच्या स्वभाववैचित्र्याचें परिज्ञान इतरांपेक्षां विशेष असल्यामुळें म्हणा, फ्रेंच लोकांच्या कृत्यांविषयीं व त्यांच्या परिणामाविषयीं आरंभापासूनच त्याच्या मनांत विलक्षण विकल्प उत्पन्न झाले. त्यानें पाठविलेल्या एका खासगी पत्रावरून त्याची आरंभींची विचारदिशा स्पष्ट दिसते. त्या पत्रांत तो म्हणतो—' शेजारच्या देशांत चाललेला अननुभूत प्रकार ऐकून आम्ही आश्चर्यानें गुंग झालों आहों, व त्याबद्दल फ्रेंच लोकांची निंदा करावी किंवा गुण गावे, हें समजत नाहीं. त्यांच्या उद्देशांची प्रशंसा न करणें अशक्य आहे हें खरें, पण त्याबरोबरच मूर्तिमंत क्रौर्य त्या देशांत अवतरलें आहे, असा भास होतो. क्रोधजन्य उद्वेगाचा हा आकस्मिक परिस्फोट असेल, तर त्यांत कांहीं विशेष नाहीं; परंतु त्या लोकांचा स्वभाव जर त्या कृत्यांत प्रतिबिंबित होत

असेल, तर मात्र ते स्वातंत्र्याला नालायक आहेत असें म्हणणें भाग पडतें. अखेर परिणाम काय होईल त्याचा आज अंदाज करतां येत नाहीं. तथापि सुदृढ राज्यव्यवस्था बनविण्यास सद्हेतूंप्रमाणें शहाणपणाचीहि आवश्यकता आहे.' ह्या क्रांतीसंबंधीं बर्कचीं पुढें जीं मतें बनलीं व त्यानें ह्या विषयावर जे लेख प्रसिद्ध केले, त्या सर्वांचें दिग्दर्शन ह्या पत्रांत आहे. योग्य स्वातंत्र्य संपादण्याच्या बुद्धीनें त्याचप्रमाणें जुलमाचा वींमोड करण्याच्या उद्देशानें त्यांचे जे प्रयत्न असतील, त्यांबद्दल फ्रेंच लोकांस त्यानें दोष दिला नाहीं; पण त्याची मनोदेवता त्यास असें पक्कें सांगत होती कीं, राष्ट्रीय सद्गुणांचें मूळ राष्ट्रीय अतिरेकांत सांपडणें शक्य नाहीं. ज्या न्यायबुद्धीचा आरंभ दरोड्यांत होतो, ती न्यायबुद्धि खोडसाळच असली पाहिजे, आणि निरपराधी रक्तांत माखलेली स्वतंत्रता, म्हणजे जुलमी स्वैर वर्तनाचेंच दुसरें नांव असलें पाहिजे. फलावरून वृक्षाची परीक्षा त्यानें केली.

नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें फ्रान्स देशांतील निरनिराळ्या स्नेह्यांस पत्रें पाठवून माहिती गोळा करण्याचे त्यानें प्रयत्न केले. जसजशी त्यास माहिती मिळत चालली, तसतसे त्याचे पूर्वींचे विचार कायम होत चालले. इ० स० १७८९ च्या ऑक्टोबर महिन्यांत फ्रान्सांतील राष्ट्रीयसभेच्या एका सभासदानें ह्या नूतन राज्यक्रांतीसंबंधीं त्याचें मत विचारलें असतां त्यास पाठविलेल्या उत्तरांत बर्क म्हणतो—' फ्रेंच लोक स्वातंत्र्यार्ह आहेत असें मला वाटतें असा आपला समज आहे, तो खोटा नाहीं. खरोखरीच माझें असें मत आहे कीं, ज्यांना स्वातंत्र्याची इच्छा झाली ते सर्व त्यास पात्र आहेत. स्वातंत्र्य हें आपल्या गुणांबद्दल बक्षीस नाहीं अथवा आपल्या उद्योगाचेंहि फल नाहीं. तें आपलें वतनच आहे. जन्मतःच त्याच्यावर आपला हक्क लागू होतो. मनुष्यप्राण्याचे इतर नैसर्गिक अधिकार ज्या कारणानें नष्ट होतात, त्याच कारणानें स्वातंत्र्यावरील हक्कहि जातो. म्हणजे जेव्हां आपल्या ज्ञानशक्तीचा सफाई नायनाट किंवा दुरुपयोग होतो, जेणेंकरून आपण दुष्कृत्य करण्यास प्रवृत्त होतों, आणि जेव्हां आपणांतील निसर्गजन्य समाजप्रेम नष्ट होऊन आपण वन्य पशूंच्या वर्गांत मोडूं लागतों, तेव्हां मात्र मनुष्य स्वतंत्रतेला मुकतो. असल्या निकृष्ट स्थितीस पोचलेल्या मानवजातीस स्वातंत्र्याऐवजीं बंधनांत ठेवणेंच अवश्य व श्रेयस्कर आहे. मी जें स्वातंत्र्य

इच्छितों तें स्वार्थपर नसून समाजनियंत्रित असलें पाहिजे. एका व्यक्तीच्या स्वातंत्र्यानें दुसऱ्या व्यक्तीच्या स्वातंत्र्यास बाध येतां कामा नये. अशाप्रकारचें स्वातंत्र्य स्थापण्याची जर फ्रेंच लोकांची इच्छा असेल, तर त्याविरुद्ध माझें कांहीं म्हणणें नाहीं. म्हणून जेव्हां मी असें ऐकेन कीं, देशांत राहणाऱ्या मनुष्याला—मग तो कोणत्याहि वर्गाचा असो—आपला जीव व मालमत्ता सुरक्षित ठेवितां येतात, त्याला आपल्या मर्जीप्रमाणें उद्योगाची दिशा धरतां येते, व बुद्धीचा उपयोग करतां येतो, कायदेशीर रीतीनें मिळविलेल्या संपत्तीचा सुखानें उपभोग घेतां येतो, तसेंच देशांतील एकाद्या साधारण मनुष्यालासुद्धां सार्वजनिक कामासंबंधीं आपले विचार जीवाला आणि स्वातंत्र्याला धक्का पोंचल्याशिवाय योग्य रीतीनें प्रसिद्ध करतां येतात, त्यावेळेस इतरांप्रमाणें मलाहि आनंद होईल.' ह्या उताऱ्यावरून बर्कच्या विचारांचा मूळपासून कसा झोंक होता, हें लक्षांत येईल.

मागें सांगितलेंच आहे कीं, पिट, फॉक्स वगैरे बहुतेक इंग्रज लोकांना ही क्रांति पसंत होती. इ० स० १६८८ सालीं इंग्लंडमध्यें झालेल्या राज्यक्रांतीचें लोकांना स्मरण होऊन असें वाटूं लागलें कीं, आपल्याप्रमाणें फ्रेंच लोकांचेंहि ह्या राज्यक्रांतीनें हित होईल व राजाविरुद्ध प्रजेचे म्हणून कांहीं हक्क असतात हें फ्रेंच लोकांना कळूं लागलें म्हणजे, अर्थातच अधिकाराच्या जोरावर आजपर्यंत चाललेला अन्याय बंद होऊन फार दिवस काढलेल्या गुलामगिरींतून त्यांची कायमची सुटका होईल. परंतु इंग्लिश राज्यक्रांतीचें फ्रान्सच्या राज्यक्रांतीशीं साम्य करूं पाहणाऱ्या लोकांचा हा निवळ भ्रम होता. पुढें बर्कनें आपले विचार ह्या विषयासंबंधीं प्रसिद्ध केले, त्यांत त्यानें असें म्हटलें आहे कीं, इंग्लंडमध्यें राज्यक्रांति घडवून आणिली नाहीं; तर जी पुढें झाली असती ती टाळली. पण हा भेद समजण्याइतकी साधारण लोकांची शक्ति नसल्यामुळें वरवर पाहून दोहोंमध्यें थोडेंसें साम्य दिसतांच इंग्लिश लोकांना फ्रेंच लोकांची धन्य वाटली. ह्याप्रमाणें सर्व राष्ट्र एकीकडे आणि बर्क दुसरीकडे अशी स्थिति होती. त्याचा स्नेही फॉक्स हा विरुद्धपक्षाचा आहे हें त्यास समजलें होतें. विचारांतीं कदाचित् आपल्याप्रमाणेंच फॉक्सचें मत होईल, अशी बर्कला फार आशा होती तीहि शेवटीं

नाहींशी झाली. हेस्टिंग्जची चौकशी यावेळीं चालू असून त्यांत फॉक्सची मदत त्यास पाहिजे होती. म्हणून आपण होऊन ह्या विषयावर त्याच्याशीं कांहींएक न बोलण्याचा संकेत बर्कनें केला होता; पण तो टिकला नाहीं. इ० स० १७९० च्या फेब्रुआरी महिन्यांत पार्लमेंटमध्यें सैन्याच्या खर्चावर वादविवाद सुरू झाला. त्या प्रसंगीं फितूर होऊन राजाविरुद्ध उठल्याबद्दल फ्रेंच सैन्याचा फॉक्सनें विनदिक्कत गौरव केला. त्याच्या भाषणाचा आशय असा होता कीं, सरकारी नोकरींत शिरल्याबरोबर प्रजाजन ह्या नात्यानें असलेल्या हक्कांस मनुष्य अंचवत नाहीं, असें फ्रेंच सैन्यानें आपल्या वर्तनानें जगास दाखविलें. राजपुरुषांच्या पायधुळीच्या स्पर्शानें स्वतःस धन्य मानून घेऊन प्रजाजन ह्या नात्यानें आपणांस निराळें अस्तित्वच नाहीं, असें समजणाऱ्या सरकारसेवकांनीं फॉक्सचें वरील महावाक्य लक्षपूर्वक मनन करण्यासारखें आहे. फॉक्सनें सांगितलेलें हें महातत्त्व बर्कला अमान्य होतें असें नाहीं; परंतु कोणत्याहि नियमाला मर्यादा असते आणि फ्रेंच सैन्याचें वर्तन मर्यादातीत होतें असा बर्कचा समज होता. त्याचप्रमाणें बंडखोर फ्रेंच सेनेची इंग्लंडांत उघड उघड स्तुति झाल्यानें इंग्लिश सेनेवर कदाचित अनिष्ट परिणाम घडेल अशीहि त्यास भीति पडली असावी. तेव्हां हें फॉक्सचें वर्तन बर्कला सहन कसें होणार? दुसऱ्या खेपेस प्रसंग येतांच तो बोलावयास उठला. प्रथम फॉक्ससारख्या वजनदार मनुष्याच्या तोंडून असे उद्गार निघणें, हें देशाच्या शांततेस किती अपायकारक आहे हें सांगून, प्रजासत्तात्मक राज्याविषयीं त्यानें आपले सविस्तर विचार कळविले. इ० स० १६८८ च्या राज्यक्रांतीनें मनुष्य-प्राण्याचे वास्तविक हक्क कसे सुरक्षित राहिले, ह्याचें त्यानें फारच मनोवेधक वर्णन केलें. तो म्हणाला--' एकसत्तात्मक राज्यव्यवस्था—मग ती कोणत्याहि देशांत असो—मला कधींहि संमत नव्हती; परंतु फ्रान्स देशांतील हल्लींच्या राज्यव्यवस्थेकडे पाहतां, ती अत्यंत लुटारू, निर्दय अशी झोटिंगपातशाही आहे, व ह्या दोषांवर पांघरूण घालण्यासारखा प्रजासत्तात्मक राज्यव्यवस्थेचा एकहि गुण तींत नाहीं.' शेवटीं त्यानें मोठ्या आवेशानें पण कळकळीनें असें सांगितलें कीं, ' जोंपर्यंत माझ्या जीवांत जीव आहे, जोंपर्यंत शरीरांत रक्ताचा एक बिंदू तरी शिल्लक आहे, तोंपर्यंत अशा दुष्ट मतांचा प्रतीकार केल्याशिवाय मी राहणार नाहीं. मग त्यांत मी आपल्या पुरातन जिवलग मित्रांनाहि अंाचवलों तरी बेहे-

चर. ' हे अगदी निकराचे उद्गार होते व त्यांचा परिणामहि झाला. विरोधी सभासदांनाहि हें भाषण आवडलें. पिट, ज्याच्या मनाचा कल आरंभीं फ्रेंच लोकांना अनुकूल होता, त्यानेंसुद्धां ह्या उद्गारासंबंधीं आपली कृतज्ञताबुद्धि प्रदर्शित केली व हे विचार सर्व देशाला मान्य होतील असा आपला अभिप्राय दिला. बर्कच्या भाषणांतील शेवटचें वाक्य विशेषेंकरून फॉक्सला लागलें असें दिसतें. बर्कच्या स्नेहाबद्दल आपण किती ऋणी आहों हें सांगत असतां तो म्हणाला—'माझ्या सन्माननीय मित्राच्या विचारशक्तीविषयीं माझ्या मनांत अत्यंत पूज्यबुद्धि वसत आहे. जगांतील सर्व मनुष्यें व ग्रंथ ह्यांच्यापेक्षांहि माझ्या मित्रापासून मला जास्त ज्ञान प्राप्त झालें आहे. माझ्या मित्रामुळेंच आपल्या राज्यव्यवस्थेवर माझें प्रेम जडलें. सारांश सर्व राजकीय विषयज्ञान व अभिमान बाळगण्यासारखी प्रत्येक गोष्ट मला माझ्या मित्रापासूनच प्राप्त झाली आहे वगैरे.' ही खरोखर पोकळ स्तुति नव्हती. राज्यकारभारांत फॉक्सचें महत्त्व वाढण्यास त्याच्या अंगच्या वक्तृत्वनैपुण्याशिवाय बर्कच्या परिपक्व व प्रचंड ज्ञानाची चांगलीच मदत झाली होती. तथापि फॉक्सचीं फ्रेंच राज्यक्रांतीवरचीं मतें बर्कच्या सहृदय भाषणानें तादृश फिरलीं नाहींत. अशा रीतीनें आजपर्यंत राज्यकारभारांत ज्यांनीं एकदिलानें काम केलें, जे रॉकिंगहॅमच्या पश्चात् व्हिग पक्षाचे खंबीर आधारस्तंभ होते, त्यांची पुष्कळ वर्षांमागें बांधलेली स्नेहग्रंथि ह्या मतभेदामुळें एकाएकीं तुटून पडली. ह्या दोघा स्नेह्यांत विरोध पाडण्यांत शेरिडनचें बरेंच अंग होतें असें म्हणतात. खुद्द पार्लमेंटमध्यें बर्कवर त्यानें निराधार आरोप ठेवून कुत्सित भाषण केलें. प्रत्यक्ष स्वातंत्र्यावर बर्कनें तरवार उपसली आहे, व अनियंत्रित राज्यसत्तेचा तो पूर्ण अभिमानी आहे, असें त्यानें बोलून दाखविलें. बर्ककडूनहि त्यास योग्य उत्तर मिळालें. आणि ' राज्यकारभारांत आजपासून आपलें जमावयाचें नाहीं ' असा निकराचा जबाब त्यास द्यावा लागला. ह्याप्रमाणें बर्क, फॉक्स व शेरिडन ह्या त्रयीचा पक्का बेबनाव झाला. हें भांडण साधारण नव्हे. सामान्य लोकांच्या कृतीचे परिणाम कर्त्याच्या बाहेर कोणास बाधत नाहींत; परंतु समाजनायकांची गोष्ट तशी नसते. जसजशी मनुष्याची योग्यता मोठी त्या त्या मानानें त्याच्या वर्तनाचा साधकबाधक परिणाम लोकसमूहावर घडत असतो. रॉकिंगहॅमच्या पाठीमागें त्या पक्षाची सर्व मदार ह्या त्रयीवर होती; तेव्हां त्यांमध्यें

वितुष्ट पडलेलें पाहून त्या पक्षांतील लोकांस धास्ती पडली. त्यामुळें त्यांतील कांहीं पुढारी मंडळींनें त्यांचा पुनः पूर्ववत् सलोखा करण्याचा बेत केला. ह्या उद्देशानें सर्व पुढारी मंडळी एका ठिकाणीं जमली. तेथें बर्क, फॉक्स व शेरिडन ह्यांसहि बोलावलें होतें. रात्रीं दहा वाजल्यापासून पहाटेस तीन वाजेपर्यंत दोन्ही पक्षांचा मोठा कडाक्याचा वादविवाद झाला. अखेरीस ज्या हेतूनें मंडळी जमली होती, तो तेव्हां तर सिद्धीस गेला नाहींच, पण पुढें कधीं ऐक्य होईल ह्याची सुद्धां आशा राहिली नाहीं.

एकंदरींत यावेळी ह्या विषयासंबंधीं इंग्लिश राष्ट्राच्या विचारांचा ओघ बर्कला प्रतिकूल वहात होता. त्याच्या पार्लमेंटमधील आणि खासगी भाषणांचा विपर्यास करून त्याच्याविषयीं गैरसमज उत्पन्न करण्याचे प्रयत्न सुरू झाले. एवढ्याकरितां ह्या महत्त्वाच्या विषयावर आपले विचार सविस्तरपणें आणि विशेषतः लोकांचा गैरसमज होण्यास जागा राहणार नाहीं, अशा रीतीनें प्रसिद्ध करण्याची आवश्यकता वाटल्यावरून तो त्या कामास लागला. लोक आधींच कुणकुण करूं लागले होते कीं, खाडीपलीकडे चाललेले स्वातंत्र्यसंपादनाचे मार्ग बर्कला पसंत नाहींत; तेव्हां ह्या विषयावर तो कांहीं लिहीत आहे, असें बाहेर पडतांच सर्व विद्वान् लोकांचें लक्ष तिकडे वेधलें. लेखकाचा लौकिक, त्याचीं विशिष्ट मतें व विषयाचें महत्त्व ह्यांमुळें तो लेख निघाल्याबरोबर वाचण्याची लोकांची उत्कंठा फार प्रज्वलित झाली. शेवटीं इ० स० १७९० च्या नोव्हेंबर महिन्यांत हा चिराकांक्षित ग्रंथ लोकांच्या हातांत येऊन पडला. ह्या जगन्मान्य ग्रंथाला अवश्य लागणाऱ्या साहित्यांपैकीं विचारसाहित्याची तयारी होतीच. भाषणांतून, पत्रव्यवहारांतून वगैरे त्याचीं मतें लोकांना कळून चुकलीं होतीं. तेच विचार एका ठिकाणीं करून त्यांचें मुद्देसूद व सविस्तर समर्थन करण्याचें काम ह्या पुस्तकद्वारा त्यानें केलें. एका फ्रेंच मित्रानें त्याचा अभिप्राय विचारल्यावरून त्यास उत्तरादाखल पत्राच्या रूपानें हा ग्रंथ लिहिला आहे. ह्या ग्रंथरचनेंत बर्कनें विलक्षण काळजी घेतलेली दिसते. वर्षभर पुस्तक छापत होतें. टाइप जुळविणारे अगदीं त्रासून गेले; कारण, बर्ककडे प्रुफ तपासण्यास गेलें कीं तें साफ बदलून प्रत्येक खेपेस निराळाच मजकूर जाई; ह्याप्रमाणें बराच वेळ झालें असें म्हणतात !

शब्द अथवा वाक्य नव्हे, तर विचार, उपमा, दृष्टांत हेहि दरवेळेस अजिबात निराळेच. पुस्तक करवेल तितकें निर्दोष करून आपले विचार लोकांच्या मनावर जेणेंकरून झटकन व दृढतर बिंबतील, असा त्याचा प्रयत्न होता असें दिसतें. सुविचाररूपी अमोल खडा उत्कृष्ट वक्तृत्वरूपी कोंदणांत बसवल्यावर तो विशेष कां खुलणार नाहीं ? उज्वल कल्पना ह्या पुस्तकाच्या वाचकांस पुष्कळच सांपडतील. इंग्लिश भाषेचें सौन्दर्यसार येथें पहावयास सांपडेल. सूक्ष्म विवेचन, मानवी कृतींच्या हेतूंचें पृथक्करण, आणि अत्यंत व्यावहारिक शहाणपणाचीं वचनें ह्यांच्या योगानें वाचणारांच्या मनावर इष्ट परिणाम झाल्याशिवाय रहात नाहीं. सारांश, हा ग्रंथ लोकमान्य होण्यास बुद्धि, ज्ञान, मनन ह्यांनीं जें कांहीं होणें शक्य होतें, तें करण्यास त्यानें काडीभरहि कसूर केली नाहीं. लवकरच त्याचें भाषांतर फ्रेंच भाषेंत झालें. त्या योगानें सर्व यूरोपखंडभर त्या पुस्तकाची कीर्ति पसरली. 'फ्रेंच राज्यक्रांतीवरील विचार' हा ग्रंथ त्या शतकांतील ध्यानांत ठेवण्यासारखी महत्त्वाची गोष्ट आहे. कारण, त्याकडे लोकांचें लक्ष इतकें वेधून राहणें, इतका वादविवाद उपस्थित होणें, एका पक्षाकडून इतकी स्तुति, आणि दुसऱ्या पक्षाकडून इतकी विरुद्ध टीका होणें आणि शेवटीं त्यांत निर्दिष्ट केलेल्या मतांच्या सत्याविषयीं बहुतेक लोकांची खात्री होऊन पूर्वी ज्या दिशेनें लोकमताचा प्रवाह वाहत होता तिकडून फिरून इष्ट दिशेस तो वळणें, ह्या गोष्टी पूर्वी प्रसिद्ध झालेल्या दुसऱ्या कोणत्याहि राजकीय विषयावर लिहिलेल्या ग्रंथाच्या योगानें झाल्या असतील किंवा काय ह्याचा संशय आहे. प्रसिद्धीप्रमाणें पुस्तकाचा खपहि जारीनें झाला. एका वर्षाच्या आंतच त्याची अकरावी आवृत्ति निघून इंग्लंडमध्यें १९,००० हजार आणि फ्रान्समध्यें १३००० हजार प्रती खपल्या. हल्लीं पुस्तकें विकत वाचण्याची जी अभिरुचि इंग्लंडांत आहे तिच्या तृतीयांशसुद्धां त्यावेळीं नव्हती, ह्याचा विचार केला असतां हें पुस्तक किती लोकप्रिय झालें होतें, ह्याची कल्पना करतां येईल. पुस्तक प्रसिद्ध होतांच अतिशय कठिण विषयाचा उहापोह करण्याचें जें सामर्थ्य त्यांत दिसून आलें, त्याबद्दल चोहोंकडून त्याचें अभिनंदन झालें. राजेरजवाड्यांना तर बर्क आपल्या हक्कांचा पुरस्कर्ता आहे असें वाटूं लागलें. जर्मनीच्या बादशहानें आपल्या प्रधानाकडून आपली पूर्ण मान्यता त्यास कळविली. त्याचेंच अनुकरण फ्रान्सच्या राजानें आणि रशियाच्या कॅथराईन

क्र. नं. ३३८

राणीनें केलें. असें म्हणतात कीं, सोळाव्या लुईनें ह्या जगत्प्रसिद्ध ग्रंथाचें भाषांतर करून आपल्या हातानें तें लिहिलें. इंग्लंडच्या तिसऱ्या जॉर्जनें तें पुस्तक फार लक्ष लावून वाचलें व पुष्कळशा प्रती चांगल्या सुरेख बांधवून आणून भेटावयास आलेल्या विशेष परिचित मित्रास एकेक प्रत तो नजर करी, आणि सांगे कीं, प्रत्येक गृहस्थानें वाचलेंच पाहिजे असें हें पुस्तक आहे. पोलंडच्या राजाचा व बर्कचा प्रत्यक्ष परिचय होता; त्यानें मान्यतासूचक म्हणून सुवर्ण पदकावर काढलेली आपली प्रतिमा बर्कला पाठवून दिली. डब्लिन येथून विश्वविद्यालयांत बर्कचें शिक्षण झालें होतें. त्या विश्वविद्यालयाला ह्यावेळीं आपल्या विद्यार्थ्याचा योग्य अभिमान वाटून त्यास बहुमानपुरःसर एल्‌एल्. डी. ची पदवी देण्यांत आली; व नंतर त्यानें केलेल्या कामगिरीबद्दल कृतज्ञताबुद्धिसूचक सोन्याच्या पेटींत घालून एक मानपत्रहि त्यास देण्यांत आलें. त्याचप्रमाणें ऑक्सफर्ड येथील पदवीधरांनींसुद्धां त्याला एक मानपत्र दिलें. बहुतेक धर्माध्यक्ष फ्रान्समधील जमीनदार व संपन्न लोक आणि कित्येक राजकारणी विद्वान् लोक, ह्यांजकडून आभार आणि कृतज्ञता दर्शविणारीं शेकडों पत्रें त्यास आलीं. गिबन, कंबर्लंड, अर्स्किन वगैरे विद्यासंपन्न व नांवाजलेल्या ग्रंथकारांनीं ह्या पुस्तकाची योग्य स्तुति केली आहे. मागें सांगितलेंच आहे कीं, 'विचार' प्रसिद्ध होण्यापूर्वीं फ्रेंच लोकांचा स्तव करण्यांत सर्व इंग्लिश राष्ट्र व्यग्र होतें, पण त्यापैकीं आतां निम्मे तरी ह्या वृद्धसेनानीच्या पताकेला येऊन मिळाले. अमेरिकन वसाहतवाल्यांवरचे आपले सार्वभौम हक्क जराहि कमी न करण्याविषयीं जे सारखे धडपडत होते; व त्या धडपडींत दैवयोगानें अखेरीस भूमिलुंठन करण्याचा प्रसंग ज्यांवर कोसळला, त्यांनींच आतां परस्पर चाललेल्या स्वातंत्र्यसंपादनाच्या प्रयत्नाचें कौतुक करावें हें त्रयस्थाला विसंगत वाटणें स्वाभाविक आहे. परंतु मनुष्यस्वभावच असा आहे, हें विसरतां कामा नये; जडसृष्टींतील चालू शतकाच्या सुधारणेच्या अतर्क्य प्रगतीच्या मानानें पाहतां मनुष्याच्या अजड वृत्तींत फारसें स्थित्यंतर झालेलें दिसत नाहीं, हें मोठ्या कष्टानें नोंदून ठेवावें लागतें. कांहींहि असो, बर्कच्या ग्रंथानें इष्ट हेतु सिद्धीस नेला. एकाच ओघानें वाहत असलेलें राष्ट्र आतां दुभंगलें. बर्कच्या विचारसरणीच्या यथा-

र्थत्वाविषयीं बऱ्याच लोकांची खात्री झाली, व ते फ्रेंच लोकांच्या कृत्यांविषयीं बरेच आक्षेप घेऊं लागले. ह्याप्रमाणें बर्कचें अभिनंदन करणारी मंडळी जशी पुष्कळ निघाली, तशी त्याजवर तुटून पडणारीहि मंडळी कमी नव्हती. पुस्तक प्रसिद्ध होतांच त्यांतील मतें खोडून काढण्याचा पुष्कळांनीं प्रयत्न केला. अपशब्दांचा तर वर्षाव होऊं लागला, अत्यंत पवित्र मानलेल्या स्वातंत्र्य-तत्त्वांवर बर्कचे प्रहार चालले आहेत, असें समजून त्याची अवहेलना होऊं लागली, स्वातंत्र्यपताका अक्षत राहण्याकरितां अमेरिकन व हिंदुस्थानवासी लोक ह्यांच्या प्रीत्यर्थ आपलें बुद्धिसर्वस्व खर्चून व लोकनिंदेला न डगमगतां, निव्वळ आपलें कर्तव्य म्हणून स्तुत्य उद्योग ज्यानें केला त्यानेंच आतां शेजा-रच्या लोकांच्या मनांत उपजलेला कोमल स्वातंत्र्यांकुर कुसकरून टाकण्याचा प्रयत्न करावा, ह्याचा उलगडा सामान्य जनांस पडेना. म्हणून बर्कनें आपलीं मतें बदललीं, असा त्याजवर आरोप लादण्यांत आला. पाठीमागील भाषणें व लेख चाळून त्यांच्या दृष्टीनें असलेलीं परस्परविरुद्ध मतें लोक प्रसिद्ध करूं लागले.

वास्तविक पाहतां बर्कच्या पूर्वींच्या व हल्लींच्या मतांत रेसभरसुद्धां विरोध आढळणार नाहीं. तो निःसंशय स्वतंत्रताप्रिय होता. पण ती स्वतंत्रता मन-सोक्त नसून समाजनियंत्रित होय. हा भेद साधारण लोकांना न समजल्यामुळें बरीच निष्कारण टीका झाली आहे. इ० स० १७७४त आपल्या मतदार लोकांस व अन्यत्र त्यानें स्पष्ट सांगितलें आहे कीं, सुव्यवस्था व न्याय ह्यांच्याशीं स्वतंत्रतेची फारकत करून कधींहि चालणार नाहीं. तेव्हां स्वातं-त्र्याच्या मोहक शब्दाखालीं जेणेंकरून निरपराधी रक्ताच्या नद्या वाहूं लागल्या व कायदेशीर रीतीनें मिळविलेल्या मालमत्तेची लूट होऊं लागली, अशा प्रका-रच्या स्वातंत्र्याची तरफदारी करण्याची कल्पनासुद्धां त्यास अत्यंत गर्हणीय वाटावी ह्यांत नवल नाहीं.

बर्कला मरून आज सवाशें वर्षें होऊन गेलीं; तथापि त्याच्या फ्रान्सच्या राज्यक्रांतीविषयींच्या विचारांचा खल अद्यापि चाललाच आहे. तो जीवंत असतां जसा मतभेद होता, तसा अद्यापिहि आहेच; व जोंपर्यंत समाजशास्त्र पूर्णावस्थेस पोंचलें नाहीं व समाजरचना आणि समाजक्रांति ह्यांवर लोकांची

निर्णयात्मक मतें ठरलीं नाहीत, तोंपर्यंत बर्कच्या 'विचारां'बद्दल एकमत होण्याचा संभव नाहीं. पुस्तक प्रसिद्ध होतांच दुराग्रहानें व उतावीळपणानें अविचारी लोकांनीं जे आक्षेप घेतले, ते आतां शांतपणानें व अकलुषित बुद्धीनें विचार करणाऱ्या ह्या पिढींतील लोकांनीं अर्थातच सोडून दिले. परंतु हल्लीं लोक जो आक्षेप घेत आहेत, व पुढें कित्येक वर्षे घेत राहतील, तो हा कीं, फ्रेंच लोकांसारख्या पराकाष्ठेच्या विपन्नावस्थेंत असलेल्या लोकांनीं आपल्या मार्गांत आड येईलसें वाटेल तें छाटून टाकून बंड करण्यास प्रवृत्त होणें हें स्वाभाविक आहे किंवा नाहीं ? आमच्या मतें, आपमतलबी व अव्यवस्थित राजयव्यवस्थेमुळें फ्रेंच लोकांचे हाल कुत्रा खात नव्हता अशी स्थिति होती हें खरें आहे. आणि त्याचा परिणाम "न हि कामात्मना राज्ञा सततं कामबुद्धिना। नृशंसेनातिलुब्धेन शक्यं पालयितुं प्रजाः ॥" ह्या भगवद्वचनाप्रमाणें राजबंधनें झुगारून देण्यास प्रजेची प्रवृत्ति होणें हाच होय. गोगलगाय प्रजेच्या अंगींसुद्धां जुलमाची परमावधि झाली असतां त्याचा प्रतीकार करण्याची अनपेक्षित विलक्षण स्फूर्ति येते. अशा क्षुब्ध झालेल्या प्रजेच्या मनांत ईश्वरांश मानलेल्या राजमूर्तीलाहि देहांत प्रायश्चित्त देण्याची कल्पना यावी हेंहि, अगदीं स्वाभाविक आहे. प्राचीन हिंदुस्थानांत वेन राजाच्या वेळीं असाच प्रकार झाला; आणि अगदीं नुकतें घडलेलें इंग्लिश लोकांचें उदाहरण डोळ्यापुढें ठेवून, फ्रेंच लोकांनीं त्याचेंच अनुकरण केलें. प्रजेची ही स्वाभाविक प्रवृत्ति सांगून भागवतांतहि राजवर्गाला सावध केलें आहे. त्यांत म्हटलें आहे "सर्वाभिशंकी नृपतिर्यश्च सर्वहरो भवेत्। स क्षिप्रमनृजुर्लुब्धः स्वजनेनैव बध्यते ॥. अन्यायामुळें किंवा सोशिकपणामुळें घालवलेली स्वतंत्रता पुनः संपादन करण्याची आपल्या अंगांत धमक आहे, असें फ्रेंच लोकांनीं सर्व जगास दाखविलें, ह्याबद्दल त्यांस कोणासहि दोष देतां येणार नाहीं; व ही गोष्ट बर्कलाहि मान्य आहे, हें मागें दिलेल्या त्याच्या पत्रांतील उताऱ्यावरून उघड होत आहे. त्या अज्ञ जनतेला सोडून देऊन बर्कनें आपलें शस्त्र पुढाऱ्यांवर उपसलें आहे. परंतु ह्यावरून ही राज्यक्रांति मूठभर लोकांनीं घडवून आणली असेंच बर्कला वाटत होतें, व त्यांच्या नायकांनीं तीं कृत्यें केलीं म्हणून दिसण्यांत दिसतें तीं वस्तुतः त्यांचीं नसून दुरवस्थित समाजघटनेमुळें

सहजच उत्पन्न झालेल्या अनिवार्य मनोविकारांना वश झालेल्या एकंदर राष्ट्रानें तीं त्यांना करावयास लावलीं, ह्याची कल्पनासुद्धां बर्कला नव्हती, असें टीकाकारांचें म्हणणें आहे. बर्कच्या सामान्य सिद्धांताविरुद्ध ब्र काढण्यास जरी कोणास जागा नाहीं तरी, ते फ्रेंच लोकांना लागू पडत नसल्यामुळें निष्कारण होत, असें ह्या आक्षेपकांचें मत आहे. त्याचप्रमाणें फ्रान्स देशाविषयीं व फ्रेंच लोकांविषयीं कांहीं माहिती नसल्याकारणानें फ्रेंच राज्यक्रांतीविषयीं व्यापक व सूक्ष्म रीतीनें त्यानें विचार केला नाहीं, असाहि आरोप सर्वत्र केलेला आढळतो ! हजारों कोसांवर असलेल्या खंडप्राय देशांतील भिन्न भाषेच्या, भिन्न रीतिरिवाजांच्या कोट्यवधि प्राणिसमूहाची, दळणवळण मंद असतांहि अचाट माहिती ज्यानें करून घेतली, अमेरिकेविषयीं बोलत असतांना तेथील व्यापारासंबंधीं इंग्लंडांत दुसऱ्या कोणासहि इतकी माहिती नव्हती असा ज्यानें लौकिक संपादला, त्याला टीचभर अंतरावर असलेल्या फ्रेंच समाजाची कांहींच माहिती नव्हती, असें मानण्यास विकारहीन मनुष्यास फार कठिण पडेल ह्यांत संशय नाहीं. इतःपर असह्य भासणाऱ्या जुलमांखालीं चिरडून जाणाऱ्या फ्रेंच लोकांची ह्या यातनांतून मुक्त होण्याची स्फूर्ति तेवढ्यापुरतीच असती, अथवा जुनें म्हणून जेवढें होतें, तेवढ्याचा उच्छेद करून अमानुष कृत्यें करण्याचें कारण केवळ अन्यायानें उत्पन्न झालेला अनिवार्य उद्वेगच असता, तर फ्रेंच लोकांची प्रशंसा करणें अगदीं वाजवी होतें. बुद्धिपुरःसर शास्त्रीय तत्वांवर जुन्याचा समूळ विध्वंस करण्यास व तो करतेवेळेस अक्षम्य उपाय योजण्यास, गारुड्याच्या साहेबी टोपीप्रमाणें आपणांस वाटेल तसा समाज बनवूं पाहणारे लोक उद्युक्त झाले ह्या गोष्टीवर मुख्यतः बर्कचा कटाक्ष होता. फ्रान्समध्यें ह्या वेळेस विद्याप्रसार बराच झाला होता. तो इतका कीं, दुर्बोध अशा शास्त्रीय विषयांवरील नांवाजलेल्या विद्वानांचीं भाषणें ऐकण्यास स्त्रियांचीहि गर्दी होत असे. निरनिराळ्या शास्त्रीय विषयांवर नवीन शोध लावून फ्रेंच लोकांनीं इतर राष्ट्रांतील पूज्य विद्वानांच्या पंक्तीस आपणांस बसवून घेतलें होतें; परंतु ह्या लोकशिक्षणांत धर्मशिक्षणाचा अगदीं लोप झाला होता, इतकेंच नव्हे, तर प्रचलित धर्माचा उपहास करण्यांत मिळालेल्या शिक्षणाचा उपयोग होत असे. मनुष्याला दुर्वर्तनापासून पराङ्मुख

करणारी धर्मबुद्धि, व्हॉल्टेअर, रूसो वगैरे नास्तिक ग्रंथकारांच्या लेखांनीं फ्रेंच लोकांच्या अंतःकरणांतून अजिबात नष्ट झाली होती, अशा ग्रंथकारांच्या उपदेशानें वहकलेल्या लोकांनीं खून करून रक्ताचे पाट वाहविले. नवीन तऱ्हेनें प्रतिपादन केलेल्या राजकीय तत्वांचा फ्रेंच लोकांच्या मनावर जबरदस्त परिणाम झाल्यामुळें त्यांच्या मनाची प्रवृत्ति बंड करण्याकडे लवकर झाली. राजा व प्रजा ह्यांचा अन्योन्यसंबंध कसा आहे, ह्या विषयाकडे त्यावेळेस लोकांचें लक्ष फार जाऊं लागलें होतें. राजा म्हणजे ईश्वरी अंश आहे, तेव्हां त्याच्या इच्छेविरुद्ध चालणें म्हणजे महत्पाप होय, असा समज पूर्वी होता; व इंग्लंडमध्यें जेम्स राजाच्या कारकीर्दींत राजपक्षीय लोक अशा मतांचें उघड उघड प्रतिपादन करीत असत. ईश्वरी अंशाच्या मिषानें ईश्वरापासून राज्य करण्याचा हक्क प्राप्त झाला आहे ह्या निमित्तानें स्वतः ईश्वराला अनभिमत असें पापाचरण करून प्रजेचा छळ राजांकडून होऊं लागला म्हणजे, अर्थातच त्याच्या ईश्वरी अंशत्वाची लोकांस शंका उत्पन्न होते; त्यांचा विश्वास उडतो; व राजाकडे राजत्व कसें आलें, हें शोधून काढण्याकडे मनाची प्रवृत्ति होते. प्रसिद्ध इंग्लिश तत्ववेत्ता लॉक ह्यानें ह्या विषयाचें विवेचन करून पुढें लिहिल्याप्रमाणें प्रतिपादन केलें आहेः—' ईश्वरानें दिलेल्या हक्कामुळें राजाला हा मान मिळाला नसून, लोकांनीं आपण होऊनच तो दिला आहे, व तो देतेवेळेस त्यांनीं कांहीं अटी त्याच्यावर लादल्या आहेत. राजा व प्रजा हा संबंध करारानें उत्पन्न झाला आहे. करितां, एका पक्षानें करारांचें उल्लंघन केल्यास दुसऱ्या पक्षास तो मोडण्याचा पूर्ण हक्क येतो. एकंदर समाजाच्या कल्याणाकरितां लोकांनीं आपखुषीनें आपले हक्क सोडले आहेत. समाज म्हणजे प्रत्यक्ष व्यक्ति नाहीं. म्हणून समाजांतील निरनिराळ्या व्यक्तींकडून समाजाला जो अधिकार प्राप्त झाला, तो बजावण्याकरितां राजाची योजना झाली. समाजापासून राजाला अधिकार प्राप्त झाल्याकारणानें समाजाचें ज्यांत निःसंशय अहित, तें करण्याचा हक्क राजास पोंचत नाहीं. राजा समाजाकडून निवडला गेला असल्यामुळें त्यास वाटेल तेव्हां पदच्युत करण्याचा हक्क समाजास आहे.' इत्यादि इत्यादि.

कमावलेल्या जमिनींत बीं रुजून फलोद्गम होण्यास ज्याप्रमाणें विलंब लागत नाहीं, त्याप्रमाणें फ्रेंच लोकांची राजकीय स्थिति व मनःस्थिति वर निर्दिष्ट केलेल्या मतांचा प्रसार होण्यास सर्वथैव अनुकूल होती. रूसो, व्हॉल्टेअर वगैरे ग्रंथकारांनीं राजकीय व धार्मिक विषयांवर लिहून लोकांचीं मनें बंड करण्यास परिपक्क करून ठेविलीं होतीं. तेव्हां द्रवहीन तृणावर ठिणगी पडतांच वायूच्या साहाय्यानें चोहोंकडे वणवा भडकतो, त्याप्रमाणें फ्रेंच लोकांची स्थिति झाली. समाजघटना अस्तित्वांत कशी आली, राजकीय धर्म एकाकडेस देण्याची आवश्यकता कशी व कां उत्पन्न झाली वगैरे विषयासंबंधीं कोणतेहि ठाम मत बर्कला पसंत नव्हतें. आणि फ्रान्स देशांतील राज्यक्रांतीचा पाया अशा मतांवर उभारला असल्यामुळें अर्थातच तींहि त्यास संमत नव्हती. ह्या दोन कारणांमुळेंच मुख्यत्वेंकरून बर्कला फ्रान्सची राज्यक्रांति नापसंत आहे. राज्यक्रांति घडवून आणतेवेळेस नास्तिकपणानें क्रूर कृत्यें करण्यास जर फ्रेंच लोक उद्युक्त झाले नसते, तर फार दिवस हाल सोशीत असलेल्या गरीब लोकांविषयीं बर्कचें सहृदयत्व निःसंशय दिसून आलें असतें. समाजबंधनें कायम राहण्यास धर्माची फार आवश्यकता आहे, किंबहुना समाजाचा दृढ पायाच धर्मबुद्धीवर रचला गेला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. म्हणून धर्माला फांटा दिलेले लोक समाजांत राहण्यास अयोग्य आहेत असें त्याच्या मनानें घेतलें होतें. ह्याचप्रमाणें हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, बर्कचें काम न्यायाधीशाचें अथवा शांतवृत्तीनें गतवृत्ताचा इतिहास लिहिण्याचें नव्हतें. स्वातंत्र्याच्या चुकीच्या कल्पना लोकांत शिरल्या आहेत, व अनियंत्रित स्वातंत्र्याभिलाषी मंडळीचा गोट वाढतो आहे, हें तो जाणून होता. फ्रान्समध्यें तर त्याचे दुष्परिणाम प्रत्यक्ष दृग्गोचर झाले, व ही सर्वस्वाहा करणारी लाट उसळत उसळत सगळ्या यूरोपभर पसरून तेथील शांतता गिळंकृत करते कीं काय, अशी त्यास धास्ती पडली असावी. तसेंच बर्कच्या टीकाकारांनीं आणखी एक गोष्ट लक्षांत घेतली नाहीं, ती ही कीं, अपरिहार्य म्हणून झालेली राज्यक्रांति, मोठ्या कष्टानें मान्य करणें हें निराळें व तिची उघड प्रशंसा करून, अनवश्यक स्थळीं ही कृति अनुकरणीय म्हणून लोकांना भासविणें हें निराळें. पिट व फॉक्स ह्यांसारख्या लोकाग्रणींनीं भयोत्पादक फ्रेंच कृत्यांचें मंडन करून त्यांचा फाजील जयजयकार केल्यामुळें बर्कला उलट बाजूचें इतक्या

नेटानें समर्थन करावें लागलें, आणि ह्मणूनच ही स्वयंदत्त वकिली पतकरून फ्रेंच राज्यक्रांतीची दुष्ट बाजू तेवढी त्यास चितरावी लागली; हें त्याच्या ह्या सर्वमान्य ग्रंथाच्या अखेरीस त्यानें जे उद्गार काढले आहेत, त्यावरून उघड होतें. तो म्हणतो—'मला ह्या सभेच्या अश्रांत श्रमांत प्रशंसार्ह असें कांहींच दिसत नाहीं, इतका मी विचारशून्य आहे काय ? क्रौर्याचीं व मूर्खपणाचीं असंख्य कृत्यें करतांना कांहीं कल्याण झालें असेल, हें मला नाकबूल नाहीं. जे लोक सरसकट सगळ्याचा विध्वंस करतात, त्यांच्याहातून निःसंशय कांहीं अंशीं दुःखाचा परिहार होईल. जे लोक सर्व कांहीं नवीन करितात, त्यांच्याकडून थोड्या तरी हितावह गोष्टी होण्याचा संभव आहे. लुबाडलेल्या अधिकाराच्या जोरावर त्यांनीं केलेल्या कृत्यांची वाहवा करावयाची असेल, अथवा ज्या अपराधांच्या साहाय्यानें त्यांनीं सत्ता प्राप्त करून घेतली, त्या अपराधांची क्षमा करावयाची असेल तर असें दिसलें पाहिजे कीं, त्यांनीं केलेलें हित अशी क्रांति घडवून आणल्याशिवाय करितां आलें नसतें ...... राष्ट्रीयसभेनें केलेली सुधारणा फारच सूक्ष्म आहे; पण तिच्या चुका मात्र गंभीर आहेत. त्या चुका कितीहि असोत; मला वाटतें, आमच्या राज्यव्यवस्थेंत सुधारणा करण्याकरितां, फ्रेंच लोकांचा कित्ता गिरविण्यापेक्षां माझ्या देशबंधूंनीं आपल्या शेजाऱ्यांनाच ब्रिटिश राज्यव्यवस्थेचें अनुकरण करण्याची शिफारस करावी हें बरें.' आणि अखेरीस तो म्हणतो 'ज्या गलबतांत मी बसलों आहे, तें एकाच बाजूवर सर्व भार पडल्यामुळें जेव्हां कलण्यास लागेल तेव्हां त्या गलबताचा समतोलपणा कायम राखण्याकरितां माझ्या बुद्धीचें वजन, मग तें कितीहि अल्प असेना, दुसऱ्या बाजूस टाकण्याची माझी इच्छा आहे.'

स्वातंत्र्यद्वेष्टा म्हणून बर्कवर आरोप आणणाऱ्यांस ह्याच ग्रंथांत उत्तर सांपडेल. तो लिहितो 'माझी अशी समजूत आहे कीं, दुसऱ्या कोणत्याहि मनुष्याप्रमाणें पाणीदार, नीतियुक्त व मर्यादाबद्ध स्वातंत्र्यावर माझेंहि प्रेम आहे. आणि कदाचित् माझ्या सर्व राजकीय चळवळींत तत्संबंधीं दाखलेहि मिळतील. परंतु अवांतर गोष्टींचा विचार न करितां, स्वातंत्र्याच्या दुष्कर अशा

शुष्क तत्वांच्या आधारानें मनुष्याच्या कृत्यांची प्रशंसा अथवा निंदा माझ्यानें कधींहि होणार नाहीं. ज्या गोष्टींची किंमत कांहीं गृहस्थांजवळ मुळींच नसते, त्याच गोष्टींपासून वस्तुतः प्रत्येक राजकीय चळवळीला विशिष्ट स्वरूप प्राप्त होतें. सामान्यतः बोलावयाचें म्हटलें म्हणजे, स्वतंत्रतेप्रमाणेंच राजसत्ताहि चांगली आहे. तथापि दहा वर्षांमागें, कोणत्या रीतीनें राज्यकारभार चालला आहे, ह्याची चौकशी केल्याशिवाय नुसती राजसत्ता असल्याबद्दल फ्रान्सचें अभिनंदन मी केलें असतें काय? स्वातंत्र्याबद्दल त्याच राष्ट्राचा गौरव आतां मला करतां येईल काय? सामान्यपणें स्वातंत्र्याची गणना मनुष्यमात्राच्या सुखांत करितां येईल एवढ्याच करितां, संरक्षण करणाऱ्या निर्बंधांतून आणि हितकारक अंधारकोठडींतून निसटून जाणाऱ्या वेड लागलेल्या मनुष्याचें, स्वातंत्र्य व प्रकाश ह्यांचा उपभोग पूर्ववत् त्यास मिळाला म्हणून मी अभिनंदन करावें काय? तुरुंग फोडून पळून जाणाऱ्या खुनी किंवा दरोडेखोराची, त्यानें आपले नैसर्गिक हक्क पुनः मिळविले म्हणून मी प्रशंसा करावी काय?

प्रजासत्ताक राज्यकारभार करूं पाहणाऱ्या फ्रेंच मुत्सद्यांचे बालिश व कोते विचार बर्कनें जागोजाग खोडून टाकिले आहेत, व त्यावरून फ्रान्ससारख्या मोठ्या देशाचा जबाबदारीचा राज्यकारभार चालविण्यास ते किती अयोग्य आहेत, हें त्यानें चांगलें व्यक्त केलें आहे. तो म्हणतो "पार्लमेंटमध्यें फ्रान्सचे चॅन्सलर म्हणाले कीं, सर्व धंदे सारखेच संमाननीय होत." प्रामाणिकपणें कोणताहि धंदा करणारा तिरस्करणीय होत नाहीं, इतकेंच जर त्यांनीं म्हटलें असतें, तर विशेष सत्योल्लंघन झालें नसतें; परंतु कोणताहि धंदा संमाननीय आहे, असें सांगतांना त्या धंद्याला आपण मान देतों. चांभाराच्या किंवा शिंप्याच्या धंद्यानें कोणत्याहि मनुष्याला अभिमान मानतां येणार नाहीं. मग ह्याहिपेक्षां खालच्या धंद्याची गोष्ट एकीकडेच राहिली. असल्या धंद्याच्या लोकांचा राजपक्षानें छल करतां कामा नये; परंतु असल्या लोकांना व्यक्तिशः किंवा समूहानें जर राज्यकारभार करूं दिला, तर मात्र देशाचें नुकसान होतें. ह्यामध्यें आम्हीं लोकांचें विचारपंगुत्व नाहींसें करीत आहों, असें तुम्हांला वाटतें; पण वास्तविक तुम्ही सृष्टिनियमांशीं तंटा करीत आहां; परंतु एवढ्यावरून सर्व

अधिकार, सत्ता व मानमरातब, उच्च कुलांतील मोठ्या नांवाच्या बड्या लोकांनाच मिळावा अशी माझी इच्छा आहे, अशी कल्पना करूं नका. राज्यकारभार सोंपविण्यास सद्‌गुण व शहाणपण ह्यांव्यतिरिक्त दुसरा गुण नाहीं. कोणत्याहि स्थितींत, धंद्यांत अगर व्यापारांत जेथें जेथें हे गुण प्रत्यक्ष आढळतात, तेथें तेथें मनुष्यमात्रापासून मान व योग्यता मिळविण्यास त्यांच्याजवळ स्वर्गाचा खलिताच असतो. जें राष्ट्र सेवा करण्याकरितां जन्म घेतलेल्या सद्‌गुणी व बुद्धिमान लोकांचा उपयोग करून घेणार नाहीं अथवा राष्ट्राचें वैभव व तेज वृद्धिंगत करणारें प्रत्येक साधन जेथें अज्ञात स्थितींत पडतें, त्या राष्ट्रास धिक्कार असो ! त्याचप्रमाणें अगदी विरुद्ध बाजूस जाऊन, जेथें क्षुद्र शिक्षण, कोत्या दृष्टीनें विचार करण्याची सवय, कोणताहि तुच्छ भाडोत्री धंदा, हींच अधिकार मिळण्यास विशेष साधनीभूत होतात, त्या राष्ट्राचीसुद्धां स्थिति वरच्यासारखीच शोचनीय होय. कोणतेंहि कृत्य करणें तें उघड रीतीनें करावें हें खरें; पण त्यांत मनुष्याच्या बुद्धिसामर्थ्याकडे दुर्लक्ष होतां कामा नये. महत्वाच्या असंख्य बाबींचा ज्या राज्यांत विचार करावा लागतो, तेथील राज्यकारभार क्रमाक्रमानें प्रत्येक मनुष्याला अधिकार देऊन, अथवा सोडतीनें दैववशात् ज्याचें नांव येईल त्याच्या पदरीं राष्ट्राचें प्रमुखत्व बांधून, किंवा अशाच तऱ्हेच्या दुसऱ्या कोणत्याहि निवडणुकीनें मुत्सद्दीमंडळ बनवून, चांगल्या रीतीनें करतां येणार नाहीं. कारण, असल्या पद्धतींत, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणें सोंपविल्या जाणाऱ्या कामाच्या महत्वाच्या मानानें मनुष्याची निवड होत नाहीं. अज्ञान स्थितींतून सत्तापूर्ण उच्च पदास जाण्याचा मार्ग अगदीं सुगम असतां कामा नये, आणि सहजरीत्या प्राप्त होण्यासारखाहि असतां कामा नये, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. दुष्प्राप्य वस्तूमध्यें उत्कृष्ट गुण जर फारच दुष्प्राप्य असेल, तर त्याची कांहीं तरी परीक्षा झालीच पाहिजे. सन्मानालय उच्च स्थानावरच बांधलें पाहिजे. जर त्याचे दरवाजे सद्‌गुणास उघडे असतील, तर सद्‌गुणाची परीक्षा दुर्धर प्रसंगाशिवाय कधींहि होत नाहीं, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

कोणत्याहि राष्ट्राचा राज्यकारभार योग्य रीतीनें चालण्यास विद्यासंपन्न माणसांप्रमाणें धनाढ्य लोकांचाहि त्या राज्यव्यवस्थेंत अंतर्भाव होणें अवश्य आहे.

असें झाल्याशिवाय मालमत्तेचें संरक्षण बरोबर होणार नाहीं. मुख्यत्वेंकरून मनुष्यमात्राची मालमत्ता सुरक्षित रहावी, म्हणूनच राज्यव्यवस्था अमलांत आली आहे. एवढ्याकरितां देशांतील मोठमोठ्या जमीनदार लोकांना न जुमानतां, ज्या राज्यव्यवस्थेंत नुसत्या बुद्धीलाच वर्चस्व देण्यांत येतें, ती व्यवस्था सदोष होय. नवीन फ्रेंच मुत्सद्यांनीं ह्या सामान्य गोष्टीकडे अगदी दुर्लक्ष केलें होतें, म्हणून बर्कला तीच गोष्ट सकारण सांगावी लागली. तो म्हणतोः—"राष्ट्रांत ज्या पद्धतीच्या योगानें ज्ञानसंपन्न लोकांप्रमाणें जमीनदार लोकांच्या तर्फे प्रतिनिधि निवडून येत नाहींत, अशी कोणतीहि पद्धति पुरी व योग्य नाहीं. परंतु ज्याअर्थी विद्यासंपन्न लोक जात्याच उत्साही व चपल असतात आणि जमीनदार लोक आळशी, थंड, आणि भित्रे असतात, त्याअर्थी संख्येनें पुष्कळ असल्याशिवाय ह्या तरतरीत मुत्सद्यांच्याहातून त्यांस कधींहि उपद्रव झाल्याशिवाय राहणार नाहीं. त्याचप्रमाणें लहान मोठ्या ऐपतदार लोकांच्या तर्फेहि प्रतिनिधि आले पाहिजेत; नाहींतर जमीनदार लोकांच्या हक्कांचें संगोपन योग्य रीतीनें होणार नाहीं. संपादन व संरक्षण ह्या दोन गोष्टींमुळें मालमत्तेचा हा धर्मच होऊन बसला आहे कीं, ती कधींहि सारखी असत नाहीं म्हणून लोभाविष्ट व मत्सरी लोकांच्या हातून ह्या जमीनदार लोकांवर कोणतेंहि संकट ओढवणार नाहीं, अशी खबरदारी घेतली पाहिजे. श्रीमंत लोकांच्या संपत्तीएवढीच संपत्ति, पण तिची वाटणी सृष्टिनियमानुसार पुष्कळांमध्यें झाल्याकारणानें तिच्याकडून तोच कार्यभाग होत नाहीं. जशी जशी तिची वांटणी होते, तसें तसें तिचें आत्मसंरक्षण करण्याचें सामर्थ्य कमी कमी होतें. ह्या नैसर्गिक वांटणीनें दुसऱ्याचा संचय लुबाडून आपल्याला पुष्कळ मिळेल असें मनुष्याच्या उत्कट इच्छेला वाटतें त्याच्यापेक्षां त्याच्या वाटणीस कमी येतें. पण खरोखर संख्येनें कमी असणाऱ्या श्रीमंत लोकांना लुटलें, आणि त्यांची जिंदगी असंख्य गरीब लोकांस वांटली, तर प्रत्येकाला कल्पना करतां येणार नाहीं इतका लहान वाटा येईल. पण हा हिशोब ह्या धनाकांक्षी जनसमूहाला समजत नाहीं.

"आपल्या वंशजांना आपली मिळकत कायम ठेवण्याचा हक्क फारच फायदेशीर व महत्त्वाचा आहे, त्यामुळें खुद्द समाजाच्या चिरस्थायित्वालाहि बळकटी

९५०७ पा. २५ १९।६।११

येते. आपल्याअंगीं ह्या एक प्रकारचा दोष असतांहि, तो सद्गुणाच्या कामीं पडतो. कारण, आपल्या लोभिष्ट स्वभावावर परोपकाराचें कलम बांधतां येतें. पिढीजाद संपत्ति व तद्द्वारा प्राप्त होणारी मानमान्यता, ह्यांचे मालक हेच त्या संक्रमणाबद्दल योग्य जामीन आहेत. ह्याच तत्त्वावर आमच्यामध्यें हाऊस ऑफ लॉर्ड्स ही संस्था स्थापन झाली आहे. त्यांत पिढीजाद श्रीमंत व नांव-लौकिकवाले असेच बहुतेक लोक आहेत. आणि म्हणूनच ही सभा कायदे करणाऱ्या मंडळीचा तिसरा भाग केली आहे. हाऊस ऑफ कॉमन्स-मध्यें देखील वस्तुतः ह्याच वर्गांतील प्रतिनिधि बरेच असतात. ह्या बड्या जमीनदार लोकांपैकीं कांहीं उत्तमांत मोडण्याचा संभव आहेच. पण ते कसेहि असोत; निदान एवढें तरी खरें कीं, राष्ट्ररूपी नौकेचा समतोलपणा कायम राखण्याचें तें साधन आहे. कारण, जरी पिढीजाद संपत्ति व तिच्याबरोबरच मिळणारी मानमान्यता ह्यांची, लांगूलचालन करणारे आर्जवी व सामर्थ्यापुढें दिपून जाऊन स्तुतिपाठ करण्यांत व्यग्र झालेले क्षुद्र लोक फाजील पूजा करतात, तरी गर्विष्ठ, अविवेकी व ज्ञानाची घमेंड बाळगणारे डौली लोक त्यांचा मूर्खपणानें उपमर्द करतात. मोठ्या घराण्यांत जन्मलेल्या लोकांचा योग्य मान ठेवणें, त्यांस कांहींसा थोरपणा देणें, हें मुळींच विलक्षण अन्यायाचें किंवा मूर्खपणाचें नाहीं.'

प्राचीन व अर्वाचीन काळीं मिळून एकंदर तीन प्रकारच्या राज्यव्यवस्था अस्तित्वांत आल्या आहेत. राजसत्ताक, प्रजासत्ताक आणि नियामित राजसत्ताक. राजसत्ताक किंवा एकसत्तात्मक राज्यव्यवस्थेचीं उदाहरणें इतिहासांत पुष्कळ सांपडतात. प्राचीन ग्रीस देशांत स्पार्टा, अथेन्स वगैरे शहरांत प्रजासत्ताक राज्यव्यवस्था असे; नियंत्रित राजसत्तेचें उदाहरण हल्लींचा इंग्लंड देश होय. अनियंत्रित राजसत्ता सांप्रत अगदी निंद्य ठरली आहे. कारण, श्रीरामचंद्रा-सारखे निष्कलंक, प्रजाहितैकतत्पर राजे वारंवार निपजणें दुर्घट. मनुष्यस्वभा-वाच्या दुर्बलतेमुळें सत्ताधीश मनुष्यावर मनोविकारांचा पगडा लवकर बसतो व मग राजा व प्रजा ह्यांचे मार्ग वस्तुतः एकच असतां परस्परविरुद्ध होतात; आणि प्रजेच्या हक्काची राजपक्षाकडून सतत पायमल्ली होते. परंतु ह्यापेक्षांहि

ह्या पद्धतींत विशेष दोष आहे तो हा कीं, राजकीय उलाढालींची माहिती एकाच व्यक्तीला असल्यामुळें बहुतेक लोक राज्यव्यवस्थेविषयीं व राज्यकारभाराविषयीं उदासीन व अज्ञानी असतात. त्याचा परिणाम असा होतो कीं, एका व्यक्तीच्या अपकर्षाबरोबर सर्व राज्य एकदम ढांसळून पडतें. अशा राजकीय हक्कांविषयीं सर्वथैव अज्ञान असलेल्या प्रजेवर जेत्यास मनसोक्त अंमल गाजविण्यास कांहींच अडचण पडत नाहीं. प्रजासत्ताक राज्यांत हा दोष नाहींसा होतो खरा; परंतु दुसऱ्या तऱ्हेनें तीहि पद्धति सदोष राहतेच. सामान्य जनसमूहाचा स्वभाव चंचळ, उतावीळ व अधीर असल्याकारणानें शांतपणें, दूरदृष्टीनें आणि वारंवार गुप्त रीतीनें काम करण्याची जेथें आवश्यकता आहे, अशा राज्यकारभारांत त्यांच्यापासून मदत न होतां, उलट व्यत्यय येतो. त्याचप्रमाणें, अथेन्ससारख्या लहान शहराला कदाचित ही पद्धति चालेल; पण मोठमोठ्या राष्ट्रांच्या कारभाराला ती अगदी अयोग्य आहे. ह्या दोन्हींमधलि अवगुण बऱ्याच अंशीं नियंत्रित राज्यव्यवस्थेनें दूर केले आहेत. एवढ्यावरून ज्या तत्वांवर इंग्लिश राज्यपद्धतीचा पाया रचला आहे, त्या तत्वांविषयीं बर्कला इतका अभिमान कां वाटत असे, व फ्रान्सांत प्रजासत्ताक राज्यव्यवस्था सुरू करणाऱ्या फ्रेंच मुत्सद्यांविषयीं त्याच्या मनांत इतका तिटकारा कां असे तें समजेल. ह्याचसंबंधानें तो म्हणतो—"प्रतिपक्षाचें असें म्हणणें आहे कीं, दोन कोट लोक दोन लाख लोकांना ताब्यांत ठेवूं शकतील. गणिताच्या उदाहरणाप्रमाणेंच जर राज्यकारभार असेल तर हें खरें आहे. अशा प्रकारचा कोटिक्रम सांपडेल त्यास रस्त्यावरील दिव्याच्या खांबावर फांशीं देणाऱ्या फ्रेंच लोकांसच शोभेल. पण शांतपणानें विचार करणारांस तो केवळ हास्यास्पद वाटतो. जनसमूहाची इच्छा आणि हित हीं अनेक वेळां भिन्न असतात."

"सांप्रतची फ्रान्स देशांतील राज्यपद्धति कशांत मोडावी हें मला समजत नाहीं. ती निव्वळ प्रजासत्ताक आहे असा ते लोक बहाणा करतात. मीहि घटकाभर ती तशीच आहे म्हणून घेऊन चालतों. नुसत्या ग्रंथांतर्गत तत्वांवर कोणतीहि राज्यपद्धति मी दोषयुक्त ठरवीत नाहीं. कांहीं प्रसंगीं निव्वळ प्रजासत्ताक व्यवस्था अवश्य व इष्ट असेल. तथापि फ्रान्समध्यें किंवा दुसऱ्या कोण-

त्याहि मोठ्या देशांत ही पद्धति लागू पडेल असें मी समजत नाहीं. आतांपर्यंत आपण पूर्ण प्रजासत्ताक राज्यव्यवस्थेचीं उदाहरणें मुळींच पाहिलीं नाहींत. पूर्वजांना आपल्यापेक्षां त्यांची जास्त माहिती होती. ही राज्यपद्धति ज्यांनीं प्रत्यक्ष पाहिली आहे, त्या ग्रंथकारांप्रमाणेंच माझेंहि मत आहे कीं, शुद्ध प्रजासत्ताक, शुद्ध एकसत्तात्मक राज्यव्यवस्थेपेक्षां अधिक योग्य पद्धति म्हणून गणतां यावयाची नाहीं. ॲरिस्टॉटलनें म्हटलें आहे कीं, 'प्रजासत्ताक राज्यव्यवस्थेचें, झोटिंगपातशाहीशीं बरेंच साम्य आहे. जेव्हां जेव्हां अशा व्यवस्थेंत मतभेद होतो व असे मतभेद वारंवार झालेच पाहिजेत, तेव्हां तेव्हां बहुमत ज्या पक्षाकडे असेल त्या पक्षाच्या हातून कमी पक्षाच्या लोकांवर निर्दय तऱ्हेनें जुलूम होण्याचा संभव आहे,' ह्याविषयीं मला शंका नाहीं. एकाच सत्ताधीशाच्या हातून जो जुलूम होण्याचा संभव आहे, त्यापेक्षां ह्या जुलमाची मर्यादा जास्त असणार; म्हणजे तो पुष्कळांना सोसावा लागणार व तो अधिक त्वेषानें केला जाईल. ह्या प्रजाछलांत व्यक्तिशः हाल सोसणाऱ्यांची स्थिति फारच शोचनीय असते. कारण, राजा निर्दय असेल तर त्यांच्या दुःखाची तीव्रता कमी करण्यासारखी मनुष्यमात्राची अनुकंपा त्यांच्या बाजूला असते. लोकांच्या प्रशंसेमुळें दुःखांतहि त्यांच्या मनाला प्रोत्साहन मिळतें. परंतु बहुजनसमूहाखालीं ज्यांना हाल काढावे लागतात, ते ह्या सर्व बाह्य समाधानाला मुकतात. मनुष्यजातीनेंच जणूं काय ते सोडलेसे दिसतात. त्यांच्याच सर्व जातीनें कट करून त्यांस छळिलें कीं काय असें वाटतें."

लोकसत्तात्मक राज्यव्यवस्थेंत जर कांहीं गुण असेल तर एकसत्तात्मक राज्यव्यवस्थाहि अगदीं टाकाऊ नाहीं. बर्कनें दोहोंची तुलना खालीं लिहिल्याप्रमाणें केली आहे. "राजांना साधनांशिवाय कांहीं करतां येत नाहीं. मदत मिळविण्यांत जो साधनांचा उपयोग करतो त्याच्या वाटेंत व्यत्ययहि येतो, म्हणून त्यांची सत्ता कधींहि अप्रतिहत नसते. त्याचप्रमाणें, आपल्या अधिकाराचा पराकोटीचा दुरुपयोग करून ते निर्भय असत नाहींत. अहंभाव, व्याजस्तुति व घमेंड ह्यांनीं हे लोक कितीहि फुगलेले असले, तरी त्यांस अशी भीति असली पाहिजे कीं, जरी प्रत्यक्ष कायद्याचें बंधन आपल्याला नाहीं, तरी

आपल्या दुष्कृत्यांबद्दल जीवंतपणींच कशा तरी रीतीनें आपल्याला जाब द्यावा लागेल. जर लोकांनीं बंड करून आपणांस छाटलें नाहीं, तर आत्मसंरक्षणार्थ ठेवलेले शिबंदीच आपला गळा कापल्याशिवाय राहणार नाहींत. त्याप्रमाणें फ्रान्सच्या राजाला शिपायांनीं जास्त पगाराकरितां विकल्याचें आपण पाहिलें आहे. परंतु लोकसत्ता जेथें पूर्ण आणि अनियंत्रित असते, तेथें आपल्या कर्तृत्वशक्तीवर लोकांचा विश्वास असतो. त्यांना दुसऱ्याची मदत लागत नाहीं. आपला कार्यभाग त्यांना स्वतःच करतां येतो. उलट, कीर्ति व लौकिक ह्यांची चाड असल्यामुळें व्यक्तीच्या स्वैरवर्तनाचें आपोआपच नियमन होतें. परंतु नांवलौकिक गमावण्याची भीति बहुजनसमूहाला नसते. म्हणून त्यांच्या हातून हवें तें कृत्य घडण्यास कांहींच प्रतिबंध येत नाहीं. राज्यकारभारांत प्रत्येक मनुष्याच्या पदरीं येणाऱ्या अपकीर्तीचा वांटा फारच अल्प असतो. अधिकाराचा दुरुपयोग करणारांची संख्या जितकी जास्त, त्या मानानें त्यांजवर प्रतिकूल टीका करणारांची कमी असते. आपलीं कृत्यें स्वभावतःच त्यांस पसंत असल्याकारणानें सर्वांची त्यांस पसंति आहे असा भास होतो. एवढ्याकरितां प्रजासत्ताक राज्यव्यवस्थेंतील सत्ताधीश अतिशय निर्लज्ज व निर्भीड बनतात. कोणत्याच मनुष्याला शासन होईल ही भीति नसते. आणि खरोखर एकंदर लोकसमूहाला शिक्षा न होणेंच योग्य आहे. कारण ज्याअर्थीं कोणत्याहि मानवी प्राण्याकडून ह्या जनसमूहाला शिक्षा होणें शक्य नाहीं, त्याअर्थीं राजाच्या पेक्षां आपली इच्छा न्यायान्यायाचें खरें प्रमाण आहे असें त्यांस वाटूं न देणें हें फार अगत्याचें आहे."

समाजघटना करारानें अस्तित्वांत आली आहे; तेव्हां करारशास्त्राचे सर्व नियम समाजालाहि लागू आहेत असें प्रतिपादन करणाऱ्या अपरिपक्व बुद्धीच्या तत्त्ववेत्त्यांस बर्कनें कसें उत्तर दिलें आहे, हें खालील उताऱ्यावरून समजेल. 'समाजरचना करारोत्पादित आहे, हें खरें आहे, व्यवहारांत प्रसंगानुसार करावे लागणारे तात्कालिक उपयोगाचे करार वाटेल तेव्हां रद्द करतां येतात; परंतु राष्ट्र म्हणजे तंबाखू, कॉफी, मसाला वगैरे वस्तूंचा व्यापार करणाऱ्या, चिरकालीन उपयोगाची नसणाऱ्या, आणि भागीदारांच्या लहरीवर बंद पडणाऱ्या पेढीपेक्षां

विशेष निराळें नाहीं असें मानतां कामा नये. समाजाकडे जास्त गंभीर व पूज्य दृष्टीनें पाहिलें पाहिजे. कारण, क्षणिक व विनाशी प्रकृतीच्या मानवी प्राण्याच्या नुसत्या अस्तित्वाला उपयोगी पडणाऱ्या पदार्थांचा व्यापार करणारांची ती पेढी नाहीं; तर सर्व शास्त्र, कला, प्रावीण्य आणि प्रत्येक सद्गुण ह्यांचासुद्धां व्यापार ही मंडळी करते. अशा मंडळीचे उद्देश पुष्कळ पिढ्यांत सिद्धीस जाणें शक्य नसल्यामुळें जीवंत असणारेच तिचे भागीदार होतात असें नाहीं; तर जीवंत असणारे, मेलेले व पुढें जन्मास येणारे हे सर्व तिचे सारखेच भागीदार आहेत. जडाजड पदार्थांना नियमित स्थळीं ठेवणाऱ्या ईश्वरी इच्छेला संमत असलेल्या ठरीव कराराप्रमाणें मनुष्यवर्गांतील उत्तम व कनिष्ठ आणि दृश्य व अदृश्य ह्या सर्वांचा संबंध जोडणाऱ्या समाजाच्या मूळच्या मोठ्या करारांत प्रत्येक राष्ट्राचा प्रत्येक करार केवळ एक कलम आहे. हा कायदा लोकांच्या इच्छेवर अवलंबून नाहीं. उलट, लोकांना म्हणजे समाजाला त्या कायद्याप्रमाणें वागणें भाग आहे. त्या विश्वरूपी राज्यांतलि निरनिराळ्या संस्थांना, तदधीन समाजांत वाटेल तेव्हां भावी सुधारणेच्या कल्पनातरंगावर घोंटाळा करून असमाजकारक, रानटी, अनिर्बाधित अशा आरंभींच्या स्थितीस नेऊन पोंचविणें अगदीं अन्यायाचें आहे. कांहीं अपरिहार्य स्थितीमुळें बेदंदशाही करण्याची आवश्यकता उत्पन्न होते, व तसें होणें रास्तहि आहे; पण ती स्थिति आपण होऊन कोणी आणीत नाहीं, तर आपोआप येते. तिच्याविषयीं कांहीं विचार करितां येत नाहीं, तिला प्रमाण लागत नाहीं; व तत्संबंधीं वादविवादहि उपयोगीं पडत नाहीं. अशाप्रकारची आवश्यकता म्हणजे सामान्य नियमाला अपवाद नाहीं. सृष्टिनियमाचा तो एक भागच आहे. आणि अवश्य म्हणून कराव्या लागणाऱ्या गोष्टी जर मनास येईल तेव्हां केल्या, तर सृष्टिक्रमाला बाध येतो आणि बंड करणारे, न्याय, शांतता, सद्गुण, सुव्यवस्था ह्यांच्या हद्दींतून जाऊन, कलह, दुर्गुण, अव्यवस्था आणि विपत्ति ह्यांच्या टापूंत जाऊन पडतात.

एकसत्तात्मक राज्यव्यवस्थेपेक्षां प्रजासत्ताक राज्यव्यवस्थेंत स्वभावतःच विशेष मोहकपणा आहे. म्हणून महत्त्वाकांक्षी, अपरिपक्व बुद्धीच्या, उतावीळ व सत्यप्रिय लोकांस ही राज्यव्यवस्था फार आवडते. ही व्यवस्था यशस्वी होण्यास

देशांतील सर्व लोक प्रामाणिक, निरिच्छ, पोक्त व उद्योगी असले पाहिजेत; परंतु असें होणें शक्य नसल्यामुळें निव्वळ प्रजासत्ताक राज्यव्यवस्था मोठमोठ्या देशांस फायदेशीर होत नाहीं, इतकेंच नाहीं, तर अशी व्यवस्था कांहीं काल टिकणेंसुद्धां संभवनीय नाहीं. राजाधीन देशांत आनुषंगिक अनुकूल गोष्टींमुळें राजा दुर्वृत्त निघून व कर्तव्यपराङ्मुख बनून सर्व राष्ट्रास आपल्याबरोबर अवनत स्थितीस पोंच-विण्यास कारणीभूत होतो, हें खरें आहे; पण त्याबरोबरच सर्व राष्ट्रापेक्षां एकाच व्यक्तीला सुधारण्याचा जास्त संभव आहे, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. बालपणीं राजपुत्रांना धार्मिक व राजकीय शिक्षण जर उत्तम मिळेल; गर्भवती स्त्री जशी गर्भाच्या हिताकरितां आपल्या इच्छांचें संयमन करिते, तशी प्रजेच्या कल्याणा-करितां राजानें प्रतिकूल मनोवृत्तींचा त्याग करावा, अशासारखे उन्नत विचारांनीं भरलेले उपदेश राजपुत्रांच्या शुद्ध कर्णरंध्रावर जर क्षणोक्षणीं पडतील, राज्यकार-भाराच्या वेळीं ऐहिक सुखापासून परावृत्त झालेल्या, सर्व द्विपदचतुष्पदांचें आत्म-वत् कल्याण इच्छिणाऱ्या निरपेक्ष व विरक्त अशा माणसांचा भूपालांस योग्य सल्ला मिळेल; तर अगदी एकाधीन राज्यवस्थेंतसुद्धां प्रजेस सुख लाधेल ह्यांत संशय नाहीं. परंतु बर्कनें म्हटल्याप्रमाणें, लोकसत्तात्मक राज्यव्यवस्थेंत जर कां एकदां बहुजनसमूह कर्तव्यभ्रष्ट झाला, तर अशा मोठ्या समूहाला सुधारण्याचा कांहींच उपाय नसल्यामुळें तदितर लोकांची विपत्ति फारच भयंकर होते आणि अखेरीस सगळें राष्ट्र स्वातंत्र्यास व सुखास आंचवतें.

फ्रान्समधील क्रांतीला राज्यक्रांति म्हणण्याचा साधारणतः प्रचार आहे, तथापि ती फक्त राजकीय क्रांति नसून सामाजिक, धार्मिक, प्रत्येक बाबींत भूकंप-जन्य सृष्टिभागाच्या क्रांतीप्रमाणें सपशेल क्रांति झाली. नवीन राज्यव्यवस्था, नवीन समाज व नवीन धर्म ह्यांची उभारणी नवीन आचारविचारांवर होऊं लागली. त्यांपैकींच ह्या अपूर्व समाजघटकांचें एक असें म्हणणें असे कीं, परं-परेनें चालत आलेल्या म्हणूनच कांहीं गोष्टींचें श्रद्धापूर्वक लोक आचरण करि-तात हें बरोबर नाहीं. तर जी गोष्ट ज्या कारणाकरितां म्हणून करावयाची ती त्याच कारणाकरितां केली पाहिजे. त्यांना धर्माचें, रीतिरिवाजाचें वगैरे, अधिक अज्ञानांत पाडणारें निष्कारण स्वरूप देऊं नये. ह्यासंबंधीं बर्कचें म्हणणें मागें

कळविलेंच आहे. ह्या पुस्तकांत तेच विचार त्यानें जरा जास्त सविस्तरपणें नमूद केले आहेत. ते येणेंप्रमाणें—" त्यावरून तुम्हांला असें दिसेल कीं, ह्या सुधारलेल्या युगांतहि असें स्पष्ट सांगण्याचें मी धाडस करितों कीं, आपण माणसें अशिक्षित मनोवृत्तीचीं आहोंत. आपल्या जुन्या वेडगळ समजुती झुगारून न देतां, उलट त्या आपल्या पुरातन अजाण समजुती आहेत, एवढ्याचकरितां आपण त्या जास्त मनोभावें बाळगतों; व जसजसा ह्या समजुतींचा अंमल आपल्यावर अधिक व पुष्कळ दिवस असेल, त्या मानानें त्यांच्यावर आपलें प्रेम विशेष. प्रत्येकाला स्वतःच्या अक्कलरूपी खासगी भांडवलावर राहून व्यापार करूं देण्यांत आम्हांला अशी भीति वाटते कीं, प्रत्येक मनुष्यांत हा अकलेचा सांठा फार कमी असतो; म्हणून व्यक्तिशः लोकांनीं गतयुगांच्या व राष्ट्राच्या एकवटलेल्या पेढीचा आणि भांडवलाचा उपयोग करावा हें बरें. आमच्यापैकीं पुष्कळ विचारी लोक सामान्यजनांच्या अजाण समजांचा उपहास न करतां, त्या वेडगळ दिसणाऱ्या वंशपरंपरागत समजुतींत अदृष्ट असलेलें शहाणपण शोधून काढण्यांत आपल्या अकलेचा उपयोग करतात. त्यांना पाहिजे असतें तें जर सांपडलें ( आणि सांपडत नाहीं असें क्वचितच होतें ) तर वेडगळ समजुतीचें आवरण काढून टाकून नुसती उपयुक्तता ठेवण्यापेक्षां, उपयुक्तता ज्यांत आहे अशा मूळ समजुती कायम ठेवणें, हेंच त्यांस शहाणपणाचें वाटतें. कारण, अशा समजुती मनांत खिळल्यामुळें उद्दिष्ट सयुक्तिक गोष्ट करण्यास दुजोरा मिळतो; मग त्याविषयीं भक्ति उत्पन्न होऊन त्यास चिरस्थायित्व येतें. आणीबाणीच्या प्रसंगीं मनुष्य गोंधळून न जातां ह्या समजांच्याच योगानें कोणतेंहि कृत्य करण्यास एकदम प्रवृत्त होतो. ह्या समजांच्यायोगानें मनुष्याचा सद्गुण त्याचा देहस्वभाव बनतो आणि आपलें कर्तव्य करणें हा त्याचा अभ्यास होऊन बसतो. "

वरील उताऱ्यावरून आमच्याकडील सामाजिक सुधारणेसंबंधीं बर्कनें आपला काय अभिप्राय दिला असता हें बरोबर ताडतां येतें. सद्गुणांचा अभ्यास होण्यासच परंपरागत समजांचा फार उपयोग होतो, ह्या वरील बर्कच्या विधानाचा आपल्यास हल्लीं अनुभव येत आहे. प्रतिदिनीं सूर्यनारायणास नमस्कारशतक घालण्याच्या पूर्वापार चालीचा अव्हेर करून, शरीरारोग्यास

व्यायाम हितकारक आहे अशी नवीन शास्त्रीय रीतीनें मनाची दृढ समजूत झाली असतांहि, आमच्या नवीन शास्त्रज्ञ मंडळींच्या हातून हें निरुपद्रवी व स्वतःस फायदेशीर काम होत नाहीं. ह्याचें कारण अर्थातच् बर्कनें म्हटल्याप्रमाणें अभ्यास अथवा कृति करविण्यास कांहीं प्रवर्तक नाहीं, हें होय. आणि त्यांतहि विद्यासंपन्न मनुष्याला अशा बाह्य प्रवर्तकाची आवश्यकता कदाचित् वाटणार नाहीं, परंतु अज्ञ जनसमूहाला त्याचा फारच उपयोग होणार; व समाजांत ज्ञानहीन लोकांची संख्या सदोदित अधिक असल्यामुळें कांहींशा अनिष्ट गोष्टींचासुद्धां अत्यावश्यक म्हणून फायदा करून घेणें हेंच सर्व समाजाची प्रगति व कल्याण दृष्टीसमोर ठेवणाऱ्या धुरीणांचें शहाणपणाचें कर्तव्य आहे.

ह्या ग्रंथांत राजकीय विषयाचा निरनिराळ्या रीतींनें सप्रमाण व मुद्देसूद असा ऊहापोह केलेला असल्यामुळें आणि हा बर्कच्या सर्व ग्रंथांत जगन्मान्य होऊन बसल्यामुळें, ह्या ग्रंथाचा सारांश थोडक्यांत खालीं दिला आहे. त्याच्या वाचनानें मराठी वाचकांची ज्ञानवृद्धि होऊन त्यांच्या विचारशक्तीस प्रोत्साहन मिळेल ह्यांत संशय नाहीं. हा सारांश नीट समजण्याकरितां इतकें सांगणें जरूर आहे कीं, डॉक्टर प्राईस नांवाच्या एका इंग्लिश धर्माधिकाऱ्यानें आपल्या धर्मव्याख्यानांत व अन्यत्र फ्रेंच लोकांचें इंग्लिश लोकांनीं अनुकरण करावें म्हणून उपदेश चालविला होता. बर्कनें प्रथम भागांत ह्या डॉक्टर प्राईसवर, तदनुयायांवर आणि त्यांच्या राज्यक्रांतिमतांचा फैलाव करण्याकरितां स्थापिलेल्या समाजावर कडक टीका केली आहे. पुढें ज्या तत्त्वांवर फ्रेंच राज्यक्रांति यथार्थ म्हणून ठरविण्यांत येत होती, त्या तत्त्वांचें खंडन, इंग्लिश राज्यव्यवस्थेचा चांगलेपणा आणि फ्रेंच मुत्सद्यांनीं नवीन सुरू केलेल्या व्यवस्थेंत दिसून येणारें मौर्ख्य वगैरेचें विवेचन केलेलें आहे.

'इंग्लंडांतील इ० स० १६८८ च्या राज्यक्रांतीचा वार्षिकोत्सव करणाऱ्या एका लहानशा क्षुद्र समाजानें फ्रेंच लोकांनीं स्थापलेल्या नवीन मुख्य राष्ट्रीय सभेच्या कृत्याविषयीं आपली संमति दर्शविली, आणि त्या मानाचा त्या सभेनें कृतज्ञतापूर्वक स्वीकारहि केला; परंतु इंग्लंडांतील कांहीं अप्रसिद्ध मंडळ्यांचें मत, तेंच सुप्रसिद्ध व देशमान्य समाजांचें मत आहे, असें भासवि-

ण्याचा हा आंतून प्रयत्न आहे. मनुष्य स्वातंत्र्यप्रिय असूनसुद्धां, फ्रेंच लोकांच्या स्वातंत्र्याधिगमाबद्दल त्यांचें अभिनंदन करण्यास नाखुष असूं शकेल. स्वार्थसाधु व उपद्यापी लोकांच्या हातांतील बाहुली असणाऱ्या फ्रेंच सभेसारख्या संस्थांकडून स्वातंत्र्याचा सदुपयोग तसाच दुरुपयोगहि होण्याचा संभव आहे. समाजरचना बिघडण्याची धास्ती नसेल तरच स्वातंत्र्य चांगलें म्हणतां येईल, फ्रेंच लोकांच्या क्रांतिकारक मतांचा निषेध करणें हें योग्यस्वातंत्र्येच्छु लोकांचें कर्तव्य आहे. फ्रेंचसभेला पाठविलेल्या मानपत्रांत प्राईस साहेबांचीं धर्मस्वातंत्र्यासंबंधीं मतें आढळून येतात; परंतु राज्यकारभारासंबंधीं मनोवृत्ति क्षुब्ध करण्याकरितां धर्माचा उपयोग करूं नये. त्याचप्रमाणें धर्माध्यक्षांच्या राजकीय अज्ञानामुळें राज्यकारभारांत व्यत्यय येतां कामा नये आणि धर्मस्वातंत्र्याचा उपयोग समाजांत पुंडाई माजविण्याकडे करितां कामा नये. डॉक्टर प्राईस आपल्या धर्मव्याख्यानांत सांगतात कीं, ज्या राजाचा आपल्या गादीवर कायदेशीर हक्क आहे असा फक्त इंग्लंडचाच राजा होय. कारण लोकांनीं निवडल्यामुळें तो राज्य करितो. परंतु वास्तविक पाहतां, इंग्लंडच्या राजाचा राज्य करण्याचा हक्क दुसऱ्या कोणत्याहि देशाच्या राजाइतकाच कायदेशीर किंवा बेकायदेशीर आहे.

त्यानें राज्य करावें अशी लोकांची इच्छा आहे खरी; तथापि तो लोकनियुक्त आहे हें म्हणणें खोटें आहे. अशा व्याख्यानांनीं इंग्लिश लोकांची राजनिष्ठा मात्र शिथिल होण्याचा संभव आहे. डॉ० प्राईस असें विधान करितात कीं, इ० स० १६८८ त लोकांनीं आपले राजे निवडण्याचा, गैरवर्तन केल्यास त्यांस पदच्युत करण्याचा आणि त्यांनीं कसें राज्य करावें हें ठरविण्याचा हक्क संपादन करण्याची इंग्लिश लोकांची इच्छा नव्हती, इतकेंच नव्हे, तर हे हक्क सांगणें म्हणजेच १६८८ सालीं केलेल्या कायद्यांचें उल्लंघन करणें होय.

त्या राज्यक्रांतीनें लोकनियुक्त राजा असण्याविषयींचा हक्क स्थापित न होतां, उलट गादीचा उपभोग राजानें वंशपरंपरा घ्यावा अशीच व्यवस्था करण्यांत आली. कारण, अशा व्यवस्थेनें आपल्या हक्कांचें निरंतर संरक्षण होईल असा लोकांचा समज होता. जेम्स राजाला पदच्युत करण्याचा ठराव झाल्यावर पार्लमेंटला आणि लोकांना आपला राजा निवडण्याचा हक्क स्थापितां आला असता.

तथापि तसें न करतां त्यांनीं विचारपूर्वक प्राचीन पद्धतीचाच अंगीकार केला. विल्यम आणि मेरी ह्यांची गादी म्हणजे त्यांच्या पूर्वजांची गादी असेंच दरबारी कागदपत्रांत लागलें आहे. शिवाय त्या वेळच्या पार्लमेंटनें पुढच्या पिढ्यांनाहि विल्यम आणि मेरी ह्यांच्या प्रॉटेस्टंट वंशजांना राजे म्हणून कबूल करण्याविषयीं बांधून टाकिलें आहे. राजाचा गादीवरील वंशपरंपरा हक्क जाऊं नये, एवढ्याकरितां परकीय राजाहि पतकरण्यास इंग्लिश लोक कबूल झाले. राज्यव्यवस्थेचें संरक्षण करण्याकरितांच राज्यव्यवस्था बदलण्याचा अधिकार उपयोगांत आणतां येईल. लोकनियुक्त नसलेले राजे जर कायदेशीर रीतीनें गादीवर बसलेले नसतील, तर १६८८ च्या पूर्वींच्या सर्व राजांचीं सर्व कृत्यें बेकायदेशीर मानलीं पाहिजेत. राज्यव्यवस्थेंत कायमची सुधारणा करण्याच्या हेतूनें जी राज्यक्रांति करण्यांत येते, तींत गैर वर्तनावरून राजास पदच्युत करणें निःसंशय अन्यायाचें आहे. इंग्लंडच्या जेम्स राजास पदच्युत करण्याचें कारण त्याच्या दुर्वर्तनामुळें राज्यपद धारण करण्यास तो अगदीं अपात्र झाला होता हें होय. राजा प्रजेचा नोकर आहे असें म्हणतात. त्याचा अर्थ तो प्रजेला जबाबदार आहे असा नव्हे; तो आपला सार्वभौम प्रभु असून स्वतंत्र आहे. तसाच प्रसंग आल्याशिवाय राजास पदच्युत करणें योग्य नाहीं, आणि असे प्रसंग कधीं येतात हें खात्रीपूर्वक कधीं सांगतां येत नाहीं. इ० सन १६८८ च्या राज्यक्रांतीनें इंग्लिश लोकांस मनसोक्त राज्य स्थापण्याचा हक्क प्राप्त झाला नाहीं. त्या राज्यक्रांतीचा हेतु प्राचीन कायदे व राज्यव्यवस्था पूर्ववत् स्थापण्याचा होता. इंग्लिश लोक पुराणप्रिय असल्यामुळें प्राचीनत्वाला झुगारून देण्याचें साहस त्यांच्यानें कधींच होत नाहीं. त्यांच्या सर्व राज्यव्यवस्थेचा पाया वारसाच्या तत्त्वावर उभारला आहे. राजा, उमराव आणि स्वातंत्र्य हीं सर्व वंशपरंपरेनें आलीं आहेत हें शहाणपणाचें आणि स्वाभाविक तत्त्व आहे. त्याच्या योगानें पुढच्या पिढीस आपण अनुभवीत असलेलें सुख प्राप्त होतें, आणि जुनें कायम राहून नवीन सुधारणा करण्यास प्रत्यवाय येत नाहीं. प्राचीनत्वाविषयीं आदर असेल तर राज्यकारभारांत मनुष्याच्या अंगीं संथपणा आणि विचारशीलता उत्पन्न होते. पिढीजाद स्वातंत्र्याचा उपभोग मिळतो आहे एवढ्याच कारणावरून स्वातंत्र्यास एक प्रकारची शोभा

येते. वयोवृद्ध व कुलीन मनुष्याला ज्याप्रमाणें इंग्लिश लोक पूज्य मानतात, त्याप्रमाणें आपल्या पुरातन राज्यव्यवस्थेलाहि ते पूज्य मानतात; आणि ह्या कारणाकरितां लोकांत पूज्यभाव असला, तर स्वातंत्र्य कायम राहील ह्याविषयीं खात्री असते.

नवीन राज्यव्यवस्था करण्याची फ्रान्सला कांहीं जरूर नव्हती. निरनिराळया लोकवर्गांनीं योग्य तऱ्हेनें प्रतिनिधि निवडल्यावर त्यांच्या विचारवृक्षांचीं स्वातंत्र्यपूर्णता आणि हितावह कायदे हींच मधुर फळें होत. फ्रान्समधील स्टेट्स-जनरल नांवाच्या सभेंत सर्वांच्या वतीनें प्रतिनिधि निवडून येत असत; आणि कोणत्याहि एका विशिष्ट वर्गाचें फाजील वर्चस्व होणार नाहीं, अशाबद्दल राजसत्तेची लोकांना हमी होती. हल्लींच्या व्यवस्थेंत तिसऱ्या सभेंतले प्रतिनिधि बहुतेक अशिक्षित, अनुभवशून्य आणि बिनयोग्यतेचे असल्यामुळें त्यांच्यांतील दुसऱ्या धूर्त लोकांनीं त्यांचा हवा तसा उपयोग करून घेण्याचा संभव आहे. वकिलीच्या धंद्यांतील अगदी हलक्या लोकांचा भरणा त्यांत फार आहे; आणि हे लोक संख्येनें पुष्कळ असल्याकारणानें देशांत त्यांचें वर्चस्व विशेष आहे. सत्ता म्हणजे कलह वृद्धिंगत करण्याचें साधन असा ह्या लोकांचा समज असणार; कारण त्यांची उपजीविका त्यावर अवलंबून असते. लहानलहान व्यापारी, वैद्य, व दुसरे ग्राम्य लोक हे जे बाकी राहिले, ते ह्या धूर्त वकिलांपुढें टिकाव धरण्यासारखे नाहींत. कायदे करणारे लोक पुष्कळ अनुभवशीर आणि उदार अंतःकरणाचे पाहिजेत. विशेषेंकरून मोठ्या देशाकरितां राज्यपद्धति घालून देणाऱ्यांच्या अंगीं वर सांगितलेले गुण अवश्य पाहिजेत. ह्या सभेंत धर्माध्यक्षांच्या वतीनें निवडून आलेले लोकसुद्धां भुकेबंगाल आणि मूर्ख आहेत. असा प्रकार असल्यामुळें उपद्यापी आणि असंतुष्ट सरदारांच्या हातांत ह्या तिसऱ्या सभेचे प्रतिनिधि केवळ बाहुलीप्रमाणें झाले. समाज म्हटला म्हणजे त्यांत उच्च नीच वर्ग असणारच. करितां त्यांतील उच्च वर्गाचे हक्क काढून घेतले असतां ते हक्क भोगण्यास, स्वभावतःच अपात्र असलेले लोक ह्या नागावलेल्या लोकांच्या जागीं येण्याचा संभव आहे.

ज्या लोकांवर राज्यकारभार सोंपविलेला असतो, ते शिक्षणानें व अभ्यासानें अधिकार गजावण्यास आधींच योग्य असले पाहिजेत. राष्ट्रानें कोणत्याहि वर्गांतील कर्तृत्ववान् लोकांचा उपयोग करून घ्यावा हें योग्य आहे. परंतु मनुष्याच्या स्थितीकडे पाहतां अधिकार चालविण्यास जो प्रथमदर्शनींच अयोग्य आहे, त्यानें तो अधिकार मिळण्यासाठीं आपली योग्यता प्रथम शाबीत केली पाहिजे. मोठमोठ्या जमीनदार लोकांच्या वतीनें पुष्कळ प्रतिनिधि राज्यकारभारांत नसले तर कुटिल व महत्त्वाकांक्षी लोकांच्या तडाक्यांतून मालमत्ता सुरक्षित राहणार नाहीं. इभ्रतदार व जमीनदार लोकांना नेहमीं असें वाटत असतें कीं आपल्या पश्चात् आपल्या वंशजांनींसुद्धां मिळकतीचा उपभोग घेऊन, आपल्याप्रमाणेंच अब्रूनें रहावें. ह्याप्रमाणें एक पिढी दुसऱ्या पिढीच्या कल्याणाकरितां जपत असते व ह्या गोष्टीवर समाजाची अविच्छिन्नता पुष्कळ अंशीं अवलंबून असते. ह्यावरून जमीनदार व अब्रूदार लोक ह्यांना समाजांत बरेंच महत्त्व येतें. समाजाच्या निरंतरतेस ते एक प्रकारची मदत करितात. बुद्धिमत्तेचा विचार न करितां केवळ संख्येनें पुष्कळ म्हणून दुसऱ्यांवर अधिकार चालविण्याचा हक्क कोणत्याहि वर्गास येत नाहीं. निसर्गतःच ज्यांच्यांत असमता आहे त्यांच्यांत समता उत्पन्न करण्याच्या फ्रेंच लोकांच्या प्रयत्नानें बेबंदशाही मात्र उत्पन्न झाली आहे.

फ्रान्सच्या राज्यक्रांतीचें स्तोम माजविणाऱ्या, आणि त्यांतील अक्षम्य कृत्यांवर पांघरूण घालणाऱ्या मंडळीचा कांहीं तरी अंतस्थ हेतु असला पाहिजे. स्वातंत्र्याकरितां फ्रेंच लोक लढले व त्यांत त्यांस यश आलें असें प्रतिपादन करून त्यांचें वळण इंग्लिश लोकांनीं गिरवावें, अशाबद्दल कांहीं लोकांची खटपट चालू आहे. त्याप्रमाणें हल्लीं उपभोगित असलेलें स्वातंत्र्य झुगारून देऊन फ्रान्सप्रमाणें बंडाळी, बेबंदशाही आणि भुकेबंगालस्थिति पतकरण्यास जर इंग्लिश लोक तयार असतील, तर त्यांस मूर्खच म्हटलें पाहिजे. इंग्लिश लोकांपैकीं थोड्क्यांना मतें देण्याचा अधिकार आहे आणि पैशानें मतें मिळवितां येतात म्हणून इंग्लिश लोक स्वतंत्र नाहींत असें डॉ० प्राईस ह्यांचें म्हणणें आहे. एकंदरींत राज्यक्रांतिसभांच्या सभासदांच्या भाषणांवरून व लेखांवरून

उघड होतें कीं, आपल्या विवक्षित मतांचा प्रसार होण्याकरितां राष्ट्रावर कोणतेंहि संकट ओढण्यास ते चुकणार नाहींत. मनुष्याच्या नैसर्गिक हक्कांच्या दृष्टीनें इंग्लिश राज्यपद्धति जर सदोष ठरेल, तर दुसऱ्या कोणत्याहि देशांतील राज्यपद्धति तितकीच दोषार्ह असली पाहिजे. जे फायदे व्यक्तिमात्राला मिळावे म्हणून समाजव्यवस्था अस्तित्वांत आली तेच त्याचे वास्तविक हक्क होत; परंतु समाजाला नियंता असल्यावांचून समाज टिकणार नाहीं, म्हणून राज्यव्यवस्था लोकांच्या संमतीनें ठरलेली असते. समाजोत्पत्तीच्या पूर्वीची प्राथमिक स्थिति सोडून समाजसहवास पतकरण्याची जर मनुष्याची इच्छा असेल, तर समाजबद्ध आयुष्यक्रमाला अवश्य असणारें नैसर्गिक हक्कांचें नियमन त्यास कबूल असलेंच पाहिजे. समाजापासून मिळणारे फायदे आणि मनःपूत स्वातंत्र्य हीं दोन्हीं त्यास एकाच वेळीं मिळणार नाहींत. राज्यव्यवस्था म्हणजेच मनुष्याच्या एकंदर सुखाकरितां त्याच्या नैसर्गिक हक्कांचें नियमन होय. हें नियमन किती व कसें असावें हें निरनिराळ्या वस्तुस्थितीवर अवलंबून आहे. हे फायदे लोकांना मिळावें म्हणून राष्ट्राची योजना झाली आहे. ते फायदे बऱ्याच अंशानें लोकांना मिळतील अशी राज्यव्यवस्था करण्यास मनुष्यांच्या निरनिराळ्या स्वभावांचा चांगला अनुभव लागतो. कारण केवळ कल्पनोद्भूत अशा अशक्य गोष्टींचा विचार न करितां शक्य असेल तें करणें हेंच खऱ्या मुत्सद्दीपणाचें लक्षण आहे.

निरोगी मनुष्याला वारंवार औषध घेण्याची गरज लागत नाहीं, त्याप्रमाणें सुव्यवस्थित समाजाला बंड करण्याचें मनांत आणण्याचीसुद्धां आवश्यकता नाहीं. अधिकाराचा प्रतीकार करण्याच्या वल्गना करणाऱ्या लोकांकडून स्वातंत्र्याच्या कामीं मुळींच भर पडत नाहीं. कारण एकतर तितकी खटपट करण्याचें आयास घेण्याचा त्यांचा बिलकुल इरादा नसतो; अथवा ते इतके मूर्ख असतात कीं, जुलमाचा प्रतीकार करण्याचे बंडाच्या खालोखालचे सर्व उपाय, ते नाकारतात. आपल्या आवडत्या मतांचें ज्यांच्या डोक्यांत वेड शिरलेलें असतें ते लोक त्या मतांकरितां कोणत्याहि मनुष्याचा आणि कोणत्याहि वस्तूचा बळी देण्यास कसूर करणार नाहींत. फ्रान्सवर हल्लीं राज्य करणारे लोक अशाच मासल्याचे आहेत. अगदी आतांपर्यंत पाश्चात्य राष्ट्रांना अभिमान असे कीं, प्रेमजन्य

राजनिष्ठेनें आपली प्रजा आपल्या आज्ञेंत वागते. पूर्वेकडील राष्ट्रांप्रमाणें आज्ञेंत राहण्याकरितां तीवर सक्ती करावी लागत नाहीं. म्हणून राजांना प्रजेवर जुलूम करण्याचें प्रयोजन पडत नसे; आणि प्रेमामुळेंच जे आज्ञेंत वागत अशा प्रजाजनांची स्वातंत्र्यज्योति विझण्याचा संभव नव्हता. यत्किंचित्सुद्धां कमीपणा वाटल्याशिवाय सर्व प्रजा राजाधीन वागत असे; उच्च वर्गांतील लोकांस योग्य मान मिळे; आणि दुर्बल व गरजू लोकांचें खात्रीपूर्वक संरक्षण होई; राजसेवा आणि देशसेवा बक्षीसाची आशा न करतां केली जात असे; देशाभिमानामुळें अब्रूची चाड कायम राही. ज्या कामीं धैर्य दाखविण्यांत येत असे त्या कामाच्या मानानें धैर्याची योग्यता विशेष वाटत असे. स्वाभिमान व आपल्या मतांविषयीं योग्य आदर ह्यांमुळें उच्छृंखल मनोवृत्तींवर दाब असे. ह्या कारणानें निदान बाह्यतः तरी मनुष्याच्या वर्तनांत मार्दव आणि सुशीलता दिसून येई. नवीन फ्रेंच तत्त्ववेत्ते ह्या कृत्रिम मनोवृत्तींचा तिरस्कार करितात; परंतु मूळच्या मनोवृत्ति सुधारल्यानेंच क्षुद्र प्राण्यांच्या पंक्तींतून निघून मनुष्याला उन्नतावस्था प्राप्त झाली आहे. उच्च वर्गांतील लोकांस मान देणारांचा हे लोक उपहास करितात. कल्पनाशक्तीनें आणि विचारानें उत्पन्न होणारे आणि विवेकानें कायम राहणारे नैतिक प्रतिबंध ह्यांच्या दृष्टीनें नाहींसे झाले पाहिजेत. मनोविकारांना शहाणपणाशिवाय दुसऱ्या कशाच्यानें आळा घालण्याची त्यांची इच्छा नाहीं. त्याचप्रमाणें आज्ञेंत वागण्याचा हेतु, फायद्याची आशा व शिक्षेचें भय हाच त्यांच्यामतें होय. अशा रीतीनें देशाभिमानाच्या ऐवजीं ज्या देशांत स्वार्थपरायणता वाढते, त्या देशाचें नुकसान झालेंच पाहिजे. ज्या राजांना प्रजेच्या प्रीतीवर विश्वास ठेवितां येत नाहीं, त्यांना अर्थातच आत्मसंरक्षणार्थ उग्र उपाय योजावे लागतील. प्रचारानें पवित्र झालेले आचारविचार जेव्हां तुच्छ मानिले जातात, तेव्हां मनुष्याचें पुढें काय होणार व तो कसा वागेल, ह्यांविषयीं पूर्वी अनुमान करणें अशक्य आहे.

विद्याप्रसार आणि भौतिक अभिवृद्धि हीं सुधारणेचीं मुख्य लक्षणें आहेत; आणि अर्वाचीन युरोपस्थ समाजाचा सर्व आधार मनुष्याच्या धर्मबुद्धीवर व थोरपणा मिळविण्याच्या इच्छेवर रचिलेला आहे. ही धर्मबुद्धि व अब्रूची चाड

जर मनुष्यांतून गेली, तर त्याबरोबर विद्याप्रसार आणि भौतिक अभिवृद्धि यांचा नाश झाल्यावांचून राहणार नाहीं. फ्रान्सच्या संसर्गानें सर्व जग पछाडलें जाईल असें मानण्यास कारण आहे. म्हणून प्रत्येक विचारशील मनुष्यानें त्या देशाच्या गोष्टींत मन घातलें पाहिजे. जुलमी राजदंडधरांना शासन होणें अवश्य आहे तथापि तें योग्य तऱ्हेनें झालें पाहिजे. फ्रान्सचा हल्लींचा राजा जुलमी राजाच्या अगदी उलट आहे असें ह्या क्रांतिकारांसमुद्धां वाटत असलें पाहिजे; नाहींतर त्यांनीं त्याला पदच्युत केलें असतें. इंग्लिश लोक पुराणप्रिय असल्यामुळें धर्म, नीति व राज्यव्यवहार यासंबंधीं जुने विचार सोडून फ्रेंच तत्त्ववेत्त्यांच्या नवीन मतांचा ते अंगीकार करणार नाहींत. कशाहि वाक्छलानें अधिकाराविषयीं असलेली त्यांची स्वाभाविक सादरबुद्धि सोडून देण्याइतके ते फसणार नाहींत. उच्छृंखलता म्हणजे स्वातंत्र्य आहे असें समजून पशूंच्या पंक्तीस ते आपल्याला बसवून घेणार नाहींत. कित्येक युगांच्या अनुभवाशीं तुलना करून पाहतां आपलें शहाणपण कांहींच नाहीं असें वाटत असल्यामुळें पूर्वापार समजुती ते सोडीत नाहींत. आणि दुसरें असें कीं, मनुष्याच्या हातून सत्कृत्य अधिक पद्धतशीर व खात्रीपूर्वक घडण्यास पूर्वापार समजांचा फार उपयोग होतो. परंतु फ्रेंच मुत्सद्यांजवळ अनुभवाची किंमत नसून स्वतःच्या कर्तृत्वशक्तीची धमक पराकाष्ठेची होती. त्यांचा देशाभिमान म्हणजे नुसती स्वार्थपरायणता होय. संसर्गजन्य रोगाप्रमाणें फ्रेंच लोकाग्रणींचीं मतें व आचार ह्यांपासून इंग्लिश लोक दूर पळतील. फ्रेंच मुत्सद्यांपैकीं बहुतेक मुत्सद्दी समूळ जरी नास्तिक नसले, तरी ख्रिस्तीधर्माचे शत्रु आहेत. इंग्लंडमध्यें नास्तिक लेखकांना वाचक मिळण्याची मारामार; नास्तिकांचा समाज असा इंग्लंडमध्यें कधींच टिकला नाहीं. ब्रिटिश राज्यव्यवस्थेची रचना व सुधारणा ह्यांच्या मुळाशीं धर्म आहे. इंग्लिश मनुष्याची धर्मविषयक पूज्यबुद्धि कशानेंहि नष्ट व्हावयाची नाहीं. नास्तिकपणापेक्षां धर्मवेड पुष्कळ बरें असें त्यास वाटतें. इतर संस्थांप्रमाणें धर्मसंस्थेबद्दल तो फार दक्ष असतो. कारण धर्मसंस्थांचा नाश झाल्यावर काय संकट गुजरेल ह्याची कल्पनासुद्धां त्यास होत नाहीं. धर्मानें मनुष्य उन्नतावस्थेस पोचतो, कारण त्याच्यायोगानें त्याचा ईश्वराशीं संबंध येतो. सर्वांपेक्षां राजांनीं ज्यांच्यायोगानें मनुष्य निर्दोष होईल अशा

साधनांची हयगय करितां कामा नये. विशेषतः प्रजासत्ताक राज्यव्यवस्थेंत धर्म अगत्याचा आहे. सार्वभौम भूपतीपेक्षांदेखील जनसमूहाची सत्ता मोठी असते. अंगशक्तीनें अथवा मतबलानें त्यांच्यावर दाब बसण्याचा संभव फार कमी असतो. फक्त धर्मामुळें, ईश्वरापाशीं आणि आपल्या बांधवांपाशीं आपलें जें कांहीं कर्तव्य आहे, त्याविषयीं आपण जागृत असूं शकूं. राज्यपद्धति आणि कायदे ह्यांविषयीं जर लोकांचा पूज्यभाव असेल तर ते तसेच आपल्या पश्चात् आपल्या वंशजांना मिळावे, म्हणून ते काळजी घेतील. त्यांत बदल करण्यास सहसा त्यांचा हात धजणार नाहीं; मग त्यांचा समूळ उच्छेद करण्याची गोष्टच बोलावयास नको. याप्रमाणें समाजस्थिति निरंतर चालून सुधारणेच्या प्रगतीस प्रतिबंध होत नाहीं. समाज म्हणजे भागीदार मंडळी आहे हें खरें; पण मनुष्याला पूर्णावस्थेस आणण्याकरितां ईश्वरानें तिची योजना केली आहे. भागीदारांच्या इच्छेवर तिचा ऱ्हास अवलंबून राहिल्यास तिचा हेतु कधींहि सिद्धीस जाणार नाहीं. सर्व मानवजाति हा एक मोठा समाज आहे. त्याचे प्रत्येक पिढींत निरनिराळे सभासद होतात; परंतु एकंदर समाज एकच असून अविभाज्य आहे. राष्ट्रांत निरनिराळ्या संस्था असतात, त्याचप्रमाणें ह्या एकंदर समाजांत निरनिराळीं राष्ट्रें होत. आपल्या अस्तित्वाचा नाश करण्याची कोणत्याहि राष्ट्रास मोकळीक नाहीं. कारण तसें करणें ईश्वराच्या इच्छेविरुद्ध आहे. राष्ट्रांचें संरक्षण दुसऱ्या कोणत्याहि उपायांनीं होणार नाहीं, अशावेळीं राज्यक्रांति झाली असतां ती न्याय्य म्हणतां येईल.

मालमत्ता अलंघनीय आहे. तिचा योग्य उपयोग होत आहे, अशाविषयीं खबरदारी घेण्याइतकाच सरकारला हक्क आहे. अस्सल खिस्ती धर्मान्वयें धर्माधिकाऱ्यांनीं पैशापासून अलिप्त असलें पाहिजे असल्या सबबीवर धर्माध्यक्षांच्या मिळकतीच्या अपहाराचें समर्थन करतां येणार नाहीं. कारण आजच्या धर्माध्यक्षांना प्राचीन धर्मशास्त्राचे नियम जर लागू करावयाचे तर त्यांना लुबाडणाऱ्या गृहस्थांसहि ते सारखेच लागू केले पाहिजेत. फ्रेंच धर्माधिकाऱ्यांवर जुलूम करणाऱ्या नास्तिकमंडळानें त्यांना आज अशा स्थितीस पोचविलें आहे कीं, नियमित अल्प वेतनाशिवाय त्यांस दुसरें कांहींच मिळत नाहीं

लोकांना सन्मार्गास लावणाऱ्या धर्माध्यापकांची इतकी निकृष्ट स्थिति असणें समाजास हितावह नाहीं. सरकारांतून धर्माध्यक्षांची नेमणूक झाली असल्यामुळें त्यांच्या जागा हव्या तेव्हां कमी करण्याचा सरकारास अधिकार आहे असें म्हणणें गैर आहे. पुष्कळ दिवस उपभोगीत असलेले हक्क आणि विशेष सवलती एकाएकीं काढून घेणें म्हणजे निव्वळ दरोडा घालणें होय. ह्या जुलमी कृत्यांचें कोणत्याहि कोटिक्रमानें समर्थन करतां यावयाचें नाहीं. पुनः असें म्हणण्यांत येतें कीं, राष्ट्रीय कर्ज फेडण्याकरितां देवालयांकडे दिलेली मिळकत घेणें अवश्य होतें; परंतु आपल्याच लोकांची मिळकत दुसऱ्यास देण्यास सरकारास अधिकार नाहीं. दुसरें असें कीं राष्ट्रीय सावकारांना आपले पैसे परत मागण्याचा जितका हक्क आहे, तितकाच देशांतील नोकरांना आपलें वेतन मागण्याचा आहे. आणि तिसरें असें कीं, पूर्वीच्या राजाला कर्ज काढण्याचा अधिकार नव्हता असें म्हणून, व त्याचीं बाकीचीं सर्व कृत्यें अमान्य करून, कर्ज मात्र कबूल करणें हा मूर्खपणा आहे. खरें कारण असें आहे कीं, पूर्वीच्या सरकारनें पुष्कळ कर्ज काढल्यामुळें देशांत धनिक लोकांचा एक मोठा वर्ग उत्पन्न झाला. ह्या सावकारांचा इतर लोक द्वेष करीत, कारण त्यांनीं सरकारला जे उसने पैसे दिले होते, त्याची फेड कर वाढवून करावयास लागणार होती. क्षुद्र वर्गांतून एकदम वर आल्यामुळें जमीनदार लोकसुद्धां त्यांचा हेवा करीत. ह्या अपमानाबद्दल सूड उगविण्याकरितां देवालयांच्या मिळकतीवर हल्ला करण्याचा त्यांनीं निश्चय केला. कारण ह्या देवालयांतील मोठ्या हुद्याच्या जागा उच्च वर्गांतील लोकांकडे पुष्कळ होत्या. वर सांगितलेल्या सावकारवर्गाला खिस्ती धर्माचे कट्टे शत्रु असणाऱ्या शिक्षित लोकांचा आश्रय मिळाला. त्याचवेळीं गरीबांच्या हक्कांचे पुरस्कर्ते म्हणून शिक्षित लोकांस म्हणवून घेण्यास सांपडलें. ह्याप्रमाणें ख्रिस्ती देवालयांवर हल्ला करण्यास सावकार व गरीब ह्या दोहोंच्याहि ते उपयोगीं पडले. ह्या रीतीनें देवालयांची मिळकत लुबाडली गेली; परंतु राजानें कर्ज काढल्यामुळें जे श्रीमंत झाले होते त्यांच्या संपत्तीला काडीचाहि धक्का लागला नाहीं. धर्माध्यक्षांना कर्ज काढितां येत होतें असें जर सभेचें मत होतें, तर ज्या मिळकतीच्या जोरावर त्यांस कर्ज काढतां येई त्या मिळकतीचे ते मालक आहेत असें सभेस वाटावयास

पाहिजे होतें; परंतु राजानें काढलेल्या कर्जाशीं धर्माध्यक्षांचा संबंध नव्हता. याकरितां त्यांच्याकडून ती कर्जफेड करण्यास कांहींच सबब नाहीं. ह्या दरोड्या-बद्दल दारिद्र्याची सबबहि फ्रेंच लोकांना सांगतां येणार नाहीं; कारण त्यांच्या प्रधानानेंच असें सांगितलें आहे कीं, थोड्या जास्त करानें सर्व कांहीं भागलें असतें. धर्माधिकारी आपला वांटा देण्यास कबूल होते. घटकाभर असें घेऊन चालूं कीं, धर्माधिकाऱ्यांना सर्व कर्ज फेडणें भाग होतें; पण पंचवीस लाख कर्ज फेडण्यास त्यांजकडून पन्नास लाख घेण्याचें कारण काय? आपली मिळकत खालसा केली जाऊं नये, म्हणून ते आपखुषीनें मोठी रकम देण्यास तयार असतां ती घेण्यांत आली नाहीं. आपल्या मुठींत वागणाऱ्या जमीनदार लोकांचा नवीनच वर्ग उत्पन्न करण्याकरितां सभेनें ही युक्ति काढिली.

क्रांतिकारक उपाय जर योजले नसते, तर सत्तापूर्ण राजाच्या मनसोक्त अमलाखालीं आह्मांस विपत्ति भोगाव्या लागत्या, अशा सबबीवर फ्रेंच क्रांतिकारक आपलीं कृत्यें योग्य ठरवितात. परंतु फ्रान्सची जुनी राज्यव्यवस्था सुधारून इंग्लंडप्रमाणें नियंत्रित राजसत्ताक राज्यपद्धति सुरू करतां आली असती हें उघड आहे. जेथें प्रजासत्ताक राज्यव्यवस्था नसेल, तेथें अनियंत्रित राजसत्ताच असली पाहिजे असा नियम नाहीं. हल्लीं फ्रान्समध्यें प्रजासत्ता आहे असें म्हणतात; परंतु कांहीं दिवसांनीं अनुदारबुद्धीच्या आणि उपद्रवी अशा थोड्याशा लोकांच्या हातांत अखेर पूर्णसत्ता राहणार असा संभव दिसतो. शुद्ध प्रजासत्ताक राज्यव्यवस्थेचा विचार केला असतांहि असें दिसतें कीं, ज्यांना तिचा अनुभव आहे त्या सर्वांचें मत असें आहे कीं, जुलमी राजापेक्षांहि ह्या व्यवस्थेंत जास्त जुलूम होतो. नियंत्रित राजसत्ताक पद्धतींत प्रजापक्षाचा दाब राज्यकारभारावर असतो. पण जेथें लोकांची सत्ता व वर्चस्व प्रत्यक्ष असतें तेथें राजाचें कांहीं चालत नाहीं. फ्रान्सच्या एकसत्तात्मक राज्यव्यवस्थेंत सुधारणा करण्यास जागा होती ह्याविषयीं कोणास शंका नाहीं, परंतु राज्यक्रांति करण्याचें कारण नव्हतें. सुधारणा करून इष्ट हेतु साधेल असें इ० स० १७८९ च्या आरंभीं सर्व फ्रेंच लोकांना वाटत होतें. फ्रान्सची लोकसंख्या आधींच पुष्कळ असून आणखी वाढत होती. देशांत सोनें रुपें बाहेरून सारखें येत होतें. सारांश

भौतिक अभिवृद्धीचीं व विद्याप्रसाराचीं सर्व चिन्हें तेथें दिसत होतीं. अशा गोष्टी अत्यंत दोषयुक्त अमलाखालीं होणें शक्य नाहीं. आतांपर्यंत राज्यक्रांतीचे परिणाम दिसत आहेत ते हे कीं, लाखों लोक देश सोडून जात आहेत, संपत्ति कमी होत चालली आहे, आणि लोकांची विपत्ति वाढत आहे.

धर्माधिकाऱ्यांवर जो जुलूम झाला त्यास ते पात्र नव्हते. पूर्वींच्या धर्माधिकाऱ्यांच्या अपराधाकरितां हल्लींच्या धर्माधिकाऱ्यांस शासन करणें अन्यायाचें आहे. दुष्ट लोकांनीं आपल्या दुष्ट मनोविकारांवर विरजण घालण्याकरितां दुसऱ्या चांगल्या गोष्टींप्रमाणें धर्माचाहि उपयोग केला आहे. वाईट गोष्टी झांकण्याकरितां ज्या चांगल्या गोष्टींचा उपयोग करण्यांत येतो त्या गोष्टींचा नाश न करतां, वाईट तेवढें शोधून काढून त्याचा उच्छेद करावा हें इतिहासाच्या शिक्षणानें आपणांस समजलें पाहिजे. कारण एकाच प्रकारचे दुष्ट मनोविकार निरनिराळ्या रूपानें दृष्टीस पडतात. धर्मश्रद्धेच्या नांवानें दुसऱ्या धर्माविषयीं ज्याप्रमाणें पूर्वी धर्मोपदेशकांत मूर्तिमंत असहनशीलता होती, त्याप्रमाणें ती धर्मस्वातंत्र्याच्या नांवानें नास्तिक मंडळांत आहे. हल्लींच्या बिचाऱ्या धर्माधिकाऱ्यांना झालेली शिक्षा योग्य आहे, असें ठरविण्यांत जीं प्रमाणें पुढें येतात त्याच प्रमाणांवरून पुढील निरपराधी नास्तिकांना शिक्षा करणें न्याय्य ठरेल. प्रत्येक धंद्यांत कांहींना कांहीं व्यंगें असून त्यांतल्या लोकांचे अगदींच सयुक्तिक नाहींत असे विवक्षित समज असतात. परंतु हे निंद्य प्रकार म्हणून त्यांबद्दल त्यांस शिक्षा करणें चांगलें नव्हे. ज्या निंद्याचारांचा आरोप पूर्वींच्या धर्माधिकाऱ्यांवर करीत असत त्यांपासून ह्या पिढीचे धर्माधिकारी निःसंशय अलिप्त आहेत. पण आतां धर्मसंस्थांची जी रचना करण्यांत आली आहे, तीमुळें सुशिक्षित व प्रतिष्ठित लोक त्यांत शिरणार नाहींत. ह्यापुढें धर्माध्यक्ष लोकांकडून निवडून जाणार. त्यामुळें निवडणुकीच्या लुच्चेगिऱ्यांत निष्णात असलेल्या मंडळीला ह्या जागा मिळणार. अमुक मतांचे लोक ह्या संस्थांत आले पाहिजेत हें ठरविण्यास अथवा पाखंडवाद्यांचें शासन करण्यास कोणीच नाहीं. धर्माची अवनति हें धर्माचा समूळ उच्छेद होऊन धर्मशिक्षणाच्या जागीं ऐहिक विषयांचें शिक्षण सुरू होणार ह्याचें पूर्वचिन्ह आहे. ज्या धर्माध्यक्षांच्या जमिनी खालसा केल्या ते कॅथॅलिक पंथाचे आहेत,

एवढ्याकरितांच फ्रेंच लोकांच्या कृत्यांची प्रशंसा इंग्लिश लोक करतील असें होणार नाहीं. कारण दुसऱ्यांच्या धर्मविचारांविषयीं त्यांच्या मनांत योग्य आदर-बुद्धि वसत आहे. दुसऱ्या देशांत आपल्या मतांचा प्रसार करण्याचे प्रयत्न फ्रेंच लोकांनीं चालविले आहेत ह्याचे परिणाम भयंकर होतील. राष्ट्रीय कर्ज वाढत आहे. अशा हल्लींच्या दिवसांत कोणत्याहि मनुष्याच्या घरावर कोण-त्याहि प्रसंगीं दरोडा घातला असतां तो सर्वथैव न्याय्य आहे असा समज सरकारचा आणि लोकांचा होऊं देणें धोक्याचें आहे. देवालयांचा विध्वंस करून फ्रेंच लोकांनीं शहाणपणाची सुधारणा केली हें म्हणणें निरर्थक आहे. अन्याय करण्यांत कधीं शहाणपण असूं शकणार नाहीं. कायदेशीर रीतीनें केलेले व्यव-हार कायद्यानेंच जर बेकायदेशीर झाले तर तो कायदा अन्यायाचा म्हटला पाहिजे. राष्ट्रांतील संस्थांनीं राष्ट्राला स्वाभाविक बळकटी येते, असें शहाणे मुत्सद्दी समजतात. त्यांचा उपयोग मात्र वाटेल तेव्हां करून घेतां येईल. पण वाटेल तेव्हां त्या संस्था उभारतां येणार नाहींत. धर्मसंस्था हें देशहित करण्याचें बळकट साधन आहे असें दूरदर्शी मुत्सद्यास वाटल्यावांचून राहणार नाहीं. अशा संस्थांत अपरिहार्य असलेलें धर्मखूळ एकंदर होणाऱ्या फायद्याकडे लक्ष देऊन त्यानें सोसलें असतें. क्रांतिकार मंडळीचें वेड धर्मवेडापेक्षां जास्त वाईट आहे अशी त्याची खात्री झाली असती. देवालयांच्या मिळकतीचे हल्लीं जे मालक होऊन बसले आहेत, ते त्यांचा उपयोग अधिक चांगल्या रीतीनें करतील असें मानण्यास आधार नाहीं. निरुपयोगी गृहस्थांचा जितका उपयोग आहे तितका धर्मोपदेशकांचाहि आहेच. श्रीमंत लोकांना लागणारे चैनीचे पदार्थ तयार करून गरीबांची उपजीविका होते; व एवढ्याकरितां पुष्कळ धंदे आपण उपयोगी म्हणून सहन करितों. त्याचप्रमाणें धर्मोपदेशकांचा धंदाहि राहूं दिला पाहिजे. देशांतील कांहीं जमिनी सत्कृत्यांना उत्तेजन देण्याकडे अथवा गुणांचें योग्य चीज करून घेण्याकडे लावणें वाईट नाहीं. त्याचा जर कदाचित् दुरुपयोग होत असला, तर त्यांत सुधारणा करणें हें प्रशस्त होय.

आपली सत्ता कायम राहण्याकरितां जुलमी राजे जे उपाय योजतात, त्यांपैकीं सभेनें एकहि कमी केला नाहीं, ह्यावरून देशाच्या कल्याणाविषयीं सभेला किती आस्था आहे हें उघड होतें. राज्यव्यवस्थेच्या रचनेंत ज्या अडचणी आल्या, त्या बुद्धि-

पुरःसर टाळल्यामुळें तीस त्या कामीं यश आलें नाहीं. इतर गोष्टीप्रमाणें राज्यकारभारांतसुद्धां यश येण्यास ज्या अडचणी येतील त्यांची टाळाटाळ न करितां त्यांतून पार पडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. दृष्टीस पडेल त्याचा उच्छेद करणें आणि त्याऐवजीं त्याच्या अगदी उलट असेल तें स्थापणें, ह्या सगळ्यांत सोप्या मार्गाचें फ्रेंच लोकांनीं अवलंबन केलें आहे. प्राचीन संस्थांचा नवीन परिस्थितीला फायदेशीर असा उपयोग करून घेणें ह्यांतच खरा मुत्सद्दीपणा आहे. सर्व लोकांचें हितानहित ज्यांत गोंवलें जातें असे राजकीय फेरफार सावकाश आणि सावधगिरीनें केले पाहिजेत. ज्यांच्यावर आपल्या कायद्यांचा अंमल होणार त्यांच्याविषयीं कायदे करणाराच्या मनांत सहानुभूति असली पाहिजे. केवळ स्वतःच्याच कर्तृत्वशक्तीवर त्यानें विश्वास ठेवूं नये. दुसऱ्यांच्या मदतीचा त्यानें आनंदानें स्वीकार करावा. सूचनांचा त्यानें कधींहि अनादर करूं नये. प्रत्येक कायद्यापासून जितका फायदा होणें शक्य आहे तितका लोकांस मिळवून देण्याकरितां मध्यें येणाऱ्या प्रतिबंधक गोष्टी दूर करण्यास त्यानें चुकतां कामा नये. पुढील पिढ्यांवर ज्यांचा पूर्ण विकास सोंपवावा लागतो, अशा निश्चित, निर्दोष व व्यापक तत्त्वांची राज्यकारभारांत फक्त सुरवात करून त्यास वारंवार स्वस्थ बसावें लागतें. ह्या सामान्य तत्त्वांकडे दुर्लक्ष केल्यामुळें फ्रेंच लोक राज्यकारभारांत ढवळाढवळ करणाऱ्या अर्धवट, महत्त्वाकांक्षी लोकांच्या आधीन झाले आहेत. फ्रेंच लोकांना मनुष्यांत अथवा इतरत्र सद्गुण न दिसतां दोष मात्र चटकन दिसतात. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, त्याचें मनुष्यजातीशीं सहृदयत्व नाहींसें होऊन प्रत्येक वस्तूचा नाश करण्याची दुष्ट खोड त्यांस लागली आहे.

आतां फ्रेंच मुत्सद्यांनीं नवीन स्थापलेल्या राज्यपद्धतीचा विचार करूं. देशाचे मुख्य त्र्यायशी सारखे भाग करून त्या प्रत्येकास एक लहान पार्लमेंट दिलें आहे. त्या प्रत्येक भागास डिपार्टमेंट म्हणतात. ह्या त्र्यायशी डिपार्टमेंटचे सारखे पोटभाग केले आहेत, त्यांस कॉम्यून म्हणतात; व ह्या कॉम्यूनचे कॅन्टन म्हणून आणखी सारखे पोटभाग केले आहेत. राष्ट्रीयसभेंत प्रतिनिधि डिपार्टमेंटमधून निवडून यावयाचे असून त्यांची संख्या डिपार्टमेंटमधल्या लोकसंख्येवर आणि त्यांत प्रत्यक्ष कर जितका दिला असेल त्या रकमेवर अवलंबून

आहे. निवडणुकीला आरंभ अर्थात् शेवटच्या कॅन्टनपासून होतो. सालीना दोन आणि तीन शिलिंग ह्यांच्या दरम्यान प्रत्यक्ष कर भरणारांना मत देण्याचा अधिकार आहे. ह्याप्रमाणें मत देण्यास योग्य असणाऱ्या प्रत्येक दोनशें लोकांकरितां एक, असे कॅन्टनमधून कॉम्यूनमध्यें प्रतिनिधि निवडून येतात; व कॉम्यूनमधून डिपार्टमेंटमध्यें जातात. आतां डिपार्टमेंटमधून राष्ट्रीयसभेंत पाठविण्याकरितां ज्या सभांमधून प्रतिनिधि निवडावयाचे ते सभासद सालीना पन्नास शिलिंग प्रत्यक्ष कर देणारे पाहिजेत असा निर्बंध आहे. ही पद्धति दोषयुक्त आहे ह्यांत संशय नाहीं. कारण सर्व मनुष्यें सारखीं आहेत असा बाणा मिरविणाऱ्या फ्रेंच मुत्सद्यांनीं ज्यांना आत्मसंरक्षणार्थ मत देण्याचा अधिकार अवश्य आहे अशा गरीब वर्गाला तो मुळींच दिला नाहीं. मत देण्याचा अधिकार पैशावर अवलंबून ठेवणें हें सभेच्या जगविख्यात मतांच्या विरुद्ध आहे. आणि वर सांगितलेली करमर्यादा क्षुद्र असल्यामुळें सभेंत स्वतंत्र लोक येतील अशी खात्री नाहीं. प्रजासत्ताक राज्यव्यवस्थेचें मुख्य अंग हें आहे कीं, आपल्या वतीनें कोणी काम करावें हें सांगण्याचा हक्क प्रत्येकास असला पाहिजे. ह्या पद्धतींत अखेरचे प्रतिनिधि आणि लोकसमूह ह्यांच्यामध्यें निवडणारांच्या दोन मंडळ्या येतात. सभेच्या तत्वांप्रमाणें संपन्न डिपार्टमेंटमध्यें गरीब डिपार्टमेंटपेक्षां जास्त सभासद असणें हें गैर आहे. बुभुक्षित गरीब लोक कदाचित् श्रीमंतांस लुबाडतील ह्या भीतीनें जर ही व्यवस्था केली असली तर तोहि हेतु सिद्धीस जात नाहीं. प्रत्येक डिपार्टमेंट-मध्यें श्रीमंतांची संख्या कमी असते. डिपार्टमेंटमधले सभासद बहुसंख्याक गरीब लोकांकडून निवडून येतात. म्हणून श्रीमंतांच्या तर्फे फारसे प्रतिनिधि जात नसल्यामुळें जितके जास्त प्रतिनिधि तितके श्रीमंतांच्या विरुद्ध बहुमत जास्त असें होतें. श्रीमंत व्यक्तिमात्रापेक्षां श्रीमंत डिपार्टमेंटचा जुलूम कमी होण्याचा संभव नाहीं. परंतु कोणत्याहि प्रांताला त्या प्रांतांत करांची रक्कम मोठी वसूल होते ह्या कारणानें जास्त प्रतिनिधि निवडण्याचा हक्क देणें हें रास्त नाहीं. कारण जमिनीचे मालक ज्या प्रांतांत त्यांची जमीन असते त्याच प्रांतांत राहतात किंवा कर देतात असा नियम नाहीं. करांची बाबत निश्चित ठर-

ण्याच्यापूर्वी करांवर अवलंबून असणारे हक्क लोकांस देणें चुकीचें आहे; शिवाय ह्या पद्धतींत विसंगतता फार आहे. कॅन्टनमधून कॉम्यूनमध्यें जे प्रतिनिधि येतात, ते लोकसंख्येच्या मानानें येतात. परंतु डिपार्टमेंटमध्यें जे प्रतिनिधि कॉम्यूनमधून जातात, त्यांच्या निवडणुकीचें धोरण क्षेत्रावर असतें. आतां केव्हां केव्हां मोठ्या क्षेत्रापेक्षां लहान क्षेत्रांत अधिक लोकसंख्या असते. त्याचा परिणाम असा होतो कीं, डिपार्टमेंटकरितां प्रतिनिधि निवडण्याच्या कामांत सर्वांत लहान असलेल्या कॅन्टनला सर्वांत पुष्कळ मतें देण्याचा हक्क येतो. त्याचप्रमाणें मोठ्या कॅन्टनपेक्षां लहान कॅन्टन अधिक संपन्न असूं शकेल. तथापि प्रांताच्या उत्पन्नाच्या मानानें कांहीं प्रतिनिधि कॉम्यूनमधून डिपार्टमेंटमध्यें पाठविण्याकरितां निवडतात. त्यांत लहान पण संपन्न कॅन्टनच्या वांट्यास मतसंख्या फार थोडी येते. आजपर्यंत एकराष्ट्र असलेल्या फ्रान्सदेशांत निरनिराळीं संस्थानें करून सर्व लोकांस अप्रगतिकारक समतेच्या मर्यादेंत आणणें हा ह्या पद्धतीचा सहेतुक परिणाम आहे. दोन माणसांत भिन्नता उत्पन्न करणारीं कारणें स्वभाववैचित्र्य आणि बुद्धिसामर्थ्य ह्यांचें कांहींच महत्त्व समजलें जात नाहीं. सर्व प्रांत सभेनें आपल्या ताब्यांत ठेवले आहेत. ह्यांवांचून समाजव्यवस्था अप्रतिहत राहण्यास दुसरी मुळींच तजवीज केलेली नाहीं. कारण नैसर्गिक गुणसमुदायानें लोकाग्रणी होण्यास योग्य असलेल्यांस अधिकार अथवा मोठेपणा दिलेला नाहीं. ह्याचा एक परिणाम असा होईल कीं, जर कदाचित् कोणी जुलमी सत्ताधिकारी निपजला, तर त्याचा प्रतीकार करण्यास कोणी राहणार नाहीं. फ्रेंचपद्धतींत दुसरा महत्त्वाचा दोष हा आहे कीं सभेंत बसणारे प्रतिनिधि प्रत्यक्ष लोकांनीं निवडले नसल्याकारणानें त्यांच्यानें प्रतिनिधीजवळ कामाचा हिशोब मागवत नाहीं. दोन वर्षांनंतर त्याच प्रतिनिधीला सभेंत बसतां येऊं नये अशा ठरावानें प्रतिनिधीस अनुभव मिळत नाहीं. उलट पुनः निवडण्यास तो योग्य होत आहे तों, मागें सभेंत असतांना त्यानें काम चांगलें केलें नसलें, तर तें लोकांच्या ध्यानांत राहणार नाहीं.

फ्रेंच क्रांतिकारांना पैशाची टंचाई भासली, सरकार खजिन्यांतली शिल्लक संपली, तेव्हां ही अडचण दूर करण्याकरितां त्यांनीं कागदाचें चलन सुरू केलें.

कागदाला अर्थात् धातूची किंमत येणार नाहीं. परंतु व्यवहाराच्या, व्यापाराच्या सोईकरितां कृत्रिम कागदी चलन बनविण्याची पद्धति आहे; तथापि जितक्या किंमतीचे कागद नाण्यादाखल वापरण्यास काढले असतील, तितकें नाणें सरकारास नेहमीं शिल्लक ठेवावें लागतें व तेव्हांच लोक कागदी चलन वापरण्यास तयार होतात. अशीं शिल्लक ठेवण्यास फ्रेंच लोकांजवळ मुळींच नाणें नव्हतें. तथापि देवालयांच्या जमिनी त्यांनीं खालसा केल्या होत्या. ह्या सर्व जमिनी एकदम विकल्या असत्या तर किंमत कमी येती; म्हणून ह्या जमिनींच्या हमीवर त्यांनीं कागदी चलन सुरू केलें. खालसा केलेल्या जमिनी मुख्य सत्ता हातीं असलेल्या सभेच्या स्वाधीन असल्यामुळें फ्रान्सदेशाचे संस्थानादाखल जे निरनिराळे भाग केले आहेत ते सर्व स्वतंत्र न होतां सभेच्या ताब्यांत राहून देशांत एक सत्ता कायम राहील असें फ्रेंच मुत्सद्यांना वाटत आहे; पण तो त्यांचा भ्रम आहे. फार तर जमीन विकून नाणें हातांत पडेपर्यंत सभेची सत्ता कायम ठेवण्यांत सर्वांचें हित आहे असें त्यांस वाटेल. जितक्या किंमतीचें कागदी चलन पाडलें आहे, तितक्या किंमतीची रक्कम खालसा केलेल्या जमिनी विकून निःसंशय येणार नाहीं. आणि तसें झालें म्हणजे राहिलेल्या जमिनी मिळविण्याकरितां सर्व लोक सभेविरुद्ध उठल्याशिवाय राहणार नाहींत. अशा प्रसंगीं वास्तविक सत्ता जमीनविक्री व कागदी चलन ह्यांची व्यवस्था करणाऱ्या अल्प प्रधानमंडळाच्या हातीं जाणार. पैशाच्या अशाश्वत किंमतीमुळें व्यवहारांतील प्रत्येक धंदा अनिश्चित होणार. त्याचप्रमाणें सभेला कदाचित् वाटत असेल कीं, सर्व देशाच्या राजधानीचें शहर पॅरिस असून तेथें स्वाभाविकपणें व्यापारी, राजकीय वगैरे उलाढाली होणार व त्यामुळें पॅरिसचे वर्चस्व कायम राहून सगळ्या देशाचीं राज्यसूत्रें सभेच्या हातांत राहतील. परंतु फ्रान्सच्या स्थानिक सभा पॅरिसच्या अंमलाखालीं फार दिवस राहतील असें वाटत नाहीं. ह्या पद्धतीचें एकंदर धोरण देशाभिमानाचा बीमोड करण्याचें आहे. कारण स्थानिक वस्तूंच्या आसक्तीनें देशाभिमानाचा उद्भव होतो. परंतु ज्याविषयीं मनुष्याच्या अंतःकरणांत प्रेमबद्ध आदरबुद्धि वसत होती त्या सर्वांचा फ्रेंच लोकांनीं नाश करून टाकला आहे. सभेवर

कोणाचा दाब नाहीं. त्यामुळें प्रत्येक नवीन सभासद पूर्वींच्याहून आणखी उलटापालट करण्यास प्रवृत्त होईल. असो, शेवटीं सांगावयाची गोष्ट म्हणजे परराष्ट्रांना देशाच्या तर्फे ज्यांच्याशीं बोलणेंचालणें करतां येईल असें कायमचें मंत्रिमंडळ नेमावयास पाहिजे होतें, तसें या राज्यव्यवस्थेंत नेमलेलें नाहीं.

कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या राजाची स्थिति निकृष्ट व सर्वथा शोचनीय करून टाकल्यामुळें लोकांच्या मनांत त्याच्याविषयीं आदरबुद्धि राहूं शकणार नाहीं. राज्यकारभारांत त्याला अधिकार दिलेला नाहीं. न्यायाच्या कामांत पाहिलें तरी, शिक्षांची नोंद करण्याचें काम मात्र त्याच्यावर सोंपविलेलें आहे. शिक्षेंत काडीमात्र बदल त्याला करतां येत नाहीं. शिक्षा देणाऱ्या न्यायाधीशांच्या नेमणुका करणेंहि त्याच्या हातीं नाहीं. विश्वासू व राजनिष्ठ नोकरांस इनाम देण्याचें त्याच्या मनांत आलें तर ती त्याच्या ताब्यांतली गोष्ट नाहीं. त्याच्या संमतीशिवाय झालेल्या कायद्यांची अंमलबजावणी मात्र त्यानें करावी. अशा रीतीनें ज्या सभेनें त्याची योग्यता कमी केली, त्या सभेकरितां तो हौसेनें काम करील हें संभवत नाहीं. ह्यापेक्षां जुन्या राजाशीं अजिबात संबंध सोडून ज्या मनुष्याच्या प्रामाणिकपणाविषयीं व उत्साहाविषयीं सभेची खात्री होती अशा मनुष्याला अंमलबजावणी करण्यास नेमिलें असतें तर बरें होतें. मंत्रिमंडळाचें राजाशीं सख्य झालें, तर दोनहि एकत्र होऊन सभेच्या विरुद्ध जातील; पण जर मंत्रिमंडळ सभेचें ओशाळें असेल, तर प्रत्येक बाबतींत तें राजाच्या कामांत व्यत्यय आणील. सभेंत बसण्याचा, नवीन कायदे करण्याचा, अथवा विद्यमान कायद्यांत फेरबदल करण्याचा अधिकार नसल्यामुळें मंत्रिमंडळ नामशेष होणार. सर्व यूरोपच्या दृष्टीनें राजा आणि त्याचें मंत्रिमंडळ ह्यांची शोचनीय स्थिति झाली आहे. शिक्षेच्या भयास्तव कायद्यांचें उल्लंघन त्यांच्या हातून होणार नाहीं हें खरें आहे. परंतु कायद्याची अंमलबजावणी करण्याचें कामहि त्यांच्या हातून उत्साहपूर्वक घडणार नाहीं. राजाच्या नुसत्या आस्तित्वानें देशाचें नुकसान झालेंच पाहिजे. कारण जो कोणी गादीवर असेल, त्याला आपलें राजपद अन्वर्थक करून घेण्याची इच्छा असणार व त्यासाठीं तो प्रयत्न करण्यास चुकणार नाहीं. आतां लोकांच्या आग्रहास्तव राजास

ठेवणें अवश्य होतें असें जर असलें, तर त्यास ज्यास्त अधिकार द्यावयास पाहिजे होते. उदाहरणार्थ, तह करण्याचा किंवा युद्ध करण्याचा अधिकार राजाला नसल्यामुळें परराष्ट्रांच्या फायद्याकरितां खटपट करणारी कांहीं देशद्रोही मंडळी राष्ट्रांत कलह उत्पन्न करतील. अशा स्थितींत प्रधानमंडळानें आपल्या जागेच्या राजीनामा देण्यास उद्युक्त व्हावें ह्यांत आश्चर्य नाहीं.

पूर्वीच्या पार्लमेंट सभांत सुधारणा करण्याऐवजीं सभेनें त्या समूळ नाहींशा केल्या. पार्लमेंटचे जुने सभासद स्वतंत्र असून त्यांना काढून टाकतां येत नव्हतें यामुळें कायदे, राज्यपद्धति आणि मालमत्ता ह्यांचें संरक्षण होईल असा भरंवसा होता. सर्वांमध्यें प्रजासत्ताक राज्यव्यवस्थेंत सरकारावर स्वतंत्र न्यायाधीशांचा दाब असणें अवश्य आहे. परंतु ह्यापुढें फ्रान्सांत न्यायाधीशांची निवड प्रांतांतील रहिवाशी करणार; अर्थात् जे मतें देतील त्यांच्या कामांत न्यायाधीशांचें वर्तन निःपक्षपात राहणार नाहीं. पार्लमेंटला लोक मान देतील अशा रीतीनें त्यांत सुधारणा करण्यास पाहिजे होती. आणि सभेचीं कृत्यें रद्द करण्याचा हक्क पार्लमेंटला दिला असता म्हणजे मूर्खपणाचे मनसोक्त कायदे झाले नसते. सभेच्या नोकराप्रमाणें मानला जाणाऱ्या राजाला आपल्या धन्यांच्या विरुद्ध तकरार करण्याचा हक्क देणें उपहासास्पद आहे. नवीन कायदे होईपर्यंत न्यायाधीशांना सभेचें म्हणणें शिरसावंद्य केलें पाहिजे. सारांश सरकार सांगेल तदनुसार ते अक्षरशः करणार. परंतु आपल्याला संमत नसलेल्या हुकमाची बजावणी सकारच्या मर्जीप्रमाणें लोक होऊं देणार नाहींत. कारण न्यायाधीशांची निवड लोक करितात. सभेनें नवीन आणि सोपे व साधे कायदे करण्याचें काम पतकरिलें आहे. साधे कायदे असल्यामुळें न्यायाधीशाच्या मर्जीवर गोष्टी राहतील. आणि त्यांचा निकाल लावण्यास कायदे नवीन असल्याकारणानें अनुभवाची मदत मिळणार नाहीं.

सैन्य उघड रीतीनें बंड करण्यास प्रवृत्त झालें आहे, आणि लवकरच देशाचें आधिपत्य त्याजकडे जाणार ह्यांत संशय नाहीं. बंड होईल असें पूर्वीच वाटलें होतें. सभेनें आपल्या कामाकरितां बंड करण्यास आणि जुलूम करण्यास शिपायांस पूर्वीं उत्तेजन दिलें. तिनें समतेचीं मतें शिकवून वरिष्ठ अधिकाऱ्यांची अवज्ञा

करण्यास शिपायांस शिकविलें आहे. तिनें राजसत्ता नामशेष करून टाकली आहे. आधीं शिपायांस शपथांची थट्टा करावयास शिकवून आतां शपथा घेऊन पूर्ववत् शांतता करण्याचे प्रयत्न सभा करीत आहे. सैन्यावर बेकायदेशीर अंमल चालवून स्थानिक स्वराज्यांतले लोक बेबंदशाहीचें उदाहरण घालीत आहेत. नवीन व्यवस्थांमुळें इतका कांहीं घोंटाळा झाला आहे कीं, मूळची अंदाधुंदी नाहींशी करण्यास सभेला तोच उपाय योजावा लागत आहे. समाजांत शिपायांची अगदी हलक्या वर्गांतील लोकांशीं गांठ पडून एकाचे अवगुण दुसऱ्यास जडतील. लष्करी अंमलाविषयीं शिपायांच्या मनांत असलेला अभिमान अस्तंगत होईल. वरिष्ठ अधिकाऱ्यांना आपल्या ताब्यांतल्या लोकांना हुकमांत वागविण्याच्या ऐवजीं त्यांची खुषामत करावी लागेल. स्वतः हे अधिकारी सभेच्या मंजुरीनें राजानें नेमावयाचे असतात. तेव्हां आपल्या इष्टमित्रांस मोठ्या जागा मिळाव्या म्हणून खटपट करणारे लोक सभेंत कलह माजवितील. आणि खुद्द अंमलदारांत जे सभेचे ऋणी असतील ते सभेला मिळतील, व ज्यांना राजानें नेमिलें असेल ते राजपक्षाकडे वळतील. सत्ताहीन राजाला फौजेंतले शिपाई जुमानणार नाहींत. ते त्याचा तिरस्कार करतील, किंवा त्याची त्यांना दया येईल. त्याचप्रमाणें वकिलांनीं भरलेल्या सभेचीहि ते परवा करणार नाहींत. दुसऱ्याला आपल्या ताब्यांत ठेवण्याचें ज्याच्या अंगांत पाणी असेल त्याच्याकडे सर्व सैन्याचें आणि अखेरीस देशाचें स्वामित्व जाईल. प्रत्येक मनुष्याला आपला अंमलदार निवडण्याचा हक्क आहे अशा मतांचा प्रसार बुद्धिपुरःसर होऊं देत असतां आणि तत्संबंधीं शिपायांच्या हक्काचा वादविवाद होऊन कित्येकांना तो हक्क दिला असतां, ज्या अंमलदारांना शिपायांनीं निवडलें नाहीं, त्यांचे हुकूम ते फार दिवस मानणार नाहींत. शांतता राखण्याकरितां सभेची सर्व भिस्त फौजेवर आहे; परंतु तिनेंच फौजेंत आणि लोकांत बेहुकमीपणाच्या मतांचा फैलाव केला आहे.

जमाबंदीची नीट व्यवस्था लावणें हें फ्रेंच मुत्सद्यांचें पहिलें काम होतें. कारण जमाबंदी म्हणजे राष्ट्राचे प्राण होत आणि तिची व्यवस्था लावून सुरळीत वसूल करण्यांत चतुर मुत्सद्याला आपलें बुद्धिसामर्थ्य दाखविण्यास उत्तम संधि सांपडते.

देशाचें उत्पन्न कोणत्या धोरणावर वाढवावें व त्याचा कसा उपयोग करावा ह्याविषयीं आपलें ज्ञान मुत्सद्यांच्या गतानुभवानें वाढलें आहे. परंतु फ्रेंच लोकांच्या कृतीवरून पाहतां ह्या कामीं त्यांची साधारण अक्कलहि दिसून येत नाहीं. उत्पन्न कमी करण्यांत मात्र त्यांनीं विलक्षण कसब दाखविलें आहे. कर बसविणें अन्यायाचें आहे म्हणून ते प्रथम सांगत गेले. आणि आतां लोकांपासून तो ते आग्रहानें घेत आहेत. अर्थात् सरकारच्या लोकांनीं अन्यायाचे म्हणून ठरविलेले कर देण्याचें लोकांनीं नाकारलें. ज्यांनीं नाकारलें त्यांच्याकडून सक्ती करून कर घेतले नाहींत. तेव्हां उदार व देशाभिमानी लोकांवर सर्व ओझें पडलें. पुढें लोकांनीं आपखुषीनें सरकारास पैशाची मदत करावी म्हणून विनवण्या झाल्या; पण त्याचाहि फारसा उपयोग न झाल्यामुळें सक्तीनें कर वसूल करण्याचे प्रयत्न आतां चालू आहेत. हल्लीं तिजोरींत जी कांहीं शिल्लक आहे, ती कागदी चलनाची आहे; वसूल कमी कमी होत जाऊन खर्चाचें प्रमाण वाढतें आहे. दुसऱ्या राष्ट्रांतून कर्ज मिळण्याची आशा नाहीं. अशा स्थितींत नवीन नाणें पाडणें हाच फक्त एक उपाय राहिला. परंतु ज्या खालसा केलेल्या जमिनींच्या जोरावर कागदी चलन पाडावयाचें त्या जमिनी वाढत नसल्यामुळें जितकें कागदी चलन नवीन निघेल त्या मानानें त्यांची किंमत कमी होणार. ज्या जमिनींच्या विश्वासावर लोकांनीं कागदी चलन पतकरलें त्या जमीनींची नक्की किंमत किती होईल तें लोकास अगोदर कळवावयास पाहिजे होतें. प्रसिद्ध झालेल्या हिशोबावरून असें दिसतें कीं, जमिनींच्या वास्तविक किंमतींच्या बाहेर त्या आधींच गहाण पडल्या आहेत व आणखी नवीन खर्च भागण्याकरितां अधिकाधिक गहाणाचा बोजा त्यांवर बसत आहे. कर वसूल करणारे अंमलदार लोकांजवळून नाणें घेऊन सरकारतिजोरींत कागदांचा भरणा करूं लागले. कारण ह्यांत त्यांचा फायदा होत असे. हा भरणा कबूल केला नाहीं, तर लोकांचा कागदी चलनावरचा विश्वास उडेल व सरकारची पत कमी होईल. म्हणून धातूच्या नाण्याची व कागदाच्या चलनाची किंमत सारखीच असें सांगून कागदाला नसती किंमत आणण्याचे प्रयत्न सभा करीत आहे. एकंदरींत सगळा फसवाफसवीचा प्रकार चालला आहे. नष्ट केलेल्या देवालयांच्या घंटा वितळवून त्यांचें नाणें पाडण्याच्या विचारांत जे मुत्सद्दी

आहेत, त्यांच्या शहाणपणास काय म्हणावें समजत नाहीं. फ्रान्सचा राज्यशकट चालविणाऱ्या कारभारी मंडळीच्या लक्षांत असें येत नाहीं कीं, सर्वत्र शांतता झाल्यावांचून वसूल वाढविण्याच्या उपायांचा खल करणें निरर्थक आहे. जेथें बेबंदशाही आहे तेथें कशाचीहि शाश्वती नाहीं. शाश्वती नसेल तेथें उद्योग करण्यास कोणी धजत नाहीं. उद्योगावांचून संपत्ति प्राप्त होत नाहीं. आणि संपत्ति नसेल, तर वसूल वाढणें शक्य नाहीं.

स्वातंत्र्याच्या नांवाखालीं फ्रान्समध्यें झालेले अत्याचार योग्य ठरणार नाहींत. स्वातंत्र्यालाहि मर्यादा आहेच. लोकनायक होणें म्हणजे आपण लोकांच्या मुठींत राहणें नव्हे. सगळयाचा विध्वंस केल्यामुळें वाईटाचा नाश होऊन थोडें-बहुत चांगलें निष्पन्न होण्याचा संभव आहे; पण फ्रेंच लोकांनीं जो अनर्थ केला त्याच्या मानानें त्यांच्या हातून कांहींच चांगलें झालें नाहीं. फ्रेंच-लोकांच्या दुष्कृतीचे परिणाम पाहून इंग्लिश लोकांनीं वेळींच जागृत व्हावें, आणि फ्रेंच लोकांप्रमाणें अविचाराचे व अनावश्यक असे फेरबदल सहसा करूं नयेत."

ह्याप्रमाणें बर्कच्या सुप्रसिद्ध व सर्वमान्य ग्रंथाचा सारांश आहे. त्यावरून धार्मिक, नैतिक, सामाजिक व राजकीय तत्वांचें बर्कनें किती व्यापक-दृष्टीनें विवेचन केलें आहे, हें वाचकांच्या ध्यानांत येईल. त्यानें स्पष्ट सांगितलें कीं, सभेची राज्यकारभार करण्याची पद्धति अविचाराची, अनिश्चित, घातकी व अन्यायाची आहे, इतकेंच नव्हे तर तिचे परिणाम काय होतील ह्याचें भविष्यहि त्यानें करून ठेवलें. त्याचें भाकीत अक्षरशः खरें झालें एवढेंच नव्हे, तर ज्या कारणाकरितां अमुक गोष्टी घडून येतील असें त्यानें म्हटलें त्याच कारणाकरितां तशा त्या घडून आल्या, हें पाहून बर्कच्या राजकीय दूरदृष्टीचें आश्चर्य वाटतें. 'दुसऱ्याला आपल्या ताब्यांत ठेवण्याचें ज्याच्या अंगांत पाणी असेल त्याच्याकडे सर्व सैन्याचें आणि अखेरीस देशाचें स्वामित्व जाईल' ह्या वाक्याची आठवण नेपोलियन बोनापार्टाच्या कारकीर्दीत कोणाला झाली नसेल ? समाजांतले उच्चनीच वर्ग मोडल्यानें अधिकाराचा पूर्ण अंमल चालविण्यास मार्ग सुगम होतो, हेंहि बर्कचें विधान पुढील गोष्टींनीं खरें ठरविलें आहे. अनियंत्रित राज्यव्यवस्थेंत कित्येक पूर्ण सत्ताधारी राजांना जी गोष्ट करतां आली

नसती ती फ्रेंच राज्यक्रांतीच्या एका वर्षांत झाली. जुलमी सत्ता दूर करण्याच्या हेतूनें जी राज्यक्रांति केली तिनें उलट ती सत्ता वाढली ! हा अर्थात् मूर्खपणाचा व अविचाराचा परिणाम होता.

एकंदरीनें राज्यक्रांतीपासून फ्रान्समधील सुराज्यव्यवस्थेची घडी विघडली. एकदां घोंटाळा झाला त्याचा परिणाम त्या देशास अद्यापि भोगावा लागत आहे असेंहि कित्येक मार्मिक तत्वज्ञांचें म्हणणें आहे. राज्यक्रांत्या अमक्याच पद्धतीनें व्हाव्या किंवा घडवून आणाव्या हें म्हणणें व्यर्थ आहे. त्या गोष्टी एका पिढींतील माणसाच्या हातच्या नसतात; तथापि बर्कचा सर्व रोख उतावीळपणानें थयथयाट घालून सुधारणा करूं पाहणाऱ्या लोकांविरुद्ध आहे. त्याचें पुस्तक प्रत्येक मुत्सद्दी म्हणविणाऱ्यानें वाचून त्यांतील विनमोल तत्वांचा निदिध्यास केला पाहिजे. लोकांचें पुढारीपण घेणाऱ्यांनीं बर्कनें दिलेला इशारा सदैव पुढें ठेविला पाहिजे. या पुस्तकांतील बर्कचें एकेक वाक्य म्हणजे सुविचाररत्नांची खाण आहे. त्याचा महिमा कोठवर वर्णावा ?

---

# भाग ८ वा

## वार्द्धक्य, पुत्रशोक व मृत्यु.

कोणतेंहि काम हातीं घेतल्यावर तें धैर्यानें व निश्चयपूर्वक शेवटास पोंचविण्या-विषयीं बर्कचा हातखंडा होता. फ्रान्सच्या राज्यक्रांतीवर एक लेख लिहून तो स्वस्थ बसला नाहीं. इ० स० १७९१ च्या आगष्ट माहिन्यांत "नवीन व्हिग पक्षाकडून जुन्या व्हिग पक्षास प्रार्थना" ह्या नांवाचा लेख त्यानें प्रसिद्ध केला. पार्लमेंटमध्यें "विचारां"वर जो वादविवाद झाला त्याला उत्तरादाखल हा लेख लिहिला असून त्यांत पुष्कळ मुद्यांचा जास्त खुलासेवार ऊहापोह केला आहे. विशेषेंकरून "विचारांत" प्रगट झालेलीं मतें नवीन नसून, पूर्वींच्या व्हिग पक्षीयांचीं तशींच मतें होतीं हें त्यानें ह्या लेखांत सिद्ध केलें आहे. लोकांना विद्यमान समाजस्थिति मोडतां येईल कीं काय ह्याविषयीं मुद्देसूद व सप्रमाण विवेचन करतांना तो म्हणतो—लोकांना प्रजाधर्मापासून पराङ्मुख करण्याकरितां कांहीं कुटिल लोक भलभलत्या मतांचा प्रसार करीत आहेत. त्यांच्या मतें समाजरचनेच्या वेळीं लोकांनीं समाजावरील आपली सत्ता मुळींच सोडली नाहीं. त्यांच्या कोणत्याहि कृत्याचा विचार करा. त्यांचें एक उत्तर आहे. 'लोकांनीं तें केलें आहे. वाटेल तेव्हां समाजाची सर्व रचना बदल-ण्याचा बहुजनसमूहाला हक्क नाहीं म्हणतां येईल काय? राजसत्तेची आज प्रजासत्ता तर उद्यां पुनः परत प्रजासत्तेची राजसत्ता, ह्याप्रमाणें त्यांस पाहिजे तें करतां येईल. ते समाजाचे धनी आहेत. कारण वस्तुतः बहुजनसमूह म्हणजेच समाज होय. फ्रेंच राज्यक्रांति बहुजनसमूहानें केली आहे आणि ती करण्यास त्यास पूर्ण अधिकार आहे.' पूर्ण अधिकार आहे म्हणजे मुळींच नाहीं. देशाची समाजव्यवस्था आणि राज्यव्यवस्था लोकांकडून गर्भित अथवा स्पष्ट कराराअंतीं

ठरली आहे. म्हणून करार करणारांपैकीं सर्वांची संमति असल्यावांचून अथवा करार मोडल्याशिवाय, त्या व्यवस्थेंत फेरबदल करण्यास अल्पजनसमूहाला किंवा बहुजनसमूहाला अधिकार नाहीं. कारण ज्या ज्या कामांत मनुष्य कांहीं गोष्टींविषयीं बांधला जातो व त्याच्यावर विवक्षित कर्तव्यें लादलीं जातात, त्या त्या कामांत इच्छेला येईल त्याप्रमाणें वागण्याचा त्याला हक्कच राहत नाहीं. अधिकृत वर्गाबरोबर केलेल्या करारांचें महत्त्व न मानण्यास लोकांस शिकविणें चांगलें नाहीं. कारण त्याबरोबर अधिकृत वर्गालाहि लोकांबरोबर केलेले करार मोडण्यास आपण शिकवितों. आणि ह्या व्यवहारांत शेवटीं लोकांचें खचित नुकसान होणार. प्रामाणिकपणा, सत्य आणि न्याय हीं सोडून देण्यास लोकांस शिकविणें म्हणजे त्यांना ठार बुडविणें आहे. कारण ह्या सद्गुणांत त्यांची सर्व सुरक्षितता आहे. करारानें एक विशिष्ट मनुष्य बांधला जाऊन बाकीच्यांस तो मोडण्यास मोकळीक आहे असा लोकांचा समज होऊं दिल्यानें, ज्यांनीं नीतिमत्तेचे नियम अक्षरशः पाळिले पाहिजेत त्यांच्या मर्जीवर शेवटीं ते राहतील; आणि जगाची नियामक व सन्मार्गप्रवर्तक शक्ति चंचल बुद्धीच्या आणि विचारमूढ लोकांच्या स्वाधीन होईल. ज्याप्रमाणें, व्यक्तिमात्राला खासगी किंवा लौकिक बाबतींत वचनभंग करतां येत नाहीं; अथवा दुसरें कोणतेंहि नैतिक बंधन मोडतां येत नाहीं; त्याप्रमाणें लोकसमुच्चयालाहि तसें करतां येणार नाहीं. अपराध करणारांच्या संख्येमुळें त्यांचीं कृत्यें प्रशंसनीय न होतां उलट अपराधाचें स्वरूप जास्त उग्र व अक्षम्य होतें. मला ठाऊक आहे कीं, मनुष्याला आपल्या अधिकाराच्या गोष्टी ऐकण्यास आवडतें. पण त्यांच्या कर्तव्याचें स्मरण करून दिलें असतां, त्यांस तें मुळींच रुचत नाहीं. स्वाभाविक आहे. कारण, आपलें प्रत्येक कर्तव्य म्हणजे पूर्ण सत्तेचें कांहीं तरी नियंत्रण होय. खरोखर अशिक्षित लोक अनियंत्रित सत्तेविषयीं इतके लोभी असतात कीं, समाजशांततेचा भंग करणारे त्यांचे सर्व तंटे अधिकाराचा उपयोग कशा रीतीनें करावा ह्याविषयीं नसून तो कोणाच्या हातांत असावा अशाविषयीं असतात. आतां तो बहुजनसमूहाला अथवा अल्पजनसमूहाला द्यावा एतद्विषयक त्यांची इच्छा, आपल्यास तो तेथें अधिकार चालविण्याचा संभव ज्यांत

असेल त्यावर अवलंबून असते. अधिकाराची हांव धरण्यास मनुष्यास शिकविण्याची गरज नाहीं. उलट आपल्या अतृप्य इच्छेवर आणि आणि अधिकाराच्या फाजील उपयोगावर पुष्कळ निर्बंध ठेवण्यास नैतिक शिक्षणाच्या योगानें आणि राष्ट्रीय संस्थांच्या साहाय्यानें मनुष्यास शिकविणें अगत्याचें आहे. ह्या दोन गोष्टी कशा रीतीनें उत्तम साधतां येतील हा महत्त्वाचा पण कठीण प्रश्न खऱ्या मुत्सद्यापुढें सतत उभा असतो. कोणत्या उपायानें राजकीय अधिकारावर कमजास्त मानानें हितावह निर्बंध राहील व अधिकाराचा शहाणपणानें उपयोग होईल ह्यावर नजर ठेवून राजसत्ता कोणाच्या हातांत द्यावी हें मुत्सद्यास ठरवावयाचें असतें. एवढ्यासाठीं कोणत्याहि मुत्सद्यानें आजपर्यंत जनसमूहावर क्रियात्मक सत्ता आपखुषीनें सोपविली नाहीं. कारण मग निर्बंध किंवा नियम कांहींच रहात नाहीं. अधिकारावर स्वाभाविक निर्बंध लोकांचा असतो, पण आपणच त्यावर करडी नजर ठेवूं पाहणें अशक्य व परस्परविरुद्ध आहे.

प्रजासत्ताक अंमलाखालीं अधिकाराचा दुरुपयोग होऊं न देण्याविषयीं नीटसा प्रतिबंध करतां येत नसल्यामुळें अधिकाराविषयीं नैसर्गिक असलेला उत्कट अभिलाष कमी करण्याचा दुसरा मोठा उपाय ह्या व्यवस्थेंत मुळींच करतां येत नाहीं. प्रजासत्ता व राजसत्ता हीं महत्त्वाकांक्षेचीं माहेरघरें आहेत. दुसऱ्या राज्यपद्धतींत महत्त्वाकांक्षेवर पुष्कळ निर्बंध असतात. प्रजासत्ताक राज्यव्यवस्थेंत जेव्हां जेव्हां मुत्सद्यांनीं महत्त्वाकांक्षेवर निर्बंध ठेवण्याचे प्रयत्न केले आहेत, तेव्हां तेव्हां त्यांचे उपाय अत्यंत अधिकारलोभी राजाप्रमाणें जबरदस्तीचे असून अखेरीस निष्फळ झाले आहेत. नीतिशास्त्राचे नियम समाजाला लागू आहेत असें ज्यांस वाटतें, त्यांनीं हें पूर्णपणें लक्षांत ठेवावें कीं, जर समाजाशीं आपल्या कर्तव्यानें आपण बांधले गेलों असलों, तर तें कर्तव्य आपल्या इच्छेवर अवलंबून नाहीं. कर्तव्यें स्वेच्छाधीन नसतात. कर्तव्य आणि इच्छा ह्यांची बहुधा संगति नसते. सामाजिक स्थिति लोकांनीं प्रथम आपखुषीनें पतकरली हें खरें आहे. परंतु ती तशीच चालू ठेवण्यास समाजाबरोबर सहचारी असणाऱ्या कायमच्या करारानें ते बांधले गेले आहेत. यत्किंचित् कृति केल्यावांचून समाजांतील व्यक्ति-

मात त्या करारानें बांधला जातो. एकंदर मनुष्यजातीला पसंत असल्यामुळें व पुष्कळ दिवसांच्या वहिवाटीनें ही व्यवस्था योग्य ठरली आहे. इच्छा नसतांहि समाजापासून मनुष्याचा लाभ होतो. आणि म्हणून त्यांची इच्छा नसतांहि त्यांजवर कर्तव्यें लादलीं जातात. त्याचप्रमाणें त्यांची इच्छा नसतां, ह्या सामाजिक करारानें त्यास बांधून घ्यावें लागतें. आयुष्यांतील गोष्टींचा व आपल्या कर्तव्यपद्धतीचा विचार केला तर असें आढळेल कीं, अत्यंत बलवत्तर नीतिबंधनें हीं कांहीं आपल्या इच्छेचा परिणाम नव्हत. नीतिनियम करण्याचें शहाणपण व तो पाळावयास लावण्याचें सामर्थ्य ज्याच्यांत आहे अशा परमनियामकाचें अस्तित्वच नाकबूल केलें, तर कोणत्याहि कराराला कायमपणा नाहीं. ज्याच्यांत तो मोडण्याचें सामर्थ्य असेल त्यानें तो खुशाल मोडावा; परंतु पॅरिसच्या तत्ववेत्त्यांच्या चेल्यांकरितां मी लिहित नाहीं, हें गृहीत धरून जन्मदात्या ईश्वरानेंच सृष्टप्राण्यांत विवक्षित स्थल आपणांस नेमून दिलें आहे, असें मानण्यास हरकत नाहीं. एकंदर मनुष्यजातीशीं आपलीं जीं कांहीं कर्तव्यें आहेत, तीं आपण केलेल्या कोणत्याहि एका विशिष्ट करारान्वयें नाहींत. त्यांचा उद्भव मनुष्यांमनुष्यांमध्यें आणि मनुष्य व ईश्वर ह्यांमध्यें जो संबंध आहे, त्यांपासून आहे. आणि हे संबंध आपल्या इच्छेचे नाहींत. कांहीं कमी महत्त्वाचे संबंध आपण होऊन करतों व कांहीं अगत्याचे असतात; पण सर्वांत कर्तव्यें हीं आपल्याला करावींच लागतात. लग्न करणें आपल्या मर्जीची गोष्ट आहे; पण तदुद्भूत कर्तव्याचें तसें नाहीं. लग्न केल्यावरोबर तीं कर्तव्यें आपल्याला चिकटलींच. आपण जगांत कसें येतों, ते मार्ग अनधिगम्य आहेत. हा गूढ सृष्टिक्रम ज्या अंगभूत ज्ञानानें सुरू होतो, तें ज्ञान आपण मिळविलेलें नाहीं. आपल्याला अज्ञात, कदाचित् अज्ञेय असलेल्या, भौतिक कारणांपासून नैतिक कर्तव्यें उत्पन्न होतात. तीं करणें आपणांस भाग आहे; कारण तीं काय आहेत हें आपणांस पक्कें समजतें. आईबाप आपल्या नैतिक संबंधाला कदाचित् कबूल नसतील; पण कबूल असोत किंवा नसोत, ज्यांच्याशीं त्यांनीं कधींहि कोणत्याहि प्रकारचा करार केला नाहीं अशांबरोबर पुष्कळ जबाबदारीच्या कर्तव्यांनीं ते बांधले जातात. मुलांची आपल्या संबंधाला संमति नसते; पण त्यांच्या अनुमतीशिवाय

नुसत्या संबंधानेंच त्यांच्यावर कर्तव्यें लादलीं जातात. अथवा पूर्वी निश्चित सृष्टिक्रमांत मनुष्यमात्राचा जन्म होत असल्यामुळें, जन्माला त्यांची संमति आहे, असें मानण्यास हरकत नाहीं. ह्याप्रमाणें मनुष्यें समाजांत येतात तीं आपल्या आईबापांच्या सामाजिक स्थितीसह येतात; त्याबरोबरच, त्यांच्या आईबापांच्या स्थितीचे सर्व फायदे त्यास मिळतात, व त्या स्थितीचा बोजाहि त्यांस सोसावा लागतो. राष्ट्राचें मूळबीज असलेल्या या भौतिक संबंधापासून उत्पन्न झालेल्या सामाजिक ग्रंथी ज्याप्रमाणें आपल्या इच्छेवर नसतात, त्याप्रमाणेंच ज्याला आपण देश म्हणतों त्यासंबंधानें आपल्याकडून कांहीं कबुली नसतांहि आपण बांधले जातों. हें कर्तव्य खडतर न भासतां प्रिय व्हावें म्हणून आपल्यांत विलक्षण तद्विषयक उपजत वासना उत्पन्न झालेली असते. आपला देश म्हणजे नुसता क्षेत्रसमुदाय नव्हे, तर ज्या समाजस्थितींत आपण जन्म घेतों, तो प्राचीन समाज होय. भूगोलाच्या चतुःसीमा तशाच राहून आपला दुसरा देश असूं शकेल. तसेंच दुसऱ्या भूपृष्ठावर तोच देश असणें शक्य आहे. ज्याच्यायोगानें देशाविषयीं आपलें कर्तव्य निश्चित होतें तो समाजसंबंध होय."

ह्याप्रमाणें, समाजोत्पत्ति, समाजाशीं व्यक्तिमात्राचा संबंध आणि गूढ व दुर्ज्ञेय ईश्वरी सूत्रानें होणाऱ्या गोष्टी, एतद्विषयक बर्कचीं मतें स्पष्ट समजण्यासारखीं आहेत. चालू शतकांत शोध लागलेल्या उत्क्रमणशास्त्राची निर्दोषता व पूर्णावस्था जेव्हां बिनतोड स्थापित होईल तेव्हांच कदाचित् वरील कांहीं मतांना धक्का लागण्याचा संभव आहे. फ्रेंच राज्यक्रांतिकार आपल्या कृतींचें मंडण तत्वज्ञानाच्या जोरावर करीत असत. त्यामुळें समाज, राष्ट्र, नीति व धर्मविषयक तात्विक विचारांचें विवेचन बर्कला करावें लागलें. बर्कच्या अगोदरच्या तत्वज्ञांचे विचार अपुरे व एकतर्फी आहेत. कदाचित् अन्यायी राज्यव्यवस्थांचा तो स्वाभाविक परिणाम असूं शकेल. बर्कनें अवशिष्ट बाजू पुढें आणून तोंपर्यंतच्या तत्वज्ञानाला निराळें स्वरूप दिलें ह्यांत संशय नाहीं. ह्याच लेखांत त्यानें लोक म्हणजे काय तें सांगितलें आहे. " असंस्कृत प्राथमिक स्थितींत लोक ही संज्ञा कोणालाच नसते. नुसत्या मनुष्यसमुदायानें एकत्रपणाचा बोध होत नाहीं. समाजाची कल्पना असल्याशिवाय लोक ही कल्पना करितां येणार नाहीं. समाज

कृत्रिम आहे, आणि तो सर्वांच्या करारानें झाला आहे. ज्या स्थितींत समाज असेल त्या स्थितीवरून त्या कराराचें स्वरूप जाणतां येईल. दुसरा कोणताहि करार त्या विवक्षित समाजाचा करार नव्हे. म्हणून जेव्हां लोक मूळचा करार मोडतात, तेव्हां त्यांच्या मधून लोकत्व नाहींसें होतें. त्यानंतर त्यांच्यांत एकवटपणा रहात नाहीं. त्यांस एकत्र ठेवण्याचें कायदेशीर अंतर्गत निर्बंध मग रहात नाहींत, व परकीयांनीं समुदाय ह्या नात्यानें ओळखावें असा त्यांचा हक्क उरत नाहीं. परस्परांशीं कांहींएक संबंध नसणारे असे ते स्वतंत्र व्यक्तिमात्र होतात. ह्याशिवाय दुसरें कांहीं नाहीं.

खोल विचार न करतां एकदम कांहींतरी विधान करणाऱ्या मंडळीकडून वारंवार असें सांगण्यांत येतें कीं, हवें तें करण्यास समर्थ असलेल्या बहुजनसमूहाकडून फ्रान्सच्या प्राचीन समाजाची विघटना केली गेली आहे; परंतु विघटित झालेल्या मनुष्यमात्रांत बहुमत अथवा कमी मत असणें शक्य नाहीं. कारण, त्या स्थितींत कोणत्याहि दोन व्यक्तींचा परस्पर संबंध रहात नाहीं. नेहमींच्या प्रचारांतल्या गोष्टी अंगवळणीं पडल्यामुळें त्या स्वभावसिद्धच आहेत असा भास होतो. त्यांतलाच प्रकार बहुमतानें सर्वांनीं चालणें ह्या कल्पनेचा झाला आहे. परंतु समाजांतील कांहीं लोकांत सर्व समाजाचा अंतर्भाव होतो असें मानण्याची कल्पना समाज अस्तित्वांत आल्यावर लोकांनीं आपण होऊन केलेली आहे. स्वभावसिद्ध नसल्यामुळें, कृत्रिम समाजाबाहेर व्यक्तींत ती दिसत नाहीं. आणि समाजांतहि पुष्कळ दिवसांच्या शिक्षणानंतर मनुष्य बहुमतानें चालण्यास तयार होतो. एका मनुष्याचीं किंवा त्यानें ज्यांना अधिकार दिला आहे अशा थोडक्या मनुष्यांचीं कृत्यें मान्य करण्यास आपण लवकर शिकतों; परंतु ज्या वादविवादांत प्रत्येकाचें अंग असतें, त्यांत यशस्वी बहुपक्षाचें मत एकदम कबूल करणें मनुष्यस्वभावाविरुद्ध आहे. कारण आधीं झालेल्या वादविवादानें क्षुब्ध होऊन, अखेरीस आपल्या म्हणण्याप्रमाणें होत नाहीं हें पाहून मनुष्य हताश व खिन्न होतो. त्याचप्रमाणें, अधिकपक्ष व न्यूनपक्ष जेव्हां बहुतेक समतोल असतात, कारण, एका पक्षाला एक मनुष्य अधिक मिळाल्यानें त्या पक्षाचें बहुमत होतें–केव्हां केव्हां न्यूनपक्षांतील लोक अधिक सामर्थ्यवान असतात,

आणि कधीं कधीं सयुक्तिकता एका बाजूला असून, दुसऱ्या बाजूला नुसता अविवेक असतो—अशा वेळींहि बहुमताप्रमाणें सर्वांनीं वागणें ही पद्धति लोकांचा विशेष करार होऊन व तो पाळण्याची फार दिवस संवय झाल्यानें अंमलांत आली असली पाहिजे. आणि कदाचित् अधिकपक्षाच्या ठरावाचा सर्वत्र अंमल करण्याकरितां एखाद्या सामर्थ्यवान् मनुष्याच्या हातांत आरंभीं कायमची सत्ता द्यावी लागली असेल. कोणाचें मत म्हणजे सर्व समाजाचें मत मानावें ही गोष्ट लोकांच्या खुषीची असून त्यांनीं ठरविलेली आहे. त्यामुळें कित्येक राष्ट्रांत कायदेशीर कृत्य होण्याकरितां पुष्कळ बहुमत असावें लागतें व कांहीं ठिकाणीं अल्पजनसमूहाच्या निर्णयानें सर्व लोक बांधले जातात. कांहीं देशांत मनुष्यास दोषी ठरविण्यास बहुमत भक्कम असावें लागतें, आणि दोषमुक्त करण्यास निम्मेहून कमी संख्या पुरते. आपल्या देशांत दोषी अथवा दोषमुक्त ठरविण्यास ज्यूरींचें एकमत व्हावें लागतें. कांहीं संस्थांत सर्वांच्या वतीनें एकजणास कांहीं कृत्यें करण्यास अधिकार असतो व दुसऱ्या कित्येक संस्थांत जास्त पण थोडक्याच लोकांस तो दिलेला असतो. अगदी आतांपर्यंत पोलंडच्या पार्लमेंटसभेंत कोणत्याहि महत्त्वाच्या राजकीय बाबतींत ठराव होण्यास सर्वांचें एकमत होणें अवश्य होतें. परंतु ही पद्धति समाजाच्या आद्य स्थितीलाच शोभण्यासारखी आहे. खरोखर सुधारलेल्या राष्ट्रांत कांहीं नियमित लोकांची इच्छा तीच सर्व लोकांची असें मानल्याशिवाय चालत नाहीं.

समाजाचा उद्धार करण्याच्या बुद्धीनें प्राचीन संयोगग्रंथि जर लोक तोडून टाकतील तर मग प्रत्येक मनुष्याला वाटल्यास व्यक्तिश: राहण्याचा हक्क आहे. आणि कांहीं व्यक्तींचा बेत ठरल्यास इतरांपासून अलिप्त असा आपला स्वतंत्र समाज स्थापण्याचा त्यांना नि:संशय अधिकार आहे. ह्यांपैकीं एखाद्याला दुसऱ्याच्या सहवासांत राहण्याचें जर भाग पडलें, तर तो आपखुषीनें केलेला करार नव्हे; निव्वळ बळजबरी होय. एकंदरींत स्वेच्छापूर्वक झालेल्या करारान्वयें समाज अस्तित्वांत आला आहे हें ज्या तत्वांवर आपण समजूं, त्याप्रमाणें हल्लींचें हें जबरदस्तीचें ऐक्य अन्यायाचें व बेकायदेशीर ठरलें पाहिजे.

प्रत्येकाची संमति असल्यावांचून ज्याप्रमाणें सर्वांना समाजस्थितींत आणण्याचा हक्क लोकांना पोचत नाहीं, त्याप्रमाणें समाजाच्या नांवानें कोणत्याहि जमिनी त्यांस फक्त आपल्याच ताब्यांत ठेवतां येत नाहींत. सांप्रतच्या फ्रेंच अधिपतींच्या विचारपद्धतीप्रमाणें फ्रान्ससंज्ञक भूपृष्ठावर जितका माझा हक्क आहे तितकाच फ्रेंच लोकांचा आहे. जेथें म्हणून रिकामी जागा मला सांपडेल तेथें तंबू ठोकण्याचा मला अधिकार आहे. तसेंच माझ्या उदरनिर्वाहार्थ त्यांची ओसाड पडलेलीं शेतें मला नांगरतां येतील. नवीन समाजांत येण्याचें ज्यानें नाकारलें असेल—आणि असें पुष्कळदां होतें—त्याच्यापासून त्याच्या मालकीचें घर किंवा बाग मला विकत घेतां येईल. त्याच्या स्वतंत्र जागीं मी उभा आहे. आपणांला फ्रेंच राष्ट्र म्हणवून घेऊन सृष्टीच्या ह्या मनोहर भागाचा आपणच एकटे उपभोग घेणारे हे कोण ? मला न समजणाऱ्या अशा त्यांच्या भाषावैचित्र्यानें माझ्या जमिनीवर त्यांना हक्क प्राप्त होतो काय ? पुरातन वहिवाटीनें मिळकतीवर मालकी शाबीत होत नाहीं, म्हणून मला सांगणारे हे तत्क्षणींच आपला हक्क पुरातन वहिवाटीच्या जोरावर कसे सांगूं शकतात ? अशा रीतीनें जास्त विचार केला असतां उघड दिसतें कीं, आपणाला लोक म्हणवून घेणाऱ्या फ्रेंच मनुष्यांचा फ्रान्सच्या जमिनीवर अनन्यसाधारण असा हक्क कायदेशीर रीतीनें कधींहि असूं शकणार नाहीं. राष्ट्रांत बहुजनसमूहाच्या म्हणण्याचा विचार करणें गैर होय. खरा नैसर्गिक उच्च वर्ग राष्ट्रांत असणें फार अगत्याचें आहे. लोकमान्य कुलांत वाढणें; बालपणापासून नीच व क्षुद्र असें कांहींहि न पाहणें; स्वतःविषयीं योग्य अभिमान बाळगण्यास शिकणें; आपलें वर्तन सक्त लोकपरीक्षणाच्या कसोटीस उतरेल अशाविषयीं खबरदारी घेण्याची संवय असणें; प्रथमपासूनच लोकमताची अपेक्षा करणें; मोठ्या समाजांतील नानाविध व असंख्य मनुष्यांचें आणि कृत्यांचें दूरवर निरीक्षण करतां येईल इतक्या उच्चस्थानीं अधिरूढ होणें; वाचण्यास, मनन करण्यास आणि संभाषणास फुरसत मिळणें, कोणत्याहि वर्गांतील शहाण्या व विद्वान् लोकांचें लक्ष्य आपल्याकडे ओढून घेण्याचें सामर्थ्य असणे; सैन्यांतील अधिकार व आज्ञाधारकत्व ह्या दोहोंसहि परिचित असणें; अब्रू मिळविण्यांत व स्वकर्तव्य बजावण्यांत कोणतेंहि

संकट न जुमानण्यास शिकणें; ज्या स्थितींत कोणत्याहि अपराधाचा दंड पड-ल्यावांचून रहात नाहीं व क्षुल्लक चुक्यांचे अत्यंत घातुक परिणाम होतात, अशा स्थितींत दक्षतेनें, सावधगिरीनें, आणि दूरदर्शित्वानें वागण्याचें अंग-वळणीं पडणें; अत्यंत महत्त्वाच्या बाबतींत आपले देशबंधु आपलें अनुकरण करि-तात अशा समजुतीनें आपला वर्तनक्रम निर्दोष व चोख ठेवण्याचें भाग पडणें; कायद्याची अंमलबजावणी करण्याचें व न्याय देण्याचें काम पतकरून मनुष्य-जातीवर स्पृहणीय उपकार करणें; श्रेष्ठ शास्त्रांचा आणि उज्वल कलांचा अध्या-पक होणें; यशःप्राप्तीवरून ज्यांच्या बुद्धितीव्रतेचें अनुमान करतां येतें अशा सधन वणिग्वर्गापैकीं एक होणें; उद्योगशीलता, व्यवस्था, दृढबुद्धि, आणि निय-मितपणा हे गुण असणें; ह्या प्रकारचे लोक स्वभावतःच उच्च वर्गांत मोडले पाहि-जेत. त्यावांचून निराळें राष्ट्र नाहीं. ज्या सामाजिक स्थितींत असा उच्च वर्ग उत्पन्न होतो तीच स्थिति स्वाभाविक होय. कारण मनुष्य स्वभावतःच बुद्धि-संपन्न आहे. म्हणून ज्या स्थितींत त्याच्या बुद्धीचा उत्कृष्ट उपयोग होतो, तीच त्याची स्वाभाविक स्थिति होय. सर्व समाजाचें नायकत्व अशा गुणविशिष्ट उच्च वर्गांतील लोकांकडेच असतें. आत्म्यावांचून देह जसा निर्जीव, तसाच गुणी लोकांविरहित समाज होय. म्हणून समाजव्यवस्थेंत नुसत्या व्यक्तिमात्रा-शिवाय त्यांची योग्यता अधिक न समजणें फार हानिकारक आहे. वर सांगि-तलेल्या स्वाभाविक नियमाला अनुसरून जेव्हां मनुष्यांचे समुदाय वागतात; तेव्हां त्यांस मी 'लोक' ही संज्ञा देतों."

फ्रेंच लोकांचें असें म्हणणें होतें कीं, आपल्या राज्यक्रांतिकृत्याला फ्रान्सच्या बहुतेक लोकांचें पाठबळ असल्यामुळें तें योग्यच म्हटलें पाहिजे. परंतु इच्छेस येईल तेव्हां बहुमतानें विद्यमान राज्यव्यवस्था मोडण्याचा हक्क कायदेशीर रीतीनें लोकांस प्राप्त होत नाहीं. अशा हक्कांच्या योग्यतेचा निर्णय अर्थातच त्यांच्या परिणामावरून ठरवावयाचा असतो. तेव्हां राष्ट्रांतील बहुपक्षाकडे असा हक्क दिल्यानें त्याचे स्वाभाविक परिणाम काय होतील ते बर्कनें खालीं लिहिल्याप्रमाणें सांगितले आहेत. "व्यक्तिमात्राला मिळून लोकसमुदाय झालेला असतो. पुढें बहुपक्षाचें म्हणून जें कृत्य होणार त्याची आरंभीं सुरुवात

करण्यास प्रत्येक व्यक्तीला हक्क असला पाहिजे. कायदेशीर रीतीनें ज्या गोष्टींचा त्याला आरंभ करतां येतो, ती सिद्धीस नेण्याचे प्रयत्न त्यास कायदेशीर रीतीनें करतां येतील. म्हणजे स्वदेशाशीं ज्या कर्तव्यांनीं तो बांधला जातो, तीं मोडण्याचा त्याला अधिकार आहे. आणि लोकांचीं मनें वळवून त्यांना आपले अनुयायी करण्याचा व आपल्या व्यवसायांत मिळतील तितके साथीदार मिळविण्याचा त्याला हक्क आहे. कारण असें केल्याशिवाय विद्यमान राज्यपद्धतीविरुद्ध उठण्यास पुष्कळ लोक तयार आहेत, असें पूर्वी कसें समजणार ? अशा मतांनीं आपला देश, त्यांतील कायदे व रीतिभाति ह्याविषयीं आपली पूज्यबुद्धि व प्रेम सर्व नष्ट होईल. दुसऱ्यांस आपल्याकडे वळविण्याची ज्याच्यांत धमक असेल, त्याची राज्याची सर्वथैव उलटापालट करण्याची हौस कशानें नाहींशी होणार ? ”

वरील लेख लिहिण्याच्या पूर्वी म्हणजे जानेवारी महिन्यांत फ्रान्सच्या राष्ट्रीय सभेच्या सभासदाला त्यानें एक पत्र लिहिलें होतें. ह्या पत्रावरून आणि उत्तरोत्तर त्यानें ह्या विषयावर जे लेख लिहिले, त्यांवरून बर्कच्या मनःस्थितींत कसाकसा बदल होत गेला हें चांगलें व्यक्त होतें. “विचारांत” सामाजिक व राजकीय तत्वांवर फ्रेंच मुत्सद्यांच्या कृतींबद्दल फक्त नापसंती दृष्टीस पडते. पण इतउत्तर त्या लोकांविषयीं तो तिरस्कारजन्य मनोविकारांनीं ग्रासलेला दिसतो. ह्या पत्रांत रूसोवर कडक टीका असून, इंग्लंडांत मुख्य न्यायाधीशाच्या जागीं क्रॉमवेलनें हेलची नेमणूक केली म्हणून त्याची प्रशंसा आणि फ्रान्समध्यें स्टेट्स जनरल नांवाची सभा ज्या रीतीनें भरविली तींत दृष्टीस पडणाऱ्या अदूरदर्शित्वावर भारदस्त टीका केलेली आहे. ह्याच पत्रांत प्रथमतः बर्कच्या पुढील मतांचा प्रथमांकुर दृग्गोचर होतो. इंग्लंड आणि प्रशिया या दोघांनीं मिळून ज्याप्रमाणें हॉलंडला वांचविलें व प्रशियानें करड्या नजरेच्या रशियाच्या झडपेंतून रानटी तुर्कस्थानास सोडविलें, त्याप्रमाणें फ्रान्सच्या राजाला पुनः सिंहासनारूढ करण्याकरतां इतर राष्ट्रांनीं मध्यें पडावें असें त्यानें सुचविलें आहे. ह्या पत्रांत त्यानें स्पष्ट म्हटलें आहे कीं, राजाला जिवंत ठेवण्याची आवश्यकता जेव्हां राहणार नाहीं, तेव्हां फ्रेंच लोक त्यास त्याच्या प्रिय पत्नीसह यमसदनास पाठ-

विल्याशिवाय राहणार नाहींत. हें भविष्य पुढें खरें ठरलें, व तें बर्कच्या गंभीर व परिपक्व विचारपद्धतीची साक्ष देत आहे. फ्रेंच लोकांच्या ज्या स्वभाववैचित्र्यावरून त्यानें अनुमानें बांधलीं व कालगतीनें तीं खरीं झालीं, त्या फ्रेंच लोकांच्या स्वभावाचें व परिस्थितीचें त्यास पूर्ण ज्ञान झालें होतें असें म्हणणें भाग पडतें. फ्रेंच लोकांच्या हातून देशहित अथवा व्यक्तिहित होईल ही अपेक्षा करणें व्यर्थ आहे. ह्याचें कारण त्यानें खालीलप्रमाणें दिलें आहे. "मनुष्य भरभराटीच्या स्थितींत असल्यावरच त्याच्या खऱ्या स्वभावाची पारख होते. जर त्याच्यामध्यें कांहीं चांगलें असेल तर तें तेव्हांच दृष्टीस पडेल. शिकार मारून आल्यावर लांडगे आणि वाघसुद्धां सौम्य बनतात. थोर माणसें आपल्या सात्विक वृत्ती अबाधित राखितात तें अशाच वेळीं होय. विपन्नांविषयीं सदयत्व, जिंकलेल्यांविषयीं उदार बुद्धि, अपमानसहिष्णुता, अपराधक्षमा, आणि उपकारांबद्दल अमर्याद कृतज्ञता ह्यांत ते आपल्या बुद्धीचा उपयोग करतात. परंतु अपात्र असून दैववशात् लक्ष्मीच्या कृपाचामराचा सुखानिल उपभोगीत असतां, अति नीच, अनुदार, कृपण व अधम लोक अशा आपल्या वैभवानें फुगून जातात; त्यांचा मूळचा क्रूर व क्षुद्र स्वभाव पूर्ण विकास पावतो. अशा प्रसंगीं अनूदार व समंजस मनुष्य तेव्हांच निवडून काढतां येतो."

स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यास कोण पात्र आहेत, ह्याचा विचार करतांना तो म्हणतो—"आपल्या मनोविकारांवर नैतिक प्रतिबंध ठेवण्यास ज्या मानानें लोक तयार असतील, ज्या मानानें अपहारबुद्धीवर न्यायप्रेमाचा पगडा पडण्याइतकें ते सदृढ असतील, ज्या मानानें प्रगल्भ व नेमस्त विचारांपुढें डौल व पोकळ गर्व ह्यांचें कांहीं चालणार नाहीं, ज्या मानानें धूर्त लोकांच्या खुशामतीला न जुमानतां शहाण्या व सुशील लोकांच्या उपदेशानें चालण्यास ते प्रवृत्त होतील, त्या मानानें ते सामाजिक स्वातंत्र्य उपभोगण्यास योग्य आहेत असें म्हटलें पाहिजे. अनियंत्रित वासना व मनोविकार ह्यांवर नियामक शक्ति कोठेंतरी असल्यावांचून समाज चालणार नाहीं आणि ती आंतून जितकी कमी असेल तितकी बाहेरून जास्त पाहिजे. अनिवार्य मनोविकारांच्या माणसांना स्वतंत्र असणें शक्य नाहीं.

ह्या सृष्टिनियम आहे. म्हणून फ्रेंच लोक स्वातंत्र्याला अद्यापि योग्य झाले नाहींत, अशी माझी समजूत आहे."

फ्रेंच मुत्सद्यांचें दोषाविष्करण मात्र बर्कनें केलें आहे; परंतु त्यांनीं कोणती राज्यपद्धति स्वीकारावयास पाहिजे होती, हें कोठेंहि न सांगितल्यामुळ कदाचित् असा समज होईल कीं तसें करणें बर्कच्या सामर्थ्याच्या बाहेर होतें. खरोखर पहातां दुसऱ्या अनुभवशून्य उतावीळ लोकांनीं फ्रेंच लोकांना स्वमनःकल्पित राज्यव्यवस्था सुचविली असती. पण बर्कनें तत्संबंधीं एक अक्षरहि काढलें नाहीं. आणि ह्यांतच त्याचा खरा शहाणपणा दिसून येतो. वर सांगितलेल्या पत्रांत त्यानें आपल्या मित्राला लिहिलें आहेः—'तुमची राज्यपद्धति कशी असावी ह्यासंबंधीं माझ्या ज्या कांहीं कल्पना आहेत, त्याविषयीं माझी जरी खात्री असली, आणि तुमच्या राजधानीपासून जरी मी फक्त वीस कोसांच्या अंतरावर असलों, तरी तत्संबंधीं मी आपलें मत प्रसिद्ध न करणें बरें. कोणतीहि राज्यपद्धति सुचविण्याचें धारिष्ट करण्याच्या पूर्वीं सर्व गोष्टी समक्ष पाहिल्या पाहिजेत, व बारीकसारीक गोष्टींचीहि इत्थंभूत माहिती पाहिजे. कोणत्या गोष्टी सहायभूत आहेत व कोणत्या प्रतिरोधक आहेत ह्याचा विचार केला पाहिजे; जेथें सुधारणा करावी लागेल तेथें ती करण्याचें साधन पाहिलें पाहिजे; मनुष्यें व व्यवहार सर्व प्रत्यक्ष नजरेखालून गेलीं पाहिजेत; ह्या सर्व गोष्टींचा विचार करून त्यांच्या धोरणानें जर राज्यव्यवस्था केली नाहीं, तर ती उत्कृष्ट असूनहि निरुपयोगी होईल, एवढेंच नव्हे, तर घातक होईल. मनुष्यांना हितावह होईल अशीच राज्यपद्धति योजिली पाहिजे. मनुष्यांची परीक्षा दुरून नीट करतां येत नाहीं. जवळ गेल्यावर बहुधा बाह्य लौकिकाला ते उतरत नाहींत असें आढळतें. केव्हां केव्हां तर उलट प्रकार होतो. ते आपल्या अजमासाच्या अगदीं विरुद्ध निघतात. मनुष्यांविषयीं जर दुरून आपल्याला निश्चितपणें कांहीं अनुमान करतां येत नाहीं, तर इतर गोष्टींसंबंधीं आपला अभिप्राय फारच चुकला पाहिजे. कारण त्या मेघसमुदायांप्रमाणें अनिश्चित व चंचल असतात.'

फ्रेंच लोकांविषयीं जशीजशी बर्कला जास्त माहिती मिळत गेली, तसेंतसें त्याचें मन त्या लोकांविषयीं संतापयुक्त विकारांनीं कलुषित होत चाललें. फ्रेंच

विचारपद्धतीचा जय झाल्यास सर्व मानवजातीस कठीण जाईल असें त्याच्या मनानें पक्कें घेतलें होतें. ह्यामुळें अर्थातच ह्या समाजविघातक लोकांची बाजू कोणी घेतली, तरी त्यास अगदीं खपत नसे. फॉक्सआदि निकट स्नेह्यांचाहि संबंध त्यास तोडावा लागला हें मागें सांगितलेंच आहे. एकदां असें झालें कीं, पार्लमेंटमधून रात्रीं घरीं परत जात असतां बाहेर पाऊस पडत असल्यामुळें आपल्या एका मित्राच्या गाडींत त्यास बसावें लागलें. आपला स्नेही आपल्याच मताचा असेल असा त्याचा अजमास होता. म्हणून तो त्या विषयासंबंधीं त्याच्याजवळ मोठ्या आवेशानें बोलूं लागला. दुर्दैवानें आपला समज चुकीचा आहे असें त्यास लवकरच समजलें. त्याच्या मित्रानें त्याच्या मतांबद्दल आपली असंमति दर्शित करतांच त्यास इतका त्वेष आला कीं, तो एकदम गाडींतून खालीं उडी मारूं लागला. शेवटीं मोठ्या मिनतवारीनें त्याच्या मित्रानें त्यास बसवून घेतलें. पुढें दोघांनीं एक शब्दहि उच्चारला नाहीं. घराजवळ गाडी येतांच बर्क खालीं उतरला आणि सांप्रदायिक नमस्कारसुद्धां न करतां तसाच चालता झाला. ही गोष्ट फार क्षुल्लक आहे. तथापि तिच्यापासून शिकण्यासारखें फार आहे. इंग्लिश लोकांना आपल्या देशाविषयीं, मताविषयीं किती आस्था व अभिमान असतो, हें ह्यावरून चांगलें व्यक्त होतें. फ्रान्समध्यें चाललेल्या घडामोडींचा परिणाम इंग्लंडमध्यें होऊन, एकनिष्ठ स्नेहांत अंतर पडावें, आपआपसांत कलह माजावेत, व पार्लमेंटसभेंत हृदयद्रावक वाग्युद्धें चालावीं हा सर्व प्रकार राजकीय कारभारांतून हद्दपार केलेल्यांस फारच विलक्षण वाटेल!

इ० स० १७९२ त पार्लमेंटमध्यें फॉक्सनें युनिटेरियन धर्मपंथानुयायांसंबंधीं कांहीं जुलमी कायदे रद्द करण्याविषयीं व दुसऱ्यांत फेरबदल करण्याविषयीं सूचना आणिली. मागील धोरणावरून बर्कनें ह्या सूचनेस अनुमोदन द्यावयास पाहिजे होतें. परंतु फ्रेंच राज्यक्रांतीपासून त्याचे विचार कांहींसे एकदेशीय झाल्यासारखे दिसत होते. फ्रेंच लेखकांच्या नास्तिक मतांचा फैलाव जगभर होतो कीं काय अशी त्यास भीति पडली. नास्तिक मतांचा दृढ प्रसार होणें शक्य नाहीं हें बर्कसारख्या दूरदर्शी तत्ववेत्त्याच्या लक्ष्यांत यावयास पाहिजे होतें. धर्मस्वातंत्र्याच्या नांवानें नास्तिक मतांचें पुष्टीकरण होत आहे असें त्यास

वाटलें. त्यामुळें ह्या भीतीनें ह्या वेळीं त्याचें भाषण फॉक्सच्या सूचनेविरुद्ध झालें; तथापि त्यांतले सामान्य सिद्धांत व विचारपद्धति इतर भाषणांप्रमाणेंच बोधपर असल्यामुळें त्याचा सारांश खालीं दिला आहे.

"मुख्य तत्वांचा विचार करावा हें खरें आहे; पण कोणत्याहि गोष्टींत सामान्य सिद्धांताच्या बाहेर रतिभर सुद्धां न चालणें मूर्खपणाचें होय. विश्वविद्यालयांतील अध्यापकांत व राज्यकारस्थानी मुत्सद्यांत भेद आहे तो हा कीं, पहिल्यास समाजाच्या सामान्य स्थितीचा विचार करून पुरें होतें, पण मुत्सद्यास बारीकसारीक गोष्टींचासुद्धां विचार करावा लागतो. ह्या गोष्टी असंख्य असून अनिश्चित असतात व त्यांच्या संमेलनानें दुसऱ्या नानाविध संमिश्र गोष्टी उद्भवतात. मुख्य तत्वांच्या अनुरोधानें ह्या सर्व गोष्टींचा विचार न केल्यास देशाचें नुकसान होईल. समाजाचें प्रतिनिधि ह्या नात्यानें जगजाहीर प्रतिपादन होत असलेल्या मतांवर नजर ठेवण्याचा सरकारास अधिकार आहे. परंतु ह्या अधिकाराचा उपयोग सारासार विचार करून केला पाहिजे. कारण बेकायदेशीर अधिकार पटकावून अन्याय करण्यापेक्षां कायदेशीर अधिकाराचा दुरुपयोग करूनच सरकार अनेक वेळां आपल्या खऱ्या हेतूच्या आड येतें. आपल्या समजाप्रमाणें जो धर्म सत्याला अनुसरून असेल, व ज्यामुळें मनुष्यजातीचें शाश्वत कल्याण होईल असें वाटेल तो धर्म प्रत्येक देशांत स्थापण्याचा यत्न करणें आपलें कर्तव्य आहे हें म्हणणें जसें नीतिदृष्टया खरें नाहीं, तसें आपण आपल्या दृढ समजाच्या विरुद्ध मतांचा फैलाव होऊं द्यावा हेंहि खरें नाहीं. कोणताहि सदसद्विचारशील मनुष्य धार्मिक किंवा इतर बाबतींत जें असत्य व अनिष्ट असेल त्याच्या प्रसाराकडे जाणून बुजून डोळेझांक करणार नाहीं. त्याचप्रमाणें कोणताहि शहाणा मनुष्य बहुजनसमूहाच्या कल्पना व समजुती यांची परवा न करतां आपल्या आवडत्या समजुतींचा त्यास जुलमानें अंगीकार करण्यास लावणार नाहीं. कोठें कशा रीतीनें वागावयाचें हें मनुष्याच्या विशिष्ट स्थितीवर अवलंबून आहे. ख्रिस्ती राष्ट्रांत धर्म आणि राज्यव्यवस्था ही एकमेकांपासून स्वतंत्र नाहींत. ते एकाचेच पण दोन निरनिराळे भाग आहेत. धर्मामुळें समाजाचें पोषण होत असल्याकारणानें, ज्या धर्ममतांनीं समाजाची शांतता,

व्यवस्था आणि स्वतंत्रता हीं नष्ट होतील त्या मतांची प्रांतिक अधिकाऱ्यानें उपेक्षा करतां कामा नये. देशाला परिणामीं अहितावह होणाऱ्या संस्थांचा उगम लोकमतापासून असल्यामुळें, तिकडे लक्ष देणें हें सरकारचें कर्तव्य आहे. राष्ट्र सुरक्षित राखण्याकरितां सरकारास कोणते हक्क आहेत व कोणते नाहींत हें निश्चयपूर्वक कधींहि सांगतां येणार नाहीं. काल्पनिक भतीवर उभारलेल्या गोष्टी अचिरकालच टिकल्या पाहिजेत. सर्व चांगलें करण्याच्या काल्पनिक समजुतीनें अंगभूत भागाचा समूळ नाश करणें हें शहाणपणाचें कारस्थान नाहीं. करतां येईल तितकें सर्वांचें कल्याण करणें हा सरकारचा मूळ हेतु असला पाहिजे. ज्यायोगानें लोकसमुदाय पराकाष्ठेच्या शोचनीय स्थितीस पोंचेल, त्यायोगानें तो हेतु सिद्धीस जाणार नाहीं. लोकांना प्रत्यक्ष भासणाऱ्या सुख-दुःखाच्या धोरणानें मुत्सद्यानें कायदे केले पाहिजेत. त्यांच्या हक्कांविषयींच्या आपल्या आवडत्या कल्पना प्रमाणभूत समजतां कामा नये. ह्यासाठीं अर्थातच लोकांच्या समजुती, आचारविचार, विशिष्ट परिस्थिति आणि दुसऱ्या नानाविध गोष्टी मुत्सद्यांस माहित असल्या पाहिजेत.

युनिटेरियन मंडळीच्या अर्जावरून व इतर पुराव्यावरून असें दिसतें कीं, ती निव्वळ धार्मिक नसून राजकीय खटपट करणारी मंडळी आहे. उपलब्ध स्वातंत्र्य स्वस्थपणें भोगण्याचा तिचा उद्देश नसून, दुसऱ्यास आपल्या गोटांत ओढण्याचा व दांडगाईनें राष्ट्रीय धर्माचा उच्छेद करण्याचा तिचा संकल्प झालेला दिसतो. व्यक्तिमात्राशींच जर धर्माचा संबंध असता, अगर ईश्वर आणि सदसद्विवेकबुद्धि ह्यांमधलाच तो प्रश्न असता तर मानवी सत्तेला मध्यें हात घालण्याचें कारण नसतें. आपल्याला अनुचित वाटेल तें करण्यापासून जर विशिष्ट धर्मपंथाचे अनुयायी अलिप्त राहतील तर त्यांस दुखविणें गैर होईल. परंतु प्रस्तुत प्रकरणीं आपणांस ठाऊक आहे कीं, हे लोक हातीं सत्ता आल्या-वर प्रचलित धर्मानुयायांचा छल करण्यास प्रवृत्त होतील. ही नुसती काल्पनिक भीति नाहीं, तर त्यांच्याच पुढाऱ्यांचें तसें म्हणणें आहे. आज्ञाधारकत्वाच्या नियमांचा क्षणोक्षणीं वादविवाद करावयाचा नसतो. नाहीं तर खुनी, दरोडे-खोर, जारकर्मी ह्यांना शिक्षा देण्यापूर्वीं सर्व नीतिविषयक मुद्यांचा आरंभापासून

विचार करावा लागेल. दुर्लक्ष केल्यानें, तसेंच विपरीत योजना केल्यानें संकटें जास्त दुणावतात. आपल्यावर संकट येऊन ठेपलें नाहीं हें खरें पण त्याचा अंकुर उद्भवला आहे हें मी पहात आहें. वेळींच योग्य भय बाळगिल्यानें अखेर निर्धास्त राहतां येतें. कारण त्यामुळें मन स्थिर राहून, विवेकशक्ति कायम टिकते. ह्या मंडळीची कृति हल्लीं जरी विशेष भीति बाळगण्यासारखी नसली तरी आपल्याला प्रिय असलेल्या राज्यव्यवस्थेवर त्यांचा कटाक्ष असल्यामुळें, त्यांविषयीं खबरदारी घेणें फार अगत्याचें आहे. ”

इंग्लंडच्या राज्यकारभारांत प्रजाजनांचा जरी पुष्कळ हात शिरला आहे, अवश्य असणारे सर्व हक्क राजाकडून संपादन करून ते निरंतर राहतील अशी जरी त्यांनीं व्यवस्था करून ठेविली आहे, जरी एका राजाला त्यांनीं धारातीर्थींहि पाठविला व दुसऱ्यास पदच्युत केलें, तरी एकंदरींत राजपक्षाकडे त्यांच्या मानसिक प्रवृत्ति बऱ्याच प्रबल असतात असें खालीं दिलेल्या हकीकतीवरून दिसून येईल. इ. स. १७९३ च्या जानेवारी महिन्यांत फ्रेंच लोकांनीं आपल्या राजाची मोठ्या थाटानें व विधिपूर्वक हत्या केल्याची बातमी लंडन येथें संध्याकाळीं आली. ती ऐकतांच लोकांची जी स्थिति झाली ती ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. नाटकगृहें एकदम बंद झालीं; प्रेक्षकसमूहानें अर्धवट खेळावरच राजी होऊन घाईघाईनें घरची वाट सुधारली. लहानापासून तों थोरापर्यंत सर्वांनीं दुःखव्यंजक वस्त्रचिन्हें धारण केलीं; फ्रेंच लोक म्हणजे राक्षस आहेत असे सर्वांच्या मुखांतून उद्गार निघूं लागले; कोणत्याहि फ्रेंच मनुष्याला रस्त्यांतून जावयाची सोय नव्हती. प्रत्येक भिंतीवर फ्रान्सबरोबर युद्ध करण्याविषयींचे जाहिरनामे चिकटलेले दृष्टीस पडले, व त्याभोंवतीं लोकांचे थवेच्या थवे जमून मोठ्या आनंदानें ते वाचूं लागले. फ्रान्सबरोबर इंग्लंडनें लढाई करावी असा प्रथमपासूनच बर्कचा आग्रह होता; आतां त्याला आयतेंच लोकमत अनुकूल झालें. त्याच्याकडे सर्व लोक पाहूं लागले. सर्व राष्ट्राला त्याचें सामर्थ्य विशेष भासूं लागलें व तो प्रधानमंडळांत नसतांहि त्याच्या सल्ल्याशिवाय राज्यकारभारांत एक पानहि हालत नाहींसें झालें.

आयुष्याचा उत्तरार्ध आनंदांत व सुखांत जाणें हें फारच थोडक्यांच्या नशीबीं असतें. आमरणांत संसारकीटक बनून राहणाऱ्या भाग्यहीन मनुष्यानें तर ह्या सुखाची अपेक्षाहि करूं नये. तरुणपणीं ह्या संसारतरूला नूतन सुखपल्लव फुटत असल्यामुळें, गळून पडलेल्या दुःखपर्णांची विशेष आठवण होत नाहीं; परंतु तसा प्रकार वृद्धपणीं नसतो. नवीन सुखाची भर न पडतां, दुःख मात्र दुणावत असतें. आयुष्यमर्यादा नियमित असल्यामुळें पूर्व वयांतील आप्त व स्नेही, ज्यांच्याबरोबर आपण आपलें बहुतेक आयुष्य घालविलें, ज्यांचें प्रेम आपल्यावर होतें, जे आपल्या सुखदुःखाचे वांटेकरी होते, आपल्या गुणांचा ज्यांना अभिमान व कौतुक वाटे, आणि जे दोष सौम्य मापानें मोजीत, अशांचा एकामागून एक वियोग झाल्यावर आपण ह्या जगांत एकटेच उरलों आहों, असा भास होतो. बर्कचे शेवटचे दिवस अशाच प्रकारच्या शोचनीय स्थितींत गेले. जॉन्सन आणि गोल्डस्मिथ ह्यांच्या मृत्यूबद्दल मागेंच उल्लेख केला आहे. त्यांच्यामागून ज्याच्याशीं बर्कचा पसतीस वर्षे ऋणानुबंध जडला होता, व ज्याचा सल्ला खासगी किंवा सार्वजनिक कामांत बर्क क्षणोक्षणीं घेत असे तो जोशुआ रेनॉल्ड्स मरण पावला ! रेनॉल्ड्स चित्रकलेंत फार निष्णात होता. बर्कनें बॅरीला पाठविलेल्या पत्रावरून त्यास त्या विद्येची अभिरुचि व ज्ञान चांगलें होतें असें दिसतें. रेनॉल्ड्सारखे सुशील व सौजन्यवान लोक फार थोडे असतात. तेव्हां दोघांचा स्नेह अव्याहत राहिला ह्यांत आश्चर्य नाहीं. मरणसमयीं बर्कला त्यानें वीस हजार रुपये रोख दिले, व तितक्याच रुपयांचा कर्जरोखा फाडून टाकला. बर्कचें कुटुंब विस्तृत नव्हतें हें आरंभीं दिलेल्या हकीकतीवरून वाचकांस समजलेंच असेल. त्याची एक बहीण होती, ती मरण पावली व तिच्या मागून त्याच्या भावाचीहि तीच स्थिति झाली. संकटें येऊं लागलीं म्हणजे चोहोंकडून एकदम येतात, ह्या म्हणण्याचा अनुभव बर्कवर आलेल्या प्रसंगावरून चांगला येतो. बहिणीच्या व भावाच्या मरणानें झालेल्या दुःखाचा कडेलोट एकुलत्या एक पुत्राच्या अकालिक मृत्यूनें झाला. बर्कला एकच मुलगा झाला होता; त्यावर त्या ममताळू पित्याचें विलक्षण प्रेम होतें. आपल्या पश्चात् आपल्या मुलानें राजकीय कामांत पडावें अशी त्याची फार इच्छा होती, व ती बहुतेक सफल झाल्या-

सारखी झाली. वॉरन हेस्टिंग्जची चौकशी संपल्यावर जवळजवळ तीन तपें निरपेक्ष-बुद्धीनें उत्कृष्टपणें बजावलेलें स्वयंगृहीत राज्यकार्य सोडण्याचा त्याचा निश्चय झाला होता. त्याप्रमाणें इ. स. १७९४ त ज्या माल्टन प्रांताच्या तर्फे तो पार्लमेंटमध्यें बसत असे, त्याच प्रांताच्या तर्फे रिचर्ड बर्कची निवड झाली. पित्यानें आपला मुलगा पार्लमेंटचा सभासद झालेला पाहिला. राज्यकारभारासारखें जोखमीचें काम करण्यास लागणारे अवश्य गुण त्याच्यांत आहेत, अशाविषयीं त्या प्रेमळ पित्याची पक्की खात्री होती. रोमन कॅथॉलिक पंथाच्या लोकांना कांहीं सवलती देण्याविषयीं आयर्लंडच्या पार्लमेंटमध्यें बिल आलें होतें त्यावेळेस त्या लोकांना मदत करण्याकरितां म्हणून बर्कनें रिचर्डला पत्र देऊन पाठविलें होतें. ह्या प्रसंगीं व इतर ठिकाणीं त्यानें जी कामागिरी बजाविली, त्यावरून त्याच्या कर्तृत्वाविषयीं बर्कनें केलेलें अनुमान अगदींच निर्मूल होतें असें म्हणवत नाहीं.

अलौकिक बुद्धिमान पित्याचा पुत्र होणें एका अर्थी अनिष्ट आहे. कारण पित्याशीं पुत्राची तुलना करून त्या कसास तो उतरला नाहीं म्हणजे त्याच्या यथार्थ गुणांचा अपकर्ष करण्याची लोकांची स्वाभाविक प्रवृत्ति होते. असाच प्रकार रिचर्ड बर्कविषयीं लिहितांना कित्येक इंग्रजी चरित्रकारांनीं केला आहे. प्रेमातिशयानें अंध होऊन वास्तविक गुणांचा अयथार्थ गौरव करण्याइतका मूर्ख मनुष्य बर्क नव्हता. नौका प्रवासोचित आहे असा भरंवसा असल्यावांचून आयुष्याच्या अत्यंत दुस्तीर्य मार्गांत आक्रमण करण्यास त्यानें त्यास लावलें नसतें. कांहींहि असो, वार्धक्यांत असह्य होणारें दुःख त्याच्यावर ओढवावयाचें होतें. रिचर्ड बर्कच्या शरीरावर क्षयरोगाचीं पूर्वचिन्हें दिसूं लागलीं. बर्कचें कोमल अंतःकरण सर्वांस माहित होतें. त्यामुळें त्याच्या स्नेह्यांनीं व वैद्यांनीं बर्कला रोगाचें स्वरूप बिलकूल समजूं दिलें नाहीं. परंतु ही गोष्ट किती दिवस गुप्त ठेवतां येणार? रोग बळावत चालला, तेव्हां मरणाच्यापूर्वीं सुमारें एक आठवडा त्यास त्या भयंकर व्याधीविषयीं सांगावें लागलें. एकुलता एक मुलगा तो आपल्या वृद्धावस्थेंत आणि त्याच्या भर तारुण्यांत मृत्युमुखीं पडणार असें समजल्यावर कोणता पिता शोकाकुल होणार नाहीं? असें सांगतात कीं, हें हृदयविदारक

वर्तमान समजल्यापासून कित्येक दिवसपर्यंत निद्रा नाहीं, अन्न नाहीं, अशी त्याची स्थिति होती. व त्याच्या अत्यंत हृदयद्रावक शोकोद्गारांनीं जवळ बसलेल्या मंडळींचींसुद्धां अंन्तःकरणें विव्हल होत. अखेरीस इ० स० १७९४ च्या आगष्ट महिन्याच्या दुसऱ्या तारखेस रिचर्ड बर्कचा अंत झाला! मरतेसमयीं त्याचें वय अवघें छत्तीस वर्षांचें होतें. ह्याचा परिणाम बर्कच्या अवशिष्ट आयुष्यावर फारच भयप्रद झाला. त्याची ज्ञानशक्ति अबाधित राहिली होती, परंतु त्याचा चेहरा शुष्क दिसूं लागला व छाती पोकळ पडली, सर्व शरीर निस्तेज दिसूं लागलें, व तो फार दिवस जगणार नाहीं अशी त्याच्या मित्रांना धास्ती वाटूं लागली. बर्कचे खालील उद्गार त्याच्या दुःखाचे व्यंजक होत. " माझ्यावरून प्रचंड वादळ गेलें असून त्यामुळें अस्ताव्यस्त पडलेल्या एका जुनाट ओकवृक्षाप्रमाणें माझी स्थिति झाली आहे. समूल नाश झाल्यामुळें जमीनदोस्त होऊन मी पडलों आहे. माझ्यासंबंधीं निसर्गविपर्यास झाला आहे. माझ्या पश्चात् जे राहिले पाहिजेत ते माझ्यापूर्वींच गेले. संततीप्रमाणें असलेले मला पूर्वजांप्रमाणें झाले आहेत. " हरदासाचें मूल रडूं लागलें तरी सुरावर रडतें म्हणून म्हणतात ही निःसंशय अतिशयोक्ति खरी. पण तत्ववेत्त्याचें रडणें तात्विक असतें याचा वरील उद्गारांवरून प्रत्यक्ष अनुभव आपल्याला मिळत आहे. इ. स. १७९४ च्या जून महिन्याच्या विसाव्या तारखेस पिटनें वॉरनहेस्टिंग्जच्या चौकशीचें काम ज्यांच्यावर सोंपविलें होतें, त्यांचे आभार मानण्याची सूचना पार्लमेंटमध्यें आणली. तोच बर्कचा पार्लमेंटमधला शेवटला दिवस होय. त्या दिवसाचें त्या सभेंतलें त्याचें भाषण अखेरचें होय. यानंतर वक्ता ह्या नात्यानें बर्कचे विचार पुढें आले नाहींत. परंतु देशहिताच्याकामीं त्याची लेखणी मात्र शेवटपर्यंत शिणली नाहीं.

ह्यावेळीं, बर्कनें केलेली अप्रतिम देशसेवा मनांत आणून त्यास 'लॉर्ड बीकन्सफील्ड' ही पदवी देऊन लॉर्ड करण्याचें घाटत होतें. परंतु रिचर्डच्या मरणानें हा बेत जागच्याजागींच विरघळला. तथापि राजानें मोठ्या उदारबुद्धीनें त्यास सालीना सदतीस हजार रुपये पेनशन देवविलें. ज्यानें निरपेक्ष बुद्धीनें स्वतःच्या पदरास खार लावून देशहितार्थ आपलें शरीर झिजविलें, त्याला वृद्ध-

पणीं कृतज्ञताबुद्धिपुरःसर दिलेल्या अल्प मोबदल्याबद्दल कोणासहि कुरकुर करतां येणार नाहीं असें प्रथमदर्शनीं वाटतें. परंतु हा समज चुकीचा आहे. इंग्लंड-मध्यें राज्यकारभारांत दोन पक्ष असल्यामुळें एका पक्षांतील लोक दुसऱ्या पक्षांतलि लोकांविरुद्ध निरर्गल प्रलाप करीत असतात. बर्कला पेनशन मिळाल्याचें ऐकतांच विरुद्ध पक्षाच्या लोकांनीं ओरड सुरू केली. वास्तविक पाहतां बर्कचा हक्क ह्या पेनशनवर बराच पोंहचत होता. मागें सांगितलेंच आहे कीं, बर्कच्या उद्योगानें व विशेषतः निरिच्छतेनें लष्करी खात्यांत सुधारणा होऊन राष्ट्राचे सालीना आठ लक्ष रुपये वाचूं लागले. त्याचप्रमाणें इतर राष्ट्रांत इंग्लिश राष्ट्राची इभ्रत वाढण्यासहि बर्क अंशतः कारणीभूत झाला; व शेवटीं हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, जें पेनशन त्यास देऊं केलें व जें त्यानें स्वीकारलें तें पार्लमेंटमधून त्यानें आपलें अंग काढून घेतल्यावर होय. तें देण्यांत किंवा स्वीकारण्यांत कोणताहि दुष्ट व लांछनास्पद हेतूंचा संशय घेण्यास जागा नव्हती. तरी देखील हा अपात्रीं अनुग्रह केला म्हणून दोन्ही सभांत पिटवर कित्येक कुत्सित लोकांनीं हल्ले केले. ह्या द्वेषबुद्धि-प्रेरित लोकांपैकीं एकाला बर्कनें स्वसंरक्षणार्थ जें उत्तर दिलें आहे तें इतकें उत्कृष्ट वटलें आहे कीं, तेवढ्याच पत्रावरून बर्कची नामांकित लेखकांत गणना होण्या-सारखी आहे. ड्यूक ऑफ बेडफर्ड नांवाच्या एका उमरावानें हाउस ऑफ लॉर्डस-मध्यें बर्कच्या पेनशनविरुद्ध कोल्हेकुई केली. हे गृहस्थ स्वतः सरकारच्या मेहेर नजरेवर यथेच्छ चैन मारीत होते. बर्कसारख्या मनुष्याच्या लक्षांत ही गोष्ट तेव्हांच येऊन चुकली. मग अशा ह्या भाषाकोविदाच्या हातांत ड्यूक साहेब सांपडल्यावर अक्षत निसटून कसे जाणार? इंग्रजी भाषेंत असें समर्पक व जशास तसें उत्तर दुसरें वाचावयास मिळणार नाहीं.

पुत्रवियोगजन्य शोकानें बर्कच्या अंगचा नैसर्गिक उत्साह व आनंद अगदीं भग्न झाला होता. आपल्या मित्रांस भेटण्याचें अगर मंडळींत जाण्याचें त्यानें बहुतेक वर्ज्य केलें होतें. रिचर्डची मूर्ति त्याच्या डोळ्यासमोरून कधींहि जात नसे. ह्या नंतरच्या प्रत्येक लेखांत त्याच्या ह्या मानसिक व्यथेची छाया दिसून येते. पार्लमेंट सोडल्यानंतर त्यानें जे लेख लिहिले त्यांत व पूर्वीच्यांत एक मोठा फरक आहे. ज्या पक्षांत त्यानें आपणांस गोंवून घेतलें होतें, त्या पक्षाचें

गौरव व समर्थन करण्याच्या हेतूनें पूर्वीचे लेख लिहिलेले होते. परंतु आतां तो कोणत्याहि विवक्षित पक्षाचा नसून सर्व राष्ट्राचा होता. इतःपर आपल्या अंगीकृत पक्षाचेंच केवळ समर्थन करण्याकडे त्यानें लेखणीचा उपयोग केला नाहीं, तर सर्व राष्ट्रावर अनिष्ट गुजणार आहे अशी त्याच्या एकांतांतहि वार्ता लागल्यास, आपलें दुःख क्षणभर एकीकडे सारून तन्निवारणार्थ प्रयत्न करण्यास तो सदा तत्पर असे. उतार वयांत सर्व जीव कीं प्राण असा एकुलता एक मुलगा गेल्यावर सुद्धां देशस्थितीविषयीं आस्था बाळगणारे लोक फारच विरळा. ज्याप्रमाणें स्वहितापेक्षां देशहिताची फार किंमत आहे, त्याप्रमाणें आत्महानीहून देशहानि विशेष भयंकर होय. जेव्हां येथून तेथून सर्व लोकांच्या हाडीं असल्या उदात्त कल्पना खिळतात तेव्हां देशाची राजकीय उन्नति होण्यास विलंब लागत नाहीं. इंग्लंडचा उत्कर्ष होण्यास हीच गोष्ट विशेषेंकरून कारणीभूत झालेली आहे.

फ्रेंच लोकांनीं आपल्या राजाराणीस धारातीर्थी पोचविल्यापासून इंग्लिश लोकांचीं मनें क्षुब्ध झालीं व राजरक्तानें न्हालेल्या लोकांविषयीं त्यांचा अभिमान जाऊन त्याच्या जागीं तिरस्कार उत्पन्न झाला. बर्कच्या भाकिताप्रमाणें युरोपिअन राष्ट्रांना फ्रान्सवर स्वारी करावी लागली. युरोपिअन सेनेनें फ्रेंच सेनेला मागें हटवून प्रथम यश संपादिलें, परंतु पुढें त्यांची सरशी होईना. सुप्रसिद्ध फ्रेंच मुत्सद्दी कार्नो ह्याच्या अप्रतिम दक्षतेमुळें अशिक्षित लुटारू लोकांच्या ऐवजीं सुव्यवस्थित व सुधारलेली फ्रेंच सेना तयार झाली व कांहीं वेळ तिनें आपल्या शत्रूची तारंबळ उडविली. त्याबरोबर इंग्लिश लोक लढाई तहकूब ठेवून फ्रेंच लोकांबरोबर तह करण्याविषयीं प्रधानमंडळाला आग्रह करूं लागले. ही बातमी बर्कच्या कानावर गेली. इंग्लिश राष्ट्रास 'ची' म्हणण्याचा प्रसंग आला; व आपण होऊन आपली अप्रतिष्ठा ते करून घेत आहेत हें त्यास सहन होईना. तेव्हां म्हणजे इ० स० १७९६ त त्यानें ह्या विषयावर दोन पत्रें लिहिलीं. भाषासौंदर्य, अलंकार, आवेश ह्यांमध्यें ह्या लेखांची तुलना "विचार" खेरीज करून कोणत्याहि पूर्व लेखांशीं करतां येणार नाहीं. शोकानें विव्हल व उदासीन असें मन असतां, अशा प्रकारचे सुंदर लेख लिहितां येण्यास भाषाज्ञान किती विलक्षण व स्वाभाविक असलें पाहिजे ! ह्या लेखांच्या

कडक भाषेबद्दल बर्कला पुष्कळांनीं दोष लावला आहे. पण हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, कमी पक्षांतील लोकांस आपलें म्हणणें सर्वांच्या कानीं घालण्यास अशीच भाषा वापरावी लागते. वर सांगितलेल्या पत्रांपैकीं एकांत तहाचा विचार करून, दुसऱ्यांत फ्रेंच लोकांच्या स्वभावाचें व उद्देशाचें निरूपण केलें आहे. फ्रेंच लोकांबरोबर तह करणें म्हणजे खुनी, लुटारू लोकांबरोबर तह करण्यासारखें अशाश्वत आणि परिणामीं घातक आहे असें त्याचें म्हणणें होतें. विरुद्ध पक्षाला फ्रेंच लोकांचें हें वर्णन अर्थात्च कबूल नव्हतें. निरपेक्ष बुद्धीनें देशकल्याणासाठीं ते झटत आहेत असा त्यांचा ग्रह झालेला असल्यामुळें बर्कचीं अनुमानें त्यांस संमत नव्हतीं. पण परिणामावरून पाहतां बर्क अगदींच चुकला होता असें म्हणवत नाहीं. इंग्लंडला फ्रान्सशीं तह करून चालण्यासारखें नव्हतें. कारण बलाढ्य राष्ट्राशीं वेळींच सलोखा करून राहणें हें छोटेखानी राष्ट्रांना आपलें क्षुद्र अस्तित्व कसें तरी कायम ठेवण्याचें एकच साधन आहे, हें खरें; परंतु मोठ्या राष्ट्रांचें तसें नसतें. इतर राष्ट्रें त्यांचा हेवा करीत असतात, व त्यांस त्यांचें फार भय वाटत असतें. त्यामुळें लीनता पतकरून इंग्लंडासारखीं मोठीं राष्ट्रें सुरक्षित रहात नाहींत. इतर राष्ट्रांवर वचक असेल तरच त्यांपासून त्यांस उपद्रव होणार नाहीं. सत्ता, वर्चस्व, आणि मान हीं भिक्षा मागून कधींहि प्राप्त होत नाहींत, तर तीं प्राप्त करून घेण्यास अंगांत स्वाभाविक पाणीच असावें लागतें. तसेंच "स्वतःच्या कर्तृत्वाविषयीं मानहानिकारक गैरविश्वास ठेवल्यानें, व शत्रूचा बेसुमार गौरव केल्यानें, शत्रूची इच्छा शिरसावंद्य करावी लागणार हें उघड आहे." कधीं कधीं नामांकित मुत्सद्दी कसे चकतात हें बर्कच्या खालील टीकेवरून ध्यानांत येईल. 'संपत्ति ही जर सद्गुणांची व राष्ट्रीय इभ्रतीची आज्ञाधारक व कष्टाळू दासी असेल, तरच तिचा योग्य उपयोग झाला म्हणावयाचें. पण जेव्हां हा क्रम बदलतो आणि संपत्ति राखण्याकरितां देशाचें नांव घालविण्यांत येतें, तेव्हां ती संपत्ति निःसत्व होऊन लवकरच लुप्त होते. आपल्या इच्छेप्रमाणें जर आपण संपत्तीचा उपभोग करूं, तर आपण खरे श्रीमंत व स्वतंत्र म्हणावयाचें. पण संपत्तीच्या अधीन राहिल्यास आपण खरोखर दरिद्रीच राहणार. बचाव करण्यांत आहे

नाहीं तें घालविण्यास तयार नसल्यामुळें, पुष्कळदा मनुष्यानें आपलें सर्वस्व गमाविलें आहे. दरोडेखोर लोकांसमोर संपत्तीचें प्रदर्शन केल्यानें त्यांचा साहसी अथवा लुटारू स्वभाव कमी होणार नाहीं. असल्या प्रदर्शनानें शत्रू दिपून जाईल व सवलतीनें तह करील असें इंग्लिश लोकांना समजविण्यांत येत आहे. पण ही चुकी आहे. आपली संपत्ति पाहून त्यांचा दम न खचतां उलट पुष्कळ लूट मारावयास सांपडेल ह्या लालुचीनें त्यांस चेव येईल. पण आपण श्रीमंत असलों वा दरिद्री असलों तरी हा सृष्टिनियम आहे कीं, दोन राष्ट्रांचें एकंदर अवसान सारखें असलें तर आपला हेतु सिद्धीस नेण्याकरितां प्रसंगीं सर्वस्व गमावण्याचा निर्धार करणाऱ्या राष्ट्राचें वर्चस्व, नियमित मर्यादेंत प्रतीकार करून अखेर शरण जाण्याचा निश्चय करणाऱ्या राष्ट्रावर असलेंच पाहिजे."

इंग्लंडांत बर्कच्या वेळेस लोकमत प्रबल होत चाललें होतें. लढाई सुरू ठेवणें, अथवा बंद पाडणें ही गोष्ट राजाच्या किंवा पार्लमेंटच्या जरी हातांतली होती, तरी लोकमताचा त्यांवर जबरदस्त दाब असल्यामुळें वाटेल तें करण्यास प्रायः लोकच समर्थ असत. सुधारलेल्या राष्ट्रांत लोकमताला धुडकावून लावणें शक्य नाहीं. म्हणून तो म्हणतोः—"लोकांच्या इच्छेविरुद्ध फार दिवस लढाई चालविणें शक्य नाहीं. विशेषतः ही लढाई लोकांच्या उत्साहावांचून चालवितां येणार नाहीं. नुसती मान्यता पुरी नाहीं, हुरूपच पाहिजे. अशा कामीं व अशा प्रसंगीं सार्वत्रिक उत्साह असणें संभवनीय नाहीं. व त्याची अपेक्षाहि करण्याची गरज नाहीं. बहुजनसमूह अनुकूल असला म्हणजे पुरे." फ्रेंच लोकांबरोबर तह न करण्याचें एक कारण बर्कनें असें दर्शविलें आहे कीं, त्यांच्या रीतिभाति व आचार त्यांनीं आपण होऊन नीतिभ्रष्ट केले होते. अशा नीतिच्युत लोकांबरोबर तह करणें, आणि तो मोडला जाणार नाहीं अशी आशा करणें, हें असमंजसपणाचें आहे. उपजत अशा मनोवृत्ती सुधारून त्या नीतिमर्यादेत आणण्याचा व नैसर्गिक प्रेमवृक्षांवर सद्गुणांचें कलम बांधण्याचा [illegible] यांचा उद्योग असतो. परंतु त्या वेळीं फ्रान्समध्यें दुराचारांना सदाचारांचें स्वरूप देण्यांत येत असे. वैवाहिकसंबंध सर्व संबंधांचें [illegible] असल्याकारणानें तो सर्वत्र पूज्य मानला गेला आहे.

आपल्या देशांत हा संबंध कोणत्याहि रीतीनें केव्हांहि मोडतां येत नाहीं. पाश्चात्य राष्ट्रांत तो मोडतो खरा. पण तसें करण्यास विशेष सबल कारणें असावीं लागतात. एकंदरींत अशा व्यवस्थेनें समाजांत शांतता, सुख व स्थैर्य राहून सुधारणा होत असते. परंतु फ्रेंच मुत्सद्यांनीं ह्या अतिश्रेष्ठ संबंधाची योग्यता नेहमींच्या मनुष्यांमध्यें होणाऱ्या व्यावहारिक कराराइतकीच ठरविली त्यामुळें स्त्रीपुरुषांस वाटेल तेव्हां हा संबंध मोडण्याची सवलत मिळाली. अर्थातच जारकर्म व तदुद्भूत संतति यांवर कायद्याचें मंगलकारक आवरण पडलें. ह्याचा परिणाम बर्कनें असा दाखविला आहे कीं, इ० स० १७९३ च्या पहिल्या तीन महिन्यांत एकंदर १७८५ लग्नांपैकीं ५६२त स्त्रीपुरुष आपला प्रथम संबंध तोडून मोकळे झाले! म्हणजे—बर्कच्या हिशेबाप्रमाणें एकट्या पॅरीस शहरांत तीन महिन्यांत जितके घटस्फोट झाले त्याच्या एकपंचमांशसुद्धां लंडन शहरीं शंभर वर्षांत झाले नाहींत. असो. ह्यानंतर बर्कनें इ० स० १७९७ सालीं ह्याच विषयांवर आणखी दोन पत्रें लिहिलीं. तीं त्याच्या पश्चात् प्रसिद्ध झालीं.

बर्कच्या मनोवृत्ती अशा चमत्कारिक असत कीं, एका विषयाचें मनन केल्या-वर लागलेंच पहिल्याहून अगदीं भिन्न विषयाचें तितक्याच सामर्थ्यानें विवेचन करण्यास त्यास कठीण जात नसे. वर निर्दिष्ट केलेलीं पत्रें लिहिण्यास सुरवात करण्याच्यापूर्वीं, त्यानें अनियंत्रित व्यापारावर एक छोटासा पण फारच बार-काईनें विचार करून लिहिलेला चटकदार लेख पुरा केला होता. इ० स० १७९५—९६ सालीं महर्घता फार होऊन इंग्लंडांत गरीब लोकांचे हाल होऊं लागले. त्या वेळेस गरीब लोकांना अल्प दरानें धान्य मिळण्याचे निरनिराळे उपाय सुचविण्यांत आले. त्यांपैकींच कायद्यानें धान्याचे कायमचे दर ठरवून टाकणें, मजूरदारांची मजुरी ठरविणें व सरकारनें शहरांतून धान्याचीं दुकानें उघडून नियमित दरानें धान्य विकणें, हे होते. पण असल्या उपायांनीं गरीब लोकांचे हाल कमी न होतां दुणावण्याचा मात्र संभव आहे, हें दाखविण्याच्या उद्दे-शानें बर्कनें हा लेख लिहिला. तो म्हणतो—"अशा वेळीं (दुष्काळांत) सरकारचें पहिलें कर्तव्य रयतेस पूर्ण माहिती पुरविणें हें होय. लोकांच्या अन्नाची तर-तूद लावण्याचें सरकारच्या शक्तीबाहेर आहे. ह्याच्या उलट जर कारभारी मंड-

ळींला वाटत असेल, तर त्यांचा ह्या डौल व्यर्थ आहे. लोक सरकारला पोसतात, सरकार लोकांना पोशीत नाहीं. सरकार संकट निवारण करूं शकेल पण ह्या किंवा दुसऱ्या कोणत्याहि बाबतींत रयतेचा प्रत्यक्ष फायदा करून देणें सरकारच्यानें होणार नाहीं. सरकारच्याप्रमाणें श्रीमंत लोकांसहि हाच नियम लागूं पडतो. ते गरीब लोकांचे पेनशनर आहेत. ज्यांना चुकीनें गरीब म्हणतात अशा श्रम करणाऱ्या वर्गावर ते सर्वस्वी वंशपरंपरा अवलंबून असतात. श्रम करणारा वर्ग गरीब आहे. ह्याचें कारण तो संख्येनें मोठा आहे. पुष्कळ लोकांत सारखी वांटणी केली तर कोणालाहि पुष्कळ मिळणार नाहीं. परावलंबी श्रीमंत लोकांचा वर्ग इतका लहान आहे कीं, त्यांच्या गर्दना कापून त्यांना वर्षास लागणारें धान्य जर सारखें वाटलें, तर त्यानें गरीब लोकांचा एक रात्रभराहि निर्वाह होणार नाहीं. श्रीमंत लोकांचा खून करणें किंवा त्यांस लुटणें रास्त नाहीं. कारण ते एक प्रकारें श्रम करणाऱ्या वर्गाचे जिम्मेदार आहेत. आणि त्यांचीं भांडारगृहें ह्या लोकांच्या पेढ्याच समजल्या पाहिजेत........ जेथून त्यांस पैसा मिळतो तेथेंच तो बहुतेक परत येतो. गरीब श्रीमंतांचा नाश करण्यास उद्युक्त होतात, तेव्हां धान्य स्वस्त करण्याकरितां गिरण्यास आग लावून धान्य नदींत टाकण्याइतका ते मूर्खपणा करितात." आणखी, "व्यापाऱ्याला आपल्या मालावर लबाडी व जुलूम केल्याशिवाय जितका फायदा मिळणें शक्य असेल, तितका मिळवूं द्यावा. व्यापाऱ्यानें आपला माल विकावयास काढावा किंवा काढूं नये. महर्घतेचा अथवा सुपीकतेचा त्यानें पाहिजे तसा फायदा करून घ्यावा. व्यापाऱ्याला गिऱ्हाइकाच्या ताब्यांत देण्यानें गिऱ्हाइकाचें कल्याण होणार नाहीं." हीं मतें सांप्रत सर्वमान्य नसलीं तरी सर्वगत झालीं आहेत. पण त्यावेळेस अर्थशास्त्राचा प्रसार इंग्लंडमध्यें हल्लींइतका झाला नव्हता. त्यामुळें हे विचार लोकांस नव्यासारखेच होते.

या सुमारास ह्या नामांकित पुरुषाची क्षणिक संसारयात्रा संपण्याची मुदत भरत आली असें दिसूं लागलें. अशक्ततेनें त्याचें शरीर खंगलें होतें. बत्तीस वर्षें पार्लमेंटमध्यें अश्रांत श्रम केल्यानें तो क्षीण झाला होता. पार्लमेंट सोडल्यावर राहिलेले दिवस जर त्यानें एकाग्रतेत घालविले असते तर कदाचित् प्रकृति सुधारली

असतो. परंतु त्याच्या मनोव्यापारांना विश्रांति म्हणून ठाऊकच नव्हती. वर उल्लेख केलेल्या लेखांवरून राजकीय कामाकडे त्याचें अद्यापि किती लक्ष्य असे व त्यांत त्याचा किती वेळ जात असे, ह्याची कल्पना करितां येईल. शिवाय बीकन्स-फील्डच्याजवळ फ्रान्समधून भयानें पळून आलेल्या बिचाऱ्या फ्रेंच लोकांच्या मुलांच्या शिक्षणाकरितां त्यानें एक शाळा स्थापन केली होती. त्या शाळेची व्यवस्था पाहण्यांत त्याचा कांहीं वेळ जाई. तारुण्यांत ज्या गरीब लोकांच्या कल्याणाकरितां तो मनोभावें झटत असे त्यांस तो वार्द्धक्यांत सुद्धां विसरला नाहीं. दुष्काळाच्या प्रसंगीं गरीब लोकांना बाजारांत निर्दोष कणकेचे पाव मिळत नसत. ही अडचण दूर करण्याकरितां त्यानें स्वतः आपल्या घरीं पाव करण्याचा कार-खाना काढून तो त्यांस अगदी हलकी किंमत घेऊन पुरवीत असे !

त्याचें अंतःकरण कोणत्याहि परिस्थितीपासून सुख व आनंद होण्यासारखें रसिक होतें. जॉनसन, गोल्डस्मिथ, रेनॉल्डस वगैरे विद्वानांशीं संभाषण करण्यांत त्यास जितका आनंद वाटे तितकाच आशिक्षित पण निष्कपट आणि प्रेमळ अशा ग्राम्य लोकांशीं बोलण्यांत वाटे. नगरांतील कृत्रिम निसर्गानुकरणापेक्षां नैसर्गिक सृष्टिसौंदर्य अवलोकन करून कोणत्या रसिक मनुष्यास आल्हाद होणार नाहीं ? ह्याशिवाय घरांतील पशुपक्षी व मुलेंबाळें ह्यांचा सहवास त्यास कमी आनंद-दायक नव्हता. सर जेम्स मॅकिंटॉश यानें त्याच्या "विचारा" वर विरुद्ध टीका केली होती, पण त्याला आतां आपली चुकी समजली, आणि तो बीकन्सफील्ड येथें बर्कला भेटावयास आला. तेव्हां मुलांबरोबर मोठ्या आनंदानें खेळतांना, सतरंजीवर त्यांच्याबरोबर गोलांट्या मारतांना व त्यांच्याशीं थट्टामस्करी कर-तांना बर्कला पाहून त्यास फार आश्चर्य वाटलें. दारच्या मुक्या जनावरांवरहि त्याचें प्रेम घरांतल्या माणसांप्रमाणें असे. गुरांना कुरवाळतांना, त्यांच्या अंगा-वरून हात फिरवितांना व त्यांच्याशीं बोलतांना तो वारंवार दृष्टीस पडे. एके दिवशीं उदासीन वृत्तीनें तो आपल्या परसांत एकटाच फिरत असतां, त्याच्या-जवळ एक म्हातारा घोडा आला. त्या घोड्यानें त्याच्या मुखाकडे कांहीं वेळ दृष्टी फेंकून नंतर आपली मान बर्कच्या खांद्यावर टाकिली. हा घोडा त्याच्या मुलाचा होता. धन्याच्या मरणापासून त्या आज्ञाधारक प्राण्यास कोणीहि

कामास लावीत नसत. तो नेहमीं सुटा असे. त्या गरीब प्राण्याची ही हृदय-द्रावक वृत्ति पाहून व मृत पुत्राचें एकदम स्मरण होऊन त्यास गहिंवर आला त्या घोड्याच्या मानेवर त्यानें आपलें अंग टाकिलें, आणि त्याच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या.

बर्कच्या कोमल अंतःकरणाची परीक्षा नसल्याकारणानें, व कांहीं अंशीं द्वेष-बुद्धीनें, त्यास बुद्धिभ्रंश झाल्याबद्दल खोट्याच कंड्या देशभर पसरल्या. तें ऐकून लंडनमधील त्याच्या स्नेह्यांस चिंता उत्पन्न झाली. त्यांपैकीं एक स्नेही तर खरें काय आहे तें पाहण्याकरितां मुद्दाम बीकन्सफील्ड येथें बर्कला भेटावयास म्हणून गेला. निस्तेज व निःसत्व झालेला त्याला तो दिसला. परंतु संभाषणांत जी त्याची बुद्धि, तीव्रता व उत्साह नेहमीं दृष्टीस पडे, त्यांत काडीभरसुद्धां न्यून त्यास आढळलें नाहीं. बोलत असतां बर्कनें टेबलाच्या खणांतून फ्रान्स-च्या तहासंबंधीं त्यावेळीं लिहित असलेलीं पत्रें काढून आपल्या स्नेह्यास दाख-विलीं. तीं वाचून तर त्या मित्राचा सर्व संशय दूर झाला. अशक्तता फार वाढल्यामुळें गुणकारी पाण्याबद्दल बाथ नांवाचें एक शहर इंग्लंडमध्यें प्रसिद्ध आहे तेथें बर्कला नेलें. परंतु कांहीं गुण वाटेना. परत बीकन्सफील्ड येथें त्यास यावें लागलें. कारण चिरकालीन सहवासानें प्रिय झालेल्या वस्तूंमध्यें तत्स्मृति-जन्य मनोविकाराच्या आनंदांत देहावसान व्हावें, अशी त्याची फार इच्छा होती. इतका दूरचा प्रवास झेपणार नाहीं असें त्यास कोणी सांगितलें. त्यावर त्यानें असें सांगितलें कीं, “लांब झाला तरी माझा तो स्मशानमार्गच आहे. तो जिवंतपणीं किंवा मेल्यावर क्रमणें सारखेंच.” हें अखेरचें दुखणें आहे अशी त्याच्या मनाची पक्की खात्री झाली. अंतकालीन व्याधीचें हेंच स्वरूप असतें कीं, हवे तेवढे उपाय करा, रोगाची पिछेहाट मुळींच होत नाहीं. आगंतुक अपमृत्यु उपायांनीं टाळतां येतो. पण महामृत्यूपुढें अमितबुद्धि मानवाचेंहि शहाणपण चालत नाहीं. अशा वेळेस धैर्यानें व न डगमगतां तो पतकरण्यास तयार असणें, हें सुज्ञ मनुष्याचें लक्षण आहे. बर्कची ऐहिक संसार-यात्रा दुष्कृत्यानें किंवा पापाचरणानें तिळमात्र दूषित झालेली नसल्याकारणानें त्यास भीति वाटण्याचें कारण नव्हतें. दुखण्यानें शोकाविव्हल न होतां धिम्मे-

पणानें अंतकालाची तो मार्गप्रतीक्षा करीत होता. मरणापूर्वी त्यानें आपल्या कागदपत्रांची व मालमत्तेची व्यवस्था करून ठेवली. वॉरन हेस्टिंग्जच्या चौकशीचे कागद प्रसिद्ध करण्यास त्यानें सांगून ठेवलें. शेवटपर्यंत देशहिताविषयीं विचार त्याच्या मनांत घोळत होते. तो म्हणाला 'शत्रूला कधींहि शरण जाऊं नका. राष्ट्र ह्या नात्यानें आपलें अस्तित्व कायम ठेवलें पाहिजे. मरावयाचेंच असेल तर हातांत तरवार घेऊन मरा. परिणामाविषयीं मला मुळींच भीति वाटत नाहीं. इंग्लिश लोकांच्या अंगांत अशी धमकच आहे कीं, योग्य नायक असल्यास कोणत्याहि शत्रूस ते जेरीस आणतील. एवढ्यासाठीं सतत यत्न मात्र करा.'

मरेपर्यंत चांगली शुद्धि राहिल्यामुळें कोणतीहि इच्छा अपरिपूर्ण न राहतां ऐहिक व पारमार्थिक म्हणून जें जें त्यास करावेंसें वाटलें, तें करण्यास त्याला अवकाश मिळाला. संसारांतील सर्व गोष्टींचा निकाल लावल्यावर ॲडिसनचे धार्मिक विषयावरील निबंध व विशेषेंकरून त्याचा आत्म्याच्या अमृतत्वावरील लेख त्यानें लक्षपूर्वक श्रवण केले. तें आटोपल्यावर त्यास गादीवर घेऊन जात असतां मध्येंच त्याचें प्राणोत्क्रमण झालें. तो दिवस तारीख ९ जुलई १७९७ हा होय. मरणसमयीं त्याचें वय ६८ वर्षांचें होतें. सहा दिवस प्रेत तसेंच ठेवलें होतें. त्याचा अंत्यविधि पंधराव्या तारखेस झाला. नामांकित लोकांचीं प्रेतें वेस्टमिनिस्टर येथें पुरण्याची वहिवाट आहे. तेथेंच बर्कचें प्रेत पुरावें, अशी सूचना पार्लमेंटमध्यें फॉक्सनें आणली होती व ती पसंत झाली असती ह्यांत संशय नाहीं. परंतु बीकन्सफील्ड येथेंच आपल्या पुत्राच्या व भावाच्या संनिध आपलेंहि प्रेतनिधान व्हावें असें त्यानें आपल्या मृत्युपत्रांत लिहून ठेवलें होतें. ह्या सुप्रसिद्ध मनुष्याच्या मृतदेहाचा अंत्य संस्कार पुरा करण्याकरितां १५ व्या तारखेस लंडनहून व दुसऱ्या कित्येक ठिकाणाहून गाड्यांचा लोट येत होता. त्यांत पार्लमेंटच्या दोन्ही सभांचे थोर सभासद आले होते. बर्कच्या पाठीमागें त्याची बायको पंधरा वर्षें होती. मरणापूर्वी संधिवातानें ती बरीच परस्वाधीन झाली होती व त्यांतच तिचा तारीख २ एप्रिल सन १८१२ रोजीं अंत झाला.

# भाग ९ वा

## धर्मश्रद्धा

बर्कच्या अंगचा फार मोठा गुण म्हटला म्हणजे धर्मश्रद्धा होय. तो प्रॉटेस्टंट पंथानुयायी होता हें मागें सांगितलेंच आहे. त्या पितृप्राप्त धर्मावर त्याची फार भक्ति असे. बालपणींच गृहशिक्षणानें मनांत जागृत झालेला खिस्तीधर्माविषयीं पूज्यभाव सज्ञानपणीं बुद्धिविकासानंतरहि किमपि न्यून न होऊन अखेरपर्यंत कायम होता. समाजाच्या अस्तित्वास, मनुष्याच्या नैतिक प्रगतीस, सुखवृद्धीस, आणि अंतर्गत शांतीस धर्म अवश्य आहे, ह्या गोष्टीवर डॉक्टर जॉनसनप्रमाणें बर्कचा दृढ विश्वास होता. फ्रान्सच्या राज्यक्रांतीवरील विचारांत त्यानें लिहिलें आहे कीं, मनुष्यप्राणी हा जात्याच धर्मनिष्ठ आहे. त्याचप्रमाणें उपजतच त्याच्या मनोवृत्ती नास्तिकपणाविरुद्ध बनलेल्या असतात. मनुष्यप्राण्याचा इतिहास पाहतां हें म्हणणें अक्षरशः खरें दिसतें. कारण सर्व समाजच्या समाज नास्तिक बनून कांहीं काल तरी टिकला आहे, असें आजपर्यंत कधीं घडलें नाहीं. अत्यंत प्राचीन मनुष्यजातीच्या उपलब्ध असलेल्या इतिहासावरून, व अगदी नवीन आढळलेल्या रानटी लोकांच्या स्थितीवरून असें दिसतें कीं, धर्मबुद्धि मनुष्यांत जन्मतःच वसत असली पाहिजे; परंतु दुर्दैवानें एखादा मनुष्य निसर्गतःच अधर्मबुद्धि निपजेल, तर त्यानें ऐहिक आत्महिताकारितां तरी धर्माचरण करण्यास प्रवृत्त होणें अवश्य आहे. कारण बर्कनें वरील ग्रंथांत म्हटल्याप्रमाणें धर्म हा समाजाचा पाया असून त्यापासूनच सर्व सुख व सर्व कांहीं चांगलें प्राप्त होतें. त्यामुळें अधर्मप्रवर्तक हे समाजाचे शत्रु होत असें तो मानीत असे.

धर्माची व्याख्या बरोबर करणें फार कठीण आहे. तथापि त्यांत ईश्वराच्या आस्तिक्याचा व तत्प्रथित म्हणून समजल्या जाणाऱ्या आचारनियमांचा अंतर्भाव होतो. निरनिराळ्या धर्मीयांचे निरनिराळे आचारनियम आहेत. त्यामुळें प्रत्येक धर्माचें स्वरूप फारच संकुचित व दुर्बोध झालें आहे. हिंदुधर्माहून ख्रिस्ती धर्माची ह्या बाबतींत फारशी भिन्न स्थिति नाहीं, हें खालील उताऱ्यावरून लक्ष्यांत येईल. "ख्रिस्ती धर्मशास्त्रांत उदात्त व परिपक्व विचारांची योजना मनुष्याचें मन संशय-निर्मूल होईल अशा तऱ्हेच्या सुव्यवस्थित रीतीनें केलेली नाहीं. त्यांत अत्यंत पूज्य अशा ईश्वरी नियमांचा संग्रह असून दुसऱ्या असंख्य गोष्टींचा विचार केलेला आहे निरनिराळ्या काळीं, निरनिराळ्या ग्रंथकारांनीं, निरनिराळ्या उप-ग्रंथांतून, निरनिराळ्या उद्देशानें लिहिलेल्या इतिहास, कथा, नीति, भविष्य, काव्य, कायदे, जगाची उत्पत्ति इत्यादिकांचा त्यांत समावेश होतो. ह्या कारणानें उपदेश-पर लिहिलेलें कोणतें, सूचनार्थ कोणतें, अक्षरशः ज्याप्रमाणें वागलेंच पाहिजे असें कोणतें, व सततचा धर्म कोणता, त्याचप्रमाणें कोणत्या आज्ञा विशिष्ट लोकां-करितां आहेत व कोणत्या आज्ञा सर्व ख्रिस्तानुयायांकरितां आहेत ह्याची निवड करणें जरूर आहे. ही निवड करतांना अर्थातच मतभेद होण्याचा संभव आहे." तथापि बर्कनें म्हटल्याप्रमाणें धर्माचें रहस्य न्याय, दया, परोपकार हीं होत ह्याविषयीं कोणासच संशय नाहीं. मग परधर्मीयांचा असहिष्णुतेनें छल करणें हें कोणत्या धर्मास संमत असणार? परंतु जगांतील सर्व मुख्य धर्मांचा इतिहास पाहतां हिंदुव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याहि धर्मानुयायांनीं परधर्मीयांस सुखानें स्वधर्मानुवर्तन करूं दिलेलें नाहीं.

अशा रीतीनें परधर्मीयांना सतत त्रस्त करण्यांतच उत्कृष्ट धर्माचरण मान-णाऱ्यांचा समुदाय मोठा असतां धार्मिकवृत्तीनें परधर्मीयांशीं सहानुभूति प्रदर्शित करणाऱ्या व्यक्ती जेव्हां मध्येंच दृष्टीस पडतात, तेव्हां त्या विशेष पूज्य होतात. पेशवाईंत कांहीं ब्राह्मण इंग्लंडांत गेले होते ते बर्कच्या घरीं उतरले होते. त्यांचें आन्हिक धर्माप्रमाणें व्हावें म्हणून बर्कनें त्यांची योग्य व्यवस्था ठेविली होती. ह्याविषयीं बर्कनें रघुनाथरावाला लिहिलेलें पत्र रा. वाकसकर ह्यांनीं भाषांतरा-सहित विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध केलें आहे तें येणेंप्रमाणें:—

"पत्र पाठवून आपण माझा जो सत्कार केला त्याबद्दल मी आपला फार आभारी आहे. आपल्या योग्यतेच्या व पदवीच्या लोकांस कशा मायन्यानें लिहिण्याचा आपलेकडेस प्रघात आहे त्याची मला चांगलीशी माहिती नाहीं तरी त्याबद्दल आपण मला क्षमा करावी.

"आपल्या तर्फेचे हणमंतराव आणि त्याचा मदतनीस मणियार पारशी अशीं जीं दोन माणसें येथें आलीं होतीं त्यांना माझा जो थोडासा व किरकोळ उपयोग झाला त्याला आपण नसतेंच महत्त्व देत आहां. कारण एका माणसाचें दुसऱ्या माणसासंबंधीं जें कर्तव्य असतें त्यापलीकडे अधिक असें मजकडून कांहींच झालें नाहीं. हणमंतरावानें माझ्या घरचा फार थोडे दिवस पाहुणचार घेतला व त्यायोगें माझाच बहुमान झालेला आहे. ज्या धर्मांत हणमंतराव जन्मले त्या धर्माचे ते कट्टे अनुयायी असल्यानें त्यांनीं प्राणांतिक संकटाचीहि पर्वा न करितां स्वधर्माचें रक्षण केलेलें मी प्रत्यक्ष पाहिलें आहे. अशा मनुष्याची व्यवस्था माझ्यासारख्या इसमाकडून जितकी चांगली लावितां येणें शक्य होतें तितकी माझ्या घरीं लाविण्याचा प्रयत्न मी केलेला आहे. त्यांनीं आम्हांला आपल्या रहाणीसंबंधानें जी माहिती दिली आहे तीवरून फायदेशीर अशी एक माहिती मिळाली कीं, ज्या ज्या वेळीं या राज्यांत आपल्याकडील उच्चकुलोत्पन्न गृहस्थांस योग्य परवानगीनें आणि वेळींच खबर देऊन पाठविण्यांत येईल त्या त्या वेळीं आमच्याशीं व्यवहार करतांना त्यास शक्य तितक्या कमी अडचणी पडतील आणि ज्या आमच्या देशांत वर्षांतून सहा महिने सुद्धां आल्हादकारक नसतात त्या (इंग्लंड)देशांत रहाणें त्यांना शक्य तितकें कमी त्रासाचें होईल, अशी व्यवस्था ठेवण्याचा आम्ही प्रयत्न करूं.

"आपल्याकडून आलेल्या गृहस्थांना आरंभीं जो कांहीं त्रास पडला त्यास इकडील लोकांच्या प्रेमळपणाचा अभाव हें खरें कारण नसून आपल्याच लोकांचें अज्ञान हें खरें कारण आहे.असो. महाराज, आपणांस कळविण्यास मला वाईट वाटतें कीं, आपणास पाहिजे असलेली सैन्याची मदत इकडून कधीं तरी मिळेल अशी मी आपणांस हमी देऊं शकत नाहीं. जेव्हां आपल्या हातून कांहींहि होण्यासारखें नसतें तेव्हां एकदमच स्पष्ट बोलावें हेंच फार उत्तम होय. हणमंतराव हा

आपला इमानी आणि लायक नोकर असून मणियार पारशी यानेंहि त्यास शक्य तितकी मदत केली आहे. जर आपल्या इच्छेप्रमाणें आपल्या कार्यास इकडे सिद्धी मिळाली नसली तर तो या लोकांचा दोष नव्हे." ह्यावरून व त्यानें आपल्या एका भाषणांत जे उद्गार काढले आहेत त्यावरून त्याच्या उदार धर्मबुद्धीची कल्पना होईल. तो म्हणतो "विचारपूर्वक, अभ्यासानें, निश्चित केलेल्या तत्वांवर आणि स्वभावतःच ज्या गोष्टींच्या मी अगदी विरुद्ध आहे ती, निष्ठापूर्वक असलेल्या मतभेदाकरितां दुसऱ्याचा छल करणें ही होय." आप-आपल्या विशिष्ट धर्मसमजुतींप्रमाणें सर्वांस अप्रतिहतपणें वागूं दिल्यानेंच आपल्या धर्माचा उत्कर्ष होतो, ह्याविषयीं त्यानें आपल्या धर्मबंधूंची अनेक प्रसंगीं खात्री केली आहे. डिसेंटर्स लोकांचीं बंधनें दूर करण्याच्या इराद्यानें पार्लमेंटमध्यें एक मसुदा आला होता. त्यावर प्रतिपक्षाचें असें म्हणणें होतें कीं, कायद्यानें धर्मस्वातंत्र्य कबूल करणें, म्हणजे ख्रिस्ती धर्मावर गदा उचलण्यासारखें आहे. ह्या आक्षेपाचें निरसन करितांना बर्क म्हणतो "पूर्ण स्वातंत्र्य दिल्यानें ख्रिस्तीधर्मावर प्रहार केले असें होतें काय? परधर्मासहिष्णुतेशिवाय दुसऱ्या कशानेंसुद्धां ख्रिस्ती धर्माला बळकटी यावयाची नाहीं, असें मानीपर्यंत आपली मजल येऊन पोचली काय? ... ... माझी पक्की खात्री आहे कीं, धर्मस्वातंत्र्य दिल्यानें ख्रिस्ती धर्माला बिलकुल कमीपणा न येतां उलट पूर्ण बळकटीच निःसंशय येणार आहे. धर्मस्वातंत्र्य नव्हतें अशावेळीं ख्रिस्ती धर्म अस्तित्वांत आला आहे; व त्या धर्माचीं तत्वें जरी लोकांनीं एकदम मान्य केलीं नाहींत, तरीसुद्धां अज्ञानांधकाराचा लोप करून जगांतील विरोधी शक्तींचा त्यानें ऱ्हास केला. परंतु ह्या तत्वांपासून परावृत्त होतांक्षणींच तो एक जुलूम करण्याचें साधन झाला. धर्मस्वातंत्र्याचें तत्व ख्रिस्ती धर्माला पसंत आहे; ख्रिस्ती धर्माचा तो एक भागच आहे अशी माझी समजूत आहे."

"स्वधर्मे निधनं श्रेयः" हेंच बर्कचेंहि मत होतें. राज्यक्रांतीनंतर फ्रेंच लोकांशीं युरोपिअन राष्ट्रांनीं कोणत्या धोरणानें वागावें, ह्यासंबंधीं लिहित असतां तो म्हणतो. "माझा स्वतःचा अभिप्राय असा आहे कीं, कोणत्याहि मनुष्यानें आपला धर्म सोडून परधर्मांत शिरूं नये; दुसऱ्याचा द्वेष न करतां त्यांत चांगलें

असेल तें घेण्यास झटणें, हें इतर गोष्टींप्रमाणें धर्मबाबींतहि फार उपयोगी आहे. कांहींशा नेमस्त वादानें मनुष्यांतला उत्साह प्रज्वलित राहतो; परंतु खात्री करून घेऊन धर्मांतर केल्याचीं उदाहरणें हल्लीं क्वचितच घडतात. अल्प-वयापासून त्यांत शिक्षण मिळाल्याकारणानें पूज्य झालेला धर्म कित्येक लोक बदलतात; पण मनाचें पूर्ण समाधान न होतां, आणि विशेषेंकरून कांहीं राज्य-कारस्थानाच्या योगानें धर्मांतर करणें भाग पडलें असेल तर त्यांच्यांमधील धर्मश्रद्धा जाऊन ते उदासीन, धर्मभ्रष्ट, व वारंवार अगदी नास्तिक बनतात."

मनुष्याच्या सद्वर्तनाला तात्विक नीतिसिद्धांतापेक्षां ईश्वरभय विशेष कारणीभूत असल्यामुळें नास्तिक लोक समाजाचे शत्रू होत. परंतु श्रद्धापूर्वक पण निरनिराळ्या रीतीनें धर्माचरण करणाऱ्या धर्मनिष्ठ लोकांविषयीं तसें म्हणतां येणार नाहीं. समाजसुखवृद्धीस ते सारखेच उपयोगी पडतात. ईश्वराला कोणतें आचरण संमत व प्रिय आहे, हें मनुष्य आपल्या स्वतःच्या विचारसामर्थ्याप्रमाणें ठरवणार हें उघड आहे; आणि विचारशक्ति तर सर्वांची सर्व काळीं कधींच सारखी नसते. मनुष्यमात्राची सुदृढ विचारशक्ति म्हणजेच जगाची सुधारणा. ह्यामुळें वेगवेगळया काळीं वेगवेगळ्या लोकांच्या धर्म व नीति याविषयींच्या कल्पना भिन्नाभिन्न होत्या ह्यांत आश्चर्य नाहीं. एवढेंच नव्हे तर एकाच लोकांमध्येंहि हा भेद दृष्टीस पडतो. तात्पर्य, सर्व माणसांच्या विचारगतींत जोंपर्यंत समता नाहीं, तोंपर्यंत प्रत्येक बाबींत भिन्नता असणें साहजिक आहे. जोंपर्यंत ही भिन्नता समाजविघातक होत नाहीं, तोंपर्यंत वेगळ्या रीतीनें पण भक्तिपुरःसर ईश्वरोपासना करणाऱ्या व ईश्वराला संमत असें आचरण आपल्या मतीप्रमाणें ठरवून त्याप्रमाणें वर्तनक्रम ठेवणाऱ्या सत्वशील, भाविक परंतु कदाचित् कांहीं अंशीं अयथार्थ कल्पना असणाऱ्या लोकांचा आपल्याहून अन्य प्रकारानें धर्माचरण करतात म्हणून छल करणें सर्वथा अप्रशस्त होय. धर्मबाबतींत अन्य मतें स्वीकारणारांचा छळ करणें जर न्याय्य ठरेल, तर राजकीय अथवा अन्य गोष्टींतहि तोच नियम कां लागू पडूं नये?

अन्यधर्मीयांना जुलमानें किंवा काव्यानें धर्मांतर करावयास लावणें कोणासहि श्रेयस्कर न होतां उलट हानिकारक आहे, हें बर्कनें खाजगी पत्रांतून व भाषणां-

सून अनेक वेळां सांगितलें आहे. ज्या धर्मावर त्यांची श्रद्धा असते त्या धर्मा-प्रमाणें आपण त्यांस वागूं देत नाहीं, आणि अपरिहार्य म्हणून अंगीकृत केलेल्या धर्मावर निष्ठा असणें तर अगदी अशक्यच. अशा स्थितींत आपण त्यांच्यामध्यें एकंदर धर्माविषयीं अनास्था, उदासीनता व हलगरजीपणा मात्र उत्पन्न करतों. अशा श्रद्धाभ्रष्ट झालेल्या माणसांत व नास्तिकांत फरक तो काय ? ह्याप्रमाणें धर्मनिष्ठ लोकांस नास्तिक केल्यानें आपण एक प्रकारें आपल्या शत्रूसच साहाय्य करीत आहों असें होतें. आयर्लंडांतील कॅथॉलिक लोकांस उद्देशून विल्यम स्मिथ नांवाच्या आपल्या मित्रास बर्कनें खालील मजकूर लिहिला आहे. " यूरोपांतील सर्व मुख्य धर्मपंथांचें मूळ एकच आहे. ह्या ख्रिस्ती धर्माच्या मुख्य चार पंथांचे लोक सवयीनें व शिष्टाज्ञेनें आपआपल्या पंथाप्रमाणें आचरण करतात. त्याच्या सयुक्ततेच्या वादग्रस्त भानगडींत कोणी पडत नाहीं. वडिलांपासून ज्यांना धर्म प्राप्त झाला आहे त्या सर्व लोकांची स्थिति अशीच असली पाहिजे, मग प्रत्येक मनुष्य आपल्या श्रद्धेचा स्वतःच्या अथवा इतरांच्या विचारशक्तीशीं कसाहि मेळ घालो. ध्यानांत ठेवा कीं, ह्या सर्व निरानिराळ्या पंथांचें संरक्षण केलें पाहिजे. नाहींतर सर्वांचा सरसकट उच्छेद झाल्याशिवाय राहणार नाहीं. तुमच्या देशांत कॅथॉलिक पंथानुयायांचा भरणा विशेष आहे. म्हणून ख्रिस्ती लोकांपैकीं एका मोठ्या वर्गाचा छळ करून अथवा त्यांचा त्याग करून देखील ख्रिस्ती धर्माचें संरक्षण कसें होणार ? कारण ख्रिस्ती धर्माचें संरक्षण करणें हाच हल्लीं मुख्य मुद्दा आहे. अधर्मी लोकांनीं जर कॅथॉलिक धर्माचा संहार केला तर प्रॉटे-स्टंट धर्मपंथाची तीच गति लागणार नाहीं ही कल्पना निर्विवाद, अगदी वेड-गळ व हास्यास्पद आहे. म्हणून माझें असें निश्चित मत आहे कीं, ज्या देशाचा जो धर्म असेल त्याला तेथें प्राधान्य देऊन बाकी सर्व पंथांना आश्रय दिला पाहिजे; त्यांचें संरक्षण केलें पाहिजे; त्यांस उत्तेजन दिलें पाहिजे. विशेषेंकरून आयर्लंडांत रोमन कॅथॉलिक धर्माविषयीं पूज्यभाव व आदरबुद्धि बाळगून त्यापासून तदनुयायांना सुख प्राप्त होईल अशी तजवीज केली पाहिजे. आतांच जर आपणांस नवीन धर्मपंथाचा अंगीकार करावयाचा असेल, तर रोमन कॅथॉलिक पंथ उत्कृष्ट म्हणून आपण मानणार नाहीं हें खरें. पण अपरिहार्य संकट

म्हणून सहन न करतां, हितावह म्हणूनच त्याचें संरक्षण केलें पाहिजे. श्रेष्ठ म्हणून जरी हा धर्म मी मानला नाहीं, तरी पण त्यास निखालस उत्तेजन देण्याची माझी मनापासून इच्छा आहे. कारण तदनुयायांची उत्कट श्रद्धा व निस्सीम धर्माचरण ह्यामुळें नास्तिक मतांचा शिरकाव त्यांत होणार नाहीं." वरील पत्र इ. स. १७९५ सालीं लिहिलें आहे, हें लक्षांत आणलें म्हणजे त्यांतील मुद्यांचा नीट खुलासा होईल. फ्रान्सची राज्यक्रांति नुकतीच होऊन गेली होती व तद्भूमिगत अधर्मबीज ग्रेटब्रिटनमध्यें रुजतें कीं काय, अशी भीति पडली होती. अशा वेळीं आपआपसांतील सूक्ष्म मतभेद सहन न करून शत्रूंना मार्ग सुगम करून देणें अत्यंत मूर्खपणाचें होतें ह्यांत संशय नाहीं. रोमन कॅथॉलिक लोकांच्या वतीनें बोलतांना किंवा लिहितांना बर्कचा युक्तिवाद प्रत्येक वेळ नवीन दृष्टीस पडतो, हें सर्व उताऱ्यांवरून वाचकांच्या ध्यानांत येईल.

आयर्लंडच्या रोमन कॅथॉलिक लोकांना राज्यकारभारांत थारा मिळत नव्हता. इतकेंच नव्हे, तर सरकारी नोकरींतसुद्धां ठेवण्यास ते अपात्र ठरले होते, हें मागें सांगितलेंच आहे. ह्या अन्यायप्रचुर कृत्याचें खंडण करतांना बर्कनें आपल्या मित्रास लिहिलें आहे:—" प्रजेनें श्रम करून मिळविल्यापैकीं बराच मोठा हिस्सा जेव्हां सरकारांत जातो आणि तो नोकरीच्या रूपानें परत सरकाराकडून प्रजेस मिळतो तेव्हां ज्या लोकांकडून सरकार कर घेतें, त्या लोकांना त्याचा मोबदला मिळतो. अशा रीतीनें सरकार व प्रजा ह्यांमध्यें समता राहते. परंतु राज्यचक्र चालण्यास द्रव्यानें मदत करणाऱ्या मोठ्या लोकसमूहाला जर सरकारांतून उलट फायदा मिळाला नाहीं तर तो असह्य जुलूम होतो. कारण त्यामुळें त्यांच्यावर इतरांपेक्षां दुप्पट निष्पट कर बसविण्यासारखें होतें. स्वतःच्या उद्योगाचें फल मिळविण्याची ज[illegible] आशा ठेविलेली नाहीं, अशा लाखो लोकांच्या लहानमोठ्या कुटुंबाच्या मनाला ही गोष्ट लागल्याशिवाय रहाणार नाहीं. राष्ट्रीय महसूल म्हणजे लूट समजणाऱ्या व म्हणूनच त्या लुटींत जितके कमी भागीदार असतील तितके कमी असण्याची अर्थात् इच्छा करणाऱ्या राज्यकर्त्यास मात्र असें करणें शोभतें. रानटी [illegible]मणें प्रजेस राजकीय हक्क दिल्यावांचून राज्य चालणें शक्य आहे अ[illegible] इतकें जर सरकार हतभागी असेल तर

त्या लोकांवरचा कराचा बराच बोजा कमी करणें व राष्ट्राच्या जबाबदारीच्या कामांतून त्यांस मुक्त करणें जरूर आहे. लोकांना गुलामगिरींत ठेवण्याबद्दल निदान हा एक प्रकारचा मोबदला आहे असें साधारण शहाणपणा व न्यायबुद्धि सांगूं शकतात. मुलकी खात्यांतील व फौजेंतील लहानसाहान जागासुद्धां मिळाल्या नाहींत, तर किती तरी कुटुंबांचें अस्तित्व अस्तंगत होण्याचा संभव आहे. आपल्या राज्यांत ह्या जागा न देणें व परदेशांत मिळविल्यास तो राजद्रोह मानणें, हा दुष्टपणा ह्या युगांत केला जाईल असें मला आजपर्यंत वाटलें नव्हतें. पूर्वी धर्मसादृश्यानें कोठेंना कोठें मनुष्यास थारा मिळत असे व तोच त्याचा देश होई. धर्माकरितां पळून आलेल्या मनुष्याला खात्रीनें आश्रय मिळे. परंतु आतां तसा प्रकार राहिला नाहीं. म्हणून बाहेरील आधार नाहींसा झाल्यानें घरांतलें दुःख जास्तच दुणावतें. सगळे धंदे बंद केल्यामुळें हें दुःख विशेषच असह्य होतें. न्याय खात्यांत वगैरे शिरण्याची त्यांस कां मनाई असावी ? फिर्यादी करण्यांत त्यांचा पैसा खर्च होत नाहीं काय ? ”

रोमन कॅथॉलिक लोकांना पूर्वी ज्ञानसंपन्न करण्याचे मार्गहि खुले नव्हते, ह्याचा मागें उल्लेख केलाच आहे. परंतु सुदैवानें हा निर्बंध लवकरच पुढें काढून टाकण्यांत आला. तथापि त्यांस कोणतेहि हक्क अद्यापि प्राप्त झाले नव्हते. ह्या विसंगततेमुळें रोमन कॅथॉलिक लोकांची स्थिति विशेष शोचनीय होती, हें बर्कनें ह्याच पत्रांत सिद्ध केलें आहे. ‘लोकांना गुलाम करून सोडण्याच्या भयंकर व अधर्म्य पद्धतींत जोंपर्यंत स्वदेशांत आणि परदेशांत ज्ञान संपादण्याच्या प्रतिबंधांचा अंतर्भाव होत होता, तोंपर्यंत लोक त्या पद्धतीला योग्य असत. मनुष्यांचे सर्व नैसर्गिक हक्क काढून घेऊन, पुन्हा त्यांस सहनशील करण्याकरितां त्या हक्कांचें ज्ञान व वासना ज्याच्यामुळें त्यांस प्राप्त होतील त्या सर्व गोष्टी शहाणपणानें मना केल्या होत्या. मानहानि करण्यास योग्य करण्याकरितां प्रथम मनुष्याची अवनत स्थिति करून टाकणें योग्यच होतें. परंतु स्वतंत्र सांपत्तिक संचय करण्याचें सामर्थ्य मनुष्यांत आणीत आहों असा जेव्हां आपण बाणा बाळगतों, तेव्हां त्या संचितवृद्धीच्या हक्काप्रमाणें मनें सुसंस्कृत करण्याचा हक्क त्यांस न देणें अन्यायाचें तसेंच मूर्खपणाचें आहे. खरोखर

माझी अशी समजूत आहे कीं, आपला बुद्धिविशिष्ट स्वभाव सुसंस्कृत करण्याच्या साधनांची मनाई करणें हा मनुष्याच्या उद्दाम व कुटिल स्वभावालाहि आजपर्यंत जो जुलूम करण्याचें धाडस झालें नाहीं अशा अति निंद्य जुलमाचा एक प्रकार आहे.'

रोमन कॅथॉलिक लोकांना प्रॉटेस्टंट लोक किती नीच समजत असत ह्याची कल्पना खालील उताऱ्यावरून होईल. "क्रीडाव्यग्र झाल्यानें रस्ता चुकल्यास तो विचारण्याकरितां अथवा बागवानांच्या माणसांजवळ बोलण्याचा प्रसंग कदाचित् आला तर तो तेवढा खेरीज करून साऱ्या आयुष्यांत रोमन कॅथॉलिक लोकांबरोबर एक शब्दसुद्धां ज्यांनीं उच्चारला नाहीं; अथवा फार तर त्यांना हलक्या प्रतीचे शिपाई व मजूरदार म्हणून जे ओळखतात असे आयर्लंडांत हजारों लोक आहेत हें खास. कांहीं काळापूर्वीं त्यांना आपल्याजवळ येऊं देण्याविषयीं देखील ते इतके नाखुष असत कीं, तबेल्याच्या बाहेर ज्यांस कधीं येतां येणार नाहीं अशा नोकरीच्या कामावर देखील ते त्यांस ठेवीत नसत. मला चांगलें आठवतें कीं, एका मोठ्या आणि चांगल्या मनुष्यानें लोहार पाहिजे म्हणून जाहिरात दिली. पण तो प्रॉटेस्टंट पाहिजे ही त्यांत अट घातली होती. अशा दूर दूर राहण्यानें एका पक्षांत भिन्नभाव व दुसऱ्यांत गर्व आणि उद्दाम वृत्ति उत्पन्न न होणें अगदी अशक्य आहे." वरील सर्व उताऱ्यांवरून उघड होतें कीं, स्वधर्मपरिपालनाच्या मिषानें परधर्मीयांचा छळ करणें बर्कला सर्वथैव असंमत होतें. त्यानें आपल्या एका भाषणांत स्पष्ट सांगितलें आहे कीं, दुसऱ्याचा द्वेष केल्यानें आपण नैष्ठिक प्रॉटेस्टंट आहों असें ज्यांस वाटतें ते मुळींच प्रॉटेस्टंट नाहींत असें समजलें पाहिजे. गेल्या शतकांत असले अमूल्य विचार प्रदर्शित करणारा मनुष्य विलक्षण उदार बुद्धीचा असला पाहिजे ह्यांत संशय नाहीं. खालील उद्गार वाचून कोणत्या सहृदय मनुष्याचें अंतःकरण वक्त्याविषयीं प्रेमभावानें, आदरबुद्धीनें व अभिमानानें उल्लसित होणार नाहीं ? आणि हें भाषण त्यानें आपल्या मतदार लोकांपुढें केलें आहे हें ध्यानांत ठेवलें असतां बर्कच्या निस्पृहपणाचें, सरळ स्वभावाचें, आणि न्यायप्रेमाचें विशेषच आश्चर्य वाटतें. तो म्हणतो. "जेव्हां लोक आपल्या सजा-

तीयांचीच हालअपेष्टा करण्यास उद्युक्त होतात, तेव्हां ते इंग्लिश राष्ट्राच्या राज्यव्यवस्थेकरितां करोत किंवा धर्मव्यवस्थेकरितां तसें करोत; पण आपण एकमेकांस दुःख देतों तें कोणत्या कारणाकरतां ह्याची मी मुळींच चौकशी करीत नाहीं. जेव्हां आम्हांला ह्या अधिकारस्थानीं पाठविण्यांत आलें तेव्हां ज्या तुम्हीं आम्हांस पाठविलें त्या तुमच्याजवळ आम्हांस करावयास सांगण्यास एकच काम होतें. अन्याय किंवा जुलूम करण्यास अथवा अमेरिकेप्रमाणें राजकीय बाबतींत, आयर्लंडप्रमाणें व्यापाराच्या कामांत, कर्जासंबंधीं कायद्यांप्रमाणें दिवाणी कामांत किंवा रोमन कॅथॉलिक व डिसेंटर्स लोकांविरुद्ध असलेल्या कायद्यांप्रमाणें धर्म-बाबतींत, सारांश कोणत्याहि कारणानें कोणत्याहि प्रकारचा जुलूम किंवा अन्याय झालेला स्वस्थपणें पाहण्यास देखील तुमच्यानें आम्हांस सांगवेना. न्यायदेवतेच्या विविधरूप पण अविच्छिन्न मंदिराचे सर्व भाग मजबूत बसले आहेत. माझ्या हातांत जी कांहीं सत्ता येईल त्या सत्तेच्या साधनाचा तें अविच्छिन्न मंदिर भग्न करण्याकडे मी आजपर्यंत कधींहि उपयोग केला नाहीं, आणि पुढें कधींहि करणार नाहीं हें ध्यानांत ठेवा. जर माझा इलाज चालेल तर कशालाहि धक्का लागणार नाहीं. सरशेवटीं हें काम पुरें होण्यापूर्वीं पुष्कळ करावयाचें राहिलें आहे. पूर्वेकडील देशांत बरेंच आहे, व पाश्चात्य देशांतहि बरेंच आहे. पण जरी हें काम मोठें असलें, तरी आपली उद्युक्तता असेल तर आपलें सामर्थ्य कमी नाहीं."

तात्पर्य, श्रीमंत, गरीब, स्वधर्मी, परधर्मी, हा भेदाभेद बर्कजवळ नव्हता. अन्यायाखालीं जे चिरडताहेत, मग ते कोणीहि असोत, त्यांस मदत करणें हेंच तो आपलें कर्तव्य समजत असे.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थलक
अनुक्रम.................. वि: ..........
भाग १०वा ........ नों. क्रि:

# बर्कचीं राजकीय मतें

बर्कच्या लेखांचे साधारणतः दोन भाग करतां येतील. एक तो पार्लमेंटमध्यें शिरण्यापूर्वीच्यांचा व दुसरा पश्चात्च्या लेखांचा इंग्लंडचा इतिहास, मूळ समाजाची तरफदारी, 'उदात्तता आणि सौंदर्य' ह्यावरील निबंध, लहान लहान काव्यांचे चुटके वगैरे त्याचे लेख पार्लमेंटमध्यें शिरण्याच्या पूर्वीचे होत. पार्लमेंटमध्यें शिरल्यावर अर्थात्च त्याच्या लेखांची दिशा बदलली. राजकीय विषयांशिवाय दुसऱ्या विषयांकडे लक्ष देण्यास त्यास त्या काळांत सवडच मिळाली नाहीं. ह्या राज्यविषयक लेखांमुळेंच मुख्यतः बर्कचें नांव इतिहासज्ञांस परिचित आहे. राज्यकारभारांत पडण्याचा जर कदाचित् योग जुळून आला नसता, तर त्याच्या लौकिकाचें कारण निराळें झालें असतें.

बर्कप्रमाणें दुसऱ्या पुष्कळांनीं राजकीय विषयावर लेख लिहिले आहेत व राज्यधुरा वाहिली आहे. असें असतां बर्कचें नांव लोकांस आजतागाईत विशेष वंद्य कां व्हावें, हा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. त्याचें कारण असें आहे कीं, त्याचीं मतें राष्ट्राच्या प्रगतीस अनुकूल, उदार आणि सहृदयतेनें प्रेरित अशीं आहेत. संकुचित व कोत्या दृष्टीनें पाहण्याची त्यास सवय नव्हती. अशाच मुत्सद्यांचीं नांवें जगाला पूज्य होतात. बर्कच्या लेखांत व भाषणांत आढळून येणारीं राजकीय मतें खालीं दिलीं आहेत. त्यांवरून वरील गोष्टीची सत्यता चांगली प्रत्ययास येईल.

समाजव्यवस्थेप्रमाणेंच प्रस्तुत असलेल्या राज्यपद्धति याहि राज्यकारस्थानकुशल मनुष्यानें पूर्वनिश्चित सिद्धांताच्या जोरावर निर्माण केलेल्या नाहींत, असें

बर्कचें म्हणणें होतें. राज्यपद्धति जशी दृष्टीस पडली तशी घेऊन, तीवर राजनीतिवेत्त्यांनीं तद्विषयक नियम बांधले आहेत. काल्पनिक अननुभूत सिद्धांतांन्वयें राज्यपद्धतीची नवीन रचना झाली आहे, असें कधींहि घडून आलें नाहीं. अशा तार्किक सिद्धांतांवर जर राज्यपद्धतीचा पाया उभारला तर ती पद्धति लोकांस सुखकारक अथवा हितावह होणार नाहीं. सारांश लोक राज्यपद्धतीकरतां नाहींत तर राज्यपद्धति लोकांकरतां आहे, ही गोष्ट बर्कच्या मनांत पूर्णपणें बिंबली होती. म्हणून वास्तविक लोकस्थितीचा विचार न करतां, आपल्या आवडत्या कल्पनांप्रमाणें राज्यनियम घालण्याचा प्रयत्न करणाऱ्या मुत्सद्यांचा उद्योग त्यास बिलकुल संमत नसे. राज्यपद्धति लोकस्थितीवर अवलंबून असल्यामुळें लोकस्थित्यंतराबरोबर राज्यपद्धतींत बदल होणें स्वाभाविक आहे, व तसा योग्य फरक करण्यास तो नेहमीं तत्पर असे; परंतु सुधारणा म्हणजे अपरिचित व अननुभूत नवीनपणा नव्हे. मूळ वस्तु कायम ठेऊन बदललेल्या लोकस्थितीमुळें अवश्य झालेला फरक केल्यास त्यापासून खात्रीपूर्वक लोकांचें कल्याण करतां येतें. परंतु पूर्व वस्तूचा समूळ नाश करून तत्स्थळीं अद्भुत गोष्टी स्थापून लोकांस तदधीन केल्यानें, समाजांत अस्थैर्य व अनर्थ उत्पन्न होतात. लोकस्थितींत होणारा बदल सावकाश व कधीं कधीं अदृश्य रीतीनेंच होत असल्याकारणानें राज्यनियमांतहि तीच स्थिति असली पाहिजे. ह्यासंबंधानें बर्कनें म्हटलें आहे.—“कोणत्याहि वस्तूंत कालमानानें फरक पडणें हा त्या वस्तूचा मुख्य धर्म आहे. मानवी शहाणपणाच्या योगानें आपणांस जें कांहीं करतां येईल तें एवढेंच कीं, हे फरक एकदम भासमान न होतां सावकाश होतील, अशा रीतीनें वस्तुस्थित्यंतरापासून होणारा लाभ प्राप्त होऊन, शिवाय वस्त्वंतरापासून होणारें नुकसान टाळतां यावें. जसजशी आवश्यकता उत्पन्न होते, तसतशी आणि तितकीच तजवीज केली जाते. ह्याचा परिणाम असा होतो कीं, पूर्वस्थितीपासून ज्यांना लाभ होत असे, त्याला ते न मुकल्या कारणानें असंतुष्टता पसरत नाहीं, व पूर्वी न मिळालेलें एकदम हातीं लाधल्यानें मदांध होऊन उद्दामपणानें त्याचा दुरुपयोग करण्याची प्रवृत्ति क्षुद्र लोकांत होत नाहीं. ह्याप्रमाणें फरक करणें तो सावकाश व सावधपणें करावा, अशी जरी माझी इच्छा आहे, तरी

"पण तो लोकांच्या प्रगतीस प्रतिबंधक न होतां सहायभूतच असला "पाहिजे."

ह्यावरून नवीन असें जगांत कांहींच होतां कामा नये असा बर्कचा अभिप्राय होता, असें अनुमान काढतां येत नाही. नवीन गोष्टींवर कोणताहि पाया रचावयाच्यापूर्वी त्यांचा अनुभव घेतला पाहिजे आणि अनुभवांतीं त्या हितावह होतील असें सिद्ध झाल्यावरच त्यांचा सर्वत्र प्रसार करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपण जें कांहीं केलें आहे त्याचा परिणाम काय होतो तें पाहिल्यावर पुढें पाऊल टाकण्यास आपणांस धास्ती वाटत नाहीं. अननुभूत गोष्टींचा एकदम पूर्ण प्रसार करण्याविषयीं प्रथम जे लोक आतुर असतात, तेच नंतर सर्वांच्या आधीं त्यांविषयीं उद्विग्न होतात. पराकाष्ठेच्या कंजूषपणानें अथवा अमित द्रव्यसंपादनानें श्रीमंत होण्याची घाई करणें जसें वाजवी नाहीं, तसेंच सुधारणेचें आहे. कोणत्याहि राष्ट्राच्या राज्यव्यवस्थेंत बदल करावयाचा तो विशेषेंकरून दोन रीतींनें करतां येतो. एक जुने कायदे रद्द करून अथवा दुरुस्त करून, किंवा अगदी नवे कायदे करून राज्याची अंतर्गत व्यवस्था सुधारणें; आणि दुसरा राज्याभिषिक्त पुरुषाचें उत्थापन करून तत्स्थानीं एक किंवा अनेक अधिकृत राज्यचालकांची योजना करणें. हा दुसरा प्रसंग फार क्वचित् येतो. परंतु पहिल्या मार्गाचें अवलंबन मुत्सद्दी वर्गाला नेहमीं करावें लागतें. खऱ्या मुत्सद्याचें काम बर्कनें असें सांगितलें आहे कीं, कायदे करणें ते मनःपूत न करतां लोकांच्या मनाचा कल पाहून त्याप्रमाणें करावे. कायद्याच्या साहाय्यानें लोकवर्तन आजिबात बदलणें मुत्सद्याच्यानें होणार नाहीं. लोकांच्या विचारांना व्यवस्थित स्वरूप देणें, त्यांची दिशा ठरविणें, व ते मान्य करणें हेंच मुत्सद्याचें मुख्य कर्तव्य होय. ह्याच नियमाला अनुसरून अमेरिकन लोकांविषयीं त्यानें म्हटलें आहेः— "जगांत जर एकादी अगदी स्पष्ट गोष्ट असेल तर ती ही कीं, स्वतंत्र राज्यव्यवस्थेशिवाय दुसरी कोणतीहि व्यवस्था अमेरिकन लोकांच्या स्वभावाला बिलकुल रुचणें शक्य नाहीं. ह्याच धोरणानें कोणत्याहि प्रामाणिक मुत्सद्यानें आपल्या हातांत असलेल्या सत्तेचा उपयोग केला पाहिजे. स्वतंत्र राज्यव्यवस्था म्हणजे काय असें जर मला कोणी विचारील, तर त्यास माझें उत्तर हें कीं, जी त्या लोकांना वाटेल तीच त्यांची स्वतंत्र

राज्यव्यवस्था होय. कारण ही गोष्ट ठरविण्यास तेच स्वभावतः लायक आहेत; मी नव्हे. पूर्ण स्वतंत्रतेच्या कल्पनेला अयोग्य अशी विशेष सत्ता जर त्यांनीं माझ्या हातांत दिली, तर त्यांनीं मजवर एवढा मोठा विश्वास ठेवला ह्याबद्दल मी त्यांचे आभार मानीन. परंतु तेवढ्यावरून मी असें अनुमान काढणार नाहीं कीं, ते स्वातंत्र्योपभोगास अयोग्य आहेत म्हणून इतःपर माझ्या मर्जीस वाटेल तेवढेंच स्वातंत्र्यसुख त्यांस मिळावें; जास्त मिळूं नये."

"साधेल तितकें सर्वांना सुख मिळावें, हाच राज्यव्यवस्थेचा मुख्य उद्देश होय. अर्थात् ज्या गोष्टींनें मोठा लोकसमुदाय अत्यंत निकृष्ट स्थितीस पोंचतो त्या गोष्टीनें हा हेतु कधीं सिद्धीस जाणार नाहीं. लोकांसंबंधीं कायदे करतांना त्यांना प्रत्यक्ष भासणाऱ्या सुखदुःखांचा विचार मुत्सद्यांनीं केला पाहिजे. नुसते काल्पनिक हक्क प्रमाणभूत धरतां कामा नयेत. ह्यामुळें अर्थातच लोकांचा विशिष्ट स्वभाव, मतें व आचारविचार आणि आयुष्यांतील दुसऱ्या नानाविध गोष्टी, ह्यांचें इत्थंभूत ज्ञान मुत्सद्यांस असणें अवश्य आहे. म्हणून समाज कोणत्या स्थितींत आहे ह्याची प्रथम चौकशी करून तदनुरूप शहाणा मुत्सद्दी, आपला वर्तनक्रम ठेवील." आयर्लंडच्या कारभारासंबंधीं आपल्या मुलाला लिहिलेल्या पत्रांतहि त्यानें हाच अभिप्राय प्रदर्शित केला. तो म्हणतो "इतर कायदे करणाऱ्या मंडळांप्रमाणें आयर्लंडच्या मंत्रिमंडळानेंसुद्धां देशस्थितीला व लोकांना योग्य होतील असेच कायदे केले पाहिजेत. अमक्या प्रकारचे कायदे पाहिजेत अशा स्वतःच्या लहरीप्रमाणें देशाच्या चाली व लोकांचे स्वभाव बदलण्याचा त्यानें प्रयत्न करतां कामा नये."

लोकांच्या मानसिक प्रवृत्तीला अनुसरून कायदे करणें श्रेयस्कर असल्यामुळें अस्तित्वांत असलेले कायदे वारंवार बदलणें हितावह नाहीं हें ओघानेंच सिद्ध होतें. कारण "एकंदर जनसमूहाच्या आचारविचारांत एकदम किंवा अगदी अल्प काळांत मोठासा फरक कधींहि पडत नाहीं. हा फरक जेव्हां दृग्गोचर होतो, तेव्हांच कायदे बदलण्यास सबळ कारण घडतें. परंतु विद्यमान कायद्यांनीं विवक्षित आयुष्यक्रम क्रमण्याची लोकांना सवय लागली असतां, व त्याच स्थितींत त्यांचें संरक्षण होत असतां, त्याचप्रमाणें जेव्हां

त्यांचे आचारविचार कायद्यांना धरून असतात व जेव्हां त्या कायद्यांच्या नियमान्वयें चालणें हें कीर्तिवृद्धीस व त्यांचें उल्लंघन करणें हें लांछन आणि शासन होण्यास कारणीभूत होतें अशावेळीं, मनसोक्त कायद्यांनीं लोकांच्या मनोवृत्तींस एकाएकीं धक्का बसविणें, त्यांच्या वैभवापासून त्यांस अवनतीप्रत पोंचविणें व ज्या रीतिभातींच्या योगानें आणि वर्तनानें मानमरातब व आनंद प्राप्त होत असत त्या चालीरीती व तें वर्तन अप्रतिष्ठित व लांछनास्पद ठरविणें, हें निःसंशय अन्यायाचें आहे. लोकमतौघाला अनुसरून जे कायदे होतील तेच सुखावह होतील. कारण मूर्खपणाचे कायदे करणें हें प्रत्यक्ष जुलमापेक्षांहि वाईट आहे. ”

सारांश, तात्विक दृष्टया ठरणाऱ्या सत्यासत्यतेवर व्यावहारिक राजकीय सिद्धांत बहुधा अवलंबून नसतात. चांगलें किंवा वाईट त्यांचा ह्यांशीं विशेष संबंध असतो. परिणामीं जें अहितावह होईल, तें राजकीय दृष्टया असत्य होय. ज्याचा परिणाम हितावह होईल, तेंच सत्य होय. उदाहरणार्थ, सरकार व प्रजा ह्यांच्यामधील तंट्यांत सत्य एकाद्या प्रसंगीं सरकारपक्षाकडे असूं शकेल. पण त्या सत्याच्या आग्रहानें सर्व राष्ट्रास शासन करण्याची कल्पना मूर्खपणाची होय. अमेरिकन वादांत बर्कनें जी दिशा घेतली होती, ती ह्याच तत्वावर होती. अमेरिकेवर कर बसविण्याचा अधिकार इंग्लिश पार्लमेंटला आहे किंवा नाहीं ह्या निरर्थक चर्चेपेक्षां तसें त्या प्रसंगीं करणें सोईचें व श्रेयस्कर आहे किंवा काय, ह्याची चिकित्सा करावयास पाहिजे असें बर्कचें म्हणणें होतें. ब्रिस्टल येथील भाषणांत त्यानें म्हटलें आहे, कीं, व्यक्तींच्या कृत्यांना अपराध म्हणतां येईल, पण लोकसमुदायाच्या कृत्यांना ती संज्ञा लावणें शक्य नाहीं. दुसऱ्या एका प्रसंगींहि त्यानें असेच उद्गार काढले आहेत, “सर्वांस सोडून देणें किंवा सर्वांस शिक्षा देणें मला पसंत नाहीं. कारण एकंदर लोकसमूहाला अपराधी म्हणून कधींहि गणतां कामा नये. प्रसंगोपात्त त्यांच्यावर कमजास्त नजर ठेवावी लागेल; परंतु त्यांस कधींहि शिक्षा देतां यावयाची नाहीं. राजनीतीचीं जीं कांहीं थोडीशीं प्रधान व न बदलणारीं तत्वें आहेत, त्यांपैकीं हें एक आहे. ”

बऱ्याच लोकसमुदायाला दंग्याच्या वगैरे निमित्तानें शिक्षा करण्याचा प्रसंग आला असतां, कोणत्या धोरणानें शिक्षा करावी ह्यासंबंधीं बर्कचीं मतें येथें दिलीं असतां अप्रासंगिक होणार नाहीं. तो म्हणतो "शिक्षा अशा रीतीनें दिली पाहिजे कीं, तिच्या योगानें आरोपी अधिक न चेतावतां नम्र होईल. विकारवश होऊन किंवा लहर लागेल तशी शिक्षा सरकार देत नाहीं, असा समज लोकांचा झाला असतां, त्यामुळें सरकारचा दाब जेवढा लोकांवर बसतो, तेवढा दुसऱ्या कशानेंहि बसत नाहीं. मुख्य अपराधी असतील तेवढेच निवडून काढून एकाच वेळीं पण निरनिराळ्या ठिकाणीं त्यांस फांशीं द्यावें; कारण सर्वच अपराध्यास सरसकट शिक्षा दिली असतां, तसले गुन्हे करण्याविषयीं आतुर असलेल्या इतर लोकांचीं मनें नम्र न होतां उलट अधिकच कठोर होतात आणि म्हणून लोकांना भीति वाटून तसले गुन्हे त्यांनीं करूं नयेत हा जो शिक्षेचा मुख्य उद्देश तो अशा सरसकट शिक्षांनीं सफल होत नाहीं. आपल्या जीवाची इतर लोक फार किंमत समजतात, असें जेव्हां मनुष्यें पाहतात, तेव्हां त्यांच्या मनांतहि ह्या ईश्वराच्या देणगीविषयीं पूज्यभाव उत्पन्न होतो. स्वतः-वर अनुकंपा राखणें, अथवा स्वतःच्या आयुष्याबद्दल परवा करणें, हें इतर गोष्टींप्रमाणेंच शिकावें लागतें. मला वाटतें जेथें शिक्षा अतिशय कडक असून त्या पुष्कळ लोकांना भोगाव्या लागल्या आहेत, तेथें दंगे विशेष होतात व तेहि लोक जीवावर उदार होऊन करतात असें आढळेल. शिवाय ह्या बाबतींत जरा जास्त कठोरता झाली, तर विशेष कोमल अंतःकरणाच्या लोकांचीं मनें दयार्द्र होऊन त्यांच्या मनांत सरकाराविषयीं तिरस्कार व अप्रीति उत्पन्न होतात. शिक्षांची मालिका सुरू झाल्यानें मनुष्यांमधील न्यायबुद्धि त्रस्त व उद्विग्न होते. कारण कायद्याच्या सौम्य अंमलबजावणीपेक्षां कत्तलच चालत आहे, असें त्यांस वाटूं लागतें. ह्याप्रमाणें कायद्यांविषयीं दुष्टांच्या अंतःकरणांतून भीति व सन्मार्ग-गामी माणसांच्या अंतःकरणांतून आदरबुद्धि हीं एकदमच नाहींशीं होतात.

मागें सांगितल्याप्रमाणें चांगले कायदे करूनच सरकारचें कर्तव्य पुरें होतें असें नाहीं. प्रजेस ज्या गोष्टीची विशेष अपेक्षा असते, ती गोष्ट म्हणजे सरकारची ममता होय. बर्कनें आपल्या एका खासगी पत्रांत म्हटलें आहे कीं,

राज्यकर्त्यांच्या मनांत जेव्हां आपल्या प्रजेविषयीं प्रेम नसतें, तेव्हां कितीहि उत्कृष्ट कायदे असले तरी त्यांच्यायोगानें प्रजेला क्वचितच सुख होतें. राज्य-कारभारांत प्रजावात्सल्य फारच महत्वाचें आहे असें बर्क समजत असे. सर हरक्यूलिस ह्यास लिहिलेल्या एका पत्रांत तो म्हणतोः—"आयरिश लोकांना कमजास्त अधिकार देण्यांत कांहीं विशेष नाहीं. त्या लोकांविषयीं वैमनस्य व वृथा भीति बाळगणें, याच गोष्टी त्यांचें मनांत विशेष रीतीनें जाचत असतात." बर्कचें हें वाक्य सर्व राज्यकर्त्यांनीं विशेषतः परकीयांनीं मनन करण्यासारखें आहे. तारायंत्रें, आगगाड्या, कालवे इत्यादि सुखवर्धनाच्या साधनांनींच केवळ प्रजाजन राज्यकर्त्यांवर अनुरक्त होत नाहींत, तर प्रजेचें मन निष्कारण दुखावलें जाणार नाहीं अशाविषयीं अंतःकरणपूर्वक दक्ष असणारे, प्रजेला सुखांत त्याच-प्रमाणें दुःखांतहि वांटेकरी होणारे व स्वजातीय आणि परजातीय पण आपलेच प्रजाजन ह्यांत भिन्नभाव न मानणारे राज्यकर्ते असतील, तरच प्रजेचें निष्क-पट प्रेम राजपुरुषांवर बसेल. मग कृत्रिम प्रेम उत्पन्न करणाऱ्या कायद्यांची आवश्यकता रहाणार नाहीं. एवढ्याकरितांच उत्कृष्ट कायद्यापेक्षांसुद्धां राज्य-कर्त्यांच्या प्रेमयुक्त आचरणाची योग्यता बर्कनें विशेष मानली आहे. प्रजेला अराजनिष्ठ म्हणून तिच्याशीं नेहमीं तसें वर्तन ठेविलें असतां, ती अराजनिष्ठ नसतांनाहि तशी होण्याचा मात्र विशेष संभव असतो. वर उल्लेख केलेल्या पत्रां-तच पुढें बर्कनें म्हटलें आहे कीं, दरोडेखोराप्रमाणें जर आपण प्रजेला वागविलें, तर पुढेंमागें ती दरोडेखोरच होईल. यावरून उघड होतें कीं, प्रजाजनांच्या चांगल्यावाईट वर्तनाचें कारण राज्यकर्तेच असतात.

व्यक्तीप्रमाणें राज्यकर्त्यांच्या मनांत प्रजेविषयीं द्वेषबुद्धि असणें अगदींच अश्लाघ्य आहे. राजाला दिलेल्या मानपत्रांत बर्कनें म्हटलें आहेः—" जे दुस-ऱ्यांवर राज्य करण्याचा हक्क सांगतात, त्यांनीं लोकांना निरर्थक न चिथविणें व शांतता झाल्यावरहि त्यांच्या मनांत पुष्कळ दिवस डांचत असतील अशीं कृत्यें न करणें, हें त्यांचें पहिलें कर्तव्य होय." राज्य व राज्यकर्ते हीं प्रजेकरितां आहेत, हें लक्षांत ठेवून प्रजेच्या मागण्या राज्यकर्त्यांनीं मान्य करणें जरूर आहे. दूरदर्शी व शहाण्या आणि अविवेकी व पोचट राज्यकर्त्यांत भेद हाच कीं,

जें प्रजेला दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं तें केव्हां आणि कसें द्यावें हें पहिल्या प्रकारच्या राज्यकर्त्यांना चांगलें समजतें. अमेरिकेच्या वादांत ह्याच तत्वावर बर्कनें अमेरिकन लोकांच्या तर्फे खटपट चालविली होती. ब्रिस्टल येथील निवडणुकीच्या प्रसंगीं त्यानें आपल्या मतदार लोकांस सांगितलें.—“ कधींहि न ढळणारें असें माझें कायमचें मत हें आहे कीं, ग्रेटब्रिटननें जें कांहीं द्यावयाचें तें प्रथम नाकबूल केलेल्या व पश्चात् कोर्टमार्फत शाबीत झालेल्या देण्याप्रमाणें न देतां उदारबुद्धीनें व दयार्द्र अंतःकरणानें द्यावें. निदान तुमच्या देण्यांत दयार्द्रता जरी दिसली नाहीं, तथापि शहाणपणानें व दूरदृष्टीनें तरी तें दिलेलें असावें; तुमचा नाइलाज करून तुमच्यापासून तुमच्या रक्तासह तें हिसकावून घेतलें असें दिसतां कामा नये; हें मत मी कधींहि सोडलें नाहीं. जेव्हां लोकमताला सरकार मान देतें, तेव्हां बराच अधिकारहि लोक सहन करतात व त्याविषयीं कोणी चिकित्सा करीत नाहीं. परंतु लोकमताविरुद्ध जेथें प्रत्येक गोष्ट केली जाते, तेथें लोक कांहींच कबूल करीत नाहींत. अशा रीतीनें प्रजेची इच्छा वेळोवेळीं तृप्त केल्यावर, प्रजा अराजनिष्ठ होण्याची मुळींच धास्ती नको. आणि प्रजा जर अराजनिष्ठ झाली तर त्याचा दोष बहुधा राज्यकर्त्यांकडेच असतो, असें मानण्यास हरकत नाहीं. असें असल्यामुळें, लोकांना तक्रार करण्यास आणखी कारण होईल असें कृत्य करून अराजनिष्ठता मोडून टाकण्याचा प्रयत्न करणें अगदीं असमंजसपणाचें होय. ” असाच अभिप्राय सर हरक्यूलिस यास लिहिलेल्या पत्रांतहि बर्कनें दिला आहे. “ जुलूम होत नसतांहि कांहीं लोकांची बंड करण्याकडे कदाचित् प्रवृत्ति होईल; परंतु अस्वस्थता उत्पन्न करण्याचा जेव्हां लोकांचा कल असतो, तेव्हां लोकांस जास्तच दुःख व जुलूम होईल असें कृत्य करणें, हा शांतता करण्याचा उत्तम उपाय होय असें कोणीहि मनुष्य म्हणणार नाहीं असें मला वाटतें. ”

एकंदरींत वर सांगितल्याप्रमाणें बर्कच्या सर्व राजनीतीचा मुख्य पाया प्रजेच्या कल्याणाकरितां राज्यव्यवस्था अस्तित्वांत आली आहे ह्या तत्वावर रचलेला आहे. ह्या कारणाकरतांच प्रत्येक राजकीय बाबतींत लोकमताला तो फार मान देत असे. मागें उल्लेख केलेल्या मानपत्रांत तो म्हणतो— “ महाराज, शहाण्या

व दयालु राज्यकर्त्यांनीं सगळया लोकांची इच्छा कधींहि तुच्छ मानतां कामा नये. मग सार्वभौम प्रभु म्हणून तात्विकदृष्ट्या त्यांचे कांहींहि हक्क व अधिकार असोत. सर्व सत्तेचें दृढ व एकच स्थान लोकांचें मन, प्रेम व संतोष ह्यांत आहे. हें आम्हीं इतक्या लहानपणापासून शिकलों आहों व त्यावर आमचा इतके दिवस विश्वास बसला आहे कीं, कांहीं लोकांच्या कल्पनासृष्टींतील तात्विक विचारांच्या जोरावर अथवा विशिष्ट राज्यकारस्थान साधण्याकरितां, आम्हीं आपलीं मतें बदलणार नाहीं. मोठमोठ्या लोकसमुदायाच्या किंवा तदंतर्गत सर्व जातींच्या मनोवृत्तींची परवा न करणें, हें न्यायास व शहाणपणास अनुसरून नाहीं." असें जरी होतें, तरी सर्वच कामांत लोकमत पूज्य मानलें पाहिजे असें त्यानें कधीं म्हटलें नाहीं. लोकमत कसें समजून घ्यावें हें त्याच्या खालील उताऱ्यावरून स्पष्ट समजेल. "मला वाटतें वास्तविक जुलूम होत आहे कीं नाहीं, हें समजण्यास योग्य लोक म्हटले म्हणजे जे अत्यंत दरिद्री, अशिक्षित व अज्ञ असतील तेच होत. कारण दुःख हें प्रत्यक्ष भासमान होतें; व तें अशा लोकांना बऱ्याच अंशानें सहन करावें लागत असल्यामुळें, व त्यांना भावी दुःखाची आधींच कल्पना होत नसल्यानें, खरोखर जुलूम होत आहे कीं नाहीं, हें त्यांच्याकडूनच समजतें; परंतु दुःखाचें वास्तविक कारण व त्याचा प्रतीकार करण्यास योग्य उपाय ह्यांबद्दल मात्र त्यांचा सल्ला घेणें चांगलें नाहीं. राज्यकारभारांत अशा लोकांना अगदी बंदी असली पाहिजे. कारण त्यांची विचारशक्ति दुर्बळ असते व एकदा क्षुब्ध झाल्यावर ते आवरेनासे होतात. त्याचप्रमाणें कोणत्याहि गोष्टींची त्यांस माहिती नसते; इत्यादि." आणखी तो म्हणतो "खरोखर, सरकारच्या अन्यायी राज्यकारभाराबद्दल लोकांच्या कल्पना चुकीच्या असतात असें जसें क्वचितच घडतें, त्याचप्रमाणें त्यांच्या कारणांविषयीं त्यांची कल्पना क्वचितच बरोबर ठरते."

ह्याप्रमाणें, 'लोकरंजनमेवात्र राज्ञां धर्मः सनातनः' असें राजकर्तव्य असतां तें योग्य रीतीनें बजावणारे राज्यकर्ते विरळा. ते आपली अनियंत्रित सत्ता एकसारखी वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करीत असतात. जुलमाच्या प्रकारांत बदल होतो; पण अजिबात जुलूम कधींच नाहींसा होत नाहीं. उघड जुलूम करण्याचें

विद्यमानकालीं बरेंच नाहींसें झालें आहे. तथापि रूपांतरानें तो अद्यापि चालू आहेच. बर्क म्हणतोः—"ही अन्याय करण्याची पद्धति अर्थात् कालस्थितिमानानें बदलावी लागेल. कारण महत्वाकांक्षेचा उद्देश जरी सर्व काळीं एकच असतो, तरी सर्व प्रसंगीं तींच साधनें अनुकूल नसतात. प्राचीन जुलमाच्या साहित्याच्या आतां चिंध्या चिंध्या उडाल्या आहेत. शिवाय पूर्वज ज्या जाळ्यांत सांपडले, त्याच जाळ्यांत आपणांसहि पाडून घेण्याइतके अजागळ व अडाणी मुत्सद्दी हल्लीं थोडेच असतात. अन्यायानें कर बसवावयाचा असेल, तर तो खचित 'शिपमनी' ह्या रूपानें आतां बसविला जाणार नाहीं. ह्या युगांत जंगलचे कायदे सर्वत्र लागू करून जुलूम करण्याचें मुत्सद्यांस आवडणार नाहीं. मनुष्यमात्राच्या अन्तर्व्यवहारांत व्यत्यय आणणारें एकाद्या कारभाऱ्याचें जुलमी वर्तन जर आपण ऐकिलें तर तें पतिसहित विलास करणाऱ्या स्त्रीपासून २०० कोंबडीं घेणें हें निःसंशय नसेल. कारण प्रत्येक युगाच्या रीतिभाती निरनिराळ्या असतात व त्यांवरच राज्यकारस्थानें उभारावयाचीं असतात." राज्यकर्त्यांचा हा स्वभाव बर्कला पूर्णपणें माहित होता. म्हणूनच त्यानें ब्रिस्टल एथील निवडणुकीपूर्वी केलेल्या भाषणांत म्हटलें आहे "गृहस्थहो आपली स्थितिच अशी आहे कीं, आपलें कल्याण करून घेण्यास आपणांस मोठी किंमत द्यावी लागते."

मनुष्यप्राणी महत्वाकांक्षी असल्यामुळें आपली सत्ता वाढविण्याची त्याची सदोदित धडपड चाललेली असते. करितां राष्ट्रचालकांकडून सत्तेचा दुरुपयोग होऊं नये म्हणून प्रजाजनांना नेहमीं दक्ष असलें पाहिजे. तथापि आपल्या राजपुरुषांच्या तर्फे सर्व राष्ट्राला जेव्हां परराष्ट्रावर अंमल चालविण्याचा प्रसंग येतो तेव्हां त्या सर्व राष्ट्राची तीच स्थिति होते. सर्व जगाच्या इतिहासांत ह्या नियमाच्या सत्यते-विषयीं इंग्लंडचेंच उदाहरण फार महत्वाचें आहे. इंग्लिश लोकांनीं महाप्रयासानें प्रजाजन ह्या नात्यानें राजपक्षाकडून आपले हक्क शाबीत करून घेतले आहेत. असें असूनहि, आयर्लंड, अमेरिका व हिंदुस्थान ह्या परदेशांशीं इंग्लिश लोकांचें वर्तन सर्वथैव श्लाघ्य होतें असें म्हणतां येणार नाहीं. नीतिशास्त्राच्या कडक नियमांप्रमाणें अन्याय करणें निंद्यच ठरतें. तथापि व्यावहारिकदृष्ट्या-देखील तें अन्यायकर्त्यास फार घातक आहे, हें बर्कनें आपल्या देशबंधूंस अनेक

प्रसंगीं कळविलें आहे. मागें उल्लेख केलेल्या राजास दिलेल्या मानपत्रांत तो म्हणतो—"इंग्लिश पार्लमेंटास जर खऱ्या स्वातंत्र्योपभोगांत ठेवावयाचें असेल-तर वसाहतींना स्वतंत्रता दिली पाहिजे. फौजेच्या हातांत राज्यकारभार सोंपव-ल्यावर स्वतंत्रेतला क्षय लागतो ! अमेरिकेंत फौजेचा अंमल चालू असल्या-मुळें तिजोरीची स्थिति फारच भयास्पद होईल. पण ही गोष्ट विशेष महत्वाची नाहीं असें मानिलें तरी खुद्द आपली स्वतंत्रता नष्ट होण्याचें तें निःसंशय जबरदस्त साधन होणार आहे. इंग्लिश लोकांच्या प्रातिनिधिक संस्थांचा अवमान कर-ण्यास शिकवलेले, लोकांपासून त्यांच्या संमतीवांचून लादलेला कर वसूल कर-ण्यास ठेवलेले, पूज्य असलेली राज्यव्यवस्था व प्राचीन संस्था ह्यांचा कायद्याची बिलकुल अपेक्षा न ठेवतां उच्छेद करण्यांत साहाय्यभूत झालेले व इंग्लिश राष्ट्राच्या नोकरींत असून कोणत्याहि न्यायाधीशाचा अंमल ज्यांच्यावर चालत नाहीं असे सेनानायक वसाहतींत असतात. अर्थात् अमेरिकेंत असतां ज्या संस्थांची अवहेलना करण्यास व तुच्छ मानण्यास त्यांस शिकविलें होतें, त्याच इंग्लंडमधील संस्थांपुढें समुद्र ओलांडतांच आज्ञाधारकत्वानें ते मान वांकवतील व त्या संस्थांबद्दल त्यांच्या मनांत पूज्यभाव व प्रेम उत्पन्न होईल, हें केवळ अशक्य आहे. आपल्या ताब्यांतील सर्व फौजेला क्रमाक्रमानें हेंच शिक्षण मिळ-णार व ह्याच सवयी जडणार. असा प्रकार घडणार नाहीं, अशी जर आपण आपली समजूत करून घेतली, तर आपण अगदींच मूर्ख माणसें ठरूं, व त्या परिणामाविषयीं जर आपण बेफिकीर राहिलों, तर आपल्या मूर्खपणाला पारावारच उरणार नाहीं. महाराज, आपण आपल्या स्वातंत्र्यास जर मुकतों आहों तर अमेरिकेचें अथवा अवघ्या जगाचें देखील राज्य आपणांस काय होय !"

या उताऱ्यांत दिसून येणारें व्यावहारिक चातुर्य, इंग्लिश मुत्सद्यांत सामा-न्यतः आढळून येत नाहीं, ही फार दुःखाची गोष्ट आहे. बर्कचा वरील उपदेश ध्यानांत ठेवणें आजमितीसहि इंग्लिश लोकांस अगत्याचें आहे. हिंदुस्थान-सारख्या महाविस्तृत देशाशीं इंग्लंडचा संबंध जडला आहे व तो कित्येक शतकें पुढें असाच राहील. अधिकारी व व्यापारी या नात्यानें हजारों इंग्लिश लोकांचा ह्या देशाशीं निकट संबंध येतो. सत्तावान् ह्या नात्यानें मनसोक्त अधिकार चाल-

विण्याची त्यांस सवय लागते. ह्या अधिकारलालसेनें एतद्देशीयांवर ते जे क्षणैक अंमल गाजवीत आहेत, त्याचा स्वतः इंग्लंडच्या गृहकारस्थानांवर पुढें मागें परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं. आपल्या ताब्यांत असलेल्या देशांच्या हिताविषयीं इंग्लिश लोकांचें शैथिल्य आजकालचें नाहीं. बर्कनें आपल्या देश-बांधवांजवळ इंग्लिश लोकांच्या ह्या बेपरवा स्वभावाविषयीं हेच उद्गार काढले आहेत. आयर्लंडच्या कारभारासंबंधानें लिहिलेल्या पत्रांत तो म्हणतो—"आयर्लंडांतच जर तुम्ही कांहींच खटपट करणार नाहीं, तर मला वाटतें येथें (इंग्लंडांत) कांहींच होणार नाहीं. वरवर किंवा मनापासूनहि येथील अधिकारी तुमच्या भानगडींत पडणार नाहींत. ह्या देशांतील एकंदर लोकसमूहाचा विचार केला, तरी त्याचीदेखील तुमच्या कामांत हात घालण्याची निःसंशय इच्छा नाहीं. तुमचें वाईट करण्याचें त्यांच्या मनांत बिलकुल नाहीं व तुमच्या कारभारासंबंधीं त्यांच्यांत इतकें अज्ञान वसत आहे कीं, त्यांच्या हातून तुमचें हित होणें शक्य नाहीं. तुमच्या देशाच्या राज्यकारभारासंबंधीं त्यांचीं मतें अज्ञानमूलक असल्या-कारणानें अर्धवट आहेत. जी कांहीं अंधुक कल्पना आहे, ती प्राचीन जुलमी 'पोपसत्ते'चा कर्णरंध्रावर असलेला अनुनाद होय. जी भीति बाळगण्याचें कारण नाहीं ती बाळगणाऱ्या आणि निकट असणाऱ्या संकटांकडे दुर्लक्ष करणाऱ्या या बिचाऱ्या लोकांची कींव येते." वरील उताऱ्यावरून असें दिसतें कीं, अधिकारि-वर्गानें चालवलेल्या अन्यायांचें निवारण करण्याचे प्रयत्न इंग्लंडांत यशस्वी न होतां आयर्लंडांतच होतील, असा बर्कचा समज होता.

येथवर राज्यव्यवस्थेंतील एका अंगाबद्दल बर्कचे विचार थोडक्यांत सांगितले. आतां मागें सांगितलेल्या दुसऱ्या अंगाचा म्हणजे ज्यास अयथार्थपणें राज्य-क्रांति म्हणण्याचा प्रघात पडला आहे त्यासंबंधीं त्याच्या विचाराचें दिग्दर्शन करणें जरूर आहे. राजा व प्रजा हा संबंध केव्हां व कसा घडून आला, ह्या बाबतींत निव्वळ कल्पनातरंगाशिवाय निश्चयात्मक सांगणें कठीण आहे. ह्याच विषयावर धर्मराजानें केलेल्या प्रश्नाला भीष्मानें उत्तर दिलें आहे तें असें,

न वै राज्यं न राजासीन्नच दंडो न दांडिकः।
धर्मेणैव प्रजाः सर्वा रक्षन्ति स्म परस्परम् ॥

परंतु ही वर्मास्थिति कोठपर्यंत चालणार ?

परस्परं च खादन्ति समर्था धिगराजकम् ॥

असे लवकरच अराजकाचे दुष्ट परिणाम भासूं लागले व बलवानापासून अश-क्तांचें संरक्षण व्हावें म्हणून राजाची आवश्यकता अर्थातच वाटूं लागली. कारण,

प्रीयतेहि हरन्पापः परवित्तमराजके ।
यदास्योद्धरंत्यन्ये तदा राजानमिच्छति ॥

ह्या भीष्मोक्तीप्रमाणें द्रव्यसंपादनाच्या इच्छेनें लोकांनीं राज्यनिर्बंधनें पतकरून घेतलीं. राजा व प्रजा हा संबंध करारानेंच उत्पन्न झालेला असावा असें मान-ण्याकडे अर्वाचीन तत्ववेत्त्यांचा कल आहे. बर्कला ह्याविषयीं कोणतेंहि कायमचें मत पसंत नव्हतें, ह्याचा मागें उल्लेख केलाच आहे. प्रजेच्या हक्कांना अनुकूल असल्यामुळें अर्वाचीन सुधारलेल्या राज्यपद्धतींचें धोरण ह्याच तत्वाला प्रायः अनुसरून असतें. तरी प्रथम संबंध करारोद्भूत होताच, ह्याबद्दल खात्रीलायक पुरावा नाहीं. प्राचीन ग्रीस देशांतील राज्यपद्धति हल्लींच्या अर्थानें प्रजासत्ताक म्हणतां येणार नाहीं. कारण ती गुलामगिरीच्या तत्वावर रचली गेली होती. प्रथमारंभीं राज्यपद्धति कोणत्या रीतीनें अस्तित्वांत आली, हें जरी निश्चयपूर्वक सांगतां आलें नाहीं, तरी हल्लीं जेता व जित ह्या संबंधावर रचलेली कोणतीहि राज्यपद्धति वाळूवर उभारलेल्या घराप्रमाणें अशाश्वत होय, ह्यांत संशय नाहीं; म्हणून अलीकडे राजा व प्रजा ह्यांच्यांमधील कोणत्याहि गोष्टीचा विचार कर्तव्य असला, तर तो करारोद्भूत राज्यव्यवस्थेच्या धोरणानेंच केला जातो. त्यामुळें जुलमी राजास पदच्युत करण्याचाहि हक्क प्रजेस प्राप्त झाला आहे. ह्यासंबंधानें बर्कनें म्हटलें आहेः—"अधिकारानें मदांध होऊन राज्यकर्त्यांच्या मनांत आपल्या प्रजेविषयीं वैमनस्य आलें असतांहि, प्रजेनें राज्यक्रांति करूं नये असें प्रतिपादन करणारा राज्यपद्धतीवर लिहिणारा कोणताहि ग्रंथकार मला माहीत नाहीं. आणि एका लोकांनीं दुसऱ्या लोकांचें वर्चस्व, त्यांची पहिल्यावर ममता व उपकार असल्याशिवाय, आपखुषीनें कां पतकरावें ह्याचें कांहींच कारण देतां येणार नाहीं." आतां राजा आणि प्रजा ह्यांच्यामध्यें बेबनाव उत्पन्न होऊन सर्व प्रजा कधींकधीं बंड करण्यासहि प्रवृत्त होते. अशा वेळेस राजपक्षाकडेच बहुधा

दोष येतो ह्या बर्कच्या म्हणण्याचा मागें उल्लेख केलाच आहे. त्यासंबंधानें ब्रिस्टल येथील शेरीफांस लिहिलेल्या पत्रांत तो म्हणतोः—"आतां किंवा कोणत्याहि वेळीं सर्व लोक बंड करण्यास प्रवृत्त होतात ते कोणी त्यांस तसें करण्यास उत्तेजन देतात म्हणून नव्हे; तर प्रत्येक प्रसंगीं राज्यकर्तेच लोकांची खजाळी काढून त्यांस बंड करण्यास भाग पडतात." मागें निर्दिष्ट केलेल्या राजाच्या मानपत्रांत अमेरिकन लोकांविषयीं बोलत असतां त्यानें राजासहि स्पष्टपणें तसेंच कळविलें आहे "आपण आपल्या भाषणांत राज्यांत माजलेल्या बंडाळीबद्दल दुःख प्रदर्शित केलें आहे; व आम्हांलाहि त्याविषयीं फार वाईट वाटतें. परंतु आमची पूर्ण खात्री आहे कीं, आजपर्यंत जेथें जेथें बंडें झालीं, त्या सर्व ठिकाणीं व सर्व प्रसंगीं त्या बंडांचें जें नेहमींचें व स्वाभाविक कारण होतें, तेंच ह्या प्रसंगीं व ह्या ठिकाणीं ह्या लोकांच्या बंडाचें आहे. तें कोणतें म्हणाल तर सरकारचें गैरवर्तन—चुकीच्या मसलती करून त्या दुराग्रहानें न सोडणें व शहाणपणाशिवाय चालविणें—हें होय."

इंग्लंडमधील बर्क आदिकरून कांहीं थोड्याशा लोकांनीं अमेरिकन लोकांची बाजू घेतल्यामुळें ते बंडाळी करण्यास उद्युक्त झाले असा आरोप ह्या मंडळींवर होता. त्यावर बर्कनें दिलेलें उत्तर ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. "आपल्या कारस्थानानें व बुद्धीच्या जोरावर अमेरिकन लोकांनीं सत्ता झुगारून देऊन धामधूम मांडली आहे, तसें करण्यास त्यास प्रवृत्त करतां यावें इतकें सामर्थ्य कोणत्याहि थोड्याशा मंडळींत असेल असें आमच्यानें मानवत नाहीं. तसेंच जबरदस्त कारण असल्याशिवाय कांहीं मंडळींच्या चिथावणीनें सर्व खंड-भर तेरा प्रांतांत पसरलेले, धर्म रीतिरिवाज व राज्यपद्धति ह्यांपैकीं बऱ्याच बाबतींत परस्परांपासून भिन्न व विरुद्धहि असलेले लाखों लोक उद्योगधंदा बंद ठेवून घट सोसण्यास व शांततासुख झुगारून देण्यास आपण होऊन तयार होतील व आपला पक्ष दुर्बल असतांहि दुसऱ्या पक्षाकडून मोठ्या निकरानें व त्वेषानें चालविलेल्या युद्धाचीं सर्व संकटें पतकरण्यास उद्युक्त होतील अशी कल्पना आमच्यानें करवत नाहीं. महाराज, आम्हांला तर वाटतें कीं साधारण संसारसुखांत विष कालवण्याइतकें, समाजघटना विग-

लित करण्याइतकें, प्राचीन व पूज्य राज्यपद्धतीला मनुष्यप्राणी सर्वदा देत असलेला मान घालवून तत्स्थलीं भीति व द्वेष उत्पन्न करण्याइतकें भयंकर व ज्याचे परिणाम सर्वांस भोगावे लागत आहेत असें विशिष्ट दुःख असल्यावांचून हें होणें शक्य नाहीं." वरील उतारा अमेरिकन लोकांना उद्देशून आहे. ह्या लोकांना इतकें कोणतें दुःख कंठावें लागत होतें, हें बर्कच्याच शब्दांनीं सांगणें म्हणजे 'सर्व लोकांच्या मालमत्तेची त्यांच्या संमतीशिवाय व्यवस्था लावण्याचा केलेला प्रयत्न ' होय.

दुसऱ्यास आपल्या कह्यांत ठेवण्याची इच्छा मनुष्यमात्रांत निसर्गतःच असते; त्यांत विशेषेंकरून इंग्लिश लोक तर महत्वाकांक्षी फार. ह्या महत्वाकांक्षेमुळेंच त्यांनीं आज एवढें अवाढव्य राज्य संपादन केलें आहे. बर्कला इंग्लिश लोकांचें वैभव पाहून फार कौतुक वाटलें. परंतु त्याबरोबरच थोडीशी भीतिहि त्याच्या मनांत उत्पन्न झाली. महत्वाकांक्षा झाली तरी तिला मर्यादा पाहिजेच उत्कर्षातिशयच स्वतःच्या नाशास वारंवार कारणीभूत होतो हें नेहमीं ध्यानांत ठेवलें पाहिजे. याविषयीं बर्कचे खालील उद्गार भविष्यवाद्याचे नाहींत, असें कोण म्हणेल ? " आपल्या स्वतःच्या महत्वाकांक्षेबद्दल वेळींच सावधगिरी ठेवणें गैर होणार नाहीं. मला स्पष्ट सांगितलें पाहिजे कीं, आपल्या स्वतःच्या सामर्थ्याची आणि महत्वाकांक्षेची मला धास्ती वाटते. इतर राष्ट्रें आपल्याला थरकांप भितात ह्याचीच मला धास्ती वाटते. आपण मनुष्यप्राणी नव्हे आणि मनुष्यप्राण्याप्रमाणें कोणत्या ना कोणत्या तरी रूपानें आत्मोत्कर्ष करून घेण्याची इच्छा करणार नाहीं असें म्हणणें हास्यास्पद आहे. पण दुसऱ्यांनीं मत्सर करण्याइतकें आपलें प्रस्थ आज वाढलें नाहीं, असें आपल्याच्यानें म्हणवेल काय ? जगांतील सर्व व्यापार आजच आपल्या हस्तगत झाला आहे; हिंदुस्थानांतील आपलें राज्य म्हणजे प्रचंड प्रकरण आहे; व्यापारांत आपलें वर्चस्व राहील इतकेंच नव्हे, तर दुसऱ्या देशांचा व्यापार आपल्याच मर्जीवर अवलंबून राहील, अशी जर आपली स्पृहणीय स्थिति आली, तर ह्या विलक्षण व आजपर्यंत कोणी कधीं न ऐकलेल्या सत्तेचा दुरुपयोग आपण करणार नाहीं, असें कदाचित् आपले आपण म्हणूं. पण आपण तिचा दुरुपयोग करूं, असेंच दुसऱ्या प्रत्येक राष्ट्राला वाटेल.

केव्हां ना केव्हां तरी अशा प्रकारच्या स्थितीमुळें, दुसरीं सर्व राष्ट्रें एकवट होऊन आपला नाश करतील ह्यांत संशय नाहीं." यूरोपच्या आजच्या राज्य-कारस्थानांची ज्याला वरवरहि माहिती आहे, त्याच्याहि ध्यानांत बर्कच्या वरील विधानांची सत्यता ताबडतोब येईल.

ह्याप्रमाणें बर्कच्या राजकीय मतांचा थोडक्यांत निर्देश केला आहे. त्यावरून तो किती उदार व चतुर मुत्सद्दी होता हें सहज समजेल.

# भाग ११ वा

## वक्तृत्व

नामांकित वक्त्याचीं मुख्य लक्षणें अशीं मानलीं आहेत कीं, प्रथम त्याचें नैतिक आचरण शुद्ध व निष्कलंक पाहिजे; ज्ञानसंग्रह सर्वव्यापी असून अशा अमर्यादित ज्ञानसंचयाला उज्वलित व सुशोभित करण्यासारखी त्याची बुद्धिमत्ता हवी; भाषाप्रवाह इच्छेनुरूप चालण्यासारखा असून, आवाज परचित्ताकर्षक असावा; त्याची कल्पनाशक्ति व युक्तिवाद करण्याचें सामर्थ्य हीं जबरदस्त असली पाहिजेत आणि प्रसंगावधान तर कधींच सुटतां कामा नये. त्याचप्रमाणें ह्या वर निर्दिष्ट केलेल्या गुणांचा एकसमयावच्छेदेंकरून किंवा त्यांपैकीं प्रसंगानुसार वाटेल त्याचा हवा तसा उपयोग करण्याचें सामर्थ्यहि वक्त्यांत अबाधित असलें पाहिजे. ग्रीक तत्ववेत्त्यांचा हा कस घेऊन परीक्षण केलें असतां, सर्व इंग्रजी वक्त्यांत बर्कशिवाय दुसरा कोणीहि ह्या कसास उतरणार नाहीं. बर्कच्या अंगच्या ह्या गुणसमुच्चयापैकीं एकेक जरी कोणांत आढळला तरी तो त्यास वाक्पटुमालिकेंत गुंफण्यास पुरेसा आहे, असें जें कित्येकांनीं म्हटलें आहे तें अगदी खरें आहे. पिट आणि फॉक्स ह्यांच्या अंगीं प्रखर युक्तिवाद हा मोठा गुण होता. शेरिडन ह्याच्या ठिकाणीं विनोद, धिम्मेपणा व प्रसंगावधान हे गुण आढळतात. लॉर्ड चॅथॅम ह्याची जोरदार व आवेशयुक्त वाणीबद्दल ख्याति असे; परंतु बर्कमध्यें सर्व गुण जसे एकवटलेले दिसतात तसे त्यांच्यांत दिसत नाहींत. बर्कचे ते स्वतंत्र विचार, प्रगल्भ भाषा, विलक्षण शब्दयोजना, किंवा वक्तृत्त्वाचें जणूं काय जीवन अशी प्रत्येक विषयाविषयीं सज्ञानता, हे गुण त्या प्रसिद्ध वक्त्यांत नव्हते. ह्या-वरून असें दिसतें कीं, बर्क हा वक्ताच जन्मला होता व पुढें ह्या निसर्गप्राप्त गुणांचा त्याच्या परिश्रमानें विकास झाला. तत्कालीन वक्त्यांपेक्षां बर्कमध्यें विशेष हा होता कीं, तो फक्त वक्ता नसून, उत्तम लेखकहि होता. अर्वाचीन

काळींहि असे थोडेच लोक सांपडतील कीं, ज्यांनीं ह्या दोन्ही मार्गांत सारखेंच प्रावीण्य संपादन केलें आहे. त्यावेळीं तरी निदान खरें वक्तृत्व संपादन करण्याचा एकच व अचूक मार्ग जो ग्रंथलेखन त्याचें दक्षतेनें अवलम्बन करणारा एकटा बर्कच होता. बर्कच्या पूर्वी लॉर्ड चॅथॅम व बॉलिंग्ब्रोक ह्या सुप्रसिद्ध वक्त्यांनीं ह्याच श्रेयस्कर पद्धतीचा अंगीकार केला होता; तथापि बर्कच्या समकालीन वक्त्यांपैकीं बहुतेकांचें वाक्पटुत्व सामान्य आणि कमी त्रासदायक उपायानें म्हणजे प्रसंग येईल तो वायां जाऊं न देतां व फटफजितीची पर्वा न करतां बोलण्याची सवय करून प्राप्त झालें होतें. अशा रीतीनें वाटेल तेवढें, निर्भीडपणें सहज बोलतां येईल; परंतु तेणेंकरून खरें वक्तृत्व संपादण्याचें स्वप्नींहि मनांत आणावयास नको. ब्रूअमसारख्या विद्वानांचा असा अभिप्राय आहे कीं, मनुष्य जितकें जास्त लिहील तितकें त्यांस चांगलें बोलतां येईल.

त्याचप्रमाणें पार्लमेंटमध्यें पुढच्या पिढीस बर्कनें निराळें वळण लावलें. बोलण्याची भाषा निराळी आणि लिहिण्याची भाषा निराळी असा आजपर्यंत सर्वांचा समज होता. पण अशा दोन निरनिराळ्या भाषापद्धति पाडण्याचे प्रयत्न त्यास कधींहि सम्मत नव्हते. पूर्वींच्या वक्त्यांप्रमाणें सामान्य पण ग्राम्य म्हणींचा तो आपल्या भाषणांत फारसा उपयोग करीत नसे म्हणून तीं नेहमीं भारदस्त असत. बर्कच्या ग्रंथांत व भाषणांत मुख्य कसब दिसून येतें तें हें कीं, तो आपल्या विषयाचें विवेचन फारच व्यापक तऱ्हेनें करतो. म्हणजे ज्या ज्या बाजूनें म्हणून विषयाचें पुष्टीकरण करतां येईल, तें केल्याशिवाय तो कधींहि रहात नाहीं. ह्याच गुणाला उद्देशून गोल्डस्मिथनें बर्कविषयीं असें म्हटलें आहे कीं, तो आपल्या विषयांत सर्पासारखा वेटाळ्या मारतो. अर्थात् विचारशक्ति चोख असल्याकारणानें त्यास आपल्या विषयास निरनिराळें स्वरूप, पण आपणास फायदेशीर होईल अशारीतीनें देतां येत असे. बर्कच्या भाषणांमध्यें अतिशय नांवाजलेलें भाषण म्हणजे मागें सांगितलेलें 'अमेरिकन लोकांबरोबर सख्य' हें होय. ह्या भाषणांत विषयाची पद्धतवार मांडणी करण्याचा बर्कचा अलौकिक गुण दिसून येतो.

हॅझलिट म्हणतोः–“त्याचे (बर्कचे) शब्द वस्तूंप्रमाणें असतात. त्याची शब्द-योजना विषयाला अगदी साजेशी असते. निरनिराळ्या वाक्यरचना त्याच्या कृतींत दृष्टीस पडतात. साधे शब्द व वर्णन ह्यांच्याचबरोबर प्रगल्भ शब्द व गंभीर वर्णन केलेलें आढळतें” हें अगदीं खरें आहे. त्याचप्रमाणें बर्कचें भाषण किंवा लेखनवैविध्यहि फार विलक्षण आहे. ज्या लेखणींतून हैदर-अल्लीच्या कर्नाटकावरील स्वारीचें कल्पनासौंदर्यानें उद्दीप्त वर्णन निघालें, त्यांतूनच कर्णावर मुक्ताफलाप्रमाणें एकेक वाक्य जेथें पडतें आहे, असें तें साधें पण प्रगल्भ आणि अनलंकृत असें “राजास पाठविलेलें मानपत्र” निघावें, हें फारच आश्चर्यकारक आहे. वॉरन हेस्टिंग्जच्या चौकशीच्या प्रसंगीं अलंकारिक भाषणाच्या अत्युच्च भरारींत विहार करणें, देवीसिंगाच्या भयोत्पादक हकीक-तीचें वर्णन करणें किंवा फ्रान्सच्या मेरीचें, ऐकणारांच्या मनोवृत्ती उचंबळून जातील असें सुंदर चित्र काढणें, ह्या गोष्टी जशा त्यास सहज करतां येत असत तसेंच शांतपणें शोध करणें, परिपक्व विचार आणि कायदेज्ञानांत प्रवीणता ह्यांची ज्यांत आवश्यकता आहे अशा प्रकारचें लॉर्ड लोकांचे कागदपत्र पाहून त्यावर रिपोर्ट करण्याचें कामहि त्यास सहज करतां येत असे. राजास पाठविलेलें मानपत्र व अमेरिकन लोकांस लिहिलेले विज्ञप्तिलेख हे अलंकारिक भाषणाचा उपयोग बिलकुल न करितां अगदी साध्या व प्रगल्भ शब्दांनीं श्रोत्यांच्या मनावर इष्ट परिणाम ज्याच्या योगानें होतो, अशा फारच कठीण वक्तृत्वाचीं उदा-हरणें आहेत. त्यांतील एक उतारा खालीं देतो. “महाराज, जर आम्ही आपल्या स्वातंत्र्यास मुकलों, तर आम्हांस, अमेरिकेचें किंवा साऱ्या जगाचें आधिपत्य काय होय ?”

अलंकारशास्त्राचा असा एक सर्वमान्य नियम आहे कीं, ऐकणाराच्या मना-वर तावडतोब परिणाम झालाच पाहिजे, अशी जोरदार भाषा वापरण्याच्या हेतूनें जेव्हां शब्दयोजना करावयाची असेल, तेव्हां नुसते सामान्य सिद्धांत सांगणें अगदी टाळलें पाहिजे. बर्कला हा गुण चांगला साधला होता. ह्याचें प्रत्यंतर खालील दोन उताऱ्यांवरून दिसून येईल. राज्यविस्तार अमर्यादित झाला असतां अत्यंत दूरच्या लोकांवर यथेच्छ अधिकार निर्विघ्नपणें चालवितां

येत नाहीं. हें राजतत्व बर्क आणि लॉर्ड ब्रूअम ह्या दोघांस सारखेंच सांगावयाचें होतें. पण दोघांनीं तें निरनिराळ्या मार्गानें सांगितलें आहे.

### बर्क

मोठ्या शरीरांत जीवनाभिस्रवण दूर भागीं मंद पडतें असा सृष्टिक्रमच आहे. टर्कीच्या सुलतानाला जसा थ्रेसवर अंमल बजावतां येईल तसा इजिप्त, अरेबिया आणि कुर्दिस्थान ह्यांवर बजावतां येणार नाहीं. खुद्द अनियंत्रित, राज्यव्यवस्थेंतहि देवाणघेवाण केल्याशिवाय चालत नाहीं.अशा ठिकाणीं सुलतानाला मिळेल तितक्या आज्ञाधारकत्वावर निर्वाह करावा लागतो. अजिबात हातांतून सत्ता जाऊं नये, एवढ्याकरितां राज्याची लगाम तो ढिली सोडतो.

### ब्रूअम

असें म्हणतात कीं, पूर्वेकडील सर्व एकसत्तात्मक राज्यांत, मुख्य राजधानीपासून जसजसे प्रांत दूर असतील, तसतसे तेथील रहिवाशांस जास्त जास्त हक्क प्राप्त होतात, राजसत्ता अधिक अधिक दुर्बल होत जाते आणि राज्यकारभाराची व्यवस्था निःसत्व होत जाऊन तिचा सहज ऱ्हास होतो.

अशीं दुसरीं पुष्कळ उदाहरणें देतां येतील. खरें वक्तृत्व म्हणजे काय हें जर कोणाला समजून घेण्याची इच्छा असेल, तर त्याचें समाधान बर्कच्या भाषणावांचून अन्यत्र होणार नाहीं. कारण बर्कशीं तुलना करण्यासारखा प्राचीन व अर्वाचीन काळीं कोणी वक्ता नाहीं, असा विद्वान लोकांचा अभिप्राय आहे. टलीअससिसरो आणि बर्क ह्यांमध्यें साम्य आहे काय? म्हणून जॉनसनला प्रश्न केला असतां, त्यानें उत्तर दिलें कीं, "नाहीं, एडमंड बर्कशींच त्याचें साम्य आहे." एवढा जरी बर्क मोठा वक्ता होता, तरी प्राचीन ग्रीक वक्त्यांप्रमाणें त्याचें लक्ष्य अंगभूत साधनांकडे फारसें नसे. त्याच्या भाषणावरून असें दिसतें कीं, खुद्द विषयाचें महत्व त्यास फार असे, आणि म्हणूनच नुसत्या मोहक अलंकारिक भाषेला भुलून त्यानें मुख्य विषयाची हानि कधींहि होऊं दिली नाहीं.

ह्यामुळें त्याच्या भाषणांना चिरस्थायित्व प्राप्त झालें आहे. बर्कचीं भाषणें केवळ भाषासौंदर्याकरितांच प्रसिद्ध नाहींत. स्वतंत्र विचार, नवीन कल्पना, विषयाचा ऊहापोह करितांना त्याच्या नानाविध अंगांचें विवेचन, व्यक्तिविषयक उदाहरणांवरून सर्वमान्य व्यापकसिद्धांत, व्यावहारिक दररोजच्या आचारविचारांना दिलेलें शास्त्रीय स्वरूप इत्यादि गोष्टी इतरत्र एकाच ग्रंथकर्त्यांत मिळणें कठीण. ह्या विलक्षण बुद्धीच्या मनुष्याचें एखादें खासगी पत्र घ्या; त्यांतहि वाचकांस कांहींतरी नवीन शिकण्यास सांपडल्याशिवाय राहणार नाहीं. असो; येथवर बर्कचे गुणनिवेदन झालें. आतां सदोषत्व हा जो मनुष्याचा नैसर्गिक गुण किंबहुना मनुष्यत्वाचें मुख्य लक्षण, त्याचा निर्देश करून हा वक्तृत्वाचा भाग आटपूं.

बर्क हा आयरिश होता. तेव्हां त्याच्या देशबंधूंप्रमाणें त्याचेहि उच्चार चांगले नव्हते. ह्यामुळें त्याच्या भाषणांना कमीपणा येई असें त्याच्या मित्रांना वाटे. त्याचप्रमाणें कठोर आवाज घाईघाईचा शब्दोच्चार आणि भलताच आविर्भाव ह्यांचीहि वरील दोषांत वारंवार भर पडे.

बर्कचे विचार गहन व भाषा प्रौढ व अलंकारप्रचुर असल्यामुळें सामान्य बुद्धीच्या लोकांस त्याचें भाषण तत्काल समजत नसे. कित्येक वेळां बर्क बोलावयास उभा राहिला म्हणजे लोक भराभर उठून जात व वक्त्यास बहुतेक आपलें सर्व वाक्चातुर्य रिकाम्या बाकांपुढेंच प्रकट करावें लागे. यामुळेंच बर्कच्या भाषणास 'जेवणाची घाट' (डिनर बेल) म्हणूं लागले. परंतु बर्कच्या भाषणास रंग भरला व तो आवेशानें बोलूं लागला, म्हणजे रिकाम्या झालेल्या सर्व जागा भरून जात. त्याचा जो चार चार पांच पांच तास एकसारखा अमृतवर्षाव चाले, तो घटघटा पिण्यासाठीं दूर दूर गेलेले सभासद धांवत येऊन पटापट आपल्या जागा पटकावीत. अशामुळें रिकामें झालेलें सभागृह माणसांनीं भरून जाई आणि एकाद्या मोहनीनें भरून गेल्याप्रमाणें दिसे.

---

# भाग १२ वा

## स्वभाववर्णन

येथवर लिहिलेल्या समग्र हकीकतीकरून प्रस्तुत चरित्रनायकाच्या अंगीं कोणते विशेष गुण होते, हें वाचकांच्या लक्षांत येऊन चुकलें असेल. परंतु वर्कची वास्तविक योग्यता समजण्याकरितां त्याच्या नानाविध गुणांचा येथें स्पष्ट उल्लेख करून व चरित्रांत नमूद न केलेल्या पुष्कळ नवीन गोष्टी देऊन चरित्रनायकाविषयीं इत्थंभूत माहिती मिळण्याविषयींची वाचकांची स्वाभाविक जिज्ञासा ह्या भागांत तृप्त करण्याचा इरादा आहे.

एखाद्या व्यक्तीचा स्वभावनिर्णय त्यानें केलेल्या एकदोन कृत्यांवरून करणें फारच धोक्याचें आहे. खरें स्वभावपरीक्षण ज्याप्रमाणें मनुष्याच्या खासगी वर्तनावरून करतां येतें, तसें लौकिक वर्तनावरून करतां येत नाहीं. त्याच-प्रमाणें पूर्वायुष्यांतल्या किंवा उत्तरायुष्यांतल्या गोष्टींचाच फक्त विचार केल्यानें स्वभावाचें यथार्थ ज्ञान होणें शक्य नाहीं. तें तसें होण्यास अल्प वयांतल्या आणि तरूण व भरभराटीच्या दिवसांतल्या तसेंच अखेरच्या दिवसांतल्या कृत्यांचा सारखाच विचार करणें जरूर आहे. परमेश्वराच्या अगम्य शक्तीमुळें अन्तर्गत स्वभावाचें प्रतिबिंब बाह्यशरीराकारावर पडत असल्याकारणानें मनुष्याचें शरीरवर्णनसुद्धां त्याच्या स्वभावाचें पूर्ण ज्ञान होण्यास साधनीभूत आहे. स्वरूपा-वरून स्वभावपरीक्षण करण्याची कला व्यवहारांत फारच उपयोगी आहे. आप-ल्यास नेहमीं शेकडों माणसांशीं व्यवहार करण्याचा प्रसंग येतो; अशावेळीं चाणाक्ष मनुष्यास बाह्य स्वरूपावरूनच स्वभावाचा अदमास करावा लागतो. ह्यावरून चरित्रांत क्षुद्रतर भासणाऱ्या गोष्टींपासूनसुद्धां व्यापक सिद्धांत काढून वाचणारास फायदा करून घेतां येईल हें उघड आहे. परंतु इतकें लांब न गेलें तरी देखील ज्या चरित्रनायकाचे गुणानुवाद आपण वाचतों व त्यामुळें जो आपणांस प्रिय होतो, त्याचा शरीराकार कसा होता हें समजण्याची आपणांस साहजिक इच्छा होते.

बर्कचा बांधा सरळ व उंच म्हणजे जवळ जवळ सहा फूट होता. त्याचे सर्व अवयव नीटनेटके होते; परंतु लहानपणापासून कांहीं ना कांहीं तरी दुखणेंबाणें असल्यामुळें त्याच्या शरीरांत राठपणा मुळींच नव्हता. त्याचें शरीर स्थूल नव्हतें; त्यामुळें एकंदर चेहरा बराच मोहक दिसे. दृष्टीमध्यें मात्र एक व्यंग होतें. तें हें कीं, त्यास फार दूरचें दिसत नसे, त्यामुळें तो डोळ्यांस चष्मा लावी. तो पोक्त व साधा असल्यानें पोषाकाकडे त्याचें विशेष लक्ष नसे. घट्ट तपकिरी रंगाचा कोट व कधीं कधीं एक त्यावर लांबलचक झगा तो घालीत असे. खोटेच्या टांचेपर्यंत लांब झगे वापरण्याची प्राचीन पद्धति हल्लीं बहुतेक नाहींशी झाली आहे. बर्कच्या वेळीं ही तऱ्हा सर्वथैव लुप्त झालेली नसल्यामुळें वृद्ध व जुन्या पिढीचे लोक झगे वापरणारे बरेच असत.

भगवद्गीतेंत मनुष्याचे तीन वर्ग केले आहेत. ह्या वर्गीकरणाला त्याची सात्विक, राजस व तामस वृत्ति कारणीभूत आहे. ह्या वर्गीकरणाप्रमाणें बर्कला सात्विक मनुष्यांत गणलें पाहिजे. कारण, त्याचें वर्तन नेहमीं सौम्य व सरळ असे. त्याच्या ठिकाणीं दांभिकपणा किंवा डौल ह्यांचें वारेंहि नव्हतें. जेव्हां लहानथोर मंडळी त्याच्या घरीं जमे, तेव्हां तो स्वतः लहान मंडळींचा समाचार घेऊन विचारपूस करीत असे. एके दिवशीं तो बीकन्सफील्ड येथें असतां त्याला भेट-ण्याकरितां एक तरुण गृहस्थ आला. त्याला रीतीप्रमाणें चाकरानें नम्रतापूर्वक सलाम केला; पण त्या तरुण गृहस्थास चाकराच्या सलामाला प्रतिसलाम कर-ण्याची आवश्यकता भासली नाहीं. हें पाहून बर्कनें त्यास एकीकडे नेलें व सांगितलें:-"आपण ज्यांना आपल्यापेक्षां कमी योग्यतेचे समजतों, त्यांनीं साधारण सभ्याचारांत आपल्यावर सरशी करावी असें होऊं देऊं नये." हा बर्कचा साधा स्वभाव मरेपर्यंत कायम होता. वृद्धापकाळीं लहान मुलांबरोबर खेळतांना तो वारंवार दृष्टीस पडे. त्याचप्रमाणें तो गांवांतील गरीब शेतकऱ्यांत मिसळे व त्यांस मधूनमधून अन्नदानहि करी. त्याच्या इतर देशबंधूंप्रमाणें आसवपानाचा बर्कला फार नाद नव्हता. तो कडक दारू बहुधा पीतच नसे, व अखेरीस तर पिववेल तितकें कढत पाणी पिण्याचा त्यानें नियम ठेविला होता.

आपल्या देशांत एतद्देशीय थोर गृहस्थांचीं चरित्रें लिहितांना चरित्रनायकाच्या संभाषणांचा उल्लेख करून त्यांच्या संभाषणशक्तीचें वर्णन करण्याचा अद्यापि संप्रदाय पडला नाहीं. याचें मुख्य कारण असें आहे कीं, चरित्रनायकाशीं ज्यांचा प्रत्यक्ष संबंध आहे, अन्योन्यसंभाषणाचे प्रसंग ज्यांच्यामध्यें पुष्कळ आले आहेत व जे त्यांचें हृद्गत पूर्ण ओळखून आहेत, अशा मनुष्यांनीं त्यांचीं चरित्रें लिहिण्याचीं उदाहरणें क्वचितच सांपडतील. शिवाय संभाषणचातुर्य दिसून येण्याचे प्रसंग देशांत समाज (क्लब) स्थापन झाल्याशिवाय येत नाहींत. आमच्या देशांमध्यें अशा समाजांची तर फारच उणीव. इंग्लंडमध्यें मात्र आतां उत्तम म्हणून गणलेल्या चरित्रनायकाच्या संभाषणशक्तीचें वर्णन करण्याचा सर्वसाधारण प्रघात पडला आहे. ह्या अलौकिक गुणाची किंमत तरी इंग्लिश लोकांना जॉनसनच्या चरित्रापासून समजली. जॉनसनच्या नामांकित चरित्रकारानें आपल्या अद्वितीय चरित्राचा सर्व पाया ह्या खासगी संभाषणावर उभारला आहे. जॉनसनचें संभाषणकौशल्य इतकें अप्रतिम होतें कीं, दुसऱ्या कोणाचीहि त्या गुणांत तुलना करणें झाल्यास ती त्या प्रसिद्ध नीतिवेत्त्याशींच करण्याचा संप्रदाय पडला आहे. जॉनसनच्या व बर्कच्या स्वभावांत जितकें अंतर, तितकेंच त्यांच्या संभाषणांतहि दिसून येतें. जॉनसनचें संभाषण मर्मभेदक, दुसऱ्यास झोंबेल असें असे. पण बर्कचें सौम्य असून कोणत्याहि मनुष्याचें अन्तःकरण त्यामुळें विनाकारण दुखवलें जाणार नाहीं अशाविषयीं तो जपत असे. प्रतिपक्ष्याला हरएक तऱ्हेनें निरुत्तर करण्याची हौस जॉनसनला फार. परंतु बर्कचा प्रकार तसा नव्हता. जॉनसननेंच म्हटलें आहे, 'केवळ बोलण्याच्या हौसेनें तो बोलत नसे'. तर कोणत्याहि विषयाचें त्यास इतकें पूर्ण ज्ञान असे कीं, विषय निघाला असतां तत्संबंधीं बोलल्याशिवाय त्याच्यानें राहवत नसे. त्यामुळें त्याचें संभाषण बहुधा गंभीर व तात्विक होऊन त्यांत विनोदयुक्त असें कांहीं नसल्याकारणानें सामान्य श्रोतृवर्गास तें कधीं कधीं रुक्ष भासत असे.

**खाजगी व नैतिक आचरण.**

बर्कचें नैतिक आचरण इतकें शुद्ध होतें कीं, त्याच्या कट्टया द्वेष्टयांसहि तद्विरुद्ध व काढण्यास जागा नव्हती. त्याच्या व्यसनपराङ्मुखतेबद्दल मागेंच उल्लेख आला आहे. खरें म्हटलें तर अशा कामीं कालक्षेप करण्यास त्यास क्षणभरहि फुरसत नव्हती. निरुद्योगी बसण्यास मला वेळच नाहीं, असें तो म्हणत असे. पार्लमेंटमधील कामाचा बोजा त्याच्या शिरावर अतिशय पडत असल्यामुळें आप्त-मित्रांच्या पत्रांस उत्तरें लिहिण्यासुद्धां त्यास सवड सांपडत नसे. जेवतांना किंवा पोषाक करितांना तो तोंडीं मजकूर सांगे, व त्याप्रमाणें कोणीतरी आलेल्या पत्रांचीं उत्तरें लिहीत असत. महत्वाच्या पत्रांचीं उत्तरें मात्र तो स्वतः लिही. जेव्हां बीकन्सफील्ड येथें आपल्या जमीनजुमल्यावर तो असे तेव्हां सकाळची वेळ प्रायः तो शेतावर घालवी. कृषिकर्माची त्यास फार अवड असे व त्यानें लिहिलेल्या पत्रांवरून अस्सल शेतकऱ्याप्रमाणें त्यास तत्संबंधीं बरेंच ज्ञान होतें असें दिसतें. लंडनमध्यें असतांना त्याची सकाळची वेळ लिहिण्यावाचण्यांत जाई आणि संध्याकाळीं पार्लमेंट नसेल तेव्हां जॉनसनादि विद्वद्रत्नांनीं स्थापिलेल्या सुप्रसिद्ध 'लिटररी क्लब' नामक समाजांत विद्यादेवीच्या एकनिष्ठ सेवकांबरोबर ज्ञानमय विश्रांति घेण्यांत जात असे. ज्ञानमय विश्रांति म्हणण्याचा हेतु इतकाच कीं, ह्या नामांकित समाजांत, तांबूलसेवन, धूम्रपान इत्यादि विलासांतच केवळ मंडळी चूर होत नसून, त्याबरोबर सर्व जगांतील विद्वत्श्रेष्ठांसहि आपल्या ज्ञानसंचयांत भर घालतां येईल अशा नानाविध विषयांचा ऊहापोह तेथें होत असे. अशा सभासदांच्या ज्ञानसमुच्चयाचा अफाट विस्तार व त्याची दुर्गमता पाहून बॉसवेलसारख्या ज्ञानातुर मनुष्यास अचंबा व कौतुक वाटावें ह्यांत नवल नाहीं.

घरांतील सर्व माणसांवर बर्कचें फार प्रेम असून, दूरदूरच्या नातेवाईकांचेंहि मन तो ओढीत असे. त्याच्या औदार्याचीं बरींच उदाहरणें मागें दिलीं आहेत; त्यावरून त्याच्या कोमल व दयार्द्र अन्तःकरणाची कल्पना करतां येईल. खरोखर दया करण्यास पात्र असतील अशांची त्यानें कधींहि हेळसांड केली नाहीं. अशा सत्कार्यीं तर त्याचा ऐपतीच्या बाहेर खर्च होत असे. इतकेंहि असून

त्याच्या ठिकाणीं विनय फार होता. एकदां त्याचा मित्र रेनॉल्डस ह्यानें त्याची तसबीर काढली व त्याखालीं बर्कच्या गुणसमुच्चयाचें प्रतिबिंब ज्यांत सांपडेल असा एक मिल्टनच्या काव्यांतील उतारा दिला. बर्कला हें कळतांच त्यानें ती तसबीर मागून घेऊन नष्ट केली आणि अन्यत्र कोठेंहि तिची प्रत आढळल्यास तिचीहि तो तशीच वाट लावी.

**त्वेष.** खाजगी व्यवहारांत बर्कचा स्वभाव जरी शांत व थिम्मा असे तरी राजकीय गोष्टींत वारंवार ह्या नैसर्गिक शान्ततेचा भंग होऊन त्यास त्वेष चढे, एकदां का एखाद्या गोष्टीच्या योग्यपणाविषयीं त्याची पूर्ण खात्री झाली म्हणजे मग ती घडवून आणण्याविषयीं तो इतका झटे कीं, तें करण्यांत त्वेष व संताप वगैरे मनोविकारांनीं त्याचें मन अगदी अस्वस्थ होऊन जाई. परंतु ह्याबद्दल बर्कला दोष देण्याची जरूर नाहीं. कारण, जाज्वल्य कर्तृत्वशक्तीचें मूळ शांत मनोविकारांत सांपडणें असंभवनीय आहे. इतिहासांत अशीं पुष्कळ उदाहरणें सांपडतील कीं, असामान्य मानसिक शक्ति असूनहि जें करण्यास लोक धजत नाहींत, तें अशा विलक्षण शक्तीबरोबर ज्यांचे मनोविकार व भावनाहि विलक्षण जबरदस्त आहेत, असे लोक सहज करूं शकतात. ल्यूथर, कॉलविन किंवा नॉक्स ह्यांनीं केलेली कामगिरी शांतवृत्ति मेलँक्थॉन ह्याच्या हातून कधींहि बजाविली गेली नसती. हे १६ व्या शतकांत यूरोपांत झालेल्या धर्मसुधारणेचे अग्रणी होते. ल्यूथर व मेलँक्थॉन हे सहकारी असून जर्मन होते. कॉलविन हा फ्रेंच होता व नॉक्स स्कॉटिश होता. स्वतः बर्कचेंच उदाहरण घेऊं. अमेरिकेच्या लढाईच्या प्रसंगीं विविध बुद्धिसामर्थ्यामुळें व विशेषेंकरून होत असलेला अन्याय सहन न झाल्यामुळें, जागृत झालेल्या सत्वशालि पण तीव्र मनोविकारांच्या योगानें त्यानें ज्याप्रमाणें सर्व देश हालवून सोडला, त्याप्रमाणें पिट किंवा फॉक्स ह्यांस करतां आलें नाहीं. त्याचप्रमाणें हेंहि निर्विवाद आहे कीं, कांहीं काल तरी निदान वॉरन हेस्टिंग्जच्या चौकशीकडे सर्व देशांतील स्त्रीपुरुषांचें जें लक्ष वेधून गेलें तें बर्कशिवाय कधींहि गेलें नसतें. फ्रान्सच्या राज्यक्रांतीच्या प्रश्नासंबंधानें नुसत्या इंग्लंडमध्येंच नव्हे तर साऱ्या यूरोप खंडांत त्यानें एकदां जी मतक्रांति केली, तोहि परिणाम ह्या जबरदस्त मनो-

विकारांचाच आहे. सारांश, मनानें घेतलेली गोष्ट घडवून आणण्यास केवळ बुद्धि-वैभव दुर्बल होय. अभिमान व आवेश असल्याशिवाय नुसता ज्ञानसंचय कर्तृत्वहीन होतो. अशाप्रकारचा आवेश किंवा अभिमान ह्यांचें उत्पत्तिस्थान, ज्यांत देशाविषयीं निरपेक्ष प्रेम व निःसीम आस्था वसत असेल तेंच अंतःकरण होय. जीवापेक्षांहि प्रिय असलेल्या देशाची हानि होत चाललेली पाहून, खऱ्या देशहितरत पुरुषांच्या अंतःकरणाचा जळजळाट झाल्याशिवाय कधींहि रहात नाहीं. आणि बर्क हा तर कट्टा देशाभिमानी, त्याची अन्यायासहिष्णुता फार तीव्र; त्याप्रमाणें देशांत चांगल्या गोष्टींचा प्रसार करण्याची त्याला पराकाष्ठेची इच्छा. त्यामुळें तो कधीं कधीं असल्या कामीं फार उतावीळ व संतापलेलाहि दिसे.

सारांश, उत्कटभावना हा दिसण्यांत जरी दोषसा भासतो, तरी त्यापासून देशहित होत असल्यामुळें तो इष्टच आहे. परंतु अशा मनोविकारवान मनुष्यांविषयीं अपरिचित लोकांचा नेहमीं गैरसमज होण्याचा संभव असतो. गर्विष्ठ, दुराग्रही, हेकेखोर, अहंपिशाचग्रस्त वगैरे जुन्यानव्या दुःशब्दांचा भडिमार मनुष्यस्वभावाचें पृथक्करण करण्याची सवय नसलेल्या असमंजस लोकांकडून त्याच्यावर होत असतो. बर्कविषयीं पार्लमेंटमधल्या तरुण मंडळींचा असाच समज झाला होता. इतकेंच नव्हे, तर ह्या अपरिपक्व बुद्धीच्या सभासदांस असेंहि वाटत असे कीं, ज्या विषयावर इतक्या कळकळीनें व त्वेषानें बर्क बोलत असे त्यांत त्याचा कांहींतरी स्वार्थ असला पाहिजे. ह्यामुळें बर्कच्या भाषणांचा ऐकणारांवर जसा परिणाम व्हावा तसा कधीं कधीं होत नसे. त्याचप्रमाणें, त्याच्या उज्वलित भाषणांचा स्वाभाविक परिणाम होण्यास दुसरा प्रत्यवाय असा येई कीं, ते विचार परिपक्व विचारांचेंच फल नसून क्षणैक मनोविकारांस वश होऊन उतावळीनें निघाले आहेत, असें विरुद्ध पक्षास म्हणण्यास सवड सांपडे. पण वास्तविक स्थिति ह्याच्या उलट होती. पूर्ण विचारांतीं अमुक गोष्ट चांगली असें ठरलें म्हणजे, ती घडवून आणण्याच्या उपायांत मात्र व त्या गोष्टीचा चांगुलपणा इतरांस समजत नाहीं म्हणून तो चेतावत असे. कांहींहि असो, हा दोष बर्कला स्वतः समजला होता हें त्यानें फॉक्सला पाठविलेल्या पत्रावरून व ‘ हाऊस ऑफ कॉमन्स ’ मध्यें काढलेल्या उद्गारांवरून उघड होतें.

बर्कचें खासगी वर्तन जरी सौम्य व विनययुक्त असे, तरी राष्ट्रीय महत्वाच्या विषयांत त्यानें कधींहि निःसत्व पुळपुळीतपणा दाखवला नाहीं. सत्याविषयीं अभिमान व असत्य किंवा अन्याय याविषयीं तितकाच तिटकारा

**सत्याभिमान.** हे त्याच्या अंगचे गुण लहानपणापासून प्रशंसनीय होते, हें मागें सांगितलचें आहे. फ्रान्सच्या राज्यक्रांतीच्या वेळेस त्या देशाविषयीं त्याच्या मनांत इतका तिटकारा उत्पन्न झाला होता कीं, तो त्या देशांतून आलेल्या वस्तूंचा स्पर्शदोषहि आपणास होऊं देत नसे. ह्याचकरितां त्यानें नंतर फ्रेंच मद्य पिण्याचें बंद केलें. बर्कच्या मरणसमयाच्यापूर्वी कांहीं वेळ फॉक्सनें त्याच्या पत्नीस पत्र पाठवून त्याच्या प्रकृतीविषयीं विचारपूस केली व त्यांतच भेटण्याची इच्छाहि प्रदर्शित केली होती. त्यावेळेस त्याच्या सांगण्यावरून मिसेस बर्कनें जें उत्तर पाठविलें, त्यावरून ह्या आसन्नमरण तत्ववेत्त्याची अचल स्वमत-भक्ति पाहून आनंद वाटल्याशिवाय राहत नाहीं. ती लिहिते—"बर्क साहेबांस मी आपलें पत्र कळविलें आणि त्यांच्याच सांगण्यावरून आपणांस कळवितें कीं, पुष्कळ वर्षांचा स्नेहसंबंध तोडून टाकतांना खडतर कर्तव्य बजावण्यांत बर्क-साहेबांस मनापासून दुःख होत आहे. परंतु हा स्नेहत्याग अवश्य आहे असें त्यांना वाटतें. तीं त्यांचीं मतें अद्यापि कायम आहेत आणि जो कांहीं आयुष्याचा अल्पभाग अवशिष्ट राहिला आहे, त्यांतहि स्वतःकरितां नव्हे, तर दुसऱ्याकरितां जगलें पाहिजे असा त्यांचा समज आहे. बर्कसाहेबांची अशी पक्की खात्री आहे कीं, ज्या मतांचा प्रसार करण्याकरितां त्यांनीं यत्न केला, तीं मतें देशाच्या उन्नतीस व कल्याणास अवश्य आहेत. त्या मतांवर त्यांची स्वतःची पूर्ण श्रद्धा आहे, असा लोकांचा जेव्हां समज होईल, तेव्हांच त्यांचा सर्वत्र अंगीकार होईल." बर्कला आपल्या मतांचा योग्य अभिमान होता, त्याचें कारण त्याच्या निर्दोषपणाविषयीं त्यास मुळींच शंका नव्हती. 'कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी' असे भवभूतीनें कांहींसे निराशेचे पण स्वनैपुण्यद्योतक उद्गार जसे काढले, तसेच बर्कनेंहि काढले आहेत. तो म्हणतो—'मी भ्रमिष्ट होऊन कांहींतरी बरळतों, असें कित्येक लोकांस वाटतें; पण आणखी वीस वर्षांनीं जगाची खात्री होईल कीं, मी भ्रमिष्ट नसून मला भ्रमिष्ट म्हणणारांचाच बुद्धिभ्रंश झाला आहे.'

येथवर सांगितलेल्या गोष्टींवरून बर्केच्या स्वभावाचें दिग्दर्शन तरी वाचकांस झालें असेल; परंतु मनुष्याचा सुस्वभाव ओळखण्याची आणखी एक खूण आहे. एकाद्या पर्वताच्या उच्चतम शिखरावर आरूढ होऊन आसमंतात् दृष्टि फेंकली असतां फारच रम्य देखावा दृष्टिगोचर होतो. तृणाच्छादित भूमिभाग गुळगुळीत गालीच्यांनींच वेष्टिला आहे कीं काय असा भास होतो, किंवा वसंत ऋतूंतहि अभिदग्ध क्षेत्ररेषा पाहून चित्तास आल्हाद होतो; पण तेच कां खालीं येऊन पूर्वीच्या चित्ताकर्षक भूमिपृष्ठावरून प्रत्यक्ष जाऊं लागलों, म्हणजे काय अनुभव येतो ? मोहक स्वरूपाचा आतां अगदीं नायनाट होऊन कंटाळवाणें व दुःखदायक स्वरूप दृष्टीसमोर उभें रहातें, खडेकांटे पायांस रुतूं लागतात आणि अमंगल वस्तुदर्शनानें मन उद्विग्न होतें. असाच प्रकार मनुष्याचा आहे. वारंवार असें घडतें कीं, दुरूनच्या लोकाध्वर्यूंस आपण वाखाणीत असतों. त्यांचा निकट संबंध व दृढ परिचय झाला, तर त्यांजविषयींची पूज्यबुद्धि शिथिल झाल्याशिवाय राहत नाहीं. त्याचें कारण इतकेंच कीं, परिचयवृद्धीबरोबर त्यांच्या अंगीं असलेल्या दोषसमुच्चयाचें उग्र स्वरूप आपल्यास समजूं लागतें. ह्यामुळें सार्वजनिक कामांत ज्यांच्याशीं संबंध येतो अशांपेक्षां स्नेहादि कारणांवरून ज्यांच्याशीं नित्य संबंध असतो, अशांनीं जर आपला प्रेमभाव प्रकट केला, तर चरित्रनायकाच्या सुस्वभावाची दुसरी साक्ष काय पाहिजे ? जॉनसन हा खरा सज्जन होय असें आपण म्हणतों त्याचें कारण हेंच आहे. बॉसवेलनें आपल्या चरित्रनायकाच्या अंतर्बाह्य यच्चयावत् गोष्टी आपणांस कळविल्या असतांहि त्या थोर पुरुषाविषयीं आपला आदर यत्किंचितहि कमी होत नाहीं, तर उलटा वृद्धिंगत होतो. दुर्दैवानें बर्कचें चरित्र लिहिण्यास कोणी बॉसवेल मिळाला नाहीं. व पुढेंहि कोणाचें चरित्र अशा धर्तीवर लिहिलें जाईल असें सांगतां येत नाहीं. प्रिन्स बिस्मार्क या लोकोत्तर पुरुषास असा एक बॉसवेल मिळाल्याचें अनुभवास आलें आहे. डॉ० बुशचें बिस्मार्कचरित्र खचित चिरस्थायी होईल. बर्कविषयीं ज्यांनीं प्रशंसापर शब्द काढले आहेत त्यांपैकीं बहुतेकांचा निकट व अत्यंत ऋणानुबंध होता. त्यांचें असें म्हणणें आहे कीं, बर्कबरोबर जसजसा परिचय वाढत जाई

तसतशी त्याच्याविषयीं पूज्यबुद्धिहि वाढतच जात असे. एका वेळीं एक गृहस्थ बर्कसारख्या चांगल्या व थोर मनुष्याच्या पदरीं राहिल्याबद्दल त्याच्या वृद्ध चाकराचें अभिनंदन करीत होता; तेव्हां तो विश्वासू चाकर म्हणाला 'होय, ते मोठे मनुष्य आहेत. क्षुद्र किंवा नीच जें कांहीं असेल त्याशिवाय सर्व त्यांस ठाऊक आहे व तेंच ते करतात.' ह्याप्रमाणें चाकरमाणसेंसुद्धां बर्कवर अगदी खूष असत.

ह्याप्रमाणें इंग्लंडच्या एका तत्ववेत्त्याचें संक्षिप्त चरित्र आहे.

[ समाप्त ]

# बर्कचें चरित्र

## परिशिष्ट [कांहीं भाषणें]

## अर्काटच्या नबाबाचें कर्ज

टॉमस रंबोल्ड यानें हेन्री डंडसवर पार्लमेंटपुढें केलेल्या आरोपाच्या चौकशीच्या प्रसंगींचें बर्कचें भाषण फार महत्वाचें असून त्या वेळचे कंपनीचे हिंदुस्थानांतील नोकर कंपनीला धाब्यावर बसवून कसा स्वैर व्यवहार करीत असत याचें त्यांत चांगलें आविष्करण झालें आहे तें भाषण असें. " महाराज! आपण रहात आहों हा काळ असामान्य गोष्टींमुळें विशेष स्मरणीय झाला आहे. नानाविध विलक्षण मनुष्यांशीं व असंख्य चमत्कारिक कृत्यांशीं जरी आपण परिचित असलों, तरी आजच्यापेक्षां विशेष विस्मयकारक प्रकार कोणाच्यासुद्धां आठवणींत झाला नसेल असें मला वाटतें. ज्या सन्माननीय गृहस्थांच्या[१] वर्तनाबद्दल प्रस्तुत विचार चालला आहे, त्यांनीं ह्या सभागृहांत त्यांच्या पाठीमागून बोलणाऱ्या पूज्य गृहस्थांवर[२] पूर्वी आरोप आणले होते. त्यांच्यावर विश्वासानें सोंपविलेल्या सरकारी अधिकाराचा अति निंद्य प्रकारचा दुरुपयोग केल्याबद्दल व दुसऱ्या कित्येक गैरशिस्त कृत्यांबद्दल ते आरोप होते. दोन वर्षांच्या आंत ह्या दोघांच्या स्थितींत विपर्यास पडलेला आपल्या दृष्टीस पडतो. विलक्षण क्रांति होऊन हिंदुस्थानांतील त्याच भागाच्या राज्यकारभारासंबंधीं सरकारी कामाचा दुरतिक्रम केल्यावरून पार्लमेंटमध्यें बिल आणून प्रत्यारोप करण्याचा त्या पूज्य गृहस्थांचा इरादा आहे.

---

१ हेनरी डंडस. २ टॉमस रंबोल्ड.

परंतु ह्या दोघा गृहस्थांच्या परस्पर संबंधांत झालेला फरक, एकाच दुर्दैवी स्थितींत असतां त्यांच्या वर्तनांत जो पूर्ण विरोध होता, त्याइतका विस्मयकारक नाहीं. त्या पूज्य गृहस्थांचें आपल्यातर्फे जें म्हणणें होतें, त्याचे गुणावगुण कांहीं असोत; आपल्यावर आलेल्या आरोपाची त्यांनीं टाळाटाळी केली नाहीं. धैर्यानें व पोक्तपणानें त्यांनीं त्याचा खुलासा केला. त्यांच्यावर पूर्वी आरोप आणणारांची हल्लींची भाषा जर त्यांनीं तेव्हां उच्चारली असती, तर त्यांजविषयीं आपण काय म्हटलें असतें ? जेव्हां त्या संमाननीय गृहस्थांनीं आपल्यावरच्या आरोपाचा खुलासा केला, तेव्हां चौकशी करूं नये, कागदपत्र तपासूं नये, व साक्षी पुरावा घेऊं नये, असें ह्या सभेस सांगणें त्यांस बरें दिसलें नाहीं. हिंदुस्थानांतील आपली कामगिरी नाजूक असल्यामुळें तत्संबंधीं कोणत्याहि गोष्टीचा परिस्फोट करणें हें राष्ट्रास अपायकारक आहे, असें त्यावेळीं, कांहींशा रास्त रीतीनें सांगतां येण्याजोगें असूनहि, त्यांनीं आपणांस तसें सांगितलें नाहीं. आपल्या कृत्यांची चौकशी करणारांच्या मनांत राज्याचा उच्छेद करण्याचें आहे असेंहि त्यांनीं आपणांस सांगितलें नाहीं.

पण, महाराज योग्य वाटेल त्या तत्वावर अनुक्रमें फिर्यादी व आरोपी होणाऱ्या ह्या दोन गृहस्थांस तसेंच सोडून, पार्लमेंटच्या कायद्याप्रमाणें ईस्ट-इंडिया कंपनीच्या कांहीं नोकरांच्या सावकारीचें मूळ व यथार्थता ह्यांची चौकशी केल्यावांचून तें त्यांचें खासगी कर्ज वसूल व्हावें, म्हणून तत्प्रीत्यर्थ सरकारी तिजोरी लावून देण्याकरतां कोर्ट ऑफ डायरेक्टर्सनीं केलेली कायदेशीर व्यवस्था बंद पाडण्यांत नियामक मंडळ म्हणून नेमलेले फडनवीस व आरमाराचे खजीनदार ह्यांचें वर्तन कायदेशीर व शहाणपणाचें झालें आहे किंवा काय हें ठरविणें आपलें काम आहे. चौकशी करण्याविषयीं पार्लमेंटच्या कायद्यांत स्पष्ट उल्लेख नाहीं अशी तक्रार नाहीं. विशिष्ट कानूंखालीं ही चौकशी करण्याचें काम तितक्याच स्पष्ट शब्दांनीं मुद्दाम कोर्ट ऑफ डायरेक्टर्सकडे सोंपविलें नव्हतें असेंहि प्रतिपादन केलें जात नाहीं. म्हणून त्या कामांत नियामक मंडळीला हात घालण्याचा बिलकुल हक्क नव्हता, असा माझा समज आहे. कांहीं विशिष्ट गोष्ट करण्याकरितां जेव्हां कांहीं लोकांस नांवानें विशेष अधिकार दिलेला असतो,

तेव्हां दुसऱ्या कोणत्याहि लोकांस मोघम अधिकाराच्या जोरावर त्या गोष्टींत पडून त्यांच्या ऐवजीं तीं विशिष्ट कामें करण्याचा अधिकार पोचत नाहीं. म्हणून ह्या कामांत प्रधानमंडळाची ढवळाढवळ म्हणजे निव्वळ दपटादपटीचा प्रकार आहे अशी माझी समजूत आहे. ज्याच्यायोगानें ह्या संशयात्मक कामगिरींत त्यांनीं आपणांस जेमतेम ओढून घेतलें तो क्लिष्ट अर्थ ज्याला म्हणून माणुसकीची चाड आहे त्या प्रत्येकानें ती कामगिरी टाळतां येण्यासारखा केला असता. तो जरी अगदीं योग्य व कायदेशीर असला तरी कोर्ट ऑफ डायरेक्टर्सकडे जी चौकशी करण्याचें सोंपविलें होतें ती न करण्याचें ठरविण्यांत अगदी गैरशिस्त वर्तन त्यांनीं केलें ह्याबद्दल माझी पूर्ण खात्री झाली आहे. जें काम करण्यास डायरेक्टर्सची मुद्दाम नेमणूक केली होती, तें काम करण्याचा हक्क जर नियामक-मंडळीला कायदेशीर रीतीनें असला तर, आढळलें तसेंच त्यांनीं तें काम पत-करलें पाहिजे. म्हणजे ज्या कानूंनीं कोर्ट ऑफ डायरेक्टर्स बांधले जात होते त्याच कानूंनीं तेहि पण बांधले गेले पाहिजेत. पार्लमेंटच्या कायद्यांत सांगित-लेल्या चौकशीचा मुख्य भाग सोडणें किंवा पद्धति बदलणें डायरेक्टर्सच्या हातां-तलें नव्हतें, हें कोणीहि कबूल करील. जर तो अधिकार त्यांनाहि नव्हता तर नियामक मंडळीला त्याच कायद्यांत कोठून मिळाला? खरोखर त्यांना तो मिळणें अशक्य आहे. ज्या पार्लमेंटच्या कायद्याला करडी चौकशी करविणें अगत्याचें वाटावें, ती चौकशी करण्याच्या पद्धतींत ज्यानें सूक्ष्म नियम घालून ठेवण्याचें विश्वासाचें काम विशिष्ट प्रकारच्या लोकांवर सोंपवावें, आणि त्याबरोबरच दुसऱ्या एका मंडळीस कायदे करणाऱ्या मंडळीनें केलेल्या कलमांत मनास वाटेल तसा हरताळ लावण्याची सवड द्यावी व कायद्याचा हेतु, उद्देश व कार्यभाग सर्वांशीं नाहींसा करण्याची सवलत ठेवावी त्या कायद्याच्या रचनेविषयीं आप-णांस काय वाटलें पाहिजे? खुद्द प्रधानमंडळानें तयार केलेल्या व पार्लमेंटच्या शेवटल्या बैठकीच्या भांबावलेल्या स्थितींत आणलेल्या कायद्याविषयींदेखील अशी कल्पना करतां यावयाची नाहीं.

सूचना करतांना प्रारंभीं आपल्या भाषणांत माझ्या संमाननीय मित्रानें तुम्हांस सांगितलें आहे कीं, सुदैवानें हिंदुस्थानांतील असंख्य भानगडीच्या प्रक-

रणांत ह्या प्रश्न फारसा गुरफटलेला नाहीं. खचित नाहीं. पण जरी तो तसा असला तरी मी तुम्हांस खात्रीनें सांगतों कीं, दुसऱ्या कोणत्याहि कामांतल्या बारीकसारीक गोष्टींपेक्षां हिंदुस्थानांतील बारीकसारीक गोष्टी विशेष कठीण आहेत असें मुळींच नाहीं. मला त्या गोष्टींचा अनुभव आहे म्हणून मी कबूल करतों कीं, हिंदुस्थानच्या अंतर्गत राज्यव्यवस्थेकरितां हिंदुस्थानासंबंधीं सूक्ष्म ज्ञान असणें जरूर आहे. परंतु त्या राज्यकारभारांतील एकाद्या विशिष्ट दोषास्पद कृत्याचा निकाल तुमच्या राज्यांत तसा प्रकार झाला असतां ज्याप्रमाणें तुम्ही केला असतां त्याप्रमाणें तुम्हांला करतां येण्यासारखा आहे. हिंदुस्थानांत उत्पन्न झालेले, ठकबाजी, अन्याय, जुलूम, लाच वगैरे अपराध आणि इंग्लंडांत उत्पन्न झालेले तेच अपराध हे एकाच हाडामांसाचे आहेत. आपल्यापुढें असलेल्या प्रकरणाच्या बाहेर जावयास नको. पक्षकार दावा सांगतात एवढी गोष्ट खेरीजकरून कोणताहि हक्क नसतांना सरकारी तिजोरींतून खासगी खिशांत चार कोटी रुपयांची रक्कम जावी किंवा न जावी ह्याचा निर्णय–मग वेस्टमिन्स्टर येथें करावयाचा असो किंवा मद्रासेस करावयाचा असो–करण्यास तुम्ही अगदी लायक आहां. नियमाच्या संज्ञा निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या असतात. परंतु त्या कधींहि गुप्त नसतात. म्हणून ह्या दोहोंमधील फरक, विषयांच्या कमजास्त कठीण किंवा सोपेपणावर नसून, एका विषयाकडे आपलें लक्ष आणि दुसऱ्याविषयीं अगदी हलगर्जीपणा ह्यावर आहे. निरनिराळ्या विषयांच्या महत्वाच्या मानानें जर लक्ष किंवा दुर्लक्ष केलें असतें तर कुरकुर करण्यास कांहीं कारण नसतें. परंतु वस्तुस्थिति ह्या कल्पनेच्या उलट आहे. हिंदुस्थानांत चाललेल्या दुष्कृत्यांचें स्थल दूर आहे खरें; पण त्यापासून असें अनुमान निघत नाहीं कीं आपल्या नजरेपासून जितकें तें दूर तितकी आपली तत्संबंधीं कळकळ कमी व्हावी. जर आपण विवेकशक्तीनें आपल्या इंद्रियांचें दमन केलें नाहीं, व पांचशें हातांच्या अंतरावर असलेल्या ओकवृक्षापेक्षां नाकाशीं असलेलें गुलाबाचें फूल जास्त मोठें वाटविणाऱ्या दृग्भ्रमापासून आपण आपली पूर्णपणें मुक्तता करून घेतली नाहीं, तर साधारण व्यवहाराप्रमाणें राजनीतींतहि आपण अर्भकापेक्षां अर्भक होऊं.

मला वाटतें ह्या देशाच्या सर्व विपत्तींचें कारण शोधल्यास एकच सांपडेल; तें हें कीं, आपण आपल्या सर्व प्रांतांचें, सामान्य, व्यापक संगतवार व नीट स्वरूप सतत आपल्या दृष्टीसमोर ठेवीत नाहीं व त्या प्रांतांचा वास्तविक संबंध व रोख ह्यांचें यथार्थ ज्ञान आपणांत नसतें. कमी झालेला भाग गाळून टाकला, तरीसुद्धां इंग्लिश राज्य अद्यापि विस्तीर्ण व विविध आहे. आपले अतिशय महत्त्वाचे हक्क काढून घेतल्यामुळें व भूषणावह असलेले आपणांतील सतेज पुरुष गेल्यामुळें हाउस ऑफ कॉमन्सची छाटाछूट झाली असली तरी पूर्ण सत्ता असतां जे विपुल हक्क बजावण्याची हाउस ऑफ कॉमन्सला सवय लागली होती, ते तसेच चालविण्यास व आजपर्यंत पूर्वीं कधींहि इतक्या मोठ्या नसलेल्या राज्याची देखरेख करण्यास आपण लायक आहों, असें आपली मर्जी असल्यास जगास दाखविण्याचें साधन अद्यापि आपणांस राहिलें आहे. पण जर आपण आपल्या कर्तव्याच्या मानानें स्वतःस अगदीच क्षुद्र करून घेतलें, जर उलट पक्षीं आपण आपलीं मनें त्यांच्या उद्देशांच्या आटोक्यापर्यंत विस्तृत केलीं नाहीं, तर खात्री ठेवा कीं, आपल्या मनाच्या परिणामास अनुसरून आपले व्यवहार आकुंचित होईपर्यंत आपल्या सभोंवतालची प्रत्येक वस्तु हळूहळू लुप्त होत जाणार. स्वतःच्या देशांतील क्षुल्लक गोष्टींविषयीं काळजी व कळकळ बाळगल्यानें आपल्या हिताविषयीं केलेल्या खोट्या अदमासाचे परिणाम टळतील असें नाहीं. अथवा लाजिरवाण्या मोडकळीच्या स्थितीस हें मोठें राज्य जें येणार, तें जबरदस्त वाताहत झाली असतां लहान सहान दुरुस्तीनें चुकेल असें नाहीं.

आपल्या देशाच्या मोठ्या आणीबाणीच्या प्रसंगीं आपण ज्या रीतीनें वागत आहों, ती रीत पाहून मला कांहीं अंशीं खिन्नता—बहुतेक निराशा वाटते, हें मी कबूल करितों. ह्या देशांतील मोठ्या हुद्याच्या जागांसंबंधीं बारीकसारीक गोष्टींचीसुद्धां सूक्ष्म चौकशी करण्यासंबंधानें हल्लीं ह्या सभेंत एक बिल आहे. अदूरदर्शी धन्याचे चाकर आपल्या धन्याला अतिशय हितावह असेल तें करीत नाहींत, तर त्याच्या नजरेसमोरचें काम मात्र करितात. फसवणुकीच्या सुधारणा करण्याकडे प्रधानाचें सारें लक्ष्य वेधलें असल्यामुळें ज्यांच्या योगानें ह्या देशाच्या

तिजोरींतून लाखों रुपये वायां जात आहेत, त्या हिंदुस्थानांतील निंद्य आजारांची चौकशी करण्यास त्यांना फुरसत नाहीं. एकसारखी उरसफोड करणाऱ्या व आर्धीच कमी पगार मिळत असलेल्या इंग्लिश नोकरांना पिळून काढण्याचा प्रयत्न करीत असतांच, दुसरीकडे प्रामाणिकपणें सरकारची ज्यांनीं कधींहि नोकरी केली नाहीं त्यांच्या प्रीत्यर्थ ह्या राज्याच्या महसुलाच्या दोन तृतीयांशाएवढी रक्कम ते उधळीत आहेत. आयर्लंडचा व्यापार सुधारण्याच्या बुद्धीनें दांत कोरून पोट भरण्याची युक्ति ह्या प्रधानांनीं चालविली आहे. हा प्रधानमंडळाचा प्रकार जरी कांहींसा विलक्षण व योग्य राज्यकारस्थानाला अननुरूप असा दिसेल तरी पण तो सर्वांशीं खरा आहे. पण याहून अगदी निराळ्या प्रकाराकडे आपलें लक्ष लावण्याकरितां, निराळ्या तऱ्हेच्या दुष्कृत्यांची चर्चा करण्याकरितां माझ्या मित्रानें आज आपल्यापुढें सूचना आणली आहे. आणि तुमचें राज्य लयास नेणारे निंद्य प्रचार तसेच चालू ठेवण्याकरितां विरुद्ध मंडळी पुढें आली आहे. ह्या बाबतींत पार्लमेंटनें बिलकुल चौकशी करूं नये, म्हणून जें प्रतिपक्ष्याचें म्हणणें आहे तें बरेंच शहाणपणाचें आहे. कारण, चौकशी करण्याविषयीं जरा कां त्यांनीं संमति दिली कीं, त्यांचा सर्व व्यूह ढासळून पडलाच. युद्ध किंवा तहासारख्या गुप्त राज्यकार्यांतहि चौकशी मना केलेली नाहीं, पण पैशाच्या देवघेवीच्या व्यवहारांत मात्र ती आहे. छपवाछपवीच्या प्रकारास असत्य विधानानें बळकटी आणावी लागते. त्या संमाननीय गृहस्थांनीं बुद्धिपूर्वक ज्या गोष्टी गुप्त ठेविल्या त्या सांगितल्या पाहिजेत. ह्याकरितां त्या त्या प्रांताची, कर्जाच्या प्रकाराची, व तें देणाऱ्या घेणाऱ्यांची थोडीशी तरी माहिती आपल्यास असणें अवश्य आहे.

मद्रास व आजूबाजूचा प्रांत हा पूर्वेकडील ब्रिटिश राज्याचा दुसरा भाग आहे. तेथील व्यापार अगदी थोड्या दिवसांपूर्वींपर्यंत एशियाखंडांत फार भरभराटींत चालला होता. परंतु ब्रिटिश अंमल चालू झाल्यापासून तो कमी कमी होत अगदी नाहींसा झाला आहे. तो इतका कीं सन १७७९ सालीं नांव घेण्यासारखा एकहि व्यापारी सर्व प्रांतांत राहिला नाहीं. ह्याप्रमाणें व्यापाराची दुर्दशा चालली असतां, फक्त चीनच्या रस्त्यानें कित्येक इंग्लिश गृहस्थांनीं दरसाल साठ लक्ष रुपये मिळविले आहेत. ह्याशिवाय दुसऱ्या मार्गानें व सोनें, रुपें

आणि जवाहीर ह्या रूपानें आलेले चाळीस लक्ष निराळेच. कर्नाटकांतून नुसत्या सन १७६० ते ८० पर्यंतच्या मुदतींत ह्या वाहत्या झऱ्याचा जर अंदाज केला तर तो वीस कोटींपेक्षां कमी होणार नाहीं. अर्काटच्या नबाबाकडून कंपनीच्या नोकरांचें देणें निघालें तिकडे प्रथम कंपनीचें लक्ष गेलें. हें कर्ज ८८० हजार पौंड होतें व तें सर्व मद्रासेस राहणाऱ्या इंग्लिश गृहस्थांचें येणें होतें; आणि त्यास व्याजाचा दर शेंकडा दहाप्रमाणें होता.

ही विस्मयकारक बातमी डायरेक्टरांना लागते आहे नाहीं, तोंच तीन गृहस्थांकडून त्यांस दुसरा एक असा अर्ज आला कीं, चीन देशांतलि व्यापाऱ्यांस आम्हीं दहा लाख पौंड दिले आहेत. ते तेथील राजाच्या मध्यस्थीनें वसूल करण्याकरितां मदत द्यावी. ह्या रकमेचें व्याज दरसाल दरशेंकडा २४ होतें. ह्या बातमीमुळें आश्चर्यानें थक्क झालेल्या डायरेक्टरांना आणखी असें समजलें कीं, एकोत्रा व्याजानें नबाबाकडून कंपनीच्या नोकरांचें आणखी चोवीस लाख पौंड येणें निघालें आहे. ह्याशिवाय त्याच व्याजानें एकलक्ष साठहजार पौंडाचें निराळें कर्ज होतेंच. हीं चारी कर्जें एकवट केलीं तर चार कोटी व बेचाळीस लक्ष पौंड होतात त्याचें व्याज सालीना सहालक्ष तेवीस हजार पौंड येत असे. ही रक्कम इंग्लंडांतलि जमिनीच्या वसुलाच्या एकतृतीयांशापेक्षांहि जास्त व ईस्ट इंडिया कंपनीच्या वार्षिक नक्की उत्पन्नाच्या दुपटीपेक्षांहि जास्त आहे. ह्यापैकीं तीन लक्ष ऱ्यायशींहजार दोनशें पौंड सालीनाचा बोजा कर्नाटकच्या सरकारि वसुलावर होता. हें प्रचंड कर्जपिशाच्च जेव्हां तरुण प्रधानाच्या नजरेस पडलें, त्यावेळेस त्यास त्या कर्जाच्या खरेपणाविषयीं संशय यावयास पाहिजे होता. बिनयोग्यतेच्या थोड्याशा क्षुद्र लोकांना पैसे मिळण्यासारखी जागा नसतां, सैन्याचें आधिपत्य नसतां, व कोणत्याहि प्रकारचा व्यापार धंदा नसतां थोडक्या वर्षांत [ कांहीं कांहीं लोकांनीं तर थोड्या महिन्यांत ] चांगल्याशा संस्थानच्या वसुलाइतकें द्रव्य कसें संपादन करतां आलें ह्याचा तपास त्यानें करावयास पाहिजे होता. ह्या प्रकरणासंबंधीं सर्व कागदपत्र वाचून स्वस्थ बसणाऱ्या प्रधानाचें धैर्य माझ्या मतें फारच विलक्षण आहे. त्या कागदांत नबाबानें डायरेक्टरांना लिहिलेल्या पत्रावरून आपोआप त्यास सर्व सुगावा लागला असता. सन १७६८

आणि ६९ त हैदरअल्लीबरोबर झालेलें युद्ध व कंपनीच्या नोकरांनीं त्याच्या इच्छेविरुद्ध त्यास करावयास लावलेल्या कित्येक गोष्टींचा उल्लेख केल्यानंतर तो लिहितो "ह्या सर्व गोष्टी जर कंपनीच्या वास्तविक हिताला प्रतिकूल असल्या, तर त्या माझ्या हिताला, माझ्या देशाच्या वैभवाला व माझ्या लोकांच्या सुखाला दसपट प्रतिकूल आहेत. कारण तुमचें हित त्यांतच माझें हित आहे. मग हें कशानें घडलें? माझ्या देशाचें नुकसान करून व तुमची नाचक्की करून स्वतःस सधन करून घेणाऱ्या थोड्याशा लोकांच्या खासगी विचारांचें हें फल आहे. कारण, ह्या देशांत तुमच्या नोकरांचा मुळींच व्यापार नाहीं आणि तुम्हीं त्यांना मोठा पगार देत नाहीं. असें असूनहि थोडक्यां वर्षांत लाखों रुपये घेऊन ते इंग्लंडला परत जातात." अल्पकाळांत कांहींएक उघड साधन नसतां एवढी जबरदस्त संपत्ति ह्यांनीं मिळविली, ह्याचें कारण तुम्हीं किंवा मी काय देऊं शकणार? कंपनीच्या नोकरांनीं इंग्लंडास पाठविलेली अवाढव्य संपत्ति योग्यरीतीनें मिळविण्यास कांहीं मार्ग नव्हता, असें नबाब आपणांस सांगत नाहीं काय? हिंदुस्थानांत बाकी राहिलेल्या कर्जाचा व्यवहार जास्त सचोटीचा व प्रामाणिकपणाचा आहे, असें तुम्हांस वाटतें काय? नबाबाच्या माहितीवरूनच तुम्हांस दिसेल कीं, जर ह्या मोठ्या रकमा खरोखरच उसन्या दिल्या असल्या तर ते स्वतःचे पैसे नसून लूट होती. आणि जर उसन्या दिल्या नसतील तर तो करार नसून फसवणूक आहे. निदान एवढें तरी खरें कीं, अधिकार न जुमानण्यांत ज्या कर्जाचें मूळ, तें वसूल करून देण्याकरितां सरकारनें मध्यें पडण्याचें कारण नव्हतें. नबाब ऋणको व कांहीं इंग्लिश गृहस्थ सावकार ह्यांच्यामध्येंच जर हा देण्याघेण्याचा प्रश्न असता तर मी निःसंशय ह्या भानगडींत पडलों नसतों; परंतु प्रतिपक्ष्यालाहि हें पक्कें ठाऊक आहे कीं, नबाब व त्याचे सावकार हे प्रतिपक्षी नसून एक मिलाफानें वागणारे आहेत. वास्तविक प्रश्न नबाब व हे लुटारू गृहस्थ एका बाजूस आणि त्या विध्वस्त प्रांताचे दुर्दैवी लोक दुसऱ्या बाजूस ह्यांमध्यें आहे. ह्या दाव्यांत वादी प्रतिवादी खरोखर हेच आहेत.

ह्या सावकारांचे मुख्य आश्रयदाते मि. डंडस ह्यांनीं त्यांचे तीन भाग केले आहेत. पहिले १७६७ सालचे, दुसरे कॅव्हलरी कर्जाचे आणि तिसरे १७७७ सालचे सावकार. ह्यांचा अनुक्रमानें आपण विचार करूं. मि. डंडस ह्यांचा असा आग्रह आहे कीं, पहिलें म्हणजे १७६७ चें कर्ज डायरेक्टरांच्या माहितीनें व सल्लयानें उघड रीतीनें दिलें असल्यामुळें तें न्याय्य ठरविलेंच पाहिजे. त्याचा व्याजाचा दरहि माफक म्हणजे दहाप्रमाणें आहे. रोख रुपये दिले असल्यामुळें सर्वांत हा सचोटीचा व्यवहार आहे हें कबूल आहे. परंतु बाकीच्यासंबंधानें मि. डंडस ह्यांनीं असत्य विधानें केलीं आहेत. डायरेक्टरांनीं आपल्या पत्रांत लिहिलें आहे "ह्या व्यवहार आमच्यापासून गुप्त ठेवला हें तुम्हांस दूषणास्पद आहे." हें पत्र १७६९ त लिहिलेलें आहे. ह्या कर्जाच्या फेडीकरतां म्हणून नबाबाच्या खासगी सावकारांनीं शांततेच्या दिवसांत दरसाल ३,२०,००० पौंड उत्पन्नाचे पंधरा प्रांत आपणांकडे लावून घेतले. शिवाय तंजावरच्या राजापासून नबाबाला दरसाल चार लाख रुपये खंडणी येत असे तीहि त्यांनीं आपणांकडे लावून घेतली. ह्या संबंधानें डायरेक्टर लिहितातः—"तुमच्यापैकीं तिघांनीं सन १७६७ च्या जानेवारी महिन्यांत हे प्रांत संपादन केले. पण १७६८ च्या ऑगष्टपर्यंत तुमच्या कागदपत्रांत त्याचा मागमूसहि नाहीं व नोवेंबरच्या पहिल्या तारखेपर्यंत ह्या व्यवहारासंबंधीं कांहींएक मजकूर लिहिलेला नाहीं." आतां पाठिमागून तरी डायरेक्टरांनीं ह्या व्यवहाराला आपली संमति दिली असें म्हणावें तर तसेंहि नाहीं. ते एका पत्रांत लिहितात 'ज्यांना कंपनीनें आश्रय दिला व इतक्या योग्यतेस चढविले त्या नोकरांनीं ह्या कामांत अगदी बेविश्वासूपणाचें वर्तन केलें आहे. त्यांनीं कंपनीचा फायदा करण्याचें सोडून दिलें व कंपनीच्या वजनाचा स्वार्थ साधण्याकडे उपयोग करून घेतला हें पाहून आम्हांस फार वाईट वाटतें.' मि. डंडस ह्यांनीं मोठ्या चातुर्यानें मद्रास सरकार व कंपनी ही एकच आहेत असें भासविण्याचा आव घातला आहे. मद्रास सरकाराला हें कर्ज पसंत होतें हें खरें आहे. परंतु हल्लींचा आरोप मद्रास सरकारावरच आहे हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. आतां ह्या लोकांचा ऋणी होण्यांत नबाबाचा उद्देश हा कीं, कंपनीला न जुमानतां ह्या लोकांच्या साहाय्यानें आपला कार्यभाग आटपून घ्यावा. त्यास

कांहीं मूर्ख लोकांनीं अशी मसलत दिली होती कीं, कंपनीशिवाय इतर लोकांशीं वळण ठेवल्यानें बराच फायदा होईल. त्यास असेंहि खात्रीपूर्वक सांगण्यांत आलें होतें कीं त्याच्या खासगी सावकारांच्यांत डायरेक्टरांचे हुकूम न जुमानण्याचें सामर्थ्य असून त्यांत त्यांचा फायदाहि आहे. ह्या सल्ल्यामुळें नबाबाचा कंपनी-वरील विश्वास कांहींसा ढळला होता. मि. डंडस ह्यांचें आणखी असें म्हणणें आहे कीं, ह्या रकमेला फारच नेमस्त म्हणजे दहाप्रमाणें व्याज आहे. पण वास्तविक प्रकार तसा नाहीं. नबाबाच्या एका पत्रावरून असें दिसतें कीं, मूळ कर्ज काढलें त्या वेळेस व्याजाचा दर दरसाल दरशेंकडा ३६ ठरला होता व पुढें तो २५ ठरून अखेरीस २० कायम झाला. ठरल्याप्रमाणें व्याज वेळच्या-वेळीं न मिळत गेल्यानें मुद्दल रक्कम बरीच फुगून तिच्यावर चक्रवाढ व्याज आकारलें जात असे. कंपनीला ह्याचा थोडा सुगावा लागल्यावर ह्या कामांत हात घालणें तिला अगत्याचें वाटल्यावरून तिनें व्याजाचा दर १० प्रमाणें ठरवून टाकला. हा व्याजाचा दर मुद्दलावर नसून व्याज आणि मूळ मुद्दल मिळून झालेल्या राशीवर होता. प्रारंभीं ठरलेल्या जबर व्याजाबद्दल व मुद्दलांत वेळो-वेळीं मिळत गेलेल्या व्याजानें चढलेल्या रकमेचा जर तुम्ही विचार केला, तर एकंदर ८,८०,००० पौंड कर्जापैकीं नबाबानें एक लाख पौंड तरी पाहिले होते किंवा नाहीं ह्याचा संशय घेतल्यास दोष लागणार नाहीं.

फॉक्सच्या इंडिया-बिलांत इ० स० १७६७ च्या कर्जाबद्दल व्यवस्था करून ठेविली होती, असें मि० डंडस ह्यांचें म्हणणें आहे; परंतु फॉक्सच्या बिलांत हें कर्ज वसूल करण्याची कांहींएक व्यवस्था केलेली नव्हती, इतकेंच नाहीं, तर कोणत्याहि ब्रिटिश प्रजेला कोणत्याहि कारणानें प्रांताचा वसूल आपल्याकडे लावून घेण्याची मनाई केलेली होती; पण पिटच्या बिलांत हें कलम मुद्दाम गाळून टाकण्यांत आलें. कॅव्हलरी कर्जाविषयीं मि० डंडस यांनीं स्तोत्रपाठ गाथिला आहे. देशाच्या बचावाकरतां, सैन्यांत बंड न होऊं देण्याकरितां आणि वसुलांत काटकसर करण्याकरितां कंपनीच्या मुकत्यारांच्या सांगण्यावरून हा व्यवहार झाला आहे, असें त्यांचें म्हणणें आहे. पण तो कंपनीच्या हुकमानेंहि झालेला नाहीं किंवा कंपनीच्या मुकत्यारांनींहि केलेला नाहीं, तर मद्रासच्या कायदेशीर

राज्यचालकांस एकीकडे सारणारे नबाब व त्याचे साथीदार ह्यांनीं केलेला आहे. आतां त्यासंबंधीं खरी हकीकत कागदपत्रावरून दिसून येते ती पुढें दिल्याप्रमाणें आहेः—ह्या सावकारांच्या मदतीनें नबाबानें ह्या राष्ट्राची सत्ता झुगारून दिल्याबरोबर त्यानें मोठें सैन्य ठेविलें; पण त्याचा पगार त्यानें कधींहि चुकविला नाहीं. अर्थात् त्याचे शिपाई नेहमीं शिरजोर असत. सैन्य कमी करण्याविषयीं त्याला ह्या लोकांनीं उपदेश केला व तो त्यानें मान्य केला; पण फौजेची बाकी थकलेली देण्यास जवळ कांहीं नाहीं असें तो म्हणूं लागला. अडचण काय ती हीच होती. नबाबाजवळ पैसे नव्हते. कंपनीजवळ पैसे नव्हते; पण एक मात्र उपाय होता. खासगी इंग्लिश सावकार जवळ होते, ते मदत करण्यास तयार झाले. कंपनीची संमति असेल तर काळ्या घोडेस्वारांचा पगार चुकविण्यास १,६०,००० पौंड देण्यास टेलर मॅजेंडी आणि कॉल हे कबूल झाले व मद्रास सरकारानें स्वतःला अधिकार नसतां कंपनीनें असले व्यवहार मना केले आहेत हें समजून असणाऱ्या नोकरांस कंपनीची मंजुरी दिली.

येथपर्यंत झालेला प्रकार अगदीच निंद्य नाहीं. आणि येथेंच मि० डंडस ह्यांनीं त्या व्यवहाराची हकीकत आटोपती घेतली आहे. त्याच्या पुढील हकीकत सांगून मि० डंडस ह्यांची गोष्ट मी पुरी करतों. खुद्द नबाबानें काय लिहिलें आहे तें पहा. " फौजेची बाकी चुकविण्याकरितां मि० स्ट्रॅटन ह्यांनीं टेलर वगैरे इसमांकडून मला चार लाख पौंड उसने देवविण्याचें आश्वासन दिलें. म्हणून मीं त्यांस आभारदर्शक पत्र लिहिलें. हे पैसे ताबडतोब मिळतील ह्या विश्वासावर नेमलेल्या दिवशीं बरीचशी फौज कमी करण्याविषयीं मी हुकूम दिला आणि कांहीं नोकरांना रजा दिली. कांहीं दिवसांनीं टेलर वगैरेनीं मला कळविलें कीं, आमच्याजवळ आतां रोख पैसे नाहींत, पण चार महिन्यांनीं ते देऊं. मला ह्याचें आश्चर्य वाटलें. कारण नोकरींतून शिपाई काढल्यावर काय होईल आणि काय नाहीं ह्याचा मला अंदाज होईना. फौजेंतील अधिकाऱ्यांना तुम्हीं सांगतां त्यावेळीं ही रक्कम द्या अशी मी टेलर वगैरेस विनंति केली आणि तत्क्षणींच त्या अधिकाऱ्यांना चार महिन्यांच्या अखेरीस तुम्हांला पैसे मिळतील व तोंपर्यंत तुमचा पगार चालू राहील असें सांगून आपल्या हाताखालच्या लोकांची सम-

जूत घालण्यास सांगितलें. तेव्हांपासून आज दोन वर्षे जवळ जवळ झालीं. पण टेलर साहेबांनीं फौजेची बाकी अद्यापि पुरी चुकविली नाहीं आणि तेव्हांपासून आजपर्यंत त्यांचा पगार चालू ठेवणें मला भाग पडलें आहे. थोडेसें व्याज सोसल्यावर सैन्य कमी करीन व त्याची थकलेली बाकी चुकवीन अशी माझी उमेद होती, पण असें न होतां उलट टेलर वगैरेस खातें लिहून दिलें तेव्हांपासून व्याजाचा बोजा व फौजेच्या पगाराचा खर्च मला सोसावा लागत आहे." हा उतारा नबाबानें गव्हर्नर हंबोल्ड यांस इ० स० १७७९ च्या मार्च महिन्यांत लिहिलेल्या पत्रांतून घेतला आहे. ह्याप्रमाणें टेलर वगैरेनीं रोख पैसे न देतां एक कागद लिहून दिला. त्याबद्दल नबाबानें लागलाच एका प्रांताचा वसूल त्यांच्याकडे लावून दिला व तो प्रांत त्यांच्याकडे पुष्कळ दिवस राहिला. आतां चार महिने होण्यापूर्वी नबाबास पैसे द्यावयाचे नव्हते व पुढें दोन वर्षे झाल्यावरहि ठरलेली सारी रक्कम त्यांनीं पुरी केली नाहीं. ह्यावरून नबाबानें लावून दिलेल्या प्रांताच्या वसुलांतूनच टेलर वगैरेनीं त्यास पैसे दिले असें अनुमान काढल्याशिवाय गत्यंतर नाहीं. ह्याप्रमाणें नबाबाचेच पैसे घेऊन त्यांतूनच त्यास एकोत्रा व्याजानें थोडथोडे परत देऊन अखेरीस १,६०,००० पौंड येणें त्यांनीं त्याच्याकडे काढलें. पण एवढ्यावरच संपलें नाहीं. इंग्लिश सावकारांना प्रांत तोडून दिल्यावर दोन वर्षांनीं नबाबाचा मोठा कामदार नबाबास लिहितो. "आपल्या हुकमावरून युरोपियन लोकांचें कर्ज फेडण्याकरितां त्या प्रांताचा सारा वसूल निराळा ठेविला आहे. टेलर साहेबांचे गुमास्ते वसूल गोळा करण्याकरितां तेथें येतात आणि सारा वसूल ते नेत असल्यामुळें फौजेचा ७।८ महिन्यांचा पगार चुकवावयाचा राहिला आहे." ह्याचा परिणाम असा झाला कीं इंग्लिश सावकारांचें पोट भरण्याकरितां उपाशीं ठेवलेली नबाबाची फौज त्याचा शत्रू हैदरअली यांस जाऊन मिळाली.

लबाडीचे आणखी मासले देतां येतील. मी आतां आपणास वाचून दाखवणार आहे तें पत्र मद्रासेंतील एका खात्रलायक मनुष्यानें जॉन केव्हरिंग यास लिहिलें आहे. तें ह्या प्रकरणाच्या दप्तरांत नाहीं. माझ्यावर विश्वास असेल तर तें खरें माना. केव्हरिंगचा बातमीदार म्हणतो " नबाबाला ठकवून पैसे मिळ-

विण्याची एक युक्ति मोठी अजब आहे. बहुधा नबाबाला कंपनीचें कांहींतरी देणें असतें. इकडे, गव्हरनर व पेढीवाले एक मिलाफानें वागत असल्यामुळें गव्हरनर पैशाकरितां नबाबाला तगादा लावतो, तेव्हां नबाब अर्थात् पेढीवाल्याकडे धांव घेतो. पेढीवाला पैसे देण्याचें कबूल करून ताबडतोब चिठ्ठी देतो, आणि नबाबाच्या खात्यांत रोख पैसे दिले म्हणून मांडतो. निराळा तनखा तोडून देईपर्यंत नबाब दरमहा शेंकडा दोन किंवा तीनप्रमाणें व्याज देतो. मध्यंतरीं अशी व्यवस्था केलेली असते कीं, कंपनीच्या चाकरीबद्दल नबाबावर कोणीहि मागणें करीत नाहीं. अशा रीतीनें पेढीवाल्याला एक पैहि रोख द्यावयास न पडतां नबाबापासून चापून व्याज मिळतें; व तें कायदेशीर लूट समजून वाटलें जातें." महाराज! येथें सावकारी धंद्यांतील कसब, खुबी व धूर्तपणा काय आहे तो तुम्हांस समजेल. त्याच्यायोगानें पॉल बेन्फील्डसारखे अजागळ, अनुभवशून्य तरुण गृहस्थहि एक अर्धा रुपाया कोणी द्यावयाला धजेल इतकी मालमत्ता जवळ नसतां प्रांत गहाण घेऊं शकतात, राजरजवाड्यांना आपले ऋणको करितात व लाखों रुपयांचे सावकार बनतात. मद्रास येथील कोर्टांत सावकारांनीं आपलें येणें शाबीत केलें आहे असें म्हणतात; पण तें निव्वळ खोटें आहे. राजाच्या मंत्रिमंडळानें पार्लमेंटच्या कायद्यांत सांगितल्याप्रमाणें चौकशी करण्याचें ठरवावयास पाहिजे होतें. पण तसें न करतां उलट त्यांनीं इ. स. १७७७ पासून १७८४ पर्यंत एकोत्रा व्याजाच्या दरानें झालेली व्याजाची रक्कम मूळ मुद्दल १,६०,००० पौंडांत मिळवून झालेल्या २,९४,००० पौंडांवर पुढें एकोत्रा व्याज घेण्याचें ठरविलें. ह्या सर्व व्यवहारांत सावकार म्हणून पुढें येणाऱ्या लोकांच्या खिशांतून एक पै गेलेली आढळेल तर चमत्कार मानला जाईल. अशा रीतीनें कॅव्हलरी कर्जाकरितां राज्याच्या वसुलापैकीं २,९४,००० पौंडांची व्यवस्था लावणें प्रधानमंडळाला योग्य वाटलें.

मि. डंडस ह्यांस ह्या तीन कर्जांपैकीं शेवटल्या संबंधानें कांहींच चांगलें म्हणतां येत नाहीं. उलट कंपनीच्या हुकुमाशिवाय तें दिलें असें त्यांनीं कबूल केलें. पण त्या कर्जाच्या समर्थनार्थ जरी त्यांस कांहीं बोलतां आलें नाहीं, तरी तें त्यांनीं सुरक्षित करून ठेवलें आहे. माझ्या मित्रांनीं सूचना आणतांना आप-

णास कळविलेंच आहे कीं, इ० स० १७८१ सालीं कलकत्त्यास त्या कर्जाचा वास्तविक प्रकार ठाऊक असणारे सावकार मुद्दलांतून शेंकडा पंचवीस कमी करण्यास सुद्धां खुषी होते; व त्या कमी केलेल्या मुद्दलाची बिलकुल व्याज न ठेवतांहि फेड होईल अशी व्यवस्था करावी म्हणून त्यांनीं विनंति केली. पण लोभप्रेरित आशेनें जें मागण्याची त्या कुमार्गी लोकांची छाती झाली नाहीं, तें त्यांस देण्यास इंग्लंडचे फडणीस तयार झाले आहेत. मनोदेवतेच्या भीतीनें शेंकडा पंचवीसांवर सावकारांनीं हक्क सोडला होता, ते त्यांस त्यानें परत दिलें. व पुढील व्याज बंद ठेवण्यास ते राजी असून तसें न करितां चार वर्षांचें एकोण्याप्रमाणें व्याज देववून व तें मूळ मुद्दलांत मिळवून त्यावर आणखी दरसाल दरशेंकडा सहाप्रमाणें सन १७८१ पासून व्याज देवविण्याचें त्यानें ठरविलें आहे. मि. डंडस ह्यांनीं तुम्हांस साफ सांगितलें आहे कीं, ह्या सगळ्या कामांत ह्या सावकारांच्या गुमास्त्यांवांचून दुसऱ्या कोणाबरोबरहि आपण भाषण केलें नाहीं. ह्या लबाडीच्या कामांत सर्वांचा भाग होता हें सिद्ध करण्यास ह्याशिवाय आणखी पुरावा काय पाहिजे ? बोलण्यांत आंवकणें, धरसोड करणें व आपल्या कृतीचीं निरनिराळीं कारणें सांगणें हीं अपराध केल्याचीं चिन्हें आहेत. मद्रासच्या अधिकारिवर्गास प्रधानमंडळानें पाठविलेल्या यादींत हें कर्ज शाबीत धरल्याचीं दोन कारणें दिलीं आहेत. पहिलें हें कीं, खुद्द ऋणको नबाब त्या विषयीं तक्रार करीत नाहीं. दुसरें, युरोपियन सावकरांचें देणें फेडलें म्हणजे देशांत पैसा खेळेल व हें प्रकरण असेंच अनिश्चित ठेवणें नुकसानकारक आहे. असें नबाबाला वाटत होतें. पण आज हीं दोन्हीं कारणें डंडस साहेबांनीं सोडून दिलीं आहेत. आतां ते तिसरेंच कारण सांगत आहेत. त्यांची निवडानिवड करण्यापेक्षां सर्वच खरें मानणें बरें. कारण ज्यात्रे येणें खरें असेल तो खोटें कर्ज उघडकीस आणल्याशिवाय राहणार नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे. कारण, डंडस साहेबांनींच आतां आपल्याला सांगितलें आहे कीं, कंपनीच्या नोकरांनीं केलेली लबाडी शोधून काढण्यास कोणताहि राजा तयार होणार नाहीं, व नबाबाशिवाय दुसरा पुरावा मिळणें शक्यच नाहीं.

नबाबाच्या दलालांनीं फसवल्यामुळें कित्येक लोकांनीं आपलें कष्टानें मिळविलेलें सर्वस्व त्यांच्या स्वाधीन केलें आहे हें खरें. ह्या लोकांचें वजन इंग्लंडांत किंवा हिंदुस्थानांत मुळींच नसल्यामुळें त्यांची दया येणें रास्त आहे. असल्या लोकांना निराळें न काढल्यामुळें प्रामाणिक व अप्रामाणिक हे सारखेच गणले गेले आहेत. त्यांची निवड करणें नबाबावर सोंपविलें आहे. पण आपल्या उपयोगी म्हणून इंग्लंडांत त्यांचें सामर्थ्य व वजन वाढलेलें पाहूं इच्छिणारा नबाब ह्या लबाडीच्या व्यवहाराला सहाय्यभूत झालेल्या सावकारांचें अप्रिय कधींहि करणार नाहीं. पण हे इंग्लिश सावकार कसेहि असोत. निःसंशय सात्त्विक सावकार जे आहेत ते तद्देशीय होत. हे संख्येनें फार असून दुर्दैवी आहेत. कर्नाटकाचा सर्व वसूल संपल्यामुळें त्या बिचाऱ्यांस कांहींच राहिलें नाहीं. ह्या लोकांनीं विश्वासावर पैसे दिले. कदाचित् त्यांच्या जवळून जबरदस्तीनेंहि ते घेतले असतील. पैशाबद्दल तारण त्यांच्याजवळ कांहीं नव्हतें; त्याचप्रमाणें पैसे वसूल करण्याच्या कामीं सहाय्य करण्यास त्यांस कोणतेंहि राष्ट्र अनुकूल नव्हतें. स० १७७७ च्या कर्जापैकीं मुख्य भागाचे गुणदोष व ते कसे वाढले ह्याचीं कारणें ह्याप्रमाणें आहेत. आणि अशा रीतीनें लांच व बेविश्वासूपणा ह्यांची भर करण्याकरितां खरोखर पैसे देणाऱ्या हतभागी तद्देशीयांविषयीं मंत्रिमंडळाचा तिरस्कार सुप्रसिद्ध आहेच. पण त्यामुळेंच असें घडलें असें नाहीं. कांहीं युरोपियन लोकांविषयीं सुद्धां त्यांनीं हाच नियम पाळला आहे. युद्धाच्या आरंभापासून अदमासें चार लाखांपासून दहा लाखांपर्यंतचा एक कर्जरोखा मद्रासेस झाला. कायदेशीर रीतीनें, उघड सचोटीनें व राज्यावरचें संकट टाळण्याकरितां हा व्यवहार झालेला आहे अशाबद्दल कोणासच संशय नाहीं. ह्या कर्जाची कांहींहि व्यवस्था केलेली नाहीं.

राज्याचा खर्चवेच जाऊन कर्ज फेडण्यास शिल्लक राहील असें समजून ती किती राहील हें पाहण्याच्या उद्देशानें एकंदर सर्व कर्जाची रकम साधल्यास शोधून काढण्याचा मी प्रयत्न केला, पण माझा सर्व प्रयत्न निष्फळ गेला सन १७६७ च्या कर्जापैकीं सुमारें २,२०,००० पौंड द्यावयाचे राहिले आहेत. व्याज किती टाकलें आहे तें मला समजलें नाहीं. निदान सात आठ वर्षांचें

व्याज भरलें तरी एकंदर रकम ३,९६००० पौंड होतात. ह्या कर्जांत कांहींहि एक दोष काढण्यासारखा नाहीं असें मंत्रिमंडळानें कबूल केलें असून, एवढ्याच कर्जावर चक्रवाढव्याज आकारलें नाहीं. कॅन्हलरी कर्ज ज्याला म्हणतात तें २,९४,००० पौंडाचें झालें आहे व ह्या व्याज आणि मुद्दल मिळून झालेल्या रकमेवर एकोत्र्याचें व्याज आकारलें आहे. सन १७७७ चें प्रचंड कर्ज किती होतें हें एक गूढ आहे. तें एकवट केलेलें कर्ज आहे; पण त्याची नक्की रक्कम कोठेंहि स्पष्ट सांगितलेली नाहीं. सन १७६७ च्या कर्जापैकीं एकवट केलेली रक्कम ८,८०,००० पौंड मुद्दल ठरविलें. सन १७७७ त जेव्हां पुनः सर्व कर्जें एकवट केलीं, तेव्हां त्यांची रक्कम एकंदर २३,००,००० पौंड झाली असें दरबारांत कळविलें होतें. परंतु पुढें ह्या एवढ्या मोठ्या रकमेची भीति वाटूनच कीं काय तींतून एकदम एक लाख कमी झालें. तथापि चार पांच लखांचें दुसरें अधांतरी एक कर्ज होतें, तें गरज लागेल तसें ह्यांत मिळवून पूर्ववत् २४,००,००० पौंडाची रक्कम होई. ह्याप्रमाणें हें कर्ज कमजास्त होत आलें. त्याची बारीक चौकशी करावयास आरंभ केला म्हणजे तें कमी होई व पुनः चौकशी मंदावली म्हणचे पूर्ववत् वाढे. खरें कर्ज आहे किती हें शोधून काढण्याचे सर्व प्रयत्न निष्फल झाल्यावर व्याजावरून ती रक्कम काढावयास मी लागलों. त्याकरितां मी कित्येक खतें व करार पाहिले. त्यापैकीं एकांत (एकीकडे, मुख्य लेखांत नव्हे,) १४,००,००० पौंडाची रक्कम लिहिलेली आढळली. पण दुसऱ्या कागदावरून हप्त्यानें द्यावयाच्या व्याजाची रक्कम जेव्हां मी मोजली, तेव्हां ती एकोत्र्याप्रमाणें वीस लाखांची झाली. नंतर दुसरें एक हप्तेबंदी खत लिहून घेतलेलें आढळलें. त्यांतील व्याज १४,००,००० मुद्दलाच्या व्याजाबरोबर आहे. पण पुढें तसेच कागद चाळीत असतां हें मुद्दल कोठें नाहींसें होतें. पुढें असेंहि लिहिलेलें आढळतें कीं त्या वेळेपर्यंत झालेल्या वास्तविक व्याजापेक्षां हप्तेबंदीचें खत कमी रकमेचें झालेलें आहे. अशीं येथें दोन सारख्याच प्रमाणाचीं पण दहा लाखांचें अंतर पाडणारीं दोन विधानें आहेत. निरनिराळीं कर्जें एकत्र करून तयार केलेल्या कागदांत कोणकोणाचें किती कर्ज ह्याचा स्पष्ट उल्लेख नसल्यामुळें, गरज पडेल त्याप्रमाणें कोणत्याहि

मनुष्याच्या नांवावर कितीहि रक्कम टाकण्यास संधि ठेवली आहे. अप्रामाणिकपणाचें अनुमान प्रथमदर्शनीं करण्यास इतकीं सबळ कारणें दुसऱ्या कोणत्याहि व्यवहारांत आजपर्यंत सांपडलीं नसतीं. पण सावकारांच्या नफ्यास वाहिलेल्या मंत्रिमंडळानें ह्या कर्जाची चौकशी दुसऱ्या कोणाजवळ न करतां, तें सरसकट वसूल करून घेण्याचा हुकूम दिला आहे. एवढया हकीकतीवरून आपण ह्याचा काय विचार करणें असेल तो करावा. ज्या ह्या बनावटकर्जाचा बोजा मंत्रिमंडळानें कर्नाटकावर टाकला आहे. त्याची खरी रक्कम किती होती हें ठरविणें अशक्य आहे. तें जबरदस्त चोरटें व चौकशीपुढें न टिकणारें आहे इतकेंच आपल्याला त्याविषयीं माहीत आहे.

हिंदुस्थानांतील विपुल संपत्तीमुळें आरंभींच कंपनीच्या सर्व प्रकारच्या नोकरांत स्वभावतःच स्पर्धा उत्पन्न झाली. पण कंपनींत निराळया प्रकारचे विचार जागृत झाले. त्यांनीं पाहिलें कीं ह्या नवीन संपादन केलेल्या मार्गानें आपल्याकडे तितकीच संपत्ति वहात नाहीं. उलट कंपनीच्या व्यापाराच्या ओहोटींत नोकरांच्या खासगी संपादनाची भरती येई. त्यांना अशीहि भीति पडली कीं, युद्धानें संपादन झालेलें वैभव युद्धानेंच नष्ट व्हावयाचें; म्हणून लढाया उपस्थित न करण्याविषयीं कंपनी वारंवार हुकूम सोडीत असते; व देशी राजांना लांच देतां येऊं नये म्हणून कंपनीच्या कोणत्याहि नोकरानें त्यांच्यापासून पैसुद्धां न घेण्याविषयीं त्यांस सक्त ताकीद केलेली होती. परंतु मनुष्याचे मनोविकार प्रबल झाले म्हणजे उपाय योजण्यांत तो प्रवीण असतो. मना केलेल्या पद्धतीपेक्षां जास्त फायदेशीर पद्धति लागलीच त्यांनीं शोधून काढली. नजर घेण्याऐवजीं ते सावकारी करूं लागले. आपल्या नांवानें लढाया न करतां, ज्याच्या नांवावर यथेच्छ लूट करतां येईल असा बिनजबाबदार व अप्रतिकार्य सत्ताधारी त्यांनीं तयार केला. हिंदुस्थानांतील प्रत्येक प्रांत जिंकून कबजांत येईल इतक्या लवकर सावकार ह्या नात्यानें आपल्या ताब्यांत घेण्याच्या इच्छेनें त्यांनीं नवाबास चढवून हिंदुस्थानचें साम्राज्य मिळवून देण्याची त्यास आशा लाविली. पण ह्याच्यापूर्वीं त्या विस्तीर्ण देशाचे तीन भाग करून एक मराठ्यांस एक कंपनीस व एक स्वतःस असें वाटून देण्याचें त्याच्याकडून त्यांनीं कबूल

करविलें. नबाबाकडे दक्षिण हिंदुस्थान ठेवण्याचें ठरविलें होतें. ह्या व्यवस्थेनें नवाबाला सैन्य पुरविण्यापलीकडे कर्नाटकांत कंपनीचें काम राहिलें नाहीं. ही व्यवस्था नबाबाकडून मोडली जाऊं नये म्हणून फ्रान्सची जिम्मा घेतली होती. ह्या प्रतिस्पर्धी राष्ट्रामुळें कर्नाटकांत वर्चस्व तर राहिलेंच पण बरोबरीच्या नात्यानें वागण्याचेंसुद्धां इंग्लिशांचें बंद झालें. ह्या राजद्रोही संकेतानुरोधानें इंग्लिश गृहस्थांनीं कर्नाटकांतील कंपनीची सार्वभौम सत्ता नष्ट केली. तेथील सर्व किल्ल्यांतून कंपनीचें लष्कर काढून घेतलें. परराष्ट्रांच्या वकिलांना घेण्याचें नाकारून त्यांस नबाबाकडे पाठवून देऊं लागले. कंपनीशीं फार दिवसांपासून सख्यत्वानें वागणाऱ्या तंजावरच्या राजावर त्यांनीं हल्ला करून त्याचा सर्व प्रदेश उध्वस्त केला व पन्नास लाख पौंड लुटींत मिळविले. नबाबाच्या नांवानें पण इंग्लिश फौजेच्या मदतीनें सर्व राजेरजवाड्यांस व स्वतंत्र मोठमोठ्या सरदारांस एका मागून एक असे त्यांनीं जेरीस आणून आपले गुलाम केले. ह्या देशविघातक जुलमी कृत्यांच्या व राजद्रोहाच्याबरोबर नबाबाचें कर्ज वाढत चाललें.

दक्षिण हिंदुस्थानांत हैदरअल्ली ह्मणून राजा असून त्याच्या ताब्यांत कर्नाटकचा पश्चिम भाग होता. ह्या हैदरअल्लीला समूळ उचलून टाकण्याचा त्या कारस्थानी मंडळीचा मुख्य हेतु होता. नबाब वास्तविक राजा असून हैदर बंडखोर आहे असें जाहीर करून त्यांनीं नबाबास उघड रीतीनें ह्मैसूरच्या गादीचीं वस्त्रें घातलीं. पण हैदर स्वस्थ बसणारा नव्हता. त्यांना लवकरच ह्या बंडखोराबरोबर मद्रासच्या दरवाजाशीं तह व सख्य करणें भाग पडलें. तह झाल्यापासून ह्या प्रतिस्पर्ध्याशीं सलोख्यानें वागणेंच शहाणपणाचें होतें. पण त्या तहावर नबाबानें सही करावी, निदान बरोबरच्या राजास सांप्रदायिक आदराचे व मानाचे शब्द वापरावे, ह्यासहि इंग्लिश सावकारांचा सल्ला मिळेना. तेव्हांपासून हैदरअल्लीच्या नाशाकरितां सारखी मसलत चालू झाली. जेव्हां हैदरअल्लीला असें आढळलें कीं, ज्यांच्याशीं प्रसंग पडला आहे, ते तहनाम्यावर सही करीत नाहींत, तहांचें अथवा सख्यांचें बंधन पाळीत नाहींत व मनुष्यांतील दळणवळणाचे कट्टे शत्रू आहेत; तेव्हां सर्व कर्नाटक उजाड करून टाकण्याचा त्यानें निर्धार केला. आपल्या प्रत्येक शत्रूबरोबर सख्य करून चोहोंकडून मिळेल तितकी

मदत जमवून तो अकस्मात् कर्नाटकच्या मैदानावर येऊन धडकला. पुढें झालेल्या प्रकाराचें वर्णन योग्य रीतीनें करणें अशक्य आहे. सर्वत्र आगीचा कल्होळ झाला. त्यांत एक घरहि टिकलें नाहीं. ज्वालामय ग्रामांतून पळत सुटणाऱ्या बिचाऱ्या लोकांपैकीं कांहींची कत्तल उडाली व आप्तजनांच्या वियोगानें दुःखी झालेले कांहीं बंदीवान होऊन दुष्काळाच्या जबड्यांत पडले. दररोज निदान ७० माणसें भुकेनें व्याकूळ होऊन रस्त्यावर मेलेलीं पडलेलीं सांपडत. मद्रास-पासून तंजावरपर्यंत सर्व प्रांत उध्वस्त करण्याचें काम १८ महिने चाललें होतें. त्यांत एक दिवससुद्धां खळ पडली नाहीं. कर्नाटकामध्यें चारी दिशेस शेंकडों मैल इंग्लिश फौज गेली, तेव्हां वाटेंत एकहि पुरुष, स्त्री, मूल अथवा कोणत्याहि जातीचें चतुष्पाद जनावर तिला आढळलें नाहीं. थोडेसे लहान किल्ले गाळले तर हें वर्णन अक्षरशः खरें आहे.

कर्नाटकाचें क्षेत्रफळ इंग्लंडच्या जवळजवळ आहे. एवढ्या मोठ्या प्रांतांत सर्वभर खराटा फिरला असतां देखील,ह्या विध्वंसकर्त्यास बक्षीस देण्याकरितां त्या प्रांताच्या वसुलाचा अंदाज करण्याइतकें वेडगळ प्रधानमंडळ बनलें आहे. "कर्नाटकाला ऊर्जितकळा पूर्वीप्रमाणें लवकरच येईल" ह्या ध्वनीनें कान अगदी किटले आहेत. त्यांना वाटतें कीं, मनुष्यें एकदम मोठीं व सशक्त निपजतील असें मानण्याइतकें आम्हीं अजागळ आहों. फार दिवसांचा जुलूम व लूट यामुळें दुर्दशा झालेल्या लोकांत सरकारला पोसण्याचें सामर्थ्य येण्याकरितां प्रथम सरकारानें लोकांना पोसलें पाहिजे. इंग्लंडप्रमाणें कर्नाटक सुपीक नसल्यारणानें लोक सुखी होऊन पूर्ववत् देशाचा वसूल उत्पन्न होण्यास फारच वर्षें लोटलीं पाहिजेत. कर्नाटकाची जमीन मूळची सुपीक नाहीं हें तेथील गुरांच्या आकारावरून सहज समजण्या-सारखें आहे. बर्नर्ड साहेबांनीं तयार केलेला नकाशा इंडिआ ऑफिसांतून आणून आपल्यापुढें हजर करण्याविषयीं मीं सूचना आणली होती. पण त्याप्रमाणें अद्यापि झालें नाहीं. त्याची एक नक्कल मी आपल्या स्वतःकरितां केलेली आणली आहे, त्यावरून आपणांस असें दिसेल कीं, निसर्गजन्य गोष्टींची उणीव मानवी कृतीनें तेथें भरून काढावी लागत आहे. तेथें नद्या, झरे, ओहोळ ह्यांचा पूर्ण

अभाव असून पर्जन्यहि ह्या देशांत एकाच ऋतूंत पडतो. म्हणून शेतकीच्या उपयोगाकरितां हिंदुस्थानाच्या भरभराटीच्या दिवसांत सर्व देशभर असंख्य पाण्याच्या टाक्या बांधलेल्या आहेत. ह्या नकाशांत सरासरी पांच मैलांत अकरा हौद मी मोजले आहेत. हे तुमची सत्ता झाल्यापासून बांधलेले नाहींत. ते लोकांना पितृतुल्य असलेल्या खऱ्या राजांनीं अंगीं औदार्यप्रेरित दानबुद्धीनें, व मनुष्य जातीचे पालक, पोषक आणि संरक्षक म्हणून आपलें नांव मरणानंतर चिरायु करण्याच्या सदिच्छेनें लोकांनीं बांधले आहेत. वर उल्लेख केलेल्या स्वारीपूर्वी पुष्कळ दिवस हल्लींच्या सावकारांनीं रयतेच्या पैशाचा दुरुपयोग केल्यामुळें ते हौद आधींच मोडकळीस आले होते. त्यांत हैदरच्या स्वारींत ज्यांची थोडक्यांत दुरुस्ती होण्यासारखी आहे असे फारच थोडे राहिले आहेत. अशा स्थितींत शहाण्या व न्यायी प्रधानमंडळानें इतर सर्व बाबतींत खर्च कमी करून उत्पन्नाची बाब वाढविण्याच्या कामीं प्रत्येक पै खर्च केली असती. पण हल्लींच्या प्रधानमंडळानें तसें कांहींएक न करतां, लबाड, लोभी, लांचखाऊ लोकांचे दुष्ट मनोविकार तृप्त करण्याची प्रथम तजवीज केली. नबाबानें तोडून न दिलेल्या प्रांतांचा सालीना वसूल साडेसोळा लक्ष पौंड येईल, ह्या लॉर्ड मॅकार्टनच्या अजमासावर विश्वास ठेवून प्रधानमंडळानें बंडखोर सावकारांचें कर्ज फेडण्यास डायरेक्टरांना हुकूम केला आहे. पण मॅकार्टननें वसुलाचा जो अजमास केला आहे, तो सर्व प्रांत उध्वस्त झाल्यानंतरचा नसून पूर्वीचा आहे, व त्याच्या पत्रावरून ही गोष्ट मंत्रिमंडळास समजलीहि होती. सर्वांत विशेष हें कीं, जो पुरावा पुढें आणावयास पाहिजे होता तो मंत्रिमंडळानें जाणूनबुजून व खोडसाळ बुद्धीनें मागें ठेवला. एका कमिटीचा रिपोर्ट माझ्या हातांत आहे; त्यावरून इ० स० १७८२ सालीं सगळ्या कर्नाटकाचा वसूल ४,८०,००० हजारांपेक्षां अधिक नव्हता. त्यांतहि ते प्रांत नबाबाच्या वहिवाटीस राहतील तर निम्मेसुद्धां उत्पन्न यावयाचें नाहीं, असें मॅकार्टनेच्या पत्रांत वारंवार सुचविलें असतांहि तें नबाबाच्या परत स्वाधीन करण्यांत आले. ह्यानंतर प्रसिद्ध झालेल्या हिशोबावरूनहि असें दिसतें कीं, उत्पन्न होण्याजोग्या प्रांतांचें उत्पन्न दरसाल ६ लाख पौंडांपेक्षां जास्ती नाहीं. आतां डंडस साहेबांच्या म्हणण्याप्रमाणें बारा लक्ष उत्पन्न जरी धरलें,

तरी त्यांतून फौजेच्या खर्चाकरितां वगैरे म्हणून नबाबास वर्षास २,४०,००० द्यावे लागतात ते वजा केले म्हणजे बाकी सुमारें ८,००,००० पौंड राहतात. त्यांतून प्रधानमंडळानें ५,००,००० कर्जाकरितां काढून ठेवले आहेत; बाकीच्या तीन लक्षांतून दरबारचा खर्च, बंदोबस्ताचीं ठिकाणें बांधणें वगैरे खर्च होणार.

कमिटीनें केलेला हा आशापूर्ण अजमास सयुक्तिक असला असें जरी मानलें, तरी हें ध्यानांत ठेवलें पाहिजे, कीं तुमच्या प्रधानमंडळानें त्या कमिटीला निरोप दिला, त्याचीं कृत्यें रद्द केली व त्यांनीं केलेले ठराव मोडले; आणि इंग्लिश लोकांच्या नेकीवर अद्यापि विश्वास ठेवण्याइतके भोळे असलेल्या दुर्दैवी अशा त्या प्रांतांतील लोकांस, लुटण्यास, तुरुंगांत टाकण्यास, हद्दपार करण्यास व वेळीं मृत्यूच्याहि तोंडीं देण्यास, अमीरउल् उमराव पॉल बेनफील्ड ह्या महादुष्ट जुलमी गृहस्थांच्या स्वाधीन केलें. कर्नाटकाच्या कजामध्यें नियामक मंडळानें अगदीं शेवटीं ज्याचा विचार केला तें खुद्द कंपनीचें कर्ज होय. इतर कर्जा-प्रमाणें ह्याहि कर्जाचा नक्की आंकडा कोठेंहि समजत नाहीं. तें किती आहे व कायदेशीर आहे किंवा नाहीं, हा प्रश्न जरी बाजूस ठेवला, तरी एक गोष्ट निश्चित आहे कीं, तें खासगी नव्हे. म्हणून सर्व राष्ट्रांतील नियमाप्रमाणें, ह्या कर्जाच्या फेडीची व्यवस्था प्रथम लावणें अवश्य होतें. परंतु प्रधानमंडळानें खासगी कर्जांना अग्रस्थान दिलें आहे. ह्या कामांतील खोटेंनाटें उघडकीस आणण्याच्या हेतूनें मी बोलत असल्यामुळें आपणांस खात्रीपूर्वक सांगतों कीं, कर्नाटकांतून कंपनीला एक पैहि येणें नाहीं. निघालेंच तर कंपनीला त्या प्रांताचें देणें निघेल. आणि ह्याचें कारण असें कीं, ज्या प्रांतावर त्यांनीं कर्जाचा बोजा बसविला आहे तो प्रांतच मुळीं त्यांचा आहे. पावसाच्या पुरानें शेताचें नुकसान झालें असतां दुसऱ्यावर येणें काढण्यासारखाच हा प्रकार आहे. नबाबाला कंपनीचें देणें आहे त्यावर व्याज नाहीं आणि कंपनीला जेव्हां जेव्हां पैशाची गरज लागे, तेव्हां तिला शेंकडा आठप्रमाणें लागतील तितके पैसे मिळत. ह्या दोन गोष्टी लक्ष्यांत बाळगल्या पाहिजेत. आतां व ह्या खासगी कर्जांचा प्रकार काय होता तो पाहा. नबाबाची बाकी थकली म्हणजे कंपनीच्या नोकरांकडून त्यास तगादा व्हाव-याचा. नबाबाजवळ पैसे नाहींतच. तेव्हां पॉल बेनफील्डसारखे धनपति शेंकडा

२४।३६ व्याजाच्या दरानें नबाबाचे प्रांत गहाण लावून घेऊन आपल्या खजिन्याचें कुलूप उघडण्यास तयार असतात. ह्यांत एक सरळ प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, नबाब नोकरांना प्रांत गहाण लावून देत असतां ते कंपनी स्वतःच कां घेत नाहीं ? पण तसें कांहीं एक न करतां नबाबाजवळून व्याजसुद्धां घेत नाहीं असा बाहेरून आव घालून आपले नोकर २०,२४,३६ व ४८ प्रमाणें-सुद्धां चक्रवाढ व्याजानें पैसे देऊन सावकारी करीत आहेत आणि कंपनी हें स्वस्थपणें बघत आहे. ह्या पद्धतीनें इंग्लंडएवढ्या मोठ्या देशाचा वसूल इंग्लिश सावकारभुंग्यांनीं लवकरच व्याप्त केला. त्याचा परिणाम तद्देशस्थ गरीब लोकांवर फारच भयावह झाला. धान्याचा कण मिळविण्याकरितां रक्ताचा एक बिंदु शरीरांत राहीपर्यंत बिचाऱ्यांच्या पाठीवर चाबकांचे फटके बसत असत.

नोकरांनीं खासगी रीतीनें देवघेवीचा व्यापार करूं नये, ह्या कंपनीच्या जुन्या हुकमाची अंमलबजावणी करण्याची सुरवात तुमच्या पूज्य प्रधानांनीं केली. पूर्वी असलेल्या कायद्याचें उल्लंघन केल्याबदल बक्षीस देऊन पाठीमागून तोच कायदा पुनः अमलांत आणणें हें विसंगत वर्तन आतां चांगलेंच उघडकीस आलें आहे. पण एकीकडे देवघेव करण्याची मनाई करून दुसरीकडे तसें करण्याविषयीं स्पष्ट परवानगी देणें ह्यास तुम्ही काय म्हणाल ? तो प्रकार असाः—कर्नाटकच्या वसुलांतून ४,८०,००० पौंड दरसाल आपल्यासमोर असलेल्या कर्जाकरितां निराळे काढून ठेवण्यास नबाबास ते सांगतात व ते वेळच्यावेळीं मिळावे म्हणून त्याच्यापासून जामीन घेतात. ह्या जामीनगिरीबद्दल नबाबास शेंकडा २४ प्रमाणें व्याज द्यावें लागून शिवाय प्रांत गहाण द्यावे लागतात. आतां हे जामीन कोण राहातात म्हणाल तर, हेच सावकार म्हणजे कंपनीचे नोकर. वर सांगितलेल्या जामीनगिरीचें व्याजाचें उत्पन्न दरसाल १,१८,००० पौंड होतें. प्रधानांनीं ह्या सर्व व्यवहार मोठ्या खुषीनें कबूल केला आहे. एथवर कर्नाटकच्या संबंधानें विचार झाला. आतां तंजावरच्या राजापासून कंपनीला घेणें आहे त्याचा प्रकार कसा आहे तो पाहूं.

फौजेच्या कुमकेबद्दल तंजावरच्या राजाकडे कर्ज झालें, असें कंपनीचें म्हणणें आहे. पण कोणत्याहि प्रकारची मदत न करतां एका छोट्या संस्थानावर मोठा रक्कम आम्ही लादली आहे. ही रक्कम राजाकडून वेळच्यावेळीं येत असे हें

इंडसनेंच कबूल केलें आहे. ती दरसाल १०,००० पौंड ठरली होती. नंतर एक शहर, बंदर आणि त्या भोंवतालचा ३० हजार पौंडांचा मुलूख कंपनीनें राजा कडून घेतला, त्याचप्रमाणें भर लढाईंत व नंतर बहुतेक प्रांत उध्वस्त झाला असतांहि ह्या राजानें कंपनीस पुष्कळ मोठमोठ्या रकमा दिल्या. इतकें करूनहि प्रधानांनीं त्याच्याजवळून आणखी प्रांत जुलमानें घेण्याचें ठरविलें आहे. तो किती व कशाकरितां ह्याचा अद्यापि खुलासा केला नाहीं. आजपर्यंत कोणत्याहि लढाईंत ह्या राजाचें अंग नव्हतें व पुढें लढाई करणें त्याच्या सामर्थ्याच्या बाहेरचें होतें. कारण, त्याच्याजवळ मुळींच फौज नाहीं आणि परराष्ट्राशीं पत्रव्यवहार करणें झाल्यास कंपनीच्या मार्फतच केला पाहिजे अशी अट आहे. तथापि आजपर्यंतच्या रीतीला अनुसरून कंपनीच्या नोकरांच्या मनांत जर एखादी लढाई उपस्थित करण्याचें आलें, तर त्या राजाचा सर्व वसूल जप्त करून घेण्याचा त्यांस अधिकार आहे. पण लढाई संपल्यावर हे पैसे परत करावयाचे असें तरी आहे काय ? कांहीं एक नाहीं. लढाईंत कंपनीला खर्च झाला असेल तो भरून येईपर्यंत देशावरची जप्ती कायम. म्हणजे देश कधींच मोकळा व्हावयास नको.

हैदरअलीच्या स्वारीपूर्वीं ह्या दुर्दैवी देशाचा एकंदर वसूल ३,६०,००० पौंडांचा होता. ह्यांतून वर सांगितल्याप्रमाणें १,६०,००० पौंड फौजेच्या कुमकेबद्दल कंपनी दरसाल घेत असे. ह्याशिवाय कर्ज. त्याची नक्की रकम मला समजली नाहीं. पण त्याच्यावर निःसंशय व्याज इतकें जबर आहे कीं, आजपर्यंत तसें कधीं कोणीं ऐकलें नसेल. म्हणजे शेंकडा अठ्ठेचाळीस; तेंहि दरमहिन्यास देण्याचा ठराव असून चक्रवाढीचा आकार ! आतां ह्यानंतर हिंदुस्थानची स्थिति सुधारणाऱ्या मुत्सद्यांनीं काय केलें पहा. १७६२ च्या तहाचा त्या राजास जो फायदा होत असे, तोहि त्यांनीं घालवला आणि शिवाय अर्कॉटच्या नबाबास दरसाल ४०,००० पौंड खंडणी देण्यास लावलें. नबाबाच्या हातांत राज्याधिकार होता तेव्हांहि त्यास खंडणी देण्याचें कारण नव्हतें. आतां तर कंपनीनेंच निर्माल्यवत् केलेल्या नबाबास खंडणी द्यावयास लावणें म्हणजे निव्वळ दरोडा घालणें होय. ह्या बिचाऱ्या राजाचें अस्तित्व कायम ठेवलें आहे तें एवढ्याच हेतूनें कीं, त्यांच्या नांवावर मनसोक्त जुलूम करतां यावा. लोकांचा मग-

दूर न पाहतां त्यांच्यापासून खंडणी घेणें निंद्य आहे. हिंदुस्थानची यत्किंचित् माहिती असणारास हें समजलें पाहिजे कीं, ह्या छोटेखानी संस्थानाचा निभ व कावेरी नदीवर लागत आहे. समाजाला सृष्टीपासून प्राप्त होत असलेल्या फायद्यांत राज्यकारस्थानानें अथवा राजाच्या स्वैर वर्तनानें व्यत्यय येतां कामा नये. नाहींतर चुकी, हयगय, आपत्ती किंवा क्षणैक लहर ह्यांच्या योगानें लाखों लोकांस दुर्भिक्ष सोसावें लागून निरपराधी राष्ट्र धुळीस मिळेल. सत्ता व अधिकार कोणाच्याहि हातांत जावो. पण मनुष्यमात्राच्या निर्वाहाचीं साधनें सृष्टिनियमांप्रमाणें अविकार्य पाहिजेत. पण कावेरी नदीच्या पाण्याचा उपयोग राजापासून पैसे उकळण्याचें साधन म्हणून या सावकारांनीं केला आहे. ०

अर्काटचा नबाब आणि तंजावरचा राजा ह्यांच्यामधील प्रांतासंबंधीं असलेल्या तंट्याचा अखेर निकाल करण्याचें काम डायरेक्टरांचें असतां, त्यांनीं लावलेला निकाल एकीकडे सारूनहि, आपण तो निःपक्षपातपणें केला असें मि. डंडस सांगत आहेत; पण हा त्याचा कोटिक्रम इतर बाबतींप्रमाणेंच पोकळ आहे. कारण, डायरेक्टर्सनीं केलेला निकाल फिरवितांना त्यांचें म्हणणें काय आहे तें, तसेंच आपआपल्या तर्फे पक्षकारांचें म्हणणें त्यांनीं ऐकून घेतलें नाहीं. ह्यावरूनच त्यांची न्याय करण्याची तऱ्हा समजणार आहे. त्याचप्रमाणें राजाच्या वतीनें एक शब्दसुद्धां न ऐकतां त्याच्याजवळून दरसाल ४०,००० पौंड घेण्याचा ठराव करणें हेंहि त्याच मासल्याचें आहे. इतकें असूनसुद्धां उलट ते असें म्हणतात कीं, एकाद्या पक्षाचे जे ओशाळे असतील तेच ह्या आपल्या ठरावाला नांवें ठेवतील. डायरेक्टरांविषयीं त्यांस काय वाटतें ? त्यांनीं कोणाजवळून पैसे घेतले ? अन्याय व जुलूम ह्यांच्या खालीं चिरडणाऱ्या लोकांच्या संरक्षणार्थ निरपेक्षबुद्धीनें व दृढनिश्चयानें एकादा मनुष्य श्रम करील, अशी त्यास कल्पनाहि होत नाहीं असेंच समजावयाचें काय ? अशा प्रकारचा आक्षेप माझ्यावर घेतल्याचें माझ्या लक्षांत आहे. त्याचा निखालस निषेध करणें पुरे आणि तेंहि सत्याविषयीं असलेल्या आदरबुद्धीमुळेंच करणें जरूर आहे. पण त्या गृहस्थांस समजावयास पाहिजे होतें कीं, सत्ताधीशांविरुद्ध विपन्न लोकांच्या वतीनें बोलण्याकरितां जो पैसे घेतो, तो जर पतकरलेलें काम निर्भीडतेनें

करील तर तो स्तुत्य कामगिरीबद्दल प्रतिष्ठितपणें मोबदला घेतो. आतां हिंदुस्थानांतील गरीब बिचाऱ्या लोकांकरितां आस्थापूर्वक श्रम करणारा मनुष्य भाडोत्रीपणानें तूं करीत आहे, असें अनुमान जर काढतां येईल तर तो दोष डंडस साहेबांच्या पायाजवळच येत आहे, ह्याचा त्यांनीं विचार करावा. कारण, त्यांनींच मूळ त्या विषयाकडे ह्या सभेचें लक्ष लावलें, व आपल्या रिपोर्टांत तंजावरच्या राजाला किती वाईट रीतीनें वागविलें व त्यामुळेंच मराठे आपल्या उलट कसे उठले, ह्याचा त्यांनीं वारंवार उल्लेख केला आहे.

आपल्या पक्षाच्या शुद्ध हेतूंविषयीं हे संमाननीय गृहस्थ ओरओरडून सांगत आहेत, राजाच्या व नबाबाच्या खोट्याकर्जासंबंधानें प्रधानांनीं केलेल्या व्यवस्थेंत त्यांची लबाडी व सावकारांशीं मिलाफ हीं जर मी सिद्ध केलीं, तर त्यांचे हेतु काय होते, हें मला निराळें सांगण्याची जरूरी नाहीं. कारण, त्यांच्या वर्तनें सद्हेतु सांगतांच येणार नाहीं. तथापि आपल्या सद्हेतूविषयीं फुशारकी मारीत असल्यामुळें असल्या नाजूक कामांत त्यांचें काय कर्तव्य होतें हें सांगणें भाग आहे. पैशाच्या कामांत संशय टाळण्याकरितां खालील साध्या नियमांकडे लक्ष दिलें पाहिजे. सावकार म्हणून पुढें येणाऱ्या लोकांच्या पुढाऱ्यांचेंच म्हणणें न ऐकतां सर्व पक्षकारांचें म्हणणें सारखें ऐकून घेणें, गुप्तपणें न वागतां होईल तितकें करून उघड रीतीनें वागणें, घाईघाईनें निकाल करून न टाकणें, ज्या हुकमान्वयें आपण वागतों त्या हुकमाचे नियम अक्षरशः पाळणें, आणि शेवटीं ओढूनताणून आपल्याकडे अधिकार न घेणें, हे थोडे नियम जर पाळले, तर निंद्य वर्तनाचा संशय येणार नाहीं; पण ह्यांपैकीं एकादा जरी पाळला नाहीं, तर त्या मानानें लोक संशय घेतल्याविना राहणार नाहींत.

हिंदुस्थानांत लुटलेल्या पैशावर पॉल बेनफील्ड ह्यानें पार्लमेंटची सुधारणा करणाऱ्या आपल्या विलक्षण प्रधानाला मागल्या पार्लमेंटमध्यें आठ सभासद आणून दिले. पण निवड झाल्याबरोबर त्यांनीं मद्रासला प्रयाण केलें. त्यामुळें त्या दिव्य मनुष्याबरोबर सल्ला मसलत करणें प्रधानास अशक्य झालें. परंतु अॅटकिन्सन नांवाच्या बेनफील्डच्या दलालाच्या संगतीचा योगागोग जुळून आल्यामुळें ही अडचण नाहींशी झाली. हल्लींच्या प्रधानाचा आणि ह्या गृहस्थाच

स्नेहसंबंध किती आहे तें प्रत्येकास माहितच आहे. "पिटचें इंडिया बिल" म्हणून साधारणतः प्रसिद्ध असणाऱ्या कायद्याच्या वाचनाच्या वेळेस ह्या गृहस्थांचें म्हणणें प्रधानाकडून कसें तत्परतेनें मान्य केलें जात असें हें सर्वांनीं पाहिलेंच आहे. पुढें ह्या गृहस्थांना मानमरातब मिळत गेला. इंडिया कंपनीचे ते डायरेक्टर बनले, लंडन शहरचे एक अधिकारी झाले आणि प्रधानांच्या ताब्यांत असलेल्या शहराच्या तर्फे लगेच पार्लमेंटमध्यें निवडून आले. गेल्या मोठ्या निवडणुकीचें काम ह्या बेनफील्डच्या दलालाच्या मार्फतच झालें व तें हिंदुस्थानांतील फायद्याकरितां केलें, तेव्हां निवडणुकीच्या कामीं उपयोगी पडलेल्या ह्या टोळीचा फायदा करून देणें त्यांना ओघानेंच आलें. आणि म्हणूनच त्यांच्या कर्जाची चौकशी करतां कामा नये. कित्येक वर्षेपर्यंत ह्या कर्जदारांमध्यें बेनफील्ड हा मुख्य भागीदार व कर्ता असलेला दिसतो. ह्या एकट्या गृहस्थाचें येणें नबाबाकडे पांच लक्ष पौंड निघत होतें व तेंच येणें आतां मंत्रिमंडळानें सन १७७७ पासून तों ८१ पर्यंतचें व्याज मुद्दलांत मिळविल्यानें ५,९२,००० पौंड होईल. पण बेनफील्डवर एवढे उपकार करून मंत्रिमंडळाचें समाधान झालें नाहीं. लॉर्ड मॅकार्टेने ह्यांनीं डायरेक्टर्सना असें कळविलें होतें कीं, जर तुम्हीं नबाबापासून सावकार जामीन मागाल तर बेनफील्डच हजार वाटेनें जामीन राहील व त्यामुळें सर्व कर्नाटकाचें स्वामित्व त्याच्याकडे जाईल. हें माहित असूनहि प्रधानांनीं बेनफील्डला जामीन देण्याविषयीं नबाबास हुकुम केला. तेव्हां दरसाल नबाबाकडून जे ४,८०,००० पौंड यावयाचे त्याच्याकरतां बेनफील्ड जामीन राहिला. त्याजबद्दल ह्या रकमेवर शेकडा चोवीस व्याज मिळत असे. हें व्याज व त्याच्या स्वतःच्या मूळच्या कर्जाचें व्याज मिळून त्यास दरसाल १,४९,५२० पौंडांचें उत्पन्न होईल.

आपल्यापुढें कर्जाविषयीं क्वचित् संशय उत्पन्न होईल असें वाटून व प्रधानाचें पाठबळ मिळेल असा अजमास नसल्यामुळें कर्जदारांच्या यादींतून आपलें नांव काढून टाकण्याची त्यानें युक्ति काढली. टेलर, मॅजेंडी आणि कॉल ह्या त्रयींच्या नांवावर त्यानें कर्ज चढविलें व त्यांच्यापासून खातें लिहून घेतलें. ह्याप्रमाणें, तिटकारा उत्पन्न करणारें बेनफील्डचें नांव व अवाढव्य कर्जाची रक-

महि थोडीशी कमी करून स० १७८३ त ड्यूक ऑफ पोर्टलंडच्या कारकीर्दीत सावकारांची यादी छापून प्रसिद्ध झाली. ह्यामध्यें अर्थात् बेनफील्डचें नांव नव्हतें. तेव्हांच नवाबानें (म्हणजे नवाबाकरितां बेनफील्डनें) डायरेक्टरांना लिहिलेल्या पत्राचा आणखी पुरावा पुढें आणला. ह्या पत्रांत बेनफील्डचा व माझा कोण-त्याहि तऱ्हेचा पैशाचा संबंध नसतांना शिष्टसांप्रदायाप्रमाणें त्यांचें मला भेटीस येणेंहि मॅकार्टने साहेबांनीं बंद केलें अशी त्यांच्याविरुद्ध नवाबानें तक्रार केली आहे. ह्याप्रमाणें स० १७७७ चें कर्ज पुष्कळ दिवसपर्यंत बाहेरून दिसावयास बेनफील्डचा त्यांत कांहीं संबंध नाहीं असें होतें. सरशेवटीं मद्रासेस बातमी आली कीं, ह्या कर्जास पार्लमेंटची मंजुरी मिळण्याच्या ऐवजीं फौजदारी होण्याचें मात्र घाटत आहे. तेव्हां सरकारी तिजोरींतून कर्ज वसूल होण्याची आशा बेनफी-ल्डला राहिली नाहीं. म्हणून त्यानें टेलर, मॅजेंडी आणि कॉल ह्यांवर मद्रास कोर्टांत फिर्याद केली. त्या वेळेस बेनफील्डनें रोख रुपये दिले नसून, त्याच्याकरितां प्रतिवादी ट्रस्टी आहेत वगैरे खरा प्रकार बाहेर आला. तेव्हां ती फिर्याद बेनफी-ल्डला काढून घ्यावी लागली व नवाबाचा सावकार म्हणून पुनः पुढें यावें लागलें. ही हकीकत इंग्लंडला पोंचण्याच्या पूर्वींच प्रधानांनीं १७७७ च्या कर्जाची व्यवस्था लावली. त्या वेळीं बेनफील्डच्या कर्जाचा कागदपत्रीं कोठेंहि उल्लेख नव्हता. उलट कर्ज नाहीं ह्याच्याबद्दल नवाबाचा व खुद्द त्याचा पुरावा होता. असें असूनहि आंतली खरी गोष्ट माहित असणाऱ्या प्रधानांनीं नवाबाचा व त्याचा देण्याघेण्याचा व्यवहार असल्यामुळें, मद्रासेस येऊन (कारण मॅकार्टने साहेबांनी तो मद्रासेस न यावा अशी व्यवस्था केली होती) परत नाबाबाच्या दरबारांत कारस्थानें चालविण्यास त्यास सवड दिली. पण तितक्यांत ह्या कृत्याची लाज वाटून नवाब किंवा त्याचें मंत्रिमंडळ ह्यांजबरोबर बेनफील्डनें संभाषण सुद्धां करूं नये अशी ताकीद दिली. परंतु नवाबाच्या दुसऱ्या मुलाबरोबर दळणवळण ठेवण्यास त्यानें मुळींच निर्बंध ठेवला नाहीं. त्याचें कारण असें कीं, नवाबाच्या नांवाखालीं होणाऱ्या गोष्टींचा कर्ता तोच असे, आणि बेनफील्डची व त्याची नवाबावर इतकी सत्ता असे कीं, ते कोणत्याहि कागदावर त्याच्यापासून डोळे मिटून सही करून घेत असत. मॅकार्टने साहेबांनीं हा सर्व मजकूर प्रधानास सांगितला

असल्यामुळें तो माहीत नाहीं असें त्यांच्यानें म्हणवणार नाहीं. ही हकीकत सांगिल्यावर प्रधानाचा व हिंदुस्थानांत खोटींनाटीं कृत्यें करणारांचा एकभाव नव्हता असें कोणासहि वाटणार नाहीं.

महाराज, ह्याप्रमाणें, मोठ्या निवडणुकीच्या वेळीं असलेला प्रधानांचा व ॲटकिन्सचा संबंध आणि बेनफील्डचा व ॲटकिन्सचा संबंध स्पष्ट करून सांगितला आहे. मंत्रिमंडळाला पाठबळ देणारी चमू पार्लमेंटमध्यें निवडून आणण्याच्या कामीं बेनफील्डनें आपल्या पैशाचा उपयोग केला हेंहि आपणास सांगितलें; ह्या कर्जामध्यें बेनफील्डचा मुख्य भाग व तो दृष्टोत्पत्तीस न येऊं देण्याबद्दल त्याचे प्रयत्न व प्रधानापासून त्यास मिळालेला उदार आश्रय ह्यांचाहि खुलासा केला. एवढ्यावरून आपल्या प्रधानाचें अंग ह्यांत होतें असें जर आपणांस वाटलें नाहीं, तर आरोपीच्या कबूलजबाबाशिवाय दुसऱ्या कशाच्यानेंहि त्याच्या अपराधाबद्दल तुमची खात्री होणार नाहीं.

# २ लग्नाच्या कायद्यावरील भाषण

इ. स. १७८१ च्या जून महिन्यांत फॉक्सनें लग्नसंबंधीं कायदा रद्द करण्याविषयीं हाउस ऑफ कॉमन्समध्यें एक मसुदा आणला. त्यावर जें बर्कनें भाषण केलें त्याचा सारांश येणेंप्रमाणें—" लग्नसंबंधीं असलेल्या कायद्यांत मुख्यतः दोन मुद्दे आहेत. पहिला हा कीं, २१ वर्षांचें वय होईपर्यंत वडिलांच्या संमतीशिवाय मुलांमुलींना लग्न करितां येऊं नये. आणि दुसरा, सर्व लग्नें जगजाहीर रीतीनें व्हावींत. अज्ञानाचें पालन कायद्यानें करावें किंवा नाहीं हा हल्लीं प्रश्न नाहीं. त्याचप्रमाणें अज्ञानस्थितीची कायद्यानें ठरविलेली मर्यादा इंग्लंडमध्यें फार आहे ह्याचाहि विचार कर्तव्य नाहीं. ह्या दोन्ही गोष्टींविषयीं साधारणतः वाद नाहीं. हल्लीं प्रश्न इतकाच आहे कीं कायद्याच्या सामान्य नियमांतून लग्नाची बाबत काढून टाकावयाची कीं काय? आणि दुसरा कोणताहि व्यवहार कायदेशीर करितां येत नसूनहि लग्नव्यवहार मात्र वडिलांच्या अनुमोदनावांचून अज्ञान मुलांमुलींना करितां यावा किंवा काय? त्यांना तो तसा करितां येऊं नये ह्याविषयीं मला मुळींच शंका नाहीं. निव्वळ प्रजोत्पत्तीनें विवाहाची कृतार्थता होते असें मानणें चूक आहे. नुसत्या प्रजावृद्धीकरितां नव्हे, तर प्रजापालन, शिक्षण वगैरे करितां आणि नीतिमय बुद्धिविशिष्ट जीवाचे सर्व हेतु साधण्याकरितां विवाहपद्धति ही प्रचारांत आली आहे. म्हणून समाजांत किती लोकसंख्या असावी एवढ्याचाच विचार न करितां किती उपयोगी लोक असावेत ह्याविषयीं विचार करणें समाजाचें कर्तव्य आहे.

व्यापारधंद्यांतलें कसब संपादन करून अथवा मानसिक सामर्थ्यानें तर एकीकडेच राहो पण नुसत्या शारीरिक शक्तीच्या योगानें कुटुंबाच्या पोषणार्थ मनुष्यांत पुरेशी ताकद येण्याच्या पूर्वीच तो प्रजोत्पत्ति करण्यास चांगला लायक होतो हें निश्चित आहे. एवढ्याकरितां मनुष्याच्या हातून होणाऱ्या मुलांची

जोपासना आणि शिक्षण योग्य रीतीनें होईल ह्याविषयीं कांहीं खात्री नसतां, त्यास समाजांत आणखी मंडळी घुसडून देण्याची परवानगी देणें हें सगळ्या समाजव्यवस्थेच्या विरुद्ध आहे. फार काय, हें अगदीं अन्यायाचें आहे. कुटुंबाच्या निर्वाहाचें योग्य साधन असल्याशिवाय जो प्रजोत्पत्ति करतो तो आपल्या मुलांचा भार दुसऱ्या माणसांवर टाकतो. आणि त्या मानानें त्यांस त्यांच्या स्वतःच्या मुलांचा निर्वाह करण्यास अडचण करितो. मूर्खपणानें झालेलें एक लग्न म्हणजे व्यवस्थित व योग्य रीतीनें झालेल्या बाकीच्या लग्नांवर करच होतो. म्हणून जुने कायदे शहाणपणानें केलेले आहेत. कारण त्यांच्या योगानें पूर्ण शारीरिक शक्तीचा, सज्ञानतेचा आणि स्वतःच्या संपत्तीचा विनियोग करण्याचा जो काल ठरला आहे, तोच काल राष्ट्रांत नवीन नागरिक उत्पन्न करून त्यांच्या निर्वाहाचा बोजा समाजावर लादण्यास परवानगी देण्याचा ठरला आहे. जेव्हां आईबाप स्वतःच आपल्या लहान मुलांचें लग्न करितात तेव्हां अशा लग्नाचे वाईट परिणाम न होऊं देण्याविषयीं ते एक प्रकारें जामीन असतात. मनुष्यस्वभावाचें ज्ञान असल्यामुळें ही जामीनगिरी समाजाला पसंत पडते. साधारणपणें आईबाप आपल्या मुलांची मूर्ख लालसा व तिची प्रस्तुत तृप्ति ह्यांकडे बिलकुल लक्ष्य देत नाहींत. बापाच्या अधिकाराची तुम्ही भीति मनांत बाळगूं नका.

मला वाटतें, मूळचा कायदा रद्द करण्याविषयीं पुढें आणलेल्या कारणांचा जरा जास्त विचार झाला असता तर बरें. असें म्हणणें आहे कीं, त्या कायद्याच्या योगानें संपत्तीचा संचय होण्यास, मोठ्या घराण्यांचें वर्चस्व कायम राहण्यास आणि संपत्तीला संपत्तीची भर पडण्यास सवड मिळते. तसेंहि कदाचित् होत असेल. समाजाला हितावह असणारे कायद्याचे किंवा राज्यव्यवस्थेचे कोणतेहि नियम देशांतील सुसंपन्न लोकांना फायदेशीर झाल्याशिवाय करतां येणें शक्य नाहीं. कधीं कधीं त्यांपासून दुष्परिणामसुद्धां घडतात. जे कायदे मालमत्तेचें संरक्षण करतात तेच मनुष्यांत लोभ उत्पन्न करतात. न्यायाधीशांची इभ्रत राखण्याच्या व्यवस्थेनें मनुष्यांत महत्वाकांक्षा व तिच्याबरोबर दुष्कृत्यें करण्याविषयीं मनाची प्रवृत्ति उद्भवतात. तथापि मालमत्तेचें संरक्षण होण्यास कायदे पाहिजेत आणि राष्ट्रांत न्यायाधीश, मानमरातब, उच्चनीच वर्ग हें सुद्धां

सर्व कांहीं पाहिजे. मग त्यापासून लोभ व महत्वाकांक्षा उद्भवण्याचा संभव असला तरी हरकत नाहीं.

कायद्यानें आईबापांचा अधिकार कबूल केल्यानें, मोठ्या घराण्यांतील आई-बाप सामान्यतः आपल्या अज्ञान मुलांचा संबंध आपल्याचप्रमाणें उच्च घराण्याशीं करण्याचा प्रयत्न करतील; परंतु ह्या अधिकारापासून प्रत्येक मनुष्याची संसारयात्रा कष्टप्रद करणारीं व मानवी समाजांतील अत्यंत प्रेमयुक्त बंधनें तोडून टाकणारीं हजारों संकटें टळतात.

पित्यांच्या लोभाविष्ट स्वभावाची तुम्हांस धास्ती पडली आहे; पण ध्यानांत ठेवा कीं, लोभाची तीव्रता ह्या ठिकाणीं बऱ्याच अंशीं कमी होते. कारण तो येथें प्रत्यक्ष दिसत नाहीं. पित्याचा स्वतःचा फायदा करून घेण्याचा प्रायः उद्देश नसतो, तर पुत्रवात्सल्यानें प्रेरित होऊन मुलाचें कल्याण करण्याच्या हेतूनेंच पितृलोभ दृष्टीस पडतो. ह्या प्रेमोद्भूत पितृलोभाला अवकाश मिळूं नये म्हणून खटपट करीत असतां बुभुक्षित द्रव्यार्थी लोकांचा लोभ सफल होण्यास मुबलक सवलत तुम्ही देत आहां. सहा शिवराईसुद्धां जिच्यापाशीं नाहींत, अशा कुमारिकेबरोबर देशांतर करणाऱ्या एकाद्या वराविषयीं कधीं कोणी ऐकिलें आहे काय? उत्तम व कोमल मनोविकार जो प्रेम त्याचें गांव ह्यास देऊं नका. हा तर निव्वळ दरोडा आहे.

सर्व कुटुंबाचा, जीवाचा आणि अब्रूचा जो निखालस शत्रु, किंबहुना सर्व समाजाला कलंक व लांछन असणाऱ्या मनुष्याला, वृद्धापकाळीं सुखसमाधानाचें जें स्थळ अशा अत्यन्त प्राणप्रिय कन्येला केवळ तिच्या मुग्धावस्थेंत पित्याची काळजी व संरक्षण ह्या मधून काढून फूस लावून नेण्यास व त्याबरोबरच सर्व आयुष्यभर कष्ट करून काळजीनें करून ठेवलेला अल्पस्वल्प संचय अशा नराधमाच्या हातांत टाकण्यास तुम्ही मुभा द्याल काय? सद्गुणी आणि प्रामाणिक पित्याच्या मुलीची गांठ दुर्गुणी आणि छिनाल माणसाबरोबर पडेल ह्याचा विचार करा. दोनहि जातींच्या तरुणांवर दया करा व अज्ञान व अनुभवशून्यता ह्यांपासून त्यांचा बचाव करा. आयुष्याच्या एका अवस्थेंतील व्यक्तींचें दुसऱ्या अवस्थेंतील व्यक्तींच्या व्यवहारचातुर्यानें व अनुभवानें संरक्षण करा. शहाणपणाच्या कायद्यांनीं आणि निसर्गप्रेमावर विश्वास ठेवून त्यांना वांचवा.

---

# सूची


अ

ॲडिसन् १२, १६८
अथेन्स १११, ११२
अनियंत्रित राज्यपद्धति ९८
अनियंत्रित राजसत्ता १११, १२८, १३९
अनियंत्रित व्यापार व्यापार पहा
अमेरिका १०, २०, ४६, ४७, ४८, ४९, ५०, ५५, १०४, १७८, १८८, १८९, १९०
अमेरिका व इंग्लंड-मधील बेबनाव ४४
अमेरिकेंतील इंग्लिश लोक ४६
अमेरिकेंतील (युरोपियन किंवा ब्रिटिश) वसाहती १४, २९, ३२, ६४
"अमेरिकेवर कर बसविणें" ४७
अमेरिकेवरील बर्कचें भाषण ४४, ४७, ४८
अमेरिकेसंबंधीं किंवा अमेरिकन वाद किंवा प्रश्न २०, २९, ४४, १८३, १८६
अमेरिकेशीं किंवा अमेरिकन युद्ध किंवा लढाई १८, ५५, ९१, २०४
अमेरिकन लोक २०, ४४, ४५, ४६, ४७, ४८, ५०, ५४, ७१, १०२, १८१, १८६, १९२, १९३
अमेरिकन लोकांस लिहिलेले विज्ञप्तिलेख १९७
"अमेरिकन लोकांशीं सख्य" ४७, १९६
अमेरिकन लोकांचें कायद्याचें ज्ञान ४८, ४९
अमेरिकन लोकांविषयीं बर्कचें ज्ञान ५०
अमेरिकन लोकांविषयीं बर्कची कळकळ ५०
अमेरिकन वसाहतवाले १०१
अरिस्टॉटल २७, ११३
अरेबिया १९८
अर्कॉटचा नबाब ८७
अर्स्किन १०१
असंस्कृत समाजाचा तरफदारी ११
अस्वस्थतेबद्दल बर्कचे विचार (लोकांतील) ३३

## आ


ऑक्सफर्ड १०१
आर्थिक धोरण फ्रान्समधील नवीन — 'नवीन राज्यपद्धतींतील दोष' ह्याखालीं पहा
"आधुनिक असंतोष" ३२
"आब्राहम् शाकल्टन्" ३
— चा नातू ३
— चें बर्कवरील प्रेम ४
आयर्लंड १, ७, १६, १७, २६, ५४, ५५, ६१, ६३, १७४, १७५, १७७, १७८, १८२, १८८, १९०
— चें पार्लमेंट १७८
— चें मंत्रिमंडळ १८२
आस्ट्रिया २९


## इ


इंग्लंड १, ७, ११, १३, १४, १६, १७, १८, २८, २९, ३०, ३७, ३८, ४०, ४४, ४८, ४९, ५४, ५७, ६६, ७२, ७३, ७४, ७५, ७७, ७८, ९२, ९४, ९६, ९७, १००, १०१, १०४, १०५, १११, ११८, ११९, १२०, १२५, १२८, १५०, १५३, १५६, १६०, १६१, १६२, १६३, १६७, १७०, १७१, १८८, १८९, १९०, १९२, २०२, २०४
इंग्लंड व अमेरिका ह्यांमधील वेबनाव ४४
इंग्लंडचा राज्यकारभार २९, १५६, १६०
इंग्लंडचा संक्षिप्त इतिहास १४, १७९
इंग्रज लोकांची धर्मविषयक अनुदार बुद्धि ५७
इंग्रजी कायदे ८०
इंग्रजी भाषा ६८, ६९, ८८, १०० १६०
इंग्लिश राज्यक्रांति ९६, ९७, ११८, ११९, १२०
इंग्लिश राज्यपद्धति ब्रिटिश राज्यपद्धति पहा
इंग्लिश राष्ट्र ७७, ७९, ९९, १७८
— चा चिकट स्वभाव ५४, ५५
इंग्लिश लोक ४४, ४५, ५४, ५५, ५७, ६३, ६६, ७१, ७३, ७७, ८१, ९४, ९६, १०३, ११८, ११९, १२०, १२१, १२२, १२५, १३०, १३९, १५३, १६१, १६८, १८८, १८९, १९०, १९३, २०२
— चा आपमतलबीपणा ४४
— चिकट स्वभाव ५४
— ची अनुदारता ६३
— ची द्रव्यतृष्णा २०
— पुराणप्रियता १२०, १२५

इंग्लिश लोकांची मत्सरबुद्धि ६३
— राजनिष्ठा ११९
— लोकांविषयीं बर्कचें मत ८
इंग्लिश सेना ९७
इजिप्ट १९८
इटली ३८
इंडिपेंडंट धर्मपंथ ५७
इंडियाबिल ६५, ७५, ७६
इंपे ७६

ई

ईस्टइंडिया कंपनी ३८, ३९, ६६, ७१, ७२, ७६, ७७, ८०

उ

"उदात्तता व सौंदर्य" १२, १४, ३७ १७९
एकसत्ताक राज्यपद्धति राजसत्ताक राज्यपद्धति पहा
एडमंड बर्क १, २

ओ

ओरिसा ६५
ओल्हा लोरन २

क

कॅथराइन् रशियाची राणी २९, १००
कॅथोलिकपंथ रोमनकॅथोलिकपंथ पहा
कॅथोलिक लोक रोमन कॅथोलिक लोक पहा
कॅन्टन १३१, १३२, १३३
कम्पनी ईस्ट इंडिया कंपनी पहा
कम्बर्लंड १०१
करार पाळण्याची आवश्यकता १४२
कर्नाटकावरील स्वारी १९७
कादंबऱ्याविषयीं बर्कचें मत बर्कचीं मतें ह्याखालीं पहा
कॉमन्स सभा हौस ऑफ कॉमन्स पहा
कॉम्यून् १३१, १३२, १३३
कायदे कसे करावे (नवीन) १३१ १८२, १८३
कायदेशास्त्राविषयीं बर्कचें मत बर्कचीं मतें ह्याखालीं पहा
कॉलविन् २०४
कारमार्थन लॉर्ड लॉर्डकारमार्थन् पहा
कॉर्क प्रांत १
कार्नो १६१
कुरदिस्तान १९८
कुराण ८०
कौलीखान ८३
क्रॅब् ५९, ६०
क्रॉम्वेल १५०
क्लाइव्ह ७३, ८१
क्रेकर (पंथ) ५७

ख

ख्रिस्तीधर्म १२५, १२६, १२७, १६९, १७०, १७२, १७४

ख्रिस्तोफर न्यूजंट १३

## ग

गॅरिक १०
गॉर्डनदंगा ५८
गिबन् १०१
गिल्ल ४,५
गोल्डस्मिथ् १, ६, १५७, १६६,१९६
ग्यारेट २
ग्रीक तत्ववेत्ते १९५
ग्रीक वक्ते १९
ग्रीस ९, १११, १९१
ग्रेट ब्रिटन् २९, १७५, १८६
ग्रेनव्हिल् लॉर्ड ग्रेन्व्हिल् पहा
ग्लॅस्गो येथील विद्यापीठ १०

## च

चवदावा लुई ९२, ९३
चार्ल्स फॉक्स फॉक्स पहा
चेतसिंग ८५

## ज

जनरल गेज ४९
जमाबंदीसंबंधीं फ्रान्सचें नवीन धोरण ‘ नवीन राज्यपद्ध-तींतील दोष ’ ह्या-खालीं पहा
जमेका बेट ५१
जर्मनी १३, २९
— चा बादशहा १००
जॉन् (राजा) १४
जॉन् टौन्शेंड ४५
जॉन् मॅकिंटॉश् (सर) सर जॉन् मॅकिं-टॉश् पहा
जॉन्सन् (सॅम्युएल) ४, ६, १२, १५, १६, १७, २१, २४. ३८, ४१, ६७, ६८, ६९, ७०, ७२, १५७, १६६, १६९, १९८, २०२, २०३,२०
जॉन्सनचें चरित्र २४
जॉन्सनचे बर्कविषयीं उद्गार १५
जॉन्सन व बर्क यांची तुलना ६८,६९
जॉन्सन व बर्क ह्यांच्या भाषण-पद्धतीची तुलना २०२
जॉर्ज (तिसरा) १८, २९,१०१
जॉर्ज ग्रेन्व्हिल् १८, २०
जुलूम १८७, १८८
— ची निरर्थकता १८६–१८८
जेन १३
जेम्स (राजा) १०५, ११९, १२०
जेंगिसखान ८३
जेसुइट १९
जोशुआ रेनॉल्डस् १५७,१६६,२०४
जोसेफ (दुसरा) २९
ज्युलिआना २

## ट

टर्कांचा सुलतान १९८
टलिअस सिसरो १९८
ट्रिनिटी कॉलेज ५

टोरी ६९
टौन्शेंड जॉन् टौन्शेंड पहा

ड

डब्लिन १, ३, ५, ३७
– चें विश्वविद्यालय १०१
डॉटस्ले १४, १५
डॉक्टर प्राइस् ११८, ११९, १२२
डॉक्टर बीटी ३८
डॉक्टर बुश् २०७
डायरेक्टर ३९, ६६
डिपार्टमेंट १३१, १३२, १३३
डिमॉस्थिनीस ६
डिसेंटर्स ५७, १७२, १७८
डुप्ले ८१
ड्यूक ऑफ बेडफर्ड १६०
ड्यूक ऑफ वेलिंग्टन् १६

त

तामरलेन् ८३, ८४
तिसरा जॉर्ज जॉर्ज पहा
तिसरी सभा १२१
तुर्कस्थान १५०

थ

थोरले बाजीराव ७३
थ्रेस १९८

द

देवासिंग ८२, १९७

ध

धनाढ्य लोकांची राज्यकारभारांत आवश्यकता १०९
धर्म १०४, १०६, ११९, १२५, १२६, १२९, १५४, १५५, १६९, १७०, १७२, १७३, १७४, १७५, १७६
धर्मबुद्धि १०५, १२४, १६९
धर्म व राज्यव्यवस्था ह्यांचें ऐक्य १५४
धर्मव्यवस्थेची आवश्यकता ११, १२
धर्मशिक्षण १०४, १२९
धर्मश्रद्धा १२९, १४९, १७३
धर्मसंस्था १२५, १२९, १३०
धर्मस्वातंत्र्य ५७, ११९, १२९, १५३, १७२
धर्माधिकारी किंवा धर्माध्यक्ष १२६, १२७, १२८, १२९
धर्माबद्दल सहिष्णुत्व (अन्य) १७२, १७३, १७४
धर्मराज १९०
धर्माविषयीं अनुदार बुद्धि इंग्रजांची इंग्रज लोकांची धर्मविषयक अनुदार बुद्धि पहा
धर्मोपदेशक १३०
धृतराष्ट्र ७४

न

नवीन राज्यपद्धतींतील दोष (फ्रान्समधील) १३१-१३९

—आर्थिक धोरणासंबंधीं १३३—१३९
—जमाबंदीसंबंधीं १३७, १३९
—निवडणुकीसंबंधीं १३१—१३३
—न्यायाधीशासंबंधीं १३६
—राजाच्या स्थितीसंबंधीं १३५, १३६
—सैन्याच्या स्थितीसंबंधीं १३७, १३९
नवीन व्हिग्‌पक्षाकडून जुन्या व्हिग्‌पक्षास प्रार्थना १४१
नॉक्स २०४
नाटकाविषयीं बर्कचा शोक १०
नाट्यकलेची दुर्दशा ९
'नाटचकलेवर एक सुरस निबंध' १४
नॉन्कन्फॉर्मिस्ट ५७
नॉर्थ लॉर्ड नॉर्थ पहा
निवडणुकीसंबंधीं फ्रान्सचें नवीन धोरण 'नवीन राज्यपद्ध-तींतील दोष' ह्या-खालीं पहा
नियंत्रित राजसत्ताक राज्यव्यवस्था नियमित राजसत्ताक राज्यव्यवस्था राज्यव्यव-स्था ह्या सद-रांत पहा
नेगल २
नेपोलियन बोनापार्ट १३९
न्यायाधीश फ्रान्स-मधील नवीन नवीन राज्यपद्ध-तींतील दोष ह्या-खालीं पहा

प

पक्षपद्धति समर्थन बर्कचें बर्क ह्या सदरा-खालीं पहा
पक्षाभिमानाचे दोष ५६
पंधरावा लुई ९३
परंपरागत समजुती वंशपरंपरागत समजुती पहा
परंपरागत गोष्टींचें अनुकरण ११६
पॅरिस ३०, १३४, १४४, १६४
पार्लमेंट इंग्लिश किंवा ब्रिटिश ९, १५, १६, १७, १८, १९, २०, २१, २२, २३, २५, २६, २९, ३०, ३१, ३२, ३३, ३४, ३८, ४०, ४२, ४३, ४४, ४६, ४८, ५०, ५१, ५२, ५४, ५५, ५६, ५७, ५८, ६०, ६१, ६२, ६३, ६४, ६६, ७१, ७२, ७४, ७५, ७७, ८०, ८७, ८९, ९७, ९८, ९९, ११९, १२०, १४१, १५३, १५६, १५८, १५९, १६०, १६३, १६५, १६८, १७२, १७९, १८३, १९६, २०३
पार्लमेंटची निवडणूक ३०
पार्लमेंटची महती ४२, ४३
पार्लमेंटची सुधारणा ५५
पार्लमेंटच्या सुधारणे-विषयीं बर्कचे विचार ३४
पार्लमेंटमधील तरुण मंडळी २०५
पिट २, १८, २०, २१, २७, ५७, ६४, ६७, ७७, ९४, ९६, ९८, १०६, १५९, १६०, १९५, २०४
पिटची योग्यता ६६, ६७
पूर्वापार समज 'वंशपरंपरागत सम-जुती' पहा
पेशवाई १७०

पोप ६
पोपसत्ता १९०
पोलंडचें पार्लमेंट १४७
पोलंडचा राजा १०१
प्यूरिटन् ५७
प्रजा व राजा ह्यांचा अन्योन्यसंबंध १०५
प्रजावात्सल्याचें राज्य-कारभारांत महत्व १८५
प्रजासत्ताक राज्य-व्यवस्था राज्यव्यवस्था ह्या सदराखालीं पहा
प्रतिनिधींचें मतस्वातंत्र्याविषयीं बर्कचे विचार २, ३
प्रधानमंडळ किंवा मंत्रिमंडळ १६, १८, २० २१, २५, ५५, ६१, ६२, ६६, ७५, १५६, १६१
प्रशिया १५०
प्रॉटेस्टंट ५७, ५८, १२०, १६९ १७४, १७७
प्राईस् डॉक्टर डॉक्टर प्राईस पहा
प्रिन्स बिस्मार्क २०७
प्रेस्बिटेरिअन पंथ ५७

## फ

फरक कसे करावे ह्याविषयीं बर्कचें मत १८०
फॅरोहा ८३
फॉक्स २, ३०, ३४, ३६, ४८, ५७ ५८, ६१, ६२, ६४, ६५, ६७, ७५, ७६, ८१, ८२, ९१, ९२, ९४, ९६, ९७, ९८, ९९, १०६, १५३, १५४, १६८, १९५, २०४, २०५, २०६
फॉक्सचे बर्कविषयीं उद्गार ९८
फॉक्स व बर्क ह्यांची तुलना ३४–३६
फॉक्स व शेरिडिन ह्यांची तुलना ६२
फारशीभाषा ७२
फ्रान्स १३, ३०, ३४, ४१ ९१, ९२, ९५, १००, १०१, १०२, १०४, १०६, १०८, ११२, १२१, १२२, १२३, १२८, १३०, १३४, १३९, १४०, १४६, १४८, १४९, १५०, १५३, १५६ १६१, १६२, १६६
— ची (नवीन) जमाबंदीची व्यवस्था १३७
— ची जुनी राज्यपद्धति १२८
— ची (नवीन) राज्यव्यवस्था ९७, १२१, १३१
— ची (नवीन) राज्यपद्धति ११२, १३२, १३३
— च्या (नवीन) राज्यपद्धतींतील दोष नवीन राज्यपद्धतींतील दोष पहा
— ची राष्ट्रीय सभा ९५, १०७, १३१, १५७
— ची स्थिति ९२, ९४
— चें जुनें पार्लमेंट १३६
— बरोबर युद्ध किंवा लढाई १५६, १६१, १६२, १६३
— मधील न्यायाधीश १३६
फ्रान्सशीं तह १६१, १६२, १६३, १६७

फ्रान्समधील राज्यक्रांति ३२, ३४, ६२, ७१, ९२, ९६, ९८, १०४, १०६, १०७, ११२, ११८, १२१, १२२, १४०, १४१, १५०, १५३, १६३, १७२, १७५, २०४, २०६
– चीं व्याप्ति ११६, ११७
– चे भावी परिणाम १२९
– बद्दल बर्कचीं मतें ९४, ९६
फ्रेंच क्रांतिकारक १२८, १३३, १४५
फ्रेंच तत्ववेत्ते १२५
फ्रेंच धर्माधिकारी १२६
फ्रेंच भाषा १००
फ्रेंच मंत्रिमंडळ १३५, १३६
फ्रेंच मुत्सद्दी १०८, ११०, ११२, ११८ १२५, १३१, १३२ १५०, १५२, १६४
फ्रेंच राजाची स्थिति १३५
फ्रेंच राज्यक्रांति फ्रान्समधील राज्यक्रांति पहा
फ्रेंच राज्यक्रांतीचे परिणाम १२९
फ्रेंच राज्यक्रांति-विषयीं विचार (बर्कचे) १००, १०१, १०३, १४१, १५०, १६१, १६६, १६९
– चें पुस्तक कसें लिहिलें गेलें ९९
– चा सारांश ११८–१३९
फ्रेंच लोक ४१, ४२, ८१, ९३, ९४, ९५, ९६, ९८, १०२, १०३, १०४, १०५, १०६, १०७, ११८, ११९ १२१, १२२, १२५, १२८, १३०, १३१, १३४, १३८, १३९, १४८, १४९, १५०, १५१, १५२, १५६, १६१, १६२, १६६, १७२
फ्रेंच लोकांच्या नीतिविरुद्ध आचरणाबद्दल बर्कचे उद्गार ४२
फ्रेंच सभा ११८, ११९, १२७, १२८, १३०, १३८, १३९
फ्रेंच समाज १०४
फ्रेंच सैन्य ९७, ८६१
– ची स्थिति व तिचे भावी परिणाम १३६
फ्रेडरिक (राजा) २९

ब

बकिंगहॅम् प्रांत अथवा शायर २५, ३८
बंगाल ६५, ७२
बनारस ८७
बॅरी ३७, ३८, १५७
बर्कचा इंग्लिश व्यापार-विषयक अभिमान १७
–चा जन्म १
त्वेष २०४
थोरपणा ५, २२, ३३
देशाभिमान २०५
नाटकाविषयीं शोक १०
निर्व्यसनीपणा १०
निरिच्छपणा ३९
निःस्वार्थ ६०
नैतिक आचरण २०३
पार्लमेंटांत प्रवेश १९

—चा पुत्रशोक १४१
पोषाक २०१
मृत्यु १६८
विद्याव्यासंग १०
—चा शरीर बांधा २०१
,, शोधकपणा ४
,, सत्याभिमान २०६
,, साधेपणा ५
,, सुस्वभाव ५९
,, स्वभाव २००
—ची अनुकरणशक्ति ११
जुलमाविषयीं चीड ४
त्वरित ग्राहकता ४, २३
दयाशीलता ३६,५९,६०,१६६, १६७, २०३
देशभक्ति २२
धंद्याविषयीं पराङ्मुखता ८
धर्मश्रद्धा १६९
पत्नी १३ } जेन, मिसेस
बायको १६८ } बर्क पहा
विद्यार्थिदशा १
सुशीलता ३
स्मरणशक्ति ४, २४, २५
स्वातंत्र्यप्रियता १७
—चें अमेरिकेवरील भाषण ४४–४७
औदार्य ३६
कवित्व ६
कुटुंब १
खासगी आचरण २०३
ग्रंथलेखन ८
दूरदर्शित्व ४२
धैर्य ५५, ६४
नीतिधैर्य ७७
न्यायप्रेम ७७
पक्षपद्धतिसमर्थन ३३, ३४
पार्लमेंटच्या सुधारणे-विषयीं प्रयत्न ५५,५६
प्राथमिक शिक्षण २
—चें ब्रिस्टल येथील शेरिफला लिहिलेलें पत्र ५०
रघुनाथरावास पत्र १७०, १७१
लहानपणांतील प्रकृति २
लहानपणचे गुणदोष ३, ४
लंडनचें वर्णन ८, ९
लेख ११
वक्तृत्व २१, ४५, ५६, १९५
वार्धक्य १४१
विद्यार्थीदशा १
संभाषणकौशल्य १५, १६
सूक्ष्मावलोकन ८
बर्कचीं मतें
इंग्लिश लोकांविषयीं ८
कादंबऱ्याविषयीं ९
कायदेशास्त्राविषयीं ८, ४९
धर्मव्यवस्थेविषयीं ११, १२
प्रतिनिधींच्या मत-स्वातंत्र्याविषयीं ५२, ५३
फरक कसे करावे त्याविषयीं १८०
राजकीय १७९
राजकीय फेरफाराविषयीं १३१
सरदार लोकांविषयीं ४०, ४१
बर्कचे उद्गार
फ्रान्सच्या अनीतिमत्तेबद्दल ४२
बर्कचे विचार

बळाविषयीं ४७, ४८
राज्यकर्ते व त्यांचीं कर्तव्यें ह्यांविषयीं १८५
लोकांतील अस्वस्थतेच्या कारणाविषयीं ३३,३४
वंशपरंपरागत समजुती राखणेबद्दल ११७
समतेविषयीं १०८, १११
स्वातंत्र्याविषयीं १०७, १०८
बर्कनें निर्दिष्ट केलेलीं राजनीतिसूत्रें ४७
बर्क व जॉन्सन ह्यांची तुलना ६८,६९
बर्क व जॉन्सन ह्यांच्या भाषणपद्धतींची तुलना २०२
बर्क व फॉक्स ह्यांची तुलना ३४-३६
बर्क व शेरिडन ह्यांची तुलना ६२
बर्काविषयीं जॉन्सनचे उद्गार १५
बहार ६५
बाजीराव थोरले थोरले बाजीराव पहा
बाथ १६७
बॉलिंग्ब्रोक ११, १२, १९६
बॉसवेल २४, २०३, २०७
बीकन्सफील्ड २५, १५९, १६६, १६७, १६८, २०१ २०३
बिटी (डॉक्टर) डॉक्टर बिटी पहा
बिस्मार्क प्रिन्स बिस्मार्क पहा
— चें चरित्र २०७
बुंदेलखंड ७३
बुश डॉक्टर बुश् पहा
बेनफील्ड ७६
बेंडोव्हर १९ वेंडोव्हर पहा
बोर्ड ऑफ डायरेक्टरर्स डायरेक्टर पहा
ब्लॅक्स्टनच्या टीका ४९
ब्राह्मण ८५, १७०
ब्राह्मणांचें मंत्रिमंडळ ८६
ब्रिटन २४
ब्रिटिश राज्यपद्धति ३१, ४२, १०७, ११२, ११८, १२३, १२५
ब्रिटिश राज्यव्यवस्था ४४,८०,१०७
ब्रिस्टल ५०, ५१, ५२, ५३, ६१, १८३, १८६, १८८
— ची निवडणूक ५१
ब्रिस्टल येथील शेरिफला लिहिलेलें पत्र ५०,१९२
ब्रुअम १९६, १९८

## भ

भगवद्गीता ५७, २०१
भगवद्वचन १०३
भवभूती २०६
भागवत १०३
भारत ४९
भीष्म १९०, १९१

## म

मॅकिंटॉश सर जेम्स मॅकिंटॉश पहा
मँचेस्टर ४६, ५१
मणिआर पार्शी १७१, १७२
मद्रास ७२
मंत्रीमंडळ प्रधानमंडळ पहा
मराठी भाषा ९८
मराठे लोक ७३
महाभारत ७३
मारी आन्त्वानेत ४२

मालमत्ता १२६
माल्टन प्रांत ५०, ५१, ५२, ५३, ६१, १५८
मिडल्सेक्स प्रांतांची निवणूक ३०, ३१, ३८
मिडल्सेक्स प्रांतांतील लोक ३०
मिल्टन २०४
मुत्सद्यांनीं विचार करावयाच्या गोष्टी १५४
मुसलमानी कायदे ८०
'मूळ समाजाची तरफदारी' १७९
मेकॉले ७९, ८७
मेथॉडिस्ट ५७
मेरी (फ्रान्सची) १९७
मेरी आणि विल्यम १२०
मेलँक्थॉन् २०४
मोरोपंत ६८
— चें काव्य ९८

## य

यॉर्क शायर ५२
युनिटेरिअन धर्मपंथ १५३
युरोप ६७, ७७, ८०, ९४, १०० १९४, २०४
युरोपियन राष्ट्रें १७२
युरोपियन सैन्य १६१

## र

रघुनाथरावास बर्कचें पत्र १७०, १७१
रशिया २९, १००, १५०
रॉकिंगहॅम् लॉर्ड रॉकिंगहॅम् पहा
रॉकिंगहॅम् पक्ष २३, २५, ३९, ४०, ६२, ६४
रॉकिंगहॅम् मंत्रिमंडळ २६, ३२, ५४
राजकीय फेरफार १३१
राजसत्ता १०८
राजसत्ताक राज्यव्यवस्था } राज्यव्यवस्था ह्या सदराखालीं पहा
राजाची स्थिति नवीन राज्यपद्धतींतील दोष ह्या सदराखालीं पहा
राजा व प्रजा ह्यांमधील अन्योन्य संबंध १०५
राजास पाठविलेलें मानपत्र १८९, १९७
राजाविषयीं लॉकचे विचार १०५
राज्यकर्ते व त्यांचीं कर्तव्यें ह्याविषयीं बर्कचे विचार १८५
राज्यकारभारांत धनाढ्य लोकांची आवश्यकता १०९
राज्यपद्धति १७९, १८०, १९१
राज्यव्यवस्था तीन प्रकारची १११, ११२
नियंत्रित अथवा नियमित राजसत्ताक राज्यपद्धति १११, ११२, १२८
प्रजासत्ताक राज्यपद्धति ५०, ९७, १११, ११२, ११३, ११४, ११५, ११६, १२६, १२८, १३२, १३६, १४३, १९१
राजसत्ताक राज्यपद्धति ७९, १११, ११२, ११३, ११४, ११५, १२६, १२८, १४३
स्वतंत्र राज्यपद्धति १८१, १८२, १८३
राज्यव्यवस्था म्हणजे काय १२३
राज्यव्यवस्थेचा मूळ उद्देश १८२
राज्यव्यवस्था व धर्म ह्यांचें ऐक्य १५४
रामचंद्र श्री रामचंद्र पहा

राष्ट्रीय सभा — फ्रान्सची राष्ट्रीय सभा पहा
रिचर्ड (बर्कचा बाप) १
रिचर्ड (बर्कचा भाऊ) २
रिचर्ड (आब्राहाम शाकल्टनचा मुलगा) ३
रिचर्ड (बर्कचा मुलगा) १५८, १६०
–चा अंत १५९
रूसो १०५, १०६, १५०
रेनॉल्डस् — जोशुआ रेनॉल्डस् पहा
रोजफुलर ४४
रोम ९
रोमन् कॅथोलिक पंथ ५७, ६३, १२९, १७४
रोमन् कॅथोलिक लोक ५४, ५८, ६१, ६२, १५८, १७४, १७५, १७६, १७७, १७८

## ल

लंडन ७, ८, १०, १६, २५, ३०, ३७, ५१, ५२, ५८, ५९, १५६, १६४, १६७, १६८, २०३
लंडनचें बर्कनें केलेलें वर्णन ८
लॉक् १०५
— चे राजाविषयीं विचार १०५
लॉर्ड कारमार्थन् ४६
लॉर्ड ग्रेन्व्हील् ५४
लॉर्ड चॅथम् १९५, १९६
लॉर्ड डलहौसी ८१
लॉर्ड नॉर्थ ६१, ६५
लॉर्ड बीकन्सफील्डची पदवी १५९
लॉर्ड ब्यूट ६३
लॉर्ड ब्रूअम् — ब्रूअम् पहा
लॉर्ड रॉकिंग्हॅम् १८, १९, २०, २१, २२, २६, २८, ३९, ४९, ५०, ६१, ६४, ९८
– चा स्वभाव १८
लॉर्ड लोक ७८, १९७
लॉर्ड वुल्स्ले १६
लॉर्ड वेल्स्ली १६
लॉर्ड व्हर्ने ५०
लॉर्ड शेलबोर्न् — शेलबोर्न पहा
लॉर्ड सभा — हौस ऑफ लॉर्डस् पहा
लिटररी क्लब २०३
लिमरिक प्रांत १
लुई चवदावा — चवदावा लुई पहा
लुई पंधरावा — पंधरावा लुई पहा
लुई सोळावा — सोळावा लुई पहा
लोकमत १८६, १८७
लोकसत्ताक राज्यपद्धति — प्रजासत्ताक राज्यपद्धति पहा
ल्यूथर २०४

## व

वंशपरंपरागत समजुती ११७, ११८, १२५
वंशपरंपरागत हक्कांचें महत्व ११०
वाकसकर १७०
वॉरन् हेस्टिंग्ज् — हेस्टिंग्ज् पहा
वार्षिक टिपण १४, १६
वॉलपोल — होरेस वॉलपोल पहा
‘विचार’ — ‘फ्रेंच राज्यक्रांतिविषयीं बर्कचे विचार’ पहा
विंड्हॅम् ८२
विदुर ७४
विल्क्स् ३०, ३१

विल्यम् १२०
विल्यम् स्मिथ् १७४
विविधज्ञानविस्तार १७०
वेंडोव्हर प्रांत २५,५० बेंडोव्हर पहा
वेन १०३
वेस्टमिनिस्टर ७२, १६८
वैवाहिक संबंध १६३, १६४
व्यापार अनियंत्रित १६४, १६५
व्यास ४९
व्हर्नें लॉर्ड व्हर्नें पहा
व्हाल्टेअर १०५, १०६
व्हीग ६९
व्हीगपक्ष ५८, ६४, ९८ १४१,
व्हीगमत ६९

## श

शंकराचार्य ५७
शाकल्टन् (आब्राहाम्) आब्राहाम शाकल्टन् पहा
शाकल्टन् (बर्कचा मित्र) ५
शिपमनी १८८
शिवाजी महाराज ७३, ७४
शिक्षा कशी करावी १८४
शुद्ध एकसत्ताक राज्यव्यवस्था ११३
शुद्ध प्रजासत्ताक राज्यव्यवस्था ११३, १२८
शेक्स्पियर ९
शेरिडन ६१, ७५, ७६, ८१, ८२, ९८, ९९ १९५
— चे गुणावगुण ६१, ६२
शेरिडन व फॉक्स त्यांची तुलना ६२
शेरिडन व बर्क त्यांची तुलना ६२
शेलबोर्न ६१, ६४
शेलबोर्न कारकीर्द ६५
श्री रामचंद्र १११

## स

सॅक्सन् लोक १४
सभा फ्रेंच सभा पहा
समतेबद्दल बर्कचे विचार १०८, १०९, १११, १२२
समाज ११५, १२६, १४५, १४६, १४७, १४८, १४९, १६९
— घटना अथवा रचना ११४, ११५
— व्यवस्था १२३, १४१, १७९
— स्थिति १२६, १४८
सर जेम्स मॅकिंटॉश् १६६
सरदार वर्गाविषयीं बर्कचें मत ४०
सर हरक्यूलिस १८५, १८६
सामाजिक कर्तव्यांचें स्वरूप १४३–१४५
सीझर २४
सुधारणा कशी करावी १८०, १८१
सैन्याची स्थिति नवीन राज्यपद्धतींतील दोष पहा
सोळावा लुई ९२, १०१
स्कॉच् लोक ६३
स्कॉट ७८
स्टँप ॲक्ट अथवा स्टँपचा कायदा २०, २१
स्टेट्स् जनरल १२१, १५०
स्पार्टा १११

स्वतंत्र राज्यव्यवस्था — राज्यव्यवस्था ह्या सदराखालीं पहा
स्वदेशासंबंधीं कर्तव्याचें स्वरूप — १४५
स्वातंत्र्याविषयीं बर्कचें विचार — ९५, १०७, १०८
स्विफ्ट — १, ६

ह

हॅझलिट — १९७
हणमंतराव — १७१
हॅमिल्टन् — १६, १७
हाऊस आफ कॉमन्स — हौस ऑफ कॉमन्स पहा
हाऊस ऑफ लॉर्डस् — हौस जाफ लॉर्डस् पहा
होरेस वॉलपोल — २९, ३०
हॉलंड — १५०
हिंदु — १७०
हिंदुधर्म — १७०
हिंदुधर्मशास्त्रांचें बर्कनें केलेलें वर्णन — ८५-८७
हिंदुधर्मग्रंथांचीं इंग्रजींत भाषांतरें — ८५
हिंदुलोक — ३९, ७५, ७७, ७९, ८० ८५, ८६, ८७
हिंदुस्थान — ३८, ३९, ५७, ६६, ६७, ७०, ७१, ७२, ७४, ७६, ७७, ८० ८१, ८२, ८७, ९३, ९४, १०१, १८८, १८९, १९३
—चे किंवा —वासी लोक — ८०, ८९, १०२
—तील लोकमत — ८३
हेल् — १५०
हेस्टिंग्ज — ७१, ७२, ७३, ७४, ७५, ७६, ७७, ७८, ७९, ८०, ८१, ८३, ८४, ८७, ८८, ८९, ९१
—चा खटला — ३९
—ची आरोप ठेवून चवकशी — ५
—ची चवकशी — ७१, ९१, ९७, १५८ १५९, १६८, १९७, २०४
—च्या कारकीर्दीची चवकशी — ७२, ९७
हैदरअली — १९७
हौस ऑफ कॉमन्स — ७, ८, ९, ३१, ४२, ५५, ६५, ६६, ७६, ७९, १११, २०५, २०६
हौस ऑफ कामन्स मधील वक्तृत्व — ९
हौस ऑफ हॉर्डस — २०, ५८, ६६, ७६, १११, १६०
ह्यूम् — ३८

# परिशिष्टाची सूची


अ

अर्काटचा नवाब, ७, ८, ९, १०, १२, १३, १४, १५, १८, २०, २१, २२, २३, २४, २५, २६, २७
– चें कर्ज १
ॲटकिन्सन् २५, २८
अमीर उल्‌उमराव २१

आ

आयर्लंडचा व्यापार ६

इ

इंग्लंड ४, ७, ८, १४, १५, १९, २२, २७, २९
इंग्लिश गृहस्थ ६, ७
– नोकर ६
– फौज १८, १९
– राज्य ५
– लोकांची नेकी २१
– सावकार ११, १२, १८, २२
इंडिया ऑफिस १९
इंडिया बिल १०

ई

ईस्ट इंडिया कंपनी १, २, ७, ८, ९, १०, ११, १३, १७, १८, २१, २२, २३
–चे नोकर ८, २३
–चें लष्कर १८

ए

एशिया खंड ६

क

कंपनी ईस्ट इंडिया कंपनी पहा
कर्नाटक ७, १५, १७, १८, १९, २०, २१, २२, २६
–चें क्षेत्रफळ १९
कलकत्ता १४
कॅव्हलरीकर्ज ९, १०, १३, १६
कॉल ११, २६, २७
कावेरी नदी २४
केन्हरिंग जॉन केन्हरिंग पहा
कोर्ट ऑफ डायरेक्टर्स २, ३, ७, ९, १०, २०, २४, २६
कॉर्टन् लॉर्ड कॉर्टन पहा

च

चीन ६
–देशांतील व्यापार ७

ज

जॉन केन्हरिंग १२

ट

टॉमस रंबोल्ट १
टेलर ११, १२, २६, २७

ड

डंडस हेनरी डंडस पहा
डायरेक्टर्स कोर्ट ऑफ डायरेक्टर्स पहा
डयूक ऑफ पोर्टलंड २७

त
तंजावर १९
—चा राजा ९, १८, २२, २४, २५
द
दक्षिण हिंदुस्थान १८
न
नबाब अर्काटचा नबाब पहा
प
पार्लमेंट १, २, ३, ६, १३, २५, २६, २७, २८
पॉल बेनफील्ड १३, २१, २५, २६, २७, २८
पिटचें बिल १०, २६
पूर्वेकडील ब्रिटिश राज्य ६
प्रधानमंडळ २, ३, ६, १३, १४, १५, १६, १७, १९, २०, २१, २४, २५, २६, २७, २८
फ
फॉक्स १०, २९
—चें इंडिया बिल १०
फ्रान्स १८
ब
बर्नर्डसाहेब १९
बेनफील्ड पॉल बेनफील्ड पहा
ब्रिटिशअंमल ६
म
मॅकॉर्टने २०, २६, २७
मॅजेंडी ११, २६, २७
मद्रास ४, ६, ७, १०, १२, १४, १५, १८, १९, २५, २७
—कोर्ट १३, २७
—सरकार ९, ११
मंत्रिमंडळ प्रधान मंडळ पहा
मराठे १७, २५
य
युरोपियन सावकार १४
युरोपियन लोकांचें कर्ज १२, १५
ल
लग्नाच्या कायद्यावरील भाषण २९
लंडन २६
लॉर्ड कॉर्टन् २०
लॉर्ड मॅकॉर्टने मॅकॉर्टने पहा
व
वेस्ट मिनिस्टर ४
स
स्ट्रॅटन ११
ह
हाऊस ऑफ कॉमन्स ५, २९
हिंदुस्थान १, २, ३, ४, ६, ८, १५, १७, १८, २०, २३, २४, २५, २६, २ , २८
हेनरी डंडस १, ९, १०, ११, १३, १४, २०, २३, २४, २५
हैदरअली ८, १२, १८, २३
—ची स्वारी २०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
क्र. ५१।२५

# आर्यसंस्कृति मुद्रणालय

संस्कृत, पाली, मराठी, इंग्रजी, फ्रेंच, व जर्मन या भाषांतील शास्त्रीय व विदग्ध वाङ्मय छापण्याची उत्तम सोय!

## लोकांचे अभिप्राय

**प्रो. द्रवीड,** सांगली:—

I may mention specially that the proofs sent to me from time to time were uncommonly good.

**डॉ. बेलवलकर:—**

The proofs were surprisingly good.

**प्रो. माधवराव पटवर्धन:—**

आर्यसंस्कृति-मुद्रणालयांत काम फार सुबक व कसोशीनें करण्यांत येतें. त्याचप्रमाणें कच्चीं मुद्रितें तपासण्यांत लेखकाचे परिश्रम वांचतील अशी काळजी घेण्यांत येते, याचा मला '**छन्दोरचना**' हें पुस्तक छापीत असतांना प्रत्यक्ष अनुभव आला आहे.

**हरि श्रीपाद घारे:—**

आर्यसंस्कृति छापखान्याचे चालक सुसंस्कृत असल्यानें पुस्तकाच्या छपाईंत व बांधणींत सौंदर्य साधण्यास उत्कृष्ट मदत होते असा मला अनुभव आला आहे.

**वि. द. घाटे:—**

सुंदर पुस्तक माफक दरानें छापवून घेणाऱ्यानें अवश्य आपल्या छापखान्याकडे धाव घ्यावी.

# आर्यसंस्कृति-मुद्रणालयांत विक्रीस असलेलीं पुस्तकें

प्रो. माधवराव पटवर्धनकृत छन्दोरचना — कागदी १॥। रु. कापडी २ रु.

प्रो. वा. ना. गोडबोले. श्री. वि. ह. घोरपडे. — रुपया अर्थात् आमचें चलन किंमत १।८

ना. गो. चापेकरः—गच्चीवरील गप्पा किं. १ रु.

ना. गो. चापेकरः—एड्मंड बर्कचें चरित्र किं. २ रु.

वि. स. कोल्हटकरः—सौख्यनिधान किं. १ आणा.

वि. कृ. नेरूरकरः—कवीची भेट (काव्य) किं. ६ आणे.

दिवाकर कृष्णः—समाधि व इतर सहा गोष्टी ०।१२ व १ रु.

माधवराव पटवर्धन—विरहतरङ्ग किं. ८ आणे

,, फार्सी-मराठी कोश २ रु.

## छापत आहेत

ना. गो चापेकरः—पैसा

डॉ. वा. गो. परांजपेः—Prof. J. Bloch कृत La Formation de la Langue Marathe या फ्रेंच ग्रंथाचा मराठी अनुवाद.

डॉ. वा. गो. परांजपेः—वेदांतसंग्रह. (ऋग्वेद, अथर्ववेद व उपनिषदें यांतील तत्त्वज्ञानपर वेंचे, मूळ, भाषांतर व अनुक्रमणिका यांसह.

मागविण्याचा पत्ताः—'आर्यसंस्कृति' मुद्रणालय, चिमणबाग, टिळक रोड, पुणें शहर.

### प्रो. माधवराव पटवर्धनकृत

## छन्दोरचना

मराठी भाषेंत सध्यां जी काव्यरचना होत आहे ती अनेक कालीं व अनेक देशीं प्रचलित अशा वृत्तांमध्यें होत आहे. यांपैकीं कांहीं वृत्तें पूर्वीच्या शास्त्रकारांनीं नियमबद्ध केलीं आहेत तथापि सर्व वृत्तांचा शास्त्रीय परामर्ष एकत्र घेतलेला 'छन्दोरचना' या पुस्तकांतच पाहण्यास मिळेल. 'भृङ्ग व पद्म' असे अनुक्रमें षण्मात्रिक व अष्टमात्रिक गण कल्पून अक्षररचनादृष्ट्या त्यांचे भिन्न प्रकार कसे होतात, यतिविराम कुठें कसे येतात, पद्यरचना कशी होते, कोणत्या भिन्न भिन्न मात्रावलि आठवतात, इत्यादि गोष्टींचें पुढें विवेचन केलेलें असून मात्रावलींना व जातिप्रकारांना परिमाणिक संज्ञा देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

ह्या पुस्तकांतील उदाहरणें म्हणजे एक अपूर्व पद्यसंग्रहच होय. त्याचप्रमाणें पद्याची भाषा या विषयावरील प्रस्तुत ग्रंथांतील विवेचन सर्वांना मननीय वाटेल. अभिनव कवींना व काव्यचिंतकांना हा ग्रंथ मार्गदर्शक होईल हें निःसंशय.

## या पुस्तकावरील अभिप्रायः—

गेल्या पन्नास वर्षांत किर्लोस्कर, देवल, कोल्हटकर प्रभृति नाटककारांनीं आणि केशवसुत, टिळक, तांबे, टेकाडे प्रभृति भावगीतात्मक गेय कविता रचणाऱ्या कवींनीं मराठींत अनेक नवीन वृत्तांची भर घालून, मराठीचें वृत्तभांडार पराकाष्ठेचें संपन्न केलें आहे. या सर्व नवीन गेय वृत्तांचें नामकरण करून त्यांना गणमात्रांचें बंधन घालण्याची बहुमोल कामगिरी प्रो. पटवर्धन यांनीं या ग्रंथांत केली आहे.... प्रो० पटवर्धन यांनीं वृत्तांना आणि जातींना दिलेलीं नवीन नांवें मात्र सर्वच सुटसुटीत, सुंदर आणि समर्पक आहेत.... या आणि खुद्द पटवर्धनांच्याहि स्वकृत उदाहरणामुळेंच छंदःशास्त्रावरील या रुक्ष ग्रंथाला पराकाष्ठेची रंजकता आली आहे.... एकंदरींत पटवर्धनांचा छंदःशास्त्रावरील हा ग्रंथ सर्वच दृष्टींनीं अभिनव आहे. त्यांच्या या ग्रंथामुळें मराठी वाङ्मयांत उपयुक्त व उत्कृष्ट भर पडली आहे, यांत शंका नाहीं. (महाराष्ट्र २१ ऑगस्ट १९२७).

रविकिरणमंडळ, पुणें, याचे एक सभासद माधवराव पटवर्धन, एम्.ए. त्यांचा 'छंदोरचना' हा नवा ग्रंथ पुणें येथील 'आर्यसंस्कृति मुद्रणालया'नें नुकताच प्रसिद्ध केला आहे.... छन्दःशास्त्रावर आजपर्यंत गोडबोले, चिपळूणकर, राजवाडे, रड्डी, जोशी इत्यादिकांनीं लिहिलेल्या सर्व ग्रंथांचा परामर्ष घेऊन हें पुस्तक लिहिलेलें आहे. परंतु तें केवळ अनुवादात्मक नसून त्यांत विचारस्वातंत्र्य पुष्कळच दिसून येतें.... पटवर्धन यांनीं त्या ग्रंथांत चिकित्सक बुद्धि कसून चालविली आहे इतकेंच नव्हे, तर छन्दःशास्त्राचा विषय अत्यन्त परिश्रमपूर्वक तळापासून ढवळून काढला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. ग्रन्थाच्या नांवाप्रमाणें त्यांत छन्दःशास्त्राचा विशेष विचार करून शिवाय त्यांनीं सातव्या व आठव्या प्रकरणांत, पद्यांतील व्याकरणविशेष व पद्यभाषा हीं जीं दोन प्रकरणें लिहिलीं आहेत तीं तर आमच्या दृष्टीनें फारच मौल्यवान आहेत. आणि त्याच्याउपयोगानें साहित्यविचाराला सर्वसाधारणरीत्या मार्गदर्शक पद्धतीची विशेष मदत होणार आहे.... विविधांमध्यें साम्य हुडकून काढतां येतें, व एकाचें रूपांतर फार थोड्या फरकानें दुसऱ्यांत करतां येतें हें उदाहरणें घेऊन दाखविण्याचा पटवर्धन यांनीं जो प्रयत्न केला आहे तो विशेष अभिनंदनीय होय व त्यांत त्यांची चौकसबुद्धि विशेष दिसून येते.... परंतु यानंतर 'पद्याची भाषा' व 'पद्यांतील व्याकरणविशेष' या दोन प्रकरणांत पटवर्धन यांनीं जे नियम किंवा सिद्धान्त दिले आहेत ते आम्हाला एकंदरीनें फारच पसंत वाटतात हें आम्हीं मोठ्या आनंदानें नमूद करतों. या प्रकरणांतील चर्चा फारच मार्मिक झालेली आहे.... एका वाक्यांत ग्रंथपरामर्ष करावयाचा तर आम्हीं असें म्हणूं कीं, साहित्यशास्त्रासंबंधानें मराठींत जे कांहीं ग्रंथ उपलब्ध आहेत त्यांत या ग्रंथानें मौल्यवान भर घातलेली असून, विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांत चालू करण्यासारखें पुस्तक मराठींत नाहीं असें म्हणणाऱ्यांना पटवर्धन यांनीं या ग्रंथानें सक्रिय असें उत्तर दिलें आहे. (केसरी ता. १३ सप्टेंबर १९२७)

**किंमत, कापडी बांधणी २ रु. (कागदी बां. १॥)**

---

(पत्ता:—आर्यसंस्कृति-मुद्रणालय, चिमणबाग, टिळकरोड, सदाशिव पेठ, पुणें)

ना. गो. चापेकरकृत

# गच्चीवरील गप्पा.

आधुनिक काळीं 'सुधारणा' नांवानें प्रसिद्ध असलेल्या चळवळीचा पहिला जोर कमी होऊन त्या चळवळीविरुद्ध घेतलेल्या आक्षेपानें त्रयस्थ लोकांचें मन साशंक झालें आहे. या साशंक वृत्तीचें उत्तम दिग्दर्शन, "हिंदुधर्म आणि सुधारणा" या प्रसिद्ध ग्रंथांत दिसून येतें. तशाच तऱ्हेचें निःपक्षपातीपणानें केलेलें समाजसंस्थांविषयीं विवेचन उपरिनिर्दिष्ट लहानशा पुस्तकामध्यें वाचकांस आढळून येईल. सर्वच सुधारणा वाईट असें आजकाल कोणीही म्हणूं शकणार नाहीं. प्रवाहपतित असे आपण सर्व सुधारक आहों; तथापि या मार्गानें किती दूरवर जावयाचें व असें करण्यानें प्राचीन संस्कृतीस व समाजस्थैर्यास धोका येईल किंवा काय हा विचार टाळतां येणार नाहीं. आंग्ल समाजाच्या अंध अनुकरणानें पुष्कळशा खोट्या व प्रथमदर्शनीं मोहक अशा अनेक सुधारणांचा आम्हीं अंगिकार केला आहे. त्यांविषयीं दुसरी बाजू सांगण्याचें धैर्यही पुष्कळांस होत नाहीं. लोकप्रवृत्तीच्या विरुद्ध बोलल्यास आपणच मूर्ख अथवा विक्षिप्त ठरूं अशी भीति वाटणें स्वाभाविक आहे. परंतु या भीतीचा आपणांवर पगडा न बसूं देतां तत्त्वकथन करणें हें खऱ्या समाजशास्त्रज्ञाचें लक्षण आहे. प्रस्तुत पुस्तकाच्या विषयानुक्रमाणिकेवरून असें दिसून येईल कीं, विवाह व स्त्रीस्वातंत्र्य या महत्त्वाच्या प्रचलित विषयांवर १३ निबंध आहेत; कुटुंबसंस्थासंबंधीं २ निबंध आहेत; या शिवाय सामान्य सामाजिक प्रश्नांवर ५ निबंध आहेत. लेखकाचा विशेष कटाक्ष स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्यावर आहे. या स्वातंत्र्यानें यूरोपांतील लोकांत किती हानि झाली हें ज्यांस माहीत आहे त्यांना हें बीं येथें रुजूं नये असें वाटणें अपरिहार्य आहे. हक्कांपेक्षां कर्तव्याचें महत्त्व अधिक आहे हें कार्लाइलनें प्रसिद्धीस आणलेलें तत्त्व ग्रंथकारानें स्त्रीस्वातंत्र्याच्या प्रश्नास लागू केलें आहे. एकंदरींत समाजांत विचारजागृति करणारे विचार या पुस्तकांत प्रत्येक पानावर सांपडतील. समाजशास्त्रांतील अनेक प्रमेयें त्यांच्या उदाहरणांसकट या लहानशा पुस्तकामध्यें ग्रथित केलीं आहेत.

या पुस्तकावरील अभिप्रायांतून कांहीं वाक्यें पुढें उद्धृत केलीं आहेत त्याव-रून या पुस्तकाच्या संग्राह्यतेबद्दल आपली खात्री होईल.

"पण जुन्या नव्याची भेसळ सुरू असतां त्यांच्या गुणावगुणांची चिकित्सा अधिकारी माणसांकडून होणें जरूर असतें; श्री. चापेकर आपल्या विद्वत्तेनें व दीर्घानुभवानें सर्वथैव पात्र आहेत यांत शंका नाहीं. त्यांनीं आपल्या पुस्त-कांस 'गच्चीवरील गप्पा' असें क्षुल्लक नांव दिलें असलें तरी त्या निव्वळ गप्पा नसून गंभीर विषयांची गंभीर चर्चा आहे हें वाचकांनीं विसरूं नये." (केसरी ३०-१-२७)

"एकंदरींत या गप्पांचा संग्रह विचारप्रवर्तक असून व तो वाचतांना "येषां स्वैरकथालापा उपदेशा भवंति च" या सुभाषिताची आठवण झाल्याविना रहात नाहीं." (महाराष्ट्र—नागपूर ता. १६ जानेवारी १९२७ चा अंक.)

"कै. चिपळूणकर, आगरकर, लो. टिळक, व गोळे यांच्या सारख्या दीप्ति-मान् लेखकांच्या लेखांनंतर सामाजिक विषयांवर इतक्या स्वतंत्र, मुद्देसूद व मार्मिक रीतीनें लिहिलेलें हें छोटेखानी असलें तरी पहिलेंच पुस्तक आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. श्री. चापेकर यांचें हें पुस्तक प्रत्येक कुटुंब-वत्सल महाराष्ट्रीयानें संग्रहीं ठेवून त्यांतील उद्बोधक विचारसरणींचें मनन केल्यास......महाराष्ट्रांतील सामाजिक स्थिति सुधारण्याचें एक प्रचंड कार्य केल्यासारखें होणार आहे" (नवाकाळ ९-१२-२६).

"पण आंत शिरतांच कमी अधिक मानानें प्रत्येक समाजसुस्थितिविषयक प्रश्नाचा खल, बहुश्रुतता व अनुभविक ज्ञान यांच्या साहाय्यानें निःपक्षपाती राहून विवेक-युक्ततेनें केलेला या पुस्तकांत सांपडतो." (श्रद्धानंद ता. २७-१-२७ चा अंक.)

कापडी बांधणी किं. १ रु.

३३२९

REFBK-0003329

'आर्यसंस्कृति' मुद्रणालय, चिमणबाग, टिळकरोड, पुणें शहर.